९८६३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २०१२

# प्रो. विजापूरकर यांचे लेख

संपादक : मु. गो. देशपांडे

REFBK-0013082

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

६५५८५
२०।३।७०
२०८२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

# प्रो. विजापूरकर यांचे लेख

# प्रो. विजापूरकर यांचे लेख

[ कै. विष्णु गोविंद विजापूरकर यांच्या शैक्षणिक, राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन लेखांचा संग्रह ]

संपादक :

प्रा. मु. गो. देशपांडे

इंग्रजी विषयाचे प्राध्यापक, नासिक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

अनुक्रम ५५५५ वि: निबंध

२०१२ २०।३।७९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

ग्रं. क्र. ३३०६२

REFBK-0013082

कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पुणें २.

प्रथमावृत्ति : १९६३

सर्व हक्क सुरक्षित

**किंमत : पंधरा रुपये**

प्रकाशक : **अनंत अंबादास कुलकर्णी**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे २.

मुद्रक : **केशव गणेश शारंगपाणी**, आर्यभूषण मुद्रणालय, फर्ग्यूसन कॉलेज रोड, पुणे ४.

विद्यापीठ हायस्कूल

व

राजाराम कॉलेज

या

कोल्हापुरांतील दोन

थोर शिक्षणसंस्थांना



कै. विष्णु गोविन्द (उर्फ अण्णासाहेब) विजापूरकर

जन्म : २६ ऑगस्ट १८६३ ] [ मृत्यु: १ ऑगस्ट १९२६

# विद्वद्वर्य ना. गो. चापेकर यांचा पुरस्कार

कै. विष्णु गोविंद विजापूरकर ह्यांचा लेखसंग्रह नाशिकचे प्रा. देशपांडे ह्यांनीं प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें अवश्य आहे. विजापूरकर वारल्यास बरींच वर्षें झालीं. मनुष्य मृत होतांच त्याचें रूप नष्ट होतें. मागें किंचित्काल नांव राहतें. तेंहि पुढें लोकांच्या स्मरणांतून जातें. नामरूपात्मक सृष्टीचा हा नियमच आहे. मात्र मृत माणसाचें कार्य अजरामर असतें. तें पाटीवरून पुसटूं म्हटलें तरी पुसटतां येत नाहीं.

देशाभिमानांत स्वदेशी वस्तूंचा वापर करणें; विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षणामृत पाजणें; तसेंच आपली संस्कृति म्हणजे आपली जीवनसारणी शक्य तितकी संभाळणें ह्या गोष्टींचा अन्तर्भाव होतो. अण्णा विजापूरकर हे अशा स्वरूपाच्या देशाभिमानाचें मूर्त प्रतीक होय. अशा जाज्वल्य स्वदेशी व्रत आचरणाऱ्या माणसाचे विचारतरंग कधींहि शिळे होत नाहींत. लोकांना त्यांची विचारप्रणाली समजून घेण्याची उत्कंठा असते. प्रा. देशपांडे ह्यांनीं मोठ्या प्रयासानें व उत्सुकतेनें हें कार्य करून मराठी वाङ्मयांत भर घातली आहे.

ह्या लेखसंग्रहाला संपादकानें जें प्रास्ताविक जोडलें आहे त्यावरून त्यांचा दीर्घ उद्योग, मार्मिक चिकित्सा, निर्मळ संशोधन, विजापूरकरांच्या कार्यावरील निष्ठा, इत्यादि गुण प्रतीत होण्यासारखे आहेत. प्रगल्भ भाषाशैलीच्या लेण्यानें ही प्रस्तावना अत्यंत वाचनीय झाली आहे.

ह्या प्रस्तावनेंत तीन व्यक्ति उठावदारपणें वाचकांच्या नजरेसमोर उभ्या राहतात. त्या म्हणजे कोल्हापूरचे शाहू महाराज, वामन मल्हार जोशी व स्वतः विजापूरकर ह्या होत. शाहू महाराज विद्येचे संस्कार नसलेले पण अफाट नैसर्गिक बुद्धिमत्तेचे; ह्या प्रास्ताविकांत वामनरावांचीं म्हणून जीं वाक्यें उद्धृत केलीं आहेत त्यांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, मनुष्य स्वभावानें सौम्य किंबहुना मवाळ असला तरी विचारानें उग्र, तीक्ष्ण व कठोर असतो. स्वभाव आणि विचार ह्यांतील भेद पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. खुद्द विजापूरकर कसे होते ? ते टिळक होते कीं गोखले होते ? टिळक म्हणजे इंग्रजी गोखले व गोखले म्हणजे मराठी टिळक असा समन्वय करणें विजापूरकरांनाहि संमत होतें. विजापूरकरांचा गोखल्यांकडे ओढा होता त्यामुळें

विजापूरकरांनीं पुष्कळांचा रोषहि ओढवून घेतला होता. माझ्या मतें कोणताहि नांव घेण्यासारखा मनुष्य कोणत्याहि पुढाऱ्यांचा पूर्णांशानें अनुयायी नसतो. त्याचें स्वतःचें व्यक्तिमत्त्व असतेंच. ह्यास्तव विजापूरकर अंशतः टिळक, अंशतः गोखले व अंशतः स्वतः अशा निरनिराळे गुण असलेल्या त्रयीच्या रसायनानें बनलेली मूर्ति असें मानणेंच सयुक्तिक ठरेल.

पुणें, ९–८–१९६२ — ना. गो. चापेकर

# संपादकाचें निवेदन

'प्रो. विजापूरकर यांचे लेख' हा ग्रंथ वाचकांच्या हातीं देतांना मला अतिशय समाधान वाटत आहे. याचें मुख्य कारण म्हणजे विजापूरकरांबद्दल अधिक यथार्थतेनें व न्यायीपणानें विचार करण्यास या लेखसंग्रहाची खात्रीनें मदत होईल अशी माझी श्रद्धा आहे. 'राष्ट्रीय शिक्षणाचा ध्यास घेतलेले व त्या ध्येयासाठीं अहोरात्र कष्ट करणारे सात्त्विक वृत्तीचे गृहस्थ म्हणजे विजारपूकर'; 'कोल्हापूरच्या त्या वेळच्या वेदोक्त चळवळीची झळ लागून त्यांची नोकरी गेली आणि दरबारचा रोष झाल्यानें पुढें अकारण त्यांना तुरुंगवास सोसावा लागला'; 'त्यांचें 'समर्थ विद्यालय' इंग्रज सरकारनें बंद पाडलें आणि महत्प्रयासानें त्यांनीं तें पुन्हा 'नवीन समर्थ विद्यालय' या नांवानें चालू केलें.' एवढीच स्थूल कल्पना महाराष्ट्रीय जनतेंतील कांहीं जाणत्यांना आहे. आजचे विजापूरकरांचे भक्त या गोष्टीखेरीज इतर कांहीं जाणत नाहींत. खुद्द तळेगांवच्या नवीन समर्थ विद्यालयांतील कार्यकर्त्यांनादेखील विजापूरकरांच्या वाङ्मयीन व वैचारिक कामगिरीची पुरेशी कल्पना आहे असें मला वाटत नाहीं. थोडीशी अधिक माहिती असणारांचा जो वर्ग आहे, त्यालाहि

**"लेखक बहु मेळवुनी सद्ग्रंथांची विणोनिया माला**
**लेवविली स्वजनांतें नच तो गुरु विष्णु वंद्य कोणाला?"**

एवढाच प्रश्न सुचतो, पण अगदीं थोड्यांनाच स्वतः विजापूरकर हे त्या वेळच्या वैचारिक जीवनांतील एक शक्तिकेंद्र होतें याची जाणीव आहे. त्यांचा स्वतःचा विनय असा कीं, त्यांनीं 'विश्ववृत्तांतील निवडक निबंध' हें पुस्तक प्रकाशित केलें. परंतु त्यांत स्वतःचे निबंध घेतले नाहींत. अद्यापपावेतों विजापूरकर या एका थोर साहित्यसेवकाचा मराठीभाषी जनतेला परिचयच घडला नाहीं. या माणसाजवळ राष्ट्रीय शिक्षणाच्या ध्यासाखेरीज व एकमार्गी विचाराखेरीज अधिक कांहीं शिदोरी आहे आणि आगरकर, टिळक, शि. म. परांजपे, खाडिलकर, श्री. व्यं. केतकर, राजवाडे यांच्याप्रमाणें या लेखकाचें गद्यलेखनहि महत्त्वाचें आहे अशी कोणींहि जाणीव दाखविली नाहीं. वस्तुतः वाङ्मयीन गुणांचा विचार केल्यास, विचारांची तेजस्विता पाहिल्यास, व देशाभिमानाची प्रखरता समजावून घेतल्यास आपणांस कबूल करावें लागेल कीं, हें लेखन ग्रंथनिविष्ट व्हावयास पाहिजेच होतें, आणि जेव्हां जेव्हां आमचे विद्वान् महत्त्वाच्या गद्यलेखकांचा निर्देश करीत असत तेव्हां त्या निर्देशामध्यें विजापूरकरांचा उल्लेख साक्षेपानें व्हायलाच पाहिजे होता. आजपर्यंत तसें घडूं शकलें नाहीं, तरी आतां हा लेखसंग्रह विजापूरकरांना मराठी भाषेंतील एक सन्मान्य साहित्यिक म्हणून आदराचें स्थान प्राप्त करून देऊं शकेल अशी उमेद मला वाटते. याच समाधानांत आणखी जी प्रासंगिक भर पडली आहे व जिच्या-

मुळें तें सोनेरी समाधान आहे असें मला वाटते ती म्हणजे हा लेखसंग्रह विजापूरकरांच्या जन्मशताब्दीच्या वर्षी प्रसिद्ध होत आहे ही होय.

या लेखसंग्रहाचें महत्त्व विशद करून सांगतांना ‘नवभारता’च्या ऑगस्ट १९६० च्या अंकांत मीं ज्या लेखांचा निर्देश केला होता त्यांतील बहुतेक येथें समाविष्ट केले आहेत, परंतु कांहीं समाविष्ट करतां आले नाहींत. अद्यापिहि कांहीं मला मिळावयाचेच आहेत. अशा न समाविष्ट केल्या गेलेल्या लेखांची संख्या जास्त भरणार नाहीं हें खरें; परंतु अद्यापि हा प्रयत्न पुरा झाला असें मानतां येणार नाही हें सूचित करण्यासाठीं हें लिहीत आहें. ज्यांना शक्य आहे त्यांनीं अजूनहि या दिशेनें प्रयत्न सुरू ठेवावा. ग्रंथाची चारशें पृष्ठांची मर्यादा ओलांडणें अवघड झालें. ज्या साहाय्याची अपेक्षा केली होती तें मिळूं शकलें नाहीं. शिवाय, या मर्यादेचा ग्रंथ विजापूरकरांच्या बहुविध व्यक्तिमत्त्वाची व सामर्थ्याची ओळख करून देण्यास खात्रीनें पुरेसा आहे. संपादक म्हणून जेव्हां लेखांची पाहणी करूं लागलों तेव्हां तशी आवश्यकता भासली म्हणूनच विश्ववृत्तांतील कांहीं लेखांची मुळांतील मर्यादा कमी केली आहे, आणि जेथें संबंध दीर्घ लेख घेतले आहेत तेथें विभाग पाडले आहेत.

जे लेख या ग्रंथांत घेतां आले नाहींत त्यांतून संपादकीय प्रस्तावनेमध्यें विवेचनाच्या ओघांत विस्तृत उतारेहि दिले आहेत. कोणताहि लेख आजच्या घडीला पटणारा वाटेल किंवा नाहीं असा निकष मनाशीं धरून निवडलेला नाहीं किंवा वगळलेलाहि नाहीं. कांहीं ठिकाणीं पुनरुक्ति होती असे लेख बाजूस ठेवले; कांहीं फार त्रुटित होते म्हणून बाजूस ठेवले; व्हिक्टोरिया राणीवरील मृत्युलेख, न्यायमूर्ति रानडे यांजवरील मृत्युलेख, कै. आगरकर यांजवरील मृत्युलेख हे चांगले आहेत. परंतु ग्रंथमालेंत ते आले असल्यानें अतिशय त्रुटित झाले आहेत. मूळ लेख जिज्ञासूंनीं अवश्य पाहावेत. ते काळाच्या उदरांत गडप होण्याच्या आधीं वांचविले पाहिजेत. तथापि येथें घेतले नाहींत याचें कारण ते समाधान देऊं शकतील असें वाटलें नाहीं. ज्या लेखांमधून विजापूरकरांचा धार्मिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक किंवा एकंदरीनें सांस्कृतिक दृष्टिकोण प्रकट झाला आहे असे लेख घेतले आहेत. हें काम पुन्हा जो कोणी करील त्याच्या दृष्टीनें मराठी गद्यलेखकांत विजापूरकर यांची गणना व्हावी म्हणून केलेला हा माझा प्रयत्न पायाभूत असा झाला आहे, एवढें मला म्हणतां आलें म्हणजे पुरे.

या ग्रंथाला आणखी एका वैशिष्टयाची जोड मिळाली असल्यानें या ग्रंथाचें महत्त्व अनन्यसाधारण असें मानलें जाईल. तें वैशिष्ट्य म्हणजे या लेखसंग्रहाला परिशिष्ट म्हणून जोडलेलीं विजापूरकरांचीं पत्रें. हीं पत्रें विजापूरकरांनीं नामदार गोखल्यांना लिहिलेलीं आहेत. १८९१ पासून १९०८ पर्यंतचीं अशीं तीं आहेत. म्हणजे ग्रंथमाला आणि विश्ववृत्त यांचें संपादन कार्य चाललें असतांनाचीं आहेत. श्री. गं. दे. खानोलकर यांनीं १९२८ सालीं विजापूरकरांचें जें लहानसें पण मार्मिक व उद्‌बोधक

चरित्र लिहिलें त्यांत कांहीं पत्रें दिलीं आहेत. त्या पत्रांहून हीं आधींचीं असून या पत्रांचें महत्त्व खासच अधिक आहे. हीं पत्रें नामदार गोखल्यांच्या राजकारणासंबंधींचीं आहेत, कोल्हापूरच्या वातावरणाविषयींचीं आहेत, ध्येयदृष्टीनें अंगीकारलेल्या कार्यरततेची ग्वाही देणारीं आहेत आणि टिळक-गोखले युगावर थोडासा नवा प्रकाश टाकणारीं अशीं आहेत. विजापूरकरांच्या मनाचें प्रतिबिंब पत्रलेखनांत जसें स्वच्छ दिसतें, तसेंच त्यांच्या तत्कालीन लेखांतहि दिसतें हा आणखी एक पडताळा यामुळें उपलब्ध झाला आहे तो वेगळाच. या पत्रांमुळें त्यांच्या लेखांची पार्श्वभूमीहि नीट ध्यानीं येते. हीं पत्रें मिळवून देण्याच्या कामीं सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे एक ज्येष्ठ सभासद श्री. द. वा. आंबेकर यांनीं अतिशय आत्मीयता दाखविली. मोडींतील पत्रें वाचण्याच्या कामींहि त्यांनीं अत्यंत तत्परतेनें मदत केली. या पत्रांपैकीं फक्त कांहीं पत्रें परिशिष्टांत दिलीं आहेत. ग्रंथ जवळजवळ छापून झाला होता अशा वेळीं हीं पत्रें हातीं आलीं. त्यामुळें माझ्या प्रास्ताविकांत त्यांचा योग्य तो उपयोग करतां आला नाहीं. पण माझ्या प्रास्ताविकांतील विधानांना एकंदरीनें पुष्टि देणारींच अशीं हीं पत्रें आहेत हें पाहून मला फारच गंमत वाटली. श्री. द. वा. आंबेकर यांचे आभार कसे मानावेत हेंच समजत नाहीं. कितीहि मानले तरी ते अपुरेच पडतील.

विजापूरकरांचें चरित्र लिहिण्याचा आणखी एखादा प्रयत्न यंदाच्या शताब्दी-वर्षामध्यें होण्याची शक्यता आहे, या मोहाला मी स्वःच बळी पडणार नाहीं कशावरून ? कानडे आणि खानोलकर यांनीं लिहिलेलीं चरित्रें प्रसिद्ध होऊन आतां ३४–३५ वर्षें झालीं, नवीन माहिती बरीचशी उजेडांत आली आहे व अजूनहि बरीचशी यावयाची आहे. जी नवीन माहिती मला १९६२ च्या एप्रिलपर्यंत मिळवितां आली ती मीं माझ्या प्रास्ताविकांत अंतर्भूत करण्याचा यत्न केला आहे. कोल्हापूरच्या सरकार-दप्तरांतील कागद पाहिले गेले पाहिजेत. तसा प्रयत्न मीं केला पण त्यांत जास्त यश आलें नाहीं. केसरी कचेरींत जर विजापूरकर आणि टिळक यांजमधील पत्रव्यवहारापैकीं कांहीं पत्रें असतील तर तीं पाहिलीं पाहिजेत. हिंदुस्थान सरकारच्या व महाराष्ट्र सरकारच्या यासंबंधींच्या कागदपत्रांचा शोध घेतला पाहिजे. समर्थ विद्यालयाच्या दप्तरांतील ठराव, चर्चा, योजना वगैरेंचींहि तीं दप्तरें नाहींशीं झालीं नसतील तर नीट तपासणी केली पाहिजे; राजवाडे आणि विजापूरकर यांच्यांतील पत्रव्यवहाराचा शोध घेतला पाहिजे. त्यांतच विजापूरकरांनीं नामदार गोखल्यांना लिहिलेल्या या पत्रांचीहि भर पडेल. गोखल्यांनीं जीं उत्तरें धाडलीं होतीं तीं मिळविलीं पाहिजेत. हें सर्व काम जर योग्य त्या दक्षतेनें व सर्वांगीण सहकार्यानें केलें गेलें तर विजापूरकर यांच्या चरित्राला यथायोग्य बैठक लाभेल. आणखीहि इतर कितीतरी बाबींसंबंधीं जागरूकता दाखवून या चरित्रलेखनाचा आराखडा ठरविला पाहिजे. पण एवढें सर्व जमून येण्यासाठीं किती अवधि लागेल तें सांगतां येत नाहीं. तुरुंगांतील जीवनांत विजापूरकरांनीं शेकडों श्लोक

रचले आहेत व आपण ती वही पाहिली आहे असें श्री. दा. न. शिखरे यांनीं मला एकदां सांगितलें होतें. ती वही अद्यापिहि तुरुंगाच्याच दप्तरांत आहे कीं आणखी कोठें हालविली गेली त्याचाहि शोध घ्यावा लागेल. अशा प्रयत्नाला चालना म्हणूनहि या ग्रंथांतील परिशिष्टामधील पत्रांचा उपयोग होईल.

हें निवेदन आधींच बरेंच लांबलें आहे, म्हणून आतां ज्यांचें ज्यांचें मला या कामीं साहाय्य झालें त्यांचा कृतज्ञताबुद्धीनें उल्लेख करतों. कराडचे श्री. ग. स. आळतेकर, श्री. पु. पां. गोखले व श्री. शिराळकर या तिघांनींहि मला आत्मीयतेनें वागविलें आणि माझ्या कामाचा आरंभ चांगला झाला. कै. ज. स. करंदीकर यांनीं दोन दिवस मुद्दाम केसरी कचेरींत मला आपल्या आठवणी सांगितल्या. डॉ. बेलवलकर, न्यायमूर्ति शं. बा. ढवळे आणि कै. डॉ. पी. के. गोडे यांनीं विजापूरकरांबद्दल त्यांना वाटणाऱ्या गाढ आदराचें प्रत्यंतर मला आणून दिलें. मिरजेचे श्री. दिवेकरशास्त्री यांचाहि नाशिकच्या त्यांच्या मुक्कामांत मला या कामीं उपयोग झाला. कोल्हापुरांतील श्री. खुपेरकरशास्त्री यांची मदत मोठीच मानावी लागेल. त्याचप्रमाणें श्री. उत्तमराव शेणोलीकर यांनींहि त्यांचें अप्रकाशित आत्मकथन मला वाचावयास दिलें व त्यांतील मजकुराचा उपयोग करण्यास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा ऋणाईत आहें. वाईचें डॉ. पटवर्धन यांनींहि ते नाशिकला आले असतांना मला विजापूरकरांच्या आठवणी सांगून उपकृत केलें आहे. कोल्हापूरचे श्री. द. ल. केळकर यांचेंहि साह्य सुरुवातीला झालें होतें. माझ्या नवभारतांतील लेखांत या बहुतेकांचा मीं उल्लेख केलाच आहे. त्यांचे आभार मात्र या ठिकाणीं मानतों.

ग्रंथमालेंतील कांहीं लेख मला पुण्याचे श्री. पारखी यांच्याकडून मिळाले. जुन्या वाङ्मयाची दक्षतेनें जपणूक करणारे श्री. पारखी हे गृहस्थ आहेत आणि ते आपल्या-जवळ असलेलें वाङ्मय फारशी जबर किंमत न आकारतां अभ्यासकांना उपलब्ध करून देतात असा माझा तरी अनुभव आहे. स्वतःच्या घरांतील दोन किंवा तीन माड्या दुर्मिळ जुन्या ग्रंथांसाठीं राखून ठेवणारा श्री. पारखी यांच्यासारखा वाङ्मयविक्रेता वाङ्मयाची थोर सेवा बजावीत आहे हें त्यांनीं श्री. प्रियोळकरांनाहि कांहीं दुर्मिळ पुस्तकें मिळवून दिलीं आहेत यावरून पूर्वीच सिद्ध झालें आहे.

विश्ववृत्ताचीं दोन बांधीव पुस्तकें चांगल्या अवस्थेंत फक्त मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालयांत आहेत अशी माझी समजूत आहे. बडोद्याचें ग्रंथालय मीं पाहिलें आहे; ठाण्याच्या ग्रंथालयाची शाखा पाहिली आहे; पुण्याचीं वाचनालयें पाहिलीं आहेत. तेथें हीं दोन बांधीव पुस्तकें आढळलीं नाहींत. नाशिकला नाहींतच. कोल्हापुरांत १९५७ सालीं तीं होतीं. मी पुन्हा १९६२ मध्यें गेलों तेव्हां तीं हाताळण्याच्या स्थितींत नव्हतीं व रद्दी म्हणून निकालांत काढण्याच्या निर्णयाला ग्रंथालयाचे अधिकारी आले होते असें कळलें व फार वाईट वाटलें. अजूनहि तीं पुस्तकें त्यांना जतन करून ठेवतां आलीं तर तीं

त्यांनीं ठेवावींत. मला हीं बांधीव पुस्तकें माझ्या बलवत्तर दैवयोगामुळें मुंबईहून साडेतीन वर्षांपूर्वी सुमारें एक महिनाभर मिळालीं. मी आणि माझे दोन विद्यार्थिमित्र श्री. अशोक पाडुरंग दाणी व श्री. रमेश वैद्य यांनीं त्यांतील लेख भरभर उतरून घेतले. श्री. दाणी यांनीं तर या कामाबद्दल कसल्याहि मोबदल्याची अपेक्षा केली नाही. आतां श्री. दाणी हे फर्ग्यूसन कॉलेजमध्यें इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत. माझ्या या विद्यार्थिमित्रांनीं ज्या सातत्यानें ही मेहनत माझ्याबरोबर घेतली त्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच होतील. विशेषतः प्रा. दाणी यांना धन्यवाद.

सरकारनें स्वातंत्र्याचा इतिहास लिहिण्यासाठीं जी समिति नेमली होती त्या समितीनें घेतलेल्या मुलाखतींचे टंकलिखित कागद मला पाहावयाला मिळाले व प्रास्ताविकामधील कांहीं मजकूर मीं त्यांच्या आधारें लिहिला आहे. याबद्दल विशेषतव श्री. द. कृ. ऊर्फ बुवासाहेब गोसावी यांचा मी ऋणी आहें.

या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी अंगावर घेऊन श्री. अनंतराव कुलकर्णी, कॉंटिनेंटल प्रकाशन, यांनीं मला कायमचें ऋणाइत करून ठेवलें आहे. त्यांच्या अंगीं असलेल्या विदग्ध वाङ्मयाच्या आवडीला आणि परिश्रमांची कदर करण्याच्या गुणज्ञतेलाच हें श्रेय आहे. त्यांनीं अतिशय उत्साहानें या प्रकाशनाची आंखणी केली. परिशिष्टांतील पत्रें मिळविण्याच्या कामीं त्यांची व आर्यभूषण छापखान्याचे मॅनेजर श्री. पटवर्धन यांची अतिशय मदत झाली. आर्यभूषण छापखान्यानें या ग्रंथाची छपाई त्वरित आणि सुंदर रीतीनें केल्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानणें जरूर आहे. श्री. पटवर्धन यांनीं हें काम अतिशय आपुलकीनें केलें.

एवढें सगळें जुळून येऊनहि शुद्धिपत्राची आवश्यकता न ठेवण्याचा आमचा बेत सिद्धीस गेला नाहीं, याबद्दल मात्र वाचकांची क्षमा मागितली पाहिजे. संपादक नाशिकला, प्रकाशक थोड्याशा इतर गोष्टींमुळें व्यग्र आणि हस्तलिखितांतील अक्षरें तीन वेगवेगळ्या हस्ताक्षरांतील त्यामुळेंच बहुधा कांहीं चुका झाल्या. अशा ग्रंथांत त्या व्हायला नको होत्या. परंतु आतां क्षमायाचनेपलीकडे कांहीं करतां येत नाहीं. ज्या सहज नजरेला येण्याजोग्या आहेत अशांची यादी ‘ महत्त्वाच्या दुरुस्त्या ’ या सदरांत दिलेली नाहीं. वाचकांनीं कृपा करून या नजरेस आणून दिलेल्या व न दिलेल्या दुरुस्त्या ध्यानीं घ्याव्यात.

ज्यांचे आभार मानावयाचें काम मुद्दाम शेवटीं राखून ठेवलें आहे त्यांतील पहिले म्हणजे विद्वद्वर्य ना. गो. चापेकर हे होत. श्री. चापेकर हे वयानें जवळजवळ विजापूरकरांचे समकालीन. परंतु अद्यापिहि त्यांची प्रज्ञा आणि प्रतिभा कार्यक्षम असून त्यांच्यासारख्या तपोनिधि साहित्यिकानें माझ्या या प्रयत्नाला पुरस्कारार्थ चार शब्द लिहून दिले. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळानें माझ्या प्रयत्नांस उत्तेजन देतां येत नाहीं असें कळविल्यामुळें वाटलेली विषादाची छटा त्यानंतर थोड्याच दिवसांनीं

प्राप्त झालेल्या या आनंदांत कुठल्याकुठें लोपून गेली. श्री. नानासाहेब चापेकर यांनीं मला दिलेल्या आशीर्वादामुळें मी स्वतःला धन्य समजतों.

'पाश्चात्य प्रतिभा' या माझ्या ग्रंथाबद्दल श्री. वि. वा. शिरवाडकर यांनीं जशी आस्था दाखविली तशीच या लेखसंग्रहाच्या प्रकाशनाबाबत दाखविली आहे. त्यांच्या स्नेहामुळें आणि मधूनमधून मिळणाऱ्या उत्तेजनामुळें आणि सहकार्यामुळें या कामांत दर वेळीं मला नवा उत्साह प्राप्त झाला आहे. त्यांचेहि मी मनापासून आभार मानतों.

हें काम जानेवारी १९६३ पर्यंत पुरें करावयाचेंच या हेतूनें मी कामाला लागलों. प्राचार्य गोसावी यांनीं माझ्या कामाचें महत्त्व लक्षांत घेऊन मला एन्. सी. सी. मधून निवृत्त होऊं दिलें म्हणूनच मी वेळ साधूं शकलों. हें मला आभारपूर्वक नमूद करावयास हवें.

शेवटीं माझ्या पत्नीच्या सहकार्याचा निर्देश. तिनें माझ्या या सहासात वर्षांच्या छंदामुळें जो सांसारिक ताण सहन केला, व माझ्या कामामुळें ठरलेले प्रवासाचे बेतहि रद्द करावे लागले तरी जो संयम आणि सोशिकपणा दाखविला त्या सहकार्याची किंमत एन्हवींच्या कोणत्याच मापानें होणार नाहीं.

संकल्पिलेल्या कामाची सिद्धि झाली आणि त्या सिद्धीच्या वेळीं ग्रंथाची महती वाढविणारी विजापूरकरांचीं गोखल्यांना लिहिलेलीं पत्रेंहि मिळालीं याबद्दल मनाला वाटणारा आनंद मला शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं. 'याचसाठीं केला होता अट्टाहास.'

नाशिक
३-१-१९६३

मु. गो. देशपांडे

## ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या प्रकाशन खर्चास सहाय्य म्हणून **पुणें विद्यापीठानें** पांचशें रुपयांची देणगी दिली आहे. या मदतीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यास आम्हास आनंद होत आहे.

संपादक व प्रकाशक

# अनुक्रम —

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | १ ते ५० |
| शैक्षणिक लेख | ५१ ते ११८ |
| राजकीय लेख | ११९ ते २४३ |
| सामाजिक व धार्मिक लेख | २४५ ते २६९ |
| वाङ्मयीन लेख | २७१ ते ३४८ |
| परिशिष्ट : विजापूरकरांनीं ना. गोखले यांना पाउविलेलीं कांहीं पत्रें | ३४९ ते ३७२ |
| टीपा | ३७३ ते ३८३ |
| शुद्धिपत्र | ३८४ |

# प्रस्तावना

१ प्रो. विजापूरकर यांच्या कोल्हापुरांतील कार्याची ओझरती ओळख
२ राष्ट्रीय शिक्षणाची पार्श्वभूमि
३ समर्थ विद्यालयांतील शिक्षण
४ समर्थ विद्यालय बंद झालें
५ संपादन-कार्य (१)
६ संपादन-कार्य (२)
७ विश्ववृत्तावरील खटला
८ संस्थानी वातावरण
९ सामाजिक परिस्थिति
१० विजापूरकरांची बुद्धिमत्ता बेताची होती काय?
११ गोखले, टिळक आणि विजापूरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ०५५८५ दि: [illegible]
[illegible] २०९२ नों: दि: 20/3/07

# प्रस्तावना

राष्ट्रीय शिक्षणाचे शिवाजी म्हणून ओळखले गेलेले कै. विष्णु गोविंद विजापूरकर यांचीं दोन चरित्रें त्यांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांच्या आंत म्हणजे १९२८ सालीं प्रसिद्ध झालीं. या दोन्ही चरित्रांचे लेखक तळेगांवच्या नवीन समर्थ विद्यालयांत होते; आणि त्यांना विजापूरकरांची ओळख विशेषत्वानें समर्थ विद्यालयाचे संस्थापक व स्वदेशी व्रताचें पालन करणारे आणि निःसीम त्यागाचें उदाहरण घालून देणारे देशभक्त अशी झाली होती. या दोन्ही चरित्रकारांनीं विजापूरकरांच्या संपादन-कार्याची महति वर्णिलेली आहे. तथापि, त्यांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं तेव्हां विजापूरकरांभोंवतीं त्यांच्या शिक्षण-कार्यांतील ध्येयवादीपणाचें आणि त्यासाठीं कराव्या लागणाऱ्या भगीरथ प्रयत्नांचें तेजोवलय होतें. शिवाय ब्रिटिश अमलाचे ते दिवस असल्यानें आणि कोल्हापुरांतहि संस्थानी राजवट असल्यानें, समर्थ विद्यालयाच्या स्थापनेच्या आधींचें विजापूरकरांचें कोल्हापुरांतील महत्त्वाचें कार्य त्यांच्या नजरेसमोर तितकेंसें नव्हतें. परंतु विजापूरकर यांचीं वयाचीं ४३ वर्षें कोल्हापुरांत गेलीं. त्यांच्या लेखनाची आणि विचारांची नीट ओळख होण्यासाठीं त्या वेळच्या कोल्हापुरामधील चळवळींत त्यांनीं घेतलेला भाग व केलेलें पुढारीपण अवश्य ध्यानीं आणिलें पाहिजे.

## प्रो. विजापूरकर यांच्या कोल्हापुरांतील कार्याची ओझरती ओळख

कोल्हापूर व इतर दक्षिणी संस्थानांतील चळवळींचा इतिहास निवेदन करणारे श्री. वि. अ. पटवर्धन यांनीं थोड्याशा विस्तारानें या जुन्या इतिहासाची माहिती करून देण्याचा प्रयत्न केला आहे. कोल्हापुरांतील लोकसभा इ. सन १८८५–८६ सालीं प्रथम जन्मास आली. पुढें तत्कालीन प्रश्नांवर शहरवासीयांना अनुकूल असा निकाल मिळविल्यानंतर १८९४ पर्यंत विशेष काम झालें नाहीं. त्या वर्षी शाहू छत्रपतींनीं संस्थानचीं राज्यसूत्रें हातीं घेतलीं. म्हणून कोल्हापूर लोकसभेनें प्रजाजनांतर्फे छत्रपतीस मानपत्र दिलें. शाहू छत्रपतींची कारकीर्द सुरुवातीस लोकांना फार आशादायक वाटत होती; आणि १९०१–२ सालापर्यंत तर ती सुखकर अशीच गेली, असें लोकमत होतें. परंतु पुढें लोकप्रतिनिधींना इतर संस्थानांतील सुधारणा आपल्याहि संस्थानांत घडून याव्यात असें वाटूं लागलें. विशेषतः बडोदें संस्थान तेव्हां आघाडीवर होतें. ब्रिटिश अमलांतील दास्यापेक्षां संस्थानी प्रजाजन म्हणून एक तऱ्हेच्या स्वराज्यांत आपण वावरत आहोंत, व राजानें अशा स्वराज्याचा आनंद प्रजेला उपभोगावयास द्यावा

अशी लोकांची मनीषा होती. संस्थानें नष्ट व्हावींत असें त्या वेळच्या कोणाहि मोठ्या विचारवंताचें मत नव्हतें.

१९०६ सालीं कोल्हापूरची तिसरी लोकसभा भरविली गेली. या लोकसभेचें अध्यक्षस्थान कोल्हापूरचे एक थोर सुपुत्र गोपाळ कृष्ण गोखले हे भूपविणार होते. परंतु कांहीं कामामुळें ते कोल्हापुरास त्या वेळीं येऊं शकले नाहींत. म्हणून डॉ. वामन दाजी रुईकर हे अध्यक्ष झाले. या सभेमध्यें रयतांचे निर्भय प्रतिनिधि यावेत म्हणून कै. सदाशिव खंडो आळतेकर यांनीं अतिशय उत्साहानें संस्थानभर प्रचार केला होता. १०१ प्रतिनिधींची ही सभा २ ऑक्टोबर १९०६ रोजीं भरली. तेव्हां जे ठराव मान्य करण्यांत आले त्यांत नगरपालिका बरखास्त केली होती, ती पुन्हां सुरू करावी, नवीन उद्योगधंदे काढावेत, शिक्षणासाठीं उपाय योजावेत हे ठराव तर होतेच; खेरीज रयतेला दरबारविरुद्ध दावे लावितां यावेत असाहि एक अतिशय क्रांतिकारक ठराव होता.

विजापूरकर यांनीं शिक्षणविषयक ठराव मांडला. त्यांच्या भाषणाचा मथितार्थ असा होता कीं, शिक्षणामुळें लोकांना समजून येईल कीं चळवळी मतलबी पुढाऱ्यांनीं केलेल्या नसून लोकोद्धारासाठीं असतात. "इंग्रज सरकारला लष्करी खर्च आहे. तो महाराजांना नाहीं. त्यामुळें शिक्षणावर खर्च करणें हें महाराजांस अवघड होऊं नये. सर्व नोकरांनीं वाचावयास व सहीपुरतें तरी लिहावयास शिकलें पाहिजे. असा सक्तीचा नियम महाराजांनीं करावा आणि त्यासाठीं रात्रींच्या मोफत शाळांतून साक्षरतेचें शिक्षण लोकांनीं घेतलें पाहिजे, अशी मागणी मीं सरकारकडे चार वर्षांपूर्वी केली होती. पण ती मान्य झाली नाहीं. उलट रात्रींच्या शाळा पुष्कळ होत्या, त्या शाहू महाराजांनीं बंद केल्या. आतां सरकारनें निदान पूर्वीच्या बंद केलेल्या रात्रींच्या मोफत शाळा पुन्हा सुरू कराव्यात असें माझें मागणें आहे," असें विजापूरकरांनीं या ठरावावरील भाषणांत म्हटलें. ठरावाला पाठिंबा देणारे अप्पाजी विष्णु कुलकर्णी (रुईचे प्रतिनिधि) म्हणाले, "शिक्षणामुळें बनावट दस्तऐवजाचे कागद बंद होतील. बडोद्याप्रमाणें येथें प्राथमिक शिक्षण सक्तीचें झालें पाहिजे. औद्योगिक शिक्षणाचीहि सोय झाली पाहिजे. तुरुंगांत हें शिक्षण मिळतें, तर बाहेर कां मिळूं नये? जन्मभूमीचा व धर्माचा अभिमान उत्पन्न करील अशा प्रकारचें तेजस्वी महाराष्ट्रीय शिक्षण देण्याची व्यवस्था सरकारनें केली पाहिजे. हें पूर्णपणें करणें सरकारला अशक्य झाल्यास राष्ट्रीय शिक्षणाच्या खासगी शाळांना उदारपणें मदत देणें हें सरकारचें कर्तव्य आहे."

या लोकसभेच्या वेळीं विजापूरकरांची राजाराम कॉलेजांतील नोकरी संपली होती; आणि त्यांनीं कोल्हापुरांत समर्थ विद्यालय सुरू केलें होतें. परंतु त्याआधीं नोकरींत असतांनाहि विजापूरकर स्वदेशी व्रत आचरणारे आणि टिळक व गोखले यांचे अभिमानी म्हणून प्रसिद्धच होते. आगरकर आणि टिळक यांना कोल्हापूर प्रकरणामुळें

डोंगरीच्या तुरुंगांत १०१ दिवस काढावे लागले तेव्हांपासूनच राष्ट्रीय मनोवृत्ति कार्यप्रवण झालेली दिसून येते. त्या वेळीं गोखले व विजापूरकर यांनीं राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या साहाय्यानें 'भ्रांतिकृत चमत्कार' हें नाटक बसविलें. त्यांत विजापूरकरांनीं दवंडी पिटणाऱ्या महाराची व नामदार गोखले यांनीं जोगिणीची भूमिका घेतली होती. हा फंड पुष्कळ जमला होता. कोल्हापूर सरकारनें तो बाहेर पोचविण्याच्या बाबतींत हरकत घेतली होती, तरी विजापूरकरांनीं शिताफीनें ती रक्कम रवाना करण्याचें काम केलें. हें त्यांचें स्वदेशप्रेम व स्वदेशी वस्तूंबद्दलची आस्था अनेक आठवणींवरून समजून येते.

कांहीं नव्यानें माहीत झालेल्या आठवणी अशा आहेत. नामदार गोखले यांच्या सन्मानार्थ राजारामीयन क्लबामध्यें मेजवानी होती. त्या ठिकाणीं परदेशी साखर वापरली जाणार म्हणून समारंभाला हजर राहतांना विजापूरकरांनीं घरचें जेवण तेथें नेलें. दुसरी आठवण अशी आहे—एकदां राजवाडे व विजापूरकर कोल्हापूरच्या पंचगंगा नदीवर स्नानासाठीं जात असतां परदेशी कपडे घातलेला एक विद्यार्थी त्यांना भेटला. त्याला त्यांनीं प्रश्न केला, "तुझें अंग पोळत नाहीं काय?" या आठवणी श्री. खुपेरकर शास्त्री यांनीं सांगितलेल्या आहेत. त्यांनींच सांगितलेली आणखी एक आठवण अत्यंत उद्बोधक आहे. कॉलेजांतील नोकरी चालू होती, तोंपर्यंत संस्थानच्या नोकरांना दरबारला हजर राहण्याची आवश्यकता असे. "दरबारच्या वेळीं पगडी घालून येणें भाग आहे. परंतु स्वराज्यप्राप्तीपर्यंत पगडी घालणार नाहीं असें मीं ठरविलें आहे, म्हणून दरबारला हजर राहण्याची सक्ती मजवर होऊं नये," असें विजापूरकरांनीं शाहू महाराजांना विनविलें होतें व महाराजांनीं विजापूरकरांची ती मागणी मान्य केली होती.

कोल्हापुरांतील त्यांनीं चालविलेलें स्वदेशी वस्तुभांडार पूर्वीच्या चरित्रकारांनीं नमूद केलेलें आहे. त्या कामीं सदाशिव खंडो आळतेकर यांचें त्यांना विशेष साहाय्य होत असे, असेंहि या चरित्रकारांनीं म्हटलेलेंच आहे. कानडे यांनीं लिहिलेल्या चरित्रांत ज्या सदर्न मराठा बॅन्केचा उल्लेख आहे, त्या बॅन्केची व्यवस्था इतरांच्या हातीं होती. विजापूरकर तिचें कामकाज पहात नसत. हरि सखाराम कीर्तने आणि मंडळी ती बँक चालवीत. मात्र त्या बॅन्केशीं त्यांचा अत्यंत निकटचा संबंध होता. ग्रंथमालेचे ठेवीचे पैसे किंवा वर्गणीचे पैसे हरि सखाराम कीर्तने आणि कंपनी यांच्याकडे पाठवावेत, अशी सूचना ग्रंथमालेच्या मुखपृष्ठाच्या आंतील बाजूस छापलेली कित्येक अंकांतून दिसून येते. आणि कीर्तने वारले तेव्हांचा त्यांजवरील मृत्युलेख विजापूरकर आणि ही बॅन्क यांचे संबंध किती जिव्हाळ्याचे होते याची साक्ष देईल.

पुण्याच्या पावलावर पाऊल ठेवून कोल्हापुरांतील मंडळीहि एक नवें चैतन्य इकडे निर्माण करीत होती. ग्रंथमालेच्याहि आधीं किंवा त्या सुमारास कोल्हापुरांत शिवाजी क्लब स्थापन झाला होता. हा क्लब बालमित्रसमाज व बाल-गोरक्षण-सभा यांच्या एकत्रीकरणामुळें निर्माण झाला होता. या क्लबाचे प्रमुख हणमंतराव कुलकर्णी गोरक्षणाचीं

पदें स्वतः रचीत व म्हणत असत. दर रविवारीं बाजारांत उभें राहून ते सभा घेत असत व ख्रिस्ती उपदेशकांची चांगली हजेरी घेत. कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांची लढाऊ-पणाची तयारी या मंडळींनीं भक्कम केली होती. स्वतः हणमंतराव हे एक कुशल लढवय्येच होते. कोल्हापूरचा रेसिडेंट हणमंतरावांच्या कौशल्यानें दिपून गेला. घोडे-स्वारांनीं वेढलेल्या हणमंतरावांनीं उडी मारून अशा शिताफीनें स्वतःला वांचविलें कीं, त्यामुळें रेसिडेंटची त्यांच्या स्वतःच्या व त्यांच्या हाताखालच्या विद्यार्थ्यांच्या तयारी-बद्दल खात्रीच झाली. साहजिकच त्यानें शिवाजी क्लबच्या सभासदांबद्दल रिपोर्ट केला. याचा परिणाम शिवाजी क्लब ही चळवळ दडपून टाकणें यांत झाला. कोल्हापूरचें आणि पुण्याचें चोरटें दळणवळण क्रांतिकारक चळवळीमध्यें चालू होतें, हेंहि आतां उघड झालेलें आहे. नागपूरकर व इतर कोल्हापूरची मंडळी यांनीं क्रांतिकारक बॉम्ब तयार करण्याची कृति महर्षि अण्णासाहेब पटवर्धन, सेनापति बापट वगैरेंकडून शिकून घेतली होती. एक बॉम्ब कोल्हापुरांतील दामू जोशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीनें कोल्हापुरांत नेलाहि होता. या तरुणांचा हेतु जे इंग्रज अमलदार शाहू महाराजांच्या कन्येच्या लग्नाच्या वेळीं उपस्थित राहतील, त्यांचा घात करावा असा होता. प्रत्यक्ष बॉम्ब टाकला नाहीं. कारण शाहू महाराजांचाहि घात व्हावा अशी कोणाचीहि इच्छा नव्हती व महाराजांची खुर्ची गोऱ्या अंमलदारांच्या रांगेंतच होती. परंतु या कटांत निव्वळ ब्राह्मण होते असें नव्हे. परशुराम सुतार नांवाचा एक तरुणहि होता.

अशा तऱ्हेच्या क्रांतिकारक चळवळीशीं विजापूरकरांचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. पण १९ व्या शतकाचें अखेरचें दशक आणि २० व्या शतकांतील सुरुवातीचीं ७–८ वर्षे या १७–१८ वर्षांच्या अवधींत विजापूरकरांचा मनःपिंड ज्या आकांक्षांनीं परिपुष्ट होत होता, त्यांना समांतर असणारी अशीच ही क्रांतिकारकांची चळवळ होती. चाफेकरांनीं केलेला रॅण्डचा खून, बंगाल्यांत होणारे बॉम्बस्फोट, वंगभंगाच्या चळवळीनें घेतलेलें विराट् स्वरूप, कोल्हापुरांतील क्रांतिकारकांचा बाहेरील क्रांतिकारकांशीं असलेला संबंध, या सर्व गोष्टींवरून असें म्हणतां येईल कीं, कोल्हापुरांतील घटना या निव्वळ चोऱ्या आणि दरोडे घालणाऱ्या मंडळींच्या नसून देशभक्तीनें प्रेरित झालेल्या तरुणांचींच तीं कृत्यें होतीं.

### *राष्ट्रीय शिक्षणाची पार्श्वभूमि*

भारतीय काँग्रेसनें राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव १९०६ सालच्या डिसेंबर महिन्यांत भरलेल्या काँग्रेसमध्यें पास केला व चतुःसूत्रीपैकीं देशाचें तें एक सूत्र बनलें. त्या काँग्रेसमध्यें कलकत्त्याला विजापूरकरांनीं राष्ट्रीय शिक्षणाच्या समर्थनार्थ जें भाषण केलें, तें व राष्ट्रीय शिक्षणाचा मूळ ठराव यांविषयीं प्रस्तुत लेखकानें नवभारत मासिकाच्या नोव्हेंबर १९६० च्या अंकांत विस्तारानें लिहिलें आहे. या ठरावावर बोलणारे वक्ते बाबू हिरेंद्रनाथ दत्त, व्यंकटअप्पया, शंकरन् नायर.

चिंतामणराव वैद्य, जे. एन्. रॉय, प्रो. विजापूरकर, मौलवी इस्माईल हुसेन शेराजी, व एम. के. पटेल हे होते. या सर्वांचीं भाषणें कोणत्या महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करणारीं झाली तें नवभारताच्या त्या अंकांत पाहावयास मिळेल. परंतु १९०६ सालीं जरी राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना कॉंग्रेसनें स्वीकृत केली, तरी त्याआधीं देशाच्या कल्याणा-विषयीं विचार करणारांच्या मनांत शिक्षणविषयक सुधारणा प्रामुख्यानें होत्या. मुंबईत, मातृभाषेंतून शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा, धर्मशिक्षण आणि चारित्र्यशिक्षण यांचाहि अन्तर्भाव शिक्षणक्रमांत असावा असे प्रयत्न पूर्वी झाले होते. डेक्कन कॉलेज सुरू झालें तेव्हां शिक्षण मातृभाषेंतून दिलें जावें असा कटाक्षानें प्रयत्न करण्यांत आला होता; परंतु विद्यार्थ्यांनीच आम्हांला इंग्रजींतून शिक्षण पाहिजे असा आग्रह धरल्यामुळें, तेथील सद्‌हेतूनें प्रेरित झालेल्या इंग्रज प्राध्यापकांची मोठी निराशा झाली होती. ' डेक्कन कॉलेज १८५१ ते १९०१ ' या इंग्रजी पुस्तकाचे लेखक जे. नेल्सन फ्रेजर यांनीं लिहिलेलें ' दि अर्ली करिक्युलम् ' हें त्यांतील प्रकरण जिज्ञासूंनीं या संदर्भांत अवश्य पाहावें. डेक्कन कॉलेज क्वॉर्टलीचे अंक पाहिल्यास असें आढळतें, कीं त्यांत इंग्रजी व मराठी अशा दोन्ही तऱ्हेचा मजकूर अन्तर्भूत केलेला आहे. पुढें न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना, फर्ग्यूसन कॉलेजची स्थापना, आणि त्याविषयीं वामन शिवराम आपटे यांनीं हंटर कमिशनपुढें दिलेली साक्ष, यांवरून तो प्रयत्न, शिक्षण आपल्या देशबांधवांच्या हातीं आणण्याचा होता, असें दिसतें. या वेळेपासून इंग्लंडांतील व हिंदुस्थानांतील विचार-वंतांपुढें शिक्षणाच्या संस्कारक्षमतेविषयीं जास्त जागरूकता निर्माण झालेली दिसते. इंग्लंडांतील उदार विचारसरणीचे लेखक आणि शिक्षणतज्ज्ञ भारतीय शिक्षणाच्या प्रश्नाविषयीं जें लिहीत, त्यामधून चारित्र्यशिकवणुकीची महति आणि मातृभाषेंतील शिक्षणाची महति गायिली गेली. भारतांतील विचारवंतहि विद्यापीठांतून मातृभाषेला स्थान मिळालें पाहिजे, हायस्कुलांतील शिक्षण मातृभाषेंतून दिलें गेलें पाहिजे, आणि आपल्या इतिहासाची उज्ज्वल पार्श्वभूमि व भारतीय संस्कृतीचा थोर वारसा विद्यार्थ्यांच्या नजरेपुढें सतत ठेवला गेला पाहिजे, असें प्रतिपादूं लागले. इंग्लंडखेरीज इतर देशांत परिस्थिति कशी आहे, त्याकडेहि या मंडळींचें लक्ष जाऊं लागलें, कोणी डेन्मार्कमध्यें मातृभाषेंतून शिक्षण दिलें जातें असें दाखवून देऊं लागला. कोणी जपानच्या प्रगतीचा पाया अशा प्रकारच्या शिक्षणांत आहे असें सिद्ध करूं लागला; तर कोणी अमेरिकेनें इंग्रजांशीं लढाई करून स्वतःचें स्वातंत्र्य मिळविलें होतें म्हणून अमेरिकन शिक्षणपद्धतीं-तील गुण आत्मसात् केले पाहिजेत, असें म्हणूं लागला.

या प्रयत्नांमागें निव्वळ शैक्षणिक दृष्टिकोणाखेरीज आणखी दोन दृष्टिकोण प्रबळ होते आणि त्यामुळेंच जसजशी राष्ट्रीय शिक्षणाची लाट अनावर होऊं लागली, तसतसा तिला सनदशीर राजकारण करणाऱ्या मवाळांकडून थोडासा उपहास सोसावा लागला व शेवटीं तर सरकारची वक्रदृष्टि होऊन राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग बंदच करावे लागले. ते दोन दृष्टिकोण असे :—

(१) प्रत्येक देशाची आणि संस्कृतीची एक विशिष्ट अस्मिता असते. भारतांतील हिंदु आणि मुसलमान या दोन संस्कृतींमध्यें समान असें भारतीयत्व आहे; तथापि त्यांच्यांत भिन्नताहि आहे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पौर्वात्य संस्कृतीनें व हजारों वर्षांचा भव्य इतिहास असलेल्या देशानें, पूर्णपणें पाश्चात्त्य संस्कृतीचें आणि विचारांचें अनुकरण व अवलंबन करावें हें इष्टहि नाहीं आणि शक्यहि नाहीं. स्वतःच्या अंगीं असलेल्या गुणांच्या पोषणानें विकास होतो; बाहेरून उसन्या आणिलेल्या वेषामुळें होत नाहीं. म्हणून पाश्चिमात्य संस्कृतीच्या पहिल्या झगझगाटानें आपण कितीहि दिपून गेलों असलों तरी आपला वारसा आपल्याला विसरतां येणार नाहीं. त्या पायावरच नवी इमारत उभी राहील. हिंदूंसाठीं हिंदु विश्वविद्यालय स्थापण्याची डॉ. ॲनी बेझंट यांची कल्पना, डॉ. अरुंडेल यांनीं अशा कल्पनेला दिलेला पाठिंबा, पंडित मालवीय यांचें बनारस विश्वविद्यालयाचें स्वप्न, सर सैयद अहमद यांनीं अलीगड येथें केलेली ॲंग्लो ओरिएंटल मुस्लिम कॉलेजची स्थापना, आणि बोलपूर येथें १९०१ सालीं स्थापन झालेलें शांतिनिकेतन किंवा पंजाबांतील गुरुकुलाची स्थापना हे भारताच्या गतवैभवाला आणि थोर संस्कृतीला कार्यक्षम व उज्ज्वल करण्यासाठीं केलेले प्रयत्न होत.

(२) दुसरा दृष्टिकोण म्हणजे भारतीयांचा जागृत झालेला स्वाभिमान हा होय. राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रश्नाला कर्झनशाहीच्या काळांत विशेष जोर चढला. कारण ब्रिटिश अंमलदार पदोपदीं सुशिक्षित भारतीयांचा अवमान करीत असत. जबाबदारीच्या जागा स्वीकारण्यास लागणारें धैर्य, नीतिमत्ता, कुवत, आणि व्यापक दृष्टिकोण, भारतीयांच्या अंगीं नाहींत अशी राज्यकर्त्यांची समजूत होती. म्हणून राष्ट्रीय शिक्षणाचा एक उद्देश असाहि होता, कीं, भारतीय तरुण महत्त्वाची कामगिरी करण्यास मुळींच कमी पडणार नाहींत, असें सिद्ध करणें.

युनिव्हर्सिटीच्या सुधारणा करणारें एक बिल कर्झननें आणिलें होतें. या बिलाचे इतर उद्देश कितीहि चांगले असले तरी या बिलामुळें सरकारचें विश्वविद्यालयावरील नियंत्रण वाढून विद्यापीठें हें सरकारचेंच एक खातें होणार होतें, अशी टीका नामदार गोखले यांनीं केली होती. कर्झनच्या युनिव्हर्सिटी बिलाकडे निर्विकार रीतीनें पाहिलें तर त्यांतील कांहीं कलमें खरोखरीच चांगलीं होतीं, असें आज वाटतें. उदाहरणार्थ, निव्वळ वाङ्मयीन असें जें शिक्षणाचें स्वरूप आहे, त्याला धंदेशिक्षण किंवा व्यापारी वळण असें जोडून कांहींतरी मिळालें पाहिजे, आणि लोकांना जरी तशी तहान नसली तरीदेखील तसें कांहींतरी केलें पाहिजे, असें कर्झनच्या शिक्षणविषयक बिलावरून दिसून येतें. युनिव्हर्सिटीचें शिक्षण घेणारांना थोडीशी कठीण चांचणी ठेवावी आणि सोळा वर्षांच्या खालील विद्यार्थ्यांस मॅट्रिकला बसूं देऊं नये असेंहि या बिलामध्यें सुचविलें होतें. परंतु, अशीं कांहीं चांगलीं कलमें त्यांत असलीं तरी कर्झनच्या मनांतला हेतु इतका स्वच्छ नव्हता, असें त्या वेळच्या इतिहासावरून दिसतें. विद्यापीठांत लोकपक्षाचें बहुमत आहे तें

कमी करून सरकारी पक्षाचें बहुमत होईल असें करण्याचें त्याच्या मनानें घेतलें. सन १९०१ मध्यें ली वॉर्नर यांनीं लिहिलेलें, सिटिझन ऑफ इंडिया हें पुस्तक नेमिलें जावें अशी सरकारची इच्छा होती. परंतु तो ठराव कलकत्ता विद्यापीठांत नापास झाला त्यामुळें चिडून कर्झननें ही कमिशनची योजना पुढें मांडली, व २७ जानेवारी १९०२ रोजीं कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनचे अध्यक्ष रिस्ले हे होते. चिमणलाल सेटलवाड यांनीं रिकलेक्शन्स ॲण्ड रिफ्लेक्शन्स या नांवाचें आत्मचरित्र लिहिलें आहे, त्यामध्येंहि कर्झनच्या युनिव्हर्सिटी बिलाविषयीं पुष्कळ विस्तारानें माहिती दिली आहे. कोणतीं पुस्तकें नेमावींत व कोणतीं नेमलीं जाऊं नयेत हें आपल्या हातीं असावें अशी कर्झनची मनीषा होती, हें स्पष्टच आहे. शिवाय, हिंदी नागरिकांना महत्त्वाच्या जागीं नेमण्यालाहि कर्झनचा व इतर ब्रिटिश अधिकाऱ्यांचा विरोधच होता. ही कोंडी फोडण्यासाठीं राष्ट्रीय शिक्षण देण्याचा ध्यास बंगालांत, पंजाबांत आणि महाराष्ट्रांत दिसून येऊं लागला. जरी प्रत्येक वर्षीच्या कॉंग्रेसमध्यें सरकारी नोकरींतील महत्त्वाच्या जागा भारतीय नागरिकांना अधिकाधिक प्रमाणांत दिल्या जाव्या असे ठराव होत होते, तरी रिस्ले व इतर गोरे लोक भारतीय नागरिक अद्याप उच्च कुवत असलेले असे नाहींत, असेंच म्हणत असत. समर्थ विद्यालयाचा उद्देश विशद करून सांगतांना विजापूरकर जेव्हां बोलूं लागतात, तेव्हां तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे पडसाद त्यामधून उमटलेले स्पष्ट दिसतील.

'राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी चळवळीचें प्रधान अंग आहे' हा विश्ववृत्तांतील (मार्च १९०७) लेख पाहिल्यास असें दिसेल कीं, धारवाड मुक्कामीं विजापूरकर यांनीं १२ मे १९०७ या दिवशीं जें व्याख्यान दिलें, त्या व्याख्यानाचाच लेख बनवून तो छापलेला आहे. मार्चचा अंक उशिरानें प्रसिद्ध झाला आहे एवढेंच. त्या अंकांत इंग्रज कोणकोणत्या बाबींमुळें भारतीयांस कमी लेखितात त्यांची यादी दिली असून शरीरसामर्थ्य, चारित्र्य, वगैरेदृष्ट्या आम्ही मुळींच कमी पडणार नाहीं असें शिक्षण मिळविण्यासाठीं समर्थ विद्यालयाचा प्रयत्न आहे असें त्यांनीं आवर्जून सांगितलें आहे. समर्थ विद्यालयांतून शिक्षण घेणारे विद्यार्थी पुढारीपण करूं शकणारे, खडतर दिवस काढण्याची तयारी असलेले व शिक्षणक्रम संपेपर्यंत आणि शक्यतर पुढेंहि बरींच वर्षे अविवाहित राहणारे असले पाहिजेत, असा विजापूरकरांचा कटाक्ष होता. बहिष्काराच्या कामीं पिकेटिंग किंवा निरोधन करण्यामध्येंहि सक्रिय भाग हे विद्यार्थी घेणार होते. साहजिकच राष्ट्रीय शिक्षणाविषयींचा हा दृष्टिकोण ही एक प्रतिक्रिया होती.

यांतच भर म्हणून त्या वेळच्या रिस्ले सर्क्युलरचाहि उल्लेख करतां येईल. विद्यार्थ्यांच्या मनांतील देशाभिमान पायदळीं तुडविणाऱ्या त्या सर्क्युलरनें देशभर जो धिंगाणा घातला होता, त्याची एक लांबलचक यादी विविधज्ञानविस्ताराच्या नोव्हेंबर १९०७ च्या अंकांत श्री. ग. र. अभ्यंकर यांनीं दिली आहे. शिवाजीवर व्याख्यान देणाऱ्या फर्ग्यूसन कॉलेजमधील एका नामांकित प्राध्यापकास कांहीं वेळ अज्ञातवास

पत्करावा लागला होता. उंबरगांव येथील सरकारी हायस्कुलांतील मुलांना, तीं शिवाजी उत्सवास गेलीं, म्हणून हांकून देण्यांत आलें. राजमहेंद्री कॉलेजांतील मुलांस वंदेमातरम् म्हटल्याबद्दल शिक्षा करण्यांत आली होती. भडोच येथील सरकारीं शाळेंतील एका मुलानें खाजगी वेळांत लजपतरायांचे फोटो विकल्याबद्दल दोन महिने त्यास शाळेंत घेतलें नव्हतें. स्वदेशी सभेला हजर राहण्याची परवानगी विद्यार्थ्यांना नाकारण्यांत आली होती. विद्यार्थ्यांच्या खोलींत देशभक्तांचे फोटो आढळले तर ते सक्तीनें त्रिचनापल्लीच्या जेसुइट कॉलेजांतील अधिकाऱ्यांकडून काढून टाकण्यांत आले होते. टिळकांची ज्युबिली करूं नये असें सरकारी अधिकाऱ्यांनीं फर्माविलें होतें. अशीं आणखी अनेक उदाहरणें अभ्यंकरांनीं नोंदलेलीं आहेत, व आपल्या लेखांत जी. एस. अरुंडेल यांचे दोन इंग्रजी परिच्छेद उद्धृत केले आहेत. त्यांचा आशय असा कीं, विद्यार्थ्याला देशाभिमानी बनविणें, देशाचें गतवैभव आणि त्याचा तेजस्वी भविष्यकाळ यांविषयीं प्रेम व आशा निर्माण करणें हें कोणत्याहि दृष्टिकोणांतून पाहिलें तरी शिक्षणक्षेत्रांत राजकारण आणल्यासारखें होत नाहीं.

रँग्लर परांजपे हे त्या वेळीं विशेष तेजोवलयानें विभूषित झालेले होते. १९०१ सालीं ६ डिसेंबर रोजीं जेव्हां ते विलायतेहून परत आले तेव्हां त्यांचा मोठा सत्कार करण्यांत आला होता. भारतीयानें सीनिअर रँग्लर ही पदवी मिळविल्यानें परांजपे सर्वांच्याच कौतुकाचा व आदराचा विषय झाले होते. त्यांतून फर्ग्युसन कॉलेजमध्येंच कमी पगारावर नोकरी करण्याचें त्यांनीं ठरविल्यानें त्यांच्या स्वार्थत्यागाला विलक्षण महत्त्व प्राप्त झालें होतें. शिक्षणक्षेत्रांतील त्यांचें स्थान अत्यंत वरच्या दर्जाचें मानलें जाई. इतिहासकार राजवाडे यांनीं आपले शिक्षणविषयक अनुभव ज्या ५० पानी लेखांत ग्रंथमालेमध्यें प्रसिद्ध केले आहेत, त्यांत असला स्वराज्य जवळ न आणणारा स्वार्थत्याग अगदीं कुचकामीं ठरविला आहे व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या मंडळींना कुचकामीं ठरविलें आहे. एवढें एक ठळक उदाहरण वगळल्यास परांजपे व इतर मंडळींचा त्याग त्या वेळीं जनतेच्या आदराचाच विषय होता. परंतु परांजपे यांनीं टिळकांच्या राजकारणाला विरोध करतांना साहजिकच राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेलाहि विरोध केला. ईस्ट ॲण्ड वेस्ट या नांवाचें एक भारदस्त मासिक मलबारी प्रसिद्ध करीत असत. त्या मासिकांत परांजप्यांनीं राष्ट्रीय शिक्षणाच्या विरुद्ध लिहिलें. आणि दोन आणि दोन चारच्याऐवजीं राष्ट्रीय शिक्षणाच्या गणितांत तुम्ही तीन किंवा पांच शिकविणार आहांत काय? असेंहि उपहासानें ते बोलत असत. त्यांची ही विपरीत भूमिका पाहून अभ्यंकर आपल्या लेखांत म्हणतात, "राष्ट्रीय शिक्षण म्हणजे कांहीं विपरीत इतिहास, अश्रुतपूर्व भूगोल, अज्ञेय असें गणित, विजातीय तर्कशास्त्र, असें मुळींच नाहीं. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे राष्ट्रीय महत्त्वाकांक्षांची वाढ विद्यार्थ्यांत करणें एवढेंच आम्ही त्याचें प्रमुख लक्षण समजत आहोंत. डायरेक्टरसाहेब अमका मुलगा स्वदेशी सभेस कां गेला, अमक्या मुलानें शिवाजी उत्सवांत अंग कां घातलें,

अमक्या शिक्षकानें कां व्याख्यान दिलें, कां लेख लिहिला अशा तऱ्हेचे प्रश्न प्रिन्सिपॉल-साहेबांस विचारीत आहेत; किंवा ग्रॅन्ट काढून घेण्याचा, किंवा विश्वविद्यालयाचें द्वार बंद करण्याचा बागुलबुवा प्रिन्सिपॉलसाहेबांच्या डोळ्यांपुढें नाचवीत आहेत. अशा स्थितींतहि राष्ट्रीय शिक्षण आणि चालू शिक्षण यांतील भेद प्रिन्सिपॉलसाहेबांच्या लक्षांत येऊं नये ही मोठ्या खेदाची गोष्ट होय."

१९०८ सालच्या आगेमागें राष्ट्रीय शिक्षणाविषयीं अशी तळमळ अनेक नामवंत व्यक्तींनीं प्रकट केलेली आहे. त्या नांवांमध्यें आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलाभिज्ञ डॉ. आनंद-केंटिश कुमारस्वामी यांचीहि गणना केली पाहिजे. अलाहाबाद येथें प्रसिद्ध होणाऱ्या हिंदुस्थान रिव्ह्यूच्या जुलै १९०७ च्या अंकांत 'वॉन्टेड नॅशनल एज्युकेशन इन् इंडिया' या नांवाचा लेख कुमारस्वामींनीं लिहिला आहे. त्याचप्रमाणें मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीचे काशिनाथ रघुनाथ मित्र यांनीं १९०६ च्या मार्च महिन्यांत 'वंगजागृति' या नांवाचें एक भाषान्तरित नाटक प्रकाशित केलें. मूळ नाटक बंगाली असून, त्याचे लेखक हरनाथ बसू हे होते. या मूळ 'जागरण' नाटकांत स्वदेशी, आत्मोन्नति, राष्ट्रीय शिक्षण, हिंदु मुसलमानांची एकी, वगैरे गोष्टी श्री. बसू यांनीं दाखविलेल्या आहेत. लोक राष्ट्रीय शिक्षणाकडे ओढले गेले असून, एक महाविद्यालय लवकरच स्थापिलें जाणार आहे, असें त्या नाटकांत दाखविलेलें आहे. नाटक निव्वळ प्रचारकी थाटाचें जरी असलें व त्यांत अस्सल दरोडेखोरांचें मन थोड्याशा बोलण्यानें पालटलेलें आहे असें दाखविलें असलें, तरीहि नाटकांतील विचार मित्रांना महत्त्वाचे वाटले व आपल्या छोट्याशा प्रस्तावनेमध्यें मित्रांनीं लिहिलें कीं, आमच्या महाराष्ट्र बंधूंस बंगाल्यांप्रमाणें महाराष्ट्रांतहि स्वदेशी चळवळ नेटानें चालविण्यास उत्साह यावा या हेतूनें हा अल्प प्रयत्न केला आहे. मनोरंजन मासिक चालविणारे मित्र किंवा कादंबऱ्या लिहिणारे नाथमाधव यांनींहि त्या काळांत स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षण या कल्पनांनीं भारून जावें, यावरूनच त्या वेळच्या महाराष्ट्रांत ही कल्पना किती दृढमूल झाली होती, व लोकांचा एक मानबिंदु ठरली होती, तें दिसून येणार आहे.

## समर्थ विद्यालयांतील शिक्षण

समर्थ विद्यालय हा शैक्षणिक प्रयोग जेवढा होता तेवढाच किंवा त्याहूनहि अधिक प्रमाणांत तो राजकीय उद्दिष्टांनीं व सामाजिक पुनरुत्थानानें भारावलेला असा एक प्रयोग होता, हें राष्ट्रीय शिक्षणाच्या त्या वेळच्या कल्पनेवरून स्पष्ट होईलच. खुद्द विजापूरकर यांनीं समर्थ विद्यालय या नांवाचें एक विस्तृत व्याख्यान दिलें व तें विश्ववृत्तांत प्रसिद्धहि झालें. पुढें नवीन समर्थ विद्यालय या स्वरूपांत तें जेव्हां अवतरलें तेव्हांपासून प्रसिद्ध होणारीं माहितीपत्रकें व अहवाल यांवरूनहि कांहीं हकीगत कळते. समर्थ विद्यालयांत गेलेले दिनकरशास्त्री कानडे यांनींहि त्यासंबंधीं केलेलें एक निवेदन स्वातंत्र्य-इतिहास लिहिणाऱ्या समितीनें घेतलेल्या मुलाखतींत दिलें आहे त्या सर्वांवरून

असें दिसतें कीं, स्वदेशी आदिकरून चतुःसूत्रीचें प्रचारक तयार करण्यासाठीं एक योजना तयार करून विश्वासू प्रचारकांना शिकविण्याचें काम प्रो. विजापूरकर यांजकडे सोंपवावयाचें होतें. कानडे म्हणतात, "टिळक, खापर्डे, नगरचे व बेळगांवचे देशपांडे, नासिकचे दादा गद्रे, प्रभृति १० मंडळींनीं वर्षाचे प्रत्येकीं शंभर रुपये व एकेक खास विश्वासू शिकाऊ प्रचारक पुरवावयाचा आणि त्यांची तयारी प्रा. विजापूरकर यांनीं करून घ्यावयाची, असें ठरलें. पोलिस ॲक्ट, रामायण, महाभारत, पॉव्हर्टी ऑफ इंडिया, हे विषय तर सदर तरुणांना शिकवावयाचेच, पण पुढें त्यांना दरमहा ३० रुपये द्यावयाचे असा बेत होता. त्यांतून कांहीं विश्वासांत घेऊन त्यांना घोडशैड, निशाणबाजी, यांचेंहि शिक्षण द्यावयाचें. प्रा. विजापूरकर यांचें कोल्हापुरामुळें अनेक लहानमोठ्या संस्थानिकांशीं संबंध आल्यामुळें तें शक्य होईल असा सर्वांचा अंदाज होता." १९०६ च्या जानेवारींत विजापूरकर कोल्हापूरला परत गेल्यावर शंकरराव लवाट्यांनीं कानड्यांना फर्ग्यूसनमधून बोलावून घेतलें आणि विजापूरकरांकडे जातोस का? असें विचारिलें. कानड्यांच्या होकारानंतर टिळकांच्याकडे बोलणें होऊन दुसऱ्याच दिवशीं कानडे हे कोल्हापूरला पहिला स्वदेशी प्रचारक होणारा विद्यार्थी म्हणून गेले. खापर्डे यांच्याकडून श्री. सुभेदार, गोवेकर हे आले. वासूकाका जोशी यांच्याकडून क्रांतिकारक आगाशे कऱ्हाडपासून चालत आले होते. वऱ्हाडांतून रामभाऊ मोटे आले होते. अशीं मंडळी जमून प्रचारक-वर्ग सुरू झाला. यालाच पुढें प्रबुद्ध वर्ग हें नांव पडलें. समर्थ विद्यालयाच्या ज. स. करंदीकर किंवा वामन मल्हार जोशी या शिक्षकांप्रमाणें प्रबुद्ध वर्गासाठीं आलेले विद्यार्थीसुद्धां शिक्षक बनविले गेले होते.

विद्यालयांतील विद्यार्थ्यांना खाकी पोषाख घालावयास लावून कानडे वगैरे लोक शिस्तीची कवाइत शिकवीत असत. मोठ्या शिक्षकांना हें माहीत नसे, असें कानडेशास्त्री म्हणतात. परंतु कै. ज. स. करंदीकर यांची मुलाखत प्रस्तुत लेखकानें १ व २ जुलै १९५७ रोजीं केसरी कार्यालयांत घेतली असतां, त्यांनीं असें सांगितले कीं, तळेगांवला अशा तऱ्हेचें शिक्षण विद्यार्थ्यांना दिलें जाई. डोंगरदरींत नेऊन निवडुंगाचीं बोंडें एकमेकांवर फेकून व लुटुपुटीच्या लढाया करावयास लावून आणि विद्यार्थ्यांचे सात-सात, दहा-दहा मैलांच्या अंतरावर कोठेंतरी कॅम्प्स् घेऊन करंदीकरप्रभृति लोक विद्यार्थ्यांना तयार करीत. बडोद्याच्या गंगनाथ विद्यालयांत तर विद्यार्थ्यांना बंदुकीचेंहि शिक्षण देत असत. कै. ज. स. करंदीकर यांनीं असेंहि सांगितलें कीं, समर्थ विद्यालयांतील विद्यार्थी कार्ल्याच्या बाजूला कोळी लोकांनीं दारू पिऊं नये, म्हणून पिकेटिंगसाठीं गेले होते. या विद्यालयांत सावरकरांचा मॅझिनी, चिपळूणकरांचा 'आमच्या देशाची स्थिति' हा निबंध, हें त्या वेळीं आक्षिप्त ठरलेलें वाङ्मय शिकविलें जात असे. ब्रिटिशांना विरोध म्हणून अमेरिकन रीडर्स लाविलेलीं होतीं.

त्या काळच्या स्वदेशी व्रताच्या कडकपणाचें कांहीं अजब नमुने सांगावयाचे झाल्यास ग. स. आळतेकर यांनीं आपली आठवण सांगितली, ती व विश्ववृत्तामध्यें दुसऱ्या एका

लेखकानें लिहिलेल्या लेखांमधून व्यक्त झालेली दृष्टि यांचीं उदाहरणें देतां येतील. डेक्कन कॉलेजमध्यें श्री. आलतेकर हे शिकत असतांना केरोसीनच्याऐवजीं समई लात्रीत असत. विश्ववृत्तामधील लेखांत असें म्हटलें आहे कीं, लाविलेलीं पुस्तकें विकत घेऊन परदेशीं पैसा पाठविण्यापेक्षां तीं पुस्तकें आपल्या वहींत उतरून घ्यावींत व अशा रीतीनें परदेशी जाणारा पैसा थांबवावा. त्या वेळच्या महाराष्ट्राचें मन या विषयानें किती भारावून गेलें होतें, हें यावरून दिसण्यासारखें आहे.

## जातिभेदाच्या आक्षेपाचा विचार

विद्यालय बंद पडलें, त्याचीं आतां सरकारी प्रकाशनांतून प्रसिद्ध झालेलीं कारणें विद्यालयाच्या सरकारविरोधी धोरणावर प्रकाश टाकतात. त्याकडे वळण्यापूर्वी श्री. ज. स. करंदीकर यांनीं आपल्या मुलाखतींत जी शंका व्यक्त केली, त्याविषयीं थोडासा ऊहापोह करावयाचा आहे. श्री. करंदीकर यांच्या बोलण्यांत असें आले कीं, समर्थ विद्यालयांतील एक शिक्षक नरहर बाळकृष्ण जोशी हे समर्थ विद्यालयांतून अपमानित होऊन गेले. श्री. जोशी नंतर कोल्हापूर येथें आले व त्यांनीं शाहू महाराजांचे कान भरविले. आणि समर्थ विद्यालयांत ब्राह्मणेतर इतकेंच नव्हे तर प्रभू मुलांना निराळ्या पंगतीस जेवावयास बसवितात वगैरे गोष्टी सांगितल्या. या चुगलखोरीपणामुळें समर्थ विद्यालय बंद पडलें असें मानणें योग्य वाटत नाहीं. अर्थातच कै. करंदीकर यांनीं या मुद्द्यावरच भर दिला, असें प्रस्तुत लेखकाला सुचवावयाचें नाहीं. परंतु समर्थ विद्यालयावर आक्षेप घेणाऱ्या त्या वेळच्या कांहीं लोकांनीं आणि नंतरच्याहि कांहीं टीकाकारांनीं व खानोलकर या चरित्रकारांनीं या गोष्टीचा उल्लेख प्रामुख्यानें केलेला आहे. म्हणून त्या वेळचीं इतर कांहीं उदाहरणें देऊन या प्रश्नाकडे जाणत्यांनीं पाहिलें पाहिजे, असें प्रस्तुत लेखकास सुचवावयाचें आहे. समर्थ विद्यालयांत कोणाला जाचक होईल अशा स्वरूपांत जातिभेद मुळींच नव्हता. विजापूरकरांचे लेख पाहणारास असें दिसेल कीं, समर्थ विद्यालयांत ख्रिश्चन, पार्शी, मुसलमान, या सर्वांस प्रवेश होता. मात्र आर्यधर्माची शिकवण तेथें दिली जाईल, असें विजापूरकरांनीं आपल्या लेखांत म्हटलें होतें. विद्यार्थ्यांमध्यें सोनार नांवाचा विद्यार्थी होता, शिक्षकांत कोतवाल नांवाचे शिक्षक होते, हरळे नांवाचे एक मराठा शिक्षकहि समर्थ विद्यालयांत होते. दिनकरशास्त्री कानडे यांनीं ग्वाही देऊन सांगितलें आहे कीं, समर्थ विद्यालयांत जातिभेद नव्हता. ते लिहितात, कीं विद्यार्थ्यांच्या कँपमध्यें ज्या हालचाली होत असत, त्या खुद्द तळेगांवींहि जातिभेद विसरून होत असत.

आपण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं तो काळ जातिभेद पूर्णपणें विसरावयास लाविणारा असा नव्हता; एवढेंच नव्हे तर जातीजातींतील पोटभेदहि विसरले जात नसत. 'ब्राह्मण-पत्रिका' चालविणारे श्री. मुंडले यांनीं ब्राह्मणांतील पोटजातीचे एकत्रीकरण होण्याविषयीं चाललेली चर्चा ऐकण्यासाठीं आपल्या प्रतिनिधीला मुंबईच्या ब्राह्मणसभेमध्यें १९२३-२४ च्या सुमारास पाठविलें असतां, त्या प्रतिनिधीनें त्यांना

कळविलें कीं, मुंबईच्या ब्राह्मणसभेंतील ब्राह्मणांचा या गोष्टीला विरोध आहे. ही १९२४ ची गोष्ट. तर १९०८ सालीं वातावरण यापेक्षांहि थोडेंसें अधिकच जातिभेद मानणारें असें असल्यास नवल नाहीं. प्रिन्सिपॉल सी. रा. तावडे यांनीं पुण्याच्या सरकारी प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजचा इतिहास लिहिलेला आहे. श्री. तावडे यांनीं ज्या निर्विकार बुद्धीनें आणि ऐतिहासिक भूमिकेवरून तत्कालीन परिस्थितीचें वर्णन दिलें आहे, तें टीकाकारांनीं व चिकित्सकांनीं जरूर ध्यानीं घ्यावें. पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांतील त्या वेळच्या विद्यार्थ्यांची भोजनव्यवस्था कशी होती, तें या इतिहासावरून समजून येईल, इतकेंच काय, कोल्हापूरच्या तुरुंगांतसुद्धां तेव्हां चार वेगवेगळ्या चुली होत्या, असें श्री. उत्तमराव शेणोलीकर यांनीं आपल्या आठवणींमध्यें लिहिलेलें आहे. तें हस्तलिखित आहे. परंतु उत्तमराव लिहितात, " तुरुंगांत स्वयंपाकघराला भिशी अशी संज्ञा आहे. भिशांत चार चुली होत्या. ब्राह्मण, जैन-लिंगायत, मराठे-मुसलमान, व चौथी पठाणांकरितां. "

◆ ◆ ◆

## *समर्थ विद्यालय बंद झालें*

गृहखात्याच्या स्पेशल फाजील क्रमांक २०, २०-अ, मधून सरकारनें कांहीं उतारे प्रसिद्ध केले आहेत.* त्यांवरून असें दिसून येतें कीं, समर्थ विद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थी आक्षेपार्ह व बंदी घातलेलीं पुस्तकें आणि वर्तमानपत्रें वाचीत असत. ७ एप्रिल १९१० रोजीं ' आमच्या देशाची स्थिति ' हा कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा निबंध सरकारनें त्या सालच्या प्रेस ॲक्ट कलम १२ प्रमाणें आक्षिप्त वाङ्मय म्हणून जाहीर केला होता. समर्थ विद्यालयाच्या अभ्यासक्रमांत हा निबंध होता.

" मुंबई सरकारनें हिंदुस्थान सरकारला धाडलेल्या वृत्तान्तामध्यें असें म्हटलें होतें कीं, नासिकच्या कटाप्रमाणें एखादा महान् उद्रेक घडून येण्याची शक्यता समर्थ विद्यालयांत दृष्टोत्पत्तीस येत आहे. प्रो. विजापूरकर – ज्यांच्यावर खटला झाला व जे सध्यां शिक्षा भोगीत आहेत – यांचा राष्ट्रीय शिक्षण देण्याचा उद्देश इंग्लंडचा पराभव करण्यासाठीं यत्न करणें हा आहे. ज्यांचीं नांवें या वृत्तान्तांत दिलीं आहेत, ते बिपिनचंद्र पाल यांच्या हिंद नॅशनल एजन्सीचे शेअर होल्डर आहेत, किंवा होते. सध्याचे मुख्याध्यापक श्री. ज. वि. ओक हे नागपूरच्या नील हायस्कूलचे मुख्य होते. तेथें राजकीय कारणांसाठीं त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. व्हिक्टोरिया राणीच्या स्मारकाचें स्वरूप कसें असावें, हें ठरविण्यासाठीं भरलेल्या सभेंत श्री. ओक यांनीं व्यत्यय येईल अशी वागणूक केली होती. श्री. कोतवाल यांना इंदूरहून एक उपद्रवी

* Source Material for A History of the Freedom Movement in India ( collected from Bombay Government Records ) Vol. II 1885-1920.
Chapter : Miscellaneous Topics; 13th Topics, page 223 ff.

गृहस्थ म्हणून हद्दपार केलें होतें. आणखी एक शिक्षक श्री. व्ही. डी. पटवर्धन यांनीं विजापूरमध्यें १९०८ सालीं उघडरीत्या बहिष्काराचा पुरस्कार केला होता. श्री. मुकुंद पांडुरंग मोघे यांना नाशिक खटल्यांत कैद करण्यांत आलें आहे. ( त्या खटल्यांत श्री. मोघे निर्दोषी सुटले. ) श्री. सी. ए. मोडक यांनाहि इंदूरहून हद्दपार करण्यांत आलें आहे."

मुंबई सरकारच्या अहवालांत पुढें टिळक, चिंतामणराव वैद्य, वगैरेंचा उल्लेख विद्यालयाचे चालक म्हणून केला असून, हे सर्व जहाल आहेत असें सूचित केलें आहे. संस्थेचे अहवाल दिलेले असून, मागील अहवालांत या संस्थेनें टिळकांना लोकमान्य असें म्हटलेलें आहे, असें दाखवून दिलें आहे. खेरीज, फडके नांवाच्या एका गृहस्थांचें मुंबईस झालेलें भाषण दिलें असून, श्री. फडके यांचीं कांहीं वाक्यें उद्धृत केलीं आहेत. " शिक्षण असें असावें कीं, ज्यामुळें पुढचे लोक पूर्वीच्या वीरांप्रमाणें शिवाजी व इतरांप्रमाणें योद्धे व्हावेत. अशा तऱ्हेचें शिक्षण समर्थ विद्यालयांत दिलें जातें, ही फार समाधानाची गोष्ट आहे. "

येथील झडतींत जप्त करण्यांत आलेलीं पुस्तकें, मासिकें व नियतकालिकें अशीं होतीं : चिपळूणकरांची निबंधमाला—६ प्रती, सावरकरांचा मॅझिनी—२ प्रती, पांगारकरांचें रामदासीबोवा हें पुस्तक, स्वराज्य—८ प्रती, आर्यमाता हें बंदी असलेलें चित्र—१ प्रत; जवळजवळ प्रत्येक खोलींत टिळकांची तसबीर आढळून आली. दीड वर्षापूर्वीच एका अधिकाऱ्यानें खबर दिली होती कीं, पुणें तालुक्याच्या ब्राह्मण अंमलदारानें ही शाळा म्हणजे फार मोठें असें सार्वजनिक धोक्याचें ठिकाण आहे, असें मानिलें होतें. सरकारचेंहि तेंच मत आहे. म्हणून या शाळेवर बंदी घालण्यांत यावी.

नाशिकचे कुप्रसिद्ध खरे असा ज्यांचा उल्लेख या अहवालांत केला आहे, ते श्री. कृष्णाजी गोपाळ खरे यांना तळेगांवच्या शाळेंतील एक शिक्षक श्री. करंदीकर यांच्याकडून पिस्तुल मिळालें होतें, असें पुराव्यांत दिसून आलें. ( सरकारी प्रकाशन, पानें ४१२ ते ४१४ ). हे करंदीकर म्हणजे ज. स. करंदीकर कीं रा. प्र. कानिटकर यांनीं वामन मल्हार जोशी यांच्या लहानशा चरित्रांत ज्यांचा उल्लेख केला आहे, ते पेणचे करंदीकर हें नक्की सांगतां येत नाहीं. प्रस्तुत लेखकानें घेतलेल्या मुलाखतींत कै. ज. स. करंदीकर यांनीं याविषयीं कांहींच उल्लेख केला नव्हता. बहुधा हे पेणचेच करंदीकर असावेत.

मुंबई सरकारच्या या निवेदनाला उत्तर म्हणून सिमल्याहून १० जून १९१० रोजीं एक नोटिफिकेशन पाठविण्यांत आलें आणि १९०८ च्या इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट, सेक्शन १६ याप्रमाणें समर्थ विद्यालय ही बेकायदेशीर संस्था ठरली.

प्रो. विजापूरकर यांच्या सुटकेनंतर समर्थ विद्यालयांतील शिक्षक पुन्हा एकत्र

येऊं शकले नाहींत. याचें कारण समर्थ विद्यालय ही संस्था बेकायदेशीर जमाव मानण्यांत आली हें होय. कै. तात्यासाहेब करंदीकर यांनीं याविषयीं बोलतांना सांगितलें कीं, पूर्वीच्या शिक्षकांपैकीं कोणतेहि दोन किंवा अधिक लोक एकत्र येणें सरकारच्या हुकुमामुळें अशक्य झालें. म्हणून विद्यालयांतील विद्यार्थ्यांना खासगी शिकविणें भाग पडलें व पुढें केसरींत आपला प्रवेश झाला. याखेरीज इतरहि कारणें संभवतात. त्यांपैकीं लोकमान्यांची शिक्षा, सावरकरांचें काळें पाणी, काळकर्ते परांजपे यांच्यावरील खटला, नाशिकच्या कटांतील आरोपींना झालेली फांशी, कोल्हापूर आणि औंध येथील खटल्यांतील आरोपी यांना झालेली कैद व कडक शिक्षा, या सर्वांमुळें महाराष्ट्र एकदम गलितगात्र झाला. विजापूरकर सुटून आल्यानंतर त्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहिला तो महाराष्ट्र हतबुद्ध किंवा किंकर्तव्यमूढ असाच आढळला. १९०६ ते १९१० या कालखंडांतील महाराष्ट्राची तेजस्विता जवळजवळ लुप्त झाल्यासारखी झाली. महाराष्ट्रांतील स्वराच मनु पालटला. नामदार गोखले यांच्याशीं प्रो. विजापूरकर यांचे संबंध कितीहि चांगले असले, तरी विजापूरकर सुटून आल्यानंतर समर्थ विद्यालयाच्या बाबतींत गोखल्यांकडून कांहीं मदत होणें त्या काळांत संभवनीय नव्हतें, असेंच अनुमान काढलें पाहिजे. जी गोष्ट नामदार चौबळांच्या साहाय्यानें पुढें विजापूरकरांना करतां आली, ती गोखले हयात असतांना त्यांना कां साध्य होऊं शकली नाहीं, याचा उलगडा एरव्हीं होतच नाहीं.

## संपादनकार्य ( १ )

प्रो. विजापूरकर यांच्या स्वतःच्या लेखनांतून उतरलेले महत्त्वाचे लेख एकत्रित स्वरूपांत महाराष्ट्राला उपलब्ध करून देणें हें महत्त्वाचें काम अंगावर घेऊन, प्रस्तुत लेखकानें शोध करण्यास सुरुवात केली. तेव्हां असें आढळलें कीं, ग्रंथमाला व विश्ववृत्त या दोन भारदस्त मासिकांच्या द्वारें विजापूरकरांनीं अनेक विद्वानांचे मननीय ग्रंथ व लेख तत्कालीन महाराष्ट्राला उपलब्ध करून दिले. समर्थ विद्यालय स्थापण्यापूर्वी त्यांनीं केलेली ही वाङ्मयसेवा इतकी थोर आहे कीं, विजापूरकरांवरील मृत्युलेखांत तिजविषयीं लिहितांना ८ ऑगस्ट १९२६ च्या विविधवृत्ताच्या अंकांत असें म्हटलें आहे, "ग्रंथमालेच्या द्वारें त्यांनीं केलेल्या वाङ्मयसेवेबद्दल अर्वाचीन महाराष्ट्र सारस्वताच्या इतिहासकाराला स्वतंत्र प्रकरण लिहावें लागेल इतकी ती मोठी आहे."

प्रथम ग्रंथमालेसंबंधीं थोडें सविस्तर लिहितों.

तारीख २ एप्रिल १८९४ हा दिवस शाहू छत्रपति यांच्या मुखत्यारीचा होता. विजापूरकरांनीं ग्रंथमालेचा पहिला अंक याच दिवशीं प्रसिद्ध केला. पुढील सहा वर्षांची ग्रंथमालेची वाटचाल कशी होत गेली तें त्यांच्याच शब्दांत देतों:—"प्रथम ग्रंथमालेंत दरमहा ६४ पृष्ठें प्रसिद्ध होत होतीं. सालीना टपालखर्चासुद्धां वर्गणी ५ रु. ६ आ. होती. दुसऱ्या वर्षाच्या प्रारंभापासून कांहीं लहान पगाराच्या नोकरांकडून व अगदीं

कमी उत्पन्नाच्या पुस्तकालयांकडून सवलती मागण्यांत आल्या. आपल्या खर्चवेंचाचा विचार पाहून सवलतीचा दर सरसकट तीन रु. आठ आणे ठेवला. तो दरमहा ५० रुपयांहून कमी उत्पन्नाच्या पुस्तकालयासच व सद्‌गृहस्थांसच लागू केला. त्याच वेळीं १६ पृष्ठें दरमहा अधिक देऊं लागलों. ही व्यवस्था सप्टेंबर १९०० पर्यंत म्हणजे ६६ अंकांपर्यंत कायम होती. पुढें ६७ व्या अंकापासून विजयादशमीच्या सुमुहूर्तानें दरमहा १७२·पृष्ठें देण्यास प्रारंभ केला. एक हजार वर्गणीदार मिळाले तर असे १८ अंक देण्याचें ठरविलें आहे. त्या वेळेपासून वर्गणीचे दर किंचित् वाढविले आहेत. म्हणजे सालीना रुपये ६ व सवलतीचा दर रु. ५ व टपाल व बंगीचा खर्च ८ आणे, अशा प्रकारें काम सुरू होऊन ६ अंक निघालेले आहेत. दिवसेंदिवस लोक ग्रंथमालेस अधिक चाहत आहेत. तींतील कांहीं प्रकरणांचे गुजरातींत व कानडींत भाषांतर करण्यास आम्हांकडे परवानगी मागितल्यावरून ती आम्हीं मोठ्या आनंदानें दिली आहे. सुरुवातीला सालीना ५०० रुपये खर्च येईल असा अजमास होता. त्याप्रमाणें ३०० च प्रती काढीत होतों. पुढें चार महिने झाल्यावर दरबारचा नक्की आश्रय १०० प्रतींचा मिळून ३०० रुपये आम्हांस द्यावयाचें ठरलें. तेव्हां ५०० प्रती छापून काढूं लागलों.

राजारामीयांनीं या कामास प्रथम सुरुवात केली. पुढें विद्वान् व दीर्घोद्योगी अशा परस्थ पदवीधरांचें व इतर सद्‌गृहस्थांचें साहाय्य मिळालें. या पुस्तकास लेखांची कधींच उणीव पडली नाहीं. अजून पुष्कळ मजकूर छापावयास तयार आहे. शिवाय अनेक लेखण्या चालल्या आहेत. फक्त कल्पित गोष्टी, कादंबऱ्या व नाटकें खेरीजकरून बहुतेक सर्व विषयांचा यांत समावेश होतो. यांतील एक मुख्य अंग म्हणजे शेंकडा ४० पृष्ठें मजकूर रा. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, बी. ए., यांनीं शोधून काढलेले जुने ऐतिहासिक लेख, म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, हें होय. बाकीच्या भागांत नवीन ग्रंथ व निबंध येतात. त्यांत प्रथमतः मि. स्टेड यांच्या रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूजच्या धर्तीवर जगांतील सर्व प्रकारची हालहवाल येते.

आमच्या शिक्षित बंधूंस तर आम्ही आग्रहानें विनवितों कीं, जगांत काय काय चाललें आहे तें पाहून व वाचून आम्हांस कळवा. 'आम्हांस फावत नाहीं, आम्हांस लिहिण्याची संवय नाहीं,' असें म्हणून आमच्या विनंतीचा अव्हेर करूं नका. जसें येईल तसें लिहून आम्हांस पाठवा. त्याला नीटनेटकें स्वरूप देण्याचें काम आमचें आहे.... जुना कागद कसलाहि असला तरी तो, अथवा त्याची नक्कल पाठवून द्या. अशा प्रकारच्या तुमच्या भेटीपासून जो आनंद होईल तो दुसऱ्या कशानेंहि होणें अशक्य आहे. कांहींहि चांगलेंसें आढळलें कीं, आमच्या द्वारें आपल्या देशबांधवांस नजर करण्यासाठीं आमच्या हवालीं करा. हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या मराठी लोकांत व मराठी भाषा बोलणाऱ्यांत एक प्रकारचें ऐक्य व प्रेमभाव वसावा व मुकुंदराज, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, मोरोपंत इत्यादि कविवरांनीं बनविलेल्या महाराष्ट्र-वाङ्मयांत देश, काल, वर्तमानाप्रमाणें

भर घालून जगांतील सुधारलेल्या भाषांत आपल्या भाषेची गणना व्हावी, अशी आमची इच्छा आहे."

ग्रंथमालेचा खर्चेंच भागविण्यास एक कायमचा निधि उभारला गेला तर चांगलें होईल, असें विजापूरकरांना पूर्वींपासून वाटत होतें. परंतु कांहींतरी भरीव कार्य करून दाखविल्याशिवाय अशा योजनेला पाठिंबा मिळणार नाहीं याची त्यांना जाणीव होती. सहा वर्षे ग्रंथमालेचें कार्य चालल्यानंतर निधीचीहि योजना त्यांनीं पुढें मांडली. या योजनेप्रमाणें कोणत्याहि वर्गणीदारानें एकरकमेनें १०० रुपये दिल्यास, पुढें त्यास दरवर्षी मनीऑर्डर पाठविण्याची कटकट राहणार नव्हती. १०० च्या व्याजांतच ग्रंथमाला मिळत जाणार होती. पैसे परत पाहिजे असतील तर आठ दिवसांच्या आंत परत केले जाण्याची सोय होती. कौटिल्यानें अर्थशास्त्रांत सहकार तत्त्वाला जो संभूय-समुत्थान शब्द वापरला आहे, तोच वापरून विजापूरकरांनीं महाराष्ट्रांतील बांधवांना सहकाराचें आवाहन केलें होतें.

या निवेदनावरून ( ग्रंथमाला, नोव्हेंबर १९०० ) असें दिसून येईल कीं, ग्रंथ-मालेंत शास्त्रीय, ऐतिहासिक, समाजशास्त्रविषयक, चरित्रविषयक, भाषाशास्त्रविषयक, प्रवासवर्णनात्मक वगैरे अनेक प्रकारचे मननीय लेख विद्वान् व अधिकारी लेखकांकडून विजापूरकरांनीं लिहवून घेतले. मार्च १९०१ च्या अंकांत 'सालअखेर' या सदरानंतर त्यांनीं एक परिशिष्ट छापलें असून, त्यामध्यें ग्रंथमालेंत किती प्रकरणें छापून पूर्ण केलीं, व कोणतीं त्या वेळपर्यंत अपूर्ण होतीं, त्याची संपूर्ण यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीवरूनहि असें दिसेल कीं, मराठी भाषेला ललामभूत होतील असे वि. ल. भावे यांनीं लिहिलेलें महाराष्ट्र-सारस्वत किंवा न्यायमूर्ति रानडे यांनीं लिहिलेल्या 'राइज ऑफ दि मराठा पॉवर,' या ग्रंथाचें मराठींतील भाषांतर अथवा पांगारकर, मोरो केशव दामले, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, यांचे ग्रंथ या मालेंतून प्रथम प्रसिद्ध झाले. मराठी पारिभाषिक शब्द बनवून यंत्रस्थितिशास्त्र, प्रकाशलेखन, रासायनिक परीक्षण, सूर्यग्रहण वगैरे शास्त्रीय विषयांवरदेखील त्या वेळच्या अधिकारी लेखकांनीं भारदस्त लेख लिहिले आहेत. पारिभाषिक शब्दांची विशेषशी अडचण तत्कालीन लेखकांना पडलेली दिसत नाहीं. स्वतः विजापूरकरांनीं फ्रीमनकृत युरोपचें संक्षिप्त इतिवृत्त, हें भाषांतर ग्रंथमालेंतून क्रमशः प्रसिद्ध केलें. त्या संदर्भात आपल्या प्रास्ताविकांत विजापूरकर म्हणतात कीं, फ्रीमनचें पुस्तक प्रसिद्ध होऊन तेव्हां चारच वर्षे झालीं होतीं. भाषांतराची परवानगी मागतांना कोणताहि मोबदला न घेतां ती त्यांना देण्यांत आली व त्यांचें कार्य सुलभ झालें. रानडयांच्या प्रसिद्ध पुस्तकाचें भाषांतर रामचंद्र मोरेश्वर आपटे, बी. ए., एलूएल्. बी., यांनीं केलें. इनामदार यांचेंहि नांव आपट्यांच्या जोडीला छापलेलें कांहीं प्रतींत दिसतें. विजापूरकरांनीं त्या दोघांचें लेखन दुरुस्त करून 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' या पुस्तकाची पुढील आवृत्ति काढली असेल. परंतु चित्रावशास्त्री यांच्या चरित्रकोशांत विजापूरकरांवर

जें टिपण दिलें आहे त्यामध्यें भाषांतरकार विजापूरकर होते असें म्हटलें आहे, तें तितकेंसें बरोबर नसावें. हा मुद्दा लहान आहे, परंतु चुकीची दुरुस्ती व्हावी अशा बुद्धीनें हें लिहिलें आहे. बर्कच्या प्रेझेंट डिस्कन्टेंट्सचें भाषांतर मोरो केशव दामले यांनीं केलें. स्पेन्सरवरील लेखमाला नारायण लक्ष्मण फडके यांनीं लिहिली. राजवाडे यांचा कादंबरी या वाङ्मयप्रकारावरील महत्त्वाचा निबंध ग्रंथमालेंतच ऑगस्ट १९०२ च्या अंकांत प्रसिद्ध झाला. सरदार माधवराव किबे, जगन्नाथ रावजी टिल्लू वगैरे मंडळी ग्रंथमालेची केवळ आश्रयदातीच होती असें नव्हे, त्यांनीं ग्रंथमालेंत लेखनहि केलें आहे. रियासतकार सरदेसाई, वाईकर भटजीचे लेखक श्री. धनुर्धारी, त्या वेळीं नुकतेच प्रसिद्धीला येऊं लागलेले मान्यवर लेखक श्री. ना. गो. चापेकर, कार्लाइलवर ग्रंथ लिहिणारे केशवसुतांचे बंधु सितारामपंत दामले वगैरेंचे लेखनसाहाय्यहि विजापूरकरांना नेहमीं मिळत गेलें.

या ग्रंथप्रकाशनामधून आणि महत्त्वाच्या मुख्या निबंधांवरून असें दिसून येतें, कीं राष्ट्राचें पुनरुत्थान करण्याचा विजापूरकरांचा तो एक महान् प्रयत्न होता. शास्त्रीय शोध, जगांतील इतर देशांतून चालू असलेली घडामोड, निरनिराळ्या देशांनीं केलेले स्वातंत्र्याचे प्रयत्न, मराठी भाषेची थोरवी, मराठ्यांच्या इतिहासाचें महत्त्व, या सर्वांवर ग्रंथमालेंत लेख आलेले दिसतात. अंधश्रद्धा कमी होऊन विवेकशक्ति वाढावी, पूर्वग्रह जाऊन सारासार विचार अंगीं बाणावा, विकारवशता जाऊन सर्वंकष असा विचार करण्याची शक्ति यावी, असाहि उद्देश ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेल्या प्रकरणांवरून नजरेस येतो. मालाकार चिपळूणकर यांच्या निबंधमालेंत जी दृष्टि होती, तिच्याहून ही दृष्टि वेगळी आणि कदाचित् अधिक महत्त्वाची असेंहि म्हणतां येईल. अनेक लोकांनीं महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उत्थापनांत व वैचारिक जागृतींत सहभागी व्हावें, असें विजापूरकरांना वाटत होतें, हें तर खरेंच; परंतु राष्ट्रीय शक्ति वृद्धिंगत व्हावी आणि इंग्रजांविरुद्ध लढण्याचा जोम निर्माण व्हावा असाहि गुप्त हेतु ग्रंथमालेंतील प्रकाशित प्रकरणांवरून व त्यांच्या स्वतःच्या लेखनावरून दृग्गोचर होतो.

इतिहासासंबंधीं ग्रंथमालेंत बऱ्याच वेळां लेख प्रसिद्ध झालेले आहेत. उदाहरण द्यावयाचें झाल्यास, ग्रंथमालेंतील निवडक निबंधांचें निबंध-पंचक या नांवाचें एक पुस्तक त्यांनीं स्वतंत्र रीतीनें प्रकाशित केलें आहे, त्याचें देतां येईल. या निबंध-पंचकांत राजकीयदृष्ट्या इतिहासाचें महत्त्व हें लेकी यांच्या इंग्रजी निबंधाचें नारायण कृष्ण आगाशे, सातारा, यांनीं केलेलें भाषांतर छापलें आहे. तेव्हांचा विशिष्ट काळ लक्षांत घेतां, इतिहासावर आमचे देशप्रेम मनांत असणारे विद्वान् भर कां देत होते, तें लक्षांत येईल. सर चिमणलाल सेटलवाड यांनीं आपल्या आठवणींमध्यें असें लिहिलें आहे कीं, त्या वेळीं इंग्लंडचा इतिहास व विशेषतः बर्क आणि बेकन यांचे ग्रंथ अभ्यासक्रमांतून काढून टाकावेत अशी सूचना गव्हर्नरनें केली होती. गव्हर्नरची म्हणजेच इंग्रज सरकारची

समजूत अशी झाली होती कीं, इंग्लंडचा इतिहास आणि बर्क व बेकन या ग्रंथकारांचा अभ्यास जर हिंदी विद्यार्थ्यांनीं आत्मसात् केला तर ते राजनिष्ठ राहणार नाहींत. अशा तऱ्हेच्या एका ठरावाची वासलात पुढें कशी लागली, आणि सरकारनियुक्त सभासदांकडून शेवटीं सरकारनें आपल्या म्हणण्याला रुकार कसा मिळविला, त्याची मनोरंजक हकीगत जिज्ञासूंनीं सेटलवाड यांच्या आठवणींमध्यें पाहावी.

ग्रंथमालेचे संपादक म्हणून विजापूरकरांनीं आणखी एक मननीय असें उदाहरण घालून दिलें आहे. त्यांची स्वतःची वृत्ति कठोर टीका करण्याची नव्हती; किंबहुना सौम्य भाषा वापरणारे म्हणून ते केव्हां केव्हां इतरांच्या हेटाळणीचाहि विषय झालेले आहेत. तरीहि, ज्या कोणा टीकाकाराला आपला विषय मांडावयाचा असेल त्याला ग्रंथमालेंत अगदीं निःसंकोचपणें आपलें लेखन करतां येत असे. नारायण बाळकृष्ण देव या गृहस्थांनीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचें ४४ पानी परीक्षण ग्रंथमालेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलें. त्यांत अर्थातच दुसऱ्याला लागेल असा मजकूर विशेषसा नव्हता. तरीहि, विष्णुशास्त्री यांच्या स्वार्थत्यागाबद्दल आणि निबंधमालेंतील त्यांच्या लेखाबद्दल श्री. देव यांना टीकास्पद असें कांहीं लिहावयाचें होतें. या लेखाची प्रतिक्रिया म्हणून कै. श्री. वा. दा. मुंडले यांनीं दोन विस्तृत लेखांक ग्रंथमालेकडे पाठविले. श्री. मुंडले आपल्या आठवणींमध्यें आणि याचसंबंधीं विस्तारानें आपल्या अप्रकाशित आत्मचरित्रांत म्हणतात कीं, प्रो. विजापूरकर आपलें विस्तृत उत्तर ग्रंथमालेंत जसेंच्या तसें छापतील किंवा नाहीं याविषयीं आपणांस शंका होती. त्यांची शंका थोडीशी रास्तहि होती, असें मुंडले यांनीं आपल्या उत्तरादाखलच्या लेखांत श्री. कुंटे ( महादेव मोरेश्वर ) याजसंबंधीं जें लिहिलें आहे, त्यावरून दिसून येईल. श्री. मुंडले लिहितात : "पुण्यांतील टारगेपणाचें बरंच श्रेय मि. कुंटे यांकडे दिलें आहे. त्याबद्दल रा. देव यांस शंका कां वाटते तें समजत नाहीं. आपल्या शंकेचीं कारणें जर त्यांनीं दिलीं असतीं, तर या बाबतींत जास्त विचार करतां आला असता.........मि. कुंटे यांच्या अंगीं गांभीर्य, पोक्तपणा, आपणांशीं संबंध असलेल्या मंडळींची योग्यता जाणण्याची शक्ति व दुसऱ्यावर छाप बसेल अशा तऱ्हेनें वागण्याची शैली, वगैरे गुण जर योग्य प्रमाणानें असते तर पुण्यांतील चावट व खोडसाळ मुलांच्या टारगेपणाला त्यांना चांगला आळा घालतां आला असता; आणि पुण्यांतील प्रमुख शाळेचे प्रमुख मास्तर या नात्यानें तसें करणें हें एक त्यांचें कर्तव्यच होतें. परंतु कै. कुंटे यांचे अंगीं वरील गुणांऐवजीं, शाळेंतील चावट व टवाळ मुलांची सलगी, त्याचबरोबर जिन्यांतून जातांना चेंगराचेंगरी, कोणत्याहि शरीरावयवाचा निःशंकपणें उच्चार करणें, मुलांच्या करमणुकीकरितां असिस्टंट मास्तराच्या चालण्याचा, बसण्याचा फार्स करून दाखविणें, इत्यादि विलक्षण दुर्गुणांचें वास्तव्य असल्यामुळें, त्यांचे हातून वर सांगितलेलें कर्तव्य बजाविलें गेलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर उलट त्यांच्या शेवटच्या गुणांनीं, मोठ्या लोकांची टवाळी कशी करावी, हें पुण्यांतील विद्यार्थ्यांस उत्तम रीतीनें शिकविलें."

हें उदाहरण दोन दृष्टींनीं उपयुक्त आहे. स्वतः प्रो. विजापूरकर यांची कुंट्यांच्या-बद्दलची भावना अतिशय आदराची होती. रानडे, कीर्तने, कुंटे, गोखले वगैरे थोर मंडळी कोल्हापुरांत निर्माण झाली. याबद्दल विजापूरकरांना सार्थ अभिमान वाटत असे. गोखल्यांच्या एका गौरवप्रसंगीं त्यांनीं म्हटलें होतें, कीं या चार-पांच थोर लोकांच्या प्रभावामुळें कोल्हापूरचे रहिवासी पंचप्रवरी झाले आहेत. कुंटे हे राजाराम हायस्कूलचे निर्माते व पहिले प्रमुख हेडमास्तर. १८७१ पर्यंत ते कोल्हापुरांत होते. त्यांनींच शाळेंतील मुलांना प्रयागच्या सहलीस घेऊन जाण्याचा उपक्रम प्रथम सुरू केला होता. त्यांच्या या कामगिरीचा सविस्तर उल्लेख विजापूरकरांनीं डॉ. आपटे ( विष्णु गोपाळ आपटे ) यांच्या लहानशा चरित्रात्मक लेखांत केलेला असून, शाळेसाठीं त्यांनीं जे परिश्रम घेतले व विद्यार्थ्यांच्यावर जो हितावह परिणाम केला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. अशा कुंट्यांच्या बाबतींत मुंडल्यांच्या लेखांत नालस्तीचे उद्गार होते. शिवाच खुद्द देव यांच्या लेखांत शिक्षणसंस्था या सदराखालीं जो एक लहानसा परिच्छेद आलेला आहे, त्यांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांवर एवढा प्रखर असा हल्ला मुळींच नव्हता. श्री. मुंडले हे तेव्हां नव्या उमेदीनें लिहिणारे, पदवीधर लेखकांसंबंधीं थोडीशी असूया बाळगणारे परंतु कर्तृत्वशाली मानले जातील असे तरुण होते. विजापूरकरांनीं थोडीशी काटछाट त्यांच्या लेखांत केली असती तरी त्यामुळें फार बिघडलें नसतें. श्री. मुंडले यांनीं अगाऊ पत्र लिहून व विजापूरकरांकडून वचन घेऊन आपलें प्रत्युत्तर पाठविलें होतें हें खरें; पण प्रत्यक्ष लेखांतील विधानें पाहून कुंट्यांची बाजू घ्यावयाची असती किंवा त्यांजवरील हल्ला सौम्य करावयाचा असता, तर त्यांना कसलाहि प्रत्यवाय नव्हता.

याच संदर्भांत लोकमान्य टिळक यांच्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांवरील व्याख्यानासंबंधीं विजापूरकरांनीं जें लिहिलें आहे त्याचा उल्लेख करतां येईल. ‘ काळाची वक्र दृष्टि ’ या आपल्या लेखांत विजापूरकरांनीं शिवरामपंत परांजपे यांच्या धारदार व उपरोधिक लेखणीला कसें उत्तर दिलें आहे तेंहि प्रस्तुत लेखकानें नवभारत मासिकाच्या ऑगस्ट १९६० च्या अंकांत पूर्वींच दाखविलें आहे.

ग्रंथमालेच्या संपादनकार्याची ही एक बाजू झाली. या बाजूवरून विजापूरकरांची मराठी भाषेबद्दलची तळमळ, राष्ट्रीय पुनरुत्थानांत महाराष्ट्रानें घ्यावयाचा भाग, नवीन विद्या आत्मसात् करण्यासाठीं धरावयाची शास्त्रीय दृष्टिकोणाची कांस, स्फूर्ति मिळविण्यासाठीं आणि योग्य त्या सावधानतेनें राजकारणांतील पावलें टाकण्यासाठीं करावयाचा इतिहासाचा अभ्यास वगैरे गोष्टी दिसून येतात. त्याचप्रमाणें संपादकानें अंगीं बाणवावयाचें आदर्श संयमशीलत्व आणि प्रामाणिक मतभेद स्पष्टपणें प्रकट व्हावे म्हणून द्यावा लागणारा अवसर, याहि गोष्टी त्यांच्या संपादनावरून दिसून येतात.

याचबरोबर ग्रंथमालेंत स्फुट असे सामाजिक, राजकीय, धर्मविषयक लेख येऊं लागले आणि स्वतः विजापूरकर सारसंग्रह आणि सालअखेर या नांवाचीं सदरें ग्रंथ-

मालेंत प्रसिद्ध करूं लागले. सारसंग्रह ही कल्पना त्यांना नंतर सुचली. परंतु ग्रंथमालेच्या पहिल्या वर्षाच्या अंकाच्या अखेरीस सालअखेर हें सदर आल्याचें दिसतें. या विषया-वरील लेखांत व सारसंग्रहांत अनेक गोष्टींचा ऊहापोह केला गेलेला आहे. सामाजिक-दृष्ट्या व धर्मविचारमंथन या दृष्टींनें वेदोक्तावरील ग्रंथमालेंतील लेखन आणि **'हिंदुधर्म-सनातनधर्म'** हें खुद्द विजापूरकरांनीं ऑक्टोबर १९०० च्या अंकांतील लिहिलेलें स्फुट महत्त्वाचीं वाटतील. वेदोक्तासंबंधीं विजापूरकरांची स्वतःची दृष्टि प्रगत व पुरोगामीपणाची होती असें कोणालाहि कबूल करावें लागेल. खानोलकरांच्या चरित्रांत यासंबंधीं विजापूरकरांच्या स्वतःच्या लेखाच्या आधारानें सारांशरूपानें जें सांगितलें गेलें आहे, तें विवेचन पुरेसें आहे असेंच प्रस्तुत लेखकालाहि वाटतें. परंतु हा विषय सामाजिकदृष्ट्या अद्यापिहि पूर्णपणें इतिहासजमा झालेला नाहीं. म्हणून त्या विषयींची चर्चा स्वतंत्र रीतीनें करण्याचा विचार आहे. **'हिंदुधर्म-सनातनधर्म'** हा लहानसा लेख त्यांतील व्यापक दृष्टिकोणामुळें मननीय वाटेल. या लेखासंबंधींहि कांहींशा विस्तारानें ऑगस्ट १९६० च्या नवभारतच्या अंकांत चर्चा आलीच आहे.

सारसंग्रह या सदरांतून पुढेंपुढें त्रुटित असे मृत्युलेख आलेले दिसतात. कै. आगरकर, न्या. रानडे, हर्बर्ट स्पेन्सर, लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर, स्वामी विवेकानंद वगैरेंवरील मृत्युलेख बरेच त्रुटित भासतात. विजापूरकरांच्या अंगीं या थोर मंडळीं-संबंधीं गौरवपर असे मोठे लेख लिहिण्याची शक्ति खासच होती. वाङ्मयपरीक्षणात्मक असे निरनिराळे लेख स्वतः विजापूरकरांनीं ग्रंथमालेंत लिहिलेले आहेत. 'विज्ञानशतक भर्तृहरीचेंच काय?' हा लेख किंवा 'बेकनचे निबंध' हें ग्रंथपरीक्षण किंवा त्या वेळचीं महत्त्वाचीं मासिकें बंद होऊं लागलीं तेव्हांचे त्यांचे दीर्घ लेख आणि इतर परीक्षणात्मक लेख त्यांच्या अंगीं असलेल्या विवेचक शक्तीची साक्ष पटवितील. मग या थोर मंडळींवरील मृत्युलेख माहीतगारपणानें भरलेले परंतु अगदीं थोडक्यांत आटपते घेतलेले असे कां व्हावेत हें समजत नाहीं. त्यांतल्या त्यांत प्रासादिक स्वरूपांत अवतरलेला व योग्य त्या मर्यादेपर्यंत वाढविलेला असा मृत्युलेख प्रो. जिनसीवाले यांच्यावरील वाटतो.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख करून ग्रंथमालेसंबंधींचा परामर्श संपवूं. सारसंग्रहांत आणि विशेषतः सालअखेर या सदरामध्यें विजापूरकरांनीं स्वतःविषयीं जो बराचसा मजकूर लिहिला आहे, त्याचा उपयोग त्यांच्या चरित्रकारांनीं करून घेतलेला दिसत नाहीं. अहमदाबाद, मद्रास किंवा दक्षिणेंतील इतर शहरें किंवा बनारसचा प्रवास, वगैरेसंबंधीं आणि तेथील प्रदर्शनें, राजकीय जागृति, सामाजिक स्थिति, मराठी भाषिक मित्रमंडळी, स्वदेशीचा ठिकठिकाणीं घडत असलेला प्रसार व स्वदेशी वस्तूंची निर्मिति, यासंबंधीं कितीतरी उल्लेख अशा आत्मपर लेखनांत झालेले आढळतील. कोल्हापूर दरबारच्या नोकरींत असतांनासुद्धां विजापूरकर कॉंग्रेसच्या अधिवेशनाला हजर राहात असत, असें

या लेखनावरून दिसून येतें. आणि वास्तविक त्यांत फारसें नवल वाटण्याचेंहि कारण नाहीं. १९०६ च्या कलकत्ता कॉंग्रेसला सयाजीराव गायकवाड हे संस्थानिक हजर होते, असें त्या वेळच्या नियतकालिकांवरून व अहवालांवरून दिसून येतें. तेव्हां नोकरींत असतांना विजापूरकरांना कॉंग्रेसला हजर राहण्याची आडकाठी झाली नसणें संभवनीय आहे. आणि पुढें जेव्हां अशी आडकाठी होऊं लागण्याचा संभव निर्माण झाला, तेव्हां त्यांची नोकरीच संपली होती. चरित्राच्या दृष्टीनें हें लेखन अतिशय महत्त्वाचें आहे.

## संपादन-कार्य (२)

आतां विश्ववृत्ताच्या संपादन-कार्यासंबंधीं थोडेंसें विवेचन करूं.

खानोलकरांनीं विजापूरकरांच्या चरित्रामध्यें विश्ववृत्त या नियतकालिकाचें रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज या मि. स्टेड यांच्या संपादनाखालीं चालू असलेल्या नियतकालिकाशीं कोणतें साधर्म्य दिसून आलें व तें साधर्म्य स्वतः विजापूरकरांनींच कसें योजिलेलें होतें, त्याची चर्चा केलेली आहे. म्हणून त्याविषयीं अधिक कांहीं लिहिण्याची आवश्यकता नाहीं. मात्र सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थानाबाहेर तेव्हां इंग्रजी भाषेंत बरींच प्रगल्भ व भारदस्त मासिकें निघत असत. दि हिंदुस्थान रिव्ह्यूचा त्या वेळचा कोणताहि अंक चाळल्यास आपणांस असें दिसेल कीं, भारतांतील महत्त्वाचीं सात-आठ इंग्रजींतून प्रसिद्ध होणारीं मासिकें त्यांत निर्देशिलेलीं आहेत, व भारताबाहेरचींहि आहेत. विश्ववृत्त मासिकाचा प्रयत्न हा असाच एक मोठा भारदस्त प्रयत्न होता. हें मासिक दुर्दैवानें अल्पायुषी ठरलें. कारण पुढें त्यांतीलच एका लेखामुळें विजापूरकरांवर खटला झाला. परंतु विश्ववृत्ताचे जे २१ अंक प्रसिद्ध झाले, त्यांतील कोणताहि अंक अशी ग्वाही देईल कीं, हें मासिक भारदस्त स्वरूपाचें आहे. विश्ववृत्ताचा पहिला अंक एका अनन्यसाधारण रीतीनें मराठी भाषेंत महत्त्व पावून राहील. लो. टिळकांनीं केसरीखेरीज मराठींतून इतर कोठेंहि लेखन केलें असल्याचें कोणाच्या निदर्शनास आलेलें नाहीं. परंतु विश्ववृत्ताच्या पहिल्या अंकासाठीं विजापूरकरांनीं त्यांचा लेख मिळविला. त्या लेखाचें शीर्षक 'आशेची निराशा व निराशेची आशा' असें असून, ज्याप्रमाणें तत्कालीन राजकीय परिस्थितीला अनुलक्षून त्यांनीं तो लिहिल्याचें दिसतें, त्याचप्रमाणें पुढें 'गीतारहस्य' लिहितांना ज्या कर्मयोगाची शिकवण त्यांना आवर्जून सांगावयाची होती, त्याचीहि बीजरूपानें कल्पना या लेखांत मांडलेली दिसेल. टिळकांच्याप्रमाणेंच त्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या इतर मंडळींनीं विश्ववृत्तांत लिहिलेलें आहे, आणि जे महाराष्ट्र वाङ्मयांत पुढें मोठ्या नांवलौकिकास चढले अशा डॉ. केतकर किंवा ना. गो. चापेकर वगैरेंनींहि विश्ववृत्तांत लिहिलेलें आहे. राजवाडे, यांनींहि विश्ववृत्तांत लेख लिहिलेला आहे. आणि स्वतः विजापूरकर यांचे महत्त्वाचे लेख विश्ववृत्तांतूनच प्रसिद्ध झाले. पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकांतील प्रास्ताविकांत विजापूरकर म्हणतात कीं, प्रस्तुत कार्याचा व्याप आजवर चालविलेल्या कामाहून निराळा आहे. हें

काम एकाचें नाहीं, हें उघड आहे. यामुळें अमक्याच प्रकारचे विचार यांत येतील असें सांगणें कठीण आहे. त्याचप्रमाणें निबंधांची संख्या मर्यादित करतां येईल असेंहि वाटत नाहीं. स्थूलमानानें तूर्त शंभर पृष्ठांत बसतील तितके स्वतंत्र निबंध येतील...प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य हेतु प्रचलित विषयावर लोकमत तयार करावें हा तर आहेच, शिवाय आपल्या लोकांना ज्या ज्या विषयांच्या चर्चेपासून नैतिक व सांपत्तिक उत्कर्षाचा मार्ग स्पष्ट होण्याजोगा आहे असें कायम महत्त्वाचें विषयहि घेतले जातील...अशा प्रकारचें कार्य मराठींत पहिलेंच आहे. जितकें विविधत्व येईल तितकें राष्ट्रांतील प्रगमक विचारांचें प्रतिबिंब या पुस्तकांत येईल, म्हणून सर्व सुशिक्षित मंडळींचा दास किंवा स्वयंनियुक्त प्रतिनिधि समजून हें कार्य अंगावर घेतलें आहे.

अहो देवराया, तुम्ही शक्ति द्यावी
निमित्तेंचि मात्रें क्रिया ही घडावी ।
अशा भावनेचें असो साधुवृत्त
जनांचें कृपापात्र हो विश्ववृत्त ॥

पहिल्या वर्षाच्या १२ अंकांत विजापूरकरांचें जें महत्त्वाचे निबंध आले, ते पुढीलप्रमाणें होत :—(१) भारतीय विश्वविद्यालय, (२) मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा, (३) समर्थ विद्यालय, (४) दोन गैरसमज, (५) टिळक अध्यक्ष कां नकोत ? (६) राजपुत्राचें शिक्षण, (७) उभय पक्षांचें कर्तव्य व नव्या पक्षावरील जबाबदारी, (८) राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी चळवळीचें प्रधान अंग आहे. याखेरीज 'पुरोगति व परागति' या शीर्षकाखालीं तीन वेगवेगळ्या अंकांत त्यांनीं तत्कालीन प्रश्नांची चर्चा केली आहे. पुढील वर्षाच्या नऊ अंकांत मोठे लेख असे त्यांनीं थोडेच लिहिले. परंतु त्यांतहि 'संस्थानी राज्यकारभार,' 'सुरत येथील असमाधानकारक प्रसंग,' 'मिलाफ होणें अशक्य आहे काय,' आणि 'पुढें काय – स्वराज्य कीं साम्राज्य,' हे चार मोठे लेख त्यांनीं लिहिलेले दिसतात. याखेरीज प्रत्येक अंकामध्यें मासिक स्फुट म्हणून मजकूर आलेला आहे. विश्ववृत्ताचें संपादन पुढें वामन मल्हार जोशी यांजकडे विजापूरकरांनीं दिलें होतें व म्हणूनच वामनरावांचें नांवहि खटल्यांत गोंवलें गेलें, हें सर्वांस माहीतच आहे. पण प्रस्तुत लेखकाचा असा कयास आहे कीं, शैलीवरून या स्फुटांपैकीं बरींचशीं स्फुटें विजापूरकरांच्याच हातचीं असलीं पाहिजेत. स्वतः वामन मल्हार जोशी यांनीं विश्ववृत्तांत जे लेख लिहिले, त्याविषयींची माहिती नव्यानें प्रस्तुत लेखकानें महाराष्ट्राला करून दिली आहे. जुलै १९५९ च्या नवभारताच्या अंकांत '**वामन मल्हार जोशी यांचें जहाल लेखन**' या नांवानें त्यासंबंधीं बरीचशी माहिती मराठी वाचकवर्गापुढें ठेवण्यांत आली आहे. त्यांतले दोन लेख तर खुद्द वा. म. जोशी यांचेच आहेत. त्या लेखांचीं शीर्षकें 'बहिष्कार योग्य व आपला जोर' आणि 'हीच परीक्षेची वेळ' अशीं आहेत. त्या लेखांत असें दाखवून दिलें आहे कीं, वा. म.

अनुक्रम ५५५५ विः ...
क्रमांक २०९२२ नों. दि. 20/3/69



जोशी यांचें त्या वेळचें लेखन अतिशय जहाल होतें. सर्वसाधारणपणें प्रचलित असलेली वामन मल्हार जोशी यांच्याबद्दलची समजूत निराळी आहे, आणि म्हणून त्यांना विनाकारण तुरुंगवास पत्करावा लागला, विजापूरकरांना शिक्षा होणें ठीक होतें, परंतु वा. म. जोशी यांचा मनःपिंड सौम्य प्रकृतीचा होता, असें महाराष्ट्रांतील बऱ्याच मंडळींचें मत आहे. वस्तुस्थिति समजून आल्यानंतर तें पालटेल असें प्रस्तुत लेखकाला वाटतें. ती वस्तुस्थिति समजून यावी म्हणून वामन मल्हार जोशी यांच्या जहाल लेखनाचा परिचय त्या अंकांत ( जुलै १९५९ ) करून देण्यांत आला आहे. याविषयींची चर्चाहि पुढें यथावकाश कांहीं विस्तारानें करूं.

विश्ववृत्त १९०६ च्या एप्रिल महिन्यांत सुरू झालें. वा. म. जोशी यांच्या सहकारितेनें तें सुरू झालें असें खानोलकरांनीं म्हटलें आहे. याचा अर्थ सुरुवातीपासूनच विश्ववृत्ताच्या संपादनकार्यांत वामन मल्हार जोशी यांचा हात होता, असा मात्र करून घेऊं नये. अर्थातच समर्थ विद्यालय १९०६ सालीं कोल्हापुरांत सुरू झाल्यानंतर वामन मल्हार जोशी समर्थ विद्यालयांत काम करूं लागले. तेव्हां त्याचें विचारहि विजापूरकरांना उपयुक्त ठरले असतील आणि सुरुवातीपासूनच विश्ववृत्ताच्या संपादनामध्यें वामन मल्हारांचें साहाय्य मिळालें असेल, असा तर्क करण्यास कांहींच हरकत नाहीं. विश्ववृत्तांत कोणकोणत्या लेखकांनीं कोणकोणत्या विषयांवर लिहिलें आहे, तें पाहूं लागल्यास असें आढळेल कीं, राजकीय, शैक्षणिक, संशोधनात्मक, आणि वाङ्मयीन विषयांवर त्यांत लेख आलेले असून, ते खालीलप्रमाणें आहेत :

एप्रिल १९०६ :— आशेची निराशा आणि निराशेची आशा — लेखक : बा. गं. टिळक, पृष्ठें १ ते १४, ( २ ) वैद्यशास्त्राची प्रगति — लेखक : आत्माराम गोपाळ परांडेकर, ( ३ ) गेलें राष्ट्रीय संमेलन — लेखक : ग. र. अभ्यंकर, ( ४ ) गोखले यांची इंग्लंडांतील कामगिरी — लेखक : वि. का. राजवाडे, ( ५ ) भारतीय विश्व-विद्यालय — लेखक : विजापूरकर.

मे १९०६ :—( १ ) पुरोगति आणि परागति — लेखक : संपादक, ( २ ) स्त्रियांची परवशता — लेखक : विनायक कोंडदेव ओक, ( ३ ) वेदोक्त — लेखक : वि. का. राजवाडे, ( ४ ) स्त्रीकर्तव्य — लेखक : ज. रा. डुल्लू, ( ५ ) सध्यां आपण कोठें आहोंत ? — लेखक : स्पष्टवक्ता राजनिष्ठ, ( ६ ) मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा — लेखक : विजापूरकर.

जून १९०६ — ( १ ) पुरोगति आणि परागति — लेखक : संपादक, ( २ ) वेदान्त प्रपंचास साधक कां बाधक — लेखक : रावब० काशिनाथ बळवंत पेंडसे, ( ३ ) वांई येथील दोन मराठी, मोडी ताम्रपत्रें — लेखक : वि. का. राजवाडे, ( ४ ) चरित्र-नायकाच्या गुणांबरोबर दोषांचें वर्णन करावें कीं नाहीं ? — लेखक : ना. गो. चापेकर, ( ५ ) समर्थ विद्यालय — लेखक : विजापूरकर.

जुलै १९०६ :—( १ ) पुरोगति आणि परागति — लेखक : संपादक, ( २ ) अर्वाचीन भरतवर्षाची औद्योगिक अवनति व ती सुधारण्याचे उपाय — लेखक : त्रिंबक भास्कर खरे, ( ३ ) स्वराज्य — लेखक : वि. का. राजवाडे, ( ४ ) आमच्या पुढाऱ्यांकरितां मार्गक्रमणाची एक दिशा — लेखक : नारायण रामचंद्र पाटणकर, ( ५ ) मालाकारांचा लोकभ्रम व माझा तद्विषयक अनुभव — लेखक : रा. रा. रामचंद्र नारायण मंडलीक, ( ६ ) दोन गैरसमज — लेखक : विजापूरकर.

ऑगस्ट १९०६ :—( १ ) विद्युत्वाहक — लेखक : बंडो गोविंद जोग, एल्. सी. ई. ( २ ) सध्यां आपण कोठें आहोंत ? — लेखक : स्पष्टवक्ता राजनिष्ठ, ( ३ ) इंग्रजी राज्याचे परिणाम — लेखक : आत्मारामशास्त्री ओढ्लमने, ( ४ ) टिळक अध्यक्ष कां नकोत — लेखक : विजापूरकर, ( ५ ) आरोग्य — लेखक : वा. वि. चांदोरकर, ( ६ ) लाख — लेखक : हरि रामचंद्र पिटके.

सप्टेंबर १९०६ :—( १ ) राष्ट्रीय शिक्षणाविषयींचें मनोगत — लेखक : रघुनाथ गणेश लिमये, ( २ ) मराठी वाङ्मयाची दैन्यावस्था — लेखक : यादव शंकर वावीवर, ( ३ ) कापसाचा धंदा — लेखक : ना. गो. चापेकर.

ऑक्टोबर १९०६ :—( १ ) स्वदेशी — लेखक : वि. का. राजवाडे, बी. ए. ( २ ) भारतवर्षीय संगीत शास्त्रांतर्गत स्वरसप्तकाचे प्राचीनत्वाबद्दल कांहीं विचार — लेखक : रावसा० कृष्णाजी बल्लाळ देवल. ( ३ ) स्पष्टवक्तेपणा व सार्वजनिक बाबतींत त्याची जरुरी — लेखक : रा. रा. एल्. के. दामले. ( ४ ) राष्ट्रीय शिक्षण — लेखक : रा. रा. माधव रामचंद्र गोरे. ( ५ ) आपल्या चळवळीची दिशा कशी असावी ? — लेखक : रा. रा. आत्मारामशास्त्री ओड्लमने. ( ६ ) हिंदुस्थानची वाट काय — लेखक : रा. रा. नारायण रामचंद्र पाटणकर.

नोव्हेंबर १९०६ :—( १ ) राष्ट्रनिष्ठा कीं राजनिष्ठा ? — लेखक : श्री. दा. सातवळे-कर. ( २ ) विधवाविवाह — ( प्रस्तावना, विषयप्रवेश व तीन पुरवण्यांसह ) लेखक : रा. रा. जगन्नाथ रावजी टुल्लू. ( ३ ) औद्योगिक हिंदुस्थान — लेखकाचें नांव निर्देशिलेलें नाहीं. ( ४ ) पुस्तकपरीक्षण :— रसायनशास्त्राचीं मूलतत्त्वें — प्रो. हरि महादेव भडकमकर, बी. ए. ( ५ ) सध्यांचा हिंदु-मुसलमानी प्रश्न — लेखक : एक हिंदु. ( ६ ) नहर ( ड्रेनेज ) — लेखक : बंडो गोविंद जोग, एल. सी. ई.

डिसेंबर १९०६ :—( १ ) स्वावलंबन आणि भिक्षा — लेखक : एक देशभक्त, पदवीधर. ( २ ) बहिष्कारयोग व आपला जोर — लेखक : वा. म. जोशी. ( ३ ) १९०६ सालची राष्ट्रीय सभा व काशीयात्रा — लेखक : गणेश कृष्ण आगाशे. ( ४ ) राजपुत्राचें शिक्षण — लेखक : संपादक. ( ५ ) राष्ट्रीय सभा — लेखक : संपादक.

जानेवारी १९०७ :—( १ ) खरी सुधारणा कोणती ? — लेखक : आत्मारामशास्त्री ओड्लमने. ( २ ) स्वदेशी चळवळ — लेखक : माधव रामचंद्र गोरे. ( ३ ) घी देखलें,

पण वडगा नाहीं देखला — लेखक : एक देशभक्त पदवीधर. ( ४ ) चिकुर्डे येथील शक संवत् ६५८ तीन मराठी ताम्रपट — लेखक : वि. का. राजवाडे. ( ५ ) उभयपक्षाचें कर्तव्य व नव्या पत्रावरील विशेष जबाबदारी — लेखक : संपादक. ( ६ ) वैदिकधर्माचें परमरहस्य — लेखक : ना. ग. परांजपे.

फेब्रुवारी १९०७ :—( १ ) मे १९०७ ( ग्रंथमालेचे किंवा विश्ववृत्ताचे अंक बरेचसे उशिरां निघत असत. मासिकाच्या मुखपृष्ठावर जो महिना निर्देशिलेला असेल त्या महिन्यांतच तो अंक प्रसिद्ध झालेला असेल असें नाहीं.) ( २ ) काशीयात्रा — लेखक : गणेश कृष्ण आगाशे. ( ३ ) परस्पर सहकारी पेढ्या — लेखक : वि. म. हेर्लेकर. ( ४ ) हुबळी येथील उद्योगधंदे — लेखक : वि. ना. जोशी. ( ५ ) कार्लाइलबरोबर कांहीं दिवस — लेखक : वामन मल्हार जोशी.

मार्च १९०७ :—( १ ) सालअखेर — लेखक : संपादक. ( २ ) सध्यांचा भक्तिमार्ग व त्याबद्दल कांहीं सामान्य विचार — लेखक : ना. वा. उटगीकर. ( ३ ) केसरीकार व सनदशीर चळवळ — लेखक : एक पदवीधर. ( ४ ) लोकसंग्रह — लेखक : ना. ग. परांजपे. ( ५ ) राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी चळवळीचें प्रधान अंग आहे — लेखक : वि. गो. विजापूरकर.

विश्ववृत्ताच्या एक वर्षाच्या कामगिरीची ही माहिती झाली. सालखेरच्या या अंकांत तिसऱ्या मलपृष्ठावर जी सूचना छापली होती, ती अशी होती :— " ग्रंथमाला, विश्ववृत्त व समर्थ या तिहींस मिळून सवलतीचा दर ९ रु. १० आणे गतसालीं ठेविला होता. तशाप्रकारें परवडत नाहीं म्हणून ती व्यवस्था मोडून निराळी करण्यांत येत आहे. " विजापूरकरांनीं असें ठरविलें कीं, ग्रंथमाला, मासिक पुस्तक म्हणून द्यावयाच्याऐवजीं तिचीं वर्षाला १२०० पृष्ठें सवड सांपडेल त्याप्रमाणें वर्षांतून पुस्तकरूपानें दिलीं जातील. विश्ववृत्ताचा वर्षारंभ एप्रिल महिन्यापासूनचा होता, तो पुढील वर्षापासून जुलै करण्यांत आला. याचें उघड दिसणारें कारण म्हणजे मार्चचा विश्ववृत्ताचा अंक बहुधा जून महिन्यांत प्रसिद्ध झाला असावा. समर्थ ( साप्ताहिक ) याचा वर्षारंभ जुलैपासून व सालीना वर्गणी एक रुपया अशी त्यांनीं ठेवली होती. याच सूचनेंत पुढें असें म्हटलें आहे कीं, ग्रंथमालेच्या व विश्ववृत्ताच्या संपादकीय बाबींसंबंधींचा पत्रव्यवहार रा. रा. वा. म. जोशी, एम्. ए., समर्थ विद्यालय, कोल्हापूर, यांचेकडे करावा; व वर्गणी आणि अंक मिळणें यासंबंधींचा पत्रव्यवहार विनायक नारायण जोशीराव, समर्थ कचेरी, कोल्हापूर, यांचेकडे करावा.

विश्ववृत्ताचे पुढें जे नऊ अंक निघाले, त्यांतील सर्व लेखांचा असाच तपशील देण्याची इच्छा होती. परंतु विश्ववृत्ताचें दुसऱ्या वर्षाचें बांधीव पुस्तक सहज मिळण्याजोगें नाहीं. मात्र, विश्ववृत्ताच्या जानेवारी १९०८ च्या अंकांत वामन मल्हार जोशी यांचा ' हीच परीक्षेची वेळ ' हा लेख आला आहे. त्या लेखाच्या अखेरीस ' उद्बाहु वामन ' असें लेखकाचें नांव दिलें आहे. इतरहि महत्त्वाचे लेख त्यांत आले आहेत,

परंतु सध्यां दिलेल्या यादीवरून विश्ववृत्त मासिकाचा दर्जा केवढा मोठा होता त्याची कोणालाहि कल्पना येईल.

ही यादी देण्यांत आणखीहि एक हेतु आहे. पुणें विद्यापीठातर्फे अलीकडेच सोशल सायन्सिस सेमिनार भरविलें जाऊन, एक टंकलिखित महत्त्वाचें प्रकाशन उपलब्ध झालें आहे. त्यामध्यें महाराष्ट्रांतील शिक्षणविषयक विचारांचा मागोवा घेणारा व राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेविषयींचा ऊहापोह करणारा लेख प्रा. कोठूरकर यांनीं लिहिलेला आढळतो. त्या लेखांत वर दिलेल्या यादींतील कोणत्याहि माहितीचा उपयोग करून घेतल्याचें दिसत नाहीं. लोकमान्य टिळकांचे केसरींतील लेख आधारभूत धरून राष्ट्रीय शिक्षणाविषयींची बरीचशी चर्चा तेथें करण्यांत आली आहे. राष्ट्रीय शिक्षणाचा मूळ ठराव कलकत्ता कॉंग्रेसमध्यें मांडण्यांत आला, त्यासंबंधींचेंहि विवेचन त्या लेखांत आढळलें नाहीं. यावरून हें स्पष्ट होतें कीं, वर दिलेली माहिती पूर्णपणें विस्मृत झालेली असून, अभ्यासकाला ती पुन्हा उपलब्ध करून दिली पाहिजे.

*विश्ववृत्तावरील खटला*

वामन मल्हार जोशी यांना जो तुरुंगवास सोसावा लागला, त्यासंबंधीं स्वतः त्यांनीं कधींहि विजापूरकरांना किंवा इतर कोणाला दोष दिला नसला, तरीहि ना. म. पटवर्धन यांनीं त्यांचें जें चरित्र लिहिलें आहे त्यांत व अलीकडे वा. म. जोशी, ना. म. जोशी व म. म. जोशी या तिघांच्याहि व्यक्तिरेखा एका पुस्तकांत देणारे त्यांचे नातेवाईक श्री. अ. म. जोशी, यांनीं यासंबंधीं इतरांचा हवाला देऊन विजापूरकरांसंबंधीं कांहीं मजकूर प्रसिद्ध केला आहे. उदाहरणार्थ, ना. म. पटवर्धन यांनीं जीवनाला मिळालेलीं वळणें या प्रकरणांत वामनरावांचे मित्र श्री. हरिभाऊ गोळे यांच्या पत्रांतील कांहीं मजकूर अवतरणांत उद्धृत केला आहे. "ठरल्याप्रमाणें वामनराव १९०७ च्या जूनमध्यें विजापूरकरांच्या शाळेंत कोल्हापुरास गेले व त्यानंतर कांहीं दिवसांनीं शाळेचें एकंदर वातावरण कसें आहे व त्यांचें कसें काय चाललें आहे, हें पाहण्यास त्यांनीं एकदां बोलाविलें होतें व मलाहि पाहावयाचें होतें, म्हणून त्यांच्याबरोबर आठ दिवस राहून आलों. तेथें गुरुशिष्यांनीं एकाच ठिकाणीं राहावयाचें, जेवणखाण बरोबरच करावयाचें, यामुळें त्या दोघांमध्यें जो आपलेपणा उत्पन्न होतो, त्याचें मला निःसंशय कौतुक वाटलें व वामनरावहि तेथील वातावरणांत समरस झालेले मला दिसले. परंतु कोल्हापुरांत चांगल्या माहीतगार मंडळींत मला विजापूरकरांच्याबद्दल फारसें चांगलें मत ऐकूं आलें नाहीं, व तें मी वामनरावांस सांगितलेंहि. पण ती गोष्ट त्या वेळीं तितकीच राहिली. विजापूरकर हे अव्यवहारी, एककल्ली व चमत्कारिक वृत्तीचे गृहस्थ आहेत असाच एकंदरींत कोल्हापुरांत त्यांच्याबद्दल ग्रह होता......खटल्याचे प्रकरणीं झालेल्या अंतस्थ घडामोडींतील एक भाग सविस्तर सांगणें अपरिहार्य आहे.

"विश्ववृत्तावरील खटल्याची पार्श्वभूमि समजण्यास त्या वेळीं गाजलेल्या वेदोक्त

प्रकरणाची माहिती देणें जरूरीचें आहे...खटल्यांतील मुख्य रोख विजापूरकरांवरच होता, ही गोष्ट जगजाहीर होती. निदान कोल्हापुरांतील आबालवृद्धांस तरी यांत कांहींहि गूढ नव्हतें. वामनराव तर बोलून चालून परस्थ होते. म्हणून कोल्हापुरांतील विजापूरकरांच्या हितचिंतकांनीं त्यांना सरळ सल्ला दिला, कीं महाराजांनीं काय हेतूंनीं या खटल्यास मंजुरी दिली आहे, हें तुम्हांस माहीतच आहे. वामनराव जोशी यांचें बिचाऱ्याचें नांव नाइलाजास्तव गोंविलें गेलें आहे. तिसरे आरोपी जोशीराव हे तर बोलून चालून प्रिंटर आहेत. शिवाय कोणाचा लेख छापावयाचा, कोणाचा नाहीं, हें सगळें तुमच्याच मर्जीवर असतें. तेव्हां तुम्ही सरळ जबाब देऊन टाका, कीं प्रसिद्धीची सर्व जबाबदारी माझी एकट्याचीच आहे. वामनरावांचें संपादकवर्गांत नांव नाहीं, मॅजिस्ट्रेटपुढें त्याचें कोणतेंहि डिक्लेरेशन नाहीं. तेव्हां विनाकारण वामनराव जोश्यांना त्यांत कां अडकवितां ? खरे संपादक तुम्हीच व महाराजांचा रागहि खरा तुमच्यावरच. रीतसर डिफेन्स करून सुटावयाचें तर तुम्ही सुटालहि कदाचित्. पण टाळाटाळी कराल तर तुम्ही तर सांपडलांच, पण तुमच्याबरोबर वामनराव जोशी मात्र निष्कारण बळी पडतील; शिवाय ते बाहेर राहिले तर शाळेला व वर्तमानपत्राला ते उपयोगी पडतील, याचाहि विचार करा."

पण विजापूरकरांचे दुसरेहि कांहीं बदसल्लागार होते. त्यांनीं त्यांना निराळा सल्ला दिला, कीं शक्यतोंवर तुम्ही आपल्यावरील जबाबदारी टाळा. पुराव्यामध्यें तुमचेवर जबाबदारी नाहीं असें ठरलें तर तुम्ही सुटालच व वामनरावांवर महाराजांचा कांहीं राग नाहींच, यामुळें ते त्यांनाहि सोडतील. झालें, या मंडळींचा पगडा विजापूरकरांवर बसत चालला. विजापूरकरांनीं जबाबदारी नाकारावयाची व वामनरावानीं जबाबदारी घ्यावयाची असें ठरविलें गेलें. कांहींहि संबंध नसतांना वामनरावांनीं थोरपणानें आपल्या मुख्याविषयींच्या एकनिष्ठेनें सर्व जबाबदारी आपल्यावर घेतली. त्यांनीं ती अंगावाहेर टाकली असती तर कायदेशीर अगर नैतिक कोणतीहि जबाबदारी त्यांचेवर येण्याला काडीचाहि पुरावा नव्हता.

तेव्हांपासून साहजिकच विजापूरकरांबद्दलचें आमचें मत अगदीं बदललें. पुढें तुरुंगांतून सुटून आल्यानंतर त्यांच्या आमच्या कोल्हापुरांतील स्नेह्यांच्या गांठीं पडल्या. त्या वेळीं वरील हकीगत अगदीं यथातथ्य आहे ही गोष्ट वामनरावांस कबूल करावी लागली. पण त्यांनीं त्याबद्दल बाहेर उच्चार कधींच केला नाहीं.

उलट, केसरीवरील १९०८ सालच्या खटल्यांत झालेला प्रकार पाहा — ज्या लेखाबद्दल खटला झाला ते लेख टिळकांचे नव्हते. कोणत्या संपादकाचे होते ते आतां सर्वश्रुत आहे. टिळकांच्या कांहीं मित्रांनीं त्यांना असाच सल्ला दिला होता कीं लेखकाचें नांव सांगून टाका, म्हणजे तुम्ही मोकळे व्हाल. त्यावर टिळकांनीं दिलेलें उत्तरहि लोकविश्रुत आहे. ' अशानें मी तर सुटणार नाहींच, दुसरा माणूस विनाकारण अडकेल.

सरकारचा खरा राग माझ्यावर आहे. तेव्हां कांहींतरी निमित्त काढून मला तें डांवणारच.' "

श्री. हरिभाऊ गोळे यांच्या पत्रांतील हा मजकूर विस्तारानें येथें दिला आहे. कारण, याची थोडी छाननी होणें जरूर आहे. वामनराव जोशी सत्त्वशील होते आणि त्यांच्या अंगीं भरपूर धैर्य होतें, यांत शंकाच नाहीं. परंतु या ठिकाणीं जी चर्चा करावीशी वाटते, ती मुख्यतः तीन गोष्टींची. (१) विजापूरकरांबद्दल कोल्हापुरांत सर्वसाधारण लोकमत काय होतें ? (२) वामनराव जोशी यांचें नांव विनाकारण गोंवलें गेलें होतें काय ? आणि जबाबदारी त्यांना कायदेशीर अगर नैतिकदृष्ट्या अंगाबाहेर टाकतां आली असती काय ? (३) केसरीवरील खटला आणि विश्ववृत्तावरील खटला यांत कांहीं फरक होता कीं नाहीं ?

विजापूरकरासंबंधींचें लोकमत :—(१) संस्थानी राजवटींत ज्या गृहस्थाची संस्थानमधील नोकरी स्वदेशी चळवळींत भाग घेतल्यामुळें महाराजांनीं संपविली होती, अशा बद्दलचें लोकमत नेहमीं थोडेंसें कलुषित राहणार. समाजसुधारक कै. कर्वे यांनीं पुनर्विवाह केला, तेव्हां समाजानें त्यांना जवळ जवळ वाळींत टाकलें होतें. संस्थानच्या लहानशा क्षेत्रांत ज्या गृहस्थांवर खुद्द छत्रपतींची गैरमर्जी झालेली आहे अशांबद्दल चांगलें लोकमत आढळून येणें वरवर पाहतां अत्यंत कठीण. श्री. गोळे यांनीं कोणापाशी अशी चौकशी केली तें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु, विजापूरकरांची नोकरी जाण्याआधीं विजापूरकरां-विषयीं १९०५ सालपर्यंत लोकमत काय होतें तें समजून घेण्यास पुरेशीं साधनें आहेत. १८९२ ते १८९५ या काळामध्यें विजापूरकर हे कोल्हापूर नगरपालिकेचे सरकारनियुक्त असे सभासद होते. कोल्हापूरच्या सर्व सांस्कृतिक चळवळींत आणि प्रगतिपर कार्यामध्यें त्यांचा पुढाकार होता. कै. मुंडले यांनीं तर आपल्या अप्रकाशित आत्मचरित्रामध्यें असें लिहून ठेवलें आहे कीं, त्या वेळीं पुण्यांत रानड्यांचें जें स्थान, तें कोल्हापुरांत प्रो. विजापूरकर यांचें स्थान होतें. राजवाडे त्यांच्याकडेच उतरत असत. नामदार गोखले यांचा व विजापूरकरांचा बालपणापासून स्नेह होता व तो गोखले हयात असेपर्यंत टिकला. विजापूरकरांच्या ग्रंथमालेला शाहू छत्रपतींचा आश्रय होता. मिरजेचे बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांचाहि आश्रय होता. मलकापूरचे जाहगीरदार त्यांचा शब्द खालीं पडूं देत नसत. कोल्हापूरला जें एक जहागीरदारांसाठीं म्हणून हायस्कूल होतें, तेथें विजापूर-करांनीं शिकविण्यास जावें असें दरबारकडूनच त्यांना सुचविण्यांत आलें होतें. नोकरी संपल्यानंतरहि १९०६ सालच्या कोल्हापूरच्या लोकसभेंत त्यांनीं जें कार्य केलें, त्याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. त्यांची स्नेही मंडळी सर्व थरांत पसरलेली होती हें सर्वश्रुतच आहे. कोल्हापूरचे दिवाण रघुनाथ व्यंकाजी सबनीस, सरन्यायाधीश कृष्णाजी नारायण पंडित वगैरे मंडळींनीं ग्रंथमालेकडे १०० रुपयांची ठेव ठेवून ग्रंथमालेला आश्रय दिला होता. या सर्व गोष्टींवरून हें स्पष्ट होईल कीं, विजापूरकर ही वास्तविक एक आदरणीय व्यक्ति

असेंच प्रत्येकाला मनांतून वाटत असलें तरी, सरकारची इतराजी झाल्यामुळें आपली कातडी बचावूं पाहणारी मंडळी त्यांच्याबद्दल चांगला अभिप्राय देऊं शकत नव्हती.

आतां त्याचबरोबर हें मात्र शक्य आहे कीं, विजापूरकर त्यांचे धाकटे बंधु वासुदेवराव यांच्याप्रमाणें चारजणांत विशेषसे मिसळत नसतील. गप्पा मारण्यांत वेळ घालविणें त्यांना पसंत पडत नसे हें कानडे (त्यांचे चरित्रकार) यांनीं त्यांच्या ज्या अनेक आठवणी संग्रहीत केल्या आहेत, त्यावरून कळण्याजोगें आहे.

( २ ) वामनराव जोशी यांच्यावर कांहीं जबाबदारी होती कीं नव्हती ? या संदर्भात कोल्हापूर सरकारनें त्या वेळीं नुकताच जो छापखान्याविषयीं व संपादकाविषयीं आणि लेख लिहिणारांविषयीं जाहीरनामा प्रसिद्ध केला होता, तो ध्यानीं घेणें अवश्य आहे. हा जाहीरनामा कोल्हापूर सरकारच्या १९०८ सालच्या गॅझेटमध्यें ४ थ्या भागांत प्रसिद्ध केला आहे. तो कोणालाहि पाहतां येईल. १३ जून १९०८ या दिवशीं-पासूनचा तो जाहीरनामा असून त्याप्रमाणें मुद्रक व संपादक जबाबदारींतून सुटूं शकत नाहींत. जोशीराव हे मुद्रक होते. विजापूरकर आणि वामनराव जोशी असे दोघेहि विश्ववृत्ताचे संपादक होते.

या तांत्रिक बाबीखेरीज खरी महत्त्वाची गोष्ट ही कीं, स्वतः वामनरावांचें लेखन त्या वेळीं पुष्कळच जहाल स्वरूपाचें होतें. नवभारत, जुलै १९५९ च्या अंकांत यासंबंधींचा ऊहापोह लेखकानें केलाच आहे. वामनराव लिहितात – "फार काय लिहावें – आपलें इंग्रजी राज्याबरोबर स्वतःच्या पक्षाचें एक निराळेंच राज्य पाहिजे. आपल्या राष्ट्रीय सभेनें ठरविलेले कर देण्यास आपण तयार पाहिजे. आपल्या पक्षाजवळ पुष्कळ पैसे असले पाहिजेत. आपले पोलीस पाहिजेत. आपलीं न्यायखातीं पाहिजेत. आपलेंच शिक्षण खातें पाहिजे. असलीं हीं खातीं आपण आपल्या शिरावर घेऊन चालूं लागलों, म्हणजे स्वराज्याची अर्धी तयारी झाली म्हणून समजावें...आपण काचेप्रमाणें नुसतें चकचकणारे आहोंत किंवा हिऱ्याप्रमाणें खरोखरीचे तेजःपुंज आहों, काचेसारखे आपटल्याबरोबर फुटणारे आहोंत, किंवा लोखंडाचे घाव घातले तरी सोसण्यास समर्थ आहों, हें दिसून येण्याची ही वेळ आहे." इतक्या धैर्यानें लिहिणारे वामनराव जबाबदारी अंगावर घेण्यास कचरतील हें शक्य कसें आहे ? आणि त्यांना निष्कारण गोंवलें गेलें असें म्हणणें किंवा 'गरीब बिचारे' असें त्यांना संबोधणें, हें वास्तविक वामनरावांचीच अवहेलना केल्यासारखें होईल. विजापूरकरांना दोष देण्याच्या भरांत आपण वामन-रावांना नीट ओळखत नाहीं हें या मंडळींच्या ध्यानांत येऊं नये, याचा विषाद वाटतो.

( ३ ) केसरीवरील खटला आणि विश्ववृत्तावरील खटला यांत साधर्म्य आहे, त्याचप्रमाणें बराचसा फरकहि आहे. ब्रिटिशांचे कायदे आणि संस्थानिक करतील ते कायदे यांत साहजिकच फरक असणार. परंतु या कायदेविषयक चिकित्सेमध्यें फार खोल न शिरतां एवढें म्हणतां येईल कीं, कोल्हापूर दरबारचा जून महिन्यांतील

जाहीरनामा मुद्रक, संपादक व प्रकाशक यांपैकीं कोणालाहि सोडवूं शकणारा नव्हता. जरी त्या जाहीरनाम्याचा भंग झाला म्हणून खटला भरण्याऐवजीं इंडियन पीनल कोड सेक्शन १२४ व ३०२/११५ यानुसार राजद्रोह व खुनास चिथावणी या आरोपाखालीं खटला भरला होता तरी त्या वातावरणाची ओळख असणारा माणूस वा. म. जोशी बहुधा सुटूं शकले असते असें म्हणणार नाहीं. खानोलकरांनीं विजापूरकरांच्या चरित्रांत सहाव्या प्रकरणांत जी चर्चा केली आहे ती समतोल दृष्टीनें केली आहे असें म्हणतां येईल. वामन मल्हार जोशी यांनीं खटल्याच्या वेळीं जें धीराचे व त्वेषाचे उद्गार काढले, तेहि त्यांनीं उद्धृत केले आहेत. वा. म. जोशी म्हणतात, " या लेखानें खुनास चिथावणी होते असें फक्त मूर्ख असेल त्यासच वाटेल." सातवळेकरांना निर्दोषी सोडतांना न्यायाधीश पंडित ( पंडितराव ) यांनीं जें निकालपत्र दिलें आहे त्याची नक्कल प्रस्तुत लेखकाजवळ आहे. त्यावरून सातवळेकरांच्या लेखांतील महत्त्वाचे फेरबदल वा. म. जोशी यांनीं केले असें पूर्वीच्या खटल्यांत त्यांनीं वारंवार सांगितल्याचें स्वच्छ दिसतें.

जातां जातां विश्ववृत्तांतील समर्थ विद्यालय या लेखावरील व समर्थ विद्यालयांतील शिक्षणपद्धतीविषयीं जी माहिती मिळत होती, तिच्याबद्दल विष्णु मोरेश्वर महाजनि यांनीं जें लिहिलें आहे त्याचा त्रोटक सारांश येथें द्यावयास हरकत नाहीं. विविधज्ञान-विस्ताराच्या नोव्हेंबर १९०६ च्या अंकांत वि. मो. महाजनि यांचें हें परीक्षण प्रसिद्ध झालें असून, तें जवळजवळ २५ पृष्ठें लांबीचें आहे. श्री. महाजनी यांच्या सूचना विधायक स्वरूपाच्या होत्या. त्यांची एक सूचना अशी होती कीं, बालसमर्थ शाळा केवळ दुय्यम शाळांचीं व दुय्यम शाळा केवळ पाठशाळांची पोषक अंगें बनतां कामा नये. त्यांचें एक अंग स्वयंसिद्ध म्हणजे त्या त्या शाळा सोडणाऱ्या व पुढें अभ्यास न चालविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा भागविणारें असें असलें पाहिजे. आणखी एक सूचना अशी होती कीं, समर्थ विद्यालयें खरोखर राष्ट्रीय असलीं पाहिजेत, त्यांत व त्यांस जोडलेल्या वसतिगृहांत सर्व ज्ञातींचा व धर्मपंथीयांचा समावेश झाला पाहिजे.

' विश्ववृत्त ' बंद पडणार हें समजल्यानंतर सरस्वती मंदिर या मासिकानें आपल्या आठव्या वर्षाच्या सहाव्या अंकांत ( भाद्रपद, शके १८३० ) जें स्फुट लिहिलें आहे, तें त्या वेळीं सरकारचा छापखान्यांविषयींचा कायदा किती जाचक झाला होता तें दाखवून देणारें आहे. या स्फुटापैकीं कांहीं भाग खालीलप्रमाणें आहे. प्रो. विजापूरकर यांनीं १२ वर्षेपर्यंत ग्रंथमालेच्याद्वारें मराठी भाषेची आपल्या शक्त्यनुसार बरीच सेवा केली आहे. या १२ वर्षांच्या अनुभवानें त्यांच्या लेखनपद्धतीस व विचारसरणीस जें एक प्रकारचें विशिष्ट वळण लागलेलें होतें, त्याचा विश्ववृत्ताच्या द्वारें मराठी वाचकांस नुकताच कोठें लाभ होऊं लागतो न लागतो, तोंच हें पुस्तक बंद होण्याची वेळ यावी, हें मराठी भाषाभिज्ञांचें दुर्दैव होय. मराठी भाषेंत हल्लीं बरींच मासिकें आहेत, परंतु

उच्च प्रकारचें वाङ्मय तयार करण्याची पात्रता त्यांपैकीं फारच थोड्यांस आहे व या राष्ट्रामध्यें चैतन्य व सामर्थ्य उत्पन्न होण्याकरितां आपल्या राष्ट्राची स्थिति काय आहे व त्या स्थितींत इष्ट फरक घडवून आणण्याकरितां काय केलें पाहिजे याचें या पुस्तकाच्या चालकांना चांगलें ज्ञान होतें, हें त्यांच्या पुस्तकांतील या बाबींसंबंधींचे लेख वाचले असतां कोणाच्याहि सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, पाश्चात्य देशांत विचारजागृति करणारीं व विवक्षित प्रश्नासंबंधानें लोकमताला वळण देणारीं, किंबहुना आपल्या लोकसामर्थ्याच्या जोरावर लोकमत तयार करणारीं जीं कांहीं प्रसिद्ध मासिकें आहेत, त्या मासल्याचें हें पुस्तक होतें व जर हें पुढें असेंच चाललें असतें, तर मराठी वाचकांस त्याचा अत्यंत उपयोग झाला असता...प्रो. विजापूरकर यांना हें पुस्तक अजीबात बंद करण्यास काय कारण झालें तें समजत नाहीं. तथापि, त्यासंबंधानें पुण्याच्या ज्ञानप्रकाशनें जो थोडासा उल्लेख केला आहे, त्यावरून बऱ्याच गोष्टींचा अंदाज करतां येतो. उच्च प्रकारच्या वाङ्मयाला लोकाश्रय असावा तसा नसतो, याचा अनुभव आम्हांसहि आहे. परंतु प्रो. विजापूरकरांनीं त्या कारणास विशेष महत्त्व दिलें असेल, असें आम्हांस वाटत नाहीं...ज्ञानप्रकाशनें जें ध्वनित केलें आहे, तें मात्र अपरिहार्य व मराठी भाषेच्या अभिमान्यांस लज्जास्पद आहे. पाश्चात्त्य देशांत विश्ववृत्तांसारखीं जीं मासिकें चालतात, तीं अनेक विद्वान् लेखकांच्या साहाय्यावर चालतात. परंतु येथील विद्वान् लोकांस मात्र असल्या पुस्तकसंबंधानें आपलें कर्तव्य समजत नाहीं व समजलें तरी बजाविण्याची इच्छा होत नाहीं. इंग्रजींतून लेख लिहिण्याची हांव पुष्कळांना दिसते...या औदासीन्यांतच आणखी प्रस्तुत परिस्थितीची भर पडलेली असावी. छापखान्यासंबंधानें संस्थानांतून व ब्रिटिश हद्दींतहि जो नवीन कायदा झाला आहे, त्याचा व सरकारच्या प्रस्तुत थोरपणाचा छापखानेवाले व लेखकवर्ग यांच्यावर बराच अनिष्ट परिणाम झालेला आमच्या अनुभवास आलेला आहे. सुखवस्तु लोक स्वतंत्र विचारांचें उद्घाटन करण्यास कचरूं लागले व छापखान्याचा धंदा करणारे लोकहि वाजवीपेक्षां जास्त भीतिवश होऊन असले लेख छापण्याचे कामीं नसते अडथळे उत्पन्न करूं लागले आहेत, यामुळें पुस्तकांच्या संपादकांनीं छापखान्याच्या धंद्यापासून सुरुवात केल्यावांचून त्याला आपल्या मताप्रमाणें पुस्तक चालविणें अशक्य झालें आहे.''

## *संस्थानी वातावरण*

त्या वेळीं गाजलेल्या वेदोक्ताच्या वादासंबंधीं विजापूरकरांची स्वतःची वृत्ति आग्रही स्वरूपाची नव्हती. ते स्वतः जरी कर्मठ होते तरीहि प्रसंगानुरूप आपल्या कर्मठपणाला आळा घालीत असत, असें खुपेरकरशास्त्री यांनीं सांगितलेलें आहे. एका आठवणीवरून तें स्पष्टच दिसतें. कॉलेजांतील कामासाठीं घरांतून लवकर जावयाचें असल्यामुळें घरांतील एका वर्षीच्या श्राद्धदिनाला ते भटजी येण्याच्या आधीं जेवून कामावर हजर झाले असें खुपेरकरशास्त्रींनीं या आठवणींत सांगितलें. मनुष्याची स्वतःची वागणूक आणि त्याची

सार्वजनिक बाबींमधील विचारसरणी यासंबंधीं गल्लत होऊं देतां कामा नये. वेदोक्ता-विषयीं इतर सनातन्यांप्रमाणें विजापूरकरांनीं निर्बुद्ध धोरण कधींहि स्वीकारलें नसलें तरी सुधारकी थाटाचीं त्यांचीं मतें होतीं, असेंहि आपणांस म्हणतां येणार नाहीं. राजाराम-शास्त्री भागवत वगैरेंसारख्या मांसाशनाचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींचा त्यांना थोडासा राग येई, परंतु तो संयमित असे. व सारासार विचार करून सामाजिक सुधारणा सुचविल्या जाव्यात अशी त्यांची मनोधारणा असे. त्याचबरोबर वेदोक्तासंबंधीं त्यांनीं जेव्हां जेव्हां ग्रंथमालेंत लिहिलें, तेव्हां तेव्हां सध्यांचे ब्राह्मण संस्कृत भाषा न जाणणारे आणि अकारण सनातनीपणाचें स्तोम माजविणारे आहेत, असें त्यांनीं म्हटलें आहे. परंतु कोल्हापुरांतील क्षत्रियांनीं व विशेषतः छत्रपतींनीं या क्षुद्र गोष्टीसाठीं अट्टाहास काय म्हणून करावा हें आपणांस समजत नाहीं, असें त्यांनीं वरचेवर म्हटलें आहे. ऑगस्ट १९०० च्या अंकांत ' जातिभेद व मराठ्यांचें नष्ट वैभव ' या शीर्षकाखालीं सारसंग्रह या सदरांत ते लिहितात : " अनेक कारणांपैकीं जातिभेद हा एक आमच्या वैभवविनाशास कारण झाला असेल, परंतु सर्व वितुष्टांची व वैमनस्यांची उपपत्ति जातिभेदावरच होईल असें वाटत नाहीं. हल्लीं पुण्यास माजलेली दुही आमच्या विचाऱ्या चातुर्वर्ण्याच्या जातिभेदानें केलेली नाहीं. दोहों पक्षांचीं बडींबडीं धेंडीं कोकणस्थच आहेत. शिवाय अशीं अनेक कार्यें दाखवितां येतील, कीं तीं ब्राह्मण–शेणव्यांनीं मिळून केलेलीं आहेत. कोंकणस्थ, कऱ्हाडे, देशस्थ, यांनीं केलेलीं व सुरू असलेलीं कार्यें आहेत. समाज म्हणजे रसायनशाला नव्हे, कीं वाटेल तो पदार्थ वाटेल त्यांत मिसळून इष्ट संयुक्त पदार्थ तयार करतां येईल...... सुधारणा करावयाची खरी, ती झाली पाहिजे खरी; पण त्यासाठीं सुधारणेच्या प्रत्येक बाबींचें स्तोम माजवितांना लेखणी व वाणीवर सुविचाराचा म्हणजे युक्तायुक्ततेचा दाब ठेवला पाहिजे. एका सुसंपन्न व वैभवशाली देशांत ज्या चालीरीती आहेत, किंवा ज्या संस्था आहेत त्याच दुसऱ्या देशांत रूढ केल्यानें हित होत नाहीं. मुसलमानांच्या सहवासानें गोषाची चाल घेतली. तशीच इंग्रजांच्या सहवासानें जात्यभेदाची चाल घेतली, तर आम्हांस नैतिक व कर्मिक उन्नति प्राप्त होईल, असें खात्रीनें कोणी सांगूं शकेल काय? वेदोक्त-पुराणोक्ताचा वाद आम्हांस तर वृथा वाटतो. कालच जें कार्य करीत आहे, त्याबद्दल इतका अट्टाहास कशास? आमच्या नगरींत पूर्वीं वेदोक्त कर्में होत होतीं. पुढें श्रीमंत बाळासाहेब महाराजांचे वेळीं बंद करून गायत्रीचेऐवजीं तदर्थक अनुष्टुभ् श्लोकांचा उपदेश सुरू झाला, अशी वृद्धपरंपरागत हकिकत आहे...सांप्रत कालीं म्हणजे छापखाना, शाळा व पाठशाळा यांच्या कालीं वेद वाचण्याचा मला अधिकार आहे व तुला नाहीं हें म्हणणें म्हणजे म्हातारीच्या कोंबडें दडविण्याच्या प्रकारापैकीं आहे. युरोपखंडांत हल्लीं खंडोगणती ऋषी बनले आहेत. मग आमच्या सुभानजी-तानाजींनीं वेद वाचला व पाठ केला व आपल्या घरीं यज्ञ केला म्हणून आम्हीं अस्सल ब्राह्मण म्हणणारांनीं त्यांस नांवें कां ठेवावीं? विचार जो करावयाचा, तो एतद्देशीय संस्थानां-तील पुरातन वृत्ति धारण करणाऱ्या ब्राह्मणांचा. वृत्तिच्छेद पत्करावा कीं, पुराणप्रवृत्ति-

च्छेद पत्करावा ? म्हणजे आपलें वतन किंवा वेतन, यावर पाणी सोडण्यास तयार व्हावें कीं, परंपरागत चाललेली रीति सोडावी, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. दीर्घकालापासून चालत आलेले आपल्या प्रजेपैकीं कांहीं लोकांचे हक्क आपल्या अभिप्रायाप्रमाणें ते वागण्यास तयार नसल्यामुळें काढून घेण्यास तयार होणाऱ्या राजास कोणी शहाणा म्हणणार नाहीं... त्याच्या स्वैर भासणाऱ्या वर्तनास प्रतिरोध करण्याचें सामर्थ्य हक्कदारास नसेल तोंपर्यंत इतर निरुपायाच्या गोष्टींप्रमाणें वृत्तिच्छेदापेक्षां स्वमताभिमान श्रेष्ठ असेल तर उपजीविकेसाठीं अन्य साधनांचा इलाज पाहावा, याशिवाय गत्यंतर नाहीं. राजाधिकाराच्या बलावर अंमलांत आणलेल्या सुधारणेचा परिणाम इष्ट होतो कीं, अनिष्ट होतो, हें ठरविण्याचें काम पुढील पिढीचें आहे.

राजानें सद्बुद्धिप्रेरित होऊन सुजाण व सुविचारी लोकांचा सल्ला घेऊन जर असें आचरण केलें तर त्याची मनोदेवताहि त्यास शापणार नाहीं. परंतु या सर्व सुधारणांचा राष्ट्रीय उन्नतीशीं संबंध जुळवून आज आपल्या लोकांस अगोदरच असलेला द्वैधी भाव वृद्धिंगत करणें हें अविचाराचें काम आहे. एकच गोष्ट दोन प्रकारांनीं सांगतां येते. सौम्यपणानें सांगितल्यास तिचा परिणाम चांगला होईल असा आमचा भरंवसा आहे. आमच्या समाजांतील लोक कविवर भवभूति याचा सूनृतावाणीचा उपयोग करावा म्हणून केलेला उपदेश विसरून गेले आहेत. आज ३०-४० वर्षें एका विद्वद्वर्याखेरीज सूनृतावाणीचा उपयोग कोणीं केला आहे असें आम्हांस दिसत नाहीं. ज्यानें त्यानें राक्षसी वाणीचा उपयोग करून दुही माजवावी असा प्रकार आहे .जातिभेदानें आम्ही बुडालों नाहीं; सूनृतावाणीच्या अभावानें आम्ही बुडत आहोंत. ''

या लांब उताऱ्यावरून विजापूरकरांची दृष्टि समन्वयाची कशी होती तें समजून येईल. सत्य कोणत्या बाजूला आहे याचा निर्णय ठामपणें सांगणें कांहीं विशिष्ट सामाजिक परिस्थितींत अवघड होऊन बसतें. विजापूरकरांना ब्राह्मणांच्या पुरातन वृत्तीबद्दल आस्था नव्हती. परंतु, जुलूम-जबरदस्तीनें, ब्राह्मणांनीं वेदोक्ताचीं कर्में करण्यासाठीं बोलाविलें जाईल त्या त्या ठिकाणीं जावें हें त्यांना अप्रशस्त वाटत होतें. शिवाय, ज्याप्रमाणें मंदिरप्रवेश हें हरिजनांच्या दुःखनिवारणाचें खरें साधन नव्हे हें बऱ्याचजणांना आज समजतें, त्याचप्रमाणें वेदोक्त कर्में मराठ्यांच्या घरीं केलीं जाणें हेंहि मराठ्यांची प्रगति होण्याच्या दृष्टीनें अर्थशून्य आहे, असें विजापूरकरांनीं वारंवार म्हटलें आहे. शिक्षणामुळें स्वतःची गुणवत्ता वाढविणें व आजच्या युगांतील विकासाच्या सर्व संधि प्राप्त करून घेणें यांमुळेंच मराठा जातीचेंहि हित होईल आणि तशीं पावलें टाकलीं गेलीं पाहिजेत, असें त्यांनीं सुचविलें. मात्र, राजोपाध्ये यांचें वतन नष्ट केलें गेलें, तेव्हां त्यांना दुःख झालें व तें त्यांनीं ग्रंथमालेच्या एका अंकांत स्फुट लिहून व्यक्तहि केलें. परंतु त्यांतसुद्धां वृत्तिच्छेद पत्करण्याइतकें धैर्य राजोपाध्ये यांच्या अंगीं आढळून येईल अशी आपली समजूत आहे हें त्यांनीं ध्वनित केलें आहे. राजोपाध्ये जबरदस्तीमुळें

शरण जातील हें संभवत नाहीं, असाच त्यांचा कयास होता. यामुळें स्वतः विजापूरकरांचें मत वेदोक्त कर्म क्षत्रियांकडे होऊं नयेत असें होतें किंवा काय, अशी शंका निर्माण होऊं शकेल. परंतु विजापूरकरांच्या मनःपिंडाचा अंदाज आपणांस बरोबर करतां आला तर जुलमानें येऊं पाहणारी सुधारणा त्यांना नको होती; किंबहुना जी गोष्ट सुधारणा या नांवाला पात्र होईल किंवा नाहीं, याविषयीं तेव्हां कांहींजणांच्या मनांत शंका होती, अशी गोष्ट जबरदस्तीनें लादली जावी, हें ब्रॅडलॉ, मिल, स्पेन्सर, वगैरेंचा अभ्यास करणाऱ्या विजापूरकरांस योग्य वाटलें नसेल.

◆ ◆ ◆

खानोलकरांनीं यासंबंधींची चर्चा करतांना, विजापूरकरांनीं जें एक न्यायाधीश, मंडळ नेमलें जावें व त्या न्यायाधीश मंडळापुढें वेदोक्त प्रकरणाचा निकाल लागावा असें सुचविलें होतें, त्या न्यायाधीश मंडळावरील सुचविलेलीं नांवें दिलेलीं आहेत. परंतु सप्टेंबर १९०२ च्या ग्रंथमालेच्या या अंकांत विजापूरकरांनीं खऱ्या कल्याणाची गोष्ट कोल्हापूर शहराच्या दृष्टीनें व संस्थानच्या दृष्टीनें कोणती होईल, तें सांगितलेलें आहे. आणि तें उद्धृत करण्यासारखें आहे. " लोकांत दुही व दुफळी असल्यानें राज्यकर्त्यास-देखील अन्न गोड लागेनासें होतें. राष्ट्रोन्नतीचे मनांतील हेतु बाजूस ठेवावे लागतात. विद्या व सुविचार या दृष्टीनें या इलाख्यांत मुंबई व पुणें यांच्या मागोमाग कोल्हापूर शहराचें नांव निघतें. (पुण्यांतील वसंतोत्सवाची व्याख्यानमाला मागें पडत आहे तर आमची हेमंत व्याख्यानमाला जोर धरीत आहे. पुण्यांतील डेक्कन कॉलेज गॅदरिंग म्हणजे जुन्या-नव्या विद्यार्थ्यांचें संमेलन, प्रायः बंदच आहे. आमचें राजारामीय गॅदरिंग जोरांत आहे. आमच्या नेटिव्ह जनरल लायब्ररीसारखी लायब्ररी पुण्यांत नाहीं. पुण्यास हल्लीं एकहि मासिक पुस्तक निघत नाहीं. वसंत व्याख्यानमालेबद्दल नवीन निघालेली फ्रेण्ड्स लिबरल असोसिएशन लेक्चर सेरीज आहे. पण ती इंग्रजी, तिकिटें लावून होणारी आहे. माल परदेशी वाटतो, पण कांहीं बरें. देशी दुकान व गायनसमाज या संस्थांत मात्र पुण्यानें आम्हांस खूप मागें सारलें आहे. वक्तृत्वोत्तेजक मंडळीचें काम पुण्यास अबाधित चाललें आहे. आमच्या इकडे बक्षिसें लावून वक्तृत्वास उत्तेजन देणारी संस्थाच नाहीं. वर्तमानपत्रांच्या कामांत पुणें, मुंबईलासुद्धां भारी आहे. तेथें आमचा काय पाड... सार्वजनिक सभा, डेक्कन सभा, कॅाँग्रेस कमिटी, या सरासरी जीव धरून तरी पुण्यास आहेत. कोल्हापुरांत तसल्या संस्थांची वार्ता नाहीं ... पुण्याच्या आम्ही एकंदरीनें फार मागें आहों, पण त्याची बरोबरी करूं म्हणेल तर ती हांव मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या कोणत्याहि शहरानें आजवर दाखविलेली नाहीं.) कांहीं कांहीं संस्था तर पुण्यांतदेखील आमच्यासारख्या नाहींत. क्षेत्र व एका पुरातन संस्थानची राजधानी या दृष्टीनें सर्व महाराष्ट्रीय लोकांच्या आदरास व प्रेमास हें शहर विशेष पात्र झालें आहे. अशा शहरानें आपसांतील प्रेमभाव नष्ट करणाऱ्या बाबींचा निकाल

लवकर लावून खऱ्या कल्याणाच्या गोष्टींकडे लक्ष अधिक पुरविलें पाहिजे. आतां परदेशांतील व्यापारधंदा व सुधारणा पाहून आमचे महाराज आले आहेत. तर या प्रांतांत भरभराटतील असे व गरीब लोकांच्या जीविकेस साधनीभूत होतील असे ग्लास फॅक्टरी, शुगर मिल, मॅचबॉक्स फॅक्टरी, किंवा असेच कांहीं इतर कारखाने काढण्याचे त्यांच्या मनांत असेल. मराठ्यांतच नव्हे तर सर्व मागासलेल्या लोकांत नुसत्या कोल्हापूर शहरांतच नव्हे तर सर्व कोल्हापूर प्रांतांत, शिक्षणप्रसार करून त्यांची योग्यता व मान्यता ( स्टेटस ) वाढविण्याचा स्तुत्य उद्योग करावयाचा आहे. या योगानेंच खरी राष्ट्रोन्नति होईल. परंतु या गोष्टीस लागणारें मनःस्वास्थ्य या वेदोक्त प्रकरणाचा निकाल लागल्याशिवाय मिळेल असें आम्हांस वाटत नाहीं... हा प्रश्न राजकीय नव्हे, सामाजिक आहे. हा केवळ स्थानिक नाहीं. तरी पण आमच्या शहराचें स्वास्थ्य व प्रगतीचा संभव कमी होत आहे, म्हणून आम्हीं यासंबंधानें निकाल लवकर लावून घेतला पाहिजे."

न्यायाधीश मंडळाची विजापूरकरांची कल्पना अशी होती. हें मंडळ सहाजणांचें राहील. दोन श्रुतिस्मृतिपुराणज्ञ शास्त्री असतील. दोन युरोपियन असतील. ते संस्कृत जाणणारे मिळाले तर ठीकच. उरलेले दोन डॉ. भांडारकर, प्रो. काथवटे, प्रो. पाठक, प्रो. वै. का. राजवाडे, रावब० बाबासाहेब पेंडसे, रावब० का. बा. मराठे, रावसा० ग. ज. आगाशे, प्रो. अर्ते, प्रो. भडकमकर, अशा तिन्हाईत संस्कृतज्ञ मंडळींपैकीं कोणीहि असावें. या मंडळानें दिलेला निकाल क्षेत्रस्थ ब्रह्मवृंद व जगद्गुरु यांच्यापुढें ठेवून त्यांचीं आज्ञापत्रें घ्यावींत.

शंकराचार्यांचा कौल घेण्याची विजापूरकरांची विचारसरणी पुढें प्रो. माटे यांनीं अस्पृश्यांचा प्रश्न सोडवितांना वापरली असल्याचें आपणांस दिसून येईल. 'चित्रपट' या आपल्या आत्मचरित्रात्मक पुस्तकांत कै. प्रो. माटे यांनीं यासंबंधींचा ऊहापोह केला असून, सामाजिक सुधारणा करणारांनीं सर्वसाधारण जनतेला ज्यांच्या मताविषयीं आदर आहे अशांची अनुकूलता प्राप्त करून घेणें आवश्यक आहे, असें आपणांस वाटत असल्याचें नमूद करून ठेवलें आहे. अस्पृश्यांची सेवा करणारे माटे स्वतःच्या धर्मबांधवांचे रीतिरिवाज व धर्मबांधवांचें इतर सामाजिक जीवन सोडावयास किंवा त्यांच्यापासून अलग होण्यास तयार नव्हते. समाजशास्त्राच्या विचारावरून त्यांचें असें प्रामाणिक मत बनलें होतें. विजापूरकरांचें जवळजवळ असेंच मत असल्यामुळें त्यांनीं फटकळ भाषा वापरली नाहीं.

माटे यांच्या 'चित्रपट' या पुस्तकांत आणखी एक थोडासा महत्त्वाचा मजकूर आला आहे, तो या संदर्भांत उद्धृत करण्याजोगा आहे. माटे लिहितात कीं, "वेदोक्ताच्या वादामध्यें बारीकसारीक तपशिलांत न शिरतां टिळकांनीं गर्जना करून जर सांगितलें असतें कीं, छत्रपति क्षत्रियच आहेत व छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार आहे. कर्मलोप

व संस्कारलोप झालेला असला तर शिवाजीमहाराजांच्या बाबतींत जें केलें होतें तें याहि छत्रपतींच्या बाबतींत वेलाशक करावें व वेदोक्ताचा अधिकार राजघराण्यांत चालू करावा, तर महाराष्ट्रांतील जातीय विचाराला निराळें वळण लागलें असतें. राजकारणांतील टिळकांचे जे प्रतिपक्षीय होते त्यांनासुद्धां ही कल्पना सुचली नाहीं. गोखले उदारमतवादी होते ना? पुण्या-मुंबईस केवढीतरी सुधारकांचीं खोडें उभीं होतीं. हीं सर्व मंडळी या प्रसंगीं सरसावून कां पुढें आली नाहींत? टिळकांप्रमाणें हे तर सनातनी नव्हते ना? आणि टिळकांच्या राजकीय पराक्रमानें यांनीं दिपवून जावयास अजून पुष्कळ अवकाश होता. पण यांनीं कोणींच कांहीं केलें नाहीं आणि या सर्वांचा दोष टिळक हे पुढें खरेखरे पुढारी ठरले म्हणून त्यांच्या माथीं बसावा याचें नवल वाटतें. पुनर्विवाहाची चर्चा सुरू झाली आणि कमिशनहि बसलें. तेव्हां डॉ. भांडारकर इत्यादि विद्वान् सामाजिक कार्यकर्ते वेगानें पुढें आले. त्याप्रमाणेंच त्यांनीं याहि प्रसंगीं पुढें व्हावयास कांहीं हरकत नव्हती. एकंदर समाजाचें हित पाहण्याचें ज्यांचें कंकण, तो ब्राह्मण सुधारकवर्ग टिळकांना मागें सारून या प्रसंगीं समाजांतील भावी दुही मिटविण्यासाठीं जलदीनें पुढें आला असता, तर पुढें महाराष्ट्राच्या चिरफळ्या करणाऱ्या एका वादांतून आपण बचावलों असतों, पण तें झालें नाहीं हेंच खरें. आणि मग, आधींपासूनच नाराज झालेला मराठा समाज छत्रपतींच्या या अवमानामुळें सत्यशोधक समाजाचा अनुयायी बनला. याच्या आधींपासूनहि एखादा ठळक मराठा याचा अनुयायी झालेलाहि असेल, पण नवी जागृति प्राप्त झालेला सगळा मराठा वर्गच्या वर्ग छत्रपतींच्या या अवमानानें त्या समाजांत जाऊन दाखल झाला आणि सत्यशोधक समाजाची चळवळ म्हणजे मराठा समाजानें आरंभिलेली उत्थानाची चळवळ असा तिचा अर्थ होऊन बसला." (चित्रपट – चित्र १४ वें, पृष्ठें २१८–२१९.)

माटे यांची ही मीमांसा अतिशय उद्बोधक आहे. आपल्या सबंध पुस्तकांत त्यांनीं टिळकभक्ति प्रकट केली असल्यामुळें या परिच्छेदांत टिळकांपेक्षां इतर सुधारकांना व मवाळांना त्यांनीं दोष दिला असला तरी टिळकांना पूर्णपणें वगळलेलें नाहीं. दोष टिळकांचा कीं मवाळांचा वा सुधारकांचा, हा महत्त्वाचा प्रश्न नसून, वेदोक्त प्रकरणामध्यें ब्राह्मणवर्गाची जी चूक झाली असें माटे यांना वाटलें, ती मीमांसा महत्त्वाची आहे. 'ब्राह्मणपत्रिका' काढणारे मुंडले यांनींहि 'ब्राह्मणअब्राह्मण बोध' या ब्राह्मणपत्रिकेंतील निवडक लेखसंग्रहामध्यें प्रास्ताविकांत असें म्हटलें आहे कीं, छत्रपतींचा अवमान करण्याची चूक जर कांहीं ब्राह्मणांनीं केली असेल तर ती मोठीच चूक होय. सत्यशोधक समाजानें पुढें ब्राह्मणवर्गावर जे अत्याचार खेडोपाडीं करण्याचा सपाटा लावला, व एकंदरींत ब्राह्मणवर्गाची जी असहाय स्थिति या चळवळीमुळें झाली, तिला तोंड देण्यासाठीं **ब्राह्मणपत्रिका** मुंडले यांनीं काढली. ब्राह्मणजातींत जन्मलेल्या परंतु ब्राह्मण्य अंगीं अंशमात्रहि नसलेल्या लोकांचा उदोउदो करण्यासाठीं ती त्यांनीं काढली नाहीं. आतां तर हा प्रश्न आजच्या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांपैकीं एक असें कोणी मानणारहि

नाहीं. तथापि, हा प्रश्न अस्तित्वांत नाहीं असें समजणें मात्र भोळसटपणाचें किंवा अंध-पणाचें होईल. म्हणूनच अखिल मानवधर्माचा विचार करणारे आमच्यांतील कांहीं ज्येष्ठ व सत्त्वशील विचारवंतहि सध्यांसुद्धां या प्रश्नाविषयीं लिहीत असतांना आढळतात. काका-साहेब बर्वे यांच्या लेखसंग्रहाचें महाराष्ट्र हरिजन सेवकसंघानें एक नवीन पुस्तक प्रकाशित केलें आहे. तें याची साक्ष देईल.

महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांची मोजदाद विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं १९१२ सालीं केली. आणि महाराष्ट्रांतल्या सुमारें १५० लोकांची यादी आपल्या मताप्रमाणें निरनिराळया प्रमुख क्षेत्रांतील लोक म्हणून दिली. या लेखांत मोघमपणानें त्यांनीं असें म्हटलें कीं, आणखी कांहीं नांवें घालतां येतील. परंतु जीं सुमारें १५० नांवें त्यांनीं दिलीं, त्यांत सयाजीराव महाराजांचें नांव यादीच्या पहिल्या कांहीं नांवांत घातलेलें आढळतें. विष्णु गोविंद विजापूरकर यांचें नांव पहिल्या यादींत ७८ व्या क्रमांकानें आलें आहे. परंतु सबंध यादींत कोल्हापूरच्या शाहूमहाराजांचें नांव त्यांनीं दिलें नाहीं. क्रिया आणि प्रतिक्रिया या न्यायानें असें घडलें असण्याचा संभव आहे आणि म्हणूनच, अलीकडे शाहूमहाराज हे लोकोत्तर अशी एक विभूति होऊन गेली, असें बऱ्याच जणांकडून म्हटलें जात आहे. त्यांच्या आठवणी अनेकजण रसिकतेनें सांगत आहेत. स्वतः शाहूमहाराज महात्मा फुले यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर संबोधीत असत, असें काकासाहेब बर्वे यांच्या महात्मा फुले यांच्या वरील लेखाच्या शिरोभागीं जें वचन दिलें आहे त्यावरून दिसून येतें. शाहू छत्रपतीसंबंधीं अशीच गौरवाची भावना मराठा समाजांत निर्माण झाली आहे. ज्यांना निदान ५० किंवा १०० वर्षांनंतरची सामाजिक वाटचाल कशी होईल याविषयीं अटकळ बांधण्याची दृष्टि आहे, अशा द्रष्टया मंडळींनीं जें मूल्यमापन केलेलें असेल, तें महत्त्वाचें ठरेल. सध्यां निर्विकार रीतीनें शाहू छत्रपतींच्या कार्याचें मूल्यमापन होण्याची वेळ आलेली नाहीं. टिळकांच्या मतप्रणालींतील कांहीं वैगुण्यें सांगण्याची वेळ ज्याप्रमाणें अजून दूर आहे, त्याचप्रमाणें शाहू छत्रपति यांनीं अधिकारातिक्रम करून पचविलेले अन्याय आणि समाजाच्या प्रगतीसाठीं सांचेबंद रूढीला दिलेले धक्के या दोहोंतील कोणत्या बाजूला अधिक महत्त्व द्यावयाचें याचा नीट विचार आणखी कांहीं वर्षांनींच होईल.

ब्रिटिशविरोधी चळवळीच्या आठ सालच्या काळामध्यें टिळक आणि इतर लहान लहान ठिकाणीं निर्माण झालेले देशभक्त यांना करावा लागणारा झगडा जर नजरेसमोर आणला, तर ब्रिटिशांना साहाय्य करणाऱ्या छत्रपतींबद्दल विषाद वाटतो, आणि कांहींजणांच्या आठवणींत उमटलेलें छत्रपतींचें चित्र गौरवास्पद दिसत नाहीं. डॉ. वा. वि. आठले यांनीं आपलें आत्मवृत्त १९५८ सालीं प्रसिद्ध केलें आहे. त्यांत पृष्ठें १६७–१६८ वर १९१० सालची कोल्हापुरांतील स्वतःच्या अटकेसंबंधींची हकीगत दिली आहे. त्यांच्याच शब्दांत ती देतों. "जेवण झाल्यावर नव्या राजवाड्यावर

सबनीसांच्या कचेरींत मला त्या टांग्यांतून नेण्यांत आलें. कारण संस्थानी हद्दींतून मला खालसा मुलुखांत न्यावयाचें असल्यामुळें एक्सट्रॅडिशन ऑर्डर घेणें जरूर होतें. इकडे झोंपडींत आनंदराव मामा कांहीं वेळ थांबले व माझ्या आईला योग्य तो सल्ला देऊन गांवांत आपल्या दवाखान्यांत परत गेले. कोल्हापूरचे राजे त्या वेळीं कोल्हापुरांतच असल्यामुळें त्यांच्याकडे मला नेण्याचा सल्ला सबनीसांनीं दिला. आमचा टांगा गांवांत जुन्या वाड्याकडे गेला. वाटेंत सिटी-पोस्टाजवळ एका खडखडणाऱ्या घोड्याच्या उंच मोठ्या गाडींतून राजे समोरून येत होते. आमच्या टांग्यांत कामटे, ( मारुतराव कामटे पोलिस इन्स्पेक्टर ) पुढें बसले होते व मी आणि म्हैसकर मागें बसलों होतों. कामट्यांची व राजांची दृष्टादृष्ट होतांच राजे आपल्या खडबड्यांत उठून उभे राहिले व त्यांनीं कामट्यांना अभिवादन केलें. राजांची ही लाचारी पाहून मला अत्यंत किळस आली... कोल्हापूरच्या राजाची ब्रिटिश सरकारच्या एका पोलिस अधिकाऱ्यापुढें काय किंमत होती हें उघड झालें. आधींच सारे संस्थानिक ब्रिटिशांपुढें नमलेले, आणि आमचे कोल्हापूरचे राजे हे असे. मग माझ्या बाबतींत एक्सट्रॅडिशन मिळण्यास किती वेळ लागणार ? " शिवराम महादेव परांजपे वगैरे त्या वेळच्या जहाल म्हणविणाऱ्या लेखकांनीं व वक्त्यांनीं शाहू छत्रपतींची निर्भर्त्सना करण्याचा सपाटाच लावला होता.

शाहूमहाराजांच्या दृष्टीनें या गोष्टीकडे पाहावयाचें झाल्यास, राजकारणाचे डावपेंच समजूं शकणाऱ्या मुत्सद्यानेंच संस्थानच्या त्या वेळच्या परिस्थितीचा अभ्यास करून कांहीं निष्कर्ष काढले पाहिजेत. परंतु सर्वसाधारणरीत्या असें दिसतें कीं, शाहूंची दृष्टि निव्वळ ब्राह्मणविरोधी अशी कधींहि नसावी. महत्त्वाच्या बहुतेक जागीं ब्राह्मण अंमलदार होते; आणि त्यांच्यावर त्यांचा पूर्ण विश्वासहि होता. त्यांची दृष्टि प्रागतिक होती. शहराची वाढ व्हावी व कलाकौशल्य आणि उद्योगधंदे विकसित व्हावेत असें त्यांना खासच वाटत होतें. कोल्हापूरचीं अनेक तीर्थें बुजविलीं जावींत व नवीन वसाहती वाढाव्यात म्हणून जी खटपट चालू होती, तिला सनातनी लोकांकडून विरोध होत होता तरी, त्यांच्या विरोधाचा योग्य आदर करून, परंतु शहराच्या विकासाला पोषक होईल असाच मार्ग म्हणजे तीर्थें बुजविण्याचा निर्णय त्यांनीं घेतला होता. परंतु तेव्हांचें संस्थानी राजकारण पूर्णपणें स्वतंत्र रीतीनें चालणें अशक्य होतें. पोलिटिकल एजंट कारस्थानें रचीत असत. अशा एका कारस्थानाची झळ १९०० ते १९०२ च्या दरम्यान खुद्द शाहूमहाराजांनाच लागली होती. परंतु पोलिटिकल एजंटचा बनाव त्याच्याच अंगलट आला होता, असें त्या वेळच्या एका खटल्यावरून दिसतें. आपल्या बटलरला फितवून पोलिटिकल एजंटनें काचेची पूड मिसळलेला पाव आपल्या स्वतःच्या न्याहारी-साठीं बटलरला द्यावयास सांगितलें. आणि अशा रीतीचा पाव पोलिटिकल एजंटला देऊन त्याचा घात करावा अशी गुप्त सूचना आपल्याला छत्रपतींकडून मिळाली असें त्या बटलरनें आपल्या जबानींत सांगावें हें थोडक्यांत कारस्थान होतें. शाहूमहाराजांना याचा सुगावा लागून, तें शिताफीनें त्यांनीं पोलिटिकल एजंटाच्याच अंगावर उलटविलें.

आणि त्या बटलरला फौजदार नेमलें अशी हकीगत श्री. उत्तमराव शेगोलीकर यांच्या अप्रकाशित हस्तलिखितांत नोंदलेली आहे. परंतु एकंदरीनें त्या वेळच्या वातावरणांत संस्थानिकांना फारशा स्वाभिमानानें राहतां येणें शक्य नव्हतें, आणि ब्रिटिश सत्तेची मनधरणी केल्याखेरीज त्यांच्या अधिकारांत वाढ होण्याजोगी नव्हती हेंहि कटु पण सत्यच आहे. सयाजीरावांसारख्या एखाद्या संस्थानिकानें जो कांहीं थोडासा बाणेदारपणा दाखविला असेल, तो वगळतां, बाकीच्या संस्थानिकांना ते त्या वेळीं शक्य नव्हतें असेंहि म्हणतां येईल.

स्वतः विजापूरकर संस्थानी राज्याचे भक्त होते. ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांतून नाहींशी झाली पाहिजे आणि त्यासाठीं संस्थानांतील प्रजेनेंहि आवश्यक तो देहदंड सोसला पाहिजे, असें जरी त्यांना वाटत असे, तरी, संस्थानांत आपण एक प्रकारच्या स्वातंत्र्यांतच आहों आणि येथील पैसा निदान इंग्लंडांत तरी जात नाहीं, असें समाधान त्यांच्या मनांत असे. शाहू छत्रपतींबद्दल तर पहिल्यापासून त्यांच्या मनांत आदर होता. सरकारी नोकरी संपुष्टांत आल्यावर आपल्याला जो पगार देण्यांत आला, तो कायदेशीर-रीत्या नोटीस देऊन एखाद्याला कमी करतांना देत असतात असा पगारच दिलेला आहे. तेव्हां त्यांत संस्थाननें विशेष असें काय केलें? असें जरी त्यांनीं त्राग्यानें म्हटलें, तरी छत्रपतींबद्दल अनादर केव्हांहि व्यक्त केला नाहीं. ग्रंथमालेला मिळणारें साहाय्य सरकारांतून बंद झालें तेव्हां त्या वेळपर्यंत जें साहाय्य झालें त्याबद्दलची कृतज्ञताच उलट व्यक्त केली.

वेदोक्तासंबंधीं विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्वतःच्या आठवणींतील एक उतारा देऊन हा विभाग संपवूं. विठ्ठल रामजी शिंदे व त्यांचे बंधु यांचें मौजीबंधन झालेलें होतें. श्रावणीचा वार्षिक समारंभहि त्यांच्या घरीं होत असे. इतर मराठे जमखंडींत अशी श्रावणी करीत नसत. परंतु शिंद्यांचेकडे अशी श्रावणी ते १८९८ मध्यें पुण्याच्या प्रार्थनासमाजाचे सभासद होईपर्यंत होत होती. महर्षि शिंदे लिहितात: "आमची श्रावणी चालली असतां, होमाच्या वेळीं आमचे पुरोहित जे मंत्र म्हणत, ते वैदिक असत कीं पौराणिक असत, हें मला माहीत नाहीं. पण नवरात्रांत रोज आमच्या घरीं ९ दिवस महापूजा होत असे. त्या वेळीं मंत्रपुष्पाच्या वेळीं पुरोहित वेदमंत्र म्हणत हें मला आठवतें. हा मंत्र क्षत्रियांच्या घरीं म्हणण्यासाठीं रचिला असावा. इतक्या जुन्या काळीं जमखिंडीसारख्या ब्राह्मणी रियासतींत आमच्या घरीं क्षत्रिय ब्राह्मणांचा इतका सलोखा असतां, पुढें पुढें ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद कसा माजला, हें आश्चर्य आहे."

### *सामाजिक परिस्थिति*

संस्कार होण्याचें वय असतांना विजापूरकरांच्या काळांतील किंवा त्याच्या थोडीशी आगेंमागें अशी कोल्हापुरांतील व महाराष्ट्राच्या इतर कांहीं भागांतील परिस्थिति

कशी होती, तें कांहीं उदाहरणांवरून सांगण्याचा प्रयत्न करूं. या विषयाचा विस्तार कितीतरी मोठा होऊं शकेल. परंतु त्याची आवश्यकता नाहीं.

कोल्हापूर ही दक्षिण काशी असल्यामुळें काशीप्रमाणेंच येथें रस्ते असावेत अशा समजुतीनें दार्जी पंडितांनीं कोल्हापूरला फरशीचे बोळ बांधले असा निर्देश करवीर नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक महोत्सव ग्रंथांत सांपडतो. ही हकीगत विजापूरकरांच्या जन्माच्या बरीच आधींची म्हणजे सुमारें १८३० ते १८४० ची असें म्हणण्यास हरकत नाहीं. विजापूरकर यांचा जन्म २६ ऑगस्ट १८६३ या दिवशीं झाला ( शालिवाहन शक श्रावण शु॥ १२, शके १७८५ ). कोल्हापुरांतच त्यांचा जन्म झाला असल्यानें, आपण कोल्हापूरसंबंधीं थोडीशी अधिक माहिती आधीं पाहूं. राजाराम हायस्कूलचा श्रीगणेशा १८५१ मध्यें झाला होता. परंतु माधवराव रानडे हे जेव्हां या शाळेंत इंग्रजी शिकूं लागले, तेव्हां आपला मुलगा कुमार्गाला लागला, असें रानड्यांच्या आईला वाटलें इंग्रजी शिक्षण पूर्ण करण्यासाठीं पुण्या-मुंबईकडे विद्यार्थ्यांना पाठविण्यास फारसें कोणी तयार नसत. १८६७ पर्यंत राजाराम हाय-स्कूलचें रूपांतर हायस्कुलांत झालेलेंच नव्हतें. म्हणून रानडे, कीर्तने, कुंटे, त्र्यंबक नारायण कीर्तने, आणि विठ्ठल नारायण पाठक ही मंडळी मिड्ल स्कूलचा अभ्यास संपवून १८५६ मध्यें कोल्हापुराहून पुढील शिक्षणासाठीं पुण्या-मुंबईस गेली. इतर कोल्हापुरांतच राहिली. उदाहरणार्थ, आबाजी नारायण हुजूरबाजार शिक्षण थांबवून कोल्हापुरांतच दरबारच्या नोकरीस लागले. स्त्रीशिक्षणासंबंधींहि कोल्हापुरांतील परिस्थिति खालसाप्रमाणेंच होती, असें म्हणतां येईल. मुंबई विद्यापीठ सुरुवाती-सुरुवातीला मुलींना परीक्षेस बसूं देणें ही गोष्ट कायदेशीर मानीत नसे.* कारण युनिव्हर्सिटीच्या सर्व नियमांमध्यें विद्यार्थ्यांविषयींचा उल्लेख पुंलिंगी म्हणजे he, him, his असा असे. १८८७ मध्यें कोल्हापुरांतील कृष्णाबाई केळवकर या एकुलत्या एक विद्यार्थिनी कॉलेजांत होत्या, असें केळकरांनीं म्हटलें आहे.

आनंदीबाई जोशी, या विजापूरकरांच्या समकालीनच मानतां येतील. त्यांचा जन्म ३१ मार्च १८६५ रोजीं झाला. त्या जेव्हां कोल्हापुरास शिकत होत्या, त्या वेळची स्थिति त्यांच्या चरित्रांत थोडक्यांत दिलेली आहे. कोल्हापुरांत एक सरकारी स्त्री-विद्यालय होतें व मिस मायसी नांवाची इंग्रज बाई तेथें शिकवीत असे. परंतु आनंदीबाई मडमेबरोबर गाडींत बसून शाळेंत जात हें कोल्हापूरच्या हिंदु जनतेला प्रशस्त वाटलें नाहीं. आणि त्याचा परिणाम अखेर आनंदीबाईनीं कोल्हापुरास रामराम ठोकण्यांत झाला.

'हिंदी स्त्रिया व एकोणिसाव्या शतकांतील हिंदी विद्यापीठें' या लेखांत ही माहिती दिली आहे व त्याचें उदाहरण म्हणून हिंदुस्थानांतील पहिली स्त्री पदवीधर एक

---

* १ सप्टेंबर १९४५ च्या Bombay University Journal चा अंक पाहा.

बंगाली विदुषी होती व ती १८८४ सालीं एम्. ए. झाली; बेळगांवच्या पोस्टमास्तरांनीं आपल्या मुलीला मॅट्रिकला बसण्याची परवानगी मागितली तेव्हां सिंडिकेटनें असा निर्णय दिला कीं, विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थिनींना परीक्षेस बसूं देतां येत नाहीं. कारण या नियमांत उमेदवाराचा सर्व उल्लेख he, him, his असा पुल्लिंगीच फक्त आहे; वगैरे माहिती दिली आहे.

विजापूरकरांच्या जन्मवर्षीच (१८६३) ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणें, या संस्थेनें पुण्यास आपल्या विद्यार्थ्यांसाठीं एक वसतिगृह स्थापन केलें. या वसतिगृहाची सुरुवात ऑगस्टच्या १ तारखेस झाली. वसतिगृह सुरू झालें, तेव्हां एकूण विद्यार्थी किती होते आणि त्या दिवशींची व्यवस्था किंवा एकादशी आणि इतर उपासाचे दिवस या दिवशींची व्यवस्था कशी असे, तें महादेव बाळकृष्ण भट, मुक्काम ओझर, जिल्हा नासिक, १८६२ ते १८६५ मधील ट्रेनिंग कॉलेजचे विद्यार्थी, यांनीं नमूद करून ठेवलें आहे. पहिल्या दिवशीं ४१ पानें मांडलीं होतीं. ३८ ब्राह्मण विद्यार्थी, १ सोनार विद्यार्थी, शिवरामपंत केळकर हे वसतिगृहाची व्यवस्था पाहणारे मास्तर व त्या दिवशीं मुद्दाम बोलाविलेला १ ब्राह्मण, असे लोक होते. सोनार विद्यार्थ्याचें पान बाजूस वाढलें होतें. त्याचें उष्टें भांडीं घांसणारी बाई काढी असे श्री. भट लिहितात.

या सर्व उदाहरणांवरून असें दिसून येईल कीं, कोल्हापूर संस्थानांत काय, जमखंडी संस्थानांत काय किंवा पुण्यासारख्या शहरांत काय, त्या वेळीं जातीजातींमध्यें जो फरक होता, तो कोणालाहि खोंचक वाटण्यासारखा नसून, एक प्रकारचा सलोखा नांदत होता. मात्र समाज, नवीन कल्पना व विशेषतः इंग्रजी शिक्षण यांमुळें बिचकत असे. स्त्रियांना आणि समाजांतील इतर खालच्या थरांना योग्य संधि प्राप्त करून दिली पाहिजे, ही जाणीव होण्यास पुष्कळ अवकाश होता. ब्राह्मणवर्गाचें श्रेष्ठत्व ही वादातीत अशीच गोष्ट मानली जाई. कोल्हापूर नगरपालिकेनें यासंबंधीं आपल्या शतसांवत्सरिक ग्रंथामध्यें जे उल्लेख केलेले आहेत, ते पाहण्याजोगे आहेत. इ. सन १८७३ सालीं कोल्हापूर नगरपालिकेनें घरफाळा बसविण्याची योजना अंमलांत आणण्याचें ठरविलें. तेव्हां या कराविरुद्ध व्यापारी, ब्राह्मण व कोल्हापूरचे समस्त पाटील व कुलकर्णी यांनीं अर्ज केले होते. सर्वसामान्य लोकांप्रमाणेंच या घरफाळा योजनेला सरदार घराण्यांतील लोकांनींहि आपल्या जहागिरीच्या संबंधाच्या कागदपत्रांतील उताऱ्यांचा आधार देऊन विरोध केला होता. परंतु ब्राह्मण मंडळींनीं केलेल्या अर्जांत जी भाषा वापरली आहे, ती तत्कालीन परिस्थितीवर उत्तम प्रकाश टाकते. "ब्राह्मण हे विशेष मान्यस्थ लोक आहेत. कमी प्रतीचे लोकांस कर द्यावा लागत असोन, कांहीं लोकांस माफी आहे, व विशेष मान्यस्थ म्हणोन ब्राह्मण लोकांस माफी मिळाली पाहिजे. पूर्वीचे काळांत ब्राह्मण लोकांस जो मान मिळत असे, तोच मिळाला पाहिजे." (ता. ८ सप्टेंबर १८७३)

अशा वातावरणांत वाढूनसुद्धां विजापूरकर यांची दृष्टि विशाल होऊं शकली, याचें

मुख्य कारण त्यांना मिळालेलें उच्च शिक्षण हेंच होय. शिवाय, बालपणापासून नामदार गोखले यांच्याशीं त्यांची मैत्री असल्यामुळें व गोखल्यांचा अभ्युदय आणि प्रागतिक विचार-सरणी त्यांच्या डोळ्यांपुढें असल्यामुळें ते संकुचित विचाराचें बनणें शक्यच नव्हतें. मात्र अशी संकुचित दृष्टि अनेक ठिकाणच्या वृत्तपत्रांतील स्फुटांमधूनहि तेव्हां दिसून येत असे. न्यायमूर्ति रानडे यांच्याविषयींच्या कांहीं आठवणी ज्ञानप्रकाशचे संपादक श्री. साने यांनीं विविधज्ञानविस्ताराच्या पुस्तक ४६, अंक १ यामध्यें दिलेल्या आहेत. सामाजिक स्थितीचें दर्शन घडविणारा त्यांतील मजकूर असा आहे. "पुण्यास फीमेल हायस्कूल स्थापन झालें. तेव्हां आतां आमचा धर्म बुडणार, पुरुष बिघडलेच आहेत, धर्म काय तो बायकांत राहिला होता, तोहि नाहींसा होणार, अशा टीका कित्येक पत्रांत येत असत. धारवाडवृत्तांत असें लिहिलें होतें कीं, यंदांच्या मंगळागौरी आतां बहुतेक शेवटच्याच होतील. तो मजकूर वाचून रावसाहेबांस हंसू कोसळलें." ( रामचंद्र मोरेश्वर साने )

विजापूरकर यांचे वडील गोविंदराव आपलें शाळेचें काम सांभाळून सार्वजनिक कामांतहि लक्ष घालीत असत, असें कानडे यांनीं विजापूरकरांच्या चरित्रांत म्हटलें आहे. अधिकाऱ्यांच्या विरुद्ध निर्भयपणें लिहिणें व लोकांची दाद लावून घेण्याचा प्रयत्न करणें, या गोष्टीला गोविंदराव भीत नसत. स्वतः गोविंदराव हे रानडे, कुंटे आणि कीर्तने या नांवलौकिकास चढलेल्या थोर लोकांबरोबरच शाळेंत शिकले, पण परिस्थिती-मुळें त्यांना मराठी ६ इयत्तेनंतर शिक्षण थांबवावें लागलें व शाळेंतील शिक्षकाची नोकरी पत्करावी लागली. साहजिकच आपल्या मुलानें तरी उच्च शिक्षण मिळवावें अशी त्यांना तहान लागली होती. म्हणून विष्णु गोविंद विजापूरकर १८८० सालीं जेव्हां मॅट्रिकची परीक्षा पास झाले व १८८६ सालीं बी. ए. पास झाले त्या वेळीं त्यांच्या वडिलांना अतिशय आनंद होणें स्वाभाविकच होय.

## विजापूरकरांची बुद्धिमत्ता बेताची होती काय ?

विजापूरकरांची बुद्धिमत्ता बेताची होती, असें मत त्या वेळचे कांहीं लोक धारण करीत होते असें वाटतें. याविषयीं म्हणावयाचें झाल्यास, प्रथम डॉ. बेलवलकर यांचें विजापूरकरांविषयींचें मत सांगणें उचित होईल. आपल्या भगवद्गीतेच्या समालोचनाला डॉ. बेलवलकरांनीं जी इंग्रजी प्रस्तावना लिहिलेली आहे, तिच्यामध्यें असे उद्गार काढले आहेत कीं, "भगवद्गीतेची शिकवण ज्या थोर सज्जनांनीं आयुष्यांत सतत आचरिली, अशा लोकोत्तर विभूतींमध्यें माझे वंदनीय गुरु प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर यांची गणना होते, जर कोणा एका व्यक्तीनें माझें चारित्र्य आणि माझें विकसणारें मन घडविलें असेल, तर तें प्रो. विजापूरकर यांनीं होय......" प्रो. विजापूरकर यांच्यासंबंधीं कांहीं आठवणी सांगण्याची विनंती करण्यासाठीं प्रस्तुत लेखक डॉ. बेलवलकरांना १ जुलै १९५७ रोजीं भांडारकर इन्स्टिटयूटमध्यें भेटला असतांना त्यांनीं सांगितलें कीं, "माझ्या गीतेच्या प्रस्तावनेंत मीं जें म्हटलें आहे, त्याहून अधिक

गौरवपूर्ण असें कोणालाहि कांहीं म्हणतां येईल असें मला वाटत नाहीं. तें माझें प्रामाणिक व कायम मत आहे."

परीक्षेतील यश ही बौद्धिक उंचीची खूण होऊं शकत नाहीं. रानडे, गोखले आणि तेलंगप्रभृति कांहींजण सोडल्यास, त्या वेळच्या बहुतेक प्रसिद्ध व्यक्तींना कोणत्या ना कोणत्या तरी परीक्षेंत अपयशाचें गालबोट लागलेलेंच दिसतें. म्हणून अशा व्यक्तींची बौद्धिक उंची कोणी कमी मानलेली नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करणारे एक प्रमुख गृहस्थ श्री. नामजोशी हे मॅट्रिकची परीक्षा अनेक वेळां नापास झाले व त्याचें कारण त्यांचे पेपर नीट तपासलेच गेले नव्हते हें होतें. पुढें केरूनाना छत्रे यांच्या निदर्शनास ती गोष्ट आणून दिल्यानंतर त्यांत दुरुस्ती झाली, अशी आठवण चिं. ग. कर्वे यांनीं 'उपेक्षित मानकरी' या आपल्या लहानशा पुस्तकांत दिलेली आहे. १८७५ सालच्या सरकारी गॅझेटांत महादेव बल्लाळ नामजोशी हा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्याचें अखेर छापून आलें. विजापूरकरांच्या बाबतींत किंवा इतर कोणा प्रसिद्ध व्यक्तींच्या परीक्षेंतील अपयशाच्या बाबतींत असेंच कांहीं घडलें असेल असें म्हणण्याचें मात्र कारण नाहीं.

विजापूरकरांची संपादकीय कामगिरी, त्यांनीं प्रसिद्ध केलेलें 'ऋक्संग्रह' हें पुस्तक, फ्रीमनच्या इतिहासाचें त्यांनीं केलेलें भाषांतर, भारत इतिहास संशोधक मंडळ वगैरे ठिकाणीं त्यांना प्राप्त झालेलें महत्त्वाचें स्थान, मालवीयांच्या नव्या कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून घेतलें जावें अशी त्यांच्या बाबतींतील टिळकप्रभृतींची शिफारस, या सर्व गोष्टींवरून असें बिनदिक्कत म्हणतां येतें कीं, त्यांची बौद्धिक पातळी पुष्कळच वरच्या दर्जाची होती. दि. वि. काळे हे विजापूरकरांचे एक मोठे भक्त. समर्थ विद्यालयाच्या आजीव सभासदांपैकीं एक. अलीकडे व्होरा आणि कंपनीमार्फत त्यांनीं विजापूरकरांचें एक लहानसें चरित्र प्रसिद्ध केलें असून, त्यांत मूलतः सद्धेतूनें व गौरवभावनेनेंच, परंतु थोडेंसें चमत्कारिक असें विधान केलें आहे. काळे लिहितात : "या मंद विद्यार्थ्याबद्दल फारशा कोणाच्या अपेक्षाहि नसणार. कोणी चलाख विद्यार्थी त्यांच्या वाऱ्यालाहि उभा राहील, असें त्यांना व्यक्तिमत्त्व, शरीरसौष्ठव किंवा बुद्धिमत्त्व देवानें दिलेलें नव्हतें." एकांगी दृष्टीनें व विजापूरकरांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या ध्यासावरच प्रकाश केंद्रित करण्याच्या हेतूमुळें असें विचित्र विधान केलें गेलें असावें.

विजापूरकरांच्या कर्तृत्वशाली जीवनचरित्राचीं सुरुवातीचीं कांहीं वर्षे डेक्कन कॉलेजांत एम्. ए. चा अभ्यास करण्यांत, अहमदाबाद येथें संस्कृतचे लेक्चरर म्हणून काम करण्यांत, व नंतर कोल्हापुरांत राजाराम कॉलेजांत संस्कृतचे अध्यापक म्हणून काम करण्यांत गेलीं. कोल्हापुरांतील त्यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात नगर वाचन मंदिरांतील, नगरपालिकेंतील, वादसभेंतील, हेमंत व्याख्यानमालेंतील, स्वदेशी चळवळींतील, सदर्न मराठा बँकेच्या स्थापनेंतील, अशा वेगवेगळ्या सामाजिक चळवळींतील पदार्पणानें झाली. या प्रत्येक चळवळींत त्यांनीं पुढारीपण केलें असें म्हणणें विभूतिपूजा केल्यासारखें

होईल. परंतु त्या वेळच्या कोल्हापुरांत त्यांच्याएवढी सर्वमान्यता असणारा आणि सर्व सांस्कृतिक आणि देशोन्नतीच्या चळवळींत लक्ष घालणारा दुसरा कोणी नव्हता. सर रघुनाथ व्यंकटेश सबनीस हे त्यांच्यापेक्षां ज्येष्ठ परंतु दरबारच्या नोकरींत निमग्न झालेले; सर न्यायाधीश पंडितराव त्यांच्यापेक्षां बुद्धिमान्, परंतु सामाजिक किंवा सांस्कृतिक चळवळींत फारसें अंग न घालणारे; रुईकर वगैरे लोकसभा भरविणारी मंडळी एका विशिष्ट दृष्टीनें जागृत, परंतु सर्वांगीण विचार करण्याची कुवत अंगीं नसलेली अशी होती. राजाराम कॉलेजांतील त्या वेळची इतर प्राध्यापक मंडळी थोर होती, परंतु स्वदेशी आणि राष्ट्रीय चळवळीचा भारतांतील इतर ठिकाणीं चालू असलेला लढा यांच्याशीं त्यांचा फारसा संबंध नव्हता. अशा सर्व दृष्टींनीं पाहिल्यास, पुण्याच्या बरोबरीचें स्थान कोल्हापूला मिळवून देण्याची खटपट करणारा, किंवा निदान पुण्यानंतरचें स्थान कोल्हापूर शहराखेरीज इतर कोणत्याहि शहराला प्राप्त होऊं शकणार नाहीं एवढी कामगिरी कोल्हापुरांत करून दाखविणारा, विजापूरकरांशिवाय दुसरा इसम नव्हता.

राजाराम कॉलेजांतील त्यांची नोकरी २२ सप्टेंबर १९०५ या दिवशीं संपली. 'तुम्ही विद्यार्थ्यांवरील आपल्या वजनाचा उपयोग यथायोग्य रीतीनें करीत नाहीं,' असा आरोप दरबारनें त्यांच्यावर केला होता. त्यांची नोकरी संपली तरी प्रिन्सिपल सेलबी, मि. कॅण्डी, डॉ. भांडारकर, प्रो. शिवराम बापूजी परांजपे, प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक, रा. गंगाधर पांडुरंग गद्रे, यांच्या कृपेंत अंतर पडलें नाहीं. सर्वांचा आदर व सर्वांकडून प्रेम त्यांनीं मिळविलें होतें. सरकारी नोकरी संपली म्हणून आतां सरकारी नोकरीबद्दल तुच्छतेनें लिहावयास हरकत नाहीं, अशी त्यांची वृत्ति मुळींच नव्हती. तेव्हांच्या काँग्रेसमधील मोठ्या पुढाऱ्यांची अशी मनोधारणा नव्हती. उलट, ब्रिटिश सरकारच्या नोकरींत आमचीं माणसें अधिकाधिक प्रमाणांत घेतलीं जाऊं यात, अशा अर्थाचे ठरावच काँग्रेस तेव्हां करीत असे. साहजिकच, विजापूरकरांनीं दरबारच्या नोकरीसंबंधीं अनुदार उद्गार काढले नाहींत. लोकराज्याची सेवा आजपर्यंत मोफत केली, व पदरमोडहि केली, परंतु इतउत्तर लोकराज्यांतील सेवक बनण्याचा संकल्प केला आहे, असें नोकरी सुटल्यानंतर त्यांनीं म्हटलें.

बेताची बुद्धिमत्ता असणाऱ्या माणसाला एवढी थोरवी आणि एवढें कर्तृत्व दाखवितां येईल काय याचा विचार आपण करावयास नको काय ?

## "*गोखले, टिळक आणि विजापूरकर*"

कानडे यांनीं लिहिलेल्या विजापूरकरांच्या चरित्रांत असें म्हटलें आहे कीं, विजापूरकरांचें बनारस विद्यापीठांत जाणें रहित झालें त्याचें कारण पं. मदनमोहन मालवीय आपल्या महाविद्यालयासाठीं सरकारी मदत स्वीकारणार होते हें होय. सरकारी मदत स्वीकारणाऱ्या खासगी संस्थांबद्दल कट्टर राष्ट्रवादी व राष्ट्रीय

शिक्षणसंस्था चालविणाऱ्या पुढाऱ्यांना मुळींच आदर वाटत नसे. समर्थ विद्यालय सरकारी मदत घेऊन चालविलें गेलें नव्हतें. विजापूरकरांना तें संमत नव्हतें. परंतु बनारस विद्यापीठांत विजापूरकर गेले नाहींत याला इतर कांहीं कारणें असलीं पाहिजेत. ते व प्रो. भानू असे दोघेजण मालवीयांच्या विद्यालयांत पाठविले जाणार होते. खानोलकर म्हणतात, कीं विजापूरकरांचा तीन वर्षांचा खर्च सातारचे वकील र. पां. करंदीकर ( दादासाहेब करंदीकर ) हे देणार होते. ' वासूकाका जोशी आणि त्यांचा काल, ' या पुस्तकांत श्री. देवगिरीकर यांनीं थोडेंसें निराळें कारण सांगितलें आहे. टिळकांचें व सरकारचें वांकडें असल्यामुळें टिळकांशीं मालवीयांना संबंध नको होता, आणि विजापूरकर तर टिळकांकडूनच आलेले. त्यामुळें आतां येतों, मग येतों, असें करतां करतां मालवीयांनीं बराचसा काळ घालविला. काकांच्याकडून अव्यवस्थित-पणाबद्दल थोडेंसें बोलणेंहि खाल्लें, परंतु विजापूरकरांबद्दल नको असें कांहीं सांगितलें नाहीं. पुढील इतिहासावरून मालवीयांची संस्था त्या वेळीं निघालीच नाहीं, व ती पुढें १०-१२ वर्षांनीं निघाली असें दिसतें. वास्तविक विजापूरकर हे जेवढे टिळकपक्षाचे, तेवढेच गोखल्यांच्याबद्दलहि आदर असलेले असे थोर गृहस्थ होते. परंतु त्या वेळच्या राजकारणांत स्वतःला राष्ट्रीय शिक्षणाला वाहून घेतल्याकारणानें विजापूरकरांचीं ६-७ वर्षे कीर्ति मिळवून देणारीं जशीं गेलीं, तशींच अनेक आपत्तींना तोंड द्यावयास लावणारीं अशींहि गेलीं.

विजापूरकरांच्या मनाचा हा प्रवास एका सत्प्रवृत्त देशभक्ताच्या अंतरंगामध्यें होणाऱ्या ओढाताणीचा निदर्शक आहे.

टिळकांच्याबद्दल त्यांना आदर वाटत असला, तरी पुण्यांतील डेक्कन सभा, सार्वजनिक सभा, वगैरे ठिकाणीं दंडेली सुरू होऊन गोखल्यांच्या विधायक, पोक्त आणि संयमशील नेतृत्वाला सुरुंग लागल्याबद्दल त्यांना अतिशय दुःख झालें होतें. यासंबंधीचें ग्रंथमालेंतील एक स्फुट असें आहे : ' सुविचाराची ओहोटी अथवा पुण्यांतून बाहेर पसरलेल्या महाराष्ट्रांतील नवीन चळवळी ' या स्फुटामध्यें पुण्याची महति प्रथम वर्णिलेली असून, सर्वत्र महाराष्ट्राचें नेतृत्व पुण्याकडे आहे, असें त्यांनीं आधीं म्हटलें. अशा पुण्यांत सामाजिक परिषदेचें राष्ट्रसभेच्या मंडपांतून उच्चाटन करण्याचा प्रयत्न झाला. शिवाजीमहाराज महोत्सव, सनातन धर्म-परिषद्, गणपत्युत्सव, देशी माल, डेक्कन लिबरल असोसिएशनची नव्यानें झालेली स्थापना, आणि या सर्व बाबींवरून आढळून येणारी पुणेंकरांतील दुही त्यांना अतिशय गर्ह्य वाटली. म्हणून टिळकांचा निर्देश न करतां, परंतु बहुतेक टिळकांनाच उद्देशून, त्यांनीं खालील परिच्छेद लिहिला असावा.

" बहुजनसमाजाची किंवा त्यांतील प्रमुख मंडळींची आपल्यावर भिस्त जडली आहे असें कळल्यावर, जात्या समंजस विचार डोक्यांत असले तरी लोकप्रियतेस धोका येईल या साहजिक बुद्धीनें ते लोकांपुढें मांडण्याची छाती होत नाहीं, व मांडले तरी

ते ठसा उमटण्याजोग्या रीतीनें मांडवत नाहीं. कित्येक वेळां समाजाच्या अति लालनाचा अथवा पूर्ण छंदानुरोधाचा परिणाम असा होतो कीं, आपल्या म्हणण्याप्रमाणेंच सर्व झालें पाहिजे असा लोकांचा ग्रह ठाम होऊन जातो. मग ज्याचे आपण मोठे देव्हारे माजविले, ज्याचा अनन्यभावानें स्तुतिपाठ गायिला, प्रसंगविशेषीं ज्याचा जयघोष केला, व ज्याच्यावरून आरत्यादि ओवाळल्या, त्याचाच सुविचारोपदेश क्षणमात्रहि ऐकूं नये असें वाटतें. जरा आपल्या मर्जीविरुद्ध भाषण झालें कीं त्या सर्व गौरवाचें मातेरें व्हावें असा कांहीं विलक्षण जोर अशिक्षित लोकांच्या समाजांत असतो. तात्पर्य, हळूहळू शिक्षणप्रसार केल्याशिवाय, अगदीं कडेलोटाच्या कल्पना सामान्य जनाच्या डोक्यांत शिरकविण्यास प्रयत्न केला म्हणजे, त्या कल्पनांच्या मोहक व मादक गुणानें त्या एकदां स्थिर बसल्या म्हणजे मर्यादेच्या व सारासार विचाराच्या गोष्टी त्यास पळभरहि मानवत नाहींत. यामुळें अशा केवळ लोकछंदानुरोधानें बनलेल्या अमुकुटधारी राजाचे हातून व्यावहारिकदृष्ट्या कल्याण बिलकुल होत नाहीं. चाललेल्या मंदच कां होईना, गतीस मात्र विरोध होतो.'' हें स्फुट ग्रंथमालेच्या नेमक्या कोणत्या अंकांतील आहे तें सांगतां येत नाहीं. परंतु, तें टिळकांच्या गणपति-उत्सव, शिवाजी-उत्सव वगैरे चळवळी सुरू झाल्यानंतरचें आहे हें खास.

गोखले आणि टिळक यांचें राजकारण त्या वेळीं परस्परपूरक होण्याऐवजीं परस्पर-विरोधी झालें होतें. आणि स्वार्थत्याग करण्याची तयारी दाखविणारे व देहदंड भोगावयास तयार असणारे विजापूरकर जरी टिळकांना अनुकूल होते, तरी स्वभावतः सौजन्य अंगीं असलेले आणि विधायक कामावर किंवा स्वःतच्या उणीवा दुरुस्त करण्यावर आधीं भर देणारे विजापूरकर गोखल्यांना अधिक जवळचे होते. राजारामीयन म्हणून, पूर्वीपासूनचे स्नेही म्हणून, इंग्लंडमध्यें मोठी कामगिरी करून हिंदुस्थानची प्रगति साधणारे म्हणून, गोखले विजापूरकरांना प्रियच होते. १९०५ च्या बनारसच्या अधि-वेशनाचे अध्यक्ष या नात्यानें गोखल्यांनीं केलेलें भाषण देशाच्या राजकारणाला योग्य वळण लावणारें ठरणार असा त्यांचा कयास होता. परंतु त्या वेळीं कोल्हापुरांतील नोकरी संपुष्टांत आली होती आणि मनानें विजापूरकर अधिकाधिक निग्रही व राष्ट्रभक्तीची कांस धरणारे होऊं लागले होते. साहजिकच गोखल्यांच्या नवीन निघालेल्या सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीस जाऊन न मिळतां त्यांनीं स्वतंत्रपणें शिक्षणकार्य करण्याचें ठरविलें. या कामांत गोखल्यांकडून साहाय्य होण्याजोगें नव्हतें. जरी मोठ्या झगड्यानंतर कलकत्त्याला १९०६ सालीं राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव चतुःसूत्रींतील एक ठराव म्हणून पास झाला, तरी गोखले आणि त्यांचे इतर अनुयायी यांनीं राष्ट्रीय शिक्षणाविषयीं फारशी आस्था दाखविली नाहीं. महाराष्ट्राबाहेर इतर प्रांतांत मात्र अशी कडवट दुफळी नव्हती. परंतु, इकडे राष्ट्रीय शिक्षणाची परांजपे वगैरे गोखले पक्षांतील मंडळींनीं हेटाळणीच आरंभिलेली होती. विजापूरकरांना त्या वेळीं टिळकांचें साहाय्य बरेंच झालें.

हें साहाय्य त्यांना संपूर्णपणें उपयोगी पडलें, कीं त्यामुळें पुढें कांहीं आपत्ति सोसाव्या लागल्या, याबद्दलचा विचार करूं लागल्यास, असें दिसतें कीं, त्या वेळच्या देशाच्या स्थितींत तें साहाय्य उपकारकच झालें. परंतु, विजापूरकरांसारख्या आचरणानें तत्त्वनिष्ठ, स्वभावानें सौम्य, वृत्तीनें समन्वयी आणि मनानें गोखले पक्षांतील असलेल्या देशभक्ताला समर्थ विद्यालयावर नंतर जें गंडांतर आलें, तें दूर करून घेण्यास अतिशय यातायात पडली. १९०६ ते तुरुंगवासाच्या अखेरपर्यंतचीं वर्षे, म्हणजे सुमारें सहा वर्षांचा विजापूरकर आणि टिळक यांच्यांतील सामरस्याचा काळ सोडल्यास, विजापूरकरांच्या उरलेल्या आयुष्यक्रमांत सुरुवातीला आणि अखेरीला त्यांचें रानडे व गोखले आणि गोखल्यांचा प्रागतिक पक्ष, यांच्याशीं निकटचें नातें होतें. परंतु हेंहि म्हणणें विजापूरकरांना पूर्ण समजून घेण्याच्या दृष्टीनें अपुरेंच होईल. कारण, नामदार चौबळ यांचें साहाय्य त्यांनीं शर्तीनें मिळविलें. समर्थ विद्यालय पुनः नवीन समर्थ विद्यालय या नांवानें सुरू केलें. चौबळांकडून पुष्कळच द्रव्यसाहाय्य होण्यासारखें होतें. इतकें असूनहि, नवीन समर्थ विद्यालय भरभराटीस येण्याचा रंग दिसत असतांना, नामदार चौबळ यांच्याशीं त्यांचें बिनसलें. आणि चौबळ त्यांच्यापासून दूर गेले. याचें कारण आपण बारकाईनें पाहूं गेलों तर असें दिसेल कीं, टिळकांपेक्षां विजापूरकरांच्या मनोधारणेला गोखले हे जरी जवळ वाटत असले तरी देशसेवा, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेम यांसाठीं जो त्याग करावयाचा, त्यांत सर्वस्व गेलें तरी चालेल, अशी तेजस्वीपणाची परंतु वरून कोणालाहि उग्र भासणार नाहीं, अशी विजापूरकरांची वृत्ति होती. म्हणून ते टिळकांहून निराळे आणि गोखल्यांहूनहि निराळे होते असेंच म्हणणें भाग आहे. १८९७ च्या डिसेंबर महिन्यांत एकदां व १९०६ च्या ऑगस्ट महिन्यांत आणखी एकदां विजापूरकरांनीं करवीर नगर वाचनमंदिराच्या कार्यकारिणीच्या सभेंत अशी सूचना आणली होती कीं, टाइम्स ऑफ इंडिया वाचनमंदिरांत येण्याचें बंद करावें.

कोल्हापुरांतील नोकरी संपल्यावर ते जे एकदां राष्ट्रीय शिक्षणाच्या आणि तदनुषंगानें राष्ट्रकार्याच्या उद्योगाला लागले, तेव्हांपासून त्यांनीं टिळकांच्या राजकारणाला जितका हातभार लावतां येईल व त्याचा निर्भय प्रचार जेवढ्या जोमानें करतां येईल तेवढा केला. त्या वेळीं महाराष्ट्रांत टिळकपक्षाचा जोर जरी वाढत होता, तरी काँग्रेसमध्यें मात्र टिळकपक्ष अल्पसंख्यच होता. म्हणून टिळकांना १९०८ सालीं शिक्षा होईपर्यंत काँग्रेसचें अध्यक्षपद त्यांच्यापासून दूरच राहिलें. तें अध्यक्षपद त्यांना मिळालें पाहिजे असा इतर टिळकपक्षीयांप्रमाणेंच विजापूरकरांचाहि आग्रह होता. १९०५ सालीं टिळकांच्या अध्यक्षपदासंबंधीं थोडीशी खटपट झाली होती. परंतु तेव्हां गोखले अध्यक्ष निवडले गेले होते. १९०६ सालीं तोच प्रश्न लोकांपुढें होता, परंतु तोड म्हणून दादाभाईंना अध्यक्ष करण्यांत आलें. १९०७ सालीं प्रथम नागपूरला काँग्रेस भरणार होती, आणि टिळकपक्षीय

तरुण लोकांचा जोम लक्षांत घेतां, नागपूरला टिळकच अध्यक्ष झाले असते. परंतु नागपूरहून सुरतेसच काँग्रेस हालविण्यांत आली. आणि मग सुरतेस बखेडा उत्पन्न झाला व काँग्रेसच मोडली. टिळक हे तेव्हां ५० वर्षांचे होते. त्या वेळच्या लोकांचें आयुर्मान लक्षांत घेतां, स्वतः टिळकांनाहि आणि त्यांच्या अनुयायांनाहि त्यांनीं काँग्रेसचे अध्यक्ष लवकर होणें इष्ट वाटत असल्यास त्यांत नवल नाहीं. विजापूरकर 'रा. रा. टिळक अध्यक्ष कां नकोत?' या लेखांत म्हणतात,—"आपण केवळ राष्ट्रासाठींच जगत आहोंत, असें ज्याच्या कृतीवरून दिसण्याजोगें आहे अशा माणसाबद्दल — मग तो गोखले असो किंवा टिळक असो — लोकांना सहज नाहीं, तरी कालावधीनें लक्षांत येतेंच, येतें." याआधीं त्याच लेखांत टिळकांच्या विषयीं गौरवानें लिहितांना त्यांनीं म्हटलें आहे, "राष्ट्रांत चोहोंकडे त्यांचा जयजयकार होत आहे, यांत आश्चर्य नाहीं. पुष्कळ लोकांना त्यांचीं राजकीय मतें मान्य होऊन, त्याचें प्रतिबिंब राष्ट्रीय सभेच्या कार्यांत पडलें तर त्यांत दोष काय? केसरी पत्राद्वारें व भाषणद्वारां लोकांची जी त्यांनीं सेवा केली आहे व आज २१ वर्षें राष्ट्रीय सभेच्या तत्त्वापासून अणुरेणू न ढळतां त्यांनीं जें आपलें धोरण ठेवलें आहे, तें पुष्कळ लोकांस मान्य आहे, ही गोष्ट दडवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. आमचा त्यांचा कित्येक बाबतींत स्पष्ट मतभेद आहे. तरी तो स्पष्टपणें लोकांपुढें मांडल्यावरहि त्याचें महत्त्व लोकांस वाटलें नाहीं, तर स्वस्थ बसणें भाग आहे. रा. टिळकांच्या अध्यक्षतेमुळें राष्ट्रांतील सर्व प्रेरणा एक होण्यास मदत होत असेल तर त्यांसच तो मान देणें योग्य होणार आहे, असें कोणीहि म्हणेल.......खरा माणूस लवकर ओळखला तर राष्ट्राचें कल्याण होतें, उशिरां ओळखला, तर घात होऊन गेल्यावर राष्ट्रास पश्चात्ताप होतो. रा. टिळक आले म्हणजे टाळ्यांच्या गजरांनीं लोक आपला आदर व्यक्त करीत असतात. त्यांचें भाषण प्रेमानें व लक्षपूर्वक ऐकून घेतात. तेव्हां राष्ट्रीय सभेस त्यांची चाललेली राष्ट्रांतील कामगिरी मान्य आहे असें स्पष्ट होतें. मग रा. टिळक अध्यक्ष कां नकोत?"

शिक्षण-क्षेत्रांतील प्रयोग म्हणून राष्ट्रीय शिक्षणाकडे त्यांनीं पाहिलें हें तर खरेंच, परंतु देशाच्या स्वातंत्र्य लढ्यांत देशांतील तरुणांची गुणवत्ता, स्वाभिमान आणि स्वावलंबित्व वाढावें यासाठीं आयुष्याच्या तारुण्यदशेपासून तों अखेरपर्यंत त्यांनीं प्रयत्न केला. अशा एका विभूति शोभण्याजोग्या देशभक्ताचे हे लेख महाराष्ट्रांतील वाचकवर्गाला आज पहिल्यानेंच एकत्रित स्वरूपांत उपलब्ध होत आहेत. त्यांचे विचार समजून घेणें हीच त्यांची स्मृति कायम ठेवण्याची रीत आहे. म्हणून इतर स्मारकांपेक्षां या लेखसंग्रहाला अधिक महत्त्व आहे.

—— मु. गो. देशपांडे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ०५५८५ वि: निबंध
क्रमांक २०९२ नों: दि: २०।३।७१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ९३०६२

# शैक्षणिक लेख

१ युनिव्हर्सिटी कमिशन

२ सरकारी शाळांतून धार्मिक शिक्षण

३ भारतीय विश्वविद्यालय

४ समर्थ विद्यालय

५ हिंदु एज्युकेशन फंड

# १. युनिव्हर्सिटी कमिशन

[ ग्रंथमाला ऑगस्ट १९०२

ह्या कमिशनची फेरी मुंबई इलाख्यांत आली होती त्या वेळीं आम्हीं आपले विचार प्रिय वाचकांपुढें ठेवले होते. आम्हीं फेब्रुवारी महिन्याच्या सारसंग्रहांत या विषयास अग्रस्थान देऊन विश्वविद्यापीठीय शिक्षणासंबंधानें मुख्य कोणत्या गोष्टी व्हावयास पाहिजे होत्या त्या नमूद केल्या. त्या झाल्या म्हणजे बाकीच्या सटरफटर गोष्टींविषयीं काळजी करण्याचें कारण नाहीं. त्या मुख्य गोष्टी तीन होत्या.

१. विद्यार्थिगृहाशिवाय कोणतीहि पाठशाळा ( कॉलेज ) असूं नये.

२. विश्वविद्यापीठांतील शिक्षण देशी भाषांच्या द्वारानें झालें पाहिजे.

३. एका विश्वविद्यापीठाच्या सर्व पाठशाळा एकाच गांवांत असल्या पाहिजेत. यासाठीं विश्वविद्यापीठांची संख्या वाढविली पाहिजे. प्रयोगादाखल नुसत्या मुंबई इलाख्यांत पांच विश्वविद्यापीठें करावींत. त्या गांवांस विश्वविद्यापीठनगर ( युनिव्हर्सिटी टाऊन ) या दृष्टीनेंच महत्त्व असावें.

या तीन गोष्टी करण्याची तयारी असली, निदान पहिली व तिसरी आवश्यक गोष्ट करण्याची तयारी असली, तर हा प्रश्न हातीं घ्यावा; नाहींतर आहे त्या व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं पाहण्याइतकें वेडेंपण नाहीं असा आमचा ठाम ग्रह आहे. आमच्या मतें दुसरी गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे. परंतु चालू व्यवस्थेंत मुळासकट ( रॅडिकल ) फेरफार करावयाची छाती होणें परकीय सरकारास कठीण आहे. आमचा खरा उपयोग ब्रिटिश साम्राज्यास व जगतास व्हावयाचा असेल तर हिंदुस्थानास संयुक्त संस्थानांच्या धोरणावर नेऊन ‘ डोमिनियन ’ व ‘ कॉमनवेल्थ ’ प्रमाणें आहे. एक ब्रिटिश पादशाहीचें अवयवभूत ‘ रिपब्लिक ’ बनविलें पाहिजे. यासाठीं ब्रिटिश सरकारानें आमच्या निरनिराळया भाषाभेदांप्रमाणें हिंदुस्थानचे भाग पाडून त्या त्या भागापुरतें संस्थान केलें पाहिजे. त्या त्या संस्थानांत तेथील भाषेच्या द्वारें शिक्षण चालविणारीं विश्वविद्यापीठें स्थापन झालीं पाहिजेत. अशाच धोरणावर आमच्या देशाचें शिक्षण नेलें तरच आमच्या साहाय्यानें ब्रिटिश साम्राज्यास इटली, ऑस्ट्रिया, रशिया, फ्रान्स, जर्मनी या पांच युरोपीय व अमेरिका व जपान या

तदितर राष्ट्रांवर सर्व बाबतींत वरचढ करतां येणें शक्य आहे. खरोखर म्हटलें असतां १५० वर्षें फुकट गेलीं. गेल्या ६० वर्षांत तर, म्हणजे ज्यांत सदरील प्रतिस्पर्धी मोठीं राष्ट्रें जोरानें पुढें सरसावलीं, त्यांत आमच्या राज्यकर्त्यांनीं आपल्या व्यापारांत व विद्यावृद्धींत आमची अमोल जोड करून घेतली असती, म्हणजे अर्थात् आमच्यामध्यें कर्तृत्वशक्ति व बुद्धिमत्त्व उत्पन्न केलें असतें तर या सातहि राष्ट्रांचें डोकें वर निघालेंच नसतें. परंतु असा मुत्सद्दीपणा ब्रिटनमध्यें नव्हता. नव्हता म्हणण्यापेक्षां होता, परंतु तो विरुद्ध बहुमताखालीं चिरडून गेला असेंच म्हणणें सत्यास अधिक धरून आहे. कांहींहि असो. झालें तें झालें. आतां तरी रुंद पायावर विश्वविद्यापीठीय शिक्षणाची इमारत उभी राहावी अशी आमची इच्छा आहे. परंतु तसा रंग दिसत नाहीं. प्रथम पाण्यासारखा पैसा खर्च केला पाहिजे. ती गोष्ट सरकारच्या हातून जर होत नाहीं तर नुसता ऊहापोह करणें नीट नाहीं. निदान आपल्यास अमकी अमकी गोष्ट साध्य होत नाहीं म्हणून ती वाईट आहे किंवा अनुपयोगी आहे किंवा अशक्य आहे असें तरी प्रतिपादन करण्याचें साहस करूं नये.

ह्या युनिव्हर्सिटी कमिशनपासून आमची समूळ निराशा झाली असें आम्ही कां म्हणतों याचें बीज आमच्या वरील लिहिण्यावरून दिसून येईल. आमच्या आशा मोठ्या होत्या व आहेत. त्या प्रथमच परिमित असत्या तर आमचा कांहींतरी संतोष झाला असता. प्रस्तुत कमिशनची उडी आमच्या मनोरथाप्रमाणें उंच गेली नाहीं म्हणून, तें सर्वथा निरर्थक आहे असें आमचें म्हणणें नाहीं. ज्या गोष्टी सुचविल्या आहेत त्यासंबंधानेंहि विचार करावा. कमिशनचें एकंदर धोरण असें आहे, कीं वाटेल त्यानें शिक्षणासारख्या महत्त्वाच्या गोष्टींत हात घालणें ठीक नाहीं व या कामीं सरकारचा चांगलाच अंमल असला पाहिजे. आपण प्रथम सर्व खर्च सोसून आमच्यांत लज्जत उत्पन्न करणार आहे असें ठरवून, सगळा विश्वविद्यापीठीय शिक्षणाचा ताबा आपल्याच हातीं सरकार ठेवणार असेल तर सर्व लोकांस समाधान वाटेल; परंतु आज ज्या सूचना पुढें आहेत, त्यांत खर्चाची योजना बहुधा शून्य (कारण या सूचना कमिशनच्या आहेत; सरकारच्या नाहींत.) व सरकारी अधिकाराची योजना मात्र परिपूर्ण आहे. अशा स्थितींत काय लिहावें व काय बोलावें याचीच पंचाईत आहे. कमिशनच्या सूचनांवर सरकारी ठराव बाहेर पडेल तेव्हांच काय लिहिणें तें लिहावें हेंच उचित; परंतु तसा ठराव करण्यास सरकारास या सूचनांसंबंधानें लोकमत काय आहे हेंहि कळणें जरूर आहे. म्हणून आम्ही चार शब्द लिहितों.

पाठशाळांच्या इमारती, तेथील सामानसुमान, तालीमखाना, क्रीडांगणें, रसायनशाळा, पुस्तकालयें, शिक्षकवर्ग वगैरे सर्व कांहीं पहिल्या प्रतीचें असावें व विद्यार्थिगृहें पाठशाळांच्या अंगभूत असावींत. या सूचना केवळ शिफारशीवजा आहेत व या अंमलांत आणण्यासाठीं सरकार पैसे खर्चे करण्यास सिद्ध नाहीं. सरकारी पाठशाळा आहेत त्यांत तरी निदान सरकार योग्य व्यवस्था करणार नाहीं, असें गृहीत धरण्याचें वर्तमानपत्रकारांस व इतर टीकाकारांस कांहीं कारण नाहीं. आजवरचें शिक्षणाबद्दलच्या खर्चाचें सरकारचें धोरण निराळें असलें म्हणून आतां हें कमिशन बसून त्यांच्या सूचना आल्यावर तें बदलणार नाहीं कशावरून? आम्हीं जें पुढें लिहिणार आहों त्यांत या कमिशनच्या सूचनांप्रमाणें आपल्या स्वतःच्या पाठशाळांत अगदीं पूर्ण अंमल सरकार करणार असें गृहीत धरलें आहे. सरकारी कॉलेजें म्हणजे कित्त्याप्रमाणें लोकांपुढें राहतील व तीं जोंपर्यंत खुद्द सरकारास तशीं करतां येणार नाहींत तोंपर्यंत दुसऱ्या म्हणजे मदतीच्या किंवा बिनमदतीच्या कॉलेजावर कोणत्याहि नियमाचें किंवा ठरावाचें जूं सरकार लादणार नाहीं, असेंहि गृहीत धरून चालणें सरळपणास योग्य आहे.

हा पहिला विचार झाला. उत्तम कॉलेज म्हणून जी काय कल्पना आहे, ती सर्व ठिकाणीं सरकारासुद्धां करतां येईल कीं नाहीं ही शंका आहे; परंतु मनांत आलें तर सरकारजवळ मुबलक पैसा असल्यानें त्यांस तें एकपक्षीं शक्य असलें, तरी खासगी म्हणजे मदतीच्या किंवा बिनमदतीच्या संस्थांस सरकारप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवतां येईल कीं काय याचा विचार केला पाहिजे. सरकारांनीं स्थापन केलेल्या कॉलेजांत सर्व लोकांचा समावेश करतां येणें कित्येक वेळां अशक्य असतें, असें आतांप्रमाणें पुढेंहि खचित होणार. खासगी कॉलेजें सर्व आजच बंद झालीं, तर खुद्द सरकारासच मोठी पंचाईत पडेल. मुंबईच्या दोन मिशनरी कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांची सोय एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें होणार नाहीं. तीच गोष्ट पुण्याच्या डेक्कन कॉलेजची. मि. सेल्बीसाहेबांनींच म्हटलें आहे कीं, डेक्कन कॉलेजमध्यें सोय नसल्यामुळें, कित्येक विद्यार्थ्यांस फर्ग्यूसन कॉलेजची वाट सुधारावी लागत आहे. नुसता एवढाच विचार केला, तरी खासगी कॉलेजें असतील तशीं राहूं देणें उचित होईल. सामान्य चढाओढीचें तत्त्व, त्यांची स्थिति नीट राखण्यास पुरें होईल. अभिमानानें कोणी कांहींहि म्हणो, जोंपर्यंत परीक्षांचे निकाल व पुढील जगांतील आयुष्यक्रम यांत सरकारी कॉलेजांतून बाहेर पडलेले पदवीधर व खासगी कॉलेजांतून पसार झालेले पदवीधर यांत कांहीं अंतर दिसत नाहीं, तोंपर्यंत खासगी कॉलेजें चालविणारांवर आग पाखडणें अत्यंत अनुदारपणाचें

होईल. पुण्यांतील एंजिनिअरिंग कॉलेजावर जो प्रसंग आला आहे, तोच प्रसंग आर्ट्स कॉलेजावर पूर्वींच आला नाहीं, यास कारण खासगी कॉलेजें. इतकेच विद्यार्थी दरसाल आम्ही घेऊं असें सरकारास म्हणावें लागलें असतें. अशा दृष्टीनें स्वतःचें नुकसान सोसून खासगी कॉलेजें चालविणारे लोक, सरकारचे उपकारकर्ते जरी म्हटलें नाहीं, तरी साहाय्यकर्ते म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. ह्या दृष्टीनें त्यांच्याविषयीं विचार करण्याचें सोडून देऊन युनिव्हर्सिटी कमिशननें त्यांचा विचार करतांना अनुदार दृष्टि प्रदर्शित केली आहे, हें आम्हांस त्यांच्या सर्व सूचनांतील व विवेचनपद्धतींतील पहिलें व्यंग दिसून येत आहे. आमची तर खात्री आहे कीं, हिंदुस्थानांतील कांहीं खासगी कॉलेजें सरकार जो नमुना आपल्या कॉलेजांत दाखवितील, तो हुबेहूब आपल्या ठिकाणीं वठवितील. हल्लीं जशीं सरकारी तशींच खासगी कॉलेजें आहेत. एखाद्या विषयाची इकडे सोय अधिक असली तर दुसऱ्या विषयाची तिकडे अधिक असते, इतकेंच. मिळून सर्वोत्तमत्व सांपडणें कठीण. पुढें दोन्हीकडे काय होईल त्याविषयीं आज बोलणें ठीक नाहीं.

दुसरें सामान्य व्यंग जें कमिशनच्या सर्व सूचनांस व विवेचनपद्धतीस सूत्रमणिगणन्यायानें दृष्टोत्पत्तीस येतें तें ‘ कॉन्सर्वेटिजम ’ होय. हा इंग्रजी राजकीय परिभाषेंतील शब्द आम्हांस उपयोजिणें भाग पडत आहे. लिबरल पक्षाचीं तत्त्वें व कॉन्सर्वेटिव पक्षाचीं तत्त्वें ज्यांना माहीत आहेत त्यांच्या लक्षांत आम्ही काय म्हणतों तें एकदम येईल. राजपक्षीय व प्रजापक्षीय, हे शब्द कित्येक वेळां कॉन्सर्वेटिव व लिबरल या जोडीच्या भाषांतरास उपयोगी पडतात, परंतु त्यांत मुळाचा सर्व तर नाहींच पण बहुंशहि येत नाहीं. संरक्षक व संशोधक यांनीं केव्हां केव्हां मुळाचा अर्थ अधिक व्यक्त होतो. पूर्वापर परंपरा चालत आली आहे त्यांत अणुमात्र फरक करावयाचा नाहीं; होतां होईलतों आहे तें राखण्याची खटपट करावयाची व प्रतिपक्ष प्रबल झाला म्हणजे निरुपाय म्हणून हार खाऊन मग कांहीं पुढें पाऊल टाकावयाचें, हें कॉन्सर्वेटिव किंवा संरक्षक पक्षाचें तत्त्व होय. समाजांतील श्रीमान् व वरिष्ठ दर्जाच्या लोकांस आपल्या पिढीजाद वतनाचा व कुलाचा अभिमान असतो व सर्व सत्ता अशांच्याच हातीं असावी असा त्यांचा अभिप्राय असतो. लोक म्हणजे बहुजनसमाज जसजसा विद्यासंपन्न व विचारशील होत जाईल तसतसा त्यांना राज्यसत्तेंत हात घालूं देण्यास हरकत नाहीं, किंबहुना तसेंच करणें योग्य आहे असें या श्रीमान् व कुलाभिमानी लोकांस वाटत नसतें. ही भावना ज्यांची, त्यांस कॉन्सर्वेटिव असें म्हणावयाचें. या मताची तीव्रता कित्येक लोकांत कमी असते. त्या मानानें उदार किंवा संशोधक पक्षाच्या

जवळजवळ ह्यांपैकीं कांहीं लोक येतात. त्याचप्रमाणें संशोधक पक्षाचें जें तत्त्व कीं सुशिक्षण व सुविचाराच्या प्रसारास अनुसरून राज्यसत्ता जितकी अधिक लोकांच्या हातीं असेल तितकें चांगलें, त्याविषयीं कमी तीव्रतेच्या लोकांचा ओढा संरक्षक पक्षांतील लोकांशीं जुळून वागण्याकडे असतो. अशा प्रकारें दोन्ही पक्षांची तडजोड हेंच राज्य सुयंत्रित चालण्याचें बीज. कधीं या पक्षाचें राज्य, कधीं त्या पक्षाचें राज्य असा क्रम चालावयाचा. लोकांवर सरकारी अंमलाचें ओझें कमी असावें. त्यांच्यांत परस्पर चढाओढीच्या तत्त्वानें सर्व कांहीं व्यवहार चालावे. ज्यांत त्यांत सरकारचा हात असण्याचें कारण नाहीं व नसणें हेंच राष्ट्राच्या अभिवृद्धीचें साधन आहे, असें मत धारण करणारी प्रस्तुत युनिव्हर्सिटी कमिशनची मंडळी दिसत नाहीं. फार कशाला ? त्यांनीं इतिहासाला दिलेलें गौण स्थळ व फ्रेंच भाषेवर ठेवलेला बहिष्कार या गोष्टीवरूनच हें स्पष्ट होत आहे. हें एक सामान्य धोरण पुढें ठेवून त्यांच्या सर्व विवेचनांचा व सूचनांचा विचार केला म्हणजे सर्व कोडें उकलणार आहे.

उच्च विद्येचा प्रसार फार लोकांत होऊं नये हें एक तत्त्व. आतां जगांत सुविचार इतका वाढला आहे व विद्या ही चांगली वस्तु आहे हें सिद्ध झालें आहे. तेव्हां विद्येचा प्रसार फार लोकांत होऊं नये असें विधान करणाराची छी थू होईल. तेव्हां हें मत प्रतिपादन करणारे लोक त्यांस हें नग्न स्वरूप देत नाहींत. कारण तें फारच निंदास्पद व तिरस्कारजनक दिसतें. तेव्हां त्यावर सुरेख दिसेल असें पांघरूण घालून त्यास निराळें स्वरूप देण्यांत येतें. तें स्वरूप हें कीं गरीब लोकांनीं उदात्त शिक्षण मिळविण्याच्या भरीस पडणें म्हणजे त्या शिक्षणाची योग्यता कमी करणें आहे व आपलें नुकसान करून घेण्याजोगें आहे. उत्तम प्रकारचें शिक्षण मिळविण्याची ऐपत नाहीं म्हणून नांवाचें उदात्त शिक्षण देणारीं कॉलेजें असतात, त्यांत जाऊन गरीब लोकांस स्वहितविघातक मार्गाचें अवलंबन करूं देणें हें लोकहितचिंतक सरकारास अनुचित आहे. तेव्हां तशा शिक्षणाच्या सोयी अलबत कमी केल्या पाहिजेत. जिकडे पाहिजे तिकडे कॉलेज ! अरे हा काय प्रकार आहे ? असा कॉलेजांचा सुळसुळाट होतो व लोक वेडे आपले तेथें जाऊन शिकतात. उच्च विद्या इतकी सवंग करणें म्हणजे ती उच्च कसली ? अशा तऱ्हेचें पांघरूण घातलें म्हणजे सामान्य विचारांचीं माणसें झुकविलीं जातात. परंतु ब्रिटिश सरकाराच्या कृपेनें अगोदरच शिक्षणप्रसाराचें काम बरेंच झाल्याकारणानें व त्यांच्या अंमलापूर्वींहि आर्य बुद्धीस कांहीं सारासार विचार करण्याची संवय असल्यानें असलीं गुळपापडीचीं भाषणें हिंदुस्थानांत खपावयाचीं

नाहींत. सत्ताधीश या नात्यानें सर्व शिक्षण खात्यास वाटेल तें स्वरूप देण्याचा अधिकार सरकारास आहे. वाटेल तीं कॉलेजें मंजूर, वाटेल तीं नामंजूर करणें शक्य होईल, असे कोनाडे ज्यांत ठेवले आहेत अशा तऱ्हेचे वरपांगी कितीहि सुंदर दिसणारे नियम केले तरी लोक फसणार नाहींत. हिंदुस्थानांत सद्य:स्थितींत हेंच हितकर आहे असा सद्धेतु मनांत आणूनच असल्या सूचना व नियम अमलांत येतात. यांत बुद्धिपुर:सर वंचकतेचा भाग बिलकुल नाहीं हें प्रांजलपणें आम्ही कबूल करतों. परंतु सद्य:स्थितींत आम्हांस काय हितकर आहे याची आम्हां लोकांची कल्पना भिन्न आहे. त्यामुळें सरकार व सरकारतर्फे नेमलेल्या कमिशनविरुद्ध बोलणें व लिहिणें आम्हांस भाग पडतें. पुढील प्रश्नांसंबंधानें आमची समजूत कमिशनच्या मंडळीनें घातली तर आम्ही त्यांचीं वचनें शिरसावंद्य करूं.

१. जगांतील दुसरीं सुधारलेलीं सरकारें उच्च किंवा इतर शिक्षणाच्या बाबतींत जितका खर्च करतात तितका किंवा त्या प्रमाणानें अवश्य तितका हिंदुस्थान सरकार करतें काय ?

२. इंग्लंड व इतर राष्ट्रांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें असून त्या शिक्षणक्रमांत व पुढील दुय्यम शिक्षणांत मुलांची मति प्रगल्भ व्हावी अशी योजना आहे व त्यामुळें उच्च शिक्षणास येणारे विद्यार्थी बहुश्रुत, पक्वबुद्धिक असे येतात, तसें इकडील कॉलेजास मिळण्यासाठीं प्राथमिक व दुय्यम शिक्षणक्रमांत सुधारणा व अधिक खर्च करावयास नको काय ?

३. आपल्या आईबापाजवळ किंवा पालकाजवळ राहण्याची सोय नाहीं अशा मुलांस लहानपणापासून विद्यार्थिगृहांत राहण्याची सोय इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांत होण्यास नको काय ?

४. हिंदुस्थानांतीलच कॉलेजांत शिकणारे विद्यार्थी कच्चे व घोकंपट्टी करणारे असें म्हणण्यास पुरावा काय ? ही रड सर्व देशांत नाहीं काय ?

५. कांहीं बाबतींत घोकंपट्टी अधिक असली तर त्याचें कारण इतर कोणत्याहि देशांत नसलेली नड म्हणजे परकीय भाषेच्या द्वारें शिक्षण हें नव्हे असें प्रमाणसिद्ध दाखविणें शक्य आहे काय ?

६. सर्व लोकांची त्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणें सोय करणें सरकारच्या हातून झालें नाहीं तर, खासगी कॉलेजें काढूं नये तर काय करावें ?

७. गरीबांनीं शिकूं नये हा सिद्धान्त गृहीत धरला तर तो एकट्या

हिंदुस्थानासच कां लागूं करावा ? गरीबांची सोय करणारे कार्नीजी व रोड्स वेडे कीं काय ?

८. कमिशन म्हणतें कीं श्रीमान् लोकांनीं कार्नीजी व रोड्सप्रमाणें पुढें यावें ? ठीक. तसे हिंदुस्थानांत त्याच प्रमाणानें लोक पुढें आले नाहींत असें म्हणतां येईल काय ? मुंबईच्या ' मर्चेंट प्रिन्सिस ' चें औदार्य काय कमी आहे ? शिक्षणाच्या कामीं त्यांनीं सरकारास मदत केली नाहीं असें प्रतिपादितां येईल काय ?

९. सर कावसजी जहांगीर, सर जमशेटजी जिजीभाई, सर दिनशा माणकजी पेटिट, नाना शंकरशेट, सर मंगलदास नथूभाई, मि. टाटा वगैरे मंडळी-प्रमाणेंच हिंदुस्थानच्या व्यापारावर श्रीमंत झालेले इंग्रज, ज्यू, ग्रीक वगैरे व्यापारी लोक पैसा गोळा करून परदेशीं जातात, त्यांपैकीं म्हणजे हिंदुस्थानावर रोड्स, कार्नीजी बनलेल्या लोकांनीं येथील लोकांच्या शिक्षणास विशेष साहाय्य केलें आहे काय ? संस्थानिक व जमीनदार यांस हल्लीं नाहीं नाहीं ते खर्च उपस्थित झाल्यानें त्यांच्यांत ह्या कामीं खर्च करण्यास त्राण किती आहे व लोकांची एकंदर सांपत्तिक स्थिति कशी आहे, याचा विचार करतां हिंदुस्थानांत सरकारावरच हा बोजा तूर्त आहे कीं नाहीं ? पुढें मागें उपयुक्त व उत्पादक शिक्षण मिळून लोक गब्बर झाल्यावर ही जबाबदारी कमी होईल; पण तूर्त ती विशेष कोणावर आहे ?

१०. अशा स्थितींत आपलें बुद्धिसामर्थ्य अत्यल्प वेतन घेऊन स्वदेशसेवेस अर्पण करणाऱ्या लोकांनीं चालविलेलीं कॉलेजें हें त्यांच्या औदार्याचें चिन्ह नाहीं काय ? अशा लोकांस द्रव्यानुकूल्य जें थोडें आहे तें श्रीमंत किंवा मध्यम स्थितीच्या लोकांच्या औदार्याशिवाय आलें आहे काय ? ही गोष्ट लक्षांत घेऊन स्कॉलरशिपा लोकांनीं द्याव्या, विद्यार्थिगृहें बांधण्यासाठीं लोकांनीं उदारपणानें पैसे द्यावे, अशा सूचना कमिशननें करून त्या वाचणारांच्या मनांत आमच्या लोकांविषयीं विपरीत भाव म्हणजे हे लोक केवळ सरकारावर अवलंबून राहाणारे कवडीचुंबक आहेत असा उत्पन्न करणें योग्य आहे काय ?

असे अनेक प्रश्न विचारण्याजोगे आहेत. शिक्षणाच्या कामांत जन्माचे जन्म घालविलेले व सर्व दर्जाच्या विद्यार्थ्यांची स्थिति ज्यांना माहीत आहे असे लोक उच्च शिक्षण महाग करावें असें कधीं म्हणणार नाहींत. होईल तितका त्याचा प्रसार करा, असेंच म्हणतील. शिकलेले लोक रस्तोरस्तीं झाले म्हणजे

काय करावयाचें ? हा प्रश्न निराळा आहे. समाजशास्त्राच्या नियमाप्रमाणें हा प्रश्न सुटेल. तिकडे लोकांचा ओघ कमी होईल किंवा वाढला तर ते आपल्या बुद्धिबलावर आपल्या सुखाचा मार्ग शोधून काढतील. हा विचार युनिव्हर्सिटी कमिशनच्या बाहेरचा आहे म्हणून आम्हींहि त्याचा विचार येथें करीत नाहीं.

कमिशननें बारीकसारीक प्रश्नांवर जो ऊहापोह केला आहे त्याविषयीं कांहीं विशेष लिहून उपयोग नाहीं. न्यायमूर्ति गुरुदास बॅनर्जी यांच्याप्रमाणें बहुतेक लोकांचे विचार असणें साहजिक आहे. मूळ तत्त्वच निराळें झालें आहे, म्हणजे कमिशनचा रोख विश्वविद्यापीठ हें एक सरकारी खातें करण्याकडे दिसतो. असें झालें म्हणजे तीं पीठें एका तऱ्हेचीं संस्थानेंच होतील. डायरेक्टर त्यांचा राजा व सिंडिकेटचे लोक प्रधान व सेनेट म्हणजे महिसूर प्रांतांत दसऱ्यास बोलावितात तसली सभा. ही उपमा कांहीं बारीकसारीक बाबतींत बरोबर नसूं दे, पण एकंदरींत धोरण तेंच. ज्यांच्या हातांत अधिकार त्यांच्यावर नियंत्रण नाहीं. बहुसंख्येपेक्षां अल्पसंख्येवर विश्वास जास्त. त्यांत पुनः एकछत्री अमलाकडेच कल विशेष. अशी सर्व पिछेहाटीची तऱ्हा आहे. तेव्हां एकदां एक कॉलेज धरलें म्हणजे मग विद्यार्थ्यास आपली सोय पाहून किंवा शिक्षणाची योग्यता पाहून वाटेल त्या कॉलेजमध्यें जातां येण्याची मारामार. कोणत्याहि खाजगी कॉलेजाचा प्राण नेहमीं संशय स्थितींत असणार. असा कांहीं धोक्याचा प्रकार आहे. कमिशननें सुचविलेल्या नियमांची स्थितिस्थापकता मोठी आहे. अंमलबजावणी करणारीं माणसें मिळतील तसा चांगला उपयोग होणेंहि शक्य आहे हें आम्हीं आनंदानें कबूल करतों. परंतु या धोरणावर कायदे केले तर निश्चितपणा राहत नाहीं. यासाठीं अंमलबजावणारीं माणसें कशींहि असलीं तरी त्यांस इकडे तिकडे करतां येऊं नये असेच नियम बांधणें चांगलें. एकदरींत मि. ज. गुरुनाथ बॅनर्जींचीं मतें त्यांच्या सहकाऱ्यांस पसंत पडलीं नाहींत. तेंच प्रमाण बाहेरहि. आम्हीं किती लिहिलें तरी तेंच. बारीकसारीक गोष्टींत खुद्द मि. बॅनर्जींशींहि आमचा मतभेद आहे व तसा असणें साहजिक आहे. परंतु एकदरींत —

१. कॉलेजच्या क्रमांत परीक्षा दोनच असाव्यात.

२. मॅट्रिक व यू. एस्. एफ्. अशा दोन परीक्षा नसाव्यात.

३. कॉलेजांतील फीचा निर्बंध नसावा.

४. सेनेटमधून नेमलेली व्यवस्थापक मंडळी जी सिंडिकेट, ती मोठ्या सभेची अंकित असावी.

५. सेनेटचे कांहीं सभासद म्हणजे फेलोज निवडण्याचा अधिकार पदवी-धरांस असावा.

६. कोणत्याहि परीक्षेस वयाची किंवा अमक्या वेळांच बसण्याची अट असूं नये.

७. मॅट्रिक्युलेशनपर्यंतच्या शाळेशीं संबंध विश्वविद्यापीठानें ठेवण्याचें कारण नाहीं.

८. होतां होईल तितकें विश्वविद्यापीठ सरकारपासून स्वतंत्र असावें.

९. कॉलेज आंत घेणें किंवा बाहेर टाकणें सिंडिकेटच्या शिफारशीनें सेनेटमध्यें व्हावें.

१०. होतां होईलतों देशी भाषांचा प्रवेश उच्च शिक्षणक्रमांत करावा व मुख्यत्वेंकरून सर्व शिक्षण तद्वारां होण्याचा प्रयत्न असावा.

अशा ठोकळ सूचना करणेंच सध्यां शक्य आहे. आज युनिव्हर्सिट्यांस पैसा दतील ते मनुष्य हवे आहेत. त्यांस सेनेटमध्यें बेधडक घ्यावें. त्यांना आम्ही दुसरा मान कोणता देणार? ते वादांत यावयास थोडेच बसले आहेत. त्यांच्या-पासून सेनेटला भीतीच नाहीं. असो. आमच्या हल्लींच्या दुष्काळ व प्लेगच्या दरिद्री दिवसांत या प्रश्नाकडे देश वळला नसता. परंतु हिंदुस्थानांत वर्तमानपत्रकर्ते व मासिक पुस्तककर्ते यांस जातीचे विषय नाहींतच. त्यांच्या विचारास मार्गदर्शक सरकार आहे. त्यानें कांहीं तरी पुढें ठेवलें कीं लागले त्या दिशेला. वस्तुतः आज हा प्रश्न अवश्य पुढें येण्यापैकीं नव्हता.

• • •

# २. सरकारी शाळांतून धर्मशिक्षण

[ ग्रंथमाला डिसेंबर १९०० ]

अलीकडे ज्या प्रश्नांकडे लोकांचें चित्त लागून राहिलें आहे, त्यांत हल्लीं शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचें व पुढें शिकण्यास प्रारंभ करणाऱ्या विद्यार्थ्यांचें आयुष्य सुखकर कसें होईल, ह्या प्रश्नाइतका महत्त्वाचा व कायम हिताहिताचा प्रश्न दुसरा नाहीं. इतर सामाजिक, औद्योगिक व राजकीय प्रश्न महत्त्वाचे आहेत; पण लोकशिक्षणापुढें सर्व प्रश्न गौण आहेत. शिक्षणाच्या प्रश्नासहि अनेक अंगें आहेत. त्यांपैकीं धर्मशिक्षणाची आवश्यकता हा प्रश्न हल्लीं जिकडे तिकडे चर्चेस येत आहे. केवळ चर्चेच्या पलीकडे याचें स्वरूप गेलें आहे. खरोखर पाहूं गेलों असतां हा प्रश्न आम्हां हिंदु लोकांशिवाय दुसऱ्यास सांशयिक नाहींच. मुसलमान व ख्रिस्ती लोक धर्मशिक्षणाकडे दुर्लक्ष कधींच करीत नाहींत. त्यांच्या वेगळ्या शाळा जेथें आहेत, तेथें धर्मशिक्षण चालतेंच, केवळ बौद्धिक व तदनुषंगानें होणारें नैतिक शिक्षण इतक्यावरच त्यांची केव्हांहि तृप्ति झाली नाहीं. इंग्रज सरकारांनीं ज्या शाळा स्थापन केल्या आहेत, त्यांमध्यें मात्र धर्माविषयीं पूर्ण ताटस्थ्य आहे. सरकार परकीय असल्यानें धर्माच्या बाबतींत असें करा, तसें करा; असें करूं नका, तसें नका; असा उपदेश किंवा शिक्षण देण्यास प्रारंभ केल्यास प्रजाजनांमध्यें क्षोभ होईल, या विचारानें सरकारनें या कामीं केवळ औदासीन्याचा अंगीकार केला. मिशनरी लोकांनीं घातलेल्या शाळांमध्यें मात्र ख्रिस्ती धर्माचा उपदेश मिळावयाचा. ह्याहून दुसऱ्या ठिकाणीं धर्माचें नांव निघण्याचें कारण नाहीं. तेथें तरी धर्मशिक्षणाची विटंबनाच होते. विद्यार्थिजन फार तो हिंदु, थोडासा पार्शी, त्याहून कमी मुसलमान व ख्रिस्ती असला तर असला एखादा. पण शिक्षकवर्ग प्रायः ख्रिस्ती, शाळेचा किंवा पाठशाळेचा खर्च चालविणारे आश्रयदाते ख्रिस्ती, एवढ्याच कारणानें शाळेच्या कामांत धर्मशिक्षणाचा देखावा करावयाचा. अशानें उपयोग न होतां उलट उपहास मात्र वाढावयाचा. धर्माच्या बाबतींत युक्तिवाद करून चालावयाचें नाहीं. सर्व धर्मास पायाभूत तत्त्वें एकच आहेत. परमेश्वर एकच असून त्याचें सर्वज्ञत्व, सर्व शक्तिमत्त्व, क्षमाशीलत्व, न्यायपरायणत्व इत्यादि गुण सर्वांस सारखे मान्य आहेत. तेव्हां ज्यांच्या त्यांच्या परंपरागत धर्माप्रमाणें धर्मशिक्षण देऊन त्यांस शुद्धशील करण्याचा क्रम कोणीं अवलंबिला

नाहीं. हल्लीं मात्र गेल्या चारपांच वर्षांमध्यें याबद्दल जरा विशेष आस्था उत्पन्न होऊन लोकांत चळवळहि सुरू आहे. म्हणूनच आम्हीं वर म्हटलें आहे कीं, या प्रश्नाचें स्वरूप केवळ चर्चेच्या पलीकडे गेलें आहे. सामान्य लोकांत धर्मांतरावांचून धर्मबुद्धि जागृत करण्यासाठीं थिऑसॉफीचे यत्न सुरू आहेत. त्यांसच फलप्राप्ति होऊन श्रीक्षेत्र काशी येथें हिंदु कॉलेजची स्थापना झाली आहे. तेथें धर्मशिक्षण कसें चालतें याची खात्रीलायक माहिती आम्हांस नाहीं. परंतु आज हजारों लोक मिशन कॉलेजांतून बाहेर पडले, त्यांच्यापेक्षां या पाठशाळेंतील लोकांच्या मनावर अधिक उदात्त संस्कार होण्याचा संभव आहे. तसेंच, मुंबईस आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कुलाचेहि चालक इतर हायस्कुलांपेक्षां आपला विशेष गुण धर्मशिक्षण हा आहे. असें जाहीर करतात. तेथेंहि विश्वव्यापक धर्मतत्त्वाचा उपदेश चालतो. इतर कांहीं खाजगी शाळांनीं प्रच्छन्न किंवा प्रकट रूपानें ह्याच तत्त्वाचा अंगीकार केला आहे. अशा प्रसंगींहि सरकार आपल्या शाळांतून धर्मशिक्षण देण्याचा ठराव करील असें दिसत नाहीं.

ही चर्चा केवळ हिंदुस्थानांतच चालली आहे असें नाहीं. ईस्ट इंडिया असोसिएशन म्हणून विलायतेस एक हिंदुस्थानच्या हिताहिताचा विचार करणारी मंडळी आहे, व तिच्या वतीनें नेहमीं व्याख्यानें होतात, हें ग्रंथमालेच्या वाचकांस माहीत आहेच. तेथेंच पूर्वी पंजाबांत नोकरीस असलेले मि. आर. मॅकॉनकी यांचें 'हिंदुस्थानांत सरकारांनीं दिलेल्या शिक्षणामध्यें धर्मतत्त्वाचा निश्चितपणें निवेश करण्याची आवश्यकता' या विषयावर गेल्या जूनअखेर व्याख्यान झालें. तें व्याख्यान व त्यावरील ऊहापोह गेल्या ऑक्टोबर महिन्याच्या 'एशिऑटिक कार्टर्ली' नामक त्रैमासिकांत आला आहे. साहेबमजकुरांचें म्हणणें असें आहे कीं, ख्रिस्ती धर्मांचा प्रसार करण्यास इंग्रज सरकारनें मदत केली असा आक्षेप येऊं नये म्हणून धर्माच्या बाबतींत आम्ही हात घालणार नाहीं, अमक्याच प्रकारचें धर्मशिक्षण तुम्हांस असावें असा आम्ही आग्रह करणार नाहीं, असा स्पष्ट जाहीरनामा प्रसिद्ध केला. याचा अर्थ सरकारच्या अम्मलदारांनीं भलताच करून हिंदुस्थानच्या शिक्षित वर्गास धर्महीन करून टाकलें आहे. हा मि. मॅकॉनकीसाहेबांचा सरकारावर मोठा आरोप आहे. इंग्रज सरकार हल्लीं हिंदुस्थानच्या प्रजेस पितृस्थानीं आहे, तरी तिचें सर्वथैव कल्याण करणें सरकारवर आहे. धर्माशिवाय नीति नाहीं, खरें नीतिशिक्षण द्यावयाचें म्हणजे त्याची धर्मशिक्षणाशीं सांगड घातली पाहिजे. सरकारी शाळांतून व पाठशाळांतून ईश्वराच्या सर्व शक्तिमत्त्वाबद्दल व त्याच्या न्यायीपणाबद्दल सर्व धर्मांस साधारण अशा रीतीनें उपदेश चालू ठेवण्यास कोणत्याहि प्रकारची आडकाठी येणार नाहीं, असा क्रम राजकुमार कॉलेजांतील माजी प्रिन्सिपल मि.

मॅक्नाक्टन यांनीं सुरू ठेवला होता, ता सर्वांस पसंत आहे असें व्याख्यात्याचें म्हणणें होतें. त्यांचीं 'ईश्वराचें अस्तित्व', 'श्रद्धा', 'प्रार्थना', 'कर्तव्य', 'शुद्धि', 'गृहसुख', 'द्रव्य', 'उपभोग', :'विवेक' इत्यादि विषयांवरील व्याख्यानें फार चांगलीं आहेत. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं तें काय म्हणतात तें पाहा. "ईश्वर आहे असा आपणां सर्वांचा विश्वास आहे. आपणांस त्या गोष्टीची शंकाच नाहीं. त्याला आपण परमेश्वर म्हणूं, किंग गॉड म्हणूं. परंतु सर्व शक्तिमान् असा सर्व वस्तूंचा एक पवित्र निर्माता आहे असा आपला विश्वास आहे. तो स्वर्ग आणि पृथ्वी यांचा राजा आहे इतकेंच नव्हे तर आमचा व ज्या सर्वांस त्यानें निर्माण केलें, त्या सर्वांचा तो पिता व प्रेम ठेवणारा संरक्षक आहे. जें जें म्हणून चांगलें व शुद्ध आहे, जें जें म्हणून सत्य व पवित्र आहे, तें तें सर्व त्याच्यापासून उद्भवतें; कारण तोच एकटा परिपूर्ण आहे. आम्हांमध्यें जेवढें चांगलें असेल तेवढ्याचें तो पोषण करतो व चाहतो आणि जेवढें वाईट असेल तेवढ्याचा तिटकार करतो व त्याची वाढ होऊं देत नाहीं."

प्रार्थनेविषयीं मि. मॅक्नाक्टन आपल्या शिष्यवर्गास काय सांगतात तें श्रवण करा. "आज मी तुम्हांस प्रार्थनेविषयीं दोन शब्द सांगणार आहें. अर्थात् प्रार्थना ही आमच्या श्रद्धेच्या, परमेश्वरावर असलेल्या श्रद्धेच्या मागून येणारच. प्रार्थना म्हणजे काय? दुसरें कांहीं नाहीं. परमेश्वराबरोबर बोलणें. त्याच्याशीं संभाषण करणें, आणि जर आमचा परमेश्वरावर खरोखर विश्वास असेल तर त्याचा उपदेश घेणें, त्याच्या करप्रसादावर अवलंबून राहणें, आणि त्याचया संमतिव्यंजक स्मिताची अपेक्षा करणें, ह्या गोष्टींची आम्हांस मोठी किंमत वाटल्यावांचून राहणार नाहीं. अशा प्रकारचा सहवास आपणांस असणें म्हणजे या भूतलावरच स्वर्गसुख अनुभवणें होय अशी आपली खात्री होईल."

असो. अशा प्रकारचें सामान्य धर्मशिक्षण सरकारी शाळांतून देण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं, असा सिद्धान्त मि. मॅकॉनकीसाहेबांनीं ठरविला आहे. त्यांच्या व्याख्यानांचा त्रोटक सारांश आम्हीं दिला आहे. त्यांनीं कांहीं विधानें अमळ चुकीचीं केलेलीं आहेत; पण त्या योगानें विषयनिरूपणास गौणता येत नाहीं, म्हणून आम्हीं त्यांचा उल्लेखहि केला नाहीं, मग विमति दर्शविणें दूरच. त्यांच्या व्याख्यानावर थोडीबहुत चर्चा झाली; परंतु तींत आहे तें ठीक आहे. नवीन मार्ग मोठा अडचणीचा आहे वगैरे शुष्क आक्षेप होते. व्याख्यात्याचें मत खोडून टाकणें अशक्य आहे. अद्यापि युरोपखंडाची संसारप्रवणदृष्टि कायम आहे. अध्यात्मविद्येचा फैलाव व्हावयाचा आहे. इतकेंच आमचें म्हणणें आहे.

• • •

# ३. भारतीय विश्वविद्यालय

[ ' विश्ववृत्त ' वर्ष १ लें, अंक १ ला ]

यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् ।
यद्यदात्मवशं तु स्यात् तत्तत्सेवेत यत्नतः ।।
सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ।।

—मनु

सामान्यतः विचार करतां ज्या गोष्टींचें महत्त्व आमच्या हृद्यावर चांगल्या रीतीनें बिंबलें असतेंच असें आपणांस वाटतें, त्या गोष्टीसुद्धां आमच्या हातून पार पडत नाहींत. कितीहि महत्त्वाची गोष्ट असो, अगदीं अंगावर येऊन पडल्याशिवाय तिकडे लक्ष पुरवावयाचें नाहीं अशी मानवी स्वभावाची प्रवृत्ति आहे. तात्त्विक वादविवादामध्यें त्या गोष्टींचें महत्त्व कबूल न करण्याइतका मतिमंद कोणी नसला तरी ती गोष्ट आचरणांत यावी म्हणून मेहनत करणारा कार्यकर्ता पुरुष विरळा. यामुळें अनेक चांगले विचार बोलण्यांत आले तरी राष्ट्रास त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. ज्या राष्ट्राचा उत्कर्ष होत आहे त्या राष्ट्रांत बोलघेवडेपणा कमी आणि कर्तृत्व पुष्कळ असतें. ज्या राष्ट्राचा अपकर्ष होत असतो त्या राष्ट्रांत विचार व बोल यांचा सुकाळ व कृतीचा दुष्काळ असतो. आपल्या राष्ट्राविषयीं बोलतांना ही स्थिति पदोपदीं अनुभवास येते असा आतां सर्व शिक्षित लोकांचा तरी पूर्ण ग्रह होऊन चुकला आहे. यामुळें परावलंबी राष्ट्रभक्त व स्वावलंबी राष्ट्रभक्त या दोहोंच्या मनांत आपण प्रचंड प्रयत्न केले पाहिजेत असें येऊं लागलें आहे, इतकेंच नव्हे तर ते त्या उद्योगास लागलेहि आहेत.

स्वावलंबी राष्ट्रहितसाधकांच्या पक्षाचे विचार आम्हांस अधिक मान्य असल्यानें व त्या तत्त्वास अनुसरून जे यत्न असतील त्याकडे आमचा विशेष ओढा असल्यानें, नेहमींच्या व्यवसायास अनुरूप अशा त्या मार्गांतील एका गोष्टीचा रात्रंदिवस मनास चटका लागून राहिला आहे. ती गोष्ट म्हणजे अर्थात् '**राष्ट्रीय शिक्षण**' ही होय. राष्ट्रीय शिक्षणास अगदीं पायाप्रमाणें उपयोगी पडणारी संस्था म्हणजे विश्वविद्यालय. राष्ट्रांत पुढारी उत्पन्न होऊन त्यांच्या बुद्धीप्रमाणें सामान्य जनांचें आचरण होत असतें; तेव्हां तशा पुढाऱ्यांच्या मनास वळण लावणारें शिक्षण ज्या ठिकाणीं मिळेल अशी योजना त्या ज्या

राष्ट्रानें आपल्या हितसंबंधाच्या सर्व गोष्टींचा विचार करून केली पाहिजे. पृथ्वी-वरील सर्व राष्ट्रांत, अर्थात् सुधारलेल्या राष्ट्रांत अशी योजना राष्ट्रीय असते; परंतु पराराज्यांकित अशा या देशांत ती शिक्षणयोजना परराष्ट्रीय आहे यांत नवल कसचें ? जोंवर खुद्द राष्ट्रच मोहीत झालें असतें तोंवर परराष्ट्रीय कोणतें व राष्ट्रीय कोणतें हें कळण्यास मार्ग नसतो. परंतु मोहपटल नाहींसें होऊन जाण्याचा सुमार आज आला आहे अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. मुसलमान बंधूंस स्वधर्माभिमान आमच्या लोकांहून अधिक आहे आणि त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक अद्यापि आपआपल्या पुरता निराळा विचार करणारे नाहींत. अर्थात् आपल्या-मधील पुढाऱ्यांनीं सुचविल्या मार्गानें जाण्यास ते सिद्ध आहेत. आमच्या समाजांत जो तो स्वतंत्र विचार करणारा, ज्याला त्याला माझें मत असें आहे असें म्हणण्याची हौस आहे. मुसलमान मंडळींत अग्रणी व अनुयायी यांच्यामध्यें परस्पराविषयीं आदर विशेष आहे. नायकांची संख्या थोडी आहे व ते मोठ्या दर्जाचे व त्यांचे विचार व वर्तन सदासर्वदा लोकांच्यापुढें असल्यानें त्यांच्यांत कोणत्याहि कार्याची सिद्धता त्वकर होते. या गोष्टीचा विचार करतां अलिगड कॉलेजची स्थापना झाली व त्यासच महॉमेडन युनिव्हर्सिटीचें स्वरूप देण्याचा विचार झाला आहे, यांत नवल वाटण्याजोगें कांहीं नाहीं. मुसलमान बंधूंच्या संस्थेंत कोणी हिंदु विद्यार्थी शिकावयास गेला तर त्याचा प्रवेश होतो, तसें हिंदु विश्व-विद्यालय झाल्यास त्यांत येण्याचा मार्ग मुसलमानांस खुला राहीलच. धर्मसंबंधाशिवाय इतर सर्व गोष्टींना दोघांचा एकोपा होणें हेंच योग्य आहे व हल्लींच्या विस्तृत देशाभिमानाच्या कल्पनेचें धोरण लक्षांत वागवून चालल्यानें तसा एकोपा होणें शक्य आहे. हिंदुमुसलमानांचीं दोन पृथक् विश्वविद्यालयें भावंडेंच होतील, किंवा एकाच विश्वविद्यालयाच्या दोन शाखा झाल्याप्रमाणेंच दिसतील यांत आम्हांला तिळमात्र शंका नाहीं.

राष्ट्रांत शिक्षण कसें चाललें आहे याची वरवर पाहणी करणारासहि आमच्या देशांतील शिक्षणसंस्थांमध्यें दिसून येणारीं व्यंगें आढळणार आहेत. प्रेक्षकाच्या मनावर पहिला ग्रह असा होईल कीं, येथें सर्व विलक्षण चाललें आहे. इतर राष्ट्रांत चाललेल्या प्रकाराहून सर्व गोष्टी भिन्न आहेत असें ध्यानांत येईल. पहिल्यांदां उदात्त शिक्षणाच्या संस्थांचा विशेषत: सरकारनें प्रजेचे लाखों रुपये खर्चून स्थापलेल्या पाठशाळांचाच विचार करूं. अवलोकनशक्ति विशेष मार्मिक नसलेला असा जरी परदेशचा प्रेक्षक मुंबईच्या किंवा कलकत्त्याच्या प्रमुख कॉलेजकडे वळला तर त्यास कॉलेजच्या नांवापासून अराष्ट्रीयत्त्वाची खूण पटेल. मद्रास व

कलकत्त्याच्या प्रमुख सरकारी कॉलेजला निर्गुण उपासकास साजेल असें नांव आहे, पण देशभाषेंतील शब्दांचा त्यांत गंधहि नाहीं. प्रेसिडेन्सी कॉलेज म्हणजे 'इलाख्याची पाठशाळा' असें नीरस नांव तिकडे आहे. आमच्याकडे मुंबइचें 'एल्फिन्स्टन कॉलेज' हें सगुणदेवपूजाव्यञ्जक नांव आहे; पण त्यांतील देवता राष्ट्रीय नाहीं. महापुरुषाची कीर्ति अजरामर करण्यासाठीं संस्थांना नांवें देण्याची चाल चोहोंकडे आहे; परंतु त्यांतसुद्धां राष्ट्रीयत्व नाहीं. पुण्याच्या कॉलेजचें नांव कलकत्ता मद्रासेकडील निर्गुण नांवाच्या प्रकारांत अनुसरून असल्याचें 'डेक्कन कॉलेज' या नांवावरून दिसून येईल. अराष्ट्रीय सगुणोपासनेची प्रचीति 'फर्ग्यूसन कॉलेज' या नांवानें येईल. प्रेक्षकांच्या मनावर नांवावरून उत्पन्न झालेला पहिला ग्रह आंत शिरून चोहोंकडे पाहिल्यानें दृढच होत जातो. जिकडे तिकडे पाहावें तें सर्व अराष्ट्रीय. विद्यार्थ्यांची शिकावयाची भाषा व ज्ञान मिळविण्याची भाषा परकीयच आढळून येईल. शिकविणारे शिक्षक विदेशी, वाचावयाचीं पुस्तकें विदेशीं ग्रंथकारांनीं केलेलीं व दूर ठिकाणीं विदेशींच छापलेलीं व बांधलेलीं. अशा विदेशी थाटाचें शिक्षण जेथें सुरू आहे, तेथें राष्ट्रांतील कच्चा माल म्हणजे विद्यार्थ्यांचीं मनें तेवढीं तेथें असणार. त्या कच्च्या मालावर परदेशी पुटांवर पुटें पडल्यानें त्यांत स्वदेशीपणा कांहींच उरत नाहीं हें परक्या प्रेक्षकास दिसून आल्याशिवाय राहात नाहीं. विद्यार्थ्यांचें खासगी भाषण धेडगुजरी भाषेंत चाललेलें असावयाचें व संभाषणाचे विषय गोऱ्या गुरूंची चेष्टा किंवा स्तव. त्यांचा ममताळूपणा, कष्टाळूपणा, टापटीप, विद्वत्ता, निःस्पृहता, शरीरसामर्थ्य इत्यादि गोष्टींचें वर्णन करण्यांत दंग झालेले विद्यार्थी कितीतरी असतात. उलटपक्षीं त्यांचा बेडौलपणा, मठ्ठ बुद्धि, बेफिकिरी, शिष्यांच्या चालीरीति माहीत नसल्यानें त्यांच्या ठिकाणीं आलेला चिडखोरपणा व आपण जेत्यांपैकीं आहों व विद्यार्थी जितांपैकीं आहेत तेव्हां त्यांनीं आम्हांपुढें वांकून सलाम केला पाहिजे, अशा भावनेनें त्याचें शिष्यांशीं होणारें वर्तन हेंहि कितीएक वेळां चर्चेचे विषय असावयाचे. कवनें, थट्टेची चुटक्यांची रचना वगैरे कोणीं विद्यार्थ्यांनीं केली तरी तीहि इंग्रजी भाषेंत. असा प्रकार चोहोंकडे पाहून एखाद्या प्रेक्षकास या ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या मनांत आपलेपणा उत्पन्न होण्याजोगें कांहीं आहे असें बिलकूल आढळणार नाहीं. इतक्यांतूनहि थोडीशी आनंदाची गोष्ट वाटते ती ही कीं खुद्द इंग्रजी वाङ्मयांत व इंग्रजी इतिहासांत जो राजकीय जोरदारपणा आहे त्याचा कित्येक मंडळींच्या मनावर परिणाम चांगला होतो. शिवाय आपल्या देशांतील प्राचीन कालापासून चालत आलेल्या पवित्र भाषेंतील ग्रंथ व

विचार याविषयीं पाश्चात्य लेखकांनीं काढलेले उदार व आदर परिपूर्ण उद्गार यांचा परिचय झाल्यानें जो ठसा उमटतो त्याच्या योगानें कांहीं स्वराष्ट्राच्या कल्पना व इतर राष्ट्रांशीं त्याची तुलना करण्याची बुद्धि त्यांना होते. इंग्रजी भाषा हें वाघिणीचें दूध इंग्रजांनीं हिंदी विद्यार्थ्यांस पाजलें त्याचा परिणाम राज्यकर्त्यांच्या राष्ट्रांतील लोकांप्रमाणेंच हिंदु लोकांच्या मनांतहि स्वातंत्र्यविचार जागृत व्हावे असा झाला. परंतु अवल अमदानींत इंग्रजी शिकलेल्या लोकांस मोठमोठ्या नोकऱ्या मिळाल्यानें सरकार व त्यांची व्यवस्था यांपासून आपलें कल्याणच होणार अशीच बुद्धि जास्त जोरावर होती. या स्वार्थास कांहीं धूर्त व दूरदर्शी इंग्रजांच्या उदार वर्तनाची जोड मिळून त्यांच्या समाजरचनेविषयीं, चालिरीतिविषयीं, खासगी व सार्वजनिक वर्तनाविषयीं आदर उत्पन्न झाल्यानें त्यांच्या राजनीतीच्या धोरणाचा व शिक्षणपद्धतीचा दूरवर परिणाम लक्षांत आला नाहीं. परंतु पुढें पुढें मिशनरी लोकांचा कावा व त्यास सरकारचें अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष उत्तेजन व इंग्रजी राज्याच्या भक्कमपणाची खात्री झाल्यानंतर होऊं लागणारें गोऱ्या लोकांचें उद्दाम वर्तन व इतिहासज्ञानाचें व सरकारी कागद-पत्रांच्या वाचनानें कळून येणारीं कृष्णकारस्थानें लोकांच्या नजरेस स्पष्टपणें आल्यावर इंग्रजी वाङ्मयांतील व इतिहासांतील दृढ राजकीय प्रमेयांचा जोर हिंदी विद्यार्थ्यांपैकीं कांहींवर स्पष्ट होऊं लागला व आपण स्वतंत्र होण्याजोगें एक राष्ट्र आहों अशा कल्पना उत्पन्न होऊं लागल्या.

इंग्रजांच्या सहवासानें व राज्यानें आपलें फार नुकसान झालें व इतर राष्ट्रें आपल्या फार पुढें गेलीं असें आढळून आलें. या सर्वांचें मूळ कारण आपल्या राष्ट्रांतील सर्व लोकांचीं मनेंच जशीं व्हावींत तशीं तयार होत नाहींत व तीं तशीं तयार होण्यास राष्ट्रीय शिक्षण नीट वळणावर नेलें पाहिजे, अर्थात् तें राष्ट्रांतील लोकांच्याच हातीं आलें पाहिजे असे विचार मनांत येऊं लागले. तशा प्रकारच्या प्रयत्नास सुरुवात आमच्या इकडे एकवार १८८० त कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं केली. परंतु दुर्दैवेंकरून त्यांचा अंत पुढें दोन वर्षांत झाल्यानें ती घडी बिघडून त्यांच्या संस्थेस सरकारीच वळण लागलें. सरकारी मदत म्हणजेच स्वातंत्र्याचा अपहार. असा प्रकार झाल्यानें तशा प्रकारची मदत न घेतां केवळ लोकांच्या मदतीनें शिक्षण देण्याची योजना झाली पाहिजे व ती आपल्याच युनिव्हर्सिट्या असल्याशिवाय होणार नाहीं असें चोहोंकडे लोकांस वाटूं लागलें होतें. त्यांतूनच एका प्रयत्नाचा उगम तीन वर्षांपूर्वीं झाला. अलाहाबादचे प्रसिद्ध वकील व राष्ट्रभक्त पंडित मदनमोहन मालवीय यांच्या मनांत राष्ट्रीय विश्वविद्यापीठ

स्थापण्याची कल्पना येऊन त्याप्रमाणें ते उद्योगास लागले व दोन तीन वर्षें राष्ट्र-सभेस येणाऱ्या प्रमुख मंडळींपुढें हा विषय काढून गेल्या सालीं त्यांनीं या कार्यास कांहीं व्यवस्थित रूप दिलें. प्रसिद्धिपत्रक काढून कॉंग्रेसच्या पूर्वी एक महिना देशांतील प्रमुख लोकांचे अभिप्राय मागविले व डिसेंबर महिन्याच्या ३१ तारखेस बनारस मुक्कामीं त्यांची एक सभा जमवून या कार्यास गंभीरपणें प्रारंभ करण्याचें ठरलें.

पंडितजींनीं जे विचार मोठ्या व्यवस्थितपणानें आपल्या प्रसिद्धि पुस्तकांत नमूद केले आहेत त्यांविषयीं आज वीस पंचवीस वर्षें शिक्षित मंडळींत चर्चा सुरू आहे. सर्व प्रकारचें शिक्षण परकीय भाषेच्या द्वारां दिलें जातें यामुळें खरें शिक्षण मिळण्यास प्रारंभ होण्यापूर्वीं मानसिक शक्ति व उत्साह यांचा बराच भाग ती भाषा शिकण्यांत खर्च होतो. त्या परक्या भाषेंतूनच अध्ययन-अध्यापन झाल्यानें महत्त्वाच्या विषयांवर देशी भाषांत ग्रंथ निर्माण होत नाहींत. शिवाय सर्व राष्ट्रास हळूहळू परकीय भाषेचेंच महत्त्व व योग्यता वाटून आपल्या भाषेचें महत्त्व व योग्यता यांची कल्पनाच येण्यास मार्ग राहात नाहीं. कित्येक लोकांच्या मतें स्वभाषा रानटी आहेत व त्या नष्ट होण्याच्याच योग्यतेच्या आहेत असेंहि सिद्ध होतें. अशा रीतीनें सर्वथा परकीय भाषा व विचार याचे गुलाम बनल्यानें सर्व राष्ट्रास वळण देण्याचें काम शिकलेल्या लोकांच्या हातून होण्याची आशा नाहींशी होते. अवघड परकीय भाषा राष्ट्रांतील सर्व लोकांस येणें अशक्य असल्यानें ते अज्ञान राहतात. ती शिकून त्यांतच गर्क होणारे व राष्ट्रभाषांस तुच्छ मानणारे लोक आपली एक निराळीच जात असल्याप्रमाणें सामान्य जनांपासून अलग वागूं लागतात. असें होऊं नये म्हणून सर्व शिक्षण स्वभाषेच्या द्वारांच मिळालें पाहिजे व तो हेतु नवीन स्थापन होऊं पाहणाऱ्या विश्वविद्यालयानें पुढें ठेवलेल्या हेतूमध्यें प्रमुख आहे हें सांगण्याचें कारण नाहीं.

स्वभाषेचें महत्त्व व तिच्या हयगयीपासून होणारे दुष्परिणाम हा विषय निराळा आहे, त्याचा विशेष विचार करण्याचें हें स्थळ नव्हे. राष्ट्रभाषेचा व राष्ट्रोदयाचा फार संबंध आहे व पूर्वजांनीं करून ठेवलेला वाङ्मयरूपी ठेवा गमाविणें म्हणजे एक घोर पातक आहे. प्रत्येक राष्ट्रानें अनादि कालापासून केलेल्या कामगिरीचें प्रतिबिंब राष्ट्राच्या वाङ्मयांत जसें दृष्टीस पडतें, त्याच्या इतिहासाचें यथार्थ ज्ञानास वाङ्मयाचें जसें साहाय्य होतें, त्यांच्या पुढील प्रवृत्ति कळून येण्यास वाङ्मयापासून जसें सुलभ होतें तसें दुसऱ्या कशानें होत नाहीं. राष्ट्रास जें वळण लागतें तें राष्ट्रांतील

वाङ्मयानेंच लागतें. परंतु परकीय भाषेच्या अध्ययनाच्या मागें लागलेल्या लोकांस जुनें वाङ्मय पारखें होतें व नवें अस्तित्वांत येत नाहीं म्हणून राष्ट्रीय वाङ्मयाशिवाय प्रगति नाहीं हें ओळखून त्याच्या चांगल्या अध्ययनास उत्तेजन देणें हा विश्वविद्यालयाचा दुसरा हेतु आहे.

इतर गोष्टींप्रमाणें दीर्घकालापासून चालत आलेले संप्रदाय व समाजांतील दृढ नीतिकल्पना यांची परकीय शिक्षणाच्या धोरणानें सर्व ओळख बुजून गेल्यामुळें समाजांतील लोकांच्या चालीरीतींशीं शिकलेल्या लोकांचें कांहींच जुळत नाहीं ही माहिती व त्यांच्याविषयीं आदर नसल्यानें समजांत एकरूपता येत नाहीं. खुद्द घरांतल्या घरांत बायकांच्या मनांत ज्या गोष्टी करावयाच्या असतात त्यांच्याशीं पुरुषांची सहानभूति नसते. त्या म्हणजे एक जुन्या काळचा अवशिष्ट भाग आहेत, असें समजलें जातें. अलीकडे तर किती एक ठिकाणीं शिकलेले लोक असें म्हणतांना आढळतात कीं आमच्यांत कांहीं धर्म राहिला आहे, तो बायकामुळेंच आहे. या म्हणण्याचें जर नीट निरीक्षण केलें तर आम्हीं जिकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे तिकडे पुरवीत नाहीं अशा प्रकारचा दोष आपण आपल्या माथीं घेतों आहों, असें सिद्ध होईल. चालीरीती व धर्मसमजुतीची पुरी माहिती नाहींशी झाली म्हणजे स्वभाषेंतील कांहीं कांहीं शब्द व वाक्यप्रयोग कळेनासे होतात. संस्कृत जाणणाऱ्या कांहीं लोकांस 'ते आमच्या देशांतले आहेत' याचा अर्थ कळत नाहींसा झाला आहे. अलीकडे कॉलेजांतील विद्यार्थ्यांसाठीं टीपा दिलेलीं पुस्तकें पाहिलीं असतां त्यांत जी माहिती दिलेली असते त्यांतील बराच भाग घरांतील म्हाताऱ्या आजीबाईला सुद्धां ठाऊक असतो व कथा-पुराणें ऐकणाऱ्या बायकांना माहीत असतो. परंतु ही परंपरा सुटल्यामुळें आमचीं मुलें मात्र कोरींच्या कोरींच राहतात. रामायण, महाभारत व भागवत यांतील बऱ्याच भागाचें श्रवण अगदीं लहानपणीं अनायासें घटका-तास पुराण ऐकल्यानें होत असे व ते संस्कार दृढ राहात असत. ही स्थिति बरी होती असें आम्हांस वाटतें. वाङ्मयाचें अर्थात् मराठी किंवा संस्कृत, वाचन करतेवेळीं पुराणकथांचें मोठें साहाय्य होतें व आपल्या प्राचीन काव्यांतील सद्रचनांचा व सद्बोधाचा परिचय प्रथमपासून असला म्हणजे तसेच विचार परकीय भाषेंत आले म्हणजे आपल्या पूर्वजांनीं या गोष्टी पूर्वींच सांगून ठेवल्या आहेत अशी योग्य पूज्यबुद्धि व प्रेमभाव उत्पन्न होतो. उलटपक्षीं त्यांतील माहिती नसल्यानें इंग्रजी ग्रंथांत केवढ्या चांगल्या उपदेशामृताचा सांठा आहे, आणि 'आमचेकडे काय आहे? कांहीं नाहीं.' असे ग्रह बनून स्वदेशाभिमान मावळत जातो आणि परक्यांशीं तुलना करून आपण स्वतःस नादान ठरवितों.

परकीय राष्ट्राच्या व विशेषत: जिंकणाऱ्यांच्या ताब्यांत शिक्षण असल्यानें विद्यार्थ्यांची अशी मन:स्थिति झाली तरी त्याचें वाईट वाटत नाहीं. परंतु सुशिक्षित लोक पुढें फुरसतीच्या वेळीं आपल्या वाङ्‌मयाचें वाचन करूं लागतात, तेव्हां आपण आपल्या वाडवडिलांस तुच्छ मानीत होतों हें बरें केलें नाहीं. त्यांच्यांत केवढें शहाणपण आहे व तें शिकण्यासाठीं आपण घरचें सोडून बाहेरचें हुडकीत गेलों. अशा स्पष्ट जागृतीचें फळ हेंच आहे कीं आजवरची शिक्षणाची दिशा चुकली आहे व शिक्षणास राष्ट्रीय वळण दिलें पाहिजे असें बहुतेकांस वाटूं लागलें आहे. राजभाषा व सुधारलेल्या जगाची भाषा म्हणून इंग्रजी शिकवावयाचें तें सुद्धां कोमल वयांत शिकवूं नये तर जरा प्रबुद्ध स्थितींतच शिकवावें असाहि पुष्कळांचा अभिप्राय आहे.

स्वभाषेच्या अध्ययनाची हयगय, परभाषेच्या द्वारां शिक्षण दिल्यानें पूर्णपणें विषयाचें ज्ञान होण्यास येणाऱ्या अडचणी, ज्ञान मिळविण्यासाठीं परभाषा शिकावयास लागल्यानें होणाऱ्या शारीरिक व मानसिक सामर्थ्याची हानि, परकीय धोरणानें शिक्षणपद्धति सुरू राहिल्यानें समाजापासून अलग व निराळ्या जातीचाच शिक्षित वर्ग तयार केल्यामुळें सर्व समाज एकजीव होण्यास येणारा प्रतिबंध, स्वधर्म व स्वपरंपराप्राप्त नीतिनियम यांची होणारी हेळसांड हे परकीय शिक्षणपद्धतींतील दोष ध्यानीं आणून राष्ट्रसंघटना करावयाची आकांक्षा जर आम्हांमध्यें असेल तर विश्वविद्यालय स्थापन करण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे, अविलंबेनैव लागलें पाहिजे आणि सर्वात्मना लागलें पाहिजे. सारांश काया, वाचा, मन आणि धन या चारींपैकीं कोणत्याहि गोष्टीची काटकसर करण्याची ही वेळ नव्हे. आपलें घर व आपलीं मुलें यांतच गुरफटत राहाण्याची वेळ निघून गेली. यानें झाली ती हानि पुरी नाहीं असें वाटत असेल तर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. परंतु आम्ही राष्ट्रांतील प्रत्येक माणसापुढें हा प्रश्न मांडतों कीं तुम्हांस स्वत:चें राष्ट्र म्हणून आहे काय ? असल्यास त्याचें रक्षण व उत्कर्ष करण्यास झटणें हें आपलें कर्तव्य आहे कीं नाहीं ? हें कर्तव्य आहे म्हटलें म्हणजे तें करण्यास झटलें पाहिजे कीं नाहीं ?

येथवर जो विचार केला आहे त्यांत राजकीय प्रश्नाचा साक्षात् विचार नाहीं. तो कमी महत्त्वाचा आहे असें नाहीं. परंतु वरील गोष्टीची सिद्धता झाल्यास राजकीय शिक्षण व त्यापासून येणारी उमेद या गोष्टी राष्ट्रापासून दूर राहतील, असा संभव नाहीं. आजवर इंग्रजी शिक्षणाचें धोरण राजकीय

स्वातंत्र्याच्या विचारास विरुद्ध होतें असें आमचें म्हणणें नाहीं. इंग्लिश भाषा शिकविल्यानें तिच्यामधील ग्रंथभांडारांचीं द्वारें खुलीं होऊन त्यांतील विचाररत्नें यथेच्छ लुटावयास सांपडल्यावर राजकीय स्वातंत्र्याच्या कल्पनांनीं संपन्न होणार नाहीं असें राष्ट्र पृथ्वीतलावर आढळलें तर तें मंदगति किंवा मंदभाग्य लोकांचेंच बनलें आहे असें बिनधोक विधान करण्यास हरकत नाहीं. बर्क, बेकन, मिल्ल, मेकॉले, ग्रोट, गिबन, स्पेन्सर, हक्सले, कार्लाईल, रस्किन, ॲडिसन, जॉनसन ह्यांचे गद्यग्रंथ व कविवर्य असून राजकीय चळवळींत जोरानें पडलेला मिल्टन याचेहि गद्यलेख वाचणारांस इंग्रजी भाषेस आमच्या विष्णुशास्त्र्यांनीं ‘ वाघिणीचें दूध ’ कां म्हटलें तें स्पष्ट कळल्याशिवाय राहाणार नाहीं. इंग्लंडच्या इतिहासांतील पहिल्या चार्लसनें केलेला हॅम्प्डन पंचायतनाचा छळ, दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दींतील सप्तर्षींची चौकशी, अमेरिका गमावणाऱ्या तिसऱ्या जॉर्जच्या आमदानींतील विल्क्सची निवडणूक या व अशा इतर प्रसंगांच्या वर्णनापासून मिळण्याजोगा बोध प्राप्त करून घेतल्यावर त्याचा व्यावहारिक उपयोग कांहींच न होईल असें राज्यकर्त्यांस वाटलें नव्हतें अशी आमची बिलकूल समजूत नाहीं. त्यांचे वेळोवेळीं निघालेले उद्गार आमच्या समजुतीला पुष्टि आणणारे आहेत. परंतु अवलपासून अखेरचा इतिहास सलगपणें जुळवून पाहिला तर, त्यांत एक प्रकारचें धोरण आहे तें दुष्ट किंवा नीच असें आम्ही म्हणत नाहीं; पण उदार किंवा श्रेष्ठ प्रकारचें असें म्हणणें इंग्रजी राज्याच्या अत्यंत अंध पक्षपात्यासहि जड जाईल. दुसऱ्या देशांत बिऱ्हाड ठेवल्यावर व तेथील जमीन मऊमऊ लागल्यावर कोपरानें खणावयास लागणें हा सामान्य मानवी धर्म आहे. त्यांत दडपून घेणारा भेटला म्हणजे त्यास दडपणारा नेहमींच भेटतो. अशा दृष्टीनें लोकांचीं मनें शिक्षणाच्या नादानें रणांगणापासून विद्यामंदिराकडे वळविणें ही एक अजब युक्ति आहे. त्याच्या जोडीला प्रजेमध्यें निःशस्त्रत्व पसरलें म्हणजे वीर्यकालाचें स्मरण बुजवून टाकण्यास चांगली मदत होते. सर्वप्रकारचें शिक्षण प्रत्येक राष्ट्रांत आहे. त्याचा सर्व राष्ट्रें मोठ्या प्रेमानें अंगीकार करतात. पण त्याच्या जोडीस दिलेला निःशस्त्रत्वाचा प्रकार लोकांस संशयास्पद वाटला नाहीं किंवा त्याची तीव्रता तरी भासली नाहीं म्हणजे राजकीय स्वातंत्र्याच्या हॅम्प्डन, मिल्टन, फेअर फॅक्स, क्रॉम्वेल, फ्रँक्लिन, वॉशिंग्टन यांच्या कल्पना फैलावल्या तरी काय फिकीर आहे ? हिंदु लोकांच्या चित्तसागरास ठरवून: दिलेल्या मर्यादा उल्लंघितां येत नाहींतच मग क्षोभ झाला तरी वडवानल समुद्राचें पाणी जाळून टाकतो तसेंच त्यांच्याशीं चित्तसागरांतील पाणी जळून जाईल. आंतल्याआंत पेट घेणारा हा इंग्रजी

इतिहासानें उत्पन्न होणारा विचारवन्हि बाहेर येणें शक्यच नाहीं. असें धोरण दूरदर्शी राज्यकर्त्यांनीं कांहीं दिवस राखल्यावर, आतां तो वन्हीहि विझवून टाकण्याचा यत्न चालविला आहे. परंतु ती गोष्ट आतां अशक्य होऊन बसली आहे. हें फळ चाखण्यास प्रथमच मनाई केली असती तर एकपक्षीं बरें झालें असतें परंतु त्यांत घात होता. तो टाळण्यासाठीं हें फळ चाखून त्याचा मद लोकांस चढविला. आतां तें व्यसन सुटून धुंदी उतरणें अशक्य झालें आहे. शस्त्रास्त्राची जरूर न ठेवतां केवळ युक्तिवादाच्या बळावर राजकीय स्वातंत्र्याचा गड घेण्याची युक्ति हे हिंदी लोक करीत आहेत तेव्हां तेंहि बळ हिरावून घ्यावें अशी अलीकडे मोठी खटपट सुरू झाली आहे. पुस्तकें तर चांगले विचार शिकवितात; विद्यार्थ्यांच्या मनाला भलींभलीं छिद्रेंहि नाहींत कीं मनांत ते विचार न राहतां पटापट गळून जावेत. मनांतले विचार जिव्हेंत येतात, ते कांहीं आंत राहात नाहींत. अशा स्थितींत जिव्हाग्र व हस्ताग्र यांनीं त्या विचारांचा उच्चार किंवा उल्लेख होऊं नये अशी खबरदारी घेण्याचा प्रारंभ हल्लीं सरकार करीत आहे. शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस अशा प्रकारें अटकाव होत आहे; वर्तमानपत्रकारांस आणि वक्त्यांत अशासाठीं स्तंभक गोळ्या देण्यांत येत आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमांतच फेरफार करावा असा यत्न झाला आहे. त्याचीं फळें दिसण्यापूर्वीच निराळा शिक्षणक्रम ठरवून आपणच आपल्या देशांतील तरुणांस वळण लावण्याचें काम केलें पाहिजे. बाळपणापासून जिकडून तिकडून राजकीय बाबतींत दडपादडपी ज्या शाळांतून सुरू आहे त्या शाळारूपी तुरुंगांतून होतकरू मुलांस सोडविणें हें राष्ट्रांतील सुविचारी पुढाऱ्यांचें आद्य कर्तव्य आहे. गणपतीपुढें व स्वदेशी सभांमध्यें राष्ट्रीय गीतें म्हणण्यास मनाई करणारें परंतु गव्हर्नर, कमिशनर, कलेक्टर, डायरेक्टररूपी देवतांच्या गळ्यांत हार घालण्यास व नरस्तुतिपूर्ण गीतें म्हणविण्यास उत्तेजन देणारें सरकार राष्ट्रहित काय करील तें दिसतच आहे. आपल्याच राष्ट्रांतील लोकल फंडाचा पैसा गोळा करून आपल्याच पोरांचे गळे सरकारी नियंत्रणजजूंनीं आवळूं देण्यापेक्षां तो पैसा चित्रळखिंडींत ओतला किंवा अफगाण अमीरास नजर केला किंवा त्यावर गोरे सोजीर पुष्ट केले तरी बेहत्तर आहे, पण निदान पैशाचा पैसा जावयाचा आणि मुलेंहि गुलाम करावयाचीं हा दुप्पट हानीचा प्रकार नको. स्वतःचें राष्ट्र परक्यांनीं कितीहि सुखांत ठेवलें तरी तें वाईटच. आपल्या घरचा कारभार आपणच पाहिलेला चांगला. सुराज्य हा स्वराज्याबद्दल योग्य मोबदला आहे असें कोणी कबूल करणार नाहीं. आपल्या लोकांनीं चालविलेल्या

राज्यांतील व्यंगें सह्य असतील तोंपर्यंतच सहन केलीं जातात. त्यांचा प्रतिकार करणें आपल्या हातांत असतें हें ठीक तत्त्व सोडून इंग्रज मुत्सद्यांचें मायावी म्हणणें मान्य करून आमच्यांतलेच दीडशहाणे म्हणत असतात कीं, इंग्रजांनीं तुम्हांस आज सोडलें तर तुमचें कसें चालेल ? तुमच्यांत राज्य चालविण्याची पात्रता कोठें आहे ? आपसांत रणें माजतील व देशांत शांतता नांदणार नाहीं. आम्हांस स्वराज्याचें ओझें वाहण्यास सामर्थ्य नाहीं तों तें शिरावर घेण्याची हांव कशाला ? अशा प्रकारचे कित्येक लोक—आमचेच शिकलेले लोक—गंभीरपणानें प्रतिपादन करीत असतांना आम्हीं ऐकलें आहे व त्यांची समजूत घालतांना आम्हांस पुरें पुरें झालें आहे. स्वाभिमानास व उत्साहास ज्यांच्या मनांत थारा नाहीं व स्वावमान व कर्तृत्वशून्यता यांनीं ज्यांना ग्रासून टाकलें आहे, त्यांचें समाधान कसें होईल ? असें शिक्षण विद्यालयांत असेपर्यंत मिळावें व पुढें सरकारी नोकरींत हेच धडे पदोपदीं सप्रयोग घट्ट करीत आयुर्दाय असेपर्यंत काल काढावा, याहून कांहीं श्रेष्ठ प्रकारच्या लोकांचें राष्ट्र बनवावयाचें असेल तर लहानपणापासून मनाला निराळें वळण लावलें पाहिजे. यासाठीं परक्यांच्या हातून शिक्षणसूत्रें आपल्या हातीं घेतलीं पाहिजेत.

नीति, संप्रदाय, भाषा, धर्म व राजकीय विचार या सर्व बाबतींत परकीय सरकार जसें बेफिकीर किंबहुना विरुद्ध असणार, त्याप्रमाणेंच राष्ट्रांत संपत्तीची अभिवृद्धि व्हावी अशाबद्दल तरी खबरदारी सरकाराकडून कोठून घेतली जाणार ? खुद्द आपल्या देशचे व्यापारी गबर व्हावेत इकडे साहजिकच सरकार लक्ष पुरविणार. शेंदीडशें वर्षें विलायतच्या सरकारचा व इंग्रजी लोकांचा आमचा संबंध आहे. तेवढ्या काळांत अलीकडील शास्त्रीय ज्ञान व यंत्रकला यांपासून आपला फायदा करून घेतला नाहीं असें एकहि राष्ट्र पृथ्वीच्या पाठीवर नाहीं. पन्नास वर्षांच्या आंत जपाननें स्वतंत्र असल्यामुळें केवढी कमाई केली. स्वातंत्र्य व बाहेरच्या जगाशीं संबंध या गोष्टी काय पाहिजे तें साध्य करूं शकतात. येथील लोकांनीं धान्य व कच्चा माल उत्पन्न करणें याहून दुसरें कांहीं करूं नये व एवढे जिन्नस आपणांस पुरवावे आणि आपण त्यांच्याबद्दल बाकी सर्व वस्तु पुरवून गबर व्हावें, हें व्यापारी राजधोरण इंग्रजी नीतींत ओतप्रोत भरलें आहे. त्याचाच परिणाम शिक्षणपद्धतींत स्पष्ट दिसून येत आहे. सुधारलेल्या राष्ट्रांत यांत्रिक शक्तीनें किती काम होतें याची माहिती आमच्या शाळांतील लोकांस गणितांतील उदाहरणांनीं झाली तर झाली. व्यापारी भूगोल, परकीय देशांच्या भाषा, हिशेबाच्या पद्धतींची माहिती, कारखान्यांच्या व्यवस्थापकास लागणारें शिक्षण,

या सर्वांस आम्ही लोक पारखे आहोंत. जणूं काय हल्लींच्या जगांत झालेल्या सुधारणांची आमच्या लोकांस शिवाशिव खपत नाहीं. अशासाठींच आम्हांस या सर्व ज्ञानापासून अलग ठेवलें आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं सर्व जगांतील कोणत्याहि भागापेक्षां सांपत्तिक उत्कर्षाचीं साधनें विपुल असतां व सामान्य जनसमूह अल्पसंतुष्ट, मितव्ययी व कष्टाळू असतां, देशांतून अठरा विश्वें दारिद्र्याचें ठाणें उठत नाहीं व प्लेग, कॉलरा, विषमज्वर यांसारखे रोग कायमचें बिऱ्हाड करीत आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करून सरकारपुढें दांत विचकून भिक्षा मागण्याचें सोडून देऊन आपला आपण शिक्षणाचा कार्यभार उचलला पाहिजे. विद्यार्थी परदेशीं पाठवून देऊन आपला भावी शिक्षकवर्ग तयार केला पाहिजे. परदेशी शिक्षक लोक इकडे आणून येथेंच शाळा, पाठशाळा व प्रयोगशाळा स्थापन केल्या पाहिजेत. हें सर्व काम स्वतंत्र विश्वविद्यालयाशिवाय होणें अशक्य आहे.

यावप्रमाणें हिंदु विश्वविद्यालयाची आवश्यकता स्थापित झाली तरी त्याच्या शक्यतेचा विचार करण्याचें काम राहिलेंच. वस्तुतः अमक्या एका गोष्टीची आवश्यकता तीव्रपणें भासूं लागली म्हणजे ती घडून आल्याशिवाय राहात नाहीं. राष्ट्रांतील वजनदार व अनुभविक लोकांनीं हें कार्य करण्यास आपलें सर्वस्वच समर्पण करण्याची तयारी केल्यावर काय होणार नाहीं ? राष्ट्रीय विश्वविद्यापीठ हें राष्ट्राच्या भावी उत्कर्षाचें बीज आहे ही खात्री झाल्यावर आपल्या हातून शक्य तितकी मदत करण्यास सर्व समंजस लोक सिद्ध झाल्यास त्या विश्वविद्यापीठाच्या उभारणीचें काम दिनावधीवर पडणार नाहीं. सर्वस्व-समर्पक पुढारी व यावच्छक्य साहाय्य करणारी मंडळी पुढें सरसावणार नाहींत तर ही कल्पना अद्याप अपक्व आहे असेंच सिद्ध होईल. राष्ट्रांतील लोक सुखाची व उन्नतीची इच्छा मात्र करतात; पण त्याला अवश्य ते परिश्रम व स्वार्थत्याग राष्ट्रांत नाहीं असें जाहीर होईल. पंडित मदनमोहन मालवीय यांनीं श्रीक्षेत्र काशी येथील राष्ट्रीय सभेच्यापूर्वीं या कार्याच्या कल्पनेस स्पष्ट स्वरूप दिलें. पुढें तीच विश्वविद्यालय स्थापन करण्याची योजना कांहीं प्रमुख लोकांपुढें मांडली. पंडितजींनीं प्रसिद्ध केलेल्या लहानशा पुस्तकांत आपलें सर्व म्हणणें व्यवस्थित रीतीनें मांडलें आहे. ज्ञानप्रसार व धर्मजागृति या दोन गोष्टींकडे आपण लक्ष पुरवावें तितकें पुरवीत नाहीं म्हणून आपल्या राष्ट्रास व विशेषतः हिंदु लोकांस विपन्न दशा प्राप्त झाली आहे. यथास्थित रीतीनें धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ साधण्यासाठीं हल्लींच्या जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांच्या विद्या व

कला संपादन करून शिवाय आपल्या परमपूज्य पूर्वजांचें सर्व ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. या सर्व गोष्टी यथास्थितपणें साधावयाच्या म्हणजे एक हिंदु विश्वविद्यापीठ असलें पाहिजे. त्यामध्यें ज्ञानाच्या सर्व शाखांचा समावेश असला पाहिजे. त्यांनीं सुचविलेलें नांव '**भारतीय विश्वविद्यालय**' असें आहे.

विश्वविद्यालयाची स्थापना क्षेत्रराज वाराणसी येथें करावी व सर्व शिक्षण तूर्त हिंदी भाषेंत द्यावें असें पंडिजींनीं सुचविलें आहे.

एवढ्या प्रचंड कार्यास द्रव्य बरेंच लागेल. पंडिजींनीं एक कोटीचा अदमास केला आहे. ही रक्कम सकृद्दर्शनी मोठी दिसते; परंतु इतक्या मोठ्या प्रमाणावर निघणाऱ्या संस्थेस हीहि अपुरीच होईल; पण यत्न केल्यास एवढी रक्कम उभी करणें कठीण नाहीं, असें त्यांच्याप्रमाणें आम्हांसहि वाटतें. राष्ट्रांतील विद्याव्यासंगी लोक एकत्र झाले, म्हणजे विश्वविद्यालयाची उभारणी झालीच. द्रव्यबल असल्यावर कांहीं कलाकौशल्याचें व यांत्रिक कार्यांचें काम शिकविण्याकरितां परकीय शिक्षक आणतां येतील. सारांश, आजकाल हें राष्ट्रीय कार्य सर्वांनीं मिळून तडीस नेलें पाहिजे. सरकारासारखें काम कसें होईल? सरकारचें द्रव्य, सरकारच्या नोकरीची शाश्वति, सरकारचें वजन व सरतेशेवटीं तयार झालेल्या लोकांस सरकार खात्यांत मिळणारी पोट भरण्याची सोय या गोष्टी या स्वतंत्र संस्थेला कोठें आहेत? अशी शंका घेऊन जे मागें सरतील त्यांना लोकांच्या सामर्थ्याची कल्पनाच नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे. सरकारनें हल्लीं चालविलेलें शिक्षणाचें काम आपल्या पसंतीचें नाहीं हेंच या संशयात्म्यास कबूल नाहीं असें म्हणावें लागतें. तसें असेल तर सर्व चर्चा व्यर्थ आहे. परंतु सरकारची कामगिरी किती वेठीची आहे हें ज्यांच्या मनावर बिंबलें आहे, त्यांना आपण स्थापूं व चालवूं, ती संस्था विशेष राष्ट्रहितसाधक होईल असें वाटल्यावांचून राहाणार नाहीं. खुद्द सरकारच्या पद्धतीनें पाठशाळांचें काम चालवावयाचें तर सरकारी संस्थांच्या बरोबरीनें किंबहुना जरा चढच हें काम एतद्देशीय मंडळी करूं शकते, हें फर्गसन (फर्ग्यूसन) कॉलेजाच्या इतिहासावरून व सांप्रतच्या स्थितीवरून व्यक्त होणार आहे. धंद्याचीं कॉलेजें सरकारनें आमच्या इलाख्यांत तीन चालविलीं आहेत. त्यांचा काय उजेड पडला आहे तो दिसत आहेच. या कॉलेजमध्यें तयार होऊन इंग्लंडमध्यें व इतर देशांस गेलेले लोक सांगतात कीं, आम्हांस येथें जें शिक्षण एका वर्षांत मिळत नाहीं तें पंधरा दिवसांत तेथें मिळतें. बरोबरच आहे. शिक्षक लोक चांगले अनुभविक व त्या त्या विषयांत प्रवीण म्हणून नेमले असावयाचे नाहींत. मुलांच्या हातानें सर्व प्रयोग

पाश्चात्य देशांत करवितात तसें येथें होणें शक्य नाहीं म्हणावयाचें. आम्ही स्वतः कॉलेजें चालवूं तर गुरुवर्य डॉ. भांडारकर यांनीं एके वेळीं स्पष्टपणें सरकारास कायदे कौन्सिलांत सांगितलें तशा प्रकारच्या कुरकुरीस जागा ठेवणार नाहीं. आज चाळीस वर्षांत पन्नास साठ माणसें शिक्षक म्हणून युरोपांतून इकडे आलीं; पण चार पांच चांगले अधीत व केवळ विद्याव्यासंगी व मर्मज्ञ असे असतील नसतील. बाजारभावानें पैसे मोजून लोक आणावयाचे व ते राष्ट्रांतील तरुणांच्या मनास वळण लावण्यासाठीं आणावयाचे. ते चांगले आणावेत. हे राष्ट्राबद्दल कळकळ तितपतच बाळगणारे सरकारी अंमलदार काय म्हणून करतील? साधारणपणें कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्याच वयाचेच म्हणजे पंचविशी उलटली आहे नाहीं असें नुकतेच परीक्षाचक्रांतून बाहेर पडलेलें पोर कॉलेजमधील प्रोफेसरांच्या सभेंत केरूनाना छत्र्यांसारख्या वस्तादाच्याबरोबर खुर्चीस खुर्ची लावून बसावयाचें अशी ही सरकारपद्धतीची पीठिका आहे. कोठें कोठें तर पेन्शनीला आलेल्या अनुभविक शिक्षकांस मी तुमचा मुख्य अधिकारी आहें, तुम्हांस मी सांगेन तें केलें पाहिजे असें ह्या गौरकाय मुलांचें बोलणें निमुटपणें ऐकून ध्यावें लागतें. हा परकीय अंमलाचा खेळ. पिकलेल्या केसांचा उपमर्द एवढाच या सरकारी पाठशाळेंतला उणेपणा असता व भारी पगार देऊन नेमलेले गोरे शिक्षक बृहस्पतितुल्य असते तर तेहि 'तेथें कांहीं चाड नाहीं भवियाची' म्हणून स्वस्थ बसणें भाग पडलें असतें, परंतु तसाहि प्रकार नसतो. कळकळीनें काम करणारे समंजस स्वदेशी अधिकारी असले म्हणजे एकाच मनुष्यास भराभर तीन विषयांचा गुरु लागोपाठ नेमण्याचें घोर पातक कधींहि झालें नसतें. या तीनींपैकीं एक तरी विषय त्या गुरूला येत असेल तर मारामार. प्रोफेसर नेमण्याचें तत्त्व विषयांतील प्रावीण्य हें नव्हेच. दुसऱ्या एका कॉलेजचे प्रिन्सिपल आपल्या कामाचा चार्ज घेतांना नोटांच्या चोपड्यांचा चार्ज घेणार. त्या नोटा घरीं खाजगी रीतीनें उपयोग करून व्याख्यान वगैरे देणार असा कदाचित् वाचकांचा समज होईल. पण तसा नव्हे. त्या नोटा वर्गांत आणून विद्यार्थिवर्गाकडून उतरविणें हेंच प्रायः शिक्षण. हें शुद्धलेखन चाललें असतां कोणा विद्यार्थ्यानें गत सालच्या किंवा तिगस्ताच्या किंवा कोणत्याहि एका पूर्वपिढीच्या विद्यार्थ्याकडून वही मिळविली असल्यामुळें तो स्वस्थ बसला तर प्रिन्सिपलसाहेबांचे डोळे लाल होणार. तेव्हां विद्यार्थ्यांनीं पांढऱ्यावर काळें केल्याचें सोंग करून तो तास मारून काढला पाहिजे. तिसरें धंद्याचें कॉलेज म्हणजे फारच. आठवड्यांतून

चार-पांच तास नांवाचें शिक्षण मिळण्यासाठीं मुंबईची वाईट हवा व रूक्ष अन्न खात राहिलें पाहिजे. सर्व दिवस कांहीं उद्योग नाहीं. मग संध्याकाळीं आपल्या पोटाच्या उद्योगानें थकले-भागलेले किंवा उद्योग मिळाला नाहीं म्हणून काळजींत चूर झालेले शिक्षक कांहींतरी बोलून जावयाचे. ह्या कॉलेजचें काम जाणून बुजून 'दिवस भरण्याचें' आहे. यांत एखादा शिक्षक जातीचा कर्तव्यदक्ष असला तर मेहनत घेतो, पण जें सामान्य वर्णन केलें तें यथार्थ आहे. परंतु हें कॉलेज म्हणजे विद्यार्थ्यांचा छळवाद असा आमचा पहिल्यापासून ग्रह आहे असो.

अशी सरकारची कॉलेजें चालविण्याची पद्धति आहे. आपल्या स्वतःच्या पैशाच्या विनियोगाची काळजी बाळगणारे व स्वतःच्या राष्ट्रांतील भावी पिढीची काळजी वाहणारे व्यवस्थापक यापेक्षां कांहीं चांगल्या रीतीनें शिक्षणशकट हांकतील असें म्हणणें म्हणजे वृथा डौल करणें असें म्हणतील ते म्हणोत. ह्या गोष्टी निरभिमानपणानें सरकारनें जरी ध्यानीं घेतल्या तरी त्यांचा आमच्याशीं मतभेद होईल असें वाटत नाहीं. शंभरदीडशें वर्षेपर्यंत, निदान पन्नास साठ वर्षांत आपल्या हातून झालें नाहीं तें काम करण्यास देशाचे लोक पुढें आले आहेत, तर काय होतें तें आपण स्वस्थपणें पाहावें, विरोध तर करूंच नये, सहानुभूति व साहाय्य देववेल तें द्यावेंच असेंच वाटणें व त्याप्रमाणें वर्तन ठेवणें उदारपणाचें आहे. इंग्रजी वर्तमानपत्रें व अंमलदार यांची निदान भाषा तर अशी आहे. कांहीं टाइम्स ऑफ इंडियासारखे चेष्टेखोर व बेलगामी वर्तमान-पत्रकार विचारतात कीं, सरकारच्या म्हणून हल्लींच्या युनिव्हर्सिट्या तुम्हांस नको झाल्या तर तारायंत्र, टपाल व आगगाड्या यांचा उपयोग कां करतां? या वितंडवादाच्या प्रकारास उत्तर देण्यांत अर्थ नाहीं. उत्तरें दोन आहेत. सरकारचें कांहींच न घ्यावें असें मनांत आहेच. पण सर्व एकदम कसें होईल? दुसरें हीं खातीं चाकरवजा आहेत. यानें आमचीं मनें सरकारच्या ताब्यांत जात नाहींत. लोकांत ज्ञान उत्पन्न होऊन राजकीय व्यवस्था त्यांच्या हातांत येईल तेव्हां या गोष्टीहि त्यांच्या हातांत येतील. प्रस्तुतचा प्रश्न सरकारच्या हातून राज्यव्यवस्था काढून घेण्यासंबंधाचा नाहीं. जें काम सरकारपेक्षां आपलें आपणांस चांगलें करतां येईल तें आपण करावें इतकाच हेतु आहे. यांत राज्यव्यवस्थेच्या भानगडीचे प्रश्न कमी आहेत. यासाठीं असल्या कोटिक्रमास न भितां लोकांनीं नेटानें काम केल्यास विश्वविद्यालय स्थापून राष्ट्रांतील शिक्षणाच्या सर्व किल्ल्या आपल्या हातीं घेण्यास अनुमान करूं नये. इतक्या मेहनतीनें व शुद्ध बुद्धीनें उभारलेल्या संस्थेस बहिष्कार घालून सरकार विरोध करील तर लोकांनीं

सरकारवर बहिष्कार घालण्याची वेळ येईल. त्यांच्या नोकरीची आशा यच्चयावत् सर्वांनीं सोडावी लागेल असें म्हणण्यापेक्षां देशांतील लोकांच्या साहाय्यास सरकार मुकेल असेंच म्हणणें योग्य होईल. त्याचे परिणाम काय होतील त्यांचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे व प्रसंगहि नाहीं व हल्लींच्या चर्चेची दिशाहि ती नाहीं. आज सर्वांनीं आपल्या अवश्य त्या गरजा भागवून राष्ट्राच्या सेवेसाठीं आपलें सर्व धन समर्पण करण्यास तयार झालें पाहिजे. सांसारिक किंवा प्रापंचिक जनांनीं आपला राष्ट्रसंसार व्यक्तिसंसाराप्रमाणेंच सुरेख थाटेल कसा ही विवंचना केली पाहिजे. सुव्यवस्थित प्रयत्न करून देशभर जागोजाग अधिकारी व कार्यकारक सभा स्थापन झाल्या व सारावसुलीच्या पद्धतीप्रमाणें राष्ट्रकार्यास द्रव्य जमविलें तर केवढी पाहिजे तेवढी कार्यसिद्धि होईल. राजेरजवाडे, संस्थानिक, सरकारी नोकर, सावकार, व्यापारी, धंदेवाले, झाडून सर्व लोकांचें हें काम आहे. या विश्वविद्यापीठाचें प्रमुख स्थान स्वीकारण्यास म्हणजे पहिले आधिपति (चान्सेलर) होण्यास आजकाल श्रीमंत सयाजीराव महाराज योग्य आहेत. आपलें नांव अजरामर करून घेण्यास व आपल्या मातृभूमीवर अनंत उपकार करण्यास अशी दुसरी संधि येणें अशक्य आहे. राष्ट्रांत चेतना उत्पन्न झाल्यावर कोणतेंहि काम कोणाबद्दल अडून राहतें असें नाहीं. पण योग्य माणसांनीं योग्य काळीं शिरावर भार घेतल्यास सर्वांस भूषणावह होतें. हीच गोष्ट ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांसंबंधीं म्हणण्यासारखी आहे. भलत्याच भीतीनें किंवा भलत्याच आशेला भुलून जर राष्ट्रकार्यास विघ्न कराल किंवा साहाय्य करण्यास हयगय कराल तर घोर राष्ट्र-द्रोहाचें पातक पदरीं बांधून घ्याल. अडचणी आहेत. अनेक गोष्टींचा सारासार विचार करणें प्राप्त आहे. हें सर्व जाणूनच आम्ही म्हणतों कीं ही वेळ वारंवार यत नाहीं. या वेळीं नेटानें प्रयत्न केले पाहिजेत. आली वेळ घालविणें, अपमान होत असतां आणखी होऊं दे म्हणजे त्वेष येईल, त्वेषानें उत्साह येईल, उत्साहानें कार्यसिद्धि होईल, अशी दिरंगाई करण्याचा प्रसंग आजचा नव्हे. कार्य कालावधी-वर लोटण्याची संवय बहुत दिवस जडली; तिनेंच आजवर घात झाला आहे. पुढेंहि अशीच हानि करून घेण्याची नसेल तर श्रद्धापूर्ण अंतःकरणानें कार्यास लागा.

• • •

# ४. समर्थ विद्यालय

[ ‘ विश्ववृत्त ’, वर्ष १ लें, जून १९०६ ]

**लोकशिक्षणाचें कार्य** — हल्लीं हिंदुस्थान देशास जी स्थिति प्राप्त झाली आहे ती समाधानकारक आहे, तिच्यामध्यें विशेष फेरबदल करण्याचें कारण नाहीं, तिच्या संबंधानें असंतोषाचे किंवा उद्वेगाचे उद्गार कित्येक लोकांच्या मुखावाटें अथवा लेखांतून बाहेर पडतात ते निराधार आहेत, असें म्हणणारे लोक प्रायः नाहींत असें गृहीत धरून आपण चालत आहों. स्थितीच्या दुःसहतेविषयींहि मतभेदास फारशी जागा नाहीं. या दोन्हींहि वाक्यांत ‘ प्रायः ’ व ‘ फारशी ’ हे दोन मर्यादक शब्द घालण्याचें कारण इतकेंच आहे कीं, कोणी हरीचा लाल आमच्यासारखे सुखी कोणी नाहींत असें म्हणणारा पुढें आला किंवा ‘ असेल आमची स्थिति थोडी वाईट, पण आजच तिच्याविषयीं विचार करण्याचें कारण नाहीं. ’ असें म्हणणारा एखादा माणूस असला तर अशा माणसांच्या सुखासमाधानाच्या आड येण्याची आमची इच्छा नाहीं. परंतु तीव्र स्वरूपास पावलेल्या रोगाप्रमाणें एका क्षणाचीहि उपेक्षा करण्याची सवड नाहीं व असेल तेवढ्या उत्साहानें व नेटानें परिश्रम करून प्रकृति सुधारणें जरूर आहे, अशी आमच्या राष्ट्राची आज दशा झालेली आहे असें मानून आम्ही हें लिहीत किंवा बोलत आहों हें वाचकांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. आपल्याहून निराळ्या मताचे पण आळसांत, आनंदांत किंवा ऐषआरामांत राहणाऱ्या लोकांस दूषण देत बसण्यासहि आपणांस फुरसत नाहीं. जेवढे साक्षात् आपल्या कार्यास विघ्न करण्यास तत्पर होतील त्यांचाच कदाचित् विचार करावा लागेल. त्यांच्याशीं वादरणेंहि करावीं लागतील; पण तीं सर्व उपायचिंतनाच्या संबंधाचीं रणें असणार. आमच्याप्रमाणेंच देशस्थितीविषयीं ज्यांचे विचार नसतील त्यांच्या वाटेसहि आम्ही जाणार नाहीं. ज्यांना सर्व आबादीआबाद आहे असें वाटत असेल त्यांच्याशीं काय बोलायचें ? तुम्ही खुशाल आहां, तर खुशाल राहा म्हणून मार्ग सोडायचा.

सर्व संकटांत मोठें संकट राजकीय संकट म्हणजे परवशता हें आहे. सर्व विपत्ति व आपत्ति तन्मूलक आहेत ही गांठ प्रत्येकानें आपल्या मनाशीं पक्की घालून ठेवावी. राष्ट्राची सामाजिक स्थिति बिघडली आहे, दुष्ट चालीरींतींचा पगडा बसला आहे, सत्यप्रीति नाहींशी झाली आहे, परस्परांवरील विश्वास

उडाला आहे, कलाकौशल्याचा ऱ्हास झाला आहे, व्यापार ठार बुडाला आहे, प्रजा अशक्त झाली आहे, इत्यादि सर्व, मूळ रोगाचीं बाह्य परिणामचिह्नें आहेत म्हणून या चिह्नांस फाजील महत्त्व देऊं नये. यांपैकीं कोणत्याहि एकाच्या नादीं लागूं नये. मूळ रोगाच्या निर्मूलनार्थ सर्व गोष्टी साधनीभूत आहेत अशी भावना बाळगूनच सर्व चळवळी चालू राहूं द्यात. ही गोष्ट अलीकडे कंठरवानें सांगितली पाहिजे असें वाटण्यास कारण झालें आहे. कोणी म्हणतो परदास्यांत असणाऱ्या लोकांस राजकीय चळवळ ती कसली? कोणी म्हणतो उगीच बडबड करण्यांत काय अर्थ आहे? कोणी विचारतो असें कोठें सभा भरवून किंवा राजकीय चळवळ करा म्हणून लोक जागे होतात काय? कोणी म्हणतो सर्व भिस्त औद्योगिक उन्नतीवर ठेवली पाहिजे. कोणाची सर्व मदार नैतिक उन्नतीवर आहे. मद्यपाननिषेधक मंडळ्या स्थापन होऊन लोकांतील हें व्यसन नाहींसें झाल्याशिवाय कोणताच मार्ग खुला होत नाहीं असेंहि कित्येक प्रतिपादितात. असे एतद्देशीय विचार चालले आहेत, परंतु या सर्वांस राजसत्तेचें पाठबळ पाहिजे हें तत्त्व विसरलें जातें. राजसत्ता विरोधी असल्यास कोणतेंहि कार्य करतां येणें शक्य नाहीं. वाटेल त्या कार्यांत विघ्न करण्याइतकें राज्यकर्त्यांस सुलभ कार्य कोणतेंच नाहीं. यासाठीं ती राजसत्ता नियंत्रित केली पाहिजे. प्रस्तुत काळीं ज्यांच्यावर त्या सत्तेचा प्रयोग होतो त्यांच्या इच्छा व आशा यांचा बिलकुल विचार न करतां राजसत्ता चालविली जाते. तिला मर्यादेंत आणणें हें पहिलें काम आहे व राष्ट्रांतील सर्व दूरदर्शी व दीर्घोद्योगी स्त्रीपुरुषांचें इकडे लक्ष लागलें पाहिजे. पुरुषांनासुद्धां ही गोष्ट पुरती कळत नाहीं. मग स्त्रियांना कोठून कळणार? आपण आहों कोणत्या स्थितींत, आपणांस जावयाचें आहे कोठें? याची अंधुक कल्पनासुद्धां या अवाढव्य राष्ट्रांत फार थोडक्या लोकांना आहे. सर्व राष्ट्राचा कारभार दुसऱ्यांनीं पाहावा व राष्ट्रांतील यच्चयावत् लोकांनीं कष्टाळू व सोशिक जनावराप्रमाणें काबाडकष्ट करावे अशी स्थिति येऊन, आपल्या देशाचे म्हणजे आपल्या जन्मभूमीचे आपण मालक आहों हें विसरून जावें किंवा स्मरून आंतल्याआंत झुरून जावें याहून दुसरी शोचनीय स्थिति कोणती असणार! तर हें स्वस्थितिज्ञान लोकांस करून देण्याचें कार्य सर्वांत अगोदर हातीं घेतलें पाहिजे असा आमचा ठाम ग्रह झाला आहे. परवशता ही आम्हांस घातक आहे. हल्लीं असलेल्या राज्यपद्धतींत राहण्यास आम्ही नाखूष नाहीं, पण स्ववश असलों तरच राहूं. परवशता म्हणजे परनेयता. आमचें हिताहित आम्हांस जसें कळेल तसें तें दुसऱ्यास कळणार नाहीं. आमचा पैसा

आम्ही जसा जपून खर्च करूं तसा दुसऱ्याच्या हातून खर्च होणार नाहीं. आदा व खर्च यांची तोंडमिळवणी करण्याची जबाबदारी आमच्यावरच पडली म्हणजे पैसा उभारावा कसा व तो खर्च करावा कसा याचा विचार आमचा आम्ही उत्तम करूं. या कामांत कांहीं चुका घडल्या तरी त्यांचे परिणाम भोगीत भोगीत आम्ही शहाणे होऊं. दुसऱ्यानें आमचीं कामें कितीहि चांगलीं केलीं तरी नकोत; तीं आमचीं आम्हीं वेडीवाकडी करण्यांत जी शोभा व जें अंतिम हित तें तीं दुसऱ्यांनीं केलेल्यांत नाहीं. शिवाय, तशीं वेडींवांकडीं करून चुकण्याचा व त्या मार्गानेंच शहाणपण मिळवून सुधारत जाण्याचा आमचा हक्क आहे. या गोष्टी स्पष्ट समजून त्या प्रतिपादिण्याचें सामर्थ्य लोकांच्या अंगीं येणें हें काम लोकशिक्षणाशिवाय नाहीं. हें शिक्षणाचें काम ज्याच्या हातांत असेल तो देशांत सत्ताधारी होईल. लोकांच्या बुद्धीस हल्लींची आहे ही स्थिति इंद्रभुवना-सारखी आहे असें वाटू लावणें शक्य असल्यास, तें प्रस्तुत राज्यकर्ते करतील, आजवर करीत आले आहेत. परंतु हा ग्रह लोकांत माजून राहणें आपल्यास इष्ट नसेल तर हें लोकशिक्षणाचें कार्य आपण आपल्या हातीं घेतलें पाहिजे. स्वदेशी चळवळ म्हणजे राष्ट्राची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा उत्तम उपाय. परंतु दुःशिक्षणामुळें कितीतरी लोकांच्या मनांत स्वदेशासंबंधानें जो पीळ पडावयास पाहिजे तो पडत नाहीं. परकीय सरकारासदेखील या चळवळीच्या विरुद्ध साक्षात् बोलवेना, पण आमचेच कित्येक लोक भ्याड झालेले स्वदेशीच्या विरुद्ध वर्तन करतात; पण सभा, प्रदर्शनें वगैरे लोकजागृतीच्या उपायांनीं स्वदेशी चळवळ जितकी यशस्वी होईल त्यापेक्षां स्वदेशी शिक्षणाच्या योगानें पंधरा-वीस वर्षांत ती अत्यंत यशस्वी होईल. तसें शिक्षण सरकारकडून मिळण्याचा बिलकुल संभव नाहीं. लोकांनीं करून दाखविल्यावर कदाचित् ‘ सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः ’ या न्यायानें व आणखी कांहीं धूर्तपणाच्या उद्देशांनीं या स्वदेशी शिक्षणासहि सरकार सर्वप्रकारें साहाय्य करील. परंतु आज हा बोजा निव्वळ राष्ट्रांतील सुजाण लोकांनींच उचलला पाहिजे. लोकमताचा पाठिंबा पुढारी लोकांस नाहीं, किंबहुना लोकमतच नाहीं असा आक्षेप सरकार आणतें, तर त्यांस शिक्षण देऊन सुविचारी करा, असा त्यांच्यापुढें सारखा आक्रोश करीत असतां तें मनावर घेत नाहीं. आतां आमचा विचार आम्हांला पाहिला पाहिजे. गुराख्यांनीं गुरें सोडलीं तरी यजमानाला त्यांची निगा केली पाहिजे. या लोक-शिक्षणाच्या कामास व तें काम आपल्या राष्ट्रीय उत्कर्षास अवश्य अशा रीतीनें करण्यास जर आपण झटलों नाहीं तर राष्ट्रसंरक्षणाचें खापर आपल्या माथीं फुटणार.

असें आजकाल हयात असलेल्या आपणांस समंजस मानणाऱ्या लोकांनीं पक्कें समजलें पाहिजे. आपल्या लोकांत परस्पर बोलतांना आडपडदा ठेवण्याचें कारण नाहीं. राज्यकर्त्यांशीं बोलतांनासुद्धां उघड उघड सत्य बोलण्यांतच खरें चातुर्य आहे. ताकाला जाऊन तपेली दडविण्याचे दिवस गेले. सरळ बोलून सरकारजवळ हक्कानें दाद मागण्याचे दिवस आले आहेत. लोकांस सरकारचें म्हणणें व वागणें कसें आहे व कसें असलें पाहिजे, सरकारचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या कोणत्या आहेत, प्रजेचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या कोणत्या आहेत या सर्व गोष्टींची यथास्थित मांडणी करून आपल्या देशबांधवांना आपल्या राष्ट्रांत मान्यतेनें राहण्याची योग्यता आणून देणारा लोकशिक्षकवर्ग तयार होणें जरूर आहे. सारांश, वेदान्तशास्त्रांत म्हटल्याप्रमाणें आत्मज्ञान सर्व राष्ट्रांत झालें पाहिजे. या कामासाठीं शिक्षणाच्या संस्था नवीन तऱ्हेच्या असल्या पाहिजेत. हें ज्ञान अर्थात् उच्च शिक्षणाच्या विद्यालयांतून विशेषत: मिळण्याजोगें असतें; परंतु अशा प्रकारच्या उच्च संस्थांमध्यें प्रवेश होण्यास अंगीं पात्रता आणून देणाऱ्या पूर्व शाळा अस्तित्वांत येणें अत्यंत अगत्याचें आहे. उदात्त शिक्षणाच्या उच्चतम पायरीचे लोक तयार करण्यास राष्ट्रीय विश्वविद्यापीठाचीच स्थापना झाली पाहिजे. त्या मोठ्या प्रमाणावरील उद्योगाची पूर्वतयारी म्हणून दुय्यम शाळांची स्थापना जागोजाग झाली पाहिजे. पांचशें किंवा त्याहून कमी लोकसंख्येच्या खेड्यांमध्यें एक प्राथमिक शिक्षण ( म्हणजे स्वभाषेंत लेखन, वाचन व गणित ) मिळण्याची सोय व्हावी म्हणून लहान बालशाळा स्थापन झाल्याच पाहिजेत. दोन हजार लोकसंख्येच्या गांवांत एक मोठी बालशाळा पाहिजे. दहा हजार लोकसंख्येच्या शहरांत अनेक मोठ्या बालशाळा असून शिवाय दुय्यम शाळा स्थापिली पाहिजे. यापुढच्या लोकसंख्येच्या नगरांत अनेक मोठ्या बालशाळा व दुय्यमशाळा असावयास पाहिजेत; अशाच नगरांत विश्वविद्यापीठीय पाठशाळा असणें भाग आहे. याहून मोठ्या पत्तनामध्यें सर्व प्रकारच्या शाळा व अनेक पाठशाळा असावयास पाहिजे आहेत. सरकारच्या हातून आज दीडशें वर्षांत हें जाळें पसरणें झालें नाहीं. सर्व लोकांस लिहितां वाचतां येण्यास भाग पाडण्याचें सरकारनें मनावर घेतलें असतें तर झालें नसतें असें कोण म्हणूं शकेल? परंतु ग्रेट ब्रिटनमध्यें ज्या गोष्टी सरकार आनंदानें करतें किंवा वसाहतवाल्या लोकांस ज्या गोष्टी आपल्या प्रदेशांत करण्याची मुभा सरकारनें ठेवली आहे, त्या गोष्टी हिंदुस्थानांत झाल्या नाहींत याबद्दल नुसता खेद करीत बसण्याची आज आपणांस सोय नाहीं. आपला गाडा आपणच ओढला पाहिजे. तो खडकावर आपटला तरी त्याची मोडतोड आपणच केली

पाहिजे. बहुत कालपर्यंत आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलों त्यापासूनहि अगदीं नुकसान झालें असें म्हणण्यास आम्ही तयार नाहीं. आमच्या मनांत सरकारनें जेवढें व ज्या प्रकारचें काम करावयास पाहिजे होतें, तेवढें व त्या प्रकारचें केलें नाहीं तरी परकीय अमलाखालीं राहिलेल्या लोकांना त्यांनीं इतकें तरी ज्ञानामृत पाजलें हेंसुद्धां त्यांचे सामान्य उपकार झाले आहेत असें म्हणण्याचें कारण नाहीं. दिलेल्या शिक्षणांतील ढोबळ चुका व त्या शिक्षणांत राहिलेल्या भयंकर व्यंगामुळें झालेली हानि याच शिक्षणानें आमच्या लक्षांत आली आहे. यासाठीं हानी-बद्दल शिव्याशाप देत बसण्यापेक्षां आपल्या दृष्टीप्रमाणें पुढील निर्दोष मार्गाचें अवलंबन एकदम करावें यांतच शहाणपण आहे. देशांतून होणारें उत्पन्न अमकें, त्या मानानें शिक्षणावर होणारा खर्च अमक्या प्रमाणाचा आहे. इतर राष्ट्रांत हें प्रमाण आमच्या प्रमाणापेक्षां कितीतरी पट जास्त आहे, हें दाखवून सरकारास लाजविण्यास त्यांच्याजवळ हे आंकडे नाहींत कीं काय? बोलण्या-प्रमाणें कृति नाहीं हें माप पदरांत घालून सरकारचे कान पिळणारें पार्लमेंट आहे, त्याच्या पुढें ओरडण्यास कांहीं माणसें वाहून दिलीं म्हणजे तो भाग आटोपला, असें समजून आपण अंतर्निरीक्षणास किंवा आत्मपरीक्षणास लागावें हाच एक मार्ग आज उरला आहे. सरकारची कोंडी फोडण्यास दोन तीन गड्डी लावून दिले म्हणजे बाकीचा खेळ आपला आपण तडीस न्यावा हेंच बरें. कोंडी फुटून लाभ झाला तर ठीकच; निदान कोंडी फोडण्याच्या नादानें आमच्या गड्यांनीं मार खाल्ला नाहीं म्हणजे आम्हांस बस्स आहे. आमच्या गड्यांनीं कोंडीवाल्यास चार घटका दमविलें एवढींच फुशारकी प्रस्तुतच्या बिकट काळांत कांहीं कमी आहे, असें मानण्याचें कारण नाहीं.

आमच्या स्वतःच्या राष्ट्रांत अशिक्षित, सुशिक्षित, श्रीमंत व गरीब असे लोक आहेत. इतर राष्ट्रांत श्रीमंत व गरीब लोक आपआपल्या राष्ट्राच्या राष्ट्रीय स्थितीसंबंधानें सुशिक्षित असतात. या दृष्टीनें पाहतां त्यांच्यांत अशिक्षित लोक नसतातच असें म्हणण्यास हरकत नाहीं. यामुळें स्वराष्ट्राभिमान त्यांच्यांत उज्ज्वल असतो व राष्ट्रहिताच्या कोणत्याहि कामीं मनुष्यबळाची किंवा द्रव्यबळाची त्यांच्यामध्यें कधींहि वाण पडत नाहीं. आमच्यामध्यें हें प्रकरण फार निराशाजनक आहे. दीर्घ परदास्यामुळें स्वाभिमान लुप्तप्राय झाला आहे. संघशक्तीनें कार्य उठविण्यास लागणारा परस्पर विश्वास नाहींसा झाला आहे. आपल्या जवळच्या लोकांसाठींसुद्धां स्वार्थत्याग करण्याची बुद्धि कोठें फारशी उरली नाहीं. आपल्या कुटुंबापलीकडे दुसरें कांहीं रक्षण करण्यासारखें आहे असें

किंवा वादविण्यासारखें आहे असें वाटत नाहीं. अशा स्थितींत व्यापक राष्ट्रीय प्रश्नाचा विचार करणारे लोक पुढें येत नाहींत. जे थोडे पुढें येतात त्यांस मिळावें तसें साहाय्य मिळत नाहीं. अशा रीतीनें आपला दाम खोटा, मग राज्यकर्त्यांस किंवा दुसऱ्या कोणांस तरी काय बोल लावावा ? इंग्रज लोक म्हणजे कांहीं देव किंवा ऋषि नव्हेत. केवळ परोपकार करण्यासाठीं त्यांचा अवतार नाहीं. त्यांना आपलें राष्ट्र आहे, तें राष्ट्र वाढत्या लोकसंख्येचें आहे, त्या राष्ट्रांतील तरुण व होतकरू लोकांची सोय लावून इंग्रजी राज्याचा विस्तार वाढवावा व जगांत त्याचा लौकिक व्हावा अशी त्या राष्ट्राची महत्त्वाकांक्षा असणें साहजिक आहे. आपण जगांत सर्व लोकांची सुधारणा करण्यासाठीं देश कात्रीज करतों. आपली भाषा, आपली संस्कृति, आपलें सामर्थ्य व आपले सर्व सद्गुण दुसऱ्या लोकांना अनुकरणीय आहेत, म्हणून हिंदुस्थानसारख्या अफाट देशांत येऊन त्यास त्या सर्वांचा लाभ आम्ही देत आहों असें त्यांच्या म्हणण्यांत येतें. 'तुम्ही कोणत्या दुःस्थितींत होता, तुमचे पूर्वींचे राजे किती कुमार्गानें चालत होते, जागोजाग चोर, दरवडेखोर यांचा सुळसुळाट होता, दुष्काळ आला म्हणजे लोक पटापट मरत होते, त्यांना धान्याचा पुरवठा दुरून भराभर होण्यास आतांसारख्या सोयी नव्हत्या याचा विचार करा; तुम्ही कधींहि एकराष्ट्र नव्हता, अजूनहि नाहीं आहां. तेव्हां इंग्लंड, फ्रान्स, इटलीप्रमाणें राजकीय हक्क मिळून तुमचें निराळें स्वतंत्र राज्य व्हावें अशी जरी आमची इच्छा आहे तरी तसें होण्यास तुमच्या विविध जातिधर्मांची अडचण आहे, म्हणून तुमच्या देशांत शांतता व सुव्यवस्था राखण्यास आम्ही झटत आहों.' अशा प्रकारच्या गोड गोड भाषणांतील विचार ऐकून आमच्यापैकीं कित्येक लोक, स्वदेशोत्कर्षाचे स्वतंत्र प्रयत्न कांहीं शक्य नाहींत, राज्यकर्त्यांच्या नादानेंच चाललें पाहिजे, तिकडचाच शिक्षणक्रम व राज्यव्यवस्थेचा क्रम आपणांस हितावह होईल म्हणून प्रतिपादन करतात. वस्तुतः गोष्ट तशी नाहीं. नैतिक व सामाजिक आचार आपआपल्या राष्ट्रांत उत्क्रांत होतील तसेच ते हितावह होतील. या बाबतींत शिक्षणक्रम आपल्या राष्ट्रांत जो पूर्वीं होता तोच आपल्या बदललेल्या स्थितींत थोड्याफार फेरफारानें उपयोगी पडेल. आमचे राजकीय प्रश्न आम्हींच उलगडावेत हेंच योग्य आहे. त्यांत रणें पडलीं तरी हरकत नाहीं. फक्त ब्रिटिश साम्राज्याचें सूत्र सर्वांस सारखेंच असलें म्हणजे अंतर्व्यवस्थेंत इंग्रजांनीं किंवा पार्लमेंटनेंहि हात घालण्याचें कारण नाहीं. आमच्या गांवांतच एका घरांत तीन भावांचा लढा असला तर त्यांनीं बोलावून ऐकटपत्र म्हणजे तुम्ही निकाल

चाल त्याप्रमाणें आम्ही वागूं असें कबूलीपत्र दिल्याशिवाय, एखादा माणूस मीं तुमचें सर्व आपल्या हवालीं करून घेतलें आहे, मी मालक व न्यायाधीश होऊन तंटा तोडतों, असें म्हणेल तर त्याचें कोणी ऐकेल काय? परंतु आमच्यांतील कित्येक सुशिक्षित म्हणविणारांना आपला आपण विचार करण्याची कल्पना अशक्य व अप्रयोजक वाटते. साम्राज्यांत राहणाऱ्या वसाहतीला जसें आपलें अंतःस्वातंत्र्य आहे तसें आम्हां भारतवासीयांस पाहिजे आहे, परंतु हें दृढनिश्चयानें मागण्यास सर्व राष्ट्रानें एकदिलानें ओरडावयास व त्यासाठीं झगडावयास पाहिजे आहे. ही समजूत राष्ट्रांतील सर्व लोकांची झाली पाहिजे. परंतु विहिरींत असेल तरच पोहऱ्यांत येईल कीं नाहीं? आजपर्यंत सुशिक्षित म्हणून तयार झालेल्या लोकांतच ह्या कल्पना मनांत आल्याबरोबर दाबून टाकण्याची प्रवृत्ति झाली असल्यानें त्यांच्या हातून तरुण पिढीचें शिक्षण नवीन तऱ्हेचें कसें होणार? तेव्हां या सुशिक्षित सधन माणसांकडून जर राष्ट्रहित व्हावयाचें असेल तर त्यांच्या डोळ्यांवरील पटल नाहींसें झालें पाहिजे. तसें दूर झाल्यावरच त्यांचें नवीन तऱ्हेच्या म्हणजे राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनांस साहाय्य मिळणार. एरवीं चेंबर्स शार्ट स्टोरीज, मॉरल क्लासबुक, बुक ऑफ गोल्डन् डीड्स, मराया एजवर्थ्स मॉरल टेल्स, सँडफर्ड अँड मर्टन, विकार ऑफ वेकफील्ड असल्याच पुस्तकांतून विद्यार्थ्यांचें नीतिशिक्षण झालें पाहिजे ही चिकाटी सुटणार कशानें? रामायण, महाभारतांत सर्व जगास पुरें इतकें नीतिशिक्षण आहे ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. आमचा इतिहास आम्हांस सांगतों कीं आमच्यामध्यें मोठमोठे राष्ट्राभिमानी वीर उदयास आले. धर्माबद्दल, देशाबद्दल व स्वराज्याबद्दल ओतप्रोत अभिमान असलेले मुत्सद्दी व शूर पुरुष भरतभूमीस भूषित करते झाले, असें असून खरा देशाभिमान ही कल्पना आपणांस नवीनच आहे. ती आपण पाश्चात्त्यांपासून शिकलों आहों असा ग्रह आमच्यांतील कांहीं मंडळींचा आहे तो जाणें जरूर आहे. श्रीसमर्थ म्हणतात त्याप्रमाणें ‘ जुनें ठेवणें मीपणें ते कळेना ’ अशी स्थिति झाली आहे. ती जाईल तेव्हां त्या ठेवण्याचा लाभ आपल्या पुढील पिढीस करून देण्यासाठीं जे कोणी प्रयत्न करतील त्यांस द्रव्यबलाची व माणूसबळाची उणीव पडणार नाहीं.

खुद्द इंग्लंड देशांत सर नॉर्मन लॉकीयरसारखे जाडे विद्वान् म्हणत आहेत कीं, शिक्षणाचा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे आणि आमच्या या देशांत माणशीं दीड आणासुद्धां शिक्षणाच्या कामीं खर्च होत नाहीं. येथें शिक्षणाची काय व्यवस्था आहे इकडे कोण बघतो काय? विश्वासानें विलायत सरकारच्या मांडीवर मान ठेवून आम्ही स्वस्थ निजलों त्याचा परिणाम काय झाला आहे

तो दिसतच आहे. अज्ञान व दैवभोळेपणा, स्वावमानित्व व परावलंबित्व, हताशत्व व हृदयदौर्बल्य यांचें साम्राज्य माजून राहिलें आहे. याचें कारण सरकारनें आपल्यावरील जबाबदारी ओळखलीच नाहीं, मग बजावण्याचें काम दूरच राहिलें. अत्यंत सरळपणानें या गोष्टीचा विचार करणारे लोक असेंच म्हणतात. परंतु इंग्लंडच्या व्यापाराभिवृद्धीसाठीं व तेथील लोकांच्या शिक्षणासाठीं जे प्रयत्न सरकारनें केले ते पाहून, निवळ अजाणपणा किंवा बेपर्वाई याहून अधिक दोषास्पद कारण हिंदुस्थानास सांप्रतच्या दुःस्थितींत राहूं देण्यास झालें आहे असेंहि कांहीं लोकांच्या मनांत आलें तर नवल नाहीं. क्षुद्रबुद्धीनें किंवा मत्सरानें हिंदुस्थानास अवनतींतच राहूं देण्यांत आपलें हित आहे असें वाटून, इकडे पुरवावें तितकें लक्ष बुद्धिपुरःसर दिलें नाहीं असें वाटून, कित्येक लोक मि. दादाभाई वगैरे लोकांप्रमाणें इंग्रजी राज्यानें आमचें कांहीं हित झालें आहे असें म्हणण्यासदेखील अनमान करीत असतात. त्यांतहि कांहीं अर्थ नाहीं असें आम्हांस म्हणवत नाहीं. सारांश, इतउत्तर या गोष्टीची उपेक्षा करणें आणि पुनः पुनः सरकारच्या तोंडाकडे आशापूर्ण नयनांनीं पाहणें म्हणजे प्रेतास जीव येईल अशी आशा करून राहण्यापैकींच आहे.

## ( २ ) " समर्थ विद्यालयाचीं कांहीं वैशिष्ट्यें "

" राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय हेंदेखील आमच्यापैकीं कित्येकांस पुरें कळलें नाहीं, यांत आम्हांस आश्चर्य वाटत नाहीं. हिंदुस्थानास राष्ट्रीयत्व आहे काय असाच ज्यांना संशय वाटतो त्यांच्याहि वाटेस जाऊन त्यांच्या मतीचा कलंकहि झाडला पाहिजे. हिंदु, मुसलमान, पार्शी व एतद्देशीय ख्रिस्ती ह्या सर्वांचें हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे, तें नवीन बनवावयाचें किंवा बनावयाचें आहे असा भ्रम बाळगण्याचें बिलकुल कारण नाहीं. एकराष्ट्रत्वास लागणाऱ्या गोष्टी हिंदुस्थानांत आहेत म्हणूनच आज २१ वर्षें राष्ट्रीय सभा चालली आहे. कांहीं मूढ किंवा पढतमूढ लोक आहेत त्यांस प्रसंगविशेषीं झालेल्या हिंदुमुसलमानांच्या बेबनावामुळें व क्वचित् वेळेनुसार झालेल्या परस्परांच्या डोकींफोडीमुळें हिंदुस्थानच्या एकराष्ट्रत्वाबद्दल संदेह वाटतो, व हेच लोक कित्येक आपमतलबी इंग्रजांप्रमाणें हिंदुस्थान एकराष्ट्र कधींच होणार नाहीं असें प्रतिपादूं लागतात. आमच्या मतें या बोलण्यांत अर्थ नाहीं. जो जो या भूमीस आपली जन्मभूमि म्हणतो तो तो या राष्ट्राचा अवयव. एका मोठ्या वाड्यांत जितकीं बिऱ्हाडें राहतात तितक्यांचा तो वाडा. तितक्यांचे हितसंबंध एक आलेच म्हणून समजावें. आतां बाहेरून

कोणी येऊन कलहाचें बीज पेरणारा भेटला तर त्यांचे कायमचे संबंध थोडेच तुटणार आहेत? परोपदेशानें हें वितुष्ट उद्भवलें नाहीं तरी आपआपल्या कमसमजुतीनेंहि एकमेकांस आपण पाण्यांत पाहतों; परंतु ते प्रसंग अगदीं तात्पुरते. एका पिढीला भांडण होईल तर दुसऱ्या पिढीला सलोखा होईल. एका गोष्टींत वैमनस्य आलें तर दुसरी एक गोष्ट अशी उद्भवते कीं, तिच्यायोगें सौमनस्य पुनः स्थापित होतें. अशा कालवशात् उपस्थित झालेल्या वादावरून जर एकराष्ट्रत्व नष्ट झालें तर दोन सख्खे भाऊ कोर्टांत तंटा खेळणारे व एकमेकांशीं अगदीं अबोला धरणारे असतात म्हणून त्यांचें एक-कुटुंबत्वहि नष्ट झालेंच पाहिजे. एका गांवांत राहणारे, एका घराची वांटणी आपआपसांत करून वावरणारे, एका जमिनीच्या तुकड्याचे तुकडे करून कष्टमशागत करून उपजीविका करणारे लोक एकाच हितांहितसंबंधानें जखडले जातात हें सांगावयास एक पोर पुरें आहे; परंतु परप्रत्ययनेयबुद्धि अशा माणसांची संख्या वाढूं लागल्यानें व बुद्धिभ्रंशाचीं स्पष्ट चिह्नें दिसून आल्यानें साध्या सरळ गोष्टीसुद्धां मोठ्या गंभीरपणानें प्रतिपादिण्याचा प्रसंग येतो. म्हणून मि. रसूलसाहेबांना आपल्या धर्मबंधूंना कंठरवानें सांगावें लागलें. 'अहो मुसलमान लोकहो, तुम्हांला या भरतभूमींत राहावयाचें आहे, इराण, अरबस्तान किंवा तुर्कस्तानांत जावयाचें नाहीं, ही भरतभूमीच तुमची जन्मभूमि आहे, म्हणून तुम्हांस आपले राष्ट्रबंधु हिंदूंपासून अलग राहतां यावयाचें नाहीं.' हीच गोष्ट पारश्यांची व हीच येथील ख्रिस्ती लोकांची. या सर्वांनीं मिळून राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. एक तत्त्व पुढें ठेवून शिक्षणाच्या संस्था स्थानिक परिस्थितीप्रमाणें भिन्न भिन्न प्रकारच्या असल्या तरी हरकत नाहीं. राष्ट्राच्या संबंधानें विचार करतांना आपण सर्व एकजीव आहों असें मानून त्याप्रमाणें वर्तन करण्यास तयार राहूं असें धोरण राखून निरनिराळ्या धर्मांच्या लोकांनीं आपआपल्या सोयीप्रमाणें प्रयत्न केले तरी हरकत नाहीं. फक्त धर्माचे व जातीचे संबंध येतील तेवढे खेरीजकरून बाकी सर्व गोष्टींचा फायदा सर्वांस सारखा मिळाला म्हणजे झालें.

असें धोरण ठेवून मुसलमान लोकांनीं आपल्या अलीगड कॉलेजची स्थापना केली आहे व तेंच धोरण भारतीय विश्वविद्यालय स्थापन करूं पाहणारांच्या मनांत आहे. त्या विश्वविद्यालयाची पूर्वतयारी व्हावी म्हणून सर्व देशभर त्या धोरणाच्या दुय्यम शाळा झाल्या पाहिजेत असा विचार मनांत आणून '**समर्थ विद्यालय**' नांवाची दुय्यम शाळा येथें उघडण्यांत आली आहे. ह्या शाळेंत

मुसलमान, ख्रिस्ती, पारशी यांचा प्रवेश होण्यास कोणतीच नड नाहीं. परंतु मुख्यत्वेंकरून हिंदु लोकांच्याच रीतीभाती व धर्म यांच्याकडे लक्ष ठेवून बहुतेक व्यवस्था करण्यांत येते. शाळेंत नेमलीं जाणारीं वाचनपुस्तकें व दिल्या जाणाऱ्या सुट्ट्या व केला जाणारा धर्मनीतिन्यायाचा बहुतेक उपदेश आर्य सनातन धर्मास अनुसरून असावयाचा. यांत राष्ट्रीयपणा राखला जाईल. त्यावरून असें सिद्ध होईल कीं, पाश्चात्त्य किंवा इतर कोणत्याहि लोकांपासून मिळण्याजोग्या शिक्षणापासून हट्टानें किंवा दुरभिमानानें पराङ्मुख न होतां आपल्या घरींच असलेल्या साधनांचा पूर्ण उपयोग करून घेण्याकडे चालकांचें विशेष लक्ष आहे. या दृष्टीनें पाहतां समर्थ विद्यालयाचा पहिला विशेष हा कीं, त्यांतील **'सर्व विद्यार्थी ब्रह्मचारीच पाहिजेत.'** बाकीचे श्रुतिस्मृतिपुराणोक्त ब्रह्मचर्याचे सर्व आचार यथास्थित पाळणें शक्य नसलें तरी त्यांपैकीं पहिली व अत्यंत महत्त्वाची गोष्ट अविवाहित स्थिति तिचा पूर्ण स्वीकार केला आहे. बालविवाहाची दुष्ट चाल आपणांत रूढ झाली आहे म्हणून व्याख्यानें देणें, किंवा बालविवाहाविरुद्ध शपथा व सह्या घेऊन समाज बनविणें किंवा इतर प्रकारांनीं चळवळ करणें, यापेक्षां मुलांमुलींच्या शाळाच अशा निघाव्यात कीं ज्यांत विवाहित विद्यार्थ्यांचा प्रवेशच व्हावयाचा नाहीं. अशा प्रकारच्या पूर्वसूचना न करतां कडक नियम केल्याबरोबर आमच्या शहरीं तरी लोक खडबडून जागे झाल्यासारखे झाले आहेत. कित्येक वर्षांच्या चळवळीनें जें अंजन डोळयांत पडलें नाहीं तें एकदम पडल्यासारखें झालें आहे. कोणाचीहि मदत न घेतां शाळा काढण्याची तयारी केल्याबरोबर लोकांत इतकी जागृति झाली आहे व आपल्या मुलांची किंवा पोष्यांची लग्नें करून टाकल्याबद्दल पश्चात्ताप झाला आहे. तर हेंच काम सरकारच्या शाळांतून योग्य नियम व अगाऊ सूचना देऊन करण्यांत आलें असतें तर किती बहार झाली असती असें आम्हांस वाटूं लागलें आहे. सरकारवर जी जबाबदारी आहे ती आम्हांवर नसल्याकारणानें आम्हीं एकदम प्रथमच नियम करून टाकला व त्याची कडक अमलबजावणी सुरू केली. आमची शाळा निघण्यापूर्वींच ज्यांचा विवाह झाला आहे अशा मुलांना व त्यांच्या पालकांना आमच्या शाळेचा मार्ग सोडावा लागल्याबद्दल मनापासून वाईट वाटत आहे हें आम्ही जाणून आहोंत, व त्याबद्दल आम्हांसहि दिलगिरी वाटते. आमच्या शिक्षणक्रमावर व शिक्षणपद्धतीवर परिपूर्ण विश्वास असून ज्याची अशा तऱ्हेनें निराशा होत आहे त्यांच्याबद्दल खेद वाटूनहि आजच्या स्थितींत आमचा नाइलाज आहे. विवाहित व अविवाहित विद्यार्थी एकाच ठिकाणीं ठेवून त्यांच्या-

कडून विद्याभ्यास करविण्याची आमची इच्छा नाहीं. आमची शाळा निघण्यापूर्वींच आमच्यासारखे विचार मनांत येऊन ज्यांनीं आपल्या मुलांना विवाहपाशांत जखडून टाकलें नाहीं, त्यांनाच त्या दूरदृष्टीच्या विचाराचें फळ मिळावें यांत आम्हांस संतोष व आनंद वाटतो. शिवाय, आज जी लोकांची निराशा होत आहे तिचा परिणाम आमच्या दृढ निश्चयामुळें समाजावर जितका पूर्ण व स्पष्ट होईल तितका आम्ही थोडा मऊपणा दाखवून कांहीं अटीवर विवाहितांचा प्रवेश करण्यानें होणार नाहीं. यासाठीं 'विवाहित' म्हटल्याबरोबर प्रवेश नाहीं असा निग्रह धारण करणें व तसेंच मध्यंतरीं विवाह केल्यास शाळा सोडावी लागेल असें स्वच्छ वजाविणें यापासूनच एकंदरींत हित आहे असा आमचा समज आहे. ज्या मुलांना व पालकांना आमच्या विद्यालयाविषयीं आदरबुद्धि असेल तीं मुलें व ते पालक शीघ्रविवाहाच्या उलट होतील. अमक्या शाळेंत प्रवेश होणार नाहीं म्हणून माझें लग्न करूं नका असा हट्ट घेण्यानेंसुद्धां कित्येक आईबाप व पालक यांचा निरुपाय होईल. अशी योग्यता आमच्या संस्थांची होणें हें सर्व पुढील यशापयशावर आहे. त्याबद्दल शेखमहंमदी करीत बसण्याचा हा प्रसंग नव्हे. तथापि, खुद्द मुलांच्या कोमल मनावर एक प्रकारचा ठसा उत्पन्न होतो व त्याचाहि एखाद्या चळवळीस मोठा उपयोग होतो असा स्वदेशी चळवळीपासून अनुभव आला आहे. स्वदेशी कपडे घेण्याच्या, स्वदेशीहून इतर साखर न वापरण्याच्या, किंबहुना हरतऱ्हेचा स्वदेशीच माल वापरण्याच्या हट्टावरून कित्येक कुटुंबांत वडील माणसांच्या अर्ध्या-मुर्ध्या निश्चयास किंवा पूर्ण विरोधास लज्जा उत्पन्न होऊन तीं कुटुंबें पूर्ण स्वदेशी झालीं आहेत. हाच प्रकार स्वदेशी विद्यालयांचा होऊन आमच्यांतील बालविवाहाची अनिष्ट चाल मोडण्यास साहाय्य होईल, असा आशांकुर आमच्या दृढनिश्चयामुळें आमच्या मनांत उद्भवला आहे. निवळ मुलांच्या मनोविकारापासून इतकें कार्य होण्याचा संभव असेल तर सारासार विचार करण्यास समर्थ असलेल्या प्रबुद्ध मातापितरांनीं व पालकांनीं या गोष्टीचें शांतपणें मनन केल्यास केवढी बहार होईल, व राष्ट्रामध्यें केवढा नवीन जोम आणल्याचें श्रेय ते घेतील? हल्लीं या बाबतींत बरीच जागृति झाली आहे, तरी चांगलीं चांगलीं सुजाण माणसेंहि विचारतात, "काय हो, तुम्ही ही अट मोठी बिकट ठेवली आहे. यांत तुमचा काय मतलब आहे? असें कां करतां? यामुळें कित्येक मुलांना तुमच्या शाळेंत यावयास नड होईल?" अशा लोकांस आजन्म ब्रह्मचारी राहिलेल्या भीष्माचार्य, मारुति वगैरेंच्या बळाची आठवण देणें भाग पडतें. भीमार्जुनासारखे कट्टे वीर पण

भीष्मापुढें काय त्यांचा पाड? भीष्माचार्यांबद्दल तर खुद्द भगवंतास भग्नप्रतिज्ञ व्हावें लागलें, व त्यांच्या पायावर द्रौपदीस घालून तिच्याकडून प्रकारांतरानें नवऱ्यांस जीवदान मागविलें. परंतु हे अपवाद सोडून दिले तरी आपल्यांतील प्राचीन काळची सररहा पद्धति हीच, म्हणजे यावदध्ययन ब्रह्मचर्य पाळून नंतर समावर्तन ( सोडमुंज ) व गृहस्थाश्रम. या गोष्टीचें इतकें विस्मरण पडावें कीं तिचें पुनरुज्जीवन करूं पाहणारांच्या प्रयत्नानें विस्मित होण्यापर्यंत लोकांची विचारावनति यावी! यामुळें खेद वाटतो. दुसरी गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे ती तरी स्पष्ट पाहावी कीं नाहीं? परंतु आपल्या या सांप्रतच्या स्थितींत दुसऱ्याच्या वाईट गोष्टीबद्दल लांब जीभ करून वाटेल तशी टीका करण्यांत आम्ही तरबेज आहों; परंतु त्यांच्यांतील अनुकरणीय गोष्टींकडे पूर्ण दुर्लक्ष करतों. हल्लीं ब्रह्मचर्य पाळून अध्ययन करणारे आमच्या राज्यकर्त्यांपैकीं सगळे आहेत. सर्व विद्याक्रम परिपूर्ण होऊन पोटापाण्याची सुरेख सोय झाल्याखेरीज इंग्रज लोक विवाहाचा विचार करीत नाहींत. त्यांच्यांतील मुलाबाळांची वाढ पाहून तरी आम्हीं कांहीं बोध घेऊं नये काय? अविवाहित स्थितींत क्रियाक्रम पूर्ण झाल्याकारणानें त्यांना सर्व पृथ्वीतलावर कोणत्या पाहिजे त्या देशांत उद्योगधंद्यासाठीं जाण्यास भीति वाटत नाहीं. अशा प्रकारचे परिणाम आमच्या समाजांत दिसून येण्यास आम्हीं समर्थ विद्यालयांत सुरू केलेल्या क्रमाचें अवलंबन सतत ५० वर्षें तरी चाललें पाहिजे. या विषयावर निबंधरूपानें पूर्ण विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे, म्हणून आमच्या शाळेचा पहिला विशेष जो ब्रह्मचर्यनिर्बंध त्याविषयीं इतकेंच लिहिणें बस्स आहे.

दुसरी निश्चयाची गोष्ट आम्ही अमलांत आणूं इच्छितों ती ही कीं, दुय्यम शिक्षणाचा प्रारंभ होतां होईल तों उशिरां करावा. हल्लीं मुलाला पुरें बोलावयास येत नाहीं, किंवा ज्याचे त्यास कपडेसुद्धां संभाळण्याचें ज्ञान नसतें तों त्यानें शाळेंत जावें अशी आईबाप किंवा पालक यांची मनापासून इच्छा असते. यामुळें नवव्या वर्षाच्या प्रारंभापासून क्वचित् जरा आधींच मुलाचा ए. बी. सी. ला प्रारंभ होऊन दहाव्याच्या आरंभाला मुलगा तिसऱ्या किंवा चौथ्या इयत्तेंत येतो. याहून लवकर कोणी मुलगा शिकेल तर त्याची विशेष वाहवा होते. यायोगें अल्प वयाच्या मुलीला झालेली संतति या शिक्षणाच्या अकालिक ओझ्याखालीं दडपून जाते, म्हणून हा प्राथमिक शिक्षणाच्या प्रारंभाचा काल पुढें पडावा म्हणून समर्थ विद्यालयांत प्रवेश होणाऱ्या मुलास दहावें वर्ष पूर्ण झालें पाहिजे असें ठरविलें आहे. यायोगें आमच्या शाळेंत येऊं इच्छिणाऱ्या कित्येक पालकांशीं बुद्धिवाद

करून त्यांची समजूत पाडावी लागली, कीं ही भराभर इयत्ता चढविण्याची गोष्ट म्हणजे शारीरिक दौर्बल्यास आदरानें व प्रेमानें बोलावून आणून त्यास सुखासमाधानाचें वसतिस्थान करून देण्यासारखी आहे. आपलीं आवडतीं मुलें अकालीं यमसदनास पाठविण्याची तयारी करून देणेंच होय ही पक्की गांठ मारून ठेवावी. आठव्यानवव्या वर्षीं मुलाच्या काखेंत इंग्रजी दप्तर देणें म्हणजे त्या घोर प्रवासाची शिदोरी बांधून तीच त्याच्याबरोबर देऊन आपणच त्याला तिकडच्या मार्गावर पोंचविण्यास सिद्ध झाल्याप्रमाणें आहे. दुसऱ्या अनेक अनिष्ट गोष्टी या दुय्यम शिक्षणाच्या प्रांतांत मुलें घुसडून देण्यापासून आपल्या हातून होतात, त्यांचा विचार सोडून दिला तरी हीच एकटी म्हणजे लहान जीवावर भला मोठा बोजा घालून त्याखालीं त्याला चूर करून टाकण्याची गोष्ट पूर्णपणें आपल्या लोकांच्या मनावर बिंबली तरी केवढें हित होणार आहे, हें आम्हीं सांगावयास नको.

शाळेंत मुलें घेतांनाच चांगलीं पाहून घ्यावींत असा चार-दोन वर्षांखालीं अमेरिकेंतील एका शाळेच्या चालकांनीं केलेला निश्चय आमच्या वाचण्यांत आला होता. सशक्त व डोळ्यानें अधू नसलेलीं मुलें शाळेंत घेतलीं म्हणजे निव्वळ विद्याभ्यासाचा परिणाम शरीरप्रकृतीवर काय होतो हें पाहतां येईल. हल्लींच शाळेंत येण्यापूर्वी शहरांतील सर्व मुलांचे डोळे तपासले तर त्यांपैकीं बरींच मुलें हीनदृष्टीचीं आढळून येतील; म्हणजे त्यांच्या कुलक्रमागत व्यंगाचें किंवा त्यांच्या मातापितरांच्या व्यंगाचें त्यांच्यामध्यें प्रतिबिंब पडतें. कित्येक वेळां मूळची दृष्टि शाबूत असून बालसंगोपनाच्या कामीं हयगय झाल्यानें कांहीं व्यंगें जडतात; त्यांत थोडाबहुत प्रसाद नेत्रेंद्रियास मिळतो. अशा प्रकारच्या मुलांतून सरसकट मुलें शाळेंत घेतलीं जातात, आणि मग सात-आठ वर्षें विद्याभ्यास झाला म्हणजे त्यांच्या दृष्टींतील कमीपणा उदयास आला कीं विद्येच्या माथ्यावर सर्व खापर फुटावयाचें. वस्तुतः असल्या चोचलेखोर विद्याभ्यासाचा ज्यास जात्या कंटाळा असतो अशांस बरेंच फावतें. विद्याभ्यास चांगल्या रीतीनें केला म्हणजे 'किं किं न साधयति कल्पलतेव विद्या' हेंच खरें ठरेल असा आमचा पूर्ण भरंवसा आहे. उत्साहानें विद्याभ्यास ज्या दिवशीं होईल त्या दिवशींची मनाची हुशारी व शरीराचें सामर्थ्य, कांहीं कारणानें वेळ फुकट गेला असेल त्या दिवसाच्या मलूलपणा व औदासीन्याशीं ज्यांनीं ताडून पाहिलें असेल त्यांसच आम्ही म्हणतों त्याची कल्पना होणार आहे. सहा मैल फिरून येण्याचा व्यायाम व चार-पांच तास एकान्तवासांत झालेलें निर्वेध वाचन किंवा लेखन ज्या दिवशीं होईल तो दिवस आनंदाचा! त्या दिवशीं झोंप कशी सुरेख येते

पण विद्यार्थिदशेंतदेखील असा क्रम होत नाहीं व नियमानें तर होत नाहींच, अशांना परीक्षेच्या अगोदर दोन महिने यंत्रांत जोरानें वाफ भरावी लागते. अशा पिशाच-वृत्तीच्या वर्तनानें विद्यार्थ्यांचें शरीर व बौद्धिक सामर्थ्य खर्ची पडलें म्हणजे कायावाचामनेंकरून सतत एखाद्या गोष्टीस वाहून घेण्याचें त्यांच्या हातून केव्हांच होत नाहीं. यांत सर्व प्रकारचे लोक येतात. मूळचे अशक्त व सशक्त सर्व सांपडतात. या चरकाचा परिणाम सर्वांवर होतो; मूळच्या अशक्तांवर विशेष होतो. ह्या अनुभवसिद्ध गोष्टी पुढें ठेवून समर्थ विद्यालयांतील विद्यार्थ्यांचे नवीन म्हणजे खालचे खालचे वर्ग लहान ठेवून प्रत्येक मुलाकडे शिक्षकाचें लक्ष विशेष लागेल अशी योजना आहे. पालकांनीं घरीं शिक्षक ठेवावयाचा नाहीं असें निक्षून सांगण्यांत येतें. खाजगी रीतीनें शाळेंतील धडे शिकून येणारीं मुलें वर्गांत दुर्लक्ष करतात, दुसऱ्या मुलांस बोलवितात किंवा घरच्या पंतोजीनें सांगितलेल्यांत व वर्गशिक्षकानें सांगितलेल्यांत कोठें जरा अंतर पडलें तर किंवा खाजगी शिक्षकानें एखादी विशेष शिकवलेली गोष्ट वर्गशिक्षकास विचारून ती त्यास वेळीं सांगतां आली नाहीं तर टवाळी करतात, शिवाय घरून शिकून आल्यानंतर दिलेलीं उत्तरें इतर मुलांपेक्षां अर्थात् वरचढ होऊन त्या मुलास तात्पुरती शाबासकी मिळते. परंतु शिक्षकास खुद्द मुलाच्या बुद्धीची प्रगति किती झाली आहे, स्वतः त्यास अर्थ लावण्याची शक्ति किंवा कोणतीहि क्लृप्ति लढविण्याचें कौशल्य किती आहे हें कळण्यास मार्ग नसतो. यामुळें घरीं शिक्षक ठेवलेलीं मुलें स्वावलंबी होत नाहींत. कांहीं दिवस उसन्या शहाणपणावर फुशारकी मारून असतात व इतर मुलांपेक्षां आपण उत्तरें चांगलीं देतों म्हणून फुगतात व पुढें पुढें गृहशिक्षणाची मदत कमी झाल्यावर त्यांची फजिती उडते. एकंदरीनें शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या गोष्टींबद्दल घरीं शिक्षक ठेवणें चुकीचें आहे.

कित्येक शिक्षक आपलीं कामें हलगरजीपणानें करतात, शाळेंत शिकवीत नाहींत, नुसते प्रश्न विचारून गुण ( मार्क ) देऊन मुलांच्या बुद्धीचा व दुसरीकडून मिळविलेल्या ज्ञानाचा हिशेब ठेवतात. प्रत्येक तासाला व धड्याला आणि विशेषतः नवीन शिकविला जाणारा धडा असला तरी त्यालासुद्धां गुण देऊन त्यांची नोंद ठेवणारे शिक्षक असतात. असल्यांस, शिक्षकाचें काम सांगितल्यापेक्षां मुलकी खात्यांत हिशेबी वही लिहिण्यास सांगणें बरें. कांहीं शिकवून मग आपल्या शिक्षणाचा परिणाम काय झाला आहे हें पाहण्यासाठीं परीक्षण करावें लागतें. परंतु त्या परीक्षणाच्या वेळीं विशेषतः तोंडी परीक्षणाच्या वेळीं गुण देणें ठीक नाहीं. कारण वर्गांत झरझर विचारले जाणारे प्रश्न सारखेच

कठीण किंवा सोपे नसतात. त्या वेळचे गुण म्हणजे सोडतींत मिळालेल्या बक्षिसाप्रमाणें होत. यासाठीं सर्वांस सारखे प्रश्न असतात अशी लेखी परीक्षा घेऊन स्थूलमानानें प्रती लावणें हेंच काय तें खरोखर शक्य असतें. भाषा, इतिहास, भाषांतर, निबंधलेखन इत्यादि विषयांत अगदीं तंतोतंत गुण देणें अशक्य आहे, निदान फार कठीण आहे. तेव्हां असलें अवघड काम नित्य करण्यांत अर्थ नाहीं. रोज शिकविण्याचें म्हणजे ज्ञानधन समर्पण करण्याचें उदार कार्य करीत असावें, व तें करतां करतां दिलेला निधि कितपत रक्षण करणारे विद्यार्थी आहेत त्याची चांचपणी करीत करीत हें ज्ञानदान चालवावें, हेंच काय तें खऱ्या व सरळ शिक्षकाचें पहिलें काम होय. त्याचप्रमाणें दिलेल्या द्रव्याची वाढ स्वत: करावयास विद्यार्थी समर्थ होत आहे कीं नाहीं हेंहि पाहणें महत्त्वाचें आहे.

बुद्धिशिक्षणाबरोबर शरीरसंवर्धन होत आहे कीं नाहीं हा विचार आवश्यक आहे. तसेंच विद्यासंपन्न होत असतां शिष्य विनयसंपन्नहि होत गेला पाहिजे. ह्या सर्व गोष्टी विसंगत नाहींत; इतकेंच नाहीं, परंतु शिक्षकाच्या धंद्याला मुख्यत्वेंकरून जर एक गोष्ट अनुकूल असेल तर ती हीच कीं, या सर्व गोष्टी परस्परांस पोषक व साहाय्यकारक आहेत. शरीरसंपत्ति नीट असली म्हणजे अभ्यास चांगला होतो. अभ्यास चांगला झाला अर्थात् आपलें काम आपण चांगलें केलें असें समाधान वाटलें म्हणजे मन प्रसन्न होऊन त्याचा शरीराच्या वाढीवर सुपरिणाम होतो. शील चांगलें असेल त्याचीच शरीरसंपत्ति ठीक असते. आणि विशेष अनुभवाची गोष्ट अशी आहे कीं, शरीरसंपन्न मुलाच्या मनांत कुढे विचार येण्याचा संभव कमी असतो. कपटी वर्तन किंवा भ्याडपणा या गोष्टी त्याच्यामध्यें सहसा नसतात. शील व आरोग्य ह्या गोष्टींची अध्ययनास मदत होते. तेव्हां या सर्व गोष्टी ज्यांच्या योगानें सारख्या वाढत जातील असे उपाय योजणें हें समर्थ विद्यालयाचे चालक आपलें अंगीकृत कार्य समजत आहेत.

यासाठीं विद्यार्थ्यांच्या शरीरप्रकृतीकडे व आहारविहाराकडे त्यांना लक्ष पुरविणें भाग आहे. पूर्वींच्या काळीं गुरुकुलांत राहून शिकण्याची जी चाल होती तिची योग्यता शिष्यवर्गाच्या तात्पुरता संबंध येतो अशा पद्धतीस येणें अशक्य आहे. यासाठीं शहराबाहेर नदीतटाकीं आश्रम बांधून तेथील ओऱ्यांत विद्यार्थ्यांची सोय होऊन सुमारें वीस वर्षें वयास होईपर्यंत विद्याभ्यास होऊं लागेल. तेव्हांच समर्थ विद्यालयाचा खरा हेतु सिद्धीस जाईल. सात्त्विक वृत्तीनें सर्व कर्में होण्यास

दुसरा उपाय नाहीं. राष्ट्राची स्थिति तर सर्व पालटली आहे, तेव्हां एकदम आज आमच्यासारख्या द्रव्यबलहीनांनीं गुरुकुलासारख्या संस्थांस हात घालणें शक्य नाहीं. तेव्हां शहरांतच शाळा घालून ज्यांचीं घरें असतील त्यांस घरांत राहूं देणें व बाकीच्यांनीं विद्यार्थिवसतिगृहांत राहिलें पाहिजे असा कडक नियम करणें इतकेंच तूर्त शक्य आहे. तशी पंक्तिव्यवहार्य ब्राह्मणमंडळीपुरती विद्यार्थिवसतिगृहाची सोय अगोदरच केलेली आहे. तेव्हां मुलाच्या राहण्याची सोय नाहीं म्हणून मुलें पाठविण्याचा अनमान करण्याचें कारण नाहीं. इतर जातीचीहि सवडीप्रमाणें अशीच सोय करून देण्यांत येईल. या बाबतींत युरोपीय राष्ट्रांतील एक अनुकरणीया चाल नमूद करण्याजोगी आहे. विद्यार्थिवसतिगृहांत ज्यांची सोय होत नाहीं अशा विद्यार्थ्यांचा एखाद्या कुटुंबांत समावेश करण्यांत येतो. गरीब परंतु अब्रूदार लोकांस तितकीच द्रव्यदृष्ट्या मदत होते व विद्यार्थ्यांसहि चांगला सहवास मिळून त्याच्या पोटापाण्याची चांगली सोय होते. तिकडे अशीं कुटुंबें आपल्या घरीं एक, दोन, तीन असे विद्यार्थी घेण्याची सोय करतात. अशा प्रकारें लहान वयाचे विद्यार्थी मध्यम स्थितींतील मास्तर लोकांनीं आपल्या घरांत ठेवून घेतल्यास त्यांच्या घरच्या माणसांवर गृहकृत्याचा बोजा विशेष न वाढतां त्यांना थोडी मदत होईल. लहान पगाराचे कारकूनहि हेंच करूं शकतील. त्यांत आपल्या घरचीं मुलें असलीं तर विशेषच सोयीचें होईल. वस्तुतः यांत कांहीं कमीपणा नाहीं; परंतु लोकापवादास व्यर्थ भिणारे लोक कमी होतील तर ही योजना अनेकदृष्ट्या हितावह होईल. स्वतः नियमितपणानें वागणाऱ्या माणसांचीं हीं कामें आहेत. मुलांवर योग्य रीतीची जरब राहील अशा सद्गृहस्थांची संख्या वाढेल तर समाजासहि वळण चांगलें लागेल. जाहिरात देऊन मुलें घेण्यापर्यंत मजल आली नाहीं तरी शाळांच्या व्यवस्थापकांस सांगून ठेवलें तरी ठीक होईल. पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटावें. असे लोक शाळांच्या व्यवस्थापकांनीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें मुलांस वागवितील तर त्यांनीं समाजाची चांगलीच सेवा केल्याप्रमाणें होईल. प्रत्येक शहरांत विद्यार्थिवसतिगृहें सर्वांच्या सोयीचीं असणें शक्य नाहीं. आपल्या देशांत तर जातिनिर्बंध जबर असल्यानें ज्या त्या जातीच्या लोकांनीं विद्येच्या कार्यास असें साहाय्य केल्यास फार चांगलें होईल.

पालकांनीं घरीं मुलांवर अभ्यासाचा निराळा बोजा लादूं नये, घरीं शिक्षक नेमूं नये, फक्त मुलें कांहीं अनीतिमार्गानें जात नाहींत एवढें पाहावें, इतकीच त्यांस प्रार्थना आहे. थोडेंबहुत पाठ करण्यास किंवा लिहिण्यास दिलें असेल

तेवढेंच त्यांचें घरचें काम. वाकी सर्व वेळ विश्रांतींत व मौजेनें खेळण्याबागड-ण्यांत घालविणें हेंच लहान मुलांस हवें असतें व तेंच त्यांनीं करावें अशी आमची इच्छा आहे. पुढें जसजशीं तीं मोठीं होतील तसतशी आपल्यावरील जबाबदारी ओळखून वाढत जाणारें घरांत करण्यासाठीं नेमून दिलेलें अगर दिशा दाखवून ठेवलेलें काम करण्यास पात्र होतात. लहानपणीं शरीर धडधाकट करून पुढें पडणाऱ्या ओझ्यासाठीं काटकपणा, शारीरिक मेहनतीनें आणण्याच्या पूर्वी त्यांच्या बुद्धीकडून अधिक काम करून घेण्याचा मोह आवरणें हें शिक्षकाचें मुख्य कर्तव्य आहे. कांहीं मुलें मोठा तरतरीतपणा दाखवितात. जें सांगावें तें पटपट ग्रहण करून उत्तम तयारी दाखवितात. म्हणून या यंत्रांतून बराच माल निघण्याजोगा आहे असें वाटूं लागून त्यांस अधिक शिकवूं लागल्यास त्यांच्या बुद्धीस हळूहळू क्षीणता प्राप्त होते, आणि प्रथम आपल्या वयाच्या मानानें जो प्रथम फार हुशार दिसत होता तोच मुलगा पुढें बुद्धिहीन वाटूं लागतो. यामुळें सामान्य शिक्षकांची व आईबापांची मुलाला लवकर शिकवून पटाईत करण्याची उत्कंठा असते तीस आळा घालणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजतों.

समर्थ विद्यालयाचा चौथा विशेष हेतु असा आहे कीं, आपल्या धर्माची, चालीरीतींची व संप्रदायांची चांगली माहिती प्रत्येक हिंदूला असली पाहिजे. हल्लीं आमच्या मासतिथींची कालगणना अगदीं बाजूस राहिली आहे. त्यामुळें इंग्रजी महिने व तारखांपलीकडे मोठमोठ्या विद्यार्थ्यांस कांहीं माहीत नसतें. कोणास अतिशयोक्ति वाटेल; परंतु मॅट्रिक, पी. ई. व आय्. ई. पर्यंत शिकलेल्या कित्येक विद्यार्थ्यांस महालक्ष्मीचा रथ कधीं निघतो, हनुमज्जयंती, गणेशचतुर्थी, अक्षय्यतृतीया, नागपंचमी, महाशिवरात्र, नवरात्र, दक्षिणायन व उत्तरायण, कोजागरी या कोणत्या महिन्यांत येतात हें ठाऊक नसतें. ब्राह्मणाच्या मुलांस पुरीं २४ नांवेंदेखील धड म्हणतां येत नाहींत. या हेतूनें त्यास कृतीनें व उपदेशानें या गोष्टींची ओळख पटवून देण्याचे इलाज चालू आहेत. गोष्ट अगदीं सुलभ व साधी आहे, पण आपलेपणा विसरल्यानें पंचांग म्हणजे थोतांड वाटूं लागलें आहे. तेव्हां ही माहिती थोडीबहुत आमच्या विद्यार्थ्यांस असावी असा हेतु पुढें ठेवला आहे. फाजील देवभोळेपणा वाढविल्याशिवाय शरीरसामर्थ्य वृद्धीला व स्वधर्मजागृतीला उपयोगी पडणाऱ्या अशा ज्या गोष्टी आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष होऊं नये, असें आमचें मत झालें आहे.

विद्यार्थ्यांमध्यें परस्पर प्रेमभाव वाढून त्यांनीं आपले खेळ व व्यायाम एकत्र व गुरूच्या देखरेखीखालीं करावे, या हेतूनें शाळेच्या अभ्यासक्रमांतच हा

एक विषय निविष्ट करण्यांत आला पाहिजे, म्हणून तसें समर्थविद्यालयांत अमलांत आणलें आहे. गांवाबाहेर कोठेंतरी ठरीव जागीं खेळण्यास जाणें व तें शिक्षकासमवेत जाणें हें शेवटल्या तासाचें शाळेचें कामच धरलें आहे. इतर तासांत गैरहजेरी चालत नाहीं तशीच याहि तासांत चालत नाहीं. अशानें प्रत्येक मुलगा व्यायाम रोज घेतो अशी आमची खातरी होते. सुट्टीच्या दिवशीं सर्वांस नदीस स्नानाला नेणें व तेथें पोहावयास शिकविणें, पाण्यामध्यें घटकातास डुंबणें, खेळणें वगैरे सर्व सुरक्षितपणास बाध न येतां करण्याचें ठरवून सवडीप्रमाणें अमलांत येतें. हल्लीं महापूर असल्यानें हें काम मर्यादित आहे. पण कार्तिक मासाच्या पुढें या कार्यभागाचे सुपरिणाम दिसून येतील. तरीपण महाएकादशीस व कर्क संक्रमणास सर्व विद्यार्थी व्यवस्थितपणें स्नानास नेले होतेच. आषाढी एकादशीस मुलें गंगेवरून स्नानानंतर सुमारें दोन मैल विठोबाच्या दर्शनास रांगेनें शहरांतून चाललीं असतां मोठी मौज दिसत. होती. सुट्टीच्या दिवशीं आठवड्या-पंधरवड्यानें सर्व मुलें गांवाबाहेर दूर देवस्थानास न्यावयाचीं व तेथें प्रत्येकानें आपआपल्या घरचें फराळास आणलेलें खावयाचें. वाटेनें जातांना खडे फेंकीत, उड्या मारीत, खेळ खेळत करमणूक करायची. या सर्व प्रकारांचे वेळीं शिक्षक व मुलें एकमेकांशीं केवळ मित्राप्रमाणें वागतील अशी योजना ठेवण्याचा क्रम समर्थविद्यालयाच्या चालकांचा आहे. हे दोन प्रकार सांगितले. अशांसारखेच प्रकार लागोपाठ चार दोन सुट्ट्या असल्या तर कोठेंतरी एखादा सबंध दिवस खर्चावा, वर्षांतून एक दोन वेळां दूरदूरचीं क्षेत्रें पाहण्यास जावें व बराच भाग पायीं प्रवास करावा असा संकल्प आहे. अनुकूलतेप्रमाणें सर्व गोष्टी होतील अशी उमेद आहे.

## ( ३ ) "समर्थविद्यालयामागची प्रेरणा"

समर्थविद्यालय हें एका मोठ्या राष्ट्रीय चळवळीचें अंग आहे. तेव्हां 'परदेशी' गोष्टींचा या विद्यालयांत होतां होईल तों विटाळ करूं द्यावयाचा नाहीं; परंतु अगतिक म्हणून जो होईल त्याबद्दल एकंदरीनें राष्ट्रहित साधून वचपा काढतां आला पाहिजे, हें धोरण राखावयाचें असा पूर्ण निश्चय आहे. परकीयांचें चांगलें असलें तरी आम्हांस नको, तें चांगलें या मोहानें त्यास जवळ केलें तर त्याच्या बरोबरीचें वाईट सहजवृत्त्या अज्ञानानें किंवा मोहानें आपल्यांत शिरेल अशा भावनेनें आमचे पूर्वज यवनांचा स्पर्श टाळीत होते. '**न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कण्ठगतैरपि**' यांतला गूढ भाव हाच आहे

गाईचें दूध पवित्र खरें, परंतु 'श्वद्दतौ गोपय इव' हा मीमांसकांचा दृष्टान्त तरी हेंच सुचवितो. कुऱ्याच्या कातड्याच्या पिशवींत घातल्यामुळें अत्यंत पवित्र पदार्थांससुद्धां अनादेयत्व प्राप्त होतें. धर्मौदार्य, परमतसहिष्णुता, ज्ञान कोणापासूनहि घ्यावें, इत्यादि उदात्त विचारांनीं भोळीं राष्ट्रें फसतात. म्हणून परदेशीय जें जें म्हणून असेल त्याचा स्पर्श होऊं नये असा विचार खरा. तरीपण हल्लींच्या काळीं जें जें आमचें होतें तें तें, विशेषत: चांगलें होतें, तें तें परक्यांनीं नेलें आहे म्हणून आपलें परत आणण्यासाठीं म्हणून परदेशीं गमन करणें व परदेशीयांपासून घेणें प्राप्त झालें आहे. आपलें जें चांगलें तें दुसऱ्याकडे गेलें म्हणून पुनश्च आपलेंसें करून घेण्यासाठीं जेवढा सकृद्दर्शनीं परदेशी माल घेणें प्राप्त आहे तेवढा घेणें म्हणजे खरोखरी स्वदेशी चळवळीस साहाय्यच करणें आहे, अशी मनाची समजूत करून घेऊन जेवढें परदेशी चांगलें तेवढें घेतलें पाहिजे. फार दिवस आमच्यांतील चांगल्या गोष्टी परक्यांनीं लुटून नेल्या त्याचा वचपा काढण्यासाठीं आमच्याकडील ज्ञान नेऊन त्यांनीं जी आपली वाढ केली आहे तीहि आम्हांस सर्व इकडे आणली पाहिजे. तात्पर्य, आज परकीयांमध्यें जेवढें म्हणून चांगलें दिसत आहे तेवढें आपण काबीज केलें पाहिजे. तसें झालें तरच ते नाना प्रकारांनीं व नाना मिषांनीं आमचेकडील पैसा नेत आहेत तो नेण्यास आम्ही प्रतिबंध करूं शकूं. या दृष्टीनें समर्थविद्यालयास परदेशी गोष्टींचा त्या 'परदेशी' एवढ्यासाठींच त्याग करण्याची सोय नाहीं. आमच्या मोठमोठ्या ऋषींचा व पंडितांचा निष्काम विद्याव्यासंग जर्मन लोकांनीं उपटला आहे. तो तेथून आणल्याशिवाय आमचा उत्कर्ष होणार नाहीं. आमच्याकडे बारीक तलम सूत व रेशीम यांचें कापड निघत होतें ती कला परकीयांनीं नेली, ती परत आणावयास नको काय? त्यासाठीं खरे देशभक्त, भरतपुत्र, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका व इंग्लंड इकडे पाठविले पाहिजेत. तेथील तज्ज्ञ लोक इकडे आणून त्यांस किंवा त्यांच्या हाताखालीं तयार झालेल्यांस समर्थविद्यालयासारख्या विद्यालयांत शिक्षक नेमले पाहिजेत. आपण जेव्हां दुसऱ्याच्या सहवासानें बिघडूं अशी भीति होती त्या वेळीं दुसऱ्याचा स्पर्श, दुसऱ्याची भाषा आम्हांस नको होती; परंतु दैवदुर्विलासानें आज कांहीं गोष्टींमध्यें परकीयांच्या तोंडाकडे पाहावयास लागतें; इतकेंच नाहीं तर परकीयांचे पाय धरणेंहि भाग पडतें. पोटाची खळगी भरण्यासाठीं किंवा आपल्या पोराबाळांस नोकरी लावण्यासाठीं नव्हे तर राष्ट्राच्या भावी कल्याणासाठीं वाटेल ती हीनता परदेशीं पत्करावी लागते. ही गोष्ट शिवाजीमहाराजांस गोसावी व्हावें

लागलें व पीटर दि ग्रेटला मजूरदार सुतार बनावें लागलें अशा उदाहरणांवरून लक्षांत येण्याजोगी आहे. निःसीम राष्ट्रप्रेम मनांत असल्यावर आपण परदेशी लोकांचा व परदेशी वस्तूंचा कां व कसा उपयोग करतों हें रात्रंदिवस लक्षांत वागवून मन आंतल्या आंत जळफळत असतें. '**कार्यावरीच सज्जनीं दृष्टि**' दिली पाहिजे हें चांगलें मनांत बिंबवून अगतिक व निरुपाय अशा वेळीं परदेशीचा अंगीकार करण्यानें स्वदेशीपणास कमीपणा येत नाहीं, हें बाळकडू समर्थ-विद्यालयांत उदाहरणानें व उपदेशानें प्रथमपासून पाजलें जाईल. येथील विद्यार्थी निकरानें वागतील, परंतु जगाच्या इतर भागांत जीं जीं उत्कर्षाचीं व सुखाचीं, सोयीचीं व समाधानाचीं साधनें प्राप्त होण्याजोगीं असतील तीं आपणांस व आपल्या देशास मिळविण्यासाठीं लागेल तें शिक्षण प्राप्त करून घेण्याकरितां वाटेल तें साहस करण्यास व पडतील ते कष्ट सोसण्यास व लागेल तो उद्योग करण्यास सिद्ध होतील, तरच या शाळेच्या प्रस्थापकांस आपल्या निरपेक्ष श्रमाचें व स्वार्थविमुखतेचें चीज झालें असें वाटेल. अविवाहित राहून सर्व विद्याक्रम संपवावयाचा, इतकेंच नव्हे तर आपल्या देशासाठीं देह झिजवा-वयाचा म्हणजे देशप्रीतिशिवाय दुसऱ्या मनोविकारास अंतःकरणांत थारा द्यावयाचा नाहीं, कारण कोणत्याहि एका कार्यास आपण वाहून घेतलें याचा अर्थच असा कीं, तेथें दुसरें कांहीं सुचावयाचें नाहीं. अशा दृढ निग्रहाचे लोक निपजावेत व कांहीं निपजतील; परंतु विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर व गृहस्थाश्रमी बनल्यावरहि शिक्षणकालांतील संस्कार त्यांच्या मनावर आमरण राहतील अशी आशा आहे.

समर्थविद्यालयांत अगदीं प्रथमपासून व्यवहारोपयोगी सृष्टिशास्त्रीय ज्ञान देण्याचा उपक्रम केला आहे. प्राथमिक शिक्षण संपल्याबरोबर निरनिराळ्या सृष्टिशास्त्राची थोडी थोडी—केवळ मनोरंजनाप्रमाणेंच—माहिती देत गेल्यानें विद्यार्थ्यांची चौकस बुद्धि वाढून, या शास्त्रांच्या साहाय्यानें परदेशीयांनीं आपलें केवढें कल्याण करून घेतलें आहे व किती उद्योगधंदे काढले आहेत याची कल्पना येत राहील. म्हणून भलत्याच दुरभिमानाच्या भरी भरून वेदान्ती न बनतां पृथ्वीवर कोठें काय आहे तें जाणण्याची व तें आपल्या देशांत आणण्याची हांव उत्पन्न होईल असें कांहींतरी विद्यार्थी निपजतील अशी उमेद आहे. स्वदेशी माल तयार करून कोणत्याहि परदेशांतील सुखांचा व मौजेचा उपभोग घेण्यास राष्ट्र तयार झालें म्हणजे अर्वाचीन सुधारणेचा कळस झाला. हें नवीन मिळवून आपली प्राचीन नीतिमत्ता आस्तिक्यबुद्धि व मानसिक शास्त्रां-

तील गति या सर्वांची सांगड घालणें हीच हल्लींच्या जगांत पहिलें पद प्राप्त करून घेण्याची गुरुकिल्ली आहे. साऱ्या दुनियेंत हें कार्य करण्यासाठीं परमेश्वरानें आपल्या अपार औदार्यानें एक देश योजिला असेल तर तो आमचा देश होय; असें येथील हवा, पाणी, नद्या, डोंगर, सुपीक जमीन व समुद्रकिनारा इत्यादि बाह्य सृष्टीचें ऐश्वर्य व अन्त:सृष्टीकडे वळलें असतांहि सर्व जगास थक्क करून सोडणारें बुद्धिसामर्थ्य यावरून आमची बालंबाल खात्री झाली नसती, व हा सुदिन येण्यास बहुत युगें लागावयाचीं नाहींत ही अतर्कित प्रेरणा झाली नसती तर या दुर्घट प्रयत्नास आम्हीं हातच घातला नसता. सद्धर्मांच्या आश्रयानें नैतिक सुधारणा व ज्ञानवृद्धि या दोन गोष्टी साधल्या म्हणजे सर्व ऋद्धिसिद्धि हात जोडून पुढें उभ्या राहतात. यासाठींच भगवद्गीतेंत चौथ्या अध्यायाच्या शेवटीं ज्ञानाची इतकी थोरवी वर्णिली आहे. ज्ञानप्राप्ति व ज्ञानदान यांसारखें पुण्यकर्म नाहीं. सर्व राष्ट्रीय चळवळीचें रहस्य सर्व प्रकारचें ज्ञान लोकांस करून देण्यांत आहे. ज्ञानापासून कृति उत्पन्न होते. ज्ञान हेंच सामर्थ्य अशा अर्थाची इंग्रजी म्हण आहे, तिचा अर्थ हाच. अर्थात् ज्ञानानें प्राप्त होणारें सामर्थ्य अंगीं यावें याहून समर्थविद्यालयाचा दुसरा हेतु काय असूं शकणार ?

अशा प्रकारचें ज्ञान व त्यापासून उत्पन्न होणारें सामर्थ्य हल्लीं चालू असलेल्या विद्यालयांपासूनहि मिळण्यास कोणतीच हरकत नाहीं. आम्ही जसे या समर्थविद्यालयांत शिक्षक आहों असेच शिक्षक त्या शाळांतहि आहेत. कांहीं कमी बुद्धीचे नाहींत, कमी उत्साहाचे नाहींत; परंतु त्यांना लावून दिलेली जी शिस्त आहे ती शिस्त आम्ही म्हणतों तशा ज्ञानाच्या व सामर्थ्याच्या उलट आहे. हल्लीं इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका व जपान या राष्ट्रांत तसें ज्ञान व तसें सामर्थ्य उत्पन्न होत आहे. इंग्लंडमध्यें सृष्टिशास्त्राचा अभ्यास करण्यास गेलेल्या येथील विद्यार्थ्यांचा अनुभव असा आहे कीं, येथें दोन वर्षें ज्या गोष्टी नीट शिकण्यास पुरत नाहींत त्या तिकडे पंधरा दिवसांत सुरेख शिकविल्या जातात. यावरून आमच्या इंग्रज सरकारनें आमच्या तरुणांच्या आयुष्याची केवढी हानि केली आहे हें स्पष्ट दिसून येतें. कांहीं कांहीं विषयांच्या शिक्षणासाठीं तर आम्हांस तिकडे होतकरू लोक पाठवून तयार करून आणले पाहिजेत असें स्पष्ट आहे. आजवर आपण ज्ञान न मिळतां निव्वळ ज्ञानाभासानें तृप्त होऊन राहिलों. आमच्याप्रमाणेंच १०।१२ वर्षें विद्याभ्यास करून तिकडे विद्यार्थी नवीन नवीन शोध लावतात व हरएक प्रकारें आपल्या ज्ञानानें व्यवहारदृष्ट्या राष्ट्राचा उत्कर्ष साधतात. आम्हांस मात्र हें शक्य नाहीं. आम्ही दुर्दैवी किंवा बुद्धिहीन असा

परिग्रहण क्र. ६४५८९ वि: निबंध
ग्रंथ क्र. 20.52 नों दि: 20/3/07



समज करून घेऊन हताश बसलों होतों. परंतु आतां इकडचे लोक तिकडे जाऊन तिकडच्या मी मी म्हणणाऱ्या पंडितांच्या मंडळाकडून 'शाबास शाबास' म्हणवून घेऊं लागले आहेत, तेव्हां पाणी कोठें मुरतें याची सुरेख ओळख पटली आहे. सरकारच्या स्कॉलरशिपा घेऊन गेलेल्या दोन तरुणांनीं तिकडची मान्यतम पदवी पटकाविली. आतां आमच्या डोक्यांत उजेड पडल्यावरहि जरूर तेवढें तिकडचें इकडे आणण्यास आम्ही आळस करूं काय? कधीं नाहीं करणार. इकडून तिकडे तरुण होतकरू लोक पाठवूं व तिकडून नाना देशींचे खरे गुणी शिक्षक इकडे आणूं आणि आमच्या राष्ट्रांतल्या राष्ट्रांत सर्व कांहीं गोष्टी करून दाखवूं. अशी उमेद हल्लीं आम्हांस आली आहे. समर्थविद्यालयासारखीं विद्यालयें अशा प्रकारचे शिक्षक मिळाले तर २० वर्षांत जो चमत्कार करून दाखवितील तो इतर राष्ट्रांतील विद्यालयांच्या १०० वर्षांच्या उद्योगानें होणार नाहीं. महाराष्ट्रांतील समंजस देशाभिमान्यांच्या मनांत परमेश्वर प्रेरणा करून आमच्या हेतूस प्रोत्साहन देण्याची बुद्धि देईल तर ही गोष्ट सिद्ध होईल.

हल्लींच्या परावलंबी शिस्तीनें झालेली हानि भरून काढावयाची आहे. तेव्हां आपल्या देशांतील प्राचीन शिक्षणपद्धति व अर्वाचीन सुधारलेल्या राष्ट्रांतील शिक्षणपद्धति यांचा सुंदर मिलाफ झाला पाहिजे. या गोष्टीला हात घालणें जितकें आवश्यक आहे तितकेंच जबाबदारीचें व कठीण आहे. हें काम एका दोघांचें नाहीं. मानवी स्वभावास आपलें तें विशेष आवडतें अशामुळें, बहुत दिवस त्याचा आपल्या हातून उपमर्द झाला आहे अशामुळें व बऱ्याच गोष्टींत त्याचा त्याग केल्यामुळें आपली हानि झाली आहे असें स्पष्ट निदर्शनास आलें आहे, अशामुळें आम्ही कदाचित् वाजवीपेक्षां पुराणप्रिय होऊन पाश्चात्त्यांच्या हितकर प्रकारांचा अनादर करूं; उलटपक्षीं हल्लींच्या पाश्चात्त्य वैभवास भुलून त्यांच्यांतील त्या वैभवाशीं असंबद्ध अशा पद्धतींचा अंगीकारहि आम्ही करूं. अशामुळें मोठ्या धीरतेनें, केवळ जगाच्या पालटलेल्या स्थितींत अवश्य त्याज्य अशा जुन्या गोष्टी सोडून, तसेंच हल्लींच्या जगांत ज्यांचा स्वीकार केला नाहीं तर आपल्यांत कमीपणा येईल किंवा योग्य उत्कर्षास साहाय्य होणार नाहीं अशा, पाश्चात्त्य देशांतील अर्वाचीन गोष्टींचा संग्रह करून आपण आज आपला मार्ग ठरविला पाहिजे. हें धोरण ठेवून समर्थविद्यालयांत सर्व गोष्टी यथामति चालू केल्या आहेत. स्थूल दिशा निश्चित करून गौण भाग आहेत ते अनुभव घेत घेत कायम करण्याचा इरादा आहे.

**( ४ ) समर्थविद्यालय – सूर्याचें एक पिलूं**

येथवर समर्थविद्यालयाच्या स्थापनेला प्रवृत्त करणारें स्थूलमानाचें धोरण

3062

कसें आहे हें आमच्या प्रिय वाचकांच्या ध्यानीं यावें म्हणून लिहिलें. आतां यापुढें हल्लीं चालू असलेला क्रम, आमच्या मनांत असलेल्या इच्छा व त्या परिपूर्ण होण्यास आवश्यक गोष्टी, यांविषयीं चार शब्द लिहावे असा मानस आहे.

शाळेची कल्पना जाहीर केल्यापासून बहुतेकांनीं अभिनंदन करून प्रोत्साहनच दिलें आहे. याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणें जरूर आहे. पुष्कळांनीं अशा प्रकारचें विद्यालय पुण्यास काढावें असें सुचविलें. तें शहर सर्व महाराष्ट्राचें केंद्र आहे हें एक कारण व दुसरें कारण व्यक्तिविषयक आहे. अनेक मित्रमंडळीस वाटतें कीं हें नवीन प्रकारचें विद्यालय व तें कांहीं पदवीधर काढीत आहेत एवढ्यासाठींच या प्रयत्नास विघ्न येईल. इंग्रज सरकार साक्षात् आपल्या राज्यांत ज्या गोष्टी करीत नाहीं त्या संस्थानांत करवूं शकतें, म्हणून अशा विघ्नाची भीति विशेष आहे, असें ते म्हणतात. परंतु आमचे हेतु उघड आहेत. आम्ही सरकारची मदत मागत नाहीं तरी आमच्या शाळेंत काय चालतें हें पाहण्याची मोकळीक आहे. समर्थविद्यालय म्हणजे हायस्कूलवजा शाळा. ती प्रस्तुत राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळींत एकट्या कोल्हापुरास निघून पुरें नाहीं. सुमारें दहा हजार वस्तीच्या गांवाला एक अशी शाळा पाहिजे आहे. पुण्यास असली एक तरी शाळा लवकर निघेल. प्राय: हल्लीं चालू असलेल्या एखाद्या हायस्कुलास हें स्वरूप देण्यांत येईल. कोल्हापूरचें विद्यालय पहिल्यांदां म्हणजे चार दोन महिने अगोदर निघालें आहे इतकेंच. यांत येथील मंडळींचीच सर्व कल्पना आहे असेंहि नाहीं. सर्वांच्या मनांत आजकाल घोळत असलेल्या विचारांचें प्रस्तुत विद्यालय हें अपरिपक्क फळ आहे. कांहीं अंशीं वऱ्हाडकर मंडळींनीं या कामीं बरीच आघाडी मारली आहे असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां एवढ्याशा उद्योगासाठीं 'नवी चिनी ( विटी ) नवा दांडू' करून नव्या जागीं डाव मांडण्यांत अर्थ नाहीं. म्हणून साहाय्यकारी मंडळीची जुळवाजुळव झाल्याबरोबर येथेंच कार्यास आरंभ केला आहे. यालाच सर्व महाराष्ट्रीयांचें सर्वतोपरी साहाय्य असल्यास येथेंच साऱ्या गोष्टी जमून येतील व याप्रमाणें इतर ठिकाणीं विद्यालयें निघण्याचा मार्ग सुकर होईल.

विद्यालयांतील शिक्षणक्रमाचें धोरण वर जें सामान्य विवेचन केलें आहे त्यास अनुसरूनच आहे. सरकारी किंवा त्याच नमुन्यावर चालू असलेल्या शाळांचा हेतु सरकारचीं निरनिराळीं खातीं आहेत त्या खात्यासाठींच नोकर तयार करावेत असा आहे. शाळामास्तर, कारकून, मामलेदार, एंजिनिअर, वकील, न्यायाधीश व डॉक्टर हे सर्व सरकारी नोकरीच्या लायकीचे लोक

निष्पन्न व्हावे म्हणून सरकारी शाळा व कॉलेजें आवश्यक होतीं व तीं तशीं काढलीं; परंतु नोकर लोकांची पहिली चणचण संपल्याबरोबर सरकार या संस्थांतून बाहेर पडलेल्या लोकांचा अनादर करूं लागलें. ज्या परीक्षा पास झाल्याबरोबर १००।१५० रुपयांच्या नोकऱ्या सहज मिळत त्या परीक्षांच्या लोकांस दहावीस अर्ज केल्यावर १५।२० रुपये मिळण्याची मारामार पडते. अलीकडे सुमारें १५।२० वर्षें तर सर्व मोठे मोठे गोरे व काळे अंमलदार कोठेंहि विद्यार्थ्यांस उद्देशून बोलूं लागले म्हणजे म्हणतात, कीं सर्वांनीं सरकारी नोकरीच्या पाठीं लागणें चांगलें नाहीं; स्वतंत्र धंदे करणें अवश्य आहे व हातकाम करण्यांत कोणताहि कमीपणा नाहीं. अंमलदारांच्या मुखानें सरकार असा दुंदुभि वाजवून सुशिक्षित लोकांना नोकरीच्या दरवाजावर होणारा मज्जाव जगजाहीर करतें; परंतु स्वतंत्र धंद्याच्या दिशा दाखवीत नाहीं. लॉर्ड रेसाहेब गव्हर्नर होते तेव्हां धंदेशिक्षणाचें एक कॉलेज व्हिक्टोरिया ज्यूबिली टेक्निकल इन्स्टिटयूट निघालें. त्याविषयीं ज्यांना माहिती आहे त्यांचें म्हणणें असें आहे कीं अगोदरच त्यांत खरें उच्च प्रतीचें धंदेशिक्षण देत नव्हतेंच; परंतु कांहीं थोडें होतें तेंहि मान हल्लीं बदललें आहे. हींच रड मुंबईच्या आर्ट्स स्कूलची आहे. उत्तम चित्रकार व शिल्पी तयार होण्यास थोडीबहुत मदत होईल असें रेखाकला व चित्रकला वगैरेंचें शिक्षण मिळत होतें. तो अभ्यासक्रम बदलून टाकून खेळवजा क्रम केला आहे. या दोन्ही कॉलेजच्या अभ्यासक्रमाची पूर्वींची स्थिति ही युरोपांतील शाळांशीं ताडून पाहतां अगदीं कनिष्ठ प्रकारची होती; परंतु हल्लींची तर अगदींच निकृष्ट झाली आहे, असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. अशा स्थितींत समर्थविद्यालयासारख्या स्वतंत्रतेच्या बाण्यानें निघालेल्या शाळांनीं ज्या द्वारीं गेलें असतां अर्धचंद्र मिळतो अशा सरकारी नोकरीच्या दिशेकडे बिलकुल वळावयाचें नाहीं, व हल्लीं असलेल्या सरकारी नोकरीच्या किंवा अस्तित्वांत असलेल्या विश्वविद्यापीठाच्या परीक्षा तृणतुल्य मानावयाच्या, यांत नवल तें कसचें? '**निरीहाणामीशस्तृणमिव तिरस्कारविषयः**' हें म्हणणें बरोबर आहे. हाडाचीं काडें करून घेऊन अल्पस्वल्प वेतनावर नोकरी करीत जन्म काढण्यापेक्षां स्वतंत्र उद्योग करून बहुमानानें पोट भरण्याची सोय करणें व दिशा दाखविणें हें समर्थ विद्यालयासारख्या संस्थेचें काम आहे. सरकारी नोकरींत चांगलीं सचोटीचीं माणसें पाहिजेत आणि अब्रूनें करून घेतली तर सरकारी नोकरी म्हणजे लोकसेवाच होय. कारण सरकार म्हणजे लोकसेवक व लोकांच्या कल्याणासाठींच सत्ता धारण करणारी संस्था हें प्रत्येक विचारी माणसास कळतें;

परंतु हातांत अधिकार आल्यावर आपण कोण व आपल्या अधिकाराची मर्यादा किती हे उद्दाम अधिकारी अगदीं विसरून जातो, त्याप्रमाणें अंमलदारांचा समुदाय जें सरकार तेंहि विसरतें. त्यांत सरकार व प्रजा यांचा संबंध जिंकणारे व जिंकलेले किंवा इतरदृष्ट्या विजातीय असल्यावर पुसूंच नये. योग्य काळीं व प्रसंगीं सरकारी नोकरी करण्याची पात्रता आहे असें शिक्षण समर्थविद्यालय किंवा अशीं विद्यालयें ज्या राष्ट्रीय विद्यापीठास जोडलीं जातील त्यांत तयार झालेल्या लोकांस मिळेलच. परंतु हल्लींच्या अवमानाच्या काळांत सुखानें मिळत नाहीं व अब्रूनें राखवत नाहीं. अशा सेवेंत 'प्रतिहतसर्वेंद्रियशक्ति' होऊन राष्ट्र-हानि करण्यास प्रवृत्त व्हायचें नाहीं, अशा दिशेनें मार्ग आक्रमणें उचित आहे.

हल्लीं सरकारी व खाजगी शाळांत जाणाऱ्या तरुणांच्या मनांत तुम्हीं लिहितां असेंच येतें, पण त्यांच्यापुढें कोणताच मार्ग नाहीं म्हणून ते धोपट मार्ग सोडीत नाहींत; तुम्ही जर अशा लोकांची जबाबदारी घेत असाल तर ते तुमच्याकडे येतील असें कित्येकांचें म्हणणें आहे. त्यास उत्तर इतकेंच कीं, अपारशक्तीचें सरकार ही हमी घेत नाहीं. उलट, आमच्या दारीं येऊन उपयोग होणार नाहीं, तुमची सर्वांची आमच्या हातून सोय होणार नाहीं असें स्पष्ट सांगून लाथाडीत आहेत तेथें मात्र तुम्ही हौसेनें किंवा निरुपाय म्हणून कां होईना डोंबी देतां; पण आमच्याकडे मात्र हमी मागतां हा अन्याय नव्हे काय? दुसरी गोष्ट अशी कीं, कोणत्याहि शहरांत जाऊन सरकारी नोकरीवर पोट भरणारे किती व इतर रीतीनें वाणी, उदमी, तेली, तांबोळी, शिंपी, कुणबी, सुतार, कुंभार, लव्हार इत्यादि लोक किती याचा विचार करा व सरकारी शाळा सोडी-पर्यंत खर्च केलेली बुद्धि व द्रव्य यांचा विचार करा. तुमच्याहून कमी बुद्धीचीं व शिक्षणाचीं माणसें सुखानें पोट भरतात किंवा श्रीमंतहि आहेत. कित्येक तर तुम्ही सरकारांत मिळवूं शकाल इतका पगार देऊन तुम्हांस घरीं नोकर ठेवण्याच्या योग्यतेचे आहेत. उगीच शांतपणानें शहरांत फिरून या लोकांचें वेतन, वर्तन वगैरे पाहा व एखाद्या कारकुनाचें पाहा, दोघांच्या शरीरसामर्थ्याची तुलना करा. जगांत नोकरीशिवाय उद्योग किती आहेत तें नीट पाहिलें व निश्चयानें कोणताहि एक आपला धंदा ठरविला म्हणजे, ज्या बुद्धीनें परीक्षा पास होऊन गुलामगिरी मिळावयाची त्या बुद्धीच्या निम्म्यानें सुखाची उपजीविका प्राप्त होईल. सामान्यत: शरीरसामर्थ्य प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांस सुतारकाम, घरकाम, विणकाम, शिवण-काम हे इतर साधतील ते धंदे इच्छेप्रमाणें एक किंवा अनेक करतां यावेत अशी योजना समर्थविद्यालयांत करावयाची आहे. विणकामाची तयारी अंमळ लवकर

होईल असें आहे. व्यापारी हिशेबठिशेब ठेवण्याचें पाश्चात्त्य व इकडील शिक्षण मिळण्याची सोय करणें तितकें कठीण नाहीं. जसजसा मुलगा मोठा असेल व शरीर-सामर्थ्य चांगलें असेल तसतसा त्यास पालकाच्या संमतीनें व खर्चानें, तसेंच कित्येक वेळां शिष्यवृत्ति देऊन हिंदुस्थान देशांत निरनिराळ्या ठिकाणीं कारखाने व शिक्षणालयें आहेत त्या ठिकाणीं उमेदवार किंवा शिष्य म्हणून ठेवून तयार करवून आणण्याची उमेद आहे. कामांत तयार करून देण्याची सोय दाखविणें हें आम्ही करूं. बाकी पुढची धमक ज्याची त्याची आहे. पहिल्यापासून आमच्या हातीं तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांत ही धमक उत्पन्न करण्याची धमकहि पण आमच्यांत आहे. हल्लीं विद्याभ्यासांत खर्च होतो इतका पैसा खर्च न होतां इतकी शरीरशक्ति क्षीण न होतां उद्योगधंद्यांत लागणारें धाडस अंगीं येऊन बऱ्या मार्गास लागतील अशी आमची उमेद आहे.

विद्वान् व पंडित होण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांस मार्ग चांगलाच खुला आहे. त्यांस वाटेल तितकें शिक्षण मिळण्याची सोय करण्यांत येईल. त्यास शिक्षक, उपदेशक, व्याख्याते, वर्तमानपत्राचे संपादक, असे धंदे खुले आहेत. याविषयीं फारसें लिहिण्याचें कारणच नाहीं. आजवर शिकून तयार झालेल्या लोकांस या धंद्याची माहिती आहे. सर्व राष्ट्रभर कानाकोपऱ्यांत अलीकडील जगांत काय चाललेलें आहे, आपलें राष्ट्र इतर राष्ट्रांच्या किती मागें आहे, त्यांतील लोकांचीं नैतिक, औद्योगिक व राजकीय कर्तव्यें काय आहेत, या सर्व गोष्टींचें योग्य शिक्षण देण्यास व उपदेशक आपल्या जुन्या चालीरीतीस अनुसरून म्हणजे हरिदास, पुराणिक वगैरे तयार होणें जरूर आहे. अशा प्रकारचे लोक जगांत जेथें जेथें हिंदु लोक जातील तेथें पाहिजे आहेत. मॉरिशसमध्यें, आफ्रिकेमध्यें, अमेरिकेंत कोठेंहि हिंदु गेले कीं त्यांच्या मागोमाग त्यांची धर्मनीति जागृत ठेवण्यासाठीं आपले पुजारी, शिक्षक, पुराणिक व वैद्य गेले पाहिजेत. तशा व्यवस्थित रीतीनें लोकांच्या वसाहती होत नाहींत व त्यांना तेथें त्रास होतो. त्याचें कारण असें कीं, अशिक्षित लोक पोटाला मिळेल तिकडे जावयाचें एवढ्यासाठीं करारमदार करून बांधून घेईल त्याच्याबरोबर जातात. राष्ट्रांत जागृति होऊं लागेल तेव्हां आपले लोक असे मेंढराप्रमाणें जाणार नाहींत. या व अनेक कामांस लोकनायक पाहिजे आहेत. हल्लीं आमचा शहाण्यासुरत्या लोकांचा वर्ग एखाद्या मोठ्या खोलींत कोंडून ठेवल्यासारखा झाला आहे. बाहेर काय आहे हें माहीत नसल्यामुळें व बाहेर बहुत लोक आहेत व त्यांचें उत्तम चाललें आहे हेंहि ध्यानांत न घेतल्यामुळें,

नवीन शिक्षणानंतर काय ? अशी त्यांची घाबरगुंडी झाली आहे. जोमाचें शिक्षण मिळालेला राष्ट्रांतील तरुणवर्ग म्हणजे राष्ट्राचा नायक; पुढेंमागें त्याच्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं चालेल. ही उदात्त कल्पना त्यांच्यापुढें उभी राहिली नाहीं. श्रीसमर्थ रामदासांच्या ग्रंथाच्या वाचनानें जर त्यांच्या अंगांत सामर्थ्य व आपल्या उत्कर्षाची दिशा आली नाहीं, तर आम्ही पामर काय बोधूं शकणार ? आम्ही तरी काय म्हणणार ? डोळे उघडून पाहा हेंच म्हणणार कीं नाहीं ? रॅली ब्रदर्स, सासून कंपनी, ग्रॅहम कंपनी, मार्क्स आणि कंपनी आणि खुद्द सरकार ही एक परदेशी कंपनी ह्यांचे चालक काय आकाशांतून पडलेले दिव्य पुरुष आहेत ? आणि तुम्ही काय वारुळांतून येणाऱ्या मुंग्या आहां ? माणसासारख्या माणसांनो ! आपली केवढी जमात, केवढी संघशक्ति याचा विचार करा. सामर्थ्य कशाचें ? '**सामर्थ्य आहे चळवळीचें**' काम नासतें कशानें '**आळसें तीं काम नासतें.**' सामर्थ्य कोणाचें ? '**जो जो करील त्याचें.**' माझें कसें होईल ? असें म्हणून अगाऊ विचारील त्याचें काय होईल ? बुद्धिनाश व प्राणनाश.

समर्थविद्यालयाचें सामान्य धोरण सांगतेवेळीं ब्रह्मचाऱ्याचा कडक नियम पाळण्याचा निश्चय कळविला आहे. दुसरा वयाच्या अटींचाहि नियम पाळला जातो; परंतु सशक्तपणाच्या कसोटीचा नियम हल्लींच्या अवनत स्थितीमुळें तितका कडक रीतीनें पाळतां येत नाहीं. मुलांचें संगोपन नीट झालें नसल्यानें व मूळचीच प्रकृति व बांधा समाधानकारक नसल्यानें चांगला धडधाकट, अमक्या ठरीव रुंदीच्या छातीचा, ठरीव उंचीचा व ठरीव वजनाचा मुलगा असला तरच त्याचा प्रवेश करावा व बाकीच्यांस परत लावून द्यावें असा परिपाठ ठेवला नाहीं. योग्य व्यायामानें व चांगल्या देखरेखीनें अशीं मुलें सुधारतात व सशक्त होतात व उंची व वजन यांवरच सर्वप्रकारचा काटकपणा अवलंबून नसतो असेंहि वैद्यकमत पडल्यामुळें, व आमच्या नवीन शिक्षणाच्या मामल्यांत सर्व प्रकारच्या लोकांस धंदे मिळतील असें असल्यानें शाळेची शिस्त पाळण्याचें कबूल करतील त्यांस तूर्त म्हणून घेतलें आहे. पळणें, खेळणें, उड्या मारणें, नदीचीं स्नानें करणें वगैरे व्यायामाच्या कसोटीस कांहीं नियमित काळांत उतरलीं नाहींत तर त्यांस काढून टाकावयाचें असा मानस आहे; खरी इच्छा वर दर्शविल्याप्रमाणें उंची, वजन पाहून विद्यार्थी घ्यावेत अशी आहे, परंतु इतक्या कडकपणास कांहीं काळ गेला पाहिजे. फ्रेडरिक दि ग्रेटच्या बापाची धिप्पाड शिपायाबद्दल कशी हौस होती तें इतिहासज्ञांस माहीत आहे. आमच्यांतील प्रमुख लोकनायकांनीं शरीरप्रकृतीबद्दल-शरीरसामर्थ्याबद्दल काळजी दाखविली तर राष्ट्रांतील अडाणी लोक तसेंच करतील.

एकंदर राष्ट्रांतच हल्लीं शरीरसामर्थ्याबद्दल अनास्था पुष्कळ आहे. संस्थानिकांजवळच कांहीं थोडेबहुत पैंहिलवान असतील ते असतील, परंतु कालेंकरून लॉर्ड रॉबर्ट्सचा ग्रेटब्रिटनमध्यें चाललेला उपदेश, ग्रेटर ब्रिटनलाहि ते करतील असा रंग दिसत आहे. ज्या त्या देशानें सैन्यें वाढवावीं, आरमारांत भर घालावी असा क्रम चालविला आहे. आम्ही हिंदी लोक ज्या कला इंग्रजांनीं आम्हांस कधीं शिकविल्या नाहींत, त्या शिकण्यास त्यांच्याकडून परवानगी घेऊन तयार झालें पाहिजे. या देशांत शिकूं न देतील तर दुसऱ्या देशांत जाऊन शिकण्याची तयारी केली पाहिजे. आज इंग्रज लोक आमच्या सरहद्दीची काळजी चांगली घेत आहेत, परंतु त्यापायीं कितीतरी पैसा पाण्यासारखा ओतला जात आहे. गेल्या मार्चमध्यें नामदार गोखले यांनीं येथील लोकांचें साहाय्य नागरिक सैन्य बनवून घ्यावें असें सुचविलें, त्यावर टाइम्ससारख्या पत्रांनीं नाक खाजवून आमची थट्टा केली आहे आणि ‘ आहे का तयारी ? ’ म्हणून विचारलें आहे. या प्रश्नास उत्तर देण्यांत गोऱ्या सोजिरांच्या इतकी साम्राज्य संरक्षणाची आमची तयारी आहे असें सांगणारा तरुणवर्ग सुशिक्षितांतूनच उभारला पाहिजे. कारण शिक्षित व अशिक्षित हा भेद मुळीं राष्ट्रांतून लुप्त होण्यासाठीं लोकांस प्राथमिक व दुय्यम शिक्षण देण्यांत हल्लींच्या सर्व पुढाऱ्यांनीं कंकण बांधलें पाहिजे, ही तर आमची पहिली मागणी आहे. लेखन, वांचन व गणित हें प्राथमिक शिक्षण व स्वधर्मज्ञान, स्वदेशाच्या इतिहासाचें ज्ञान, युरोपच्या प्रमुख इतिहासाचें ज्ञान, व्यापारी व सृष्टिज्ञानविषयक भूगोलाची चांगली माहिती, जगांतील भाषांपैकीं चारदोन भाषांचें ज्ञान, संस्कृत भाषेचें सामान्य ज्ञान व कोणताहि उदरनिर्वाहाचा धंदा हें दुय्यम शिक्षण. यांपैकीं बराच भाग राष्ट्रांतील प्रत्येक माणसास आला पाहिजे तर हिंदुस्थान देश हल्लींच्या काळांत आपलें ईशनिश्चित प्रथम स्थान पावेल. एरवीं देवानें दिलें आणि कर्मानें नेलें असें होईल. ब्रिटिश साम्राज्याच्या टापूंत हिंदुस्थानास हें वैभव व ही मान्यता प्राप्त झाल्यानें आजच्या इंग्रज मुत्सद्द्यांचीं वचनें सत्य होऊन, तमाम दुनियेंत इंग्रजी राज्याचा बोलबाला झाल्याशिवाय राहणार नाहीं. समर्थ विद्यालय तें काय एवढेंसें, त्यांत इतके दूरवर मनाचे मांडे खाण्याचा प्रकार काय चालला आहे हा आक्षेप वाचकांच्या जिव्हाग्रावर उड्या मारीत आहे, हें आम्ही जाणून आहों; परंतु या गोष्टी अशा लखलखीत पुढें दिसल्याशिवाय आमचें पाऊल पुढें पडलें नाहीं. तेंच सूर्याचें पिलूं आमच्या वाचकांनीं आमच्या इतकें स्पष्ट नाहीं तरी अंधुक अंधुक तरी पाहावें म्हणून हें वाग्जाल त्यांच्या पुढें आम्हीं पसरलें आहे. दीर्घ वाचन,

अचाट भाषाप्रभुत्व, अपार विचारशक्ति यांपेक्षां सामान्य धोरण, बहुश्रुतपणा, शरीरसामर्थ्य व धडाडीची वागणूक या गोष्टी मुख्यत्वेंकरून साधावयाच्या असल्यानें वरचेवर परीक्षा, वरचेवर शिष्यवृत्तिसमर्पण आणि त्याबरोबर आपसांतील आकस वाढविणें यांपासून आम्ही परावृत्त झालों आहों.

एका परगांवच्या गृहस्थानें रस्त्यांतल्या रस्त्यांत उभें राहून विचारलें, "काहो, अमके अमके गृहस्थ ते तुम्हीच का?" जरा राहल्यानें, समजावयाचें तें समजून त्यानें प्रश्न केला, "काय हो, तुम्हीं ही नवी शाळा कशाला काढली? यांत तुमचा हेतु काय?" घरीं भेटा म्हणावयाची सोय नाहीं, तेव्हां त्याला इतकेंच सांगितलें कीं, "बहिरी आणि मुकी आईची गोष्ट तिसऱ्या पुस्तकांत आहे (आतांच्या मराठी तिसऱ्या पुस्तकांत आहे कीं नाहीं माहीत नाहीं) तीच गोष्ट लागू आहे. आपल्यास परमेश्वरानें जें कर्मा केलें आहे तें आपल्या मुलास देवानें दिलें आहे हें पाहून तिला आनंद झाला. आमच्या स्थितींत, आमच्या शिक्षणांत जीं जीं व्यंगें राहिलीं तीं तीं उलट यत्न केला नाहीं तर, तशींच पुढील पिढींत येणार असें वाटून खेद झाला. म्हणून 'यत्नास लागावें' या हेतूनें हा उद्योग आरंभला आहे." "म्हणजे काय, नीट समजलें नाहीं," असें त्या गृहस्थांनीं म्हटल्यावरून विचारलें, "खरंच का तुम्हांस सर्व समजून घ्यावयाचें? तुमचा आमचा परिचय नाहीं तेव्हां तुम्हांस घरीं कसें बोलवावें?" इतकें म्हटल्याबरोबर ते गृहस्थच म्हणाले, "हो, अलबत येईन, घटकाभर सावचितपणें बोलूं." पुढें हे गृहस्थ पुनः मुळींच दिसले नाहींत. ही आस्था! किंवा कांहीं आकस्मिक काम उद्भवलें असेल. कोणीं नाहीं म्हणावें? पुढील कांहीं भाग त्यांच्या नजरेस पडला तर त्यांचें थोडें समाधान होईल. मागील भागहि अवश्य वाचला पाहिजेच. पण पुढील भागांत सर्व गोष्टी थोडक्यांत येणार आहेत म्हणून तेवढाच पाहण्याची शिफारस केली आहे.

## (५) "वीर्यवती विद्या प्राप्त होण्याचे कांहीं मार्ग"

१. शिकवितांना व शिकतांना सर्व गोष्टी परक्या भाषेच्या द्वारां शिकाव्या लागल्यानें त्या विद्यार्थ्यांस नीट समजत नसत. स्वभाषेंतून शिक्षणाची सोय असती तर कितीतरी ज्ञान अधिक झालें असतें व किती अल्प श्रमानें झालें असतें असें वाटत असे. त्या अनुभवाचा उपयोग करून सर्व विषय देशी भाषेंतून शिकवावयाचें हा निर्धार झाला आहे.

२. सर्व हिंदुस्थान देशांत एक भाषा कोणती व्हावी व सुशिक्षितांचा व्यवहार चालण्यास एक भाषा पाहिजे यांत शंका नाहीं. निरनिराळ्या देशी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या मनांत चालूपैकीं कोणत्याहि भाषेस हा मान देण्याचें नाहीं असें दिसतें. साहाजिकरीत्या हिंदी भाषा ही जागा पटकावील अशी अटकळ करणें कठीण नाहीं. तरी पण संस्कृत भाषेस हें स्थळ मिळाल्यास म्हणजे हें तिचें पूर्वींचेंच पद प्राप्त झाल्यास, कोणाचाच असंतोष होणार नाहीं म्हणून सर्वांस संस्कृत भाषा यावी ह्या हेतूनें तिचें सुलभपणें अध्ययन होणें जरूर आहे. तें हल्लींच्या शाळांतून झालें नाहीं, होणार नाहीं म्हणून सुमारें १५ संधिनियम १०–१२ समासनियम, १०–१२ धातुसाधितांचे नियम, शब्दरूपावलि व धातुरूपावलि एवढ्या पूर्वतयारीनें एकदम संस्कृत वाङ्मयांत विद्यार्थ्यांचा प्रवेश करून द्यावयाचा हा एक आमचा बेत ठरला आहे. प्रत्येक हिंदूस संस्कृत आलेंच पाहिजे. पाहिजे त्या प्रबुद्ध माणसास महिन्याच्या आंत स्वभाषा लिहितांवाचतां शिकविण्याची आम्हांस उमेद आहे. तसेंच, पाहिजे त्या प्रबुद्ध माणसास चालचलाऊ बोलणें, लिहिणें परमुलखांत जरूर पडतें इतकें सहा महिन्यांच्या आंत संस्कृत शिकवितां येईल असा आमचा भरंवसा आहे. मग थोडें थोडें पहिल्यापासून पांच वर्षांच्या क्रमांत शिकविलें असतां बरेंच येईल व त्याचा राष्ट्रांतील निरनिराळ्या प्रांतांत व्यवहार चालण्यास मोठा उपयोग होईल. या बाबतींत हिंदीसारख्या भाषेचा उपयोग होईल. परंतु ती शिकविण्यासाठीं संस्कृतप्रमाणें चोहोंकडे शिक्षक मिळणार नाहींत. लिपीचीहि अडचण आहेच. संस्कृत लिपि सर्वांस येते व भाषा कोठेंहि शिकतां येते. वर सांगितलेल्या पूर्वतयारीनें पंचतंत्र, हितोपदेश, सोप्या कथा व कादंबरीसार इतकें वाचतां येईल. थोडी शिक्षकाची मदत लागेल. हीं पुस्तकें दहा वेळां वाचून लिहिण्या-बोलण्याचा परिपाठ ठेवल्यास कोठेंहि अडचण पडणार नाहीं. अधिक परिश्रम करील त्यास 'अधिकस्याधिकं फलम्' हें सांगावयास भास्कराचार्यांची जरूर नाहींच.

३. पाश्चात्त्य नीतिकल्पना व पौरस्त्य नीतिकल्पना यांचीं मूलतत्त्वें कधींहि भिन्न असूं शकणार नाहींत. याचें कारण मानवस्वभाव :सर्वत्र सारखाच असावयाचा. फक्त परिस्थितिभेदामुळें आचारभेद व संप्रदायभेद होतात. यामुळेंच धर्म व पंथहि निरनिराळे होतात. निवळ तर्कशास्त्राच्या कसास लावलें तर यांचें समाधानकारक रीतीनें समर्थन होणार नाहीं; परंतु भाषा, धर्म, समजुती व आचारविचार यांच्या ऐक्यामुळें लोकांचे राष्ट्रसंबंध जुळून त्या त्या मानवसमूहास

विशिष्टत्व आलेलें असतें. तें व त्याचा अभिमान ह्यालाच राष्ट्राभिमान किंवा देशभक्ति असें नांव आहे. ही सदैव कायम राखून आपल्यांत सुधारणा होत जावी अशा हेतूनें समर्थविद्यालयांत इतिहास व भाषाविषय यांचें अध्यापन चालू आहे व पुढेंहि राहील. आपल्या देशाचा आपल्या लोकांनींच लिहिलेला इतिहास विद्यार्थ्यांस शिकविल्यानें त्या देशाची व त्याच्या इतिहासाची माहिती होऊन अभिमान जागृत होतो. तसे हिंदुस्थानचे इतिहास फार झाले नाहींत. तरीपण त्यांतल्यात्यांत धनुर्धारी यांनीं लिहिलेले इतिहास रा. गोगटे, पावगी, वगैरेंनीं लिहिलेलीं पुस्तकें, तसेंच नाना फडणवीस, महादजी शिंदे, परशुरामभाऊ, बापू गोखले वगैरे वीर व मुत्सद्दी यांचीं चरित्रें व काव्येतिहाससंग्रहांतून व इतरत्र अलीकडे छापलेले ऐतिहासिक लेख यांचा उपयोग करून घेतला जाईल. रामायण, महाभारत व त्यांतील निराळ्या गोष्टी व इतिहास यांचीं पुस्तकें तयार करून रा. रा. बळवंतराव द्रविड यांनीं फार उत्तम कामगिरी केली आहे. ही आमच्या विद्यालयासाठीं जणूं काय त्यांनीं पूर्वतयारी केली असें आम्हांस वाटतें व आमच्या विनंतीचा आदर करून त्यांनीं हीं पुस्तकें आम्हांस आमच्या शाळेकरितांच चांगल्या सवलतीनें देण्याचें मान्य केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. भारत व रामायण हे राष्ट्रांतील अस्सल ग्रंथ होत. यांच्या मराठी भाषेंत कितीतरी रूपांनीं कितीतरी कवींनीं आवृत्ती काढल्या आहेत! परंतु अलीकडे ५० वर्षांत विश्वविद्यापीठांच्या सरकारी शाळा व पाठशाळारूपी खाणींतून विद्वन्मणी निघाले, त्यांच्या वाचनांत यांपैकीं एकहि आवृत्ति आली नाहीं. एवढ्यावरूनच प्रचलित शिक्षणपद्धति दुष्ट अशा छापास लायक ठरत आहे. ग्रंथराज दासबोधासारख्या प्रासादिक ग्रंथास व तो ज्या भाषेंत लिहिला आहे त्या भाषेस विश्वविद्यापीठांत जागा नसावी याहून दुसरी हीनतेची व अराष्ट्रीयत्वाची बाब दुसरी असेल हें आमच्या कल्पनेंतहि येत नाहीं. परंतु अर्ध्या शतकानंतर तरी हा मोह नाहींसा होत आहे. या अंधकारांतून आपण थोडे थोडे प्रकाशांत येत आहों ही तरी परमेश्वराची या राष्ट्रावर कृपाच आहे. एकदां उजाडलें म्हणजे झपाझप सूर्यकिरणें पसरूं लागतात, तेव्हां तसें झाल्यास समर्थविद्यालयांतील शिक्षणाचें धोरण सर्वांस पटून जिकडे तिकडे समर्थविद्यालयें होतील. सारांश, अशा राष्ट्रीय ग्रंथांचे दर इयत्तेंत वाचन होण्याची प्रथमपासून खबरदारी घेऊन, पांच वर्षांत महाभारत व रामायण हे ग्रंथ संपविले जातील; आणि मराठी वाङ्मयाची गोडी इतकी लागेल कीं, त्याच्या वाचनाशिवाय पुढें चैन पडेनासें होईल व त्या वाङ्मयास उत्तेजन देण्याची प्रवृत्ति वाढेल. संस्कृत ग्रंथवाचनासंबंधानेंहि हेंच धोरण राहील. कारण

हेंच व्यंग आमच्या आजपर्यंतच्या शिक्षणांत राहिलें होतें. रत्नावलीसारख्या नाटिका नेमून रामायण व महाभारतास मज्जाव करणाऱ्या शिक्षणक्रमास काय नांव द्यावें? बीभत्स श्लोकांचे अलंकारग्रंथ खपतात पण मनुस्मृति-सारखा सुरेख ग्रंथ नेमला जात नाहीं. त्या विश्वविद्यापीठांत एकदम सुधारणा झाली पाहिजे होती. मराठी व संस्कृत वाचनामध्यें हें राष्ट्रीय स्वरूप राखण्याची खबरदारी घेतली तरी परदेशी वीर, मुत्सद्दी, तत्त्ववेत्ते, कारखानेवाले व ग्रंथकार यांचीं चरित्रें वाचून अलीकडल्या जगांतील शहाणपणाचा व साहसाचा परिचय व्हावा या हेतूनें ग्लॅडस्टन, सिसरो, कॉब्डेन, ब्रॅडला, डिमॉस्थिनीस, बर्क, क्रॉम्प्टन, वॅट, ओकोनेला, फ्रॅंक्लिन, वॉशिंग्टन, जॉन्सन, गोल्ड्स्मिथ, वगैरेंचीं चरित्रें परदेशचे नाना इतिहास वाचनक्रमांत नेमले जातील.

४. वरील कलमाचाच भाग असून जिचें पृथक्त्वानें दिग्दर्शन करावेंसें वाटतें ती गोष्ट ही कीं, अभ्यासाचें ओझें कमी करावें या सबबीनें १८७२ सालापासून दुय्यम शिक्षणांतून अजीबात कमी केलेले ग्रीस व रोमचे इतिहास आमच्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांस अवश्य पढविण्यांत येतील. सर्व युरोपांत त्या साग्र इतिहासाचें ज्ञान प्रत्येक शिक्षितास असतें, परंतु आमच्या पदवीधरास मात्र तें असलें तरी चालेल नसलें तरी चालेल अशी सरकारची प्रवृत्ति आहे. ऐतिहासिक व राजनैतिक शिक्षण मिळण्यास अत्यावश्यक अशा या भागाची सरकारनें केलेली अवहेलना चांगली दृष्टोत्पत्तीस आल्यावर तिकडे दुर्लक्ष करणें अशक्य आहे.

५. हल्लींच्या शिक्षणांत व राष्ट्रांतील सर्व व्यवहारांत इंग्रजी भाषेस ती राजभाषा म्हणून फाजील महत्त्व आलें आहे. ह्या पदावरून तिला भ्रष्ट करून इतर विषयांप्रमाणें तो एक आवश्यक विषय करणें जरूर वाटल्यानें तिचें कांहीं ज्ञान समर्थविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांस होईल. जगांतील अहवाल कळण्यास, इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कानडा इतक्या मोठ्या प्रदेशावर फिरण्यास व पत्रव्यवहार करण्यास उपयुक्त असल्यानें आणि हा देश ब्रिटिश साम्राज्याचा अवयव असल्यानें शिक्षित म्हणविणाऱ्यांना या भाषेचें ज्ञान आवश्यक आहे. परंतु त्या मर्यादेबाहेर देशभाषा व गीर्वाणभाषा, तसेंच जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या भाषांपैकीं एक दोन भाषा शिकण्यास फुरसत मिळूं नये व बुद्धिसामर्थ्य उरूं नये इतका इंग्रजीचा हव्यास करण्याचें बिलकुल कारण नाहीं. त्या भाषेचें हल्लीं जितकें मार्मिक ज्ञान करून घेण्याकडे राष्ट्रांतील उत्साह व सामर्थ्य खर्च

पडत आहे त्यांचा दुसऱ्या अत्यंत महत्त्वाच्या कामीं उपयोग होण्याजोगा आहे म्हणून बोलण्या-लिहिण्यापुरती, व आपल्या भाषेच्या द्वारां मिळण्याजोगें नाहीं असें आपआपल्या कामापुरतें ज्ञान त्या भाषेंतूनच मिळविण्यापुरती ती भाषा आली म्हणजे शेंकडा ९५ शिक्षितांस बस्स आहे. यासाठीं इंग्रजी शिकविण्याची पद्धति व त्या भाषेंतील वाचावयाच्या पुस्तकांची निवडणूक यांत पुष्कळ फरक करावयाचें आम्हीं योजिलें आहे. नाना तऱ्हेच्या पुस्तकावलींतील उपयुक्त भाग घेऊन इकडच्या रिवाजाचे भाग घालून आपली पुस्तकावलि निराळी तयार करावयाची आहे. परंतु हें काम अधिक मंडळींचें साहाय्य व कांहीं दिवसांचा अनुभव मिळाल्यावर हातीं घ्यावयाचें आहे. प्रथमत: तर संभाषणपद्धतीनें म्हणजे भाषा शिकण्याच्या स्वाभाविक पद्धतीनें इंग्रजी शिकविण्यास प्रारंभ केला आहे व हा प्रयोग यशस्वी होईल अशी उमेद आहे. बोलणें ऐकून ऐकून लहान मुलें आपल्या घरीं नेहमीं भाषा शिकतात. अंतर इतकेंच कीं, त्या मुलांस बोलणारांचा सहवास पुष्कळ असतो व आमच्या शाळांत या विषयास वेळ थोडा असतो. यामुळें संभाषणपद्धतीनें प्रारंभ करून शब्दांचे उच्चार बसूं लागले व बोलण्याचाहि थोडा सराव झाला म्हणजे पुस्तकावरून शिकण्यास सुलभ जाईल.

६. निव्वळ बुद्धिशिक्षणाकडे सर्व लक्ष पुरविल्यामुळें आमच्या राष्ट्रांतील तरुणवर्ग अगदीं परावलंबी झाला आहे. सरकारी नोकरी मिळेल तर त्याची सोय होते, पोटभर अन्न मिळण्याची तरतूद होते व अब्रूनें जीवयात्रा चालते. एरवीं सर्व दिशा शून्य झाल्यासारखें त्यास भासतें. ही स्थिति कांहीं अंशीं पालटून त्यांचें लक्ष औद्योगिक व्यवसायाकडेहि लावावें असा सर्व राष्ट्रनायकांचा अभिप्राय झाला आहे. म्हणून रेखाकला, विणकाम, सुतारकाम, शिवणकाम, इत्यादि गोष्टींच्या शिक्षणाच्या सोयी करणें हें समर्थविद्यालयाचें प्रधान अंग आहे. त्यासाठीं नितळ कामकरूंपेक्षा वरिष्ठ दर्जाचे लोक तयार व्हावेत म्हणून शास्त्रीय-रीत्या निरनिराळ्या शाखांचें औपपत्तिक व प्रायोगिक ज्ञान देण्याची योजना करावयाची आहे. रेखाकला व सृष्टिशास्त्रांपैकीं रसायन, वनस्पति व शरीर यांची थोडक्यांत मनोरंजक रीतीनें माहिती देण्यास प्रारंभ झाला आहेच. याच शाखेसाठीं द्रव्यसाहाय्य मोठें लागेल; तसेंच शिक्षकवर्गाहि तयार करावा लागेल. या सर्व गोष्टींबद्दल महाराष्ट्रांत अभिमान उत्पन्न झाला म्हणजे कशाचीच उणीव पडणार नाहीं.

७. व्यायाम व करमणूक या संबंधानें वर सामान्य विवेचनांत बराच भाग येऊन गेला आहे. त्यासंबंधानें पुन: लिहिण्याचें कारण नाहीं. अभ्यासाचें

ओझें कमी केल्यानें व याच विषयाकडे विशेष लक्ष पुरविल्यानें राष्ट्रांतील तरुणांत स्पष्ट दिसून येणाऱ्या सामर्थ्यहानीस प्रतिबंध करणें, व त्यांच्या अंगांत सर्व प्रकारें कोणत्याहि राष्ट्रांतील तरुणांची योग्यता आणणें हा तर आमच्या विद्यालयाचा आदिहेतु आहे.

या विद्यालयांत प्रवेश होण्यासाठीं गणित, वाचन व लेखन हे विषय झाले असले म्हणजे झालें. हे विषय येथील पूर्वींच निघालेल्या '**समर्थबालशाळेंत**' आम्हांस पाहिजे त्या धोरणावर शिकविले जातात. मुलांस सुरेख घडघड वाचतां येऊन मतलब साधारण सांगतां यावा, असा भाषाविषयक, झडती, सामान्य तोंडचे हिशेब, व्यवहारी अपूर्णांक, त्रैराशिक व चांगलें मोडी व बालबोध अक्षर, वाणीशुद्धि, महिम्न, लक्ष्मीस्तोत्र व प्राथमिक आवश्यक ब्रह्मकर्म इतक्या गोष्टी शिकविल्या जातात. नकाशा दाखविण्यापलीकडे भूगोल शिकविला जात नाहीं व इतिहास वाचनपुस्तकाप्रमाणें वरचेवर थोडा थोडा वाचून घेतला जातो. इतकें प्राथमिक शिक्षण समर्थविद्यालयांत येणाऱ्यांस पुरें असतें. समर्थ-बालशाळेंतून येणाऱ्या मुलांखेरीज मुलांची चांचणी घेऊन तो नालायक असल्यास कांहीं दिवस त्या शाळेंत पाठविला जातो.

आमच्या शाळेंतून विद्यार्थी हल्लीं अस्तित्वांत असलेल्या विश्वविद्यापीठाचे पदवीधर बनविण्यासाठीं तयार केले जात नाहींत हें वर आलेंच आहे. तर मग आमचे शिक्षक तरी हल्लींचे पदवीधरच पाहिजेत असा आम्ही निर्बंध ठेवीतच नाहीं. मात्र त्या त्या विषयांत तरबेज होण्याची इच्छा असावी. त्यांना शिक्षकाचा धंदा मनापासून आवडत असून ते त्या कामास आमरण वाहून घेणारे असावेत या हेतूनें शिक्षकाश्रम पृथक् ठेवला आहे. म्हणजे सर्व शिक्षक एका ठिकाणीं एकाच शिक्षकालयांत राहण्याची सर्व व्यवस्था केली आहे. शिक्षणाचें धोरण एक राहावें म्हणून सहवासानें व संभाषणानें मतें व आचरण दृढ होण्यासाठीं शिक्षकाश्रमाची योजना आहे. यांपैकींच निदान एक असामी विद्यार्थिवसतिगृहांत राहील. शिक्षकांचा सर्व चालचलाऊ खर्च चालविला जाईल. त्यांना कोणत्याहि प्रकारें कुटुंबचिंतापाश असूं नये हें चांगलें. अशा निग्रहानें विद्याव्यवसायी, राष्ट्रोदयेच्छु तरुण हल्लींच्या शिक्षकांप्रमाणें एम्. ए. पासून खालीं मॅट्रिकपर्यंत जे कोणी या अटीवर व येथील शिस्तीप्रमाणें वागण्याचें मान्य करून समर्थविद्या-लयाच्या कार्यास साहाय्य करूं इच्छीत असतील, त्यांनीं प्रथम संस्थेचे चिटणीस रा. रा. राजाराम दामोदर देसाई, बी. ए., यांच्याशीं पत्रव्यवहार करून शिक्षका-

श्रमांत प्रवेश करावा. सारांश, अगदीं बालपणापासून समर्थबालशाळा, समर्थ-विद्यालय व शिक्षकाश्रम या तीन संस्थांतून तयार झालेलीं माणसें आमच्या कार्यास कालेंकरून तयार होतील अशी उमेद आहे.

मध्यंतरीं '**भारतीय विश्वविद्यालय**' व त्याच्या शाखा झाल्यास तिकडे समर्थविद्यालयांतील लोक प्रवेशपरीक्षेसाठीं जातील. पुढें त्यांचें उच्च शिक्षण होऊन इतर राष्ट्रांप्रमाणें वीर्यवती विद्या आमच्या तरुणांस प्राप्त होईल. त्यायोगें शिक्षकाश्रमाचें काम हलकें होईल. तोंपर्यंत सर्व तयारी आपली आपणांसच केली पाहिजे. प्रस्तुत प्रसंगीं जगन्नाथ पंडिताची कोकिलान्योक्ति ध्यानीं घेऊन भावी भारतीय विश्वविद्यालयाची प्रतीक्षा करीत स्वस्थ बसणें योग्य आहे.

तावत्कोकिल विरसान्यापय दिवसान्वनान्तरे निवसन् ।
यावन्मिलदलिमालः कोऽपि रसालः समुल्लसति ॥

येणेंप्रमाणें कार्यास प्रारंभ केला आहे. नुसत्या जाहिरातीपेक्षां माहिती अधिक द्या असें अनेक ठिकाणांहून लिहून आल्यावरून या उद्योगाचे हेतू व त्याची दिशा दाखविली आहे. मनांत आहे तितकें कागदावर वठणें शक्य नाहीं व वठलें तरी आज उपहासासच कारण होईल. या सर्व प्रयत्नास ईशकृपा साहाय्य झाल्यास राष्ट्राचें दैन्य फिटणार आहे. इतकेंच म्हणणें आज शक्य आहे.

• • •

## ५. हिंदु एज्युकेशन फंड

स्वदेशी चळवळ यशस्वी होण्यास धंदेशिक्षण व व्यापारी शिक्षण वाढविणें हाच एक उपाय आहे; परंतु त्याकडे लोकांचें जावें तितकें लक्ष जात नाहीं. खरी जागृति झाली असती तर केवळ बुद्धिशिक्षणाकडे किंवा सामान्य शिक्षणाकडे त्याचा ओढा कमी झाला असता. परंतु या बाबतींत विद्यार्थिजनाची घावरगुंडी उडून जाणें साहजिक आहे. पालकांसहि आपल्या मुलांस कोणता मार्ग दाखवावा, कसलें शिक्षण द्यावें ह्याची पंचाईतच पडते. सरकारी नोकऱ्या मिळत नाहींत आणि दुसऱ्या कोणत्या रीतीनें उदरनिर्वाह करावा तें समजत नाहीं; अशा कष्टमय स्थितींत सर्व तरुणवर्ग पडला आहे. दुसरें कांहीं सुचत नाहीं म्हणून मॅट्रिक व्हावें आणि एखाद्या कॉलेजची वाट धरावी, नाहीं तर वकिलीचीं पुस्तकें हातांत घ्यावीं याहून दुसरा मार्ग नाहीं. 'धोपट मार्गा सोडुं नको' असा वडिलोपार्जित उपदेश हाडींमाशीं खिळलेला आहे. त्याविरुद्ध मार्ग दाखवितील ते व तो मार्ग आक्रमिण्यास साहाय्य करतील ते आज राष्ट्राचे मोठे उपकर्ते समजले पाहिजेत. योग्य पूर्वशिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांसाठीं औद्योगिक व व्यापारीय शिक्षणाच्या शाळा जागोजाग स्थापल्या पाहिजेत. अशा काळांत शिक्षक होण्यास त्या त्या शास्त्रांचा व्यासंग केलेले सद्गृहस्थ पाहिजेत. परकीय शिक्षक दिलसफाईनें शिकवीत नाहींत. यासाठीं शास्त्रीय व कलाकौशल्याचें शिक्षण मिळविण्यासाठीं आपल्या देशांतून युरोप, अमेरिका व जपानकडे विद्यार्थी पाठवून तयार करून आणले पाहिजेत. श्री. सयाजीरावमहाराज गायकवाडांसारख्या राजवर्यानें पुढाकार घेऊन सर्व राजेरजवाड्यांकडून मोठा निधि गोळा करून हें काम केलें पाहिजे. त्याच्या अभावीं हें काम आमच्या इलाख्यांत हिंदु एज्युकेशन फंड ही संस्था करीत आहे. व्हावयास पाहिजे त्या मानानें या संस्थेची कामगिरी 'दर्यामें खसखस' या प्रमाणाचीच आहे. याचा सर्व दोष आमच्या अंगीं वसत असलेल्या औदासीन्याचा आहे. तथापि झाल्या त्या अल्पस्वल्प कामगिरीबद्दल जिम्मेदार मंडळींचें अभिनंदन करणें जरूर आहे. तिसरा वार्षिक अहवाल किंवा वृत्तान्त नुकताच प्रसिद्ध झाला आहे. वस्तुतः तो

वार्षिक नाहीं आणि त्यास मंडळीनें वार्षिक म्हटलेंहि नाहीं. प्रस्तुत अहवालास ‘तिसरा प्रगतीचा अहवाल’ असेंच म्हटलें आहे. दुसऱ्या अहवालास मात्र ‘दुसरा वार्षिक प्रगति-वृत्तान्त’ असें म्हटलें आहे. यावरून वार्षिक वृत्तान्त प्रसिद्ध करण्याचा हेतु असून तो मुंबईस प्लेग वगैरे अडचणीमुळें प्रसिद्ध करतां आला नाहीं. तेव्हां ३१ डिसेंबर १९०७ पर्यंतची हकीगत इतक्या उशिरां प्रसिद्ध करण्यापेक्षां पुढले सहा महिनेहि त्यांत धरून प्रस्तुत अहवालांत जून १९०७ पर्यंतची हकीगत दिली आहे. आजवर ज्या एकंदर आठ विद्यार्थ्यांनीं या संस्थेचा फायदा घेतला आहे त्यांची एक यादी जोडली आहे. तींत कोणास किती रक्कम दिली हें दर्शविलें असतें तर बरें झालें असतें. तसेंच, वर्गणीदार किंवा सभासद यांचीं नांवें देऊन त्यांच्यापुढें देऊं केलेली रक्कम व पोंचलेली रक्कम असे आंकडे दिले असते तर पूर्वीच्या हकीगतींत देऊं केलेल्या ३४,७७५ रुपयां-पैकीं किती वसूल झाले व नवीन किती वसूल झाले हें कळण्यास मार्ग झाला असता. गेल्या दीड वर्षांत खर्चवेंच भागून केवळ १,५०० रुपयेच शिलकींत टाकतां यावे ही कांहीं फार समाधानकारक स्थिति नाहीं. तितक्या अवधींत सबंध खर्चानें संस्थेनें काय तो नवीन एकच विद्यार्थी परदेशीं ठेवला आहे. दुसरे दोन गेले आहेत ते आपला निर्वाह मजुरीवरच करीत आहेत. जपानचें उदाहरण पुढें ठेवून आपण काम केलें पाहिजे. अशा प्रकारच्या गोष्टी बोलतांना आपण पुष्कळ लोक पाहतों, परंतु हिंदु एज्युकेशन फंडासारख्या संस्थांस मदत किती थोडी मिळते हें ध्यानीं घेतल्यास अजून आपण बोलघेवडेपणांतच लोळत आहों. हें मोठ्या शरमेनें कबूल केलें पाहिजे. दुसऱ्या सालच्या वृत्तान्तांत १२८ सभासद असून आणखी ५७ लोकांनीं सभासद होण्याचें अभिवचन दिलें आहे, असें नमूद केलें आहे. आणि प्रस्तुत वृत्तान्तांत सभासदांची संख्या १५६ असल्याचें दाखविलें आहे. याचा स्पष्ट अर्थ असा कीं, कितीएकांनीं आपलीं वचनें पूर्ण करण्याचें किंवा तसें करण्यास प्रारंभ करण्याचेंहि उभ्या दीड वर्षांत मनांत आणलें नाहीं. यामुळें पोकळ वचनें इतक्या लोकांनीं दिलीं आहेत व त्यांनीं पैसे भरले तर एवढी रक्कम होईल असें मनोराज्य प्रस्तुत अहवालांतहि आलें आहे, त्याची किंमत करावी. तात्पर्य काय कीं, डॉ. नानासाहेब देशमुख, शेट मुरारजी गोकुळदास देवजी, ना. गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. खेर, रा. भाजेकर वकील, रा. माधवराव बोडस व रा. दत्तात्रय बळवंत चिटणीस सॉलिसिटर अशा मंडळींनीं कायदेशीर

व्यवस्था करून उभारलेल्या संस्थेसदेखील आपल्या राष्ट्राचे लोक भावी कल्याणाच्या बाबतींत साहाय्य करण्यास भराभर पुढें येत नाहींत. प्रथमतः मंडळी ३०० रु. खालीं रकमा घेत नव्हती; परंतु मध्यम स्थितींतील लोकांस एवढी उडी झेंपत नाहीं; त्यांच्यासाठीं लहान रकमा घेण्यास सुरुवात केली आहे. या रीतीनें ' दसकी लकडी एकका बोजा ' या न्यायानें जरी लक्षावधि रुपये उभारले तरी ठीक होईल. परंतु तो कालहि दूरच दिसतो. जागोजाग या फंडासाठीं स्वयंसेवकांनीं काम केलें पाहिजे व मि. त्रिभुवनदास मालवीयांसारख्या धनाढ्यांनींहि मोठमोठ्या देणग्यांनीं आंत भर टाकली पाहिजे. दरसाल २०० लोक तरी मुंबई इलाख्यांतून गेले पाहिजेत. असें १० वर्षें चालल्यास कांहीं परिणाम होईल.

अशा प्रकारच्या संस्था चालविण्यास लोकांनीं किती झटलें पाहिजे याची कल्पनाच आमच्या राष्ट्रांत आली नाहीं. पण बारीकसारीक रकमांनीं असलीं प्रचंड राष्ट्रकार्यें होत नसतात. या कार्यांचा उपयोग पुढील सर्व पिढ्यांस होणारा असतो, म्हणून दहा वर्षांत होणारा खर्च पुढील दोन तीन पिढ्यांवर वांटला जाणें उचित आहे. ज्या गोष्टीपासून त्यांना फायदा होणार त्या गोष्टीस होणाऱ्या खर्चाचा बोजा त्यांच्यावर पडला पाहिजे व तो त्यांनीं आनंदानें सोसला पाहिजे. यासाठीं हिंदु एज्युकेशन फंडासारख्या संस्थांनीं तीस वर्षें किंवा साठ वर्षें कर्ज काढावयास कोणतीच हरकत दिसत नाहीं. सरकारी व परक्या राष्ट्रांच्या बँकांत पैसे ठेवणारांनीं किंवा नोटा खरेदी करून ठेवणारांनीं तितकेंच व्याज घेण्याचें कबूल करून, आपला पैसा आपल्या राष्ट्राच्या कामीं लावून स्वार्थ व परार्थ किंवा व्यक्तिदृष्टि स्वार्थ व राष्ट्रदृष्टि स्वार्थ साधावा ह्यासारखें दुसरें कांहींच कल्याणकारक नाहीं. सर्व मोठमोठीं कार्यें अशींच झालीं पाहिजेत. परंतु आमच्यांत वर्गण्या म्हणजे भिक्षांदेहीचा प्रकार झाला आहे. देणग्या लहान असल्या तर त्यांचें कांहीं वाटत नाहीं; पण मोठमोठ्या देणग्यांचा कांहीं तरी साक्षात् मोबदला मिळावा असें धनिकांस वाटतें. तसा मोबदला बिन सरकारी संस्थांस मदत केल्यानें कोठून मिळणार? पैसा नाहीं म्हणावें तर गव्हर्नरसाहेबांच्या मनांत पदार्थसंग्रहालय काढावयाचें असलें व तीन लाख रुपये हवे असले तर सहा लाख रुपये उभे राहतात. एल्फिन्स्टन कॉलेजसाठीं २५ लाख रुपये एकानें देऊं केले म्हणतात. एका बहाद्दरानें तर माझा एक लाखाचा धर्मादाय तुमच्या हातून व्हावा अशी माझी इच्छा आहे, असें गव्हर्नरास म्हटलें. सारांश,

जोंपर्यंत धनाच्या व्ययांत असा परदेशीपणा व पदव्या किंवा कृपा हा प्रत्यक्ष मोबदला सरकारपासून धनिक मिळवूं इच्छितात, तोंपर्यंत स्वार्थत्यागी व उत्साहशाली देशभक्तांच्या प्रयत्नास फारच अल्प फलप्राप्ति होणार हें निश्चित आहे. मध्यम स्थितींतल्या सुशिक्षित वर्गांत संशयात्मे व चिकित्सेखोर लोकांचा भरणा मोठा असून त्यांच्यांत देशकल्याणाच्या चर्चेपलीकडे कांहीं विशेष दिसत नाहीं. मिळून चहूंकडे गुडघ्याइतकें पाणी !

● ● ●

# राजकीय लेख


१ दोन गैरसमज

२ टिळक अध्यक्ष कां नकोत ?

३ राष्ट्रीय सभा

४ उभय पक्षांचें कर्तव्य व
नव्या पक्षाची जबाबदारी

५ राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी चळवळीचें
प्रधान अंग आहे काय ?

६ संस्थानी राज्यकारभार

७ मोर्लेसाहेबांचें भाषण

८ हें धर्मयुद्ध नव्हे !

९ राष्ट्रीय सभेचें स्थलान्तर

१० सुरत येथील असमाधानकारक प्रसंग

११ पुढें काय ? स्वराज्य कीं साम्राज्य ?

१२ बॉम्बगोळा प्रकरण

# १. दोन गैरसमज

[ ' विश्ववृत्त ', जुलई १९०६ ]

सकृदपि दृष्ट्वा पुरुषं विबुधा जानन्ति सारतां तस्य ।
हस्ततुलयापि निपुणाः पलप्रमाणं विजानन्ति ॥ १ ॥
विरला जानन्ति गुणान् विरलाः कुर्वन्ति निर्धने स्नेहम् ।
विरलाः परकार्यरताः परदुःखेनापि दुःखिता विरलाः ॥ २ ॥
शुभं वाप्यशुभं कर्म फलकालमपेक्षते ।
शरद्येव फलत्याशु शालिर्न सुरभौ क्वचित् ॥ ३ ॥
शक्तिरहितोऽपि कुप्यति सेवासक्तोऽपि मानमुद्वहति ।
अधनोऽपि हि कामयते जानाति विधिर्विडम्बयितुम् ॥ ४ ॥
अप्रकटीकृतशक्तिः शक्तोऽपि जनस्तिरस्क्रियां लभते ।
निवसन्नन्तर्दारुणि लङ्घ्यो वह्निर्न तु ज्वलितः ॥ ५ ॥
लोके गुरुत्वं विपरीततां वा ।
स्वचेष्टितान्येव नरं नयन्ति ॥ ६ ॥
निरतिशयं गरियाणं तेन जनन्याः स्मरन्ति विद्वांसः ।
यत्कमपि वहति धर्भ महतामपि यो गुरुर्भवति ॥ ७ ॥

आपल्या राष्ट्रांत अलीकडे बरीच जागृति झाली आहे याविषयीं वाद नाहीं. परंतु राष्ट्र म्हणजे सर्व हिंदुस्थान देश म्हणजे आसेतुहिमाचल सर्व प्रदेश असा अर्थ समजावयाचा तर ती जागृति किंवा तें आत्मज्ञान केवढ्या थोड्या प्रमाणावर झालें आहे याचा विचार पाहतां, हल्लीं ज्या प्रकारचीं भाषणें केलीं जातात व ज्या प्रकारचे लेख लिहिले जातात त्यांत दूरदर्शित्वापेक्षां औत्सुक्याचा भाग अधिक असतो, असें म्हणणें प्राप्त आहे. स्वदेशाच्या उत्कर्षासाठीं लिहिणारांबोलणारांमध्यें अनास्था किंवा निराशा असण्यापेक्षां आवेश व उल्हास अधिक दृष्टीस पडावा हें अभिनंदनीय आहे. तरुण व होतकरू लोकांमध्यें उत्कंठा अधिक असल्यानें बोलण्यांत किंवा लिहिण्यांत तितका सारासार विचार सांपडला नाहीं तरी नवल नाहीं व तो अनुभवानें यावयाचा असल्यानें त्याचा अकालीं प्रादुर्भाव झाला तर तें ठीक नाहीं, असेंहि एकपक्षीं म्हणतां येईल. तरुणांनीं तरुणांसारखेंच बोलावें, आवेशयुक्त असावें यांतच राष्ट्रहित आहे, परंतु ज्यांच्यांतील पहिला आवेशाचा व उल्हासाचा कढ येऊन

गेला आहे किंवा जावयास पाहिजे आहे त्यांचे बोल व लेख नीतिनिपुण मुत्सद्द्यास साजतील असेच असले पाहिजेत. राष्ट्रकृतीस योग्य वळण लावणाऱ्या सर्व लोकांनीं, अर्थात् वर्तमानपत्रकर्ते, मासिकपुस्तककर्ते व जबाबदार वक्ते यांच्या उद्गारांत एक प्रकारचें भारदस्त व कृत्यनुकूल धोरण असणें जरूर आहे. व्यवस्थितपणानें सर्व राष्ट्राची उद्योगनौका चालविली जात आहे कीं नाहीं, हें कळण्यास उत्तम मार्ग म्हणजे त्यांतील जबाबदार लेखकांचे व वक्त्यांचे उद्गार होत. आजकाल राष्ट्रीय सभा ही आमच्या सर्व राजकीय चळवळींचें केंद्र म्हणजे मध्यबिंदु आहे. तिनें जें धोरण घालून दिलें असेल त्याप्रमाणें चालावयाचें हें सर्वांचें आद्यकर्तव्य आहे. त्या सभेंत अमके विचार निघावेत, तेथें अमके ठराव पसार व्हावेत, तिचा सरकारशीं अमका संबंध असावा किंवा नसावा याविषयीं चर्चा करण्यास वाटेल तितकी मोकळीक आहे; परंतु हल्लीं म्हणजे पुढची राष्ट्रीय सभा भरून निराळें धोरण किंवा वळण मिळाल्याचें अधिकारत्वानें जाहीर होईपर्यंत गेल्या राष्ट्रीय सभेंत ठरलेल्या दिशेनें उद्योग चालले पाहिजेत. ते तसे चालले असल्यास त्यासंबंधीं गैरसमज उत्पन्न करण्याजोगे किंवा त्यांस विघ्न करण्याजोगे लेख आपण लिहूं लागलों व भाषणें आपण करूं लागलों तर तटस्थपणें अवलोकन करणारे विचारवान् लोक आम्हांस काय म्हणतील, याचा आम्हांस पोंच राहिला आहे काय? गेल्या म्हणजे श्रीक्षेत्र काशी येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेमध्यें कार्याच्या दिशा दोन ठरल्या होत्या. एक नामदार गोखले यांनीं विलायतेस जाऊन तेथील पुढारी लोक व जबाबदार अधिकारी यांच्यापुढें हिंदुस्थानच्या आशा व मनोरथ मांडून, त्यांचा शक्य तो परिणाम घडवून आणणें व दुसरी, वर्षभर सर्व हिंदुस्थानच्या लोकांत राष्ट्रीय सभेचे हेतु व उद्योग यांची कल्पना पसरणें व तद्द्वारां राजकीय चळवळ करणें. या दोन उद्योगांपैकीं पहिल्या अर्थात् म्हणजे आपल्याच हुकुमानें व आपण दाखविलेल्या दिशेनें चाललेल्या उद्योगासंबंधानें नाहीं नाहीं तें लिहीत बसण्याचा किंवा बोलत सुटण्याचा क्रम बिलकुल पसंत नाहीं. ना. गोखले, मि. मोर्ले किंवा लिबरल पक्ष यांस कल्पवृक्ष मानून चालले आहेत असें टीकाकारांस वाटत आहे कीं काय कोण जाणे! लिबरल पक्ष बहुतां वर्षांनीं अधिकारारूढ झाला आहे व त्या पक्षांतहि बर्क व ग्लॅडस्टनसारख्या मतांचे भोक्ते मोर्लेसाहेब हिंदुस्थानचे चिटणीस झाले आहेत; अशा वेळीं इकडील लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लागण्याचा संभव अधिक आहे. हे विचार गेल्या राष्ट्रीय सभेस पसंत पडले व त्याप्रमाणें नामदार गोखले विलायतेस गेले. मुत्सद्दी

व वक्तृत्वकलानिपुण या नात्यानें लिबरल पक्षाविषयीं व मि. मोर्लेविषयीं त्यांच्या भाषणांत येऊन गेलेल्या गौरवाच्या उद्गारांवरून सर्व कांहीं या 'वदान्यगुरु' सद्गुरूच्या कृपेनें साध्य होईल असा भ्रम होऊं नये, म्हणून आपल्या अध्यक्ष-स्थानापासून केलेल्या भाषणाच्या शेवटीं त्यांनीं इशारा देऊन ठेवला आहे. आज-वरचे सर्व प्रतिकूल टीकाकार आपल्या स्वत:इतकेंदेखील राजधोरण ना. गोखले यांस नाहीं असें गृहीत धरून चालले आहेत. वक्त्यांच्या व लेखकांच्या भाषणांतील अर्थवाद कोणता व निर्भेळ सत्य विचार कोणते हें समजण्याइतकें ज्ञान या टीकाकारांस नाहीं असें नव्हे, तर एका तऱ्हेचे विचार मस्तकांत भरले म्हणजे आपणांस सहज सुचणारे विचारदेखील इतरांच्या डोक्यांतहि येण्याजोगे आहेत या गोष्टीचें भान राहत नाहीं. यामुळेंच नाहीं तें गृहीत धरून लेखणी किंवा वाणी चालू ठेवतात. स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं किंवा प्रौढरीत्या म्हणावयाचें म्हटलें म्हणजे 'आत्मैव ह्यात्मनो बंधु:' ह्या गोष्टी सामान्य जनां-प्रमाणें गोखल्यांनाहि कळतात. स्वावलंबनाचें तत्त्व त्यांच्या ग्रहणशक्तीबाहेर आहे असें मानण्याचें कारण नाहीं, किंवा त्या शक्तीच्या आवांक्यांत आलें नाहीं असेंहि कोणीं समजूं नये. परंतु 'शक्तीशिवाय मस्ती' करणारांपैकीं ते नव्हते. तरुणांत ही प्रवृत्ति असते व असली तरी त्याचा त्यांना तितका विषादहि वाटावयाचा नाहीं. कारण पुष्कळ असलें तर तळाला कांहींतरी राहील. परंतु 'तयारीशिवाय स्वारी' करून पाठमोरें फिरण्याशिवाय दुसरें कांहीं निष्पन्न होऊं नये या गोष्टीचा त्यांना वीट आहे. हेंच त्यांच्या शेंकडों भाषणांवरून दिसून येतें. सामर्थ्य व संयमन या दोहोंचें समतोल मिश्रण असलें तरच वीर्यवती क्रिया घडून येईल. यासाठीं सामर्थ्य प्राप्त होईपर्यंत वाक्संयमन व एकंदरीनें आत्मनिग्रह करणें यांतच खरें शौर्य आहे, असें त्यांचें गुरुपरंपराप्राप्त शिक्षण आहे व त्यांतच कल्याण आहे असें कोणांसहि वाटेल. येथील सत्ताधारीवर्ग आपल्या दृढबद्ध मुष्टींतून यत्किंचितहि अधिकार सोडण्यास तयार नाहीं, सर्व राज्याधिकारांचा खंडमक्ता आपला आहे असा त्यांचा आग्रह आहे; आणि हा गड हातीं येणें दुर्घट आहे, म्हणून पायरीपायरीनें जाण्यासाठीं थोडें थोडेंच मागणें केलें पाहिजे व तेंहि देण्यास विलंब केला तरी डोकें भणभणून जाऊं देतां कामा नये. 'आपण दृढनिश्चयानें वागतों व परस्परांशीं प्रतारणा केली नाहीं तर अखेर सर्व कांहीं आपल्या हातीं आलेंच पाहिजे. आपली संख्या इतकी मोठी आहे कीं, एकमेकांशीं आपण सत्यभावानें वागलों तर आपली मनोरथसिद्धि निश्चित आहे.' अशा प्रकारचा त्यांचा उपदेश

किंवा कळकळीची प्रार्थना विसरून जाऊन व त्यांच्या प्रयत्नांच्या सर्व दिशांकडे दुर्लक्ष करून त्यांच्याविषयीं गैरसमज करण्यांत कोणास कांहीं फायदा वाटत असेल तर वाटो; परंतु कार्यकारी मुत्सद्दी व उतावीळ देशाभिमानी यांत नेहमीं अंतर असावयाचेंच.

ना. गोखले यांच्यासंबंधानें गैरसमज झाला आहे, त्याहून भयंकर गैरसमज आमच्यापैकीं कांहींच्या मनांत कोणाविषयीं झाला असेल तर तो मि. मोर्ले यांच्यासंबंधानेंच होय. यांच्यासंबंधानें कित्येक लेख वाचून आमच्या मनावर असा ग्रह झाला आहे कीं, आमचे लोक यांस कर्झनफुलरपेक्षां वाईट समजत आहेत. याचें एक आणि एकच कारण आहे. तें हें कीं, प्रथमतःच लोकांच्या मनाची अशी भावना होऊन गेली कीं मोर्लेसाहेबांची कारकीर्द हा एक आपणांस परीस सांपडला आहे; याच्या संगानें सर्व कांहीं परकीय राज्यरूपी अनिष्ट लोहाचें सुवर्ण होऊन जाईल. परकीय राज्य तें परकीयच. कोणी कितीहि पंडित किंवा सत्यशील असला तरी तात्त्विक मतांची ताबडतोब व पूर्ण अंमलबजावणी करूं शकत नाहीं. इच्छा असली तरी त्यास हें शक्य नाहीं. आमच्या इकडे ‘ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या’ म्हणणाऱ्या वेदान्तवाद्यांस परमार्थदशा वेगळी व व्यवहारदशा वेगळी असें म्हणून संसाराची उपपत्ति करावी लागते. त्यांत स्वजनांशीं वागतांना जनकादि तत्त्ववेत्ते वागले तसे परकीयांशीं वागणें शक्य नाहीं. सत्यसुद्धां सर्वदा सर्वत्र पाळणें शहाणपणाचें नाहीं हें नीतिनिपुण सांगत आले आहेत. तेव्हां भलतीच अपेक्षा करून निराश पावावें व मग वाटेल तें बरळत सुटावें यांत वेडेपणा आहे. मि. मोर्ले यांस करावयाचें पहिलें कार्य आहे तें आपल्या स्थानाची निश्चित परंपरा राखणें हें होय. स्वतःच्या आचरणाचा संबंध जेथें येईल तेथें त्यांच्या सौजन्याचा, विद्वत्तेचा व तत्त्वज्ञानाचा उपयोग हिंदुस्थानाला झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांनीं स्वतः हिंदुस्थान देश पाहिला नाहीं; हिंदुस्थान देशांतील लोकांची सांपत्तिक स्थिति त्यांच्या नजरेस कशी यावी? हिंदुस्थान देश व हिंदुस्थानचे लोक यांत इंग्रजी मुत्सद्दी फरक करीत नाहीत. हिंदुस्थानभूमींतून आयात-निर्यात माल आला व गेला यावर श्रीमंती-गरिबीचे सिद्धान्त बांधले जातात. देशस्थिति व लोकस्थिति यांत फरक करून आम्ही प्रतिपादन करतों कीं देशस्थितीचे आंकडे लोकस्थितिदर्शक नाहींत. व्यापाराचा फायदा परकी व्यापारी लोकांच्या खिशांत उतरतो व प्रजा दीन राहते ती राहतेच. परंतु या प्रतिपादनाचा स्टेट सेक्रेटरीस उपयोग होत नाहीं. सरकारीरीत्या खालून शिजून येईल तें अन्न वाढवणें हेंच बजेटच्या दिवशींचें त्याचें काम आहे. अधिकारी लोकांवर सर्व

राज्यकारभाराची जबाबदारी असते म्हणून त्यांच्यावर गैरविश्वासाचा चकार शब्दहि त्यांस काढतां येत नाहीं. अशामुळें त्या भाषणांत आलेले आंकडे व त्यांवरून काढलेलीं अनुमानें यासंबंधीं स्टेट सेक्रेटरी जबाबदार नाहीं. त्यांच्या मुखांतून येतात एवढ्याबद्दल त्यांस जबाबदार धरणें म्हणजे पार्लमेंटच्या प्रारंभीं होणाऱ्या राजाच्या भाषणाबद्दल राजास जबाबदार धरण्यासारखेंच आहे. मागील कृत्यें होऊन गेलीं तीं गेलीं, त्यांत फरक करावयाचा नाहीं हें तत्त्व इंग्रज राज्याचें काय आणि कोणत्या राज्याचें काय ठरलेलें आहे; म्हणून ज्यासंबंधानें मागील स्टेट सेक्रेटरींनीं पूर्ण निकाल लावला आहे त्यासंबंधानें मि. मोर्ले यांचें मत कसेंहि असलें तरी ती 'गोष्ट ठाम' असें वारंवार ते म्हणत आहेत. त्यांतलें इंगित आपण समजून त्या बाबतींत चालू चळवळीच्या पद्धतीनें कांहीं उपयोग होणार नाहीं. लॉर्ड डलहौसीनें ज्या कारणांमुळें कित्येक राज्यें ब्रिटिश साम्राज्यांत सामील केलीं त्या कारणांवरून दुसरीं खालसा करावयाचीं नाहींत असें ठरलें, पण पूर्वीचीं गिळलीं तीं गिळलींच. मि. मोर्लेसाहेब तत्त्ववेत्ते आहेत, सत्य-पक्षपाती आहेत, सरळ विचार करणारे आहेत, म्हणून सातारच्या गादीबद्दल आम्हीं आज प्रश्न काढला तर किंवा रा. टिळकांवरील राजद्रोहाचा प्रश्न उपस्थित केला तर मागील कारकीर्दीस दोष देऊन सातारच्या गादीची पुनः स्थापना किंवा रा. टिळकांच्या खर्चाची भरपाई या गोष्टी होणार नाहींत. हल्लीं मि. मोर्ले यांच्यापुढें चालू असलेल्या प्रकरणांत त्यांच्या परीक्षेची वेळ आहे. ती परीक्षा त्यांची उतरली नाहीं असें म्हणण्यास आम्हांस कारण नाहीं. त्यांच्या कारकीर्दीस सहा महिने झाले असून सहा वर्षें जावयाचीं आहेत. लोकोपचारांसाठीं व रूढीस अनुसरून ज्या गोष्टी त्यांना बोलाव्या लागतात त्यांवर भिस्त ठेवून दूषण देणें चांगलें नाहीं. वाट पाहण्याची अजून वेळ आहे. राणीच्या जाहीरनाम्या-संबंधाचें मत, राष्ट्रीय सभेसंबंधानें आदर, मिठाच्या कराविषयीं उद्गार, एतद्देशीयांस उच्च प्रकारच्या नोकऱ्या देण्याचा काल येऊन ठेपला आहे हें आश्वासन, या सर्वांसंबंधीं अजून कांहींच रूप दिसलें नाहीं व तें दिसावयास अवधि निदान वर्ष सहा महिन्यांचाहि न देतां पोकळ सहानुभूति पोकळ सहानुभूति अशी ओरड करणें हें समंजसपणाचें नव्हे; दूरदर्शित्वाचें म्हणावें तर तेंहि नाहीं. आपल्या कारकीर्दींत पुष्कळ गोष्टी बऱ्या व्हाव्यात असें मि. मोर्ले यांस वाटत आहे असा साक्षात् सहवासा-अंतीं जर ना. गोखले यांच्या मनाचा ग्रह झाला असला, तर एवढ्या जबाब-दारीच्या जागेवर आलेल्या सद्गृहस्थांत लॉर्ड रिपनच्यानंतर मि. मोर्लेशिवाय हिंदुस्थानचा मित्र दुसरा कोणी नव्हता, असें म्हणण्याची संधि न येईल असें

आम्हांस वाटत नाहीं. इतक्या दिवसांच्या राजकीय शिक्षणामध्यें ना. गोखल्यांच्या अंगीं माणसाची पारख आली नाहीं असें आमच्यानें म्हणवत नाहीं, आणि आमच्या-प्रमाणेंच साऱ्या राष्ट्राचें मत नसतें तर गेल्या राष्ट्रीय परिषदेचें सभापतित्वहि त्यांना देण्यांत आलें नसतें. यावरून शिरोलेखांतील पहिल्या पद्याप्रमाणें नामदार गोखल्यांच्या अभिप्रायावर विश्वास ठेवणें हें अधिक सुरक्षित आहे, असें आम्हांस वाटतें. मि. मोर्लेसाहेबांस इकडची स्थिति समजावून देण्यास व या देशातर्फे शिष्टाई करण्यास ना. गोखल्यांची योजना झाल्यापासून कांहीं कार्यभाग झाला आहे यास दुसरा कसला पुरावा नसता, तरी इकडील इंग्रजी पत्रकार आपल्या चिकार्टीतून कांहीं गोष्टी सुटणार अशा भीतीस आपल्या अंतःकरणांत थारा देत आहेत, ही गोष्टच आम्हांस कमी वाटली नसती. महिन्यांतून एखादा लेख इकडील गोष्टीसंबंधानें लिहिला न लिहिला अशीं पत्रें अलीकडे वारंवार आम्हां दीनांकडे मेहरनजर पोंचवूं लागलीं आहेत, व नामदार गोखले व मि. दत्त यांच्या विधानांत अतिशयोक्ति आहे असें लिहितां लिहितां ( मि. मोर्ले यांच्या मनावर त्या विधानांच्या अविचाल्य अनुकूल ग्रह होत चालला आहे म्हणूनच ) आपणाहि त्यांच्या म्हणण्यास मान देणें जरूर आहे असें म्हणत आहोंत. असो. राष्ट्रीय सभेच्या आज्ञेवरून विलायतेस ना. गोखले गेले याचा उपयोग मि. मोर्ले यांस झाला याचें कारण तरी ऋग्वेदीय ऋषींच्या स्तोत्रांपैकीं 'श्रुत्कर्ण' हें एक विशेषण मि. मोर्ले यांस लागू पडण्याजोगें आहे म्हणूनच कीं नाहीं? श्रुत्कर्ण म्हणजे ऐकणारे कान आहेत ज्याला, असा देव असला तर त्याच्याजवळ प्रार्थना करण्यांत फायदा आहे. नाहींतर, प्रार्थना करण्याचा काय उपयोग? आतां या सर्व प्रार्थनांस आधार अर्थात् नीतितत्त्वाचा व त्या प्रार्थनांचा अव्हेर केल्यास कधीं काळीं होईल त्या प्रजाक्षोभाच्या भीती-चाच हें आपण जाणून आहों. अशा दोन्ही गोष्टींस क्रॉस, फाउलर, हॅमिल्टन व ब्रॉडरिक यांनीं भीक घातली नाहीं व मि. मोर्ले घालतील अशी आशा आहे म्हणून हे हल्लींचे सेक्रेटरी कांहीं निराळ्या प्रकारचे आहेत असें म्हणणें प्राप्त आहे व तसा अनुभव येईल अशी आशा आहे. यासाठीं त्याच्याविषयीं जरा जपून लिहावें अशी आमची सर्व वर्तमानपत्रकारांस विनंती आहे. आशेची निराशा ही तर आपल्या घरची आहेच. तिचा अनुभव घेत आपण शहाणे होत चाललों आहोंच व करावयाचे ते उद्योग झपाट्यानें व जोरानें हातीं घेत आहोंच. मि. मोर्ले काय आणि खुद्द ब्रॅडला किंवा बर्क काय आम्हांस पाहिजे तें स्वराज्य देणार थोडेच आहेत. त्यासाठीं झगडा निराळाच आहे. त्याची तयारी निराळीच. ती

सावकाशीनें नव्हे धिमेपणानें नव्हे तर अविलंबानें व औत्कंठ्यानेंच केली पाहिजे. प्रचंड स्वार्थत्याग, दृढ निर्धार व अविश्रांत परिश्रम करणारी स्वदेशसेवकचमू सिद्ध होऊन राष्ट्रांतील गाढ अंधकार विलयाला येऊन आत्मज्ञानकिरण कानाकोपऱ्यांत पोंचवील तेव्हां मि. मोर्ले उदात्त आहेत कीं अनुदात्त आहेत याचा विचार करण्याची भानगडच पडणार नाहीं. आज आपण सर्वथा अन्नास मोताद झालों आहों, वस्त्राविण उघडे पडलों आहों, म्हणून सारा कमी करा, मिठावरील कर उठवा, गिरणीवरील मालावर जकात बसवूं नका, आमचीं चार माणसें मोठ्या हुद्द्यांवर घ्या, म्हणून तोंड वेंगाडतों; पण हीं कामें आमचीं आहेत, तीं आमचीं आम्हीच उरकणार, तुम्ही स्वस्थ पाहून चुकलों माकलों तर सांगा असें म्हणून ती सत्ता हस्तगत करून घेण्याची तयारी हेंच खरें राष्ट्रकार्य. तें करण्यास सर फेरोजशा मेथा, रा. टिळक, नामदार गोखले यांची मुंबई इलाख्यातर्फे ट्रायम्वर किंवा त्रिनायकी म्हणून नेमणूक होईल व एकदिलानें सर्व लोक त्यांच्या ध्वजच्छायेखालीं आपआपलीं कामें बिनबोभाट करतील तोच सुदिन! असे दर प्रांतांतून नेमले जाऊन स्वराज्यसुखप्राप्तिपरायण सत्पुत्रांनीं भरतभूमि गजबजून जाईल तेव्हांच ती धन्य होईल व पृथ्वीवरील सर्व जाणतीं राष्ट्रें तिचा कीर्तिदुंदुभि वाजवितील.

• • •

# २. टिळक अध्यक्ष कां नकोत ?

[ ' विश्ववृत्त ', ऑगस्ट १९०६ ]

राष्ट्रीय सभेपासून बहुतेक सर्व स्थानिक चळवळीच्या संस्था मोडून गेल्या हा एक अनिष्ट परिणाम झाला असें आमच्यांतील पुढारी म्हणत असतात. या एका काँग्रेसरूपी विराट पुरुषानें सर्व बारीकसारीक चळवळी गिळून टाकल्या व त्यामुळें जागोजाग लोकसभा नाहींत, कांहीं नाहींत, असल्या तर नांवाच्या आहेत, त्यांत बिलकुल त्राण राहिला नाहीं अशी चोहोंकडे हाकाहाक झाली आहे.

अशी स्थिति झाली आहे म्हणून वार्षिक राष्ट्रीय सभेसाठींतरी एकसारखी वर्षभर साऱ्या राष्ट्रांत कष्टी मेहनत होत आहे असेंहि नाहीं. त्यामुळें राष्ट्रीय सभा एक सालअखेरची मजलस म्हणजे आळसांनीं मजा मारण्याची जागा व प्रसंग असेंच झालें आहे. ही सालअखेरच्या नाताळमहोत्सवाची राजनिष्ठ अनुकृति पुरे, कांहीं खरें खरें कार्य झालें पाहिजे. सर्व सालभर राष्ट्रीय सभेच्या कार्यासाठीं खटपट चालू ठेवण्याची तरतूद केली पाहिजे, अशाबद्दलचें लोकमत प्रबल होत चाललें आहे. राष्ट्रीय सभेनें एकवीस वर्षें काम केलें, यापुढेंहि आजवर चाललेलाच क्रम चालू ठेवावयाचा किंवा त्यांत कांहीं सुधारणा करावयाची यासंबंधानें सालमजकुरीं सहा महिने अगाऊ खल सुरू आहे. बंगाल्यांत व महाराष्ट्रांत स्वदेशी चळवळ जोरानें चालू असल्यानें काँग्रेसनें स्वदेशी चळवळीस अनुसरून स्वावलंबनाचे प्रयत्न करावे आणि सरकारकडे ठराव पाठवूं नयेत, अर्ज करूं नयेत व प्रार्थनाहि करूं नयेत असा एक पक्ष म्हणत आहे. दुसऱ्याचें म्हणणें असें आहे कीं स्वदेशीसाठीं औद्योगिक चळवळ निराळी आहे. औद्योगिक परिषद् व प्रदर्शनें यांनीं हें कार्य होईल. काँग्रेसमध्यें निवळ राजकीय प्रश्नाचा विचार करणें हेंच योग्य आहे. कित्येकांचें मत असें आहे कीं, स्वदेशीविरुद्ध परदेशी किंवा निव्वळ स्वदेशी मालाच्या अभिवृद्धीसाठीं औद्योगिक चळवळीचा उपयोग काय होईल तो होवो व तसा तो होईलहि; आणि कदाचित् फार भीत भीत केला तर नहि होईल; पण स्वदेशी चळवळीचें जोरदार अंग जो बहिष्कार म्हणजे ब्रिटिश मालावरच विशेषतः बहिष्कार घालावयाचा व तद्द्वारां राज्यकर्त्यांच्या राष्ट्रास आपलें असमाधान, द्रव्यदृष्ट्या तरी त्यांचें नुकसान करण्याचा आपला दृढनिश्चय प्रकट करावयाचा हें आतां राष्ट्रीय सभेनें आपल्या हातीं घेतलें पाहिजे. परदेशी मालाचा

खप हिंदुस्थानांत होऊं नये यासाठीं व विशेषत: ब्रिटिश माल तर हिंदुस्थानच्या मर्यादेंत येऊं देऊं नये अशी आपली औद्योगिक उन्नति साधावी अशाबद्दल सर्व लोकांस उद्देशून ठराव म्हणजे एकवटलेल्या राष्ट्राचें राष्ट्रीय सभापतीच्या शिक्कामोर्तबासह चोहोंकडे फैलवावेत अशी एक विचाराची दिशा आहे. सरकारकडे मागून मागून अजून तोंडवाफ दवडावयाची तरी किती ? आतां स्वत: कंबर बांधून तयार होणें अगत्याचें आहे. याच स्वदेशी चळवळीचें अंग राष्ट्रीय शिक्षण तेंहि काम राष्ट्रीय सभेनें हातीं घेऊन आपला स्पष्ट अभिप्राय द्यावा व आपलें वजन त्या पारड्यांत घालावें. परकीय भाषेच्या अध्ययनाच्या पायीं हाडाचीं काडें करून तिच्या द्वारां सर्व ज्ञान मिळविण्यानें कच्चेपणा व कुचरपणा शिक्षित लोकांत वाढविण्याचें बंद करावें. सरकारी शिक्षणपद्धतीखालीं चालविलेल्या शाळा व कॉलेजांतून शिस्तीच्या सुंदर नांवाखालीं स्वदेशाभिमानाचा चक्काचूर होत आहे ह्या अवमानकारक अवदशेचा नायनाट करावा. समजुतीच्या व सवलतीच्या मार्गाचें अवलंबन न करतां लोकांच्या धर्म व रूढींची उद्धटपणें पायमल्ली होत असतां तिकडे डोळेझांक करून त्यांतच आपलीं मुलें व तरुणवर्ग लोटूं न देण्याच्या मार्गास लागावें. एका मदतीच्या कॉलेजांत, तेंहि हिंदूंनीं चालविलेल्या कॉलेजांत, ग्रहणाची सुट्टी नसावी व श्रीशिवाजीमहाराजांची तसबीर डोळ्यांआड झाल्याशिवाय व्यवस्थापक गुरूस चैन पडूं नये व दुसऱ्या एकांत (पण तें पाद्री लोकांचें) महाएकादशीच्या दिवशीं सुट्टी नसल्यामुळें हिंदु विद्यार्थ्यांस संप करावा लागावा, तसेंच युनिव्हर्सिटीच्या चालकांस दिवाळीच्या दिवसांतून हिंदु विद्यार्थ्यांस आपल्या गृहसुखास मुकविण्याचें पातक सालोसाल करावें लागतें. असल्या गैरशिस्तीच्या कैचींतून सोडवून स्वातंत्र्यानें चालविलेल्या विद्याखात्याच्या रेशमी काढण्यांनीं विद्यार्थ्यांस बद्ध करून सुमार्गास लावण्याचें श्रेय राष्ट्रीय सभेनें घ्यावें. कलाकौशल्य व उद्दीमधंद्यास उपयोगी पडणारें ज्ञान लपवून ठेवून संस्कृत पंडित म्हणतात त्याप्रमाणें 'ज्ञानभासानेंच' सर्व शिकणाऱ्या लोकांस तृप्त करण्याचें अजब कारस्थान आतां पुरें झालें, झाली तितकी हानि बस्स आहे, मिळालें तेवढें शासन नवीन मार्ग धरण्याची अक्कल शिकविण्यास उपयोगी पडत आहे असा राष्ट्रांतील शहाण्यासुरत्या लोकांचा ग्रह होत आहे, हें राष्ट्रीय सभेनें जगजाहीर करून राष्ट्रजागृतीचा डंका वाजवावा. पूर्वजांचा ठेवा व परकीयांची आणलेली नवीन दौलत या दोहोंच्या योगानें भरतभूमि धनाढ्य, ज्ञानसंपन्न व सामर्थ्यवती होईल अशी राष्ट्रांतील लोकाग्रणींनीं वाट पकडावी, अशा विचाराचा एक पक्ष जोरानें पुढें येत आहे. सारांश, राष्ट्रीय सभेची तयारी करण्याचें काम दरसालीं फक्त स्वागत-

मंडळी पाहुण्यांची बरदास्त राखण्यासाठीं काय करीत असेल तीच खरी. परंतु सालमजकूरचा रंग कांहीं निराळाच आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

स्वावलंबन पक्षाच्या गाडीचा बिगुल अमरावतीचे सुप्रसिद्ध वकील रा. दादा-साहेब खापर्डे यांनीं फुंकला आहे व त्या योगानें सर्व राष्ट्रांत खळबळ उडून गेली आहे. या स्वावलंबन पक्षाचे अग्रणी रा. बाळ गंगाधर टिळक यांसच येत्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नेमावें अशी सूचना पुढें आली आहे. कलकत्ता मुक्कामीं राष्ट्रीय सभा भरावयाची असल्यानें अध्यक्षाच्या निवडणुकीचें काम बंगाल स्वागत-मंडळीचें आहे. इतर गोष्टी जशा दरसाल विशेष वगळल्याशिवाय होत होत्या परंतु यंदा गाजावाजा विशेष आहे, त्याप्रमाणें यासंबंधानेंसुद्धां बराच बोभाटा झाला आहे. अध्यक्षाची निवडणूक करण्याच्या कामीं एवढा अट्टाहास चालला आहे, असा प्रसंग यापूर्वीं केव्हांच आला नाहीं. राष्ट्रीय सभेस अध्यक्ष अमक्या मताचा असला तरच एखाद्या पक्षाचा मनोरथ सिद्धीस जाईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. अध्यक्षस्थान स्वीकारल्यानें एक प्रकारचें मौनच पत्करणें भाग पडतें. सर्व पक्षांस व मतांस सर्व बाबतींत साम्यानें वागावें लागतें. अध्यक्ष म्हणजे स्वैरसत्ताक राजा नव्हे हें कोणत्याहि बहुमतानें चालणाऱ्या सभेचें काम ज्यानें पाहिलें आहे त्याच्या सहज लक्षांत येऊन चुकलेंच पाहिजे. राष्ट्रीय सभेचें काम तर पूर्वीं विषय-चर्चा सभा ( सब्जेक्ट्स कमिटी ) जसें ठरवील त्या धोरणानें सुरळीत चालतें. विषय-सभेचें काम मोकळ्या मनानें चालावें व वाटेल त्यानें आपलें म्हणणें वाटेल तितक्या जोरानें मांडावें असा शिरस्ता आहे. त्या सभेचें काम सुरळीत व सभांच्या नियमाप्रमाणें चालतें, तरीपण तेथील गोष्टी प्रसिद्ध नसतात. तेथील निकाल कार्यक्रमरूपानें प्रसिद्ध होईल तेवढीच काय ती प्रसिद्धि. तेथें काय झालें हे वर्तमानपत्रांत येऊन ऊहापोह होऊन केव्हां केव्हां आमच्या दुष्मनास चेष्टा करण्यास सांपडते. हें काम घरभेद्यांच्या दुष्कृतीचें फळ आहे. आपल्या समाजांत अद्यापि जूट व सरळ वर्तणूक यांचीं बीजें रुजावयाचीं आहेत इतकेंच समजून स्वस्थ बसावयाचें. विषय-चर्चा सभेस जगांत एक तुलना असेल तर एवढ्या संबंधानें पाहतां ब्रिटिश प्रधानमंडळाची आहे. प्रधानमंडळांत काय चर्चा होते हें कळत नाहीं. परस्परांचा सल्ला घेऊन सर्वांचें म्हणून कांहीं-तरी मत ठरून त्याप्रमाणें पार्लमेंटच्या धोरणानें सर्व कांहीं केलें जातें. त्या मंडळांत कोणाची भाषा कोण बोलला हें कधीं प्रसिद्ध झालें नाहीं. अशा प्रकारें विषय-चर्चा सभेंत म्हणजे कार्यक्रम ठरविण्यासाठीं सर्व मुख-त्यारांपैकीं निवडक मंडळीच्या सभेंत जें ठरेल त्याप्रमाणें राष्ट्रीय सभेचें काम

चालवयाचें अशी वस्तुस्थिति असल्यानें अध्यक्षांचें मत काय आहे, त्यांचें स्वत:चें धोरण काय आहे यास भिऊन जाण्याचें कारण नाहीं. राष्ट्रीय सभेचें सामान्य राजकीय धोरण ज्यास माहीत आहे व राष्ट्रांतील लोकांत ज्याचें वजन असेल व जो गुणांनीं आणि कृतींनीं लोकादरास पात्र झाला आहे, अशा एका मोठ्या पुरुषास राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाची जागा देऊन त्याचा गौरव करणें याहून तूर्त तरी दुसरें बक्षीस लोकांच्या हातीं नाहीं. सार्वजनिक कार्यांमध्यें पुढाकार घेऊन ज्यांनीं लोककल्याणार्थ परिश्रम केले आहेत व स्वार्थत्याग केला आहे, अशा राष्ट्रकार्यकर्त्यांच्या उपकाराची फेड करण्यास व कृतज्ञता व्यक्त करण्यास याहून दुसरें मोठ्या मानाचें पारितोषिक लोकांजवळ नाहीं. सकल-गुणसंपन्न एक परमेश्वरच आहे. आजवर ज्या राष्ट्रपुरुषांस हा मान मिळाला आहे त्यांच्याशीं कोणत्या गुणांमध्यें रा. रा. बळवंतराव टिळक यांची तुलना करतां येण्याजोगी नाहीं असा प्रश्न आम्ही सहज विचारूं शकूं. त्यांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता, नि:सीम देशभक्ति, स्वार्थत्याग, देशकार्यतत्परता व लोकप्रियता याच गुणांवर लुब्ध होऊन त्यांस हा मान यापूर्वींच मिळणें योग्य होतें. परंतु निव्वळ सरकारच्या मुरवतीनुसार समजून उमजून त्यांस आजवर त्या उच्च पदावर लोकांनीं आरूढ केलें नाहीं. लोकनायकांच्या मतास बहुजन-समाजांत जो मान आहे व रा. टिळकांच्या स्नेही व गुणग्राहक मंडळींत राष्ट्रकार्यांत बखेडा माजविण्याची इच्छा नाहीं म्हणून हा प्रश्न त्यांनीं मागें ठेवला. त्यांच्यावर सरकारनें व सरकारी अंमलदारांच्या फुसलतीनें भलभलते आरोप आणून त्यांच्या धवल कीर्तीस काळिमा आणून राष्ट्रनायकरूपी तारामंडळांतून त्यांस भ्रष्ट करावें असे इलाज झाले. परंतु त्या सर्वांचा परिणाम त्यांचें तेज अधिकाधिकच फांकत जाऊन ‘ कृतोपकारा इव विद्विषस्ते ’ या भारवीच्या म्हणण्याप्रमाणें त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं त्यांचें कल्याणच केलें, असें म्हणणें भाग आहे. अशा स्थितींत राष्ट्रांत चोहोंकडे त्यांचा जयजयकार होत आहे यांत आश्चर्य नाहीं. त्यांचीं राजकीय मतें राष्ट्रांत पुष्कळ लोकांना मान्य होऊन त्याचें प्रतिबिंब राष्ट्रीय सभेच्या कार्यांत पडलें तर त्यांत त्यांचा दोष काय? तसें करण्यास त्यांच्या अध्यक्ष होण्यानें किंवा न होण्यानें बाध येणार नाहीं असें आम्हांस वाटतें. प्रश्न इतकाच कीं, कित्येक राष्ट्रनायकांच्या अभिप्रायास मान देऊन मोठ्या जनसमूहानें रा. टिळकांबद्दलची आपली आदरबुद्धि दाबून ठेवली होती ती तशीच ते कायमपणें ठेवतील कीं काय? केसरी पत्राद्वारें व भाषणद्वारां लोकांची जी त्यांनीं सेवा केली आहे व आज एकवीस वर्षें राष्ट्रीय सभेच्या

तत्त्वापासून अणुरेणु न ढळतां त्यांनीं जें आपलें धोरण ठेवलें आहे तें पुष्कळ लोकांस मान्य आहे, ही गोष्ट दडवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. आमचा त्यांचा कित्येक बाबतींत स्पष्ट मतभेद आहे; तरी तो स्पष्टपणें लोकांपुढें मांडल्यावरहि त्याचें महत्त्व लोकांस वाटलें नाहीं तर स्वस्थ बसणें भाग आहे. राष्ट्रांतील लोकांचें मत राष्ट्रीय सभेंत प्रतिबिंबित झालेंच पाहिजे व तें तसें होईलच. कोणाच्या मुरवतीनें तें तसें प्रतिबिंबित झालें नाहीं तर त्या मतास तितकी तीव्रता आली नाहीं असेंच समजावयाचें. सर फिरोजशहा मेथा-सारख्यांच्या मतास हिंदुस्थानच्या लोकांत मान आहे. त्यांच्या मुरवतीखातर कांहीं गोष्टी करण्यापासून लोक पराङ्मुख राहतील; परंतु ही मंडळी राष्ट्रमनाच्या क्षुब्ध स्थितींत आपलें नायकत्व विसरून स्तब्ध बसली तर लोकमताचा प्रवाह स्वाभाविक मार्गानें वाहात राहील. टाइम्स् ऑफ इंडिया, पायोनिअर, इंग्लिशमन् असल्या पत्रांच्या लेखांत तें लोकमत जुमानणार नाहीं, इतकेंच नाहीं तर त्या लेखांच्या धोरणाविरुद्ध वर्तन करण्यांतच पुरुषार्थ आहे असेंहि वाटेल. आज स्वदेशी चळवळीसारखा प्रश्न राष्ट्रीय सभेपुढें मुख्यत्वें आहे. त्यासंबंधानें रा. टिळक यांच्या इतका पुढाकार दुसरें कोणी घेत नाहीं तर त्यांसच विशेष महत्त्व यावें ही गोष्ट दोन आणि दोन चार यासारखी स्पष्ट आहे असें आम्हांस वाटतें. आपमतलबी व मायावी इंग्रजी वर्तमानपत्रें आमच्यांत दुही माजवीत आहेत. यांच्या मानसशास्त्रीय प्रयोगास वश होण्याजोगें मनोदौर्बल्य ज्यांचें असेल ते या पत्रांच्या वाग्जालांत सांपडतील; पण राष्ट्रीय मताचा ओघ पाहून त्यांत आपल्यास कांहीं वावगें दिसत नसेल तर लोकसंग्रह करण्याची संधि दवडणें हें अगदीं गैरमुत्सद्दीपणाचें आहे. रा. टिळकांच्या अध्यक्षतेमुळें राष्ट्रांतील सर्व प्रेरणा एक होण्यास मदत होत असेल तर त्यांसच तो मान देणें योग्य आहे असें कोणीहि म्हणेल. राष्ट्रीय सभा-नौका नुसत्या अध्यक्षाच्या किंवा त्याच्या कंपूच्या म्हणण्याप्रमाणें चालून खडकावर आपटेल हें म्हणणें निव्वळ खोडसाळपणाचें व खोटें आहे. हिंदुस्थानांतील लोक 'वेषधारी' कोण व 'कार्यकारी' कोण हें न ओळखण्याइतके मतिमंद झाले नाहींत असा आमचा पूर्ण ग्रह आहे. आपल्या खाजगी कल्याणाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून लोकहितार्थ कोण झटत आहे हें त्यांस समजतें. आपण केवळ राष्ट्रासाठींच जगत आहों असें ज्याच्या कृतीवरून दिसण्याजोगें आहे अशा माणसाबद्दल, मग तो गोखले असो किंवा टिळक असो, लोकांना सहज नाहीं तरी कालावधीनें लक्षांत येतेंच येतें. अशा स्थितींत राष्ट्रास आपलें वळण लागावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें कार्यास

प्रारंभ करावा. मागें मागें राहून अमका असा, अमका तसा, असें म्हणून शिव्याशाप देण्यांत अर्थ नाहीं. कितीहि खालावलेलें राष्ट्र असलें तरी काम आहेच. त्याची वाण पडणार नाहीं. जितकें अधिक खालावलेलें राष्ट्र असेल तितकें अधिकच काम आहे. अहंकार न बाळगतां जो माणूस काम करण्यास पुढें येईल त्यास लोक पुढें करतील, त्यास मान देतील; दुष्टपणानें किंवा कमी समजुतीनें त्याचा पाय धरून त्यास पाडण्यास जे लोक यत्न करतील तेच खड्ड्यांत घसरतील, त्यांचेच दांत पडतील, असा सर्व दुनियेचा अनुभव आहे. खरा माणूस लवकर ओळखला तर राष्ट्राचें कल्याण होतें. उशिरां ओळखला तर घात होऊन गेल्यावर राष्ट्रास पश्चात्ताप होतो. यासाठीं ज्याला ज्याला म्हणून आपलें एखादें धोरण इष्ट वाटत असेल, त्यानें खरा स्वार्थत्याग करून राष्ट्रास वळण लावण्यास पुढें यावें. मायावी लोकांची कांस धरून आपल्या लोकांस विघ्न करूं नये इतकेंच आमचें सांगणें आहे. अशा प्रकारें रा. टिळक यांचें वर्तन आजवर झालें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे, किंवा राष्ट्रांतील मोठ्या जनसमूहास तशी वाटत आहे. राष्ट्रीय सभेच्या गादीवर रा. टिळक बसले एवढ्यानेंच त्या सभेंत अमक्या मताची सरशी होईल अशी भीति बाळगण्याचें बिलकुल कारण नाहीं, हें वर दाखविलेंच आहे. मग रा. टिळक अध्यक्ष कां नकोत ह्या प्रश्नास सयुक्तिक जबाब राहात नाहीं हेंच खरें. सरकारनें त्यांस राजद्रोही ठरविलें होतें, मुंबई युनिव्हर्सिटीनें त्यांचें सभासदत्व काढून घेतलें, कायदे कौन्सिलांत त्यांची निवडणूक लोकांनीं केली असती तर एखादें बुइल्कस प्रकरण उपस्थित झालें असतें. रा. टिळकांनीं ती परीक्षा पाहिली नाहीं; कदाचित् सरकारभीरु स्थानिक स्वराज्यांतील गुलाम राजांचीं मतेंहि त्यांना मिळालीं नसतीं. परंतु या सर्व गोष्टींनीं त्यांचें कांहीं वांकडें झालें नाहीं. राष्ट्रीय सभेंतून त्यांना मज्जाव झाला नाहीं. ते आले म्हणजे टाळ्यांच्या गजरांनीं लोक आपला आदर व्यक्त करीत असतात. त्यांचें भाषण प्रेमानें व लक्षपूर्वक ऐकून घेतात. तेव्हां राष्ट्रीय सभेस त्यांची चाललेली राष्ट्रांतील कामगिरी मान्य आहे असें स्पष्ट होतें. मग रा. टिळक अध्यक्ष कां नकोत? राष्ट्रीय सभेचें सभापतित्व दिल्यानें राष्ट्रसभा-नौका खडकावर आपटेल अशी भीति बाळगण्याजोगें त्यांचें कोणतें आचरण किंवा भाषण झालें आहे हें कोणीं दाखवून देईल काय? राष्ट्रैक्य साधण्यास ज्या गोष्टी कराव्यात असें वाटलें त्याच गोष्टी त्यांनीं आजवर केल्या आहेत. मतभेदास पुष्कळ जागा असेल. मनुष्यसुलभ बारीकसारीक दोषहि इतरांप्रमाणें त्यांच्यांत असतील; परंतु त्यांचा गौरव करण्यासारखे

लोकोत्तर गुण त्यांचेजवळ आहेत म्हणून त्यांस अध्यक्ष निवडण्याबद्दल विरोध असला तर तो अत्यल्प जनसंख्येचा आहे, व त्यांपैकीं सर्वांचे प्रवर्तक हेतु शुद्ध व सात्त्विकच असतील असें म्हणण्याचें साहस करणें कठीण आहे. सालमजकुरीं या प्रश्नाची कशीहि वासलात लावली तरी हा प्रश्न राष्ट्रापुढें कायमचा आहे. रा. टिळक या मानास योग्य आहेत याविषयीं शंका नाहीं. सरकाराप्रमाणें किंवा तज्जातीय पत्रकर्त्यांप्रमाणें आपलें मत नाहीं व आपण स्वतंत्र विचार करूं शकतों; आपले खरे हितचिंतक व हितकर्ते कोण हें आपणांस कळतें व तें तसें कळलें आहे असें स्पष्ट दर्शविण्यास आपण भीत नाहीं हें दाखविण्याची हीच वेळ आहे.

ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस, येत्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाच्या जागीं कोणाची निवडणूक व्हावी या प्रश्नाचा नागपूर येथील स्वागत मंडळामध्यें खल होणार आहे. तेथील नवीन पक्षाच्या मतें रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांस सालमजकुरीं हा मान द्यावा असें आहे. तेथील जुन्या पक्षाचा विचार मि. राजाबिहारी घोष यांची, निदान तिलकेतराची योजना त्या स्थानीं करावी असा आहे. गेल्या म्हणजे कलकत्ता येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेंत ठरल्याप्रमाणें स्वागत मंडळाच्या तीनचतुर्थांश मतानें हा निकाल लागला नाहीं तर कॉंग्रेस कमिटी नेमली आहे. तिच्यापुढें हा प्रश्न येऊन तेथें जें ठरेल तें खरें. आज दोन वर्षें रा. टिळकांच्या नेमणुकीविषयीं पुष्कळ चर्चा झाली आहे. आमचें मत आम्हीं गतसालींच दिलें होतें तेंच कायम आहे. मि. दादाभाई यांस पुढें करून हा प्रश्न कसाबसा एक वर्ष मागें टाकला; पण मागें टाकलेली किंवा दडपून टाकलेली गोष्ट मुळीं नाहींशी झाली असें थोडेंच होणार आहे? यासाठीं अशा दडपादडपीनें किंवा एखाद्या प्रसंगीं एखाद्या कमिटींत बहुमत अमक्या तऱ्हेचें मिळवितां येईल म्हणून या प्रश्नाचा कसाबसा निकाल करून टाकावा हें नीट नाहीं. ही झटापट निकराची दिसते. गेल्या सालीं ज्याचें नांव घेतलें कीं, उत्तररामचरितांत म्हटल्याप्रमाणें — **विरोधो विश्रान्तः प्रसरति रसो निर्वृतघनस्तदौद्धत्यं क्वापि व्रजति विनयः प्रह्वयति माम् । झटित्यस्मिन्दृष्टे किमपि परवानस्मि, यदि वा महार्घस्तीर्थानामिव हि महतां कोऽप्यतिशयः ॥** अशा परमपूज्य पितामहाच्या आगमनानें सर्व जिकडच्या तिकडे सामसूम झालें. इतक्या कष्ट अपेष्टा सोसंवून मि. दादाभाईस आणल्यासारखें त्यांनींच स्वराज्याची कल्पना लोकांपुढें स्पष्ट मांडली. तीच रा. टिळक अध्यक्ष होऊन त्यांनीं पुढें ठेवली असती तर सर्वांस कबूल पडली

असती कीं काय याची शंकाच वाटते. यावरून घडतें तें सर्व ईशसंकेतानुरूप एकंदरीनें कल्याणासाठींच घडतें असें म्हणावयाचें! यंदाहि जें होईल त्यापासून कल्याणच होईल असा आमचा भरंवसा आहे. परंतु निकें भविष्यज्ञान सामान्य मानवी बुद्धीस अप्राप्य असल्यानें या प्रश्नासंबंधानें विचार करणारांनीं लक्षांत घेण्याजोग्या अशा ज्या गोष्टी आम्हांस वाटतात त्या वाचकांपुढें ठेवणें जरूर आहे.

रा. टिळकांच्याइतका राजकीय चळवळींत असलेला कोणीहि पुरुष अद्यापि राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष व्हावयाचा राहिला नाहीं. त्यांच्याइतका सरकारनें छळवाद दुसऱ्या कोणाचा केला नाहीं. यावरून बहुजनसमाजाला पूज्य झालेला, जनपदहितकर्ता केवळ नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांच्या 'पोक्त विचारा'मुळें कसा मागें पडून राहतो हें स्पष्ट होतें. १८९७ सालच्या राष्ट्रीय सभेमध्यें त्यांच्याबद्दल खेदप्रदर्शक ठरावदेखील करवला नाहीं. त्याबद्दल लोकांनीं त्या वेळीं जोर धरला नाहीं. याचें कारण इतकेंच कीं, सरकारजवळ आज नाहीं उद्यां दाद लागेल अशी आशा होती. सरकारला मुद्दाम चिडविण्यांत अर्थ काय? असें वाटत होतें. साताराच्या प्रांतिक सभेमध्यें तरी खुद्द मुंबई इलाख्यांत घडलेल्या गोष्टींवर रोख ठेवून सरकारची राज्यरीति दुष्ट झाली आहे असा एक ठराव पसार करण्याची सूचना पुढें आल्याबरोबर सगळा बाजार मोडण्याची वेळ आली. त्या गोष्टी घडून गेल्यावर लॉर्ड कर्झनी झाली. आतां लोकपक्ष पुरा चीत करून टाकावा, अशी बुद्धि सरकारास झाली आहे अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. सरकारवरील विश्वास उडून गेला आहे. अर्थात् आपण होऊन कॉन्झर्व्हेटिव्ह नाहीं तर, लिबरल पक्षांतील मंडळी तरी उदार तत्त्वें व मानवांचे समसमान हक्क ध्यानीं आणून हिंदुस्थानांतील लोकांस स्वराज्यभार वाहण्यास तयार करील अशी आशा होती ती समूळ नाहींशी झाली. आतां आपल्यावर ज्याअर्थीं ब्रिटिश राज्यसत्ता आहे व ती आमच्यावर बसवून घेण्यास आपणच कारण झालों आहों, तेव्हां तिजबद्दल दोष द्यावयाचा तर आपणांसच दिला पाहिजे. आमचे पूर्वज फसले, आपसांत भांडले, दुसऱ्याचें पिलूं घरांत घेतलें. 'भटास दिली ओसरी व भट हळूहळू पाय पसरी' अशी गत झाली. आमची राजसत्ता गेली तिजबरोबर व्यापार गेला, कलाकौशल्य ठार झालें, उद्योगाची संवय मोडली, स्थित्यनुरूप जें औद्योगिक व यांत्रिक ज्ञान पाहिजे तें मिळविलें नाहीं. सारांश, बुद्धिनाश झाला आणि प्रणाश झाला. असें रडत बसण्यापेक्षां या सर्व गोष्टींस कारण जें अज्ञान व त्यामुळें झालेला मोह यांचा नाश करण्याच्या उद्योगास झपाट्यानें लागा; असा एकसारखा

उपदेशानें व उदाहरणानें लोकांच्या मनावर पक्का बोध ठसविण्याची ज्यानें खटपट केली व अजूनहि करीत आहे अशा महापुरुषास अध्यक्ष नको म्हणणारांस भीति कशाची वाटत आहे? सरकारनें राजद्रोहाचा खटला केला म्हणून रा. टिळकांशीं त्यानें सर्व व्यवहार बंद केला आहे काय? साहेब लोक त्यांच्याशीं सभ्यपणानें वागतात; ते साहेबाशीं सभ्यपणानें वागतात. इंग्रजी राज्य आज उलथून पडावें किंवा पाडावें असें त्यांनीं कधीं म्हटलें नाहीं, कधीं लिहिलें नाहीं. कॉंग्रेसच्या हरएक सभेंत त्यांचीं भाषणें होतात. इतर चार लोकांप्रमाणें ते कॉंग्रेसभक्त आहेत. कॉंग्रेस भरवूं नये किंवा सरकारशीं कायदेशीर रीतीनें झगडूं नये असा त्यांचा लेख किंवा बोल कोणी दाखवून देईल तर खरें. अर्थाचा अनर्थ करून त्यांच्यावर आग पाखडावयाची व आपणच तेवढे राजनिष्ठ व दुसरे राजद्रोही असें भासविण्यांत कोणास पुरुषार्थ वाटत असेल तर वाटो. सरकारचे धूर्त अंमलदार जहाल मवाळ हे सर्व जुलमी राज्यपद्धतीचे एकसारखेच कर्दनकाळ आहेत असें ओळखून आहेत. यांपैकीं कोणी आपण सरकारचे विश्वासनिधि किंवा कृपापात्र समजत असतील तर ती सपशेल चूक आहे. आपसांत फूट माजवून सर्वांचा सहज नाश करून टाकण्यास मदत देण्याची दुर्बुद्धि नेमस्त म्हणविणाऱ्या पक्षानें आतां धरूं नये. क्षुद्र बुद्धीस थारा देऊन माझ्यावर यांनीं असा कुशब्दप्रहार केला, माझें लोकांतील वजन बुडविण्यास हे कारण झाले किंवा बुडविण्याचा यत्न केला, अशा विचारांनीं कोणीहि आपलें मन कलुषित करण्याची ही वेळ नाहीं. इंग्लंडांत चळवळ करावयाची असेल तर ती नेटानें करा, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिऊं नका असें रा. टिळकांचें म्हणणें आहे. राष्ट्रीय शिक्षण देऊन लोकांचीं मनें स्वदेशी करा. इंग्रजांच्या मालावर बहिष्कार घालून त्यांच्या खिशाला चट्टा बसेल असें करून त्यांना जागे करा. इंग्रजांचें राज्य आहे तोंपर्यंत त्यांच्याकडून काय सवलती मिळतील त्या घ्याच; परंतु त्याबद्दल आभार मानून एवढ्यानें आम्हीं तुष्ट झालों असें बिलकुल दाखवूं नका. फुसक्या व फसवेगिरीच्या देणग्यांनीं तुमच्या तोंडास पानें पुसलीं तरी '**उपकारभारें शिरसा वहामि**' असें म्हणत नाचूं नका. तेवढ्यानें तुमच्या हक्काच्या मागणीचा नेटाचा उद्योग शिथिल पडूं देऊं नका. मागणी कबूल करीपर्यंत कायदेशीर रीतीचे अडवणुकीचे सर्व उपाय करण्यांत कसूर करूं नका. हिंदुस्थानांत कायम घर करून राहणारे व त्याच्या उत्कर्षाबद्दल झटणारे सर्व लोकांचें येथें राज्य पाहिजे, मग ते मूळचे ख्रिस्ती किंवा बाटलेले ख्रिस्ती, मुसलमान, पारशी किंवा हिंदु असोत, अशा सर्वांचें हें राष्ट्र आहे असें म्हणणारे

रा. टिळक आहेत. आम्हांस रा. टिळकांचीं मतें वाटतात तीं हींच. काँग्रेसचे अध्यक्ष होण्यास या मतांनीं विघ्न कसें येईल कळत नाहीं. ब्रिटिश साम्राज्याशीं संबंध राखून स्वतःच्या प्रयत्नांनीं आपली सर्वतोपरी उन्नति करून घेऊन स्वराज्य-सुखाचा उपभोग आपल्या देशास मिळावा हा हेतु पुढें होऊन काम करण्यांत ज्यांनीं आपलें सर्वस्व खर्च केलें, अलीकडे स्वदेशी चळवळ निघाल्यापासून शरीरप्रकृतीचीहि पर्वा केली नाहीं, अशा सद्गृहस्थाचा मान करण्यास विलंब लावणें हें गैर आहे. याहून कठोर शब्द आमच्या लेखणींतून उतरवत नाहींत. सर्व जहालांत अति नेमस्त रा. टिळक हेच आहेत व त्यांच्या निवडणुकीनेंच यंदाची काँग्रेस सुरक्षितपणें पार पडेल, नाहींतर हें तारूं खडकावर आपटेल अशी आम्हांस भीति वाटते. रा. टिळकांस माणसाची मुरवत आहे. राष्ट्रीय जबाबदारी ते नीट ओळखतात. मतभेदाचा एखादा प्रश्न उत्पन्न झाला म्हणजे रबर किती ओढावा, किती ताणावा हें त्यांना नीट समजतें. सारांश, खऱ्या दूरदर्शित्वाचें व औदार्याचें काम म्हटलें म्हणजे रा. टिळकांसच अध्यक्ष निवडावें, लिहूं नये पण ओघानें तेंहि लिहितोंच. कोण जाणें अशीच लठ्ठालठ्ठी चालून हें राष्ट्रीय सिंहासन कित्येकांस दोन दोनदां देऊन रा. टिळकांस एकदादेखील दिलें नाहीं याबद्दल सतत अश्रु ढाळीत राहण्याचा प्रसंग राष्ट्रावर दुर्दैवानें येईल. यासाठीं आजवर केलेलें पातक करीत राहूं नये. निर्दोषी कोण आहे ? आजवर झालेले सगळे अध्यक्ष सर्व सद्गुणाचे व सुनीतीचे पुतळेच आहेत काय किंवा होते काय ? कृतघ्न व अरेरावी सरकारी अंमलदारास भिऊन आमच्यांतील माननीयाचा मान करण्यास आम्हीं भ्यावें काय ? आम्हां सर्व सुशिक्षितांस शत्रु म्हणणाऱ्या उदार शिरोमणींच्या हातून खऱ्या कल्याणाच्या गोष्टी आम्हांस सुखानें मिळणार नाहींतच. त्याला काय वाटेल ? त्याच्या पित्त्यांना काय वाटेल ? या भीतीनें एका खऱ्या योग्य मनुष्याचा अपमान करण्यास आम्ही तयार होतों ! रा. टिळकांचे दोष आम्ही जाणीत नाहीं असें नाहीं, पण त्यांच्याविषयीं चाललेले लपंडाव व केलेलीं विधानें आम्हांस मानवत नाहींत.

**अविनयमनुमन्तुं नोत्सहे दुर्जनानाम् ।** —भर्तृहरी

हें स्पष्ट सांगून कालिदासाच्या एका वाक्याची आठवण करून देऊन हा स्फुट लेख संपवितों.

**प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजाव्यतिक्रमः ।**

• • •

# ३. राष्ट्रीय सभा

[ ' विश्ववृत्त ', डिसेंबर १९०६ ]

आज ज्या पार्लमेंटच्वें अधिष्ठान विलायतेस आहे, त्या पार्लमेंट-विषयीं नामदार गोखले यांनीं काढलेले उद्गार गेल्या राष्ट्रीय सभेस बऱ्याच अंशीं लागू पडतात. 'हल्लींची प्रतिनिधि सभा मागच्या प्रतिनिधि सभेप्रमाणेंच आहे असा समज करून घेणें म्हणजे गोंधळांत पडणें होय. तसा समज करून घेऊन कोणींहि गोंधळांत पडूं नये. जो जो माणूस सभेस जातो त्यास असेंच वाटतें व तो तसे उद्गारहि काढतो.' १९०६ च्या राष्ट्रीय सभेनें कांहीं राष्ट्रांत क्रान्ति घडवून आणली आहे असा भाग नाहीं. परंतु राष्ट्रीय सभेच्या द्वारां राष्ट्रांत काय चाललें आहे हें कळून आलें इतकेंच काय तें खरें असतां, या राष्ट्रीय सभे-संबंधानेंच लोकांच्या मुखावाटें व लेखावाटें असे उद्गार कां यावेत हें समजणें कठीण नाहीं. लोकांच्या मनांत येणारेच विचार उत्तम कवि आपल्या मनोहर वाणीनें प्रकट करतो व ते लोकांस पटतात म्हणून लोक त्या कवीची तारीफ करतात. राष्ट्रीय सभा काय किंवा कोणत्याहि लोकसंस्था काय जनमनाचें प्रतिबिंब दर्शविणारीं साधनें आहेत. आजपर्यंतच्या राष्ट्रीय सभाहि तशाच होत्या व गेली राष्ट्रीय सभाहि त्यांतलीच. परवांची राष्ट्रीय सभा तरी कित्येक लोकांच्या मतें अजून कालाच्या मागेंच आहे. तथापि त्यांचासुद्धां या कामीं संतोष झाला आहे याचें कारण राष्ट्रीय सभेमध्यें जीं मतें प्रतिपादन करण्यांत आलीं म्हणजे जे ठराव पसार झाले, त्यांच्या-मागें आतां हिंदुस्थानांत कोणी विचारी, समंजस ( अर्थात् या गोष्टीसंबंधानें विचार करणाऱ्यांपैकीं ) माणूस राहिला नाहीं. नेमस्त व जहाल हे शब्द टाकून देऊन आम्ही म्हणतों कीं, स्वपरावलंबी व स्वावलंबी अशा उपयोग केला तर कदाचित् हल्लीं राष्ट्रांत जीं दोन राजकीय मतें आहेत त्यांचें दिग्दर्शन होईल. स्वपरावलंबी शब्दांतील पर म्हणजे अर्थात् सरकार; तें सरकार परकीयच आहे म्हणून पर शब्दानें त्याचा निर्देश करण्यास कांहीं हरकत नाहीं. इतके दिवसपर्यंत परावलंबन कांहीं थोडें झालें नाहीं. त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं असा अनुभव आला असतांनाहि एवढ्याशा तेवढ्याशा गोष्टींवर संतुष्ट राहून परावलंबन पंकांत आपला पाय अधिकाधिक खोल जाऊं देण्यांत अर्थ नाहीं, इतकेंच नाहीं तर सर्वतोपरीं नुकसानकारक आहे. आपलें खरें कल्याण आपल्याच हातीं आहे. कल्याणाप्रमाणें दिसणाऱ्या गोष्टीला भुलून जाण्याचे दिवस गेले. तसल्याच गोष्टी मागत बसण्यांतहि अर्थ नाहीं. अशा

मताचा स्वावलंबी पक्ष म्हणतो कीं, आपल्या हातून होण्याजोग्या गोष्टी असतील त्यांच्याकडेच राष्ट्रीय सभेनें लक्ष द्यावें व परावलंबन नव्हे तर परावलोकनदेखील करूं नये. अमकें करा अशी विनवणीच करूं नये. तिला हक्काची मागणी असें जालीम नांव दिलें तरी हक्काच्या मागणीला लेखणी आणि वाणी या दोन गोष्टींहून, किंबहुना तिसरी आमच्या संख्येची पोकळ धमकावणी यांच्याहून अधिक जोमाचें पाठबळ नाहीं तोंपर्यंत अर्ज करण्याचा हक्क म्हणजे भिकाऱ्यांचा हक्कच असें स्वावलंबी पक्ष समजणार. स्वपरावलंबी पक्षाचें म्हणणें बऱ्याच अंशीं स्वावलंबी पक्षासारखें आहे. स्वतःस काय करतां येईल तें करण्याची मनाई कोण करणार आहे! तें तर कराच आणि तें विशेष जोरानें करा व परावलंबनाचा सर्वथा परित्याग करण्याची तयारी करा. परंतु जोंपर्यंत हल्लींची राज्यव्यवस्था चालू आहे तोंपर्यंत ‘स्वपरबलाबल नेणुनि’ बडबडण्याचा बालिशपणा करूं नका. सर्व प्रकारें आमच्या प्रयत्नास विघ्न करण्याचें सामर्थ्य परकीय सरकारच्या हातीं आहे. असें खरें नसेल तर आम्हांस अर्धेकच्चे म्हणून आमचा उपहास करण्याची मोकळीक तुम्हांस आहेच. पण आम्हीं कोणतीहि गोष्ट हातीं घेतली तरी चरफडण्यापलीकडे आमच्या हातून कांहीं होत नाहीं हें पक्कें ओळखणारें सरकार तिला विघ्न करील असें आम्हांस मनापासून वाटतें, आणि तें तुम्हांस आम्ही वारंवार सांगतों; त्यांचा हेतु तुम्हांस कळूं नये आणि तुम्हीं आमच्यावरच घसरावें यासारखें दुसरें दुर्दैव नाहीं. स्वराज्य पाहिजे, स्वराज्य मिळवावयाचें, स्वराज्याची तयारी करावयाची या गोष्टी आम्हांस नाकबूल नाहींत. पण हल्लींच्या परराज्यांतून स्वराज्यांत जावयाचें आहे. परराज्याच्या हद्दीबाहेर असलेल्या माणसाप्रमाणें आपण बोलणें व वागणें नीट नव्हे, सुरक्षित नव्हे, कल्याणाचें नव्हे हेंच आमचें म्हणणें आहे. याला एक दृष्टान्त दिला तर स्वपरावलंबी पक्षाचें म्हणणें कदाचित् अधिक स्पष्टपणें ध्यानीं येण्याचा संभव आहे. आपण लोकांच्या घरीं राहात आहों व तें घर सोडून लवकरच जाण्याच्या हेतूनें स्वतःचें घर बांधण्याचें काम सुरू केलें आहे किंवा करावयाचा विचार आहे. अशा वेळीं जितके दिवस हल्लींच्या घरांत राहावयाचें आहे तोंपर्यंत त्या घराच्या मालकाशीं हमरीतुमरीनें वागण्यांत किंवा तसें वागतों असें दाखविण्यांत अर्थ काय? जबर भाडें देऊन त्याच्या घरांत आपणांस राहावें लागतें आणि सोयी तर कांहींच नाहींत, करून देण्याचा विचार दिसत नाहीं, या सर्व गोष्टी स्पष्ट कळल्यावरहि आपलें घर तयार होईपर्यंत ही [illegible] करून द्या, ती सोय करून द्या, म्हणून कांहीं मालकानें व कांहीं आपण वि[illegible]ा होईल तेवढ्या सोयी करून घेऊन दोन दिवस गुजारा करणें प्राप्त आहे.

आपलें घर कांहीं रंगारूपास आलें म्हणजे गोष्ट वेगळी. अर्थात् हा दृष्टान्त आहे हें वाचकांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे आणि तसें ठेवल्यावर बारा वाटा पळून भलभलत्या शंका घेत बसण्याचें कारण नाहीं. दृष्टान्ताचा म्हणून जेवढा उपयोग व्हावा तेवढाच करून घेण्यासाठीं तो दिला आहे. अशा दृष्टीनें पाहतां तुमच्या सुधारणा नकोत, कमिशनें नकोत, नांवलौकिक मिळवून देणाऱ्या सन्मानाच्या नोकऱ्या व अधिकार नकोत असें म्हणणारा केवळ स्वावलंबी पक्ष व तडजोडीचा म्हणजे आहे त्या स्थितींत कालापेक्षी म्हणजे प्रसंगावर नजर देऊन वागणारा स्वपरावलंबी पक्ष. या दोहोंतील भेद इतका सूक्ष्म झाला आहे कीं, लवकरच त्यांचा समेट होऊन सर्वच स्वावलंबी पक्ष होण्याचा स्पष्ट रंग दिसत आहे. कदाचित् स्वावलंबनाची मर्यादा कोणाची कमी, कोणाची अधिक, साधनें कोणाची हीं तर कोणाचीं तीं, असा कांहीं भाग भविष्यत्कालाच्या उदरांतून प्रकट होईल, परंतु त्याची कल्पना या वेळीं करीत बसण्याची जबाबदारी आम्हीं आज अंगावर घेण्यांत कांहींच मतलब नाहीं.

वर दाखविलेले दोन पक्ष गेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं मंडपांत कमीअधिक जोरानें प्रेक्षकांपुढें आपली करामत व पराक्रम प्रकट करीत होते. अध्यक्षांचा पक्ष स्वपरावलंबी असला तरीं खुद्द अध्यक्ष स्वावलंबी पक्षाच्या तत्त्वांतील निर्मळपणा ओळखणारे असल्यानें सर्व काम 'ज्याचा शेवट गोड तें सर्व गोड' अशा थाटाचें झालें. राष्ट्रीय सभेंत हजर असलेल्या मंडळींचा परिपूर्ण ग्रह असा झालाच पाहिजे कीं, परावलंबी भाग औपचारिक कार्यक्रमाप्रमाणें ओढून काढण्यांत आला आणि स्वावलंबी भाग मात्र सर्व लोकांच्या चित्तास गुंग करून सोडणारा झाला होता. त्या भागासंबंधानें कडाक्याचे वादविवाद जागोजाग होत होते, खाजगी सभा होत होत्या, सह्यांचे कागद फिरत होते. राष्ट्रीय सभेंत काय होईल तितकें ठीकच. परंतु खाजगी रीतीनें लोकमत तयार करून पुढील सालीं अधिक जोर येण्यासाठीं काय करावें याबद्दल चर्चा होत होती. 'ऑल-इंडिया बॉयकॉट सोसायटी' म्हणून एक मंडळी काढण्याचें घाटूं लागलें. तिचा हेतु इतकाच कीं, जितक्या वस्तूंवर बहिष्कार घालणें शक्य आहे तितक्या वस्तूंची यादी करावी, त्यांपैकीं कोणत्या वस्तूंवर बहिष्कार घालण्यास् आपण तयार आहों तें प्रत्येक सभासदानें नमूद करून द्यावें. कोणत्याहि एका वस्तूवर बहिष्कार घालण्याचें जो कबूल करील त्याचें नांव सभासदपटावर दाखल करण्यांत यावें. राष्ट्रीय सभेच्या पीठावरून बहिष्क-
प्रयोगाचा दुंदुभिनाद करणें कालमानावरून किंवा आपल्या राष्ट्रांतील लो-
बोलघेवडेपणा व कर्तृत्वशील यांचें प्रमाण किती आहे त्याचें स्पष्ट प्रत्

असल्यावरून ज्यांना आवडत नव्हतें असे लोकसुद्धां या नवीन समाजाच्या पटावर आपलीं नांवें अर्ज करून देण्यास तयार होते. याबद्दल राष्ट्रांत अव्याहत परिश्रम करून लोकमत जागृत करण्याचे किती प्रकार आहेत यासंबंधानें ऊहापोह होत असे. बहिष्कार व संप यांची कडेकोट तयारी करण्यास लोकमताचें प्रचंड पाठबळ मिळाल्याशिवाय राष्ट्रीय सभेसारख्या जबाबदार संस्थेनें आपला हुकूम फरमाविणें ठीक नाहीं. आपण सरकारकडे जे ठराव पाठवितों त्यांच्या अंमलबजावणीस विलंब लागला तर त्यांत आपला काय दोष आहे ? पण आपणच ज्या गोष्टी अवश्य व एकदम झाल्या पाहिजेत असें म्हणणार त्यांत दिरंगाईचा प्रकार दिसणें, अथवा योग्यायोग्यतेचा किंवा शक्याशक्यतेचा पूर्ण निर्णय न करतां आपण कांहींतरी बोलतों असें भासविणें हें कमीपणाचें आहे. अशा अभिप्रायाचीं कांहीं माणसें आचरणांत बहिष्काराचें तत्त्व इतकें पाळणारीं आहेत कीं कट्टे बहिष्कारी म्हणून गाजलेले लोक त्यांच्या पासंगासहि टिकणार नाहींत किंवा या कट्टया बहिष्कारांच्या बहिष्काराची कल्पनासुद्धां तितकी पुढें गेलेली नसते. यांना स्वदेशी तत्त्वांचें बीं रुजून खूप पीक यावें यासाठीं बहिष्काररूपी मनोविकारानें राष्ट्रमनाची नांगरणी करणें अत्यंत जरूर वाटतें. बहिष्कार मनांत भिनला म्हणजे आपल्या चरितार्थासाठीं सर्व प्रकारच्या वस्तूंची उपज करण्यास स्वतः कंबर बांधणें जरूर होणारच असा त्यांचा अभिप्राय आहे. आपल्याशीं दुष्मनगिरीनें वागणाऱ्याचे दांत पाडण्यास बहिष्कारासारखें दुसरें अस्त्र आज तरी आपल्याजवळ नाहीं हें ओळखून त्याचा जितका परिणामावह उपयोग करतां येईल तितका करणें त्यांना मनापासून आवडतें. परंतु ‘ बहिष्कार ! बहिष्कार ! ’ म्हणून तोंडची वाफ दवडणें त्यांना बरें वाटत नाहीं. यासाठीं खरोखर लोकमत तयार होऊन बहिष्कारास्त्राचा प्रयोग करण्याची पूर्ण तयारी करण्यास ते एका पायावर तयार असणार. अशा मंडळीसदेखील मनापासून काम करणारे लोक ज्या समाजांत येतील असा एखादा ‘ निखिल भारत बहिष्कार समाज ’ स्थापन होईल, व प्रो. कर्वे यांनीं ‘ विधवाविवाह ’ या विषयासंबंधानें लोकमताची नोंद करण्यासाठीं जशा निरनिराळ्या प्रती करून निरनिराळ्या रकान्यांत मतें व प्रत यांचा स्पष्ट उल्लेख करून घेतला तसें काम करण्यास सर्वः देशभर तरुण व होतकरू संचारकवर्ग तयार करतां येईल, अशी एखादी संस्था आज अस्तित्वांत आली पाहिजे. संरक्षित व्यापारतत्त्वांचा अंगीकार करून भावी किंवा वाढत्या धंद्यास उत्तेजन देण्यास सरकार तयार नसलें तर लोकांनीं आपला गरी मोक्ष साधून घेतला पाहिजे. परकीय लोकांच्या जोरदार हल्ल्यापासून

अल्पबळ व्यापार बचावयाचा असेल तर बहिष्काररूपी बुरूज बांधून विदेशी मालास मज्जाव केल्याशिवाय तरणोपाय नाहीं. अशा दृष्टीनें कांहीं जिन्नस ठरवून अर्थात् ते जरूरीपैकीं असल्यास आपल्या देशांत पैदा होण्याजोगे आहेत, पण जे जरूरीपैकीं नसल्यानें आत्मसंयमन व दृढनिश्चय यांच्या योगानें दूर टाकतां येतील असें जिन्नस ठरवून त्यांच्यावर परिच्छिन्न बहिष्कार ठेवावयाचा असा कृतसंकल्प करणारे, म्हणजे आपण होऊन बांधून घेणारे लाखों लोक पुढें येतील तर बहिष्कारपूर्वक स्वदेशी तत्त्वपरिपालनव्रत सिद्धीस गेल्याशिवाय राहणार नाहीं. मग कदाचित् १९०७ मध्येंच राष्ट्रीय सभेकडून बहिष्काराचा व्यापक ठराव करून घेण्यास काय उशीर? अशा प्रकारचे विचार कलकत्त्यास निघाले होते, पण पुढें सर्व जेथल्या तेथेंच जिरलें. यावर कोणीं शंका, उपशंका, प्रतिशंका काढल्याच. कोणी म्हणत, राष्ट्रीय सभेनें साऱ्या राष्ट्रास हुकूम तर देऊन ठेवावा! त्या जोरावर प्रयत्न करण्यास ठीक पडेल. असा बहिष्कार घातला पाहिजे हें मत कांहीं व्यक्तींनीं (मग त्या कितीहि सन्मान्य असोत) प्रतिपादणें निराळें व राष्ट्रीय सभेनें त्याला आपल्या निकालाचा पवित्रपणा देऊन त्या दिशेनें उद्योग करण्याची शिफारस करणें निराळें. कोणी म्हणे सभा केल्या, समाज केले, सह्या घेतल्या, शपथा घेतल्या म्हणजे काय होणार? असें कित्येक वेळां झालें आहे. वचनें, शपथा वगैरे सर्व मोडलीं तर काय करावयाचें? अपराध्याचें पारिपत्य कशानें करावयाचें? यावर कोणीं उत्तर दिलें कीं, अशा माणसावर जातिबहिष्काराचें अस्त्र फेंकून त्यास जेरीस आणावें; तसें करण्यास कायदेशीर आधार आहे. तसा एक हायकोर्टाचा निकालहि आहे.

सारांश, स्वदेशी व बहिष्काराची राष्ट्रीय सभा असें जर १९०६ च्या राष्ट्रीय सभेस टोपण नांव दिलें तर कांहीं वावगें होणार नाहीं. स्वराज्याचें निशाण मि. दादाभाई यांनीं उभारलें असें म्हणतां येत नाहीं. परस्परांत भांडूं नका, स्वराज्य मिळविण्याचा हेतु पुढें ठेवा, इतकेंच लोकांना सांगण्याचा त्यांचा अभिप्राय होता असें आम्हांस वाटतें.

अध्यक्षांच्या विचारांत नवीन कांहीं नाहीं. स्वतःच्या इतक्या कालाच्या श्रमास अनुरूप फलप्राप्ति झाली नाहीं आणि दुसऱ्या कोणास बंड करण्याची स्फूर्ति झाली असती असें म्हणून पुन्हा उदार बुद्धीचे, स्वातन्त्र्यप्रिय इंग्रज असें गीत गाऊन इंग्रज राज्यकर्त्यांच्या गळीं पडत आहेतच. अर्ज पाठवा, चळवळ करा, ह्याशिवाय दुसरें कांहीं सुचवीत नाहींत अशा प्रकारचे उद्गार कलक

पुष्कळ लोकांनीं काढलेले आमच्या कानीं आले. परंतु वृद्ध, पितामहतुल्य, कार्यदक्ष अशा मि. दादाभाईंनीं इकडे यावयाला एवढा प्रवास करण्याचें कारण पत्करलें व सर्व काम संथपणें चालविलें, विरुद्ध पक्षाचे कडाक्याचे वादविवाद मिटवून गोडीगुलाबीनें सर्व गोष्टींचा शेवट केला. या निःसीम देशभक्तीचें व स्वार्थत्यागाचें उदाहरण पाहून सर्वांचीं मनें पूज्यबुद्धीनें परिपूर्ण झालीं होतीं. सतत ५० वर्षें कष्टांत घालवून केवळ सद्गुणानें व व्यवस्थित राहण्यानें किती काटक व कार्यक्षम वृद्धावस्था संपादन करतां येते या गोष्टीचा तरुण मंडळीपुढें उत्तम कित्ता म्हणून मि. दादाभाईंची मूर्ति कायमची करून ठेवावी, असें त्या वेळीं आमच्या मनांत आलें. पहिल्या दिवशींच आपलें भाषण वाचण्यास प्रारंभ करून तें पूर्ण करण्याचें काम ना. गोखले यांजकडे दिलें, या गोष्टीवरूनहि नानाप्रकारच्या कल्पना आमच्या मनांत आल्या. (गेल्या सालीं आजवरच्या सर्व अध्यक्षांत वयानें लहान अशा ना. गोखले यांनीं 'स्वराज्याची तहान सुराज्यानें भागावयाची नाहीं' असें सांगितलें व या सालीं सर्व अध्यक्षांत वयानें मोठे मि. दादाभाई यांनीं तर स्वराज्य हेंच आमचें साध्य आहे असें स्पष्ट मांडलें. केसरीकारांनीं म्हटल्याप्रमाणें इतक्या स्पष्टपणें स्वराज्याची कल्पना बोलून दाखविण्याची योग्यता इतरांस नाहीं व इतरांनीं कोणीं बोलून दाखविली असली तरी ती सर्वांस पटली असती कीं नाहीं त्याची शंकाच आहे. गोष्ट अक्षरशः खरी आहे. जहालपक्ष असेंच म्हणणार म्हणून तिकडे लक्षच पुरविलें नसतें किंबहुना उपहासच करण्यांत आला असता. आतां सर्वांत अनुभविक आणि इंग्लंड व इंडिया या दोहोंस पूर्ण ओळखणारा, स्वराज्य असतें तर मुख्य प्रधानाच्या पदावर आरूढ होण्याच्या योग्यतेचा अत्यंत सन्मान्य पुरुष हे उद्गार काढीत आहे आणि स्वराज्याशिवाय तृप्ति होणें अशक्य आहे असें जाहीरपणें म्हणत आहे, तेव्हां ही गोष्ट आतां साध्याच्या मर्यादेंतील आहे असेंच वाटणार असा हुरूप आणण्यास मि. दादाभाईंचा इतक्या दुरून-येण्याचा उपयोग झाला आहे. सर्व लोकांस असा आशांकुर उत्पन्न करणें व तदनुरूप उचित प्रयत्नास पुढील पिढीला प्रवृत्त करणें ही कांहीं लहानसहान कामगिरी नव्हे. मि. दादाभाईंनीं आजवर आपल्या देशसेवेच्या इमारतीवर गेल्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षत्वानें कळस बसविला असें आमचें मत आहे.

त्यांच्या आगमनानें सर्व गोष्टी सुसूत्र झाल्या अशाबद्दल कित्येक लोक आनंद मानीत होते. परंतु हा विचार आमच्या मनांत आला तरी त्यास आम्हीं महत्त्व दिलें नाहीं. कोणाला वाटत होतें कीं लाल-बाल-पाल पक्षाची सरशी होऊन ग्रेसचें तारूं अंतःकलहाच्या खडकावर आपटून फुटून गेलें असतें; परंतु यांस

असें कळत नाहीं कीं, १९०६ साल हें राष्ट्रीय सभेचें शेवटचें साल नव्हे. दरवर्षी मि. दादाभाईस आणणें शक्य नाहीं. इतःपर या लढाया आमच्या आम्हांस केल्या पाहिजेत. त्या सर्व करून पुनः एकोपा राखण्याची करामत आमच्यांत आहे, दिवसेंदिवस अधिकहि येईल. तेव्हां असल्या तात्पुरत्या कामगिरीनें आमचा संतोष झाला नसता. आम्हांस आनंद वाटला तो अशाबद्दल कीं, राष्ट्रांतील आज हयात असलेल्या व पुढें उद्यास येणाऱ्या लोकांना आपली स्पष्ट कर्तव्यदिशा मि. दादाभाईनीं दाखविली, स्वदेशीवर पूर्ण वरदहस्त ठेवला, बहिष्काराचें पाऊल पुढें सरकविलें व राष्ट्रीय शिक्षण लोकांनीं हातीं घ्यावें असा काळ आला आहे इतकें 'सूतोवाच' करून ठेवलें. यापुढें पुढच्या राष्ट्रीय सभेचें काम जोरानें होईल, समाजांतील तरुण पिढीचे लोक कार्यक्षम निपजतील व सर्व राष्ट्राचा हेतु सिद्धीस जाऊन या हतभागी देशास सुखाचा दिवस येईल; परंतु या दिवसाचा अरुणोदय या दृष्टीनें मि. दादाभाईचा उपदेश चिरस्मरणीय होईल.

राष्ट्रीय सभा म्हणजे काय आहे, तेथें लोक करतात काय याची माहिती लोकांच्या मनावर कांहीं गंभीर प्रकारानें बिंबेल असें करण्यासाठीं पूर्वी केलेली सूचना पुनः करतों. राष्ट्रीय सभेचा असा एक दिवस नेमून 'अध्यक्षांचा निरोप' म्हणून एक आज्ञापत्र त्या दिवशीं एका वेळीं सर्व राष्ट्रभर खेडोखेडीं वाचलें जावें. सरकार अशा प्रकारची व्यवस्था वाटेल तेव्हां करतें, त्यांचें हें अनुकरण करणें कमीपणाचें नाहीं. प्रथम तालुक्याच्या ठिकाणींच हें कसें काय साधतें तें पाहावें; निदान एक वर्ष जिल्ह्याच्या मोठ्या शहरीं करून पाहावें. लोकांत राष्ट्रीय सभेविषयीं उत्साह उत्पन्न होऊन ती भरेल त्या ठिकाणीं यात्रेप्रमाणें दरसाल जात राहावें, अशी वारीची कल्पना कांहीं लोकांच्या मनांत येण्यास राष्ट्रीय सभेची माहिती कोनाकोपऱ्यांत पसरली पाहिजे. निदान, राष्ट्रीय सभेच्या कामाकडे लक्ष पुरविणारे लोक वाढले तरी ठीक होईल. तशीं चिन्हें दिसत आहेत व स्वदेशी चळवळीनें राष्ट्रीय सभेसहि जोर येईल असा सुमार दिसत आहे. गेल्या राष्ट्रीय सभेस पुष्कळ लोक आले होते. सुमारें २,००० तर मुखत्यारच होते. प्रेक्षकसंख्या १५ पासून २० हजार होती. इतक्या लोकांची व्यवस्थितपणे सर्व सोय करून देणें हेंच एक शिक्षण आहे; परंतु या कामांतसुद्धां लोक जितके तरबेज व्हावयास पाहिजेत तितके झाले नाहींत. सर्व गोष्टी शिस्तीनें करणें व त्या तशा करून घेणें हें काम अगदीं सोपें नाहीं. बुद्धिपुरःसर कोणी कोणाची गैरसोय करीत नाहीं. व्यवस्थापक लोक प्रायः सभ्य रीतीनें वागतात.

मुख्य राजकीय धोरणापासून तों अगदीं सामान्य गोष्टीपर्यंत २२ व्या राष्ट्रीय सभेसंबंधानें आम्हांस काय वाटलें तें थोडक्यांत नमूद केलें. त्याच आठवड्यांत किंवा त्यानंतर लवकरच हा निबंध लिहिण्यांत आला असता तर कांहीं कमी महत्त्वाच्या गोष्टींस फाजील महत्त्व देण्यांत आलें असतें; परंतु आज दोन महिन्यांनंतर लिहिण्यांत खऱ्या महत्त्वाच्या गोष्टींचाच उल्लेख झाला आहे असा आमचा ग्रह आहे. एकंदरीनें १९०६ च्या राष्ट्रीय सभेपेक्षां १९०७ ची सभा अधिक जोमाची होईल. तिच्यापेक्षां १९०८ ची व असाच क्रम पुढें चालेल असा आमचा समज झाला आहे.

◆ ◆ ◆

## ४. उभय पक्षांचें कर्तव्य व नव्या पक्षावरील विशेष जबाबदारी

[ 'विश्ववृत्त', जानेवारी १९०७ ]

आजकाल हिंदुस्थान देशांतील कांहीं सुशिक्षित लोकांच्या मनांत स्वराज्याचे विचार घोळत आहेत, परंतु त्याच्या प्राप्तीसाठीं कायावाचामनेंकरून किंवा तनुमनधनेंकरून झटणारे किती भारतपुत्र असतील याची शंकाच आहे. आपल्याच राष्ट्राची गोष्ट असली चमत्कारिक आहे असें मानून धैर्य खचूं देण्याचें कारण नाहीं. पुष्कळ मोठा समाज आपआपलीं नित्य आवश्यक देहकर्मे करून राहणारा असतो. त्याच्या मनांत स्वपरराष्ट्राच्या गोष्टी शिरतच नाहींत. दारिद्र्यानें व अज्ञानानें ग्रस्त असल्यामुळें त्याला आपल्या साक्षात् परिस्थितीच्या बाहेरचें कांहीं कळत नाहीं. प्रथमत: फार थोड्या लोकांस स्वदेशाच्या सद्य:स्थितीविषयींचे व भावी कल्याणाचे विचार सुचतात. मग हळूहळू त्यांचा प्रसार होत जातो. विचारांप्रमाणें कृति घडण्यास कांहीं वेळ लागतो, परंतु सर्व लोकांचे विचार परिपूर्ण बनले म्हणजेच मग कृतीस प्रारंभ व्हावा अशा प्रकारचें प्रतिपादन करणारे कित्येक लोक असतात, त्यांच्या मताप्रमाणें चालल्यास कृतीचा काळ कधींच यावयाचा नाहीं. उद्योन्मुख राष्ट्रामध्यें कांहीं थोडा विचाराचा काल गेल्याबरोबर कृतीस सुरुवात झाली पाहिजे व निव्वळ उपदेशापेक्षां सोदाहरण उपदेशास प्रारंभ झाला म्हणजे राष्ट्राच्या उदयास मोठासा अवधि लागत नाहीं. उपदेश करणारे लोकाग्रणी आपल्या सांगण्याप्रमाणें वागतनासे झाले तर तुकोबारायांनीं म्हटल्याप्रमाणें

**सांगणें तें नाहीं करणें आपण । मोलही वचन बाध झालें ॥**

या दृष्टीनें विचार करतां स्वावलंबनाचा पक्ष जोरावर आहे व बंगाल्यांत तर राष्ट्रीय संरक्षक (पोलीस) चमू बनविली आहे हें आनंद मानण्याजोगें आहे. शिक्षणासंबंधानें पाहतां तें स्वतंत्ररीत्या आपल्या हातीं घेण्याचा फार सुरेख रीतीनें उपक्रम केला आहे हें समाधानाचें आहे. परंतु अशा रीतीनें लोकांचे अव्याहत प्रयत्न सुरू असतांना त्याबरोबर सरकारांतून शक्य तितका अधिकार आपल्या हातांत घेण्याच्या खटपटी कमी पडूं देतां कामा नये. तीस कोटी लोकांस हालहालवून जागे करून सर्वांचा राष्ट्रकार्यास उपयोग करून घेणें

शक्य नाहीं; निदान थोडक्या कालांत तरी त्या सर्वांचें लक्ष इकडे वळणें संभवनीय नाहीं. यासाठीं कांहीं लोक स्वतःच्या पायावर उभे राहून सरकारचें करणें नापसंत वाटल्यामुळें त्याच्यासारखींच आपलीं स्वतंत्र खातीं अस्तित्वांत आणीत आहेत, अशा समयींच दुसऱ्या कित्येकांनीं सरकारच्या पोटांत शिरून त्यांच्या हातची चिंधी मिळेल तेवढी घेण्यास हरकत नाहीं. लोकांचा जोर दिसून आला म्हणजे सरकारास कांहींतरी देणें भाग पडणारच. म्हणून परस्परविरोध न येतां सर्व तऱ्हेच्या लोकांस पुष्कळ कामगिरी आहे. परस्परांवर शब्दप्रहार करण्यांत किंवा इतररीत्या विघ्न करण्यांत गेलेला काळ नुसता व्यर्थ गेला, इतकेंच होत नाहीं तर त्यायोगें राष्ट्राचें एकंदर कार्य नासतेंच. आपल्या राष्ट्रांतील बहुजनसमाज अनुकूल करून घेऊन सरकारच्या कानींकपाळीं ओरडण्यानें कार्यसिद्धि झाली वाहवा, न झाली वाहवा; ओरड सफल झाली तर जिंकलीच; विफल झालीच तर त्या पक्षाचें महत्त्व हळूहळू कमी होऊन स्वावलंबन पक्ष जोरावणार. सरकार आपण होऊन नुसत्या मागण्यानें, किंवा युक्तिसिद्ध मागणें करण्यांत आपले लोक तरबेज झाल्यानें कांहीं हक्क देत नाहीं ही गोष्ट स्थापित करतां येईल. अर्थात् नेमस्त किंवा सरकारच्या विश्वासाचा पक्ष नष्ट होऊन सर्वच लोक स्वावलंबनपक्षास मिळतील. पापाचा पुरा घडा भरेपर्यंत परमेश्वर कोणासहि शासन करीत नाहीं, अशी आपल्या लोकांची समजूत आहे. त्याप्रमाणें सरकारच्या पदरांत पापाचें माप भरपूर पडेल आणि ज्यांच्यावर विश्वासून राहणें सुरक्षित नाहीं अशांच्या मांडीवर मान ठेवून आपण झोंपीं गेलों ही आपण मोठी चूक केली असेंहि आपल्याच कांहीं देशबांधवांच्या खातरजमेस उतरेल. हल्लीं जो स्वावलंबनपक्ष अस्तित्वांत आला आहे तो तरी अनुभवानेंच आला आहे. म्हणजे आम्ही सर्वजण सरकारवर प्रथम विश्वासून होतों, हल्लीं कांहींचा तो विश्वास उडाला आहे, इतरांचा उडण्यास अवधि लागेल एवढ्याबद्दल त्यांचा उपहास करणें किंवा त्यांस देशद्रोही, राष्ट्रहितविघातक अथवा लांगूलचालक अशा शेलक्या शिव्या मोजणें इष्ट नाहीं. पहिलीं वीस वर्षें आमच्या सर्वांचीच अर्जे, विनवण्या, विषादप्रकटन, विरोधप्रदर्शन, कमीअधिक जोराचा निषेध यांत गेलीं. एकवीस व बाविसाव्या वर्षीं लॉर्ड कर्झनच्या अपकृत्यांनीं लोकांच्या अंगांत नवें वारें शिरलें. त्या लॉर्ड कर्झनचें चांगलें पारिपत्य करणें तर दूरच, परंतु विलायतेस त्याचा जिकडे तिकडे बडेजावच माजत चालला; परवां तर इंग्लंडांतील एका उच्चत्तम पुराणविद्यापीठानें त्यास आपल्या समितीचें प्रामुख्य समर्पण केलें. याचा अर्थ असा कीं साम्राज्यांतील एका मोठ्या भागांतील लोकांस

चिरडून टाकल्याची खबर किंवा फिकीर विलायतेस बिलकुल नाहीं. त्या ठिकाणीं आपली दाद लावून घेण्यासाठीं आपल्यांतील कर्तृत्वशाली बृहस्पतितुल्य वाग्वीर खर्चीं घालावे कीं काय हा मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. बहुतेकांची आतां खात्री झाली आहे कीं आतां विशेष नेट केला पाहिजे.

अन्यायाचे कायदे असले तर ते अमान्य करून, तत्त्वदृष्ट्या व परमेश्वरापुढें आपण उभे राहिलों तर जें यथान्याय दिसेल तसेंच वर्तन करावयाचें, असा निश्चय करणें प्राप्त आहे. अशा वर्तनाबरोबर होणारे हाल, ओढवणारीं संकटें व येऊन पडणाऱ्या जबाबदाऱ्या या सर्वांस सिद्ध होण्याची तयारी आहे असेच पुढारी लोकांच्या आदरास पात्र होणार. सारासारविचार, खरें देशकल्याण व नि:सीम नीतिमत्ता यांचा अनादर न करतां मानवी जुलमाचा नुसता शब्दानें निषेध करून स्वस्थ बसावयाचें नाहीं, तर तो जुलूम बिलकुल सहनच करून घ्यावयाचा नाहीं. पावसानें भिजविलें व राजानें मारलें तर शरण कुणा जावें ? असें म्हणणें अप्रयोजक आहे अशी लोकांची खातरजमा होत चालली आहे. राजा ईश्वरी अंश खरा, पण कोठवर ? तो ईश्वराप्रमाणें वागेल तोंपर्यंत; परंतु प्रथमत: 'मी तुमचें रक्षण करीन' असें म्हणून जो रक्षण करणार नाहीं, घातासच प्रवृत्त होईल त्यास ईश्वरी अंश मानणें हें अत्यंत गर्हणीय आहे, हें तत्त्व इंग्लंडच्या इतिहासानेंच शिकविलें आहे. वेन राजाची कथा आमच्या राष्ट्रीय राजनीति-शिक्षणानें आमच्या वाडवडिलांच्या हृत्पटलावर कोरून ठेवलेली असते; परंतु ज्ञान असणें आणि त्याप्रमाणें वर्तन घडणें या दोन गोष्टी सदासर्वदा एकत्र कोठून सांपडतील ? हॅम्प्डनसारखा एखादा पुढारी राजसत्तेस प्रतिरोध करण्यास दंड ठोकून उभा राहिला म्हणजे त्याच्यामागून बाकीचे लोक सज्ज होतात. जहाजपट्टी ती काय ? हल्लींच्या दरानें १५ रुपये बसविली होती; पण पहिल्या चार्लसची ही उच्छृंखल वृत्ति चालू द्यावयाची नाहीं म्हणून कंकण बांधून तयार झालेल्या हॅम्प्डननें ती तेवढी क्षुद्र रक्कम देण्याचें नाकारलें. इंग्रज लोकांचीं आपल्या देशांत वागण्याचीं तत्त्वें अशींच जोराचीं आहेत. त्यांचा महाकवि त्यांस उपदेशितो कीं, एका गवताच्या काडीसाठीं रणें पडलीं तरी फिकीर नाहीं; मात्र त्या काडीच्या तंट्यांत तत्त्वाचा प्रश्न असला पाहिजे. सामान्य नीतिदृष्ट्या पक्ष खरा, स्वतंत्रता देवीची आज्ञा, महाकवीचें प्रोत्साहन, देशबांधवांच्या अनुमोदनाचीच नव्हे तर अनुकरणाचीहि खात्री, आणि अंगीं वसणारा रसरशीत देशाभिमान इतकी तयारी असल्यावर राजसत्तेनें नुसता जाहीर केला म्हणूनच एखादा कायदा मान्य करावा किंवा एखादी पट्टी निमूटपणें द्यावी हें जॉन हॅम्प्डनसारख्या वीराकडून कसें घडणार ? आणि हेंच नीतिशिक्षण,

तोच शेक्सपीअर, व तेंच हॅम्प्डनचें उदाहरण पुढें असतां जुलमी अमलाची, पैन् पै ओढण्याच्या राजनीतीचीं दीडशेंवर वर्षे पाहूनहि केवळ आज्ञापत्रारूढ झाला म्हणूनच एखाद्या कायद्याखालीं लोकांनीं आपली मान द्यावी हें इत:पर शक्य नाहीं असें स्थापित होण्याचे दिवस हिंदुस्थानांतहि जवळ आले आहेत असें म्हणणारा पक्ष हल्लीं राष्ट्रांत बळावत चालला आहे. त्या पक्षांतील उतावीळ म्हणणारा नेमस्तपक्ष असें प्रतिपादन करीत असतो कीं, आपण पात्र झालों म्हणजे आपले राज्यकर्ते सर्व हक्क आम्हांस देतील. एक वर्तमानपत्र तर म्हणतें, कीं आम्हांस हल्लींच अगदीं हक्क नाहींत असें म्हणणें चुकीचें आहे. कमी अधिक प्रमाणानें जे हक्क आपणांस आहेत असें त्यानें म्हटलें आहे ते हे:—(१) आत्मसंरक्षणाधिकार, (२) भाषण व मुद्रणस्वातंत्र्य, (३) संमेलनाधिकार, (४) समानशासन यांत 'कमीअधिक प्रमाणानें' एवढे शब्द उपयोजून लेखकानें अकरणरूपास करणरूपी बनविण्याची खुबी केली आहे इतकेंच म्हणणें प्राप्त आहे. 'आमची दौलत शून्य आहे' असें म्हणणाऱ्यांस दौलत आहे असें म्हणणें जितकें शोभेल तितकेंच वरील चार हक्क या भरतभूमीच्या अभागी लेंकरांकडे अजून राज्यकर्त्यांनीं ठेवले आहेत असें म्हणणेंहि नीट दिसेल. आत्मसंरक्षणासाठीं शस्त्रें ठेवलीं आहेत काय? वक्ते बोलतात त्या ठिकाणीं गुप्त पोलीस कशाला? व्याख्यानाला जे हजर होते त्यांची नोकरीची पाळी आली कीं, त्यास बाजूस सारून खालच्या माणसाच्या गळ्यांत माळ कां घालतात? वर्तमानपत्रकारांचे जामीन कशासाठीं घ्यावयाचे? १२४ अ व १५३ अ यांचा भलभलत्या ठिकाणीं उपयोग कां करावा? प्रांतिक सभा व इतर सभा पोलिसांनीं कां मोडाव्या? लोक एका जागीं गोळा झाल्यास गर्दी-मारामारीची सबब सांगून त्यांस हाकून देण्यांत कां येतें? हिंदु व मुसलमान, इंग्रज व हिंदी यांच्यांतील खटल्याचे निकाल अगदीं जवळ आहेत त्यांत नि:पक्षपातीपणाची किती '**कमाल**' आहे हें पाहून 'समानशासन' आपल्यास मिळतें ही घमंडी जिरलीच पाहिजे. अशा प्रकारचे आमचे चार हक्क आहेत म्हणजे ते आम्हांस नाहींतच म्हटलें तरी चालेल. या हक्काच्या योगानें पुढील हक्क मिळवावयाचे ते कोणते म्हणाल तर (१) अधिकाऱ्यांची जबाबदारी व (२) तिजोरीवर लोकप्रतिनिधींचा ताबा. हे दोन हक्क मोठ्या महत्त्वाचे आहेत, परंतु त्यापूर्वींच्या चारांच्या जोरावर हे हस्तगत करून घेण्याचें म्हणजे अशक्यच झालें आहे. खपुष्पाच्या माळा घालून, मृगजळानें तहान भागविणाऱ्या वंध्या-पुत्राचें साम्राज्य सर्व पृथ्वीवर होईल तेव्हां हे दोन हक्क सांप्रतच्या क्रमानें या

देशास प्राप्त होतील. चार हक्क आहेत, दोनच प्राप्त व्हावयाचे आहेत. ज्यांनीं चार दिले तेच योग्य कालीं आणखी दोन देतील असें कांहीं समंजस लोक म्हटल्याशिवाय राहत नाहींत; पण अशा परावलंबी लोकांस कोण विचारणार ? युरोप अमेरिकेंतील सर्व राष्ट्रें यांची आमच्यावर गांजलें पीडिलें अशी नजर होणार नाहीं. आबादीआबाद आहे म्हणून जाहीर करणाऱ्या या आमच्यांतील वर्तमानपत्रापेक्षां मि. ब्रायनसारख्या प्रवाश्याचीच दृष्टि मार्मिक म्हणणें भाग आहे. यासाठीं लोकांत मोठा भ्रम माजून राहिलेला आहे तो दूर झाला पाहिजे. आपल्या देशास दीडशें वर्षें एकसारख्या जळवा लागल्या आहेत आणि त्यांनीं इतकें रक्त शोषून घेतलें आहे तरी अजून हिंदुस्थानांत चालणाऱ्या इंग्रजी वर्तमानपत्रांवर सर्व भिस्त ठेवून लोक श्रीमंत व सुखी झाले आहेत असें प्रतिपादन करणारे लोक आपणांमध्यें आहेत. त्यांना परमपूज्य दादाभाईसारख्यांची ओरड एकतर्फी वाटते. इंग्रजी वर्तमानपत्रांच्या चष्म्याशिवाय ज्यांस दुसरें साधन नाहीं त्यांना आयात-निर्यात मालाचे आंकडे घेऊन स्पष्टपणें दाखविलें पाहिजे कीं, हिंदुस्थानास दारिद्र्य व उपासमार यांशिवाय कांहीं दुसरें शिल्लक राहणें आज शक्य नाहीं. शारीरिक हानि होऊन लोकांत दुर्बलता चोहोंकडे पसरली. इतकेंच नाहीं तर आपल्या स्वतःच्या देशांत आपलें म्हणून कांहीं उरलें नाहीं असें म्हणण्याची पाळी परराज्याच्या सर्वव्यापकतेमुळें आली आहे. आपल्या मालकीच्या घरांत आपण भाडेकरी झालों व आपल्या स्वामित्वाच्या जमिनींत आपण मजूर झालों, अशी विपन्न स्थिति प्राप्त झाली आहे. आपल्या बुद्धीला मोह झाला आहे. त्या योगानें आपलें चांगलें तें वाईट दिसत आहे व दुसऱ्याचें हीन व त्याज्य आहे तें श्रेष्ठ व आदरणीय भासत आहे. आपसांत तंट्यानें इसापनीतींतील माकडन्यायाधीशाच्या घशांत आमचें सर्वस्व उतरत आहे. न्याय कसला तो उरला नाहीं, नीतीस ओहोटी मोठीच लागली, धर्म तर रसातळालाच गेला अशा स्थितींत वरपांगी छानछुकी दाखविणारीं शहरोशहरीं दिसणारीं चार टकलीं पाहून चोहोंकडे आबादी-आबाद आहे असें जाहीर करणारे लोक आमच्यांत सांपडावे व राज्य-कर्त्यांनीं आपला धन्यवाद गाण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करावा यांतच खऱ्या स्थितीचें यथास्थित प्रतिबिंब दिसून येत आहे. शहरच्या दिखाऊ संगमरवरी गुळगुळीत पदराखालीं काय लपलें आहे एवढा प्रश्न केला कीं सर्व भाट मंडळींची वाचा बसलीच पाहिजे. या प्रचंड सुपीक देशांत वारंवार दुष्काळ पडतात व दुष्काळाच्या वेळीं सरकार व्यवस्थित रीतीचे प्रयत्न करून लाखों लोकांचे प्राण वांचवितें, तसेंच कर्जबाजारी रयतेची सावकाराच्या तडाक्यांतून सुटका करतें,

नियामेत सारा घेऊन स्वस्थ बसतें या गोष्टीवरून सरकाराविषयीं लोकांच्या मनांत कांहींसा आदरसुद्धां उत्पन्न होतो. पाद्री लोक अन्नछत्रें व दवाखाने घालून लोकांचे प्राण वांचवून धर्म बुडवितात; पण धर्म बुडवितात इकडे दुर्लक्ष करून अन्नाच्या गोळ्यावर नजर देऊन मोठमोठे लोकहि पाद्री लोकांचे गौरव करतात. हिंदुस्थान-वासी लोकांची जमात कमी होते व परराज्याच्या स्थिरत्वाशीं ज्यांचे हितसंबंध गुरफटून जातात अशांची संख्या वाढते ही राष्ट्रहानीची बाब तितकी ध्यानांत भरत नाहीं; अशा प्रकारें सर्व लोकांच्या मतीवर मोहपटल वाढत आहे, कांहीं कांहीं लोकांस अर्थात् वर्तमानपत्रें वाचणाऱ्या किंवा ऐकणाऱ्या लोकांस ही वस्तुस्थिति समजते; परंतु वर वर्णिलेल्या शहरांतील दिखाऊपणाप्रमाणेंच सर्व वस्तुस्थिति आहे असें अनुमान काढणें जसें चुकीचें होईल तसेंच या थोड्या लोकांच्या सज्ञानपणावरून सर्व लोकांच्या सुजाणपणाचें अनुमान काढणें चुकीचें होईल. खऱ्या स्थितीचें ज्ञान चोहोंकडे पसरण्यास व देशांत चोहोंकडे नांदणाऱ्या दुरवस्थेचें निराकरण करण्यास कोणतीं साधनें अनुकूल आहेत, कोणतीं प्रतिकूल आहेत, लोकांच्या कोणत्या समजुतींत फरक पडला पाहिजे, त्यांचे कोणते आचार बदलले पाहिजेत, त्यांच्यांत जडलेलीं कोणतीं व्यसनें अजीबात सुटणें जरूर आहे इत्यादि गोष्टींची, स्वराष्ट्रो-दयेच्छु स्त्रीपुरुषांच्या दृष्टीनें प्रयत्न करण्यासाठीं हरएक प्रकारच्या योजना करणें हें राष्ट्रांतील समंजस व सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांचें काम आहे.

या कामासाठीं आपल्या देशाची सर्वांगांनीं पाहणी झाली पाहिजे. सरकारच्या हातून काय किंवा लोकांच्या हातून काय कोणतें तरी कार्य करावयाचें म्हणजे तें हातीं घेण्यास अगोदर भरपूर माहिती पाहिजे, नंतर माणूसबळ पाहिजे, त्या माणूसबळास द्रव्यबळ पाहिजे. द्रव्यबळाच्या पाठीं सुव्यवस्थित रचनाकौशल्य पाहिजे. सरकारचीं निरनिराळीं खातीं आहेत तशीं आपण निरनिराळीं खातीं करून सरकारपासून अलग राहून शक्य तेवढी व्यवस्था करणें अगत्याचें आहे. राष्ट्रोद्धाराच्या प्रचंड कार्यास द्रव्यसाहाय्य प्रचंड पाहिजे. त्यासाठीं परकीय राज्याखालीं असल्यामुळें त्या परकीय सरकारची भूक भागवून पुन: आपल्या योजिलेल्या कार्यपरंपरेच्या सिद्धीसाठीं निराळी करव्यवस्था केली पाहिजे. सरकारच्या साऱ्याप्रमाणें सारा मोठ्या खुषीनें देण्यास सिद्ध झालें पाहिजे. अगदीं अवश्य तितकेंच देणें सरकारास पोंचवून बाकी सर्व पैसा वांचवून या खाजगी स्वराज्याच्या तिजोरींत इकडच्या शिस्तीस अनुसरून भरला पाहिजे. स्वदेशी चळवळ यशस्वी करण्यास तूर्त हाच मार्ग आहे. सर-कारची जी जी गोष्ट आपणांस नापसंत असेल ती ती आपण हातीं घेतली

पाहिजे. सरकार कदर कशी ठेवतें व इतर देशांत कसकशी राज्यव्यवस्था असते, या सर्व गोष्टींचा विचार करून स्वराज्यांतील नियंत्रण ठरविलें पाहिजे. हें काम सुलभ नाहीं, मोठ्या जबाबदारीचें आहे. यांत स्वार्थत्याग विलक्षण प्रकारचा लागणारा आहे. सर्व प्रकारच्या मत्सरांस फांटा देण्याची संवय झाली पाहिजे. जात, धर्म, पंथ असले सर्व भेद राष्ट्रैक्यापुढें पूर्णपणें लुप्त झाले पाहिजेत. यासंबंधाचे निकाल लावणारी एक निर्णायक संस्था ठरविली म्हणजे तिच्याविरुद्ध व्र काढण्याची सोय नाहीं. सारांश परकीय सरकारांनीं देण्याच्या अगोदर स्वराज्याचे हक्क आपणच उपभोगण्यास प्रारंभ केला पाहिजे. आमची आम्ही व्यवस्था करून त्यांच्यावर होतां होईतों कमी भार घालण्याचा निश्चय करावयाचा आहे. यथान्याय वर्तन करीत असतां केवळ आमची हानि करण्याच्या बुद्धीनें एखादा कायदा पसार करण्यांत आला, किंवा एखाद्या उपद्व्यापि अंमलदारानें आपल्यास विघ्न केलें, तर त्या दोहोंच्याहिविरुद्ध वागण्याची तयारी ठेवली पाहिजे. स्वराज्याच्या मर्यादेंत परराज्याचें पाऊल आलें तर त्याचें निराकरण करण्याचें धैर्य व सामर्थ्य दाखविण्याची तयारी ठेवण्यांत अंतर पडतां कामा नये. लढाईची तयारी असली म्हणजे तो प्रसंग येत नाहीं असा साधारण नियम आहे. आपण होऊन परराज्यांत पाऊल टाकूं नये, पण आडवें आल्यास कापून काढण्यास मागेंपुढें पाहूं नये.

असो. या पुढच्या स्वराज्याच्या मनोराज्यांत फार वेळ गर्क राहण्यापेक्षां त्याच्या तयारीचा पहिला उपाय आपल्या देशाची पाहणी व त्यासंबंधानें लोकशिक्षणाच्या उपायाची सिद्धता करणें जरूर आहे. अशी पाहणी करण्यास व अशा तऱ्हेनें लोकशिक्षणाचें काम करण्यास ब्रह्मचारी संचारक तयार केले पाहिजेत. त्यांना साधारणरीत्या वकिलाच्या कामास उपयोगी पडण्याइतकें चालू कायद्याचें ज्ञान असलें पाहिजे. विचारसरणींत शुद्धता असावी व आपलें म्हणणें लोकांपुढें व्यवस्थित रीतीनें मांडतां यावें यासाठीं त्यांस तर्कशास्त्रा (विगमन व निगमन – इंडक्टिव्ह व डिडक्टिव्ह) चीं सामान्य तत्त्वें शिकविलीं पाहिजेत. राजनीतिशास्त्राची ठोकळ माहिती व अर्थशास्त्राचें साधारण ज्ञान असणें अगत्याचें आहे. स्वातंत्र्यप्राप्ति करून घेणाऱ्या निरनिराळ्या राष्ट्रांचे इतिहास या लोकोपदेशकांना अवगत असले पाहिजेत. स्वदेशाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास व सांप्रतच्या स्थितीचें हुबेहूब वर्णन हा तर या उपदेशकांचा विशेष अध्ययनाचा विषय होय. सद्यःस्थिति समजावून देऊन लोकांच्या मनांत पुढील काल सुखावह करून देण्याची तयारी करविणें हें काम खरोखर राष्ट्रीय सभेसारख्या

संस्थेनें हातीं घेतलें पाहिजे. दादाभाई नौरोजी, डिग्बी व दत्त, राष्ट्रीय व प्रांतिक सभेच्या हकीगती, यांचे ग्रंथ, विशेषतः अध्यक्षांचीं भाषणें, वर्तमानपत्रें, या सर्वांचा या प्रबुद्ध शिक्षकांस अभ्यास चांगलाच पाहिजे. भाषण व लेखन या दोहोंमध्यें बरेंच नैपुण्य प्राप्त करून घेण्यासाठीं साहित्य व वक्तृत्वकला ( रेटरिक व एलोक्यूशन ) या दोहोंचा थोडाबहुत परिचय असला पाहिजे. तांत्रिक, वैद्यक, आयुर्वेद व हकिमी माहिती असली तर त्याचा स्वतःस व इतरांस उपयोग होऊन लोकसंग्रहाच्या कामास मदत होणार आहे. थोडें स्वरज्ञान असलें म्हणजे राष्ट्रीय कार्याच्या अनेक चळवळींसंबंधींचीं चार पदें म्हणून लोकांचें मन करमणुकीच्या द्वारां ओढून घेण्यास तो समर्थ होईल. याज्ञिकी, हरिदासी, पुराणिकीपुढच्यांपैकीं माहिती असणारा माणूस त्या प्रकारानेंहि आपले विचार लोकांच्या मनांत उतरविण्यास कमी करणार नाहीं. समाधान वृत्ति राखून, प्रसंगोचित भाषण करणाऱ्या अशा लोकशिक्षकांचें आज आमच्या देशास जितकें अगत्य आहे तितकें पूर्वीं केव्हां नव्हतें व पुढें कांहीं वर्षांनीं राहणार नाहीं. इंग्रजी भाषेचें सामान्यज्ञान प्राप्त करून घेऊन गणित व सृष्टिशास्त्राचें अध्ययन केलेले लोक हरएक प्रकारच्या औद्योगिक शिक्षणासाठीं तयार होणें हल्लीं जरूर आहे. त्यांनीं परदेशीं जाऊन हरहुन्नर साध्य करावयाचे आहेत. त्याचप्रमाणें देशांत संचार करून वर दर्शविल्याप्रमाणें जरूर ती माहिती गोळा करणें व लोकांस आपल्या अवस्था, अपेक्षा व आकांक्षा यांचें ज्ञान करून देणें या कार्यास तसेच लोक तयार पाहिजेत.

ही माहिती गोळा करण्याच्या, म्हणजे हल्लीं लोकांची स्थिति कशी आहे हें पाहण्याच्या, कामाचा विचार राष्ट्रीय सभा प्रथमच स्थापन झाली तेव्हां झाला. किंबहुना राष्ट्रीय सभेच्या कामास १८८५ सालीं २८ डिसेंबर रोजीं सुरुवात झाली त्या वेळीं पहिला ठराव हाच झाला कीं, ब्रिटिश राज्यकारभार कसा काय चालला आहे याची चौकशी राजनियुक्त संसदेकडून व्हावी व तींत हिंदी लोक असून माहिती घेणें ती हिंदुस्थानांत व इंग्लंडांत अशा दोन्ही ठिकाणीं घेण्यांत यावी. अशा प्रकारची संसद नेमून चौकशी करण्याबद्दल राष्ट्रीय सभा नेहमीं सरकारास विनविते. पूर्ण चौकशी होत नाहींच. निरनिराळ्या संसदा नेमण्यांत येतात. त्यांत कांहींतरी बाहेर येतें व त्या चौकशीचें धोरण पहिल्यापासून ठरल्यासारखें असतें आणि सरकारी कामांत असेंच व्हावयाचें. परंतु राष्ट्रीय सभा प्रस्थापकांचा हेतु काय होता हें सदर नमूद केलेल्या ठरावावरून कळण्याजोगें आहे. कोणत्याहि स्थितींत सुधारणा करावयाची म्हणजे तिचें स्वरूप अगोदर नीट ध्यानांत आलें

पाहिजे यासाठीं हिंदुस्थानच्या लोकांस आपली सद्यःस्थिति पूर्णपणें कळण्यास त्यांचे त्यांनींच म्हणजे अर्थात् त्यांच्यापैकीं विचारी पुढाऱ्यांनीं सर्व देशाची पाहणी करण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे. हल्लींच्या नवीन जहाल किंवा स्वावलंबी – वाटेल तें बरेंवाईट नांव त्यास द्या – पक्षाच्या मंडळीवर कृति करून दाखविण्याची मोठी जबाबदारी आहे. सरकारकडूनच आळवून वळवून काम करून घेण्याचे दिवस गेले नाहींत, आपली अद्यापि स्वतंत्रपणें उद्योग करण्याची योग्यता आली नाहीं, स्वतःच्या हक्काचें संपादन सरकारच्या अधीन आहे, असें म्हणणारांस जहाल पक्षाच्या कठोर शब्दप्रहाराचा मारा सहन करण्यापेक्षां किंवा त्यांच्या हेतूंचा विपर्यास करून दाखवून सरकारजवळ आपली पात्रता अधिक दर्शविण्यापेक्षां फारसें काम उरत नाहीं. स्वावलंबन पक्षास राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय पोलिस, राष्ट्रीय सैन्य, राष्ट्रीय रुग्णशाला, राष्ट्रीय दुष्काळनिवारणार्थ प्रयत्न सर्व कांहीं करावयाचें आहे. सरकारचे योग्य कायदे पाळून अयोग्य कायदे मोडून, त्या वर्तनाचे परिणाम धिमेपणानें धारिष्टानें सहन करून त्या कायद्यांत सरकारनें फेरबदल करावा असें घडवून आणणें, म्हणजे त्या सरकारास आपलेपणाचें पूर्ण स्वरूप देणें, हें त्याचेंच काम आहे. जोंपर्यंत ब्रिटिश अंमल कायम आहे तोंपर्यंत सरकारवर बहिष्कार घालून चालावयाचें नाहीं. सरकारचा कायदा जितकें कल्याण करण्यास समर्थ व तयार असेल तितका हवा आहेच; परंतु ज्या राष्ट्रहिताच्या गोष्टी सरकार करण्यास तयार नाहीं, किंवा ज्या कराव्या असें त्याच्या ध्यानीं आल्याचें दिसत नाहीं, किंवा ध्यानीं येऊन तिकडे कानाडोळा करीत आहे, त्या गोष्टींची पूर्तता स्वावलंबी पक्षास करणें प्राप्त आहे. अशा दृष्टीनें पाहतां नवीन पक्षाच्या माणसानें आपल्यावर कोणीं हल्ला केला तरी सरकारांत फिर्याद करूं नये असें म्हणणारास त्याच्या हेतूंचें रहस्य कळलें नाहीं असें समजावें. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, नवीन पक्षाचा उद्देश म्हणजे साध्य झाल्यास अंमलांत आणण्याचा कार्यक्रम जरी ठरला आहे तरी तो साग्र अंमलांत आणण्याची तयारी होण्यास अद्याप बराच अवकाश आहे. म्हणून जुन्या पक्षानें आपला म्हणून कदाचित् अभिमानानें कदाचित् निरुपाय म्हणून रेखून ठेवलेला अर्जाचा किंवा भिक्षांदेहीचा मार्ग या नवीन पक्षासहि कांहीं दिवस क्रमावा लागेल. आमच्या शिवेंत तुम्हीं पाऊल कां ठेवलें म्हणून स्वावलंबी पक्षास विचारावेंसें ज्या 'नेमस्तास' वाटतें त्यास जेथून लाथाडून टाकलें जातें तेथें पुनः पुनः जाण्यांत अभिमान वाटतो काय? यांत भूषण काय? दुसरा उपाय नाहीं म्हणून हा उपाय केला त्यांत इतकें त्यांचें

काय गेलें ? यांत इतकें टोंचून खोंचून कां बोलावें ! दृष्टान्तास एक गोष्ट घेतों. चिकित्सामार्ग भिन्न आहेत, त्यांत होमिओपथीच्या डॉक्टरनें एखादें अलिओ-पथीचें औषध देऊन पाहिलें तर कोणाचा मोठा गुन्हा झाला ? रोगी दगावतोच आहे पण अभिमान सोडून एखादा उपाय आपल्या पंथाहून निराळ्या पंथाप्रमाणें केला तरी काय बिघडलें ? तात्पर्य हल्लींचा काळ असा आहे कीं, कोणीं कोणांस हसूं नये, टोंचून बोलूं नये, कोणीं कोणाचा हेवा करूं नये, ज्याच्या हातून जें कार्य होईल तें त्यानें करीत राहावें. इंग्लंडसारख्यांत पक्षाभिमानास जागा आहे. कदाचित् पक्षाभिमान हितावह असेल, परंतु आपल्या देशांत सर्व मंडळी एका हेतूनेंच काम करणारी आहेत. त्यांचे मार्ग भिन्न नाहींत. तेव्हां सर्वांनीं एकदिलानें वागणें हेंच श्रेयस्कर आहे.

• • •

# ५. राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी चळवळीचें प्रधान अंग आहे काय ?

[ ' विश्ववृत्त ', मार्च १९०७ ]

" आज सुमारें एक तासापूर्वीं धारवाडकर मंडळींनीं सूचना केली कीं, मीं स्वदेशी चळवळीवर व्याख्यान द्यावें. अर्थात् ज्या विषयासंबंधीं आपल्या राष्ट्रांतील सर्व लहानथोर, स्त्रीपुरुष, श्रीमंत व गरीब अशा लोकांच्या मनांत कमीअधिक मानानें विचार घोळत आहेत अशा विषयावर आतां नवीन काय सांगावयाचें हीच मला पंचाईत पडली. त्यांत धारवाड मुक्कामीं आमचे मित्र रा. रा. पित्रे, जोशी आदिकरून या विषयासंबंधानें हरएक प्रसंग साधून लोकांत जागृति करीत आहेत, अशा ठिकाणीं पूर्वीं विशेष विचार न करतां कांहींतरी बोलणें हें नीट नाहीं असें वाटल्यावरून आपली तर इच्छा पूर्ण व्हावी व मीहि पूर्वीं विचार न करतां बोललों असें माझ्या मनानें मला खाऊं नये अशी कांहींतरी तोड काढली पाहिजे. कारण कोणत्याहि वक्त्यानें पूर्वतयारीशिवाय एकदम एखाद्या विषयावर बोलण्याचें धाडस करणें हें जितकें त्याला स्वतःला अपायकारक आहे, तितकेंच श्रोतृजनांस पण अपमानकारक आहे. या मंडळीपुढें कांहींतरी बोलून मोकळें होणें सुलभ आहे, त्यांच्यापुढें बोलणें फारसें जोखमीचें किंवा जबाबदारीचें नाहीं असें मानणें म्हणजे त्यांचा अपमान करणें होय. त्यांच्या बुद्धिमत्तेविषयीं आपलें किती हलकें मत आहे हें व्यक्त करण्याप्रमाणें आहे. माझें भाषण कमी प्रतीचें झालें किंवा तें आपणांस आवडलें नाहीं तर निराळें, परंतु माझ्याकडून मीं हलगरजीपणा केला हा दोष मला पत्करणार नाहीं. शिक्षकास थोडें येत असेल, देवानें त्यास बुद्धि विशेष दिली नसेल, पण विद्यार्थ्यांस पढविण्यास जाण्यापूर्वीं त्यानें मनापासून तयारी केली पाहिजे. असो; यासाठीं जो थोडा वेळ मला सांपडला तेवढ्यांत आपणांस काय सांगावयाचें त्याचा निश्चय करून व थोडेंसें टांचण करून मी आपणांपुढें उभा राहिलों आहें.

वृद्ध तरुण जनहो, आम्हीं आजवर अनेक सभा भरविल्या, निरनिराळ्या विषयांवर चर्चा केली व अशा क्रमापासून अनेकांचा वेळोवेळीं फायदा झाला; परंतु आज जशी राष्ट्रांत जागृति झाली आहे किंवा झाल्याचीं स्पष्ट चिन्हें

चोहोंकडे दिसत आहेत त्याचें कारण काय असावें बरें? सर्व लोकांस समजते अशी भाषा आपणांस मिळाली आहे. शिकलेले लोक लहानमोठ्या सभांमध्यें काय बोलत होते तें अशिक्षित लोकांस कळत नव्हतें. त्यांना तें कळावें म्हणून त्यांच्या भाषेंत सुलभ रीतीनें त्यांना समजून देण्याचा आपण यत्नहि केला नाहीं. पण स्वदेशी चळवळ या विषयासंबंधानें अशी गोष्ट नाहीं. हा विषय पुढें मांडला कीं एखाद्या गांवढ्या माणसास देखील कळतो. तुझ्या किंवा तुझ्या भावाच्या खिशांतील पैसा बाहेर जाऊन तुम्हांस दारिद्र्य येत चाललें तें तसेंच वृद्धिंगत व्हावें कीं तुमच्या गाठीं चार पैसे पडतील अशी गोष्ट साधावी बरें? असा प्रश्न केला व कापड, साखर, मीठ इत्यादि गोष्टींचा दाखला देऊन हे जिन्नस आपले आपण देशांतच निर्माण केले तर त्या कला आपणांस पूर्वीप्रमाणें येतील व आपण सधन होऊं, ही गोष्ट वाटेल त्यास पटते. न्याय खातें व अंमलबजावणी खातें हीं पृथक् असावींत असें राष्ट्रीय सभेचें मागणें असतें. शिक्षण मोफत व सक्तीचें असावें, अधिकारीवर्गाची सत्ता अनियंत्रित आहे ती मर्यादित करावी, अंदाजपत्रकावर वादविवाद होतो, परंतु कायदेकौन्सिलांतील सभासदांचीं मतें घेतलीं जात नाहींत तीं घ्यावीं, शस्त्राचा कायदा नसावा, विलायतेस व इकडे सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा व्हावी, राजद्रोहाचे खटले, जातीजातींमध्यें अप्रीति उत्पन्न करण्याचें निमित्त ठेवून छळवाद करूं नये, प्राप्तीवरील कराचें किमान मान वाढवावें, परदेशांत गेलेल्या किंवा वसाहतींतील रहिवासी हिंदी प्रजांच्या हक्काची जपणूक व्हावी, राज्याधिकारांत एतद्देशीयांचा अधिकाधिक प्रवेश व्हावा, कायम-धाऱ्याची पद्धति चहूंकडे सुरू करावी, आगगाड्यांपेक्षां कालवे, विहिरी व तळीं इकडे सरकारनें लक्ष अधिक पुरविलें पाहिजे, जंगल खात्याचे नियम सौम्य करावे, खाणीशेजारीं किंवा राखलेल्या जंगलाशेजारीं राहणाऱ्या लोकांवर होणारी कैची बंद व्हावी, मिठावरील कर उतरावा, आयात, पक्क्या परदेशी मालावर जबर पट्टी बसवावी अशा अनेक सूचना व तक्रारींचा ज्यांना त्यांतील स्वाभाविक कठीणपणामुळें किंवा साक्षात् संबंध नसल्यामुळें अगदीं बोध होत नाहीं, अशा लोकांससुद्धां स्वदेशी चळवळीचें रहस्य कळलें आहे. आपला देश परदेशी लोकांच्या व्यापारी उत्कर्षामुळें दरिद्री झाला आणि आपण आपल्या देशांतच उत्पन्न होण्याजोगे जिन्नस पैदा करण्याकडे लक्ष पुरविलें नाहीं, परदेशी दिखाऊ मालास भुलून आपलें वाटोळें करून घेतलें, या गोष्टींचें माप अगदीं सर्व लोकांच्या पदरांत पडलें आहे. ही गोष्ट कळूं लागल्यानें आतांच सांगितलेल्या गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी कळण्याची त्यांच्या अंगीं पात्रता आली आहे. स्वदेशी

चळवळ म्हणजे काय हें कळल्यानें, स्वदेशाभिमान म्हणजे काय, आपला देश म्हणजे कांहीं विशेष पूज्य दैवत आहे व त्याच्या संरक्षणासाठीं आपल्या खाजगी कल्याणाचा होम करणें हें आपलें आद्यकर्तव्य आहे, त्या देशावर कोणाचेंहि जुलमी राज्य असूं नये इत्यादि गोष्टी कळण्याचा मार्ग खुला झाला आहे. हल्लीं झालेली जागृति लोकांत कायम राहते कीं नाहीं व तिजपासून स्पष्ट फळें उत्पन्न होतील कीं नाहीं, हें आमच्यांतील शिकलेसवरलेले लोक आपल्या कर्तव्यास ज्या प्रमाणानें जागतील त्या प्रमाणावर अवलंबून आहे. नुकतेंच सांगितल्याप्रमाणें शिक्षित व अशिक्षित यांस समजण्याजोगी एक भाषा आपणांस प्राप्त झाली आहे. आजपर्यंत शहाणेंसुरते लोक काय बोलतात, कसली चळवळ करतात हें ज्यांस कळत नव्हतें त्यांस तें आतां कळूं लागलें आहे. स्वाभिमान प्रत्येकास आहेच; जसा व्यक्तीचा स्वत:विषयींचा अभिमान तसाच राष्ट्राचा स्वत:विषयींचा अभिमान म्हणजे स्वदेशाभिमान किंवा राष्ट्रभक्ति. अभिमान हा चांगल्या गोष्टीबद्दलचा असला पाहिजे. कुलाभिमान असणाऱ्या माणसानें आपल्या कुलांत जे थोर विद्वान् व सुशील पुरुष होऊन गेले त्यांच्याबद्दलचा अभिमान बाळगून त्यांचें अनुकरण करावयाचें असतें. नाहींतर 'तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणाः क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति' असा प्रकार करावयाचा नाहीं. यासाठींच, आमचे आजे, वडील गरीब होते, आम्ही गरीबच राहणार असें कोणी म्हणत नाहींत. भलत्याच गोष्टीचा अभिमान तो दुरभिमान. यासाठींच मोरोपंत म्हणतात, 'दुरभिमान सारा गळो!' आपल्यामध्यें स्वाभिमान, स्वदेशाभिमान पाहिजे ही गोष्ट कोणीहि अमान्य करणार नाहीं. खुद्द आमच्या राज्यकर्त्या इंग्रजांसहि ती गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. तो सद्गुण आहे व तो सर्वांस प्राप्त व्हावा म्हणून तशा प्रकारचें त्यांच्या कवीचें वचन त्यांनीं आम्हांस शिकविलें आहे. सर वॉल्टर स्कॉटचें एक लहानसें काव्य सर्वतोमुखीं असतें, नसलें तर असण्याच्या योग्यतेचें आहे. असा जडात्मा कोण आहे कीं ज्याच्या मनांत ही माझी, ही माझी भूमि आहे असें येत नाहीं ! अशा अर्थाचें तें आहे.

> Breathes there the man with soul so dead,
> Who never to himself hath said,
> This is my own, my native land.

हिंदुस्थानांतील लोक माणसें नव्हेत काय ? त्यांचे आत्मे मृत आहेत काय ? आत्म्याशिवाय श्वासोच्छ्वास करणारे देह म्हणजे लव्हाराचे भातेच; दुसरें काय ? आजपर्यंतचा हिंदुस्थानचा इतिहास निराळ्या गोष्टी सांगत आहे.

अलीकडील परिपूर्ण परावलंबी काळांत या दुर्धर दुर्दैवांतून सोडविण्यासाठीं असा दुंदुभि पश्चिमेंतून आणून आमच्या कानींकपाळीं इंग्रजांनीं वाजविल्यावरहि आम्हीं पोपटाप्रमाणें हीं वचनें पाठ करून देशाभिमानशून्यच राहावें काय ? खुद्द राज्यकर्त्यांचे हातून शब्दांनीं तरी असें म्हणविणार नाहीं. ही जर गोष्ट खरी आहे तर जगांतील इतर देशांतील लोकांप्रमाणें आम्हांस स्वराष्ट्रोत्कर्षासाठीं जीवापाड परिश्रम करावयास नकोत काय ? त्या त्या उत्कर्षाच्या आड जे जे येत असतील, त्यांना अटकाव करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. सर्व प्रतिबंध दूर झाल्यावर आम्हांस आपलें कार्य साधण्यास कठीण पडणार नाहीं. प्रथमतः आमच्यांत स्वदेशहितबुद्धि जागृत झाली पाहिजे. त्या कामीं या स्वदेशी चळवळीचा मोठा उपयोग झाला आहे.

या चळवळीचा राष्ट्राच्या औद्योगिक व व्यापारी उत्कर्षाच्या कामीं खरा उपयोग झाला पाहिजे असें असेल तर, दुसऱ्या अनेक गोष्टींचा विचार करणें प्राप्त आहे. पहिला उल्हासाचा कढ येऊन गेला म्हणजे मागून शांत व दूरवर विचार करण्यासहि आपण समर्थ आहों असें सिद्ध झालें पाहिजे. खरोखर आपला उत्कर्ष व्हावा अशी ज्या राष्ट्रास इच्छा असते, त्या राष्ट्रांतील लोक इतर राष्ट्रांपेक्षां आपला माल स्वस्त कसा पडेल इकडे लक्ष पुरवितात. अर्थात् लोकांस जी गोष्ट इष्ट व फायदेशीर असते, ती त्यांच्या सरकारासहि असते. परंतु सरकार किंवा राज्यकर्ते लोकांपैकींच असले म्हणजेच हा प्रकार घडतो. परंतु दुर्दैवानें अथवा सुदैवानें आज हिंदुस्थानांत अशी स्थिति नाहीं. कायमपणें असें वैषम्य असणें हें दुर्दैवच, परंतु भावी कल्याणासाठीं कांहीं कालपर्यंत परराज्याचें शासन सर्व राष्ट्रांच्या पाठीं लागलेंच आहे व ‘ नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ’ या न्यायानें पाहतां ‘ हा हतोऽस्मि ’ म्हणून ऊर बडवून घेण्याचें कारण नाहीं. हल्लींच्या काळांत आपल्या भावी सुखाच्या आशेनें मनापासून उद्योग केला पाहिजे. ‘ दैव दैव ’ म्हणून स्वस्थ बसून चालावयाचें नाहीं. ‘ आमच्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं, उगीच धडपड करून काय होणार ? ’ असें म्हणणारे कांहीं लोक आहेत, परंतु मला तसें वाटत नाहीं. आपल्या राष्ट्रावर परमेश्वराची कृपा आहे. सर्व जगांतील उत्तमोत्तम गोष्टी या देशांत एकवटल्या आहेत व आज कित्येक शतकेंपर्यंत आम्ही आपला धर्म व नीतिरक्षण करून राहिलों आहों. त्याचें फळ आम्हांस मिळालेंच पाहिजे. नैमित्तिक अवनतीमुळें ऱ्हास झाला आहे. परंतु कित्येक कमकुवत राष्ट्रांप्रमाणें आम्ही लयास जाणार नाहीं. भर्तृहरीनें दोन प्रकारचे पात वर्णिले आहेत. मृत्पिंडपात म्हणजे ओल्या मातीचा गोळा पडला

म्हणजे पडलाच; व कंदुकपात म्हणजे चेंडूचें पडणें. चेंडू पडला तरी त्याला उशी येते. हस्तिदंती चेंडू दगडी जमिनीवर आपटला म्हणजे त्याला खूप उशी येते. तो वरचेवर पडून वरचेवर उशी घेतो. याप्रमाणें आमच्या देशाचा पात आहे. साधुवृत्त म्हणजे शील चांगलें असणारे लोक आहेत त्यांची विपत्ति फार दिवस टिकत नाहीं.

प्रायेण साधुवृत्तानामस्थायिन्यो विपत्तयः ।

अशा प्रकारचें आश्वासन आम्हांस आहे. आपलें काम इतकेंच आहे कीं, आपलें वर्तन चोख आहे असें परमेश्वराच्या ठिकाणीं रुजू झालें पाहिजे. आपापल्या खाजगी कल्याणावरच नजर ठेवून वागणारे लोक असले म्हणजे राष्ट्राचें कल्याण कसें होईल? राष्ट्रकल्याणासाठीं आपण झीज सोसण्यास तयार झालें पाहिजे. यालाच स्वार्थत्याग म्हणतात. तो ज्याला जितक्या प्रमाणानें शक्य असेल तितका त्यानें केला पाहिजे. पुष्कळ दिवस जगणें, आपल्या सर्व इंद्रियांस सुखाचा उपभोग करून देणें हा सामान्य सृष्टिनियमानुसार क्रम आहेच. परंतु आणखी कांहीं दिवस जगतां येणें शक्य असलें तरी, राष्ट्रासाठीं आपल्या आयुष्यांतील तितके दिवस कमी झाले तरी बेहत्तर आहे असें वर्तन ठेवणें किंवा सुख घ्यावेसें वाटलें तरी किंवा द्रव्यसंग्रह करण्याचा मोह पडला तरी, त्या सुखाची किंवा द्रव्याची पर्वा न करणें या गोष्टीसच स्वार्थत्याग म्हणतात; असा स्वार्थत्याग करण्यास लोक तयार असतील तरच देशास आनंदाचे दिवस येतील. पेरावें तसें उगवतें. परोपकार करून ठेवलेला असावा, केव्हांना केव्हां तरी त्याचें फळ मिळेलच मिळेल, हा व्यक्तिनीतीचा नियम राष्ट्रनीतीसहि लागू आहेच. योग्यवेळीं थोड्या स्वार्थत्यागानें जें काम भागेल तेंच काम साधण्यास पुढें अत्यंत नुकसान सोसावें लागेल. म्हणून याच वेळीं स्वदेशी चळवळ पूर्ण यशस्वी होण्यास प्रत्येकानें स्वदेशी व्रत कडकडीत पाळलें पाहिजे. जी काय शपथ घ्यावयाची किंवा जो काय मनाचा निश्चय करावयाचा तो निकरानें पाळला पाहिजे. परंतु हें राष्ट्रांतील सर्व लोकांस साधणें कितपत शक्य किंवा संभवनीय आहे याचा विचार करणें अत्यंत अगत्याचें आहे. कितीहि जाज्वल्य स्वदेशाभिमान असला तरी 'स्वदेशीच जो माल, तो वापरीन' हा निश्चय चालविण्याइतकें द्रव्यसामर्थ्य नसतें. म्हणून स्वदेशी चळवळ यशस्वी व्हावी अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं स्वतःपुरतें स्वदेशी बनून पुरें नाहीं. त्यांनीं इतर लोक तसेच होतील अशी तजवीज कशी करतां येईल याविषयीं विवंचना केलीच पाहिजे. शहाण्या व समंजस पुढारी लोकांस एखादा विषय

एकदेशीय दृष्टीनें विचारांत घेऊन चालणार नाहीं. त्यांचा सांगोपांग विचार केला पाहिजे, म्हणजे त्या विषयांशीं संबन्द्ध अशा अनेक गोष्टी लक्षांत घेऊन त्यापासून उत्पन्न होणाऱ्या अडचणी वारल्या पाहिजेत.

मध्यम स्थितींतील लोक स्वदेशी मालाचा कट्टा अभिमान बाळगून रुपयामागें चार आण्यांपर्यंत स्वतःच्या पदराला खार लावून घेतात. परंतु त्यांनीं अशा रीतीनें स्वदेशांत राखलेला सारा पैसा मोटार कार्स खरेदी करून आमच्यांतील राजेरजवाडे परदेशीं पाठविणार! मोठमोठ्या गिरणीवाल्यांच्या घरीं कितीतरी परदेशी सामान असतें म्हणून सांगावें? मुंबईस एखादा आमच्यासारखा गेला आणि त्यांचीं घरें पाहिलीं तर छाती दडपून जाते. पैशाचा असा पूर परदेशीं जावयाचा तर आपण पैपैनें पैसा राखून काय होणार? हीच गोष्ट सरदार व राजे लोकांची. यांच्या स्वतःच्या चैनीसाठीं व यांच्याकडे येणाऱ्या काळ्यागोऱ्या पाहुण्यांच्या संतोषासाठीं कितीतरी पैसा परदेशीं जात आहे! श्रीमंतांचा पैसा असा जात असतो तर गरीब लोक निरुपाय होऊन परदेशी मालाचा आश्रय करतात. कापडाच्या किंमती चढल्यामुळें, अन्नखर्चास अवश्य तेवढा पैसा देऊन उरणाऱ्या पैशांत स्वदेशी कापडास पुरें इतकें द्रव्य त्यांच्या गांठीं नसतें. परदेशी साखर घेऊन स्वदेशी वर्णाची करून किती लबाड व्यापारी हल्लीं देशभोळ्या लोकांस बुचाडीत आहेत? खरी निःसंशय स्वदेशी साखर महाग पडते म्हणून गुळावरच काम भागवावें तर परदेशी साखर गुळापेक्षांहि स्वस्त म्हणून तिचा खप गरीबांत पुष्कळ होतो. या दृष्टीनें पाहतां स्वदेशी मालाचा किंमती बेतांत ठेवण्याचें काम आपणांस शक्य नसल्यानें परदेशी मालाचा खप विशेष कमी होत नाहीं. मध्यम स्थितींतले तुम्ही आम्ही लोक हाल सोसतों व पैसाहि सामर्थ्याबाहेर खर्च करतों. परंतु अप्रामाणिक व्यापाऱ्यांचे किंवा देशाभिमानशून्य चैनी व चोमड्या श्रीमंतांचें पारिपत्य करणें आमच्या हातीं नाहीं. सरकार जर आमचें असतें तर आमच्या राष्ट्रांत गरिबी माजूं दिली नसती. परदेशास धान्य जातें व आपल्या देशांतील लोकांचीं पोरें उपाशी मरतात, ही दुःस्थिति बंद करण्यासाठीं एक साल पुरे इतकीं कोठारें केलीं असतीं. अशानें महागाई होण्याचें थांबल्यावर आपल्या देशांतील कमी मिळकतीच्या लोकांस-देखील स्वदेशी कापडास उत्तेजन देतां येणें शक्य झालें असतें. बऱ्या स्थितींतील लोकांसहि देशी कारखान्यास उत्तेजन देण्यासाठीं बुडीत खर्च करण्यास व गरीब लोकांस स्वदेशी माल घेण्यास मदत करण्यासाठीं मोठमोठे निधि (फंड) उभारतां आले असते."

· २ ·

या गोष्टींचा म्हणजे स्वदेशी चळवळींत आपल्या राष्ट्रांत पूर्णपणें यश येण्यास सरकारचें साहाय्य नसतां आपणांस काय करतां येईल याचा विचार करावयाचा झाल्यास आपण हल्लीं बहुतेक पंगु आहों अशी आपली खातरजमा झाली असेल. इतर राष्ट्रांतील लोक स्वतंत्र असल्यानें व त्यांचें वजन सरकारवर पडत असल्यानें ज्या गोष्टी त्यांना शक्य होतात त्या गोष्टी आमच्या राष्ट्रांत शक्य नाहींत ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. सरकार आमच्या धंद्यांस उत्तेजन देण्यासाठीं संरक्षक व्यापारतत्त्वाचा अंगीकार करण्यास म्हणजे परदेशी मालावर जकात बसविण्यास व एतद्देशीय मालास सवलत देण्यास म्हणजे ड्यूटी व बाउंटी या दोन्ही मार्गांनीं देशी हुन्नरास टेकू देण्यास सरकार तयार होण्याची आशा नाहीं. परक्या देशचा कच्चा माल आपल्या देशांतील लोकांस उपयोगी पडावा म्हणून त्यावर जकात बसवावयाची नाहीं, पण परक्या देशचा पक्का माल आपल्या मालाशीं चढाओढ करण्यास बाजारांत येऊंच नये म्हणून त्यावर जबर जकात बसवावयाची अशी फ्रान्स, जर्मनी, अमेरिका व खुद्द ब्रिटिशांच्या वसाहती वगैरेंची रीत आहे, पण हिंदुस्थानांत मात्र खुला दरवाजा, 'आवजाव घर तुम्हारा' असा प्रकार आहे. आमचे धंदे बुडवीपर्यंत इंग्लंडनें आमच्याशीं किती नीचपणाचें व दुष्टाव्याचें वर्तन केलें याचा इतिहास सांगत बसण्याचा हा प्रसंग नव्हे, परंतु ज्यांनीं आमच्या हरहुन्नरांचा इतक्या निर्दयपणें गळा कापून टाकला त्या सरकारनें व त्याच्या अंमलदारांनीं आमच्या औद्योगिक उत्कर्षाबद्दल आम्हांस काळजी आहे असें आज म्हटलें म्हणजे त्यांचा तिटकारा येतो. तशा प्रकारचे अमके अमके प्रयत्न आम्ही करीत आहों असें त्यांनीं जाहीर केलें म्हणजे यांत कांहींतरी अंतस्थ हेतु असावा असें वाटल्याशिवाय राहात नाहीं. तात्पर्य काय कीं, या स्वदेशी चळवळीचा विजय म्हणजे आमच्या राष्ट्राचा सांपत्तिक उत्कर्ष आणि त्या मानानें हिंदुस्थानशीं व्यापार करून गबर होणाऱ्या राष्ट्रांचें नुकसान. अशा राष्ट्रांपैकीं पहिल्या प्रतीचें राष्ट्र आमच्या राज्यकर्त्यांचें असल्यानें केवळ स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं अथवा आजवर चाललेली चंगळ कायम राखण्यासाठीं कांहींतरी निमित्त ठेवून या चळवळीच्या मुळाशीं कुऱ्हाड घालण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणें त्यांना शक्य नाहीं. राजसत्ता पूर्णपणें त्यांच्या हातीं असल्यानें त्यांचे प्रयत्न सफलहि होणारच, परंतु अशा स्थितींत आम्हीं स्वस्थ बसावें काय याचा विचार आपणच करा.

अरूनफिरून राजकीय विषयावर आपण येणार असा आमच्या सर्व चळवळींचा रोख आहे, त्यास उपाय नाहीं. जेथें तेथें आमची परवशता आम्हांस नडते. यासाठीं गेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं आम्हांमधील वृद्ध पितामह दादाभाई नौरोजी यांनीं सांगितलेल्या स्वराज्याच्या प्राप्तीकडे सर्वांचें लक्ष लागणें साहजिकच आहे. आम्ही नुसत्या बाहेरच्या गोष्टींत म्हणजे शरीरावर घातल्या जाणाऱ्या कापडासंबंधानें किंवा घरांत व बाहेर वापरल्या जाणाऱ्या सामानासुमानासंबंधानें विचार करतों, परंतु आमच्या देशांत हे जिन्नस तयार होऊं लागले तर त्यांवर वाटेल तेव्हां कर बसवून ते महाग करण्याची पूर्ण मुखत्यारी दुसऱ्यास आहे. त्यास आळीबंधा घालण्यासाठीं आमच्या देशाचा आंतर राज्यकारभार आमचेकडे पाहिजे. कोणत्याहि परदेशाशीं लढाई करणें किंवा तह करणें हीं कामें साम्राज्याकडे असोत व त्यासाठीं हिस्सेरशीनें येईल तो बोजा आम्ही सहन करूं, परंतु आमच्या देशांत उत्पन्न होणाऱ्या पैशाची व्यवस्था आमची आम्हांस करतां आली पाहिजे. आम्हांस लागेल तेवढा पैसा आमचा आम्ही उत्पन्न करूं व ठराविक मर्यादा पाळून त्याचा विनियोगहि आमचा आम्ही करूं. आमच्या लोकांचे तंटेबखेडे मोडण्यासाठीं व वसूल गोळा करण्यासाठीं व व्यवस्था लावण्यासाठीं जरूर ते अंमलदार आमचे आम्ही आमच्या सोयीप्रमाणें ठरलेल्या राज्यव्यवस्थेनुरूप नेमूं. यालाच ‘साम्राज्यांत स्वराज्य’ म्हणावयाचें व हाच एक आम्हांस सुराज्य मिळण्याचा प्रकार आहे. स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं असें आम्हीच म्हणतों असें नाहीं, तर सर्व मानवी स्वभावास अनुसरून जगांतले सर्व लोक म्हणत आहेत. परक्याचें राज्य सुराज्य असूं शकत नाहीं हा अनुभव आहे, म्हणून नुसतें सुराज्य मागून हल्लींच्या काळीं भागत नाहीं. ज्या वेळीं आमच्या देशांत परराज्याची भीति नव्हती तेव्हांसुद्धां नुसत्या भीतीच्या कल्पनेवर आमचे ऋषी स्वराज्याची प्रार्थना करीत होते. राष्ट्रास स्वराज्य निसर्गतःच हितकारी आहे. त्यांत एका राष्ट्रानें दुसऱ्यास तुमचें राष्ट्र स्वराज्यास पात्र नाहीं असें म्हणणें म्हणजे सृष्टीविरुद्ध आचरण करणें आहे, ही सूर्यासारखी उज्ज्वल गोष्ट देखील आमच्या दृष्टीस कित्येक दिवस स्पष्ट दिसत नव्हती. हा महिमा, सभ्य जनहो, एका परवशतारूपी मोहिनीचा. परवशता म्हणजे कालिदास म्हणतो त्याप्रमाणें परप्रत्ययनेय बुद्धि. आपण सर्व मूढ झालों. बुद्धीला व्यामोह झाला. हें बुद्धीचें ग्रहण कित्येकांचें सुटलें आहे, तरी पण आपल्यापैकीं कांहीं लोकांना अद्यापि मोहानें घेरलें आहेच. आमचें राज्य आम्हांस करतां येईल कीं नाहीं याची त्यांना शंका आहे. पूर्वीचा इतिहास काय सांगतो इकडे त्यांचें दुर्लक्ष नाहीं, परंतु

त्यांचें मन परक्या राज्यकर्त्यांच्या मोहक वाणीनें पछाडलें आहे, ही एक जबर **मेस्मेरिझम** आहे. हिच्या कचाट्यांत आपण सांपडलों आहों. ‘ आपला व्यापारी उत्कर्ष करण्यासाठीं, आपली शेतकी राष्ट्राच्या उत्कर्षास उपयोगी पडावी यासाठीं, आपली खनिज संपत्ति स्वतः राष्ट्रांतील लोकांनीं उकरून काढीपर्यंत जेथल्या तेथेंच पडून राहिली पाहिजे असा सक्तीचा अंमल करण्यासाठीं पूर्ण राज्यसत्ता आमच्या हातांत पाहिजे हें स्पष्ट तत्त्व आम्हांस कळणें अत्यंत जरूर आहे, तुम्हांस वाटत असेल कीं यांत गूढ काय आहे ? ही गोष्ट एखाद्या पोरासमुद्धां कळण्याजोगी आहे. परंतु महामायेनें पछाडलेल्या मोठमोठ्या बुद्धिमान्यांसहि लहान पोरास समजण्याजोग्या गोष्टी दिसत नाहींत. अशी कांहीं जबर मोहिनी या देशांतील लोकांच्या मनावर येऊन पडली आहे, म्हणून, बंधुजनहो, आमच्यांतील थोर थोर विद्याव्यासंगी व बारीक बारीक मुद्द्याच्या एखाद्या मुकदम्याच्या वेळीं छडान् छडा काढणाऱ्या पुरुषांससुद्धां राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना येत नाहीं. कोण ही अनावर मांया ? अहो, राष्ट्र म्हणून ज्याला आहे त्याला त्या राष्ट्राचा उत्कर्ष साधणारें शिक्षण तेंच राष्ट्रीय शिक्षण हें कळूं नये काय ? राष्ट्रांतील तरुणांच्या बुद्धीचा वृथा क्षय करणारें शिक्षण तें राष्ट्रीय नव्हे. राष्ट्राच्या भाषेंत जें दिलें जात नाहीं तें शिक्षण राष्ट्रीय नव्हें. जें शिक्षण दिलें असतां उच्च परीक्षा घेऊन ज्यांतील परि-पूर्णत्व स्थापित झालें असतां, तरुणांस सुतारगवंड्यापेक्षां किंबहुना मजुरांपेक्षांहि हीन स्थितींत आयुष्यक्रमणा करावी लागते, तें शिक्षण राष्ट्रीय नव्हे. राष्ट्राच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांतील अभिमानाचा भाग ज्या शिक्षणाच्या योगानें ठसून राष्ट्रभक्तीचें बीज अंतःकरणांत रुजण्यास साहाय्य होत नाहीं तें शिक्षण राष्ट्रीय नव्हे. स्वतःच्या देशांत उपलब्ध होणारे जिन्नस दुसऱ्याच्या देशांत जाऊन त्यांचा पक्का माल आपल्या देशांत येऊन तो देश दरिद्री झालेला पाहूनहि त्याचा प्रतिकार करण्याचें बुद्धिसामर्थ्य आणि कृतिपरता ज्या शिक्षणाच्या समाप्ती-नंतरहि शिक्षितांमध्यें दिसत नाहीं तें शिक्षण राष्ट्रीय नव्हे. या व दुसऱ्या अनेक गोष्टी पोरासहि कळण्याजोग्या आहेत, पण थोरांची मति येथें गुंग होते म्हणूनच यांस मी अविद्या किंवा माया असें म्हणतों. मेस्मेरिझमचे किंवा मानस-मोहाचे प्रयोग ज्यांनीं पाहिले असतील त्यांना आमच्यांतील कित्येकांस इंग्रजांचें बोलणें ऐकून व लिहिणें वाचून कसा मोह पडला आहे व वचनास प्रतिवचन देण्यांत ते कसे तरबेज झाले आहेत याची कल्पना आली असेल. सारांश, स्वदेशी चळवळ यशस्वी होण्यास आमचीं मनें स्वदेशी झालीं पाहिजेत. आपण स्वतः

आपल्या देशांत सत्ताधारी असणें हेंच साहजिक आहे व हेंच अवश्य आहे, ही गोष्ट आम्हां सर्वांच्या मनावर बिंबली पाहिजे. स्वतःच्या देशांत तेथील लोकांकडे अधिकार असावे ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. ही गोष्ट मागण्याची व देण्याची नाहीं, यामुळें योग्यायोग्यतेचा, शक्याशक्यतेचा किंवा पात्रापात्रतेचा या गोष्टींत विचार उरतच नाहीं. कित्येक अधिकारी लोक मोठ्या मायावीपणानें आम्हांस आजवर सांगत आले आहेत कीं, इंग्रजांचें हिंदुस्थानांतील राज्य स्वतःच्या फायद्यासाठीं नाहीं; येथील लोक स्वराज्याचा उपभोग घेण्यास व त्याबरोबर येऊन पडणाऱ्या जबाबदाऱ्या ओळखून काम करण्यास तयार झाले कीं सर्व राज्यसत्ता त्यांच्या स्वाधीन करून निजधामास जाण्यास ते तयार आहेत. हें भाषण किती पोंचट व फसवणुकीचें आहे? परंतु इंग्रज म्हणतात त्याप्रमाणें आमचेहि पुष्कळ लोक त्यांचीच झलि ओढतात आणि म्हणतात कीं आम्ही स्वराज्यसूत्रें हातीं घेण्यास पात्र नाहीं. जणू काय पाण्यांत पडल्याशिवाय पोहण्याहून, अधिकारारूढ झाल्याशिवाय राज्य चालविणें अधिक शक्य आहे. काम, कसलेंहि जोखमीचें काम आमच्या हातीं न सोंपवितां आम्हीं तें करावें तरी कसें? एतद्देशीय संस्थानांच्या राजांस व कारभाऱ्यांस थोडीच स्वतंत्रता असते, परंतु ज्या ठिकाणीं त्यांची बुद्धि चालविण्यास अवकाश ठेवला असतो त्या ठिकाणीं या पारतंत्र्यकालांतहि तिचा प्रभाव दिसून आला आहे, परंतु हा पात्रतेचा विचारच चुकीचा आहे. शेजाऱ्यास जर मी म्हणूं लागलों कीं तुमच्या घरचें काम तुम्हांस समजत नाहीं, मी सर्व तुमचा कारभार करतों, तर तो काय म्हणेल? 'आमचा आम्ही वेडावांकडा कारभार करतों, तुम्ही आमच्या कामांत ढवळाढवळ करूं नका' इतकीच साधी गोष्ट दोन राष्ट्रांच्या संबंधांतील आहे. नाहीं म्हणावयास कांहीं इंग्रज लोक स्वच्छ असें म्हणतात कीं आम्हीं हिंदुस्थान तलवारीच्या धारेनें जिंकलें आहे आणि हिंदुस्थान जें आम्हीं ताब्यांत ठेवीत आहों तेंहि तलवारीच्या धारेवरच, हें म्हणणें मात्र सरळ आहे. याचा विचार या दृष्टीनेंच केला पाहिजे, परंतु तुम्ही अजून पुरे जाणते झालां नाहीं, पात्र झालां म्हणजे सर्व तुमचेंच आहे. या गुळचट थापा त्वेषाशिवाय दुसरें कांहीं उत्पन्न करूं शकणार नाहींत. या कामांत मूढपणानें आपले लोक हसें करून घेत आहेत. त्याच प्रकारें अनेक बाबींमध्यें या मायेंत आमचे लोक सांपडले आहेत. त्यांचा थोडक्यांत मासला कलमवार देण्याचा मीं विचार केला आहे. म्हणून मीं एक टांचण करून आणलें आहे. तेंच तुम्हांस वाचून दाखवितों. इंग्रजींत वाचलेले शब्द

पूर्वपरिचित वाटून कित्येकांच्या मनांत ही गोष्ट लवकर भरेल. त्यांतला मतलब मराठींत देत आहेंच.

1. Physical Unfitness.

१. इंग्रजांच्या शरीरसामर्थ्याशीं तुलना केली असतां एतद्देशीय लोक नादान ठरतात. कलेक्टरसाहेब जसे घोड्यावर बसून मजल मारतात व संकटांत उडी घालतात तसें कोणातरी 'नेटिवा'च्या हातून होईल काय? साहेब लोक आठ आठ तास कामें करूं शकतात. अशी बैठक इकडच्या लोकांस शक्यच नाहीं.

2. Inferior Morality.

२. एतद्देशीय लोकांची नीतिमत्ता कमीच. सरळ शुद्ध वर्तन जसें साहेबांचें तसें 'नेटिवां'त सांपडावयाचें नाहींच.

3. European heads are preferred to Indian ones by subordinates.

३. हाताखालच्या लोकांस युरोपिअन मुख्य असलेला आवडतो, पण आपले लोक नकोत. आपल्या लोकांची अरेरावी व खुनशीपणा पाहिला म्हणजे साहेबांचें सर्वांशीं समतेनें, कित्येक वेळां ममतेनें वागविणें पाहिलें म्हणजे आपल्या लोकांपेक्षां साहेब शतपटीनें बरे वाटतात.

4. Unfitness for European institutions due to backwardness of the masses and inherent selfishness of the upper classes.

४. युरोपांतील पार्लमेंटासारख्या संस्था पाहिजे म्हणणें सोपें आहे, पण लोकसमूह किती अडाणी व मागासलेला आहे याचा विचार केला म्हणजे वरिष्ठ लोक त्यांना फसवून आपल्या पोळीवर तूप ओतून घेतल्याशिवाय राहावयाचे नाहींत. तात्पर्य काय कीं हिंदुस्थान देश पाश्चात्त्य संस्थांना पात्रच नाहीं.

5. Educated men do not represent the large classes. What disparity is there between the so-called leaders and the masses!

५. सुशिक्षित लोक आपणच कांहींतरी कल्पना करून सर्वांच्या वतीनें म्हणून मागण्या करतात व तक्रारी पुढें मांडतात, पण बहुजनसमाजाचे हे मुखत्यार कसें म्हणावें? त्यांच्यामध्यें केवढें अंतर आहे म्हणून सांगावें? सुशिक्षित लोकांना अडाणी समाजाची माहिती लागण्याचा संभवच नाहीं.

6. Likelihood of the Mahomedans being oppressed by the Hindus by sheer predominating numbers or by the superiority of education.

६. हिंदुस्थानला प्रतिनिधिसत्ताक राज्य द्यावें म्हटलें तर काय अनर्थ होईल हें कोण पाहतो. हिंदु लोकांची संख्या अतिशय, त्यामुळें मुसलमानांवर नाहक जुलूम होईल हाच संभव फार. हिंदु लोक संख्येनें जास्त आहेत इतकेंच नाहीं तर पाश्चात्त्य शिक्षणाचा त्यांनींच विशेष फायदा घेतला आहे. यामुळें हिंदूंचा मुसलमानांवर जुलूम व्हायचाच.

7. Divided interest of various castes, orders, races, languages making a common independent Government impossible.

७. सर्व एतद्देशीयांच्या हातांत सत्ता असावी असें म्हणणें एकपक्षीं कबूल केलें तरी सर्व कामकाजें सलोख्यानें चालतील असा संभव नाहीं. जाती, धर्म, शाखा, भाषा यांची परस्परांत लढाई जुंपून राहीलच. प्रत्येकाचे हितसंबंध निराळे. अशानें एक स्वतंत्र सरकार व्यवस्थितपणें चालेल असें म्हणणें म्हणजे वाळूचा दोर वळवितां येईल असें आग्रहानें प्रतिपादणें आहे.

8. India was not and is not a nation. It is only a geographical name.

८. हिंदुस्थान आजवर कधीं एकराष्ट्र नव्हतें व आतांहि नाहीं. राष्ट्रीय सभा, राष्ट्रीय राज्यव्यवस्था, राष्ट्रीय शिक्षण वगैरे सर्व पदरचना भ्रामक आहे. हिंदुस्थान हें एक भूगोलांतलें नांव आहे. इतर देशासारखें ह्याला राष्ट्रत्व नाहीं.

9. English people's interest will not be properly watched. Already disrespect is shown to them everywhere.

९. हिंदुस्थानांत कित्येक इंग्रज लोक राहिले आहेत त्यांची वाट काय? त्यांच्या हितसंबंधाचा कोणीं प्रश्न काढला कीं त्याचा योग्य विचार होणार नाहींच, ही आपली ठरलेली गोष्ट. हल्लींच जिकडे तिकडे त्यांचा उपमर्द चालला आहे. त्यांच्याशीं अशी उद्धटपणाची व बेपर्वाईची वागणूक करणें म्हणजे कृतघ्नपणाचें आहे.

10. What right have the people of India to a better consideration so long as their women are uneducated and ill-treated?

१०. हिंदु व मुसलमान राजकीय हक्क मागतात, परंतु त्यांच्या म्हणण्याचा विचार कोण करील? अगोदर त्यांनीं आपल्या बायकांस शिक्षण द्यावें व त्यांस चांगल्या रीतीनें वागविण्यास प्रारंभ करावा. त्यांच्या स्त्रियांची जोंपर्यंत ही स्थिति आहे तोंपर्यंत त्यांनीं राजकीय सुधारणेची गोष्ट बोलूं नये.

पूर्वपरिचित वाटून कित्येकांच्या मनांत ही गोष्ट लवकर भरेल. त्यांतला मतलब मराठींत देत आहेंच.

1. Physical Unfitness.

१. इंग्रजांच्या शरीरसामर्थ्याशीं तुलना केली असतां एतद्देशीय लोक नादान ठरतात. कलेक्टरसाहेब जसे घोड्यावर बसून मजल मारतात व संकटांत उडी घालतात तसें कोणातरी 'नेटिवा'च्या हातून होईल काय ? साहेब लोक आठ आठ तास कामें करूं शकतात. अशी बैठक इकडच्या लोकांस शक्यच नाहीं.

2. Inferior Morality.

२. एतद्देशीय लोकांची नीतिमत्ता कमीच. सरळ शुद्ध वर्तन जसें साहेबांचें तसें 'नेटिवां'त सांपडावयाचें नाहींच.

3. European heads are preferred to Indian ones by subordinates.

३. हाताखालच्या लोकांस युरोपिअन मुख्य असलेला आवडतो, पण आपले लोक नकोत. आपल्या लोकांची अरेरावी व खुनशीपणा पाहिला म्हणजे साहेबांचें सर्वांशीं समतेनें, कित्येक वेळां ममतेनें वागविणें पाहिलें म्हणजे आपल्या लोकांपेक्षां साहेब शतपटीनें बरे वाटतात.

4. Unfitness for European institutions due to backwardness of the masses and inherent selfishness of the upper classes.

४. युरोपांतील पार्लमेंटासारख्या संस्था पाहिजे म्हणणें सोपें आहे, पण लोकसमूह किती अडाणी व मागासलेला आहे याचा विचार केला म्हणजे वरिष्ठ लोक त्यांना फसवून आपल्या पोळीवर तूप ओतून घेतल्याशिवाय राहावयाचे नाहींत. तात्पर्य काय कीं हिंदुस्थान देश पाश्चात्त्य संस्थांना पात्रच नाहीं.

5. Educated men do not represent the large classes. What disparity is there between the so-called leaders and the masses!

५. सुशिक्षित लोक आपणच कांहींतरी कल्पना करून सर्वांच्या वतीनें म्हणून मागण्या करतात व तक्रारी पुढें मांडतात, पण बहुजनसमाजाचे हे मुखत्यार कसें म्हणावें ? त्यांच्यामध्यें केवढें अंतर आहे म्हणून सांगावें ? सुशिक्षित लोकांना अडाणी समाजाची माहिती लागण्याचा संभवच नाहीं.

6. Likelihood of the Mahomedans being oppressed by the Hindus by sheer predominating numbers or by the superiority of education.

६. हिंदुस्थानला प्रतिनिधिसत्ताक राज्य द्यावें म्हटलें तर काय अनर्थ होईल हें कोण पाहतो. हिंदु लोकांची संख्या अतिशय, त्यामुळें मुसलमानांवर नाहक जुलूम होईल हाच संभव फार. हिंदु लोक संख्येनें जास्त आहेत इतकेंच नाहीं तर पाश्चात्त्य शिक्षणाचा त्यांनींच विशेष फायदा घेतला आहे. यामुळें हिंदूंचा मुसलमानांवर जुलूम व्हायचाच.

7. Divided interest of various castes, orders, races, languages making a common independent Government impossible.

७. सर्व एतद्देशीयांच्या हातांत सत्ता असावी असें म्हणणें एकपक्षीं कबूल केलें तरी सर्व कामकाजें सलोख्यानें चालतील असा संभव नाहीं. जाती, धर्म, शाखा, भाषा यांची परस्परांत लढाई जुंपून राहीलच. प्रत्येकाचे हितसंबंध निराळे. अशानें एक स्वतंत्र सरकार व्यवस्थितपणें चालेल असें म्हणणें म्हणजे वाळूचा दोर वळवितां येईल असें आग्रहानें प्रतिपादणें आहे.

8. India was not and is not a nation. It is only a geographical name.

८. हिंदुस्थान आजवर कधीं एकराष्ट्र नव्हतें व आतांहि नाहीं. राष्ट्रीय सभा, राष्ट्रीय राज्यव्यवस्था, राष्ट्रीय शिक्षण वगैरे सर्व पदरचना भ्रामक आहे. हिंदुस्थान हें एक भूगोलांतलें नांव आहे. इतर देशासारखें ह्याला राष्ट्रत्व नाहीं.

9. English people's interest will not be properly watched. Already disrespect is shown to them everywhere.

९. हिंदुस्थानांत कित्येक इंग्रज लोक राहिले आहेत त्यांची वाट काय? त्यांच्या हितसंबंधाचा कोणीं प्रश्न काढला कीं त्याचा योग्य विचार होणार नाहींच, ही आपली ठरलेली गोष्ट. हल्लींच जिकडे तिकडे त्यांचा उपमर्द चालला आहे. त्यांच्याशीं अशी उद्धटपणाची व बेपर्वाईची वागणूक करणें म्हणजे कृतघ्नपणाचें आहे.

10. What right have the people of India to a better consideration so long as their women are uneducated and ill-treated?

१०. हिंदु व मुसलमान राजकीय हक्क मागतात, परंतु त्यांच्या म्हणण्याचा विचार कोण करील? अगोदर त्यांनीं आपल्या बायकांस शिक्षण द्यावें व त्यांस चांगल्या रीतीनें वागविण्यास प्रारंभ करावा. त्यांच्या स्त्रियांची जोंपर्यंत ही स्थिति आहे तोंपर्यंत त्यांनीं राजकीय सुधारणेची गोष्ट बोलूं नये.

11. How are the Parias and Mahars treated by the so-called upper classes? Do those that treat them thus possess any right to equal treatment with Englishmem?

११. वरिष्ठ जाती म्हणून आहेत त्यांनीं आपण अस्पृश्य मानलेल्या जातींस कसें वागवितों याचा विचार केला आहे काय? अशा वाईट रीतीनें आपल्याच लोकांस वागवितात त्यांना इंग्रज लोक आपल्याशीं नीट वागत नाहींत याबद्दल कुरकुर करण्यास जागा तरी आहे काय? आपल्या पायाखालीं काय जळत आहे हें पाहावें कोणीं?

12 Blessings of good Government enjoyed under British rule are made light by the critics of the Government. India is now better governed and more cheaply governed and is happier and richer now than ever before. Look at the following undeniable facts.

(1) Railway, Telegraph, Electric and Gas light.
(2) Justice in Law Courts.
(3) Peace resulting from cessation of inroads from outside and dacoities from within; absolute safety everywhere.
(4) Education under all branches.
(5) Relief works, hospitals, and missionary efforts to save life. Excellent organization is observable everywhere.
(6) Systematic official work seen in the collection and expenditure of money, in the institution of departments such as Police, Army, Marine, Municipal, Sanitary, Forest, Abkari, Public Works, Medical, Education etc. etc.

१२. सरकारावर टीका करणारे लोक ब्रिटिश अमलाखालीं सौराज्यसुखाचा लाभ कसा होत आहे याविषयीं कांहींच गौरव करीत नाहींत. सुराज्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखासमाधानाचें जसें काय त्यांस महत्त्व वाटतच नाहीं. खरें पाहूं जाणारास दिसण्याजोग्या गोष्टी त्यांच्या खिसगणतींत नाहींत, पूर्वींच्या कोणत्याहि काळापेक्षां हल्लीं हिंदुस्थानचें राज्य उत्तम चाललें आहे, राज्यकारभारास खर्च कमी लागतो आणि लोकहि पण अधिक सुखी व गबर आहेत. पुढील गोष्टींकडे पाहा. त्यांपैकीं कोणती खोटी आहे हें छातीला हात लावून कोणितरी सांगूं शकेल काय?

( १ ) आगगाड्या, तारायंत्र, विजेचे व धुराचे दिवे.

( २ ) कायद्याच्या कचेरींत मिळणारा न्याय.

( ३ ) देशांत चोहोंकडे नांदणारी शांतता. परचक्रापासून भीति उरली नाहीं. देशांतल्या देशांत दंगेधोपे व दरवडे यांचा संभव राहिला नाहीं. चोहोंकडे सुरक्षितपणा आहे व आपणांस कोठेंच कशाचें भय वाटत नाहीं अशी समाधानाची वृत्ति जिकडे तिकडे पसरली आहे.

( ४ ) सर्व प्रकारचें शिक्षण देण्यांत आलें आहे. मेकॉलेसारखे ग्रंथकार तर म्हणतात कीं सर्व ज्ञानभांडार व पश्चिमेकडील सर्व विद्या व कला यांचे दरवाजे हिंदुस्थानांतील लोकांस खुले केले आहेत.

( ५ ) दुष्काळ कामगिऱ्या, दवाखाने, लोकांचे प्राण वांचविण्यासाठीं पाद्र्यांचे अहर्निश प्रयत्न या सर्व ठिकाणीं दिसून येणारी टापटीप किती सुरेख असते.

( ६ ) पद्धतशीर सरकारी काम खालपासून वरपर्यंत सुरळीत चाललें आहे. वसूल गोळा करून त्यांची विल्हेवाट कशी यंत्राप्रमाणें चालली आहे. पोलीस ( लोकरक्षक सैन्य ), सामुदायिक शहरसफाई, आरोग्य, जंगल, अबकारी, इमारत, वैद्यकी, विद्या वगैरे खातींच पाहा म्हणजे खात्री होईल.

ह्या प्रत्येकावर जबाब देण्याचा हा प्रसंग नव्हे व हें काम थोडक्यांत होणारहि नाहीं. या प्रत्येक बाबीवर एकएक पृथक् निराळें व्याख्यान देण्याजोगें आहे. इंग्लंडचा इतिहास ज्यांस माहीत नाहीं अशा माणसापुढें असल्या बाता साहेबलोकांनीं माराव्या, परंतु आमच्यांतील शहाण्यासुरत्या लोकांच्या तोंडांत या गोळ्या इंग्रजांनीं घालाव्या आणि त्या त्यांनीं गटागटा गिळाव्या व त्यांच्या गुणांचें वर्णन करावें हें आश्चर्य आहे.

अशा प्रकारचीं मतें उराशीं घट्ट बांधून या देशांतील इंग्रज वर्तमानपत्र-कर्ते व त्यांच्या मोहपाशांत सांपडलेले आपले लोक प्रचलित राज्यपद्धतीचे आधारस्तंभ बनले आहेत. बारीकसारीक सुधारणा राज्यकर्त्यांच्या मेहेरबानीनें झाल्या तर मुळीं तेवढ्या या आमच्या देशबांधवांस नको असतात असा भाग नाहीं. परंतु ज्या सुधारणा म्हणून केल्या जातात किंवा आमच्या देशाच्या सांपत्तिक उत्कर्षाची बाब म्हणून पुढें केली जाते त्यांत राज्यकर्त्यांचें कांहीं विशेष धोरण असतें, हें तत्त्व प्रथमप्रथम लक्षांत न येणें साहजिक आहे. परंतु इतका काळ लोटल्यावर, इतका पुरा अनुभव आल्यावरहि, आपलें मन या

मायेपासून सुटावें अशी इच्छा आम्हांस होऊं नये काय? शेंदीडशें वर्षें राज्य राहून त्यांत पन्नास-साठ वर्षें अविच्छिन्न शांतता नांदूनहि आमच्या देशांत दर वीस वर्षांस मोठे दुष्काळ व दर तीन वर्षांस लहान दुष्काळ यावेत हें शोचनीय नव्हे काय? अलीकडे तर एकसारखे दुष्काळच पडत आहेत, किंबहुना दुष्काळ पडत आहेत म्हणण्यापेक्षां आपण सतत दुष्काळांतच राहात आहों. या स्थितीची पुरी मीमांसा करण्यास स्वतंत्रपणें विचार करण्याची जरूरी आहे. प्रत्येक गोष्टींत आमच्या स्वतःच्या राष्ट्रास लागू पडणाऱ्या तर्कशास्त्राचा उपयोग केला पाहिजे. शिक्षणानें मन स्वदेशी बनविलें पाहिजे. तसें बनविलें नाहीं तर देशांतील आयात-निर्यात मालाचे आंकडे पाहून आपणांमध्यें संपत्ति वाढत आहे असें समजून फसून स्वस्थ बसावें लागेल. प्रथमतः मन दुसऱ्यांच्या ताब्यांतून सोडविलें पाहिजे. प्रत्येक विषयाचें अध्ययन किंवा विचार करण्यांत राष्ट्रीय दृष्टि ठेवली पाहिजे. परके लोक आपमतलबानें काय म्हणतात इकडे लक्ष ठेवलें पाहिजे.

पृथ्वीवरील इतर राष्ट्रें आपल्या देशांतील सर्व साधनांचा जितक्या फायदेशीर रीतीनें उपयोग करतां येईल तितका करतात, परंतु आमच्या देशांतील सांपत्तिक साधनांचा आम्हांस उपयोग करता आला असता तर आम्ही असें दरिद्री कां झालों असतों? आमचें स्वतःचें म्हणजे राष्ट्रीय सरकार असतें तर आमच्या खाणींत आम्हींच कामें करून दुसरीकडचा पैसा आणला असता. आमच्या देशांतील सर्व व्यापार आमच्या हातीं असता. आमच्या देशांतील आगगाड्या, तारायंत्रें, टपाल वगैरे आंतील दळणवळणाचे उपाय आमच्या हातीं असते व बाहेरील देशांशीं व्यवहार करण्यास जरूर असणारीं जहाजें आम्हींच चालविलीं असतीं, परंतु या सर्व गोष्टी आम्हांस कोणीं शिकविल्या नाहींत. एवढा समुद्रकिनारा ज्या देशास आहे त्या देशांतील लोकांच्या मालकीचीं व त्यांनीं स्वतः चालविलेलीं जहाजें असावयास हरकत कोणती? पण याला त्या दिशेनें बुद्धीला वळण लागलें पाहिजे. पण आमच्या बुद्धीला वळण देणारे आमचे आम्ही कोठें आहों! कुंभाराच्या हातांत पडलेल्या मातीप्रमाणें आमच्या बुद्धीचें काय वाटेल तें करून घेणारे निराळेच आहेत. परके लोक आमच्यावर राज्य करीत आहेत, त्यांच्या पूर्ण कह्यांत आमचें सर्वस्व असल्यानें आम्ही पाणके व लांकूडतोडे झालों आहों. राष्ट्राच्या हिताहिताचा पूर्ण विचार करून जो पूर्ण फायदा ज्या गोष्टीचा घेतां येईल तितकें त्या राष्ट्राचें पाऊल पुढें पडतें. अशा रीतीनें पाहतां सर्व जगामध्यें पुढें असण्याजोगीं नैसर्गिक साधनें आमच्या देशांत

परमेश्वरानें ठेवलीं असतां आम्हांस त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. यांतलें बीज काय ? दुसरें कांहीं नाहीं. या बाबीचा राष्ट्रीयदृष्ट्या विचार करणें आम्हांस परचक्राच्या फेऱ्यामुळें घडलें नाहीं. फिरलेली बुद्धि ताळ्यावर आणणें हेंच आज मुख्य कर्तव्य आहे. आमच्या देशांत आमचें हित जेणेंकरून होईल अशी परिस्थिति आमची आम्हींच आणली पाहिजे. दुसरे कोण या कामीं प्रथमच साहाय्य करणार नाहींत. आम्ही हात पाय हालविले तर दुसरे मदत करतील. प्रथम आपली कंबर बांधली पाहिजे. सभ्य जनहो, 'आत्मैव ह्यात्मनो बंधुः' दुसऱ्याकडे पाहात बसून कड लागावयाची नाहीं."

: ३ :

इतर देशांनीं काय चालविलें आहे, त्यांचा उदय कसा होत आहे हें डोळे उघडून पाहा. या कामीं मोठ्या कळकळीनें आपल्या राष्ट्रास उपदेश करण्याचा अधिकार श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांच्यासारखा कोणाचाच नाहीं. त्यांनीं नुकताच सुधारलेल्या जगाचा प्रवास केला आहे. आपल्या प्रवासांत आढळून आलेल्या गोष्टी त्यांनीं अनेक ठिकाणीं सांगितल्या आहेत. गेल्या डिसेंबरांत कलकत्त्यास त्यांनीं धंदेशिक्षणाच्या शाळा स्थापन करण्याचें व लोकांत हातकाम करण्याची संवय वाढविण्याचें महत्त्व सांगितलें आणि यासाठीं व इतरांचें राजकारण समजून घेण्यासाठीं विद्यार्थी परदेशीं पाठविण्याची जरूरी आहे ही गोष्ट पूर्णपणें स्थापित केली आहे. त्या कामीं पैसा व परिश्रम कितीहि लागले तरी हरकत नाहीं. बाहेरून शिक्षक आणून हीं कामें नीट होणार नाहींत. दोन्हीहि गोष्टी चालल्या पाहिजेत. अमेरिकेसारखा सुधारलेला देश, परंतु तेथील राष्ट्रीय सरकार अजून परदेशीं कोणते पदार्थ होतात हें पाहण्यासाठीं लोक रवाना करतें व दरसाल दोनतीन हजार विद्यार्थी बाहेर शिकावयास जातात. जपानचा उदय असाच झाला. तेथून दरसाल २०० विद्यार्थी सरकारांनीं कित्येक दिवस पाठविले. चार कोट वस्तीच्या देशांतून इतके विद्यार्थी जातात आणि आम्ही तीस कोट प्रजा अज्ञानांधकारांत लोळत पडलों तरी पर ठिकाणच्या ज्ञानाचा उजेड इकडे पडेल अशी व्यवस्था करीत नाहीं. आपल्या देशांत कोणकोणत्या गोष्टींची शक्यता आहे किंवा खुद्द आमच्या डोक्यांतून काय काय निघण्याचा संभव आहे हें कळून येण्यास दुसऱ्या देशाचा व दुसऱ्या लोकांचा परिचय झालाच पाहिजे. तशा प्रकारें लोकांशीं संबंध ठेवण्यास पूर्वतयारीच्या शिक्षणाचें धोरण अगदीं निराळें पाहिजे.

प्रत्येक शाखेंत सरकारांनीं चालविलेलें धोरण चुकीचें व आत्मघाताचें आहे, हें आज सर्व सांगत बसण्याचें कारण नाहीं. ठिकठिकाणीं व्याख्यानें दिलीं आहेत. ‘विश्ववृत्तां’त एक सविस्तर लेख प्रसिद्ध केला आहे. खुद्द तुमच्यापुढें सहा महिन्यांपूर्वीं या गोष्टींची चर्चा केली आहे. स्वदेशाच्या भूगोलाकडे, इतिहासाकडे, भाषांकडे, कसें दुर्लक्ष झालें आहे याचा विचार त्या वेळीं केला. भूगोल म्हणजे कोणत्या पृष्ठभागावर कोणत्या लोकांचें राज्य आहे व डोंगर, सरोवरें, नद्या व शहरें आहेत हें नव्हे. सृष्टिशास्त्रदृष्ट्या भूवर्णनाचा भाग आम्हांस मुळींच शिकवीत नाहींत. What and where are the following? पुढील स्थळें काय व कोठें आहेत ? हाच सर्व भूगोलाचा भाग मॅट्रिकच्या मुलांना माहिती. कोठील हवा कशी, कोठें काय पिकतें, कोठें कोणत्या धंद्यास तेजी आहे, कोठले लोक कसे आहेत वगैरे माहितीच्या नांवानें भोपळ्याएवढें पूज्य. इतिहासाची गोष्ट पुसूंच नका. ज्या देशाची भाषा आपणांस येत नाहीं त्याचें वाङ्मय व त्यांच्यामधील जुनींनवीं कागदपत्रें वाचावयाचें सामर्थ्य नाहीं त्या देशाचा इतिहास आपण लिहितों काय याचा विचार न करतां लिहिलेलीं पुस्तकें आमच्या तरुण विद्यार्थ्यांस घोकून काढावीं लागतात. इंग्लिश भाषा बरीच चांगल्या रीतीनें येत असल्याकारणानें आम्ही इंग्लंडचे इतिहास खाचित अधिक चांगलें लिहूं आणि ते इतिहास इंग्लंडांत सुरू केले तर इंग्रजास काय वाटेल ? हल्लीं चालणाऱ्या इतिहासांत तीन प्रकरणें असतात. इ. स. १,००० वर्षांपूर्वीचा इतिहास, मोगल भाग व ब्रिटिश भाग. यांत मराठ्यांचा भाग किंवा ‘मराठा पीरिअड’ चा अभावच. त्यांच्या राजनीतीचें, लोकस्थितीचें व पराक्रमाचें वर्णन नाहींच. न्यायमूर्ति रानडे यांच्याबद्दल सरकारच्या मनांत आदर आहे, पण त्यांनीं लिहिलेला इतिहास शाळांतून कोण शिकवितो ? त्यांतील दिशा लहानपणापासून मुलांस लागेल तर त्यांना जें वळण लागेल तें कांहीं निराळेंच होईल ही भीति वाटते कीं काय कोण जाणें ! कोण जाणें कशास ? तसलें वळण त्यांना नाहींच लागावयाचें. नाहीं तर असे इतिहास पूर्वीं तयार झाले नसते कीं काय ? पण ते पाहिजे होते कोणास ?

जी गोष्ट इतिहास-भूगोलाची तीच इतर विषयांची. स्वभाषेच्या आबाळीची तर गोष्टच पुसूं नका. तिच्यामध्यें ज्या प्रासादिक ग्रंथांची गर्दी आहे, त्यांपैकीं एकाचाहि परिचय होत नाहीं, इतकेंच नाहीं तर तिच्या द्वारां सर्व ज्ञान मिळावें तेंहि होत नाहीं. संस्कृत, गणित, इतिहास व सृष्टिशास्त्रें सर्वच परकीय भाषाद्वारां शिकावयास लागल्यानें ज्ञान यथार्थ व चिरस्थायी होत नाहीं. वेळ व शक्ति यांचा पुष्कळ अपव्यय होतो. या गोष्टी आतां मुलाबाळांससुद्धां कळून चुकल्या

आहेत. तेव्हां त्यासंबंधीं विशेष बोलण्याचें कारण उरलें नाहीं. अर्थशास्त्राचीं तत्त्वें इंग्लंडला लागूं पडतील अशीं शिकविण्यांत येतात. त्या विषयाची गोष्ट गणितशास्त्रासारखी नाहीं. परदेशांत भिन्न होणारीं तत्त्वें व त्यांची लापनिका विद्यार्थ्यांस शिकविण्यास त्या त्या राष्ट्राचें अर्थशास्त्र जाणणारे अनुभविक व शोधक गुरु पाहिजेत. एल्फिन्स्टन कॉलेजांतील गुरु प्रो. वर्डस्वर्थ मोठ्या निरभिमानपणें म्हणत असत कीं, मला ‘ इंडियन पोलिटिकल एकॉनमी ’ येत नाहीं. त्याचें अध्ययन रा. रानडे यांच्यापाशीं करावें. परंतु हें सरळ मनाचें तत्त्व सरकारी शिक्षण पद्धतींत असतें तर आम्हीं धडपड कशाला केली असती व आपणांला हें व्याख्यान ऐकण्याचा शीण तरी कशाला पडला असता ? हीच गोष्ट वनस्पतिशास्त्राची. कित्येक वनस्पतींचें प्राचीन आर्यग्रंथांत वर्णन आहे, पण त्यांचा पत्ता नाहीं. याचें कारण इतकेंच कीं येथील रानावनांतील, दऱ्याखोऱ्यांतील व डोंगरावरील वनस्पतींचा शोध लावण्याची चौकस बुद्धि उत्पन्न झालेली नसते. तसें वळण विद्यार्थिदशेंतच मिळत नसतें. भूगर्भशास्त्राचें तर बहुतेक नांवच आमच्या विश्वविद्यापीठीय शिक्षणक्रमांत नाहींच म्हटलें तरी चालेल. एंजिनिअरिंग किंवा स्थापत्य शाखेंत हा ऐच्छिक विषय असतो. परंतु त्याचें अध्ययन नीट होत नाहीं. चौकस युरोपियन अंमलदार दौऱ्यावर जातात त्यांची दृष्टि सर्व गोष्टींवर पोहोंचते. एखादा चमत्कारिक धोंडा नजरेस पडला कीं त्यांनीं उचललाच. त्यापासून कांहीं फायदेशीर निघण्याजोगें आहे कीं नाहीं हें स्वतःस कळलें नाहीं तर तो तज्ज्ञाकडे रवाना व्हावयाचाच. सृष्टिसौंदर्य पाहून व उपभोगून त्यांना जो आनंद व नफा होतो त्याचें नांव आमच्या फिरत्या अंमलदारांच्या कपाळीं नाहीं. हिंदुस्थानांतील जुन्या इमारती, पार, वगैरेंची माहिती देऊन युरोपियनांनीं ग्रंथ केले आहेत, पण आमच्या एल्. सी. ई. ना हें शक्य नाहीं. निसर्गशक्तीचा उपयोग होऊन धंद्याच्या कामीं फायदा करून घ्यावा हें वळण मुळापासून शिक्षणांतच पाहिजे, पण त्याच्या अभावामुळें आमच्या राष्ट्राच्या लोकांस ज्या गोष्टी सुचाव्या व फायदेशीर व्हाव्या त्यांची लूट परक्यांच्या पदरांत पडते, याचें उदाहरण धारवाड जिल्ह्यांत सहज सांपडेल. तुमच्या सोन्याच्या खाणी पाहा. पूर्वीं ह्या देशांत हें काम होत होतें पण हल्लीं ज्या अवलोकनाची संवय आम्हांस नाहीं व जें ज्ञान आम्हांस मुळीं दिलें नाहीं, त्या अवलोकनानें व ज्ञानानें बाहेरचे लोक गबर होत आहेत. दुसरें उदाहरण बेळगांव जिल्ह्यांतील गोकाक धबधबा गिरणीचें. ह्या अगदीं ठोकळ म्हणजे धांवतां धांवतां वाचावयास येतील इतक्या मोठ्या अक्षरांनीं लिहून ठेवलेल्या

आमच्या हलगरजीपणाच्या व अज्ञानाच्या जाहिराती होत. पाहिलीं तर अशीं उदाहरणें जागोजाग आहेत. खाजगी फुरसतीचा वेळ आम्ही लोक कसा घालवितों व युरोपियन लोक कसा घालवितात, त्याचेंहि अवलोकन या कामीं उपयोगी पडेल. परक्या देशांत येऊन नवीन नवीन धंदे काढून पाश्चात्त्य लोक आमच्या देशावर गबर होत आहेत, आणि आमच्या हातांत नारळाची आई येत आहे यांतील रहस्य अजूनहि आम्हांस ओळखूं नये काय? बाळपणापासून व्यावहारिक धोरण ठेवून शिक्षण देणें इत:पर सरकारांच्या हातून होईल अशी आशा करणें मूर्खपणाचें आहे. शेतकीला उत्तेजन सरकार देणार, शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठीं वर्ग काढणार म्हणून आमच्या तोंडास पाणी सुटलें आहे. सरकार मोफत शिक्षण देणार असा मोह पडला आहे. त्यांतलें इंगित आम्ही कळून कसें घेत नाहीं हेंच आश्चर्य. इंग्लंडांतील गिरण्यांना मुबलक कापूस-व कामकरूंना खावयास मुबलक गहूं इंग्लंडांत पिकणें शक्य नाहीं. जिवंत आणि मेलेल्या लोकांस पुरी होऊन तेथें जागाच उरत नाहीं म्हटलें तरी चालेल. आतां कोठें प्रेतें जाळण्यास प्रारंभ झाला आहे. परंतु लोकसंख्या वाढत आहे. हवेसाठीं अवश्य तेवढी मोकळी जागा सोडून राहत्या घरासदेखील जागा नाहीं. तेव्हां हिंदुस्थान देशच्या शेतकीबद्दल त्यांस प्रेमाचा पाझर फुटावा हें विहीत आहे. मोफत शिक्षणा-संबंधानें विचार करतां पृथ्वीवरील सर्व लोक फसत आहेत असें माझें मत आहे. पण परक्या सरकारनें मोफत शिक्षण देणें म्हणजे तर थट्टाच करणें आहे. फी देऊन हल्लीं आमची ही स्थिति, मग भिकेची भीड पदरीं घातल्यावर आम्ही काय बोलणार? स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांचा सरकारवर दाब असतो. ते सरकारास असें विचारूं शकतात कीं, शिक्षण मोफत दिलें म्हणून काय झालें? तुम्हीं धर्मादाय केला असें समजतां काय? शिक्षणावर खर्च करतां ते पैसे कोणाचे? आमचेच नव्हत काय? मग अशी हयगय कां करतां? असे प्रश्न हक्कानें विचारतां येतात. आमच्याकडे सर्वच अवघड आणि अशुद्ध. आम्ही फी देऊन शिकतों तर ही रड! आणि धर्मार्थ शिक्षण झाल्यावर मग उजेडच! असो, एक का अनेक गोष्टी. ज्याचें त्यानें राज्य केलें म्हणजे नुकसान झालें तरी संशयास कारण होणार नाहीं. परक्या लोकांचा अंमल म्हणजे संशयितच. सरकारांनीं कितीहि म्हटलें कीं वाईट हेतु लावूं नका, तरी काळेंबेरें मनांत यावयाचेंच. मनुष्यस्वभावच असा आहे कीं, आपल्या हितासाठीं ज्यानें त्यानें जागावें, आपलें हित अधिक साधण्यासाठीं किंवा आपल्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं जरूर तेवढें दुसऱ्याचें हित साधावें; यामुळें, बोलतात त्याप्रमाणें

हिंदुस्थानचें कल्याण करावें असें जर इंग्रजांच्या मनांत असेल तर आमचे अधिकार आम्हांवर सोंपवून आपण साम्राज्याचा बहुमान घेऊन स्वस्थ बसावें. त्याबद्दल ठराविक कांहीं नक्त खंडणी मागितली तरी आम्ही खुषीनें देऊं. परंतु राज्याबरोबर आमची बुद्धीहि नाहींशी होत आहे, तो नाश आम्हांस अत्यंत दुःसह होत आहे. सोयीनें, गोडीगुलाबीनें अशा गोष्टींचा निकाल लागावा हें मनुष्य-स्वभावास विरुद्ध आहे म्हणूनच या आमच्या देशावर अनर्थपरंपरा येऊन पडत आहेत. यत्नानें, धैर्यानें, स्वार्थत्यागानें प्रसंग पडल्यास प्राणसमर्पणानें आपले सर्व अधिकार मिळवावे लागतील. या सर्व गोष्टींस पुढील पिढी समर्थ व्हावी म्हणून राष्ट्रहितकारी विद्या तिला दिली पाहिजे, असें आमच्या मनानें पूर्णपणें घेतलें आहे. लॉर्ड कर्झन यांनीं युनिव्हर्सिटी बिल पसार करीपर्यंत लोकांच्या मताप्रमाणें शिक्षणांत कांहीं सुधारणा होतील असें वाटलें होतें. पुढें सिमल्यास लॉर्ड कर्झन यांचेकडे निव्वळ गोऱ्या लोकांचें गुप्त कूट जमून कांहीं तत्त्वें ठरलीं व युनिव्हर्सिटी कमिशन बसलें व तेंहि गौरवर्णांचेंच असावें असा पहिला घाट होता. परंतु लाजे-खातरस्तव एक एतद्देशीय त्या समितींत घेतला. न्या. गुरुदास बॅनर्जी यांचा त्या समितीचा अनुभव फार कष्टप्रद झाला, यामुळेंच सरकारी नियंत्रणाच्या सर्व शिक्षणापासून त्यांच्या मनानें माघार खाल्ली आणि ते बंगाल्यांतील राष्ट्रीय शिक्षणा-च्या चळवळीचे अध्वर्यु बनले. तात्पर्य, सरकारी शाळा व पाठशाळा यांतून सरकारास पाहिजे असे लोक निर्माण होतील. तेवढ्यावरच लोकांनीं संतुष्ट होऊं नये. राष्ट्रांत उदीमधंदे, कलाकौशल्य, व्यापार व इतर सर्व मानमान्यतेच्या व उपयुक्ततेच्या गोष्टी वृद्धिंगत पावाव्या अशीं शिक्षणाचीं सर्व अंगें त्यांनीं आपल्या कार्यक्रमांत घातलीं पाहिजेत असें करणें सरकारास भाग पाडावें अशी खटपट केली पाहिजे. ज्या अर्थीं राष्ट्रापासून पैसे घेतात त्याअर्थीं तसें करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. परंतु या सर्व तत्त्वज्ञानाच्या गोष्टी व्यवहारांत काय उपयोगी? म्हणून आपण मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं ही खूणगांठ घालून ठेवून, शिवाय कितीहि टीका केली व सरकारच्या कामगिरीची मीमांसा केली तरी, कोळसा उगाळावा तितका काळाच असें समजून कामास लागण्याचाच प्रस्तुतचा समय आहे.

अशा बुद्धीनें प्रेरित होऊन कोल्हापूर मुक्कामीं आम्हीं **'समर्थ विद्यालय'** स्थापिलें आहे ही गोष्ट आपणांस माहीत आहेच. त्याचा मुख्य हेतु धंदेशिक्षणानें किंवा इतर मार्गांनीं आपल्या उपजीविकेची सोय करून राहणें व श्रीमंत होणें सुशिक्षित मंडळीस शक्य आहे हें दाखविण्याचा आहे. नुसतें हातकाम करणारे किंवा हातकाम करणाऱ्या लोकांचे पोशिंदे लोक असतात, त्यांचें वाङ्मय,

इतिहास वगैरे बुद्धीचा विकास करणाऱ्या विषयांचें अध्ययन झालें नसलें तर त्यांची प्राणयात्रा अपुरीच झाली असेंच म्हणणें प्राप्त आहे. शिक्षणाचा हेतु स्त्रीपुरुषांची प्राणयात्रा पूर्ण झाली पाहिजे असा आहे. मनुष्याचे या जगांत संबंध अनेकविध असतात, तितक्या त्याच्यावर जबाबदाऱ्या असतात. त्या सर्वांतून अब्रूनें निभावणें हें त्याचें कर्तव्य आहे. राष्ट्राचा उत्कर्ष एकसारखा व्हावयाचा म्हणजे त्याच्या कारणीं आपली बुद्धि व संपत्ति खर्च व्हावी अशी प्रत्येक पौराची इच्छा असली पाहिजे. आमच्या राष्ट्रांत अशा प्रकारें उपयोगी पडणारी बुद्धि व संपत्ति आहे ती बहुतेक सरकारसेवेंत गडप झाली आहे. कांहीं संपत्तिमान लोक सरकारसेवेच्या बाहेर आहेत; परंतु त्यांना शिक्षण नसल्यानें राष्ट्र म्हणजे काय व राष्ट्रोत्कर्ष म्हणजे काय हें माहीत नसतें. तसेंच इहलोकच्या संबंधाशिवाय परमेश्वराशीं आपला संबंध काय आहे, परलोकाविषयीं व चालू आयुष्याच्या पुढचे कांहीं विचार करण्याची योग्यता व सामर्थ्य असल्यास येथील प्राणयात्रा एकंदरीनें समाधानाची व संतोषाची होण्यास पुष्कळ मदत होते. या सर्व गोष्टींचा विचार करून हल्लीं आमच्या राष्ट्रास प्रपंचाचिंता जरी तीव्र आहे तरी तिलाच सर्वस्वीं वाहून घेणें नीट नाहीं. इतर कोणत्याहि विषयांचें ज्ञान झालें तरी मनुष्यास 'मनुष्य' हाच ज्ञानाचा विषय कांहीं महत्त्वाचा मानतां येणार नाहीं. या दृष्टीनें पाहतां सुशिक्षणांत अर्थार्जनाचा विचार येतो व तो मुख्यत्वें येतो, तरीपण या एकाच पुरुषार्थामागें लागणें उचित नाहीं. एकंदर पुरुषार्थ चार आहेत. त्यांपैकीं चौथा शिकून शिकवून येत नाहीं. परंतु तिन्हींकडे म्हणजे धर्म, अर्थ व काम यांकडे समदृष्टि कशी राहील व व्यक्तिदृष्ट्या व राष्ट्र-दृष्ट्या आपण स्वावलंबी कसें होऊं हें शिकविणें,आमचें प्रमुख साध्य कल्पून या उद्योगास आम्ही लागलों आहों. इतर राष्ट्रांतील लोकांप्रमाणें व्यावहारिक उदयाची इच्छा करणारे व उदात्त हेतु मनांत असलेले सुशिक्षित, दृढनिश्चयी, दीर्घोद्योगी व धनाढ्य अशा लोकांची संख्या देशांत वाढावी हें फळ अंशतः तरी प्राप्त होण्याच्या मार्गावर आमचा देश लागला इतकें आमच्या आयुर्मर्यादेंत आम्हांस दिसेल तर हें जग सोडतांना समाधान वाटेल.''

· ४ ·

धर्माचरणाचीं तत्त्वें सनातन धर्मास म्हणजे श्रुतिस्मृति पुराणोक्त पद्धतीस अनुसरून आहेत असें आम्ही मानतों. आम्हीं आर्य किंवा प्रार्थना असा कांहीं निराळा समाज काढला नाहीं, किंवा तशा कोणास मिळालों नाहीं. आमचे वृद्ध पूज्य रा० रघुनाथराव म्हणतात त्याप्रमाणें आमचीं शास्त्रें कोणत्याहि

खऱ्या राष्ट्रहिताच्या सुधारणेस आड येणारीं नाहींत. व्यापक दृष्टि ठेवून बदलणाऱ्या परिस्थितीस योग्य अशा सवडी ठेवून आचाराचे नियम प्राचीन मुनींनीं ठरविले आहेत. यासाठीं

'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि'॥

या भगवदुक्तीप्रमाणें वागावें हेंच आम्ही श्रेयस्कर मानतों. 'आचारः प्रथमो धर्मः' असें म्हटलें आहे याचें तरी कारण इतकेंच कीं, कोणाच्या मनांत कोण शिरतो, वागणुकीवरून माणसाची सामान्यतः कल्पना होते. देशाचार भिन्नभिन्न असतात त्याप्रमाणें सर्वांनीं वागावें. विशिष्ट परिस्थितींत शास्त्राची अनुज्ञा मिळेल तितका फरक करावा. सर्व ठिकाणीं व्यवस्थितपणा पाहिजे. राज्यव्यवहारांत जसें ठरीव अनुशासन असतें, तसें धर्मव्यवहारांतहि पाहिजे, म्हणून धर्मस्थानें व गुरुस्थानें आहेत. राजा जसा जुलमी, अज्ञानी किंवा बेफिकीर होऊं शकतो व समाजास त्याचे परिणाम भोगावे लागतात, त्याप्रमाणें धर्मपीठांचीहि कधीं कधीं गत होईल. पण सामान्य स्थिति कशी असावी याचा विचार करण्याचाच प्रस्तुत प्रसंग आहे. आम्हीं समर्थ विद्यालयांतील विद्यार्थ्यांस कोणतें वळण लावूं ह्याचें फक्त दिग्दर्शन केलें आहे. मी पाहिजे तसा वागेन, असें म्हणणारा शिक्षक किंवा शिष्य येथें खपावयाचा नाहीं. शिष्टसंमत आचरण पाहिजेच. परकीय राज्यकर्ते धर्मशिक्षणाविषयीं उदासीन असतात, पण आम्हांस तसें होतां येत नाहीं. अगदीं उदासीन असणें म्हणजे धर्मच नसणें. सर्व धर्म झूट मानण्याकडे प्रवृत्ति होते तें इष्ट नाहीं. हल्लींच्या शिक्षणाचा परिणाम कसा होतो तें पुढील वाक्यांत एका साहेबानें वर्णिलें आहे.

They neglect their own languages, disregard their own literatures, abjure their own religions, despise their own philosophies, break their own caste-rules and divide their own time-honoured customs (ते आपल्या स्वतःच्या भाषांची उपेक्षा करतात, आपल्या स्वतःच्या वाङ्मयाकडे दुर्लक्ष करतात, आपला स्वतःचा धर्म सोडून देतात, आपल्या स्वतःच्या तत्त्वशास्त्रास तुच्छ मानतात, आपले स्वतःचे जातिनिर्बंध मोडतात आणि आपल्या स्वतःच्या कालक्रमागत संप्रदायांचा उपहास करतात.)

— SIR M. MONIER WILLIAMS

शास्त्रीय विषय निराळे शिकवावयाचे असल्याकारणानें वाचनपुस्तकांत शास्त्रीय धडे नसावेत असें माझें म्हणणें आहे. तशी पुस्तकमाला ब्रुक्स रीडर्स म्हणून अमेरिकेंतील आणविली आहे. इंग्रजीसाठीं पहिल्या सहा महिन्यांत मुलींच पुस्तक नाहीं. साध्या गोष्टीविषयीं संभाषण करून घरोघर लहान मुलें स्वभाषा शिकतात त्याप्रमाणें विद्यार्थ्यांचा इंग्रजींत प्रवेश करून द्यावयाचा. त्याच्या शेवटीं पुस्तकी अक्षरांची माहिती करून द्यावयाची. दुसऱ्या सहामाहीच्या वेळीं पहिलें पुस्तक सबंध व दुसऱ्यांतील बराच भाग. तिसऱ्या सहामाहीस तिसरें पुस्तक. पुढें चौथ्या सहामाहीस रॉबिन्सन क्रूसो, यापुढील वर्ग वर्षावर्षांचे आहेत. तिसऱ्या वर्षाचा वर्ग म्हणजे आमच्या इकडील पांचवी इयत्ता, हल्लीं आमच्या शाळेंत नाहीं. सहाव्या इयत्तेचा वर्ग आहे, त्यास चेम्बर्स एक्झेंप्लरी बायॉग्रफी हें पुस्तक लावलें आहे. चौथ्या इयत्तेपासून म्हणजे चौथ्या सहामाहीपासून साधीं इंग्रजी पत्रें लिहिण्यास शिकवीत असतों. त्यांत शाळेची माहिती, घरगुती मजकूर, मित्रांच्या सुखदुःखाच्या गोष्टी, प्रवासवर्णनें असे विषय आहेत. पांचव्या इयत्तेस व्यापारी हिशेबाची माहिती ठेवावयाची आहे, त्या वेळीं व्यवहाराची माहिती मिळेल. सहाव्या व सातव्या इयत्तांत यांतच विशेष गति होऊन निबंध-लेखन येईल. आमच्या शाळेंतील क्रम पुरा झाला म्हणजे त्यास कोणत्याहि विषयावरील इंग्रजी ग्रंथ दुसऱ्याच्या मदतीशिवाय समजावा; इतकेंच नाहीं तर सफाईनें वाचतां येऊन त्या विषयाचें अध्ययन करतां यावें इतकी गति होईल अशी उमेद आहे. प्रथमपासून शिकविण्यांत संभाषणपद्धतीचा अंगीकार केला असल्यानें मुलांत तत्परता व सभाधीटपणा यावा अशी योजना आहे. त्यायोगें व पुढें सहाव्या व सातव्या इयत्तांत असतांना व्याख्यानाप्रमाणें बोलण्याचा परिपाठ ठेवल्यानें विशेष त्रास न पडतां इंग्रजींत बराच प्रवेश होईल. जातीच्या मेहनतीवर व हुशारीवर बरेंच अवलंबून राहील हें सांगावयास नकोच. स्वारीच्या मनांत कितीहि पळावयाचें असलें तरी त्याची गति घोड्याच्या सामर्थ्यानें मर्यादित होणार आहेच. तेव्हां या कामीं अनुभव काय येतो तो पुढें दिसेलच.

हल्लींच्या शिक्षणक्रमांत असलेला दुसरा महत्त्वाचा विषय संस्कृत. स्पेन्सर म्हणतो म्हणून आमचीहि मंडळी लागली म्हणावयाला कीं प्राचीन भाषांचें अध्ययन कशाला? संस्कृत भाषा सामान्यजनांच्या बोलण्यांतून आजकाल गेली नाहीं. पेशवाईच्या वेळींहि सारे लोक संस्कृत बोलत होते असें नाहीं, पण असलें अभद्र आणि त्वेषजनक विशेषण आमच्या पवित्र आणि परमपूज्य भाषेला कोणीं

लावलें नव्हतें. इंग्रजांनीं किंबहुना सर्व पाश्चात्त्यांनीं आपल्या आदिभाषांस 'मृत' म्हटलें म्हणून आम्हींहि तेंच घोर पातक करावें काय? परंतु ज्यांच्याकडून आम्हीं गुरुमंत्र घेतला त्यांनीं बोधिलें आहे कीं, 'त्वच्चित्तं मम चित्तमनु। त्वच्चरित्रं मे चरित्रमनु' माझ्यासारखें तुझें मन होऊं दे, माझ्या आचरणासारखें तुझें आचरण होऊं दे. शिक्षाध्यायांत सांगितल्याप्रमाणें गुरूचें चांगलें तेवढें अनुकरण करावें, इतर न करावें हें तत्त्व आम्हीं पाळलें नाहीं, आणि अमरवाणीलाहि 'मृत' हें विशेषण लावूं लागलों. देवांचा हा उपमर्द परमेश्वरास कसा सहन व्हावा? ज्यांनीं साऱ्या जगभर या भाषेचा प्रचार करण्यास झटावें आणि आपल्या सनातन धर्माचें पाणी तमाम दुनियेला दाखवावें, त्यांनींच आमच्या सनातन भाषेला मृत म्हणून तिच्या संकोचाची इच्छा धरावी आणि यत्नाला लागावें काय? तुम्ही आम्ही, सर्व हिंदुराष्ट्र, रामायण-महाभारतादि ग्रंथ, चारी वेद, अनंत उपवेद, जोंपर्यंत जगांतून नाहींसे झाले नाहींत, तोंपर्यंत संस्कृत मरत नाहीं, आत्म्याप्रमाणें ती अमर आहे. सर्व लौकिक भाषांचें अध्ययन जोरानें करा. लोकांत ज्ञान पसरावयाचें, जागृति करावयाची तर लोकांस समजतें त्या भाषेंतच बोललें पाहिजे, ग्रंथ रचले पाहिजेत. गौतम बुद्धांनीं त्या वेळच्या भाषेंत उपदेश केला, पण संस्कृतला 'मृत' किंवा अशा कांहीं विशेषणानें उल्लेखिलें नाहीं. सर्व भाषा देवांच्याच आहेत असें म्हणण्याची मोकळीक आहे व आम्हीहि म्हणतों. पण त्यासाठीं गीर्वाणवाणीचें अग्रस्थान कोणीं हिरावून घेणें शक्य नाहीं. प्रत्येक सुशिक्षित आर्यास ती आली पाहिजे, असा आमचा कटाक्ष आहे. आमच्या देशांतील सर्व भाषांत तिची जरूर आहे. त्यांची वाढ व्हावयाची असेल तर संस्कृतचें साहाय्य त्यांना अवश्य आहे. आईच्या दुधासारखें साधन उपलब्ध असतांना, ती जिवंत असतांना मेली म्हणून डांगोरा पिटवून वरच्या दुधावर मुलांस वाढवूं पाहणाऱ्या लोकांस काय म्हणावें? हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न प्रांतांतील लोकांत 'नवा जोर, नवी हिम्मत' उत्पन्न करण्यास देशी भाषांचें अध्ययन जोरानें झालें पाहिजे. जिकडे तिकडे आर्य लोकांच्या बुद्धीला अज्ञान-राहूनें ग्रासलें आहे, त्याचा शिरःच्छेद केला पाहिजे. एका भाषेच्या अस्त्रानें हें कार्य होत नाहीं, तर अनेक भाषारूपी अस्त्रांनीं तें केलें पाहिजे. पूर्वींचीं असलेलीं अस्त्रें मोडलीं असलीं तर नीट करून त्यांना पाणी दिलें पाहिजे. परंतु या सर्व अस्त्रांस मूठ एकाच लांकडाची आहे हें विसरतां कामा नये. सर्व देशी भाषांस संस्कृतची जरूर फार आहे. आतां संस्कृत फार कठीण आहे, तिचा बोजा विद्यार्थ्यांच्या शिरावर कां घालतां एवढा प्रश्न बरीक

सयुक्तिक आहे आणि त्याला समर्पक उत्तर आम्हीं अनेक वेळां दिलें आहे व तें आजहि पुन: देतों. संस्कृत भाषेचें काठिन्य तिच्या क्लिष्ट व अपरिमित व्याकरणाच्या रूपांत व दीर्घ असमंजस न्यायघटित परिष्कारांत आहे. तिचें व्यावहारिक स्वरूप जसें अत्यंत मनोहर आहे तसेंच तिचें अध्ययनहि सुलभ आहे. सुमारें १५ संधिनियम, १० समासाचे नियम, १० धातुसाधित रूपें, साग्र शब्दरूपावलि व धातुरूपावलींपैकीं वर्तमान ( लट् ), प्रथमभूत ( लङ् ), आज्ञार्थ ( लोट् ), विध्यर्थ ( लिङ् ) हे डॉ. भांडारकरांच्या पहिल्या पुस्तकांतील काळ आणि द्वितीयभूत ( लिट् ) फक्त तृतीय पुरुष व द्वितीयभविष्य ( लुट् ) एवढ्या सामग्रीवर वाटेल तो ग्रंथ वाचण्याचें सामर्थ्य सामान्य प्रबुद्ध स्त्री-पुरुषांस आल्या-शिवाय राहणार नाहीं, अशी माझी प्रतिज्ञा आहे. कारक व कर्मणि हीं दोन्हींहि रूपें दशम गणाच्या धातुरूपावरून व चतुर्थ गणाच्या आत्मनेपदावरून अनुक्रमें सहज शिकवितां येतात. हें सर्व काम चांगलें लक्ष पुरविलें तर सहा महिन्यांच्या आंत रोज एक तास याप्रमाणें अभ्यास केल्यास होईल. याला निराळीं पुस्तकें नकोत, कांहीं नको. पुढें वाङ्मय वाचतांना एक टांचणवही असली म्हणजे झालें. वरच्या सामग्रीवर कळणार नाहींत अशीं क्वचित् रूपें वेळोवेळीं येतील त्यांची माहिती घ्यावी लागेल. हें या भाषारत्नाच्या सुलभपणाबद्दल झालें. आतां आम्ही नुसतें मराठी चांगलें शिकूं पण संस्कृत शिकणार नाहीं असें म्हणणारे आहोंत. त्यांना एक गोष्ट विचारावयाची ती ही कीं, मोरोपंत हा महाकवि तुम्ही आपल्या वाचनांतून वगळणार नाहींना ? त्याचीं काव्यें समजण्यास जेवढें संस्कृतचें ज्ञान ( म्हणजे संधि, समास व धातुसाधितें चांगलींच यावीं लागतात ) मिळवावें लागतें त्यापासून वर रेखाटलेला संस्कृतचा क्रम किती दूर आहे ? 'आम्ही शेवटपर्यंत जाऊं परंतु इंग्लंड दूर राहिलें, आतां वेळ नाहीं' म्हणून ते पाहिल्या-शिवाय परत येणाऱ्या माणसास काय म्हणावें ? किंवा राष्ट्रीय दृष्टान्त द्यावयाचा म्हणजे दक्षिणेस मंडपम् स्टेशनपर्यंत जाऊन रामेश्वरची यात्रा न करतां परत येणारास आम्ही काय म्हणूं, किंवा त्याहूनहि विशेष, काशीस राष्ट्रीय सभेस जाऊन विश्वेश्वराचें दर्शन घेतलें नाहीं तर काय म्हणावें ? असो, आम्हां सर्व हिंदुस्थानवासीयांस एकराष्ट्रत्वाच्या प्रेमरज्जूंनीं बांधण्यास साधनीभूत अशी पवित्र व अत्यंत उपयुक्त, सर्व विद्वानांस दळणवळणासाठीं उपयोगी पडूं शकणारी सुलभ व सर्व देशभाषांची मातृभाषा जी गीर्वाणवाणी तिचा अनादर आमच्या हातून कधींच होणार नाहीं.

तिसरा महत्त्वाचा विषय इतिहास. याविषयीं हल्लीं कशी हयगय होते तें मागेंच सांगितलें आहे. आमच्या क्रमांत पहिलीं दोन वर्षें म्हणजे पहिल्या चार इयत्तांत हिंदुस्थानचा इतिहास शिकविण्यांत येणार आहे. या इतिहासाचे चार भाग करून पहिला भाग म्हणजे प्राचीन इतिहास शेवटीं घ्यावयाचा आहे. मराठी रियासत, मुसलमानी रियासत व ब्रिटिश राज्याचा भाग असे तीन क्रमानें अगोदर घेतले जातात. पुढील वर्षांत इंग्लंड, ग्रीस व रोम या देशांच्या इतिहासाची स्थूल माहिती दिली जाईल. इतर युरोपियन देशांपैकीं कांहीं माहिती त्या त्या राष्ट्रांतील थोर पुरुषांच्या चरित्राच्या द्वारां मिळेल. जसें गॅरिबाल्डी, फ्रेडरिक दि ग्रेट, पीटर दि ग्रेट वगैरे. इंग्लंडच्या इतिहासाशिवाय त्या देशांतील थोर व उद्योगशाली पुरुषांचीं चरित्रें इंग्रजींतून व मराठींतून वाचनपुस्तकद्वारां शिकवावयाचीं आहेत. जसें हॅम्पडन, क्रॉम्वेल, ग्लॅड्स्टन, ब्रॅडलॉ, कॉब्डेन वगैरे. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या ज्ञानांतहि चरित्रवाचनद्वारां भर पडेलच. उदाहरणार्थ, शिवाजी, थोरले शाहूमहाराज, पहिले बाजीराव, थोरले माधवराव, परशुरामभाऊ, नाना फडणवीस, महादजी शिंदे वगैरे.

अमेरिकन इतिहासाची व अमेरिकन राज्यपद्धतीची तर हिंदुस्थानच्या लोकांस पूर्ण माहिती पाहिजे. म्हणून इंग्रजी वाचनपाठमाला आम्हीं मुद्दाम अमेरिकन ठेवली आहे. हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांत स्वराज्य कधीं काळीं व्हावयाचें तर तें संयुक्त संस्थानच्या धोरणाचें होणार. न्यायानें व प्रेमानें इंग्रजांनीं आहे तो संबंध राखला तर त्यांचें साम्राज्य हिंदुस्थानचे लोक आनंदानें कबूल करतील. हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणाचा शिरकाव न व्हावा असें धोरण राखण्यास म्हणजे ‘ भारतीयांसाठीं भारतवर्ष ’ हें तत्त्व ‘ अमेरिकनांसाठीं अमेरिका ’ ह्या मन्रोच्या तत्त्वाप्रमाणें पाळलें पाहिजे. सर्व युरोपचा तरुण स्वरूपानें अवतार म्हणजे अमेरिका. अर्वाचीन कला व शास्त्र यांकरितां जर कोणी गुरु करावयाचा असल्यास अमेरिकाच चांगली. युरोपांत पैशाची गठडी बांधून न्यावी तेव्हां दाद लागावयाची, पण अमेरिकेंत तसें नाहीं. आपल्या हिंमतीवर व उद्योगानें मोलमजुरी करूनहि तेथें विद्याभ्यास करणारे कांहीं विद्यार्थी तिकडील विद्यालयांत शिकतात. सर्व देशांतील सर्व भाषांचे, सर्व धर्मांचे लोक तेथें एकत्र होतात हें पाहण्यास व लोकसत्ताक राज्य कसें चाललें आहे हेंहि पाहण्यास आपल्या लोकांपैकीं पुष्कळांनीं तिकडे जावें. शास्त्रीय कलाकौशल्याच्या सर्व अर्वाचीन सुधारणा तेथेंच आहेत. सारांश, अमेरिकेचें तेज आपल्या लोकांत यावें व त्यांचें व्यंग जें परमार्थविचारशून्यता तें आपल्यांत

येऊं नये, किंबहुना ' विद्यया विद्या ' या तत्त्वानें त्यांस अध्यात्मविद्या शिकवून आपण त्यांजपासून म्हणजे तदितर लौकिक विद्या शिकाव्या हाच मार्ग आम्हांस नीट वाटतो.

हिंदुस्थान देशास एकराष्ट्रत्व आहेच. संस्कृत भाषा, सनातन धर्म, समदुःखसुखीपणा, एकभूमिवास या बाबींनीं तें स्थिर झालें आहेच; परंतु जाती, पंथ, किरकोळ चाली यांमुळें झालेला कांहींसा गैरसमज अधिक दळणवळणानें नाहींसा होईल. याला मुख्य साधन म्हणजे एकमेकांच्या भाषा एकमेकांस समजणें. कानडी व मराठी शिकण्याच्या इकडे सोयी पुष्कळ आहेत. कानडीच जाणणारे विद्यार्थी आमच्या विद्यालयांत येणार असतील तर त्यांस दोन तीन महिन्यांत मराठी शिकविण्याची उत्तम सोय केली आहे. आमच्याकडील विद्यार्थ्यांस गुजराथी व हिंदी या दोन भाषा येणें फार जरूर आहे. गुजराथी भाषा व्यापारी कसबांत तरबेज व प्रवासास न कंटाळणारे अशा लोकांची असल्यानें आशिया व आफ्रिकेंत पुष्कळ पसरली आहे. हिंदी भाषेचीं निरनिराळीं रूपें बहुतेक उत्तर हिंदुस्थानभर चालतात. या दोन्ही भाषा हल्लीं समर्थ विद्यालयांत थोडथोड्या शिकविल्या जातात. अर्थात् त्यांचें ज्ञान संभाषणापुरतें व सामान्यतः ग्रंथ वगैरे समजण्यापुरतें होईल. त्या त्या भागांत प्रवास करण्यानें हें वाढणारें आहे.

हल्लींच्या सरकारी पद्धतींत स्वभाषेच्या अभ्यासाची लवकरच फारकत होते. व्यंग काढून टाकावें व मार्मिक पंडितास साजेल असें त्या भाषेचें ज्ञान विद्यार्थ्यांस व्हावें, तींतील प्रासादिक ग्रंथकारांचा दृढ परिणाम त्यांच्या मनावर व्हावा व भाषाभिमानद्वारां धर्म व देश यांच्याबद्दलचा अभिमान वृद्धिंगत व्हावा, हा आमचा प्रधान उद्देश आहे. तदनुरूप रामायण-महाभारतांचीं अनेक गद्यपद्य रूपांतरें विद्यार्थ्यांच्या अवलोकनांतून जावींत अशी अध्ययनक्रमांत योजना आहे. स्वभाषेंतील सर्व ग्रंथ वाचून टाकीन अशी हांव उत्पन्न व्हावी व स्वभाषेची सेवा करणें हें एक अवश्य कर्तव्य आहे असें बऱ्याच विद्यार्थ्यांस वाटावें अशा धोरणानें हा अभ्यास चालावयाचा आहे. रा. रा. विष्णुशास्त्री चिपळूणकर व रा. रा. आगरकर यांचीं चरित्रें व लेख त्यांच्या मनावर बिंबतील अशाबद्दल विशेष काळजी घेण्यांत येते. चौथ्या व पांचव्या इयत्तांस चिपळूणकरांचें चरित्र वाचनपुस्तकच ठेवलें आहे. त्यांच्या ग्रंथाच्या साहाय्यानें त्यांच्या चरित्राचा अभ्यास करावयाचा. वाचनपुस्तकांत विपुलता व विविधपणा जितका शक्य तितका आणण्याचें ठरविलें आहे.

धंदेशिक्षण व कलाकौशल्य यांविषयीं आतांपर्यंतच्या विषयाप्रमाणें ठाम लिहितां येत नाहीं. या कामीं आमच्या कृतीपेक्षां उद्देशाचीच धांव फार मोठी आहे. आमचे सर्व उद्देश सिद्धीस जाण्यास सढळ हातानें देशबांधवांनीं मदत करावी एवढ्याचीच जरूर आहे. पाद्री लोकांनीं आमच्या शेजारीं सांगली मुक्कामीं काढलेल्या कार्यशाळेंतून कितीतरी लोक तयार होत आहेत, पण त्या शाळेला ४०–५० हजार रुपये तरी सहज खर्च झाले आहेत. आमच्या लोकांचें दणें अगदीं बेताचें आणि विचारणें मात्र 'तुम्ही असें कराल काय? तसें कराल काय? तुम्ही हें शिकविणार काय? तुम्ही तें शिकविणार काय? तुमची स्कीम (ठरलेली योजना) सांगा.' आम्ही एकच उत्तर देतों, आम्हांला सर्व कांहीं करावयाचें आहे. जेवढा द्रव्याश्रय येईल तेवढें करूं. टेक्निकल (धंदेशिक्षण) च तेवढें कां शिकवीत नाहीं म्हणून कांहीं लोक विचारतात. तेवढें मात्र आमच्या हातून होणार नाहीं. अपुरें शिक्षण आणि अपुरें जीवन आम्हांस नको. मनुष्यप्राणी जनावर असता तर सर्कशींत किंवा कारखान्यांत त्याच्याकडून चोपून काम करून घेतात तसें आम्हींहि केलें असतें. उपजीविकेसाठीं व देहसंतर्पणासाठीं व जगांतील लोकांशीं व्यापारी युद्धांत जय मिळविण्यास नसलें तरी टिकाव धरण्यासाठीं हाताचा आणि डोक्याचा पुष्कळ उपयोग करणें योग्य आहे; म्हणून कांहीं वेळांपूर्वीं सांगितलेल्या कारणासाठीं हस्तकलेबरोबर बुद्धिशिक्षणाची सांगड अवश्य आहे. नाहीं तर '**बुद्धिर्यस्य बलं तस्य**' या न्यायानें लोकांचे दासच होण्याची पाळी यावयाची. हल्लींच्या काळीं जिकडे तिकडे बुद्धिशिक्षणाकडे फाजील लक्ष देऊन सर्व कला विलयास नेल्या यासाठींच जरी आम्ही बुद्धिशिक्षणाचें महत्त्व कमी करीत नाहीं, तरीपण त्याहून अधिक महत्त्व आज धंदेशिक्षण व कलाकौशल्य यांना देत आहों. त्यांत सरकारी नोकरी व वकिली या उपजीवनोपायांवर आमच्या क्रमांतील विद्यार्थ्यांनीं अजीबात पाठ फिरविली असल्यानें त्यांना हस्तकौशल्य हाच तरणोपाय राहिला आहे. यामुळें रेखाकला ही सर्व कलांची आदिमाता ती सोडून सुतारी, विणकाम, घरकाम, गवंडीकाम, मूर्ति घडविण्याचें काम, लहानसहान कारखाने (पेन्सिली, टांकाचीं टोंकें, साबण, काच, काड्याच्या पेट्या वगैरे) रासायनिक कारखाने (रंग देणें, तेलें, अत्तरें काढणें, चित्रकर्म, मेणकापड करणें वगैरे) लहान-मोठीं रिपेअरीचीं कामें करणें व नवीन जिन्नस करणें वगैरे अनेक गोष्टी शिकवावयाच्या आहेत, पण 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' असो, या बाबतींत आज इतकेंच सांगणें शक्य आहे कीं, आम्हीं सुतारी, विणकाम सुरू केलें आहे. सुतारीचें काम रोज सकाळीं

दोन तास एक स्वयंसेवक शिकवीत असतात. दोन प्रहरीं आमचे रेखाकलाशिक्षक मधल्या सुट्टींत शिकवितात. विणकामासाठीं एक जुना माग ठेवला आहे व एक नवीन (दांडेकर पद्धतीचा, त्यांनींच तयार केलेला) तऱ्हेचा आहे. एक एल्. सी. ई. मित्र लवकरच आम्हांस मिळतील अशी आशा आहे. म्हणजे ही कार्यशाले (वर्कशॉप) ची व्यवस्था ठीक जुळेल. रसायनशास्त्राच्या स्थूलज्ञानास लागणारीं उपकरणें आणलीं आहेत. प्रो. लक्ष्मण गणेश साठे, एम्. ए., यांनीं केलेलें ‘रसायनशास्त्र’ हेंच पुस्तक लावलें आहे. शास्त्रीय पुस्तकांच्या पाठमालेचें काम तज्ज्ञ माणसांकडे सोंपविलें आहे. एक वर्षांत या सर्व अंगांनीं पुरोगति झालेली दृष्टीस पडेल अशी उमेद आहे.

सहा महिन्यांपूर्वीं समर्थ विद्यालयाची जी स्थिति होती तिच्यापेक्षां आज ती अधिक समाधानकारक आहे, हें ऐकण्यानें आपणांस आनंद होणार आहे. पहिली गोष्ट मनुष्यबळाची. राजाराम कॉलेजांत पूर्वीं असलेले तरुण मित्र रा. रा. राजाराम दामोदर देसाई, बी. ए., यांच्या साहाय्यानेंच प्रथम गेल्या सालीं जूनच्या १ ल्या तारखेस हें विद्यालय स्थापण्यांत आलें. प्रथम आम्ही दोघेच काय तें सर्व वेळ इकडे खर्च करणारे शिक्षक होतों. आठवड्यांतून २।३ तास शिकविण्याचें आश्वासन डॉ. आत्माराम गोपाळ परांडेकर; एल्. एम्. अँड एस्. व रा. डॉ. सखाराम रामचंद्र भागवत, बी. एस्सी., यांनीं दिल्यानें मोठी मदत झाली. पुढें बडोदा हायस्कूलचे माजी हेडमास्तर पेन्शनर रा. रा. गोविंद मोरेश्वर हसबनीस, बी. ए., आमच्या विद्यालयांत २–३ तास शिकावयास येत होते व पुढेंहि येण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें आहे. माझे पूज्य गुरु कै. प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक रसायनशास्त्र व प्राणिशास्त्र शिकविण्यास येत असत. त्यांच्यासारखा अविश्रान्त विद्याव्यासंगी पुरुष विद्यार्थ्यांच्या पुढें असणें हीच एक शिक्षणाची बाब आहे. त्यांच्या अकालिक मृत्यूनें आमचें मोठें नुकसान झालें आहे. त्यांचें स्मरण व्हावें म्हणून आमच्या प्रयोगशाळेस आम्हीं त्यांचें नांव देण्याचें योजिलें आहे. इतकें झालें, तथापि रा. रा. देसाई व मी या दोघांप्रमाणें यावज्जीव या कार्यास वाहिलेले शिक्षक मिळाल्याशिवाय या विद्यालयास चिरस्थायिता येणार नाहीं असें वाटत होतें, ती काळजी बऱ्याच अंशीं श्रीकृपेंकरून दूर जाहली आहे हें सांगण्यास मला मोठा आनंद वाटतो. येथें जमलेल्या बहुतेकांस परिचित असलेले रा. रा. जनार्दन सखाराम करंदीकर, बी. ए., एलएल्. बी., हे आम्हांस येऊन मिळाले. दुसरे दोन पदवीधर रा. रा. वामन मल्हार जोशी, एम्. ए., व रा. रा. नरहर बाळकृष्ण जोशी, बी. ए. एलएल्. बी., हे आमच्या शिक्षकवर्गांत सामील

झाले आहेत. यांपैकीं पहिले अगदीं नुकतेच विद्याक्रम संपविलेले, डेक्कन कॉलेजांत दोन वर्षे दक्षिणा फेलो असलेले आहेत व दुसरे शिक्षकांच्या कामांत व व्यवहारांत बरेच अनुभव असलेले, माझ्यापेक्षां किंचित् वडीलच आहेत. यापुढेंहि आणखी लोक आले पाहिजेत. समर्थ विद्यालयासारख्या शाळा दर जिल्ह्यांत एक अशा झाल्या पाहिजेत. त्यासाठीं शिक्षकमंडळी एका धोरणाची होतील तितकें इष्ट आहे. येथें जमलेल्या व इतर ठिकाणच्या तरुण विद्वान् मंडळीस माझी विनंती हीच आहे, कीं त्यांनीं राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यास वाहून घेतलें पाहिजे. आजवर झालेल्या शिक्षणांतूनच आपण सर्व तयार झालों आहों. आपल्यांत राहिलेलीं व्यंगें पुढील पिढींत पुनरावृत्त होऊं नयेत यासाठीं आम्हांस झटलें पाहिजे. भगवंतांनीं सांगितल्या-प्रमाणें 'श्रेयान् द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप' हें लक्षांत ठेवून आपणांपैकीं शक्य असेल त्यांनीं या कामास लागण्याचा निश्चय करावा. वहिरी आणि मुक्या आईची आणि हल्लींच्या शिक्षणयंत्रांतून बाहेर पडलेल्या लोकांची स्थिति एकच आहे. पुढील पिढी सुशिक्षित, सुदृढ, सुशील व राष्ट्रकार्यक्षम होणें न होणें आम्हांवर अवलंबून आहे. सदर नांवें घेतलेले पदवीधर आमच्या कार्यास मिळून ठिकाणचें काम संभाळीत असल्याकारणानें मला तेथील काळजी वाटत नाहीं, आणि प्रसंग पडल्यास सगळाच बोजा सहन करण्याजोगी मंडळी मिळाली हा मी परमेश्वराचा या कार्यावर अनुग्रहच समजतों. वयाच्या मानानें व उत्साहानें त्यांच्याकडून माझ्यापेक्षां कार्य पुष्कळच अधिक होत आहे व होईल असें लोकांनीं म्हटलेलें ऐकून मला अत्यंत संतोष व अभिमान वाटणार आहे हें सांगावयास नकोच. या कार्याचें यशापयश बहुतांशीं शिक्षकमंडळीच्या कामगिरीवर अवलंबून राहणार, म्हणूनच या कामासाठीं सात्त्विक वृत्तीच्या तरुण विद्वानांस प्रेमानें बोलावीत आहें."

· ५ ·

शिक्षणक्रमांतील विषयाविषयीं नवीन कांहीं सांगावयाचें राहिलें आहे असें नाहीं. अविवाहित विद्यार्थी उत्साहयुक्त असणारच. ते जितके सुशील, सुवृत्त व उद्योगशाली असतील तितका विद्यालयाचा लौकिक वाढेल. त्यांना तसें बनवि-ण्याचा प्रयत्न आमच्या हातून होईल तितका आम्ही करूंच. यासाठीं पालकांनीं याउपर आपल्या मुलांना प्रस्तुत क्रमांतच ठेवावें किंवा राष्ट्रीय शिक्षणाच्या क्रमांत घालावें याचा विचार करण्यास ते समर्थ आहेतच.

आमच्या कार्याचे हितचिंतक आहेत त्यांस मोठी काळजी वाटते ती द्रव्य-बलाचीच होय. परंतु मला या बाबतींत इतकी चिंता वाटत नाहीं. आमच्या लोकांत एखाद्या गोष्टीची उपयुक्तता सिद्ध झाली तरी तिच्या साहाय्यार्थ थैल्या सोडण्याची तितकी तयारी नसते ही गोष्ट मला मान्य आहे, परंतु ह्यासंबंधीं चांगली जागृति झाल्यावर ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं मनावर घेतल्यास कर-पद्धतीनें पैसा वसूल करण्यास कठीण पडणार नाहीं. शिवाय, लोकांच्या मनांत ही गोष्ट बिंबली म्हणजे आपण होऊन या संस्थेस मदत आल्याशिवाय राहणार नाहीं. अनेक लोकांनीं अनेक मार्ग सुचविले आहेत. त्यांपैकीं कांहीं कष्टसाध्य आहेत. मुष्टिफंड किंवा पैसाफंड अशांनीं आमच्यासारखीं सालीना १०,००० रुपये खर्चाचीं वीस विद्यालयें चालविण्याइतका निधि ( वार्षिक किंवा तितकें व्याज उत्पन्न होईल इतका कायम निधि ) उभारणें शक्य नाहीं, तरी पण प्रथम प्रथम हा भार आजवरच्या पद्धतीनें शिकून तयार झालेल्या व शिकत असणाऱ्यांवरच विशेषत: पडणार. आमच्याकडून आम्ही गांवोगांव जाऊन प्रयत्न करीत आहोंतच व ठोकळ देणग्या मागत आहोंच. त्यांत भर घालण्यासाठीं वकिलांनीं, विद्यार्थ्यांनीं व सुखवस्तूंनीं ( थेंबें थेंबें तळें सांठे ) या न्यायानें हातभार लावावा. सुखवस्तूंत कारखानदार, कारागीर, व्यापारी वगैरे सर्व येतात. त्यांच्यांत धर्मदायाबद्दल म्हणून रकमा निराळ्या काढतात त्याचा कांहीं भाग या कार्याकडे यावा. वकिलांनीं आपल्या अशिलाकडून १५ रुपये घेतले तर १ रु. आपला घालून त्याच्याकडून २ रु. समजूत घालून घेऊन ३ रु. ची त्याच्या नांवाची पावती दिली तर बरीच रक्कम होईल. कोर्टाची पायरी चढल्याबद्दल सरकारास व वकिलास दंड द्यावा लागतोच, त्याच वेळीं सत्कार्यांत थोडा पैसा जाईल तो चांगल्या ठिकाणीं चित्रगुप्त नोंदून ठेवील हा भरंवसा बाळगावा. विद्यार्थ्यांच्या इतकें शुद्ध अंत:करण क्वचितच असतें. हल्लीं आपण तर एका क्रमांत पडलों आहोंच. त्या क्रमांत पुढल्या पिढीनें पडूं नये म्हणून आपण अल्पसें साहाय्य करण्याचें त्यांनीं मनांत आणल्यास एकंदरीनें कांहीं कमी मदत होईल असें नाहीं. आपल्या शिक्षणांत दरमहा कांहीं तरी फी द्यावी लागतेच. हल्लींचें नवीन शिक्षण ज्यांना पसंत पडेल अशांनीं दुष्काळांत तेरावा महिना समजून एक महिन्याच्या फीइतकी सालीना मदत आमच्या महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळास करण्याचा निश्चय केल्यास, त्यांनीं पुढील पिढीचें बरेंच कार्य करण्यास आतांच प्रारंभ केला असें होईल. सर्व गृहस्थाश्रमी लोकांनीं आपल्या घरीं शुभाशुभ कार्याच्या प्रसंगीं श्रीसमर्थ विद्यालयाचा एक भाग काढून ठेवला तरी बराच कार्यभाग उरकणार आहे. मेजवान्यांच्या

थाटांत, रुसण्या-फुगण्यांत व कित्येक वेळीं अपात्रीं दानांत केवळ रूढिवश होऊन आपण किती द्रव्य वेंचतों हें ज्यांच्या लक्षांत येईल त्यांना आमची सूचना वावगी वाटणार नाहीं. असो, असे अनेक मार्ग सुचवितां येतील, पण अखेर '**दातुरिच्छा बलीयसी**' म्हणून म्हणतात तेंच खरें. जशी ज्या तऱ्हेनें शक्य असेल त्या तऱ्हेनें या कार्यास कुमक होईल अशी माझी दृढ श्रद्धा आहे. त्या श्रद्धेनुरूप आजवर मला फलसिद्धि झाली आहे. या कामीं कोणत्याहि वेळीं विवंचना उत्पन्न झाली कीं श्रीकृपेनें ती अचूक दूर व्हावी असा योगायोग आजवर अनेक वेळां आला आहे. त्यावरून ईश्वरी जाहीरनामा नवव्या अध्यायांतील

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥**

किंवा तुकारामाच्या साध्या वाणींतील

**पडतां जडभारी । दासें आठवावा हरि ।**
**मग होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥**

या तत्त्वाचा अनुभव आला आहे. तेव्हां केवळ कर्मापुरते अधिकारी आम्ही आहों, फलाविषयीं विचार करण्याचें कारणच नाहीं, फलें अनेक होतात, असें

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**

या भगवदुक्तींतलि 'फलेषु' या अनेकवचनावरून स्पष्ट आहे. पाहा 'कर्माणि' हें एकवचन असून 'फलेषु' हें अनेकवचन घालण्यांत भगवंतांचें औदार्य विशेष व्यक्त होतें. खरेंच आहे,

**अनंत हस्तें कमलावरानें । देतां किती घेशिल दो करानें ॥**

तेव्हां त्याच्यावर विश्वास ठेवून फलाविषयीं काळजीनें न झुरतां आपण काम करीत राहावें हेंच बरें."

• • •

# ६. संस्थानी राज्यकारभार

[ ' विश्ववृत्त ' जुलई १९०७ ]

मायेला गुंतून आपण ह्या व्यवहारांत पडलों म्हणजे केवळ स्वतःचा विचार सुटला. ज्या ज्या गोष्टींचा म्हणून आपण अभिमान बाळगतों त्या त्या गोष्टींबद्दल आम्हांस व्याप करावा लागतो. जितका व्याप अधिक तितका संताप अधिक, असें आपले वाडवडील सांगत आले आहेत. जगांत ' सुख पाहतां जवापाडें। दुःख पर्वताएवढें ' असें तुकारामबोवा बजावितात. ' जगीं सर्वसूखी असा कोण आहे ? ' हा समर्थांचा प्रश्न जगप्रसिद्ध आहे. इतकी गोष्ट सिद्ध आहे कीं, मानून घेतलें तरच थोडेंबहुत सुख या जगांत आहे, म्हणजे संतोष किंवा समाधान याची मदत घेतल्याशिवाय आपणांस सोय नाहीं. पदोपदीं होणाऱ्या दुःखानें व येऊन पडणाऱ्या काळजीनें आपणांस त्रास होऊं लागला तर जगणेंच अशक्य होईल. यासाठीं जी स्थिति आपणांस प्राप्त झाली आहे तींतच संतोष मानून राहावें आणि होतां होईतोंपर्यंत व्याप वाढवून संतापास अधिकाधिक कारण करून घेऊं नये व जेवढा पसारा आपल्याभोंवतीं पडला असेल तोच आवरण्याचा प्रयत्न करून, होतां होईतों आपल्याहून इतरांवर आपलें सुखदुःख अवलंबून न राहण्याच्या उद्योगाए लागावें. हीच प्रत्येक विवेकी माणसाची प्रवृत्ति असावयास पाहिजे आहे. परंतु ही गोष्ट शक्य नाहीं, निदान पुष्कळांना शक्य नाहीं. यासाठीं पसाराहि वाढवावयाचाच व त्या वाढलेल्या पसाऱ्यांतच जें सुखदुःख मानण्यांत येतें त्याचाच विचार करावयाचा असल्यानें, सर्व व्यवहार असा हट्टाच्या व वेडेपणाच्या रीतीचा झाला आहे. म्हणजे अनुभविक व परम कारुणिक साधुजन सांगतात कीं, जेवढा व्याप वाढेल तेवढें दुःख वाढेल, सुख कमी कमी होईल आणि आम्ही तर सर्व लोक व्याप वाढविणार आणि सुख मिळवावें म्हणून धडपड करणार. असेंच होणार याचा अर्थ असा कीं, आम्हांस उत्तरेस काशीस जावयाचें आहे तर आम्ही भलत्याच कोणत्या तरी दिशेनें जाणार.

पाश्चात्त्य लोकांच्या संगतीनें आम्हांत कांहीं इष्ट व अनिष्ट प्रकार आले आहेत. त्यांतील अनिष्टांपैकीं राज्यरीतीसंबंधाच्या कल्पना ह्या होत. आम्हां लोकांपैकीं स्वभावतः राज्यधोरण अमक्या तऱ्हेचें असावें किंवा राज्यकारभार

अमक्याच्या हातीं असावा कीं नसावा या भानगडींत पडणारे लोक थोडे. राज्य-व्यवस्थेच्या तीन प्रकारांची विचारपूस आमच्या इकडील राजनीतिशास्त्रांत नाहीं हें कित्येकांस मोठें व्यंग वाटतें. राजसत्ताक, अल्पजनसत्ताक व लोकसत्ताक असे विभाग अरिस्टॉटलपासून पाश्चात्त्यांत आहेत. राजनीतिशास्त्राचा त्यांनीं जसा व्यापक रीतीनें विचार केला आहे तसा आमच्याकडे कोठें झाला आहे ? बहुमतानें निकाल करावा ही कल्पना आमच्यांत लोकांना जशी काय माहीतच नाहीं असें दिसतें. राजा हा खरोखर प्रजेचा नोकर आहे व लोक हेच खरोखर राजे आहेत हें राजनीतिरहस्य ज्यांना कळत नाहीं व पाश्चात्त्यांनीं सत्य-निर्णयाची सरबत्ती देऊन उडवून दिलेलें 'राजा हा परमेश्वर आहे किंवा देवाचा अवतार आहे' असलें रानटी तत्त्व उराशीं घट्ट बांधून बसण्याइतके आमचे लोक अडाणी आहेत. सर्वांनीं आपल्या बहुमतानें मुख्त्यार निवडलेले असावेत. अशा निवडलेल्या लोकांच्या मुख्त्यारांची सभा असून तिच्या हातांत सर्वसत्ता असावी. ह्या सभेंत ज्यांचें बहुमत असेल त्यांच्या मर्जीमाफक राज्यशकट हांकला जावा. अल्पमतांत असणाऱ्या लोकांनीं छिद्रान्वेषीपणाचें व्रत चालवून बहुमत-वाल्यांना सदा सावध ठेवावें ही राज्यपद्धति किती चांगली ! सर्व निरनिराळ्या हितसंबंधांच्या लोकांना आपलें म्हणणें स्पष्टपणें प्रतिबिंबित करतां येईल अशी राज्यव्यवस्था किती सुरेख असते ! हल्लीं सर्व सुधारलेल्या जगांत अशी व्यवस्था आहे. परंतु हिंदुस्थानांत वेद, रामायण व महाभारतापासून तों पेशवाईच्या ऱ्हासा-पर्यंत किंवा नाशापर्यंत एक पद्धति ठाऊक, प्रगति कसली ती नाहीं. असा कोटिक्रम करणारे लोक आमच्या विद्वानांत बहुत आहेत. परंतु हा कोटिक्रम आम्हांला तरी बिलकुल मान्य नाहीं. प्रत्येकानें राज्यव्यवस्थेचा विचार करणें व राज्यकारभाराच्या भानगडींत पडणें ही गोष्ट राष्ट्रास हितावह नाहीं असें आम्हांस वाटतें. आपआपल्या व्यवसायाची काळजी वाहणें, त्यांत सुधारणा करणें व जेणें-करून त्यांत बरकत येईल अशा गोष्टींचा विचार करणें यांतच प्राय: सर्व आयु-र्भाग खर्च होतो, त्यास आम्ही संसारी असें विशेषण लावतों. मुलेंबाळें, गणगोत, उदीमधंदा त्यांतच प्रत्येक संसारी माणसाचें मन गुंतून असतें. पैसा पुष्कळ मिळावा, मालमत्ता मोठी असावी, अधिकार मोठा असावा व त्या संपत्तीस जोड म्हणून तिच्याहून अधिक सुखदायक अशी संतति असावी इतकीच बहुतेक लोकांची प्राय: मजल गेलेली आहे. इहलोकींचा हा विचार करून प्रत्येकानें लक्ष घालण्या-जोगा विषय म्हणजे परलोकसाधन होय. धर्म, अर्थ, काम या त्रिगुणांचा विचार झाला म्हणजे मोक्षाचा विचार करावयाचा. सर्व लोकांच्या मागें अगदीं न सुटणारा

असा हा एक दुसरा विषय आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांच्या व विशेषत: इंग्रजांच्या संगतीनें राज्यव्यवस्था किंवा राज्यकारभार हें एक लचांड आमच्या मागें लागलें आहे. पाश्चात्त्य लोकांस स्वार्थ, राज्यार्थ व परमार्थ असे तीन विषय अवश्य झाल्यानें शेवटल्यास फारसें फावत नाहीं. दुफळी ही स्वार्थपरायण अशा मानवस्वभावाचें व्यापक अंग आहे. व्यापक शब्द अंमळ शास्त्रीय अर्थानें आम्हीं उपयोजिला आहे. जेथें जेथें धूम आहे तेथें तेथें अग्नि असावयाचाच, तसें जेथें जेथें स्वार्थपर मानवस्वभाव असावयाचा तेथें तेथें वैमनस्य व कलह किंवा दुफ़ळी ही असावयाची. त्यांत जितकें कमी करतां येईल तितकें कमी करण्याचें सोडून देऊन पाश्चात्त्यांनीं भरच घातली आहे. त्या योगानें वैमनस्याचीं इतर कारणें कायम राहून आणखी राज्यनीति व राज्यरीति या विषयांच्या मतभेदाची मिळवणी होते. राजकीय पक्ष दोन, तीन क्वचित् चार किंवा अधिकहि होतात. सामान्य लोक राजकीय विषयाची चर्चा करण्यास पात्र नसतात. फक्त चार पुढारी लोकांस तो एक धंदा किंवा काळजीचा विषय होऊन राहतो. कित्येक आपमतलबी माणसांस पुढें पुढें करून आपलें स्तोम वाढविण्यास संधि सांपडते. स्वराज्यसुखाचा उपभोग घेणाऱ्या राष्ट्रांत असल्या पद्धतीपासून घोटाळाच होतो व सुराज्याची प्राप्ति होत नाहीं, पण असल्या पद्धतीचा फार्स म्हणजे उपहासजनक अनुकरण करूं इच्छिणाऱ्या परराज्यांकित लोकांचे हाल कुत्रादेखील खात नाहीं. जित लोकांत फूट पाडून आपली चंगळ चालविण्यास मात्र या पाश्चात्त्य पद्धतीचा आम्हांत अंशांशानें प्रवेश केल्यानें तो राजकर्त्यांस उपयोगी पडतो. राष्ट्रीय संस्था अंगवळणीं पडल्या असतात तेथें सुखदुःखांची बेरीज-वजाबाकी होऊन कदाचित् कांहींतरी सुखाची बाकी येण्याचा संभव आहे, परंतु आमच्या देशांत राज्यकर्त्यांनीं आम्हांस सपशेल तोंडघशीं पाडण्यासाठीं या आमच्या दृष्टीनें अराष्ट्रीय संस्था आमच्यांत प्रविष्ट केल्या आहेत कीं काय असें वाटण्याचा प्रस्तुत प्रसंग आला आहे. बहिरंगावरून पाहतां ज्या ज्या गोष्टी आजवर मनोहर वाटत होत्या त्यांची आंतील शिवणीच्या अंगाची बाजू दृष्टीस पडून आम्ही आपलें राष्ट्रीयत्व सोडल्याबद्दल शोकाकुल होण्याचा काल आला आहे. शिक्षण अराष्ट्रीय दिल्यानें कसा घात करून टाकला हें अनेक वेळां दाखविलें आहे. कांहीं कांहीं अराष्ट्रीय संस्था आमच्यांत शिरकवून त्यांबद्दल आमच्या विमूढमतित्वामुळें आमचा डुवा घेतला.

शिवटीं आमचा मोह जात चालल्यावरहि त्या संस्थांचा त्याग करतां येत नाहीं तर त्यांचाच स्वीकार करून, नेटानें पाश्चात्त्यांप्रमाणेंच त्या थाटून त्यांच्याच मार्गांनीं त्यांचें म्हणणें त्यांच्याच गळ्यांत घालणें प्राप्त आहे. अशांपैकीं या पाश्चात्त्य राजकीय संस्था आहेत. या संस्थांचे अनिष्ट परिणाम होत होते तोंपर्यंत आमच्यांत त्यांस सुखानें नांदूं देऊन आतां कोठें त्या संस्था आमच्यांत मुरूं लागून आम्ही त्याप्रमाणें आगलें व आपल्या राष्ट्राचें हित साधण्याच्या मार्गास लागलों, तेव्हां मात्र त्या संस्थांचा संकोच करण्याची दुर्बुद्धि राज्यकर्त्यांस होत आहे आणि हिंदुस्थानचे लोक या राजकीय संस्थांस पात्र नाहींत असा फाटक्यातुटक्या साहेबापासून तों मोर्लेपर्यंत एकसारखा ध्वनि निघत आहे. याउपर शिक्षणाच्या नाड्या आंखडणें जसें शक्य नाहीं, तसेंच राजकीय बाबतींत युरोपांतील राजनीति कल्पनाप्रमाणें जागृत झालेल्या स्वराज्यादिविषयक महत्त्वाकांक्षा आतां दडपून टाकणें अशक्य आहे. मिळालेल्या शिक्षणाच्या आश्रयानें त्यासच राष्ट्रीय स्वरूप देणें हा जसा आपला कृतसंकल्प व अंगीकृत व्यवसाय बनला पाहिजे, तसेंच या पाश्चात्त्य राजनीतीच्या धोरणास राष्ट्रीय स्वरूप देण्यास आम्हीं हातीं कंकण बांधलें पाहिजे.

आमचीं संस्थानेंसुद्धां ब्रिटिश मुलुखाप्रमाणेंच अराष्ट्रीय बनलीं आहेत. राजेरजवाड्यांसहि अराष्ट्रीय शिक्षण मिळालें असल्याकारणानें त्यांचीं मतें प्राश्चात्त्य बनलीं आहेत. खुद्द विद्वद्वर्य श्री. सयाजीराव गायकवाडमहाराजांचीसुद्धां दृष्टि कित्येक वेळां चकलेली दृष्टीस पडते. त्यांच्या राजधोरणांत प्राचीन व्यवस्थेबद्दल दिसावा तसा आदर दिसत नाहीं. जगांत सामान्य लोक शहाणे झाले तर किती शहाणे होतील. राजनीतिशास्त्र किंवा व्यवहार किती सूक्ष्म आहेत व त्यास कशा प्रकारचे लोक नियंत्रक असावे लागतात याचा त्यांना विचार होणें शक्य नाहीं. वानराच्या गळ्यांत कोणीं हार घातला म्हणजे काय होतें तें जगन्नाथ पंडितरायांनीं वर्णिलें आहे.

हारं वक्षसि केनापि दत्तमज्ञेन मर्कटः ।
लेढि जीघ्रति संकोच्य करोत्युन्नतमानसम् ॥

त्याप्रमाणेंच स्थानिक स्वराज्याचे सर्व हक्क प्रजेस दिल्यानें होत असतें. हिंदुस्थानांतील अनुभव असा आहे. परंतु तसाच क्रम चालावयाचा असेल तर लोकांस शिक्षण देऊन अगोदर तयार केलें पाहिजे, आणि तें राष्ट्रीय पद्धतीनेंच देऊन परकीय राज्यरीतींतील चांगला भाग घेण्याजोगा आहे तेवढाच संगृहीत केला पाहिजे.

हें हितकर राष्ट्रकार्य आमचे संस्थानिक किंवा राजे जशा रीतीनें पा. शकतील तशा रीतीनें कोणी परके लोक करतील अशी आशा बाळगणें हें निरर्थक आहे. परंतु आमच्या संस्थानिकांपैकीं बहुतेकांची स्थिति कशी आहे याचा विचार केला म्हणजे फार मोठी निराशा होते. राजपुत्रांना राष्ट्रीय शिक्षण म्हणजे कसलें तें ठाऊकच नसतें. राजकन्या व राजस्नुषा यांसदेखील गव्हर्नेस म्हणजे गोरं शिक्षकीण लागते. राजपुत्र तर आम्हीं दुसऱ्या एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें पूर्वीच भविष्यदृष्टीनें नांव दिलेल्या राजकोटांत कोंडलेले असतात. ज्यांची तेथें सोय नसेल त्यांस त्यासारख्याच इतर ठिकाणीं घातलेल्या राजपुत्र-पाठशाळेंत ठेवण्यांत येतें. तेथें सर्व गांठ युरोपीयांशीं म्हणजे साक्षात् आंग्लांशीं किंवा आंग्लांभूत एतद्देशीयांशीं असते. त्या ठिकाणीं मनु, याज्ञवल्क्य किंवा रामायण, महाभारत हीं नांवें कानीं येण्याची मारामारच. इंग्लंडचा इतिहास किंवा कांहीं युरोपच्या इतिहासांतील ठळक माहिती व इंग्रजांच्या कल्याणाचें अर्थशास्त्र हा उदार शिक्षणाचा मुख्य भाग असणार. हिंदुस्थानच्या इतिहासाची सामान्य जनाच्या हायस्कुलांत जी रड तीच तेथें असावयाची. क्लाइव्ह, कूट, लेक व वेल्सली पुढें शिवाजी, बाजीराव, धनाजी, माधवरावांच्या नांवांस थारा मिळणें कठीण. मुत्सद्दीचा तर लुटारू लोकांत अत्यंताभावच ! अशी प्राचीन व अर्वाचीन पूर्वजांची अकटोविकट माहिती असल्यावर मग स्वदेशाभिनाचा उजेड कसा पडेल त्याची कल्पना करण्यास मोठीशी मार्मिकता पाहिजे असें नाहीं. स्वाभिमानाविषयीं पाहिलें तर या राजपुत्रास लहानपणापासून आंग्लांकित राहावें लागल्यानें आमच्या एका विनोदी मित्रानें लिहिल्याप्रमाणें 'साहेबानें नमन वाहिलें कोणि कां तो असेना' हें बाळकडूच त्यास जणूं पाजलें असतें. शिक्षणाची तयारी अशी, तर सभोंवार असणारी मंडळी कशी ? राजा शहाणा झाला तर आमचीं पोटें कशीं भरावीं हें त्यांचें वर्तनतत्त्व. राजपुत्रास शुद्धशील व सुविचारी करावें असें कोणास वाटत नाहीं. भलभलते नाद त्याला लागतील तर त्यांची पोळी पिकेल. अध्ययन-कालांतील अशा तयारीवर वाढलेलीं हीं राजरत्नें सिंहासनारूढ झाल्यावर त्यांना राज्याची जबाबदारी ओळखण्याचा संभव अगदीं नसतो. यामुळें त्यांच्या हातून प्रजेच्या कल्याणाच्या नवीन गोष्टी घडून येणें अशक्यच होतें. याला अपवादभूत असे राजे केव्हां केव्हां दिसतात, त्या वेळीं प्रजेचें नशीब उघडतें. अशा राजास एखादा दिवाण चांगला कार्यकर्ता मिळाला म्हणजे जिकडे तिकडे सर्व कारभार व्यवस्थित चालून पुढच्या काळींसुद्धां सहसा न बिघडणारी घडी बसते. परंतु सर्व राज्यव्यवस्थेचें धोरण अप्पलपोटेपणाचें व बेगुमानीचें असलेलींच उदाहरणें

पुष्कळ. एतद्देशीय संस्थानांतील प्रजेचे हाल पाहून खालसा (ब्रिटिश) मुलखांतील लोकांस आपण सुखी आहों असें वाटावें हा एक संस्थानांच्या अस्तित्वापासून इंग्रज सरकारास फायदा आहे. चांगले शिकलेसवरलेले लोक हीं संस्थानें नाहींशीं होऊन सर्व हिंदुस्थानचा नकाशा रक्तवर्ण होईल तर बरें असें मनापासून म्हणणारे आहेत. धार संस्थानच्या एका अपकृत्याबद्दल लिहितांना केसरीकारांनीं लिहिलें आहे त्याप्रमाणें कित्येक वेळां 'हीं संस्थानें नसतील तर बरें' असे त्वेषाच्या भरांत उद्गार काढणारे तर पुष्कळच आहेत. ज्या गोष्टी ब्रिटिश मुलखांत होण्यास विलंब लागतो त्या संस्थानांत सहज होऊं शकतात. तें कायद्याचें राज्य आहे असें स्थापित करण्यासाठीं कोणत्याहि जुलमाच्या गोष्टीस एक विलक्षण स्वरूप दिलें जातें. त्यायोगें त्या गोष्टी केवळ जुलमाच्या आहेत असें वाटत नाहीं व कायद्याच्या मार्गानें सरकारचें कुमार्गाकडे वळलेलें पाऊल परत फिरविणें शक्य आहे अशी खात्रीहि वाटत असते. हा सर्व प्रकार संस्थानी प्रजेस नसल्यानें तिला स्वैर अंमलाखालीं झुरावें लागतें. घरची अशी बेबंदशाहीची गुलामगिरी सहन करण्याचें त्या प्रजेच्या नशीबीं असून संस्थानाच्या संरक्षक सरकारचें अर्थात् इंग्रज सरकारचें धोरण जेव्हां जुलमाचें झालें असतें त्या वेळीं तिकडचींहि संकटें तिला सोसावीं लागतात. ब्रिटिशांचा मुलुख व संस्थानांचा मुलुख लागून असतात व कित्येक वेळां तर संस्थानांचीं लहान लहान शकलें ब्रिटिश मुलखांत गडप झाल्यासारखीं दिसतात. तेव्हां सर्वांच्या सुरक्षितपणासाठीं चोहोंकडे एक शिस्त असावी म्हणून तेच कायदे लागू करण्यांत येतात. परवांच्या काश्मीरच्या महाराजांच्या सभाप्रतिबंधक कायद्यावर किंवा त्याच्या सुधारून वाढविलेल्या कोल्हापुरांत निघालेल्या आवृत्तीवर नजर दिली, तर ब्रिटिश मुलखांतील जुलमाच्या ज्वाळांनीं तेथील प्रजेपेक्षां संस्थानी प्रजेस अधिकच होरपळून जाण्याचा दुर्धर प्रसंग येतो, हेंहि लक्षांत घेण्याजोगें आहे. सारांश, ब्रिटिश प्रजेच्या हालअपेष्टा व घरच्या हालअपेष्टा अशा दुहेरी कांचणीखालीं संस्थानी प्रजेस किती ताप होतो व अशा स्थितींत त्यांची जीवनयात्रा कशी चालते ह्याची कल्पना इतरांस होणें शक्यच नाहीं.

वर प्रदर्शित केल्याप्रमाणें आमच्यापैकीं कित्येकांचें मत असें आहे कीं, सर्व संस्थानें मोडून खालसा मुलखांत सामील केल्याशिवाय हिंदुस्थानास चांगले दिवस येण्याचीं आशा नाहीं. आमचें मत याच्या उलट आहे. आपणांस स्वराज्य पाहिजे असें म्हणणारांनीं आज आहे त्या स्वराज्याचा नायनाट करण्याची

इच्छा बाळगणें बरें नव्हे. खोकला जाण्यासाठीं कोणी गळा कापून टाकील काय? त्यांत सुधारणा करून आपली कर्तबगारी प्रकट करावी. संस्थानाकडे सर्व खालसा मुलुख आला तरी तो आम्हांस हवा आहे. आम्हांस जें पाहिजे तें खरें स्वराज्य पाहिजे. संस्थानी प्रजा खऱ्या स्वराज्यांत नांदत नाहीं. संस्थानिक लोक आप-आपल्या संस्थानचे अधिपती असतात, ते केवळ नांवाचे असतात. सार्वभौम सरकारास ज्या बाबतींत हात घालावयाची इच्छा नसेल त्या बाबतींतच त्यांचे अधिपतित्व असतें. कोणत्या बाबतींत केव्हां हात घालण्याची इच्छा होईल याचा कांहीं नेम नाहीं. अशामुळें त्यांना व त्यांच्या प्रजेला नेहमीं जीव मुठींत घेऊन वागावें लागतें. तेवढ्या बाबतींत 'जो हुकूम' म्हणून वागणाऱ्या संस्थानिकास आपल्या मर्यादित राज्याच्या टापूंत बहुतेक नंगानाच घालण्यास पूर्ण मुभा असते. प्रजेच्या गाऱ्हाण्यांची दाद लागण्याचा संभव राजाच्या चांगुलपणावर असतो. आपण होऊन कोठें काय न्यून आहे त्याचा विचार करणारे थोडे. त्यांच्यापुढें आलेल्या कामांचा सरळ व निरभिलाषपणें निकाल करणारे राजेहि दुर्मिळ आहेत. त्यांच्या सभोंवार असलेल्या लोकांस आपला मतलब साधावयाचा असतो आणि त्या तंत्रानें राजाची वाटेल तशी समजूत करून देण्यांत त्यांच्याकडून कधीं कसूर होत नाहीं. स्वतः राजासच अपहारबुद्धि निर्माण झाली तर त्याचा हात धरणारा कोणी नसतो. अशा रीतीनें हरएक बाबतींत मुलकी, दिवाणी, फौजदारी, शिक्षण व व्यापार या सर्व बाबतींत सरळ न्याय न मिळाल्यामुळें सर्व तऱ्हांनीं नागवणूक चालली आहे. परदेशी राज्यकर्ते आपल्या संचयांतील थोडासासुद्धां पैसा खऱ्या उपयुक्त कारणास लावीत नाहींत; मात्र तशांतूनहि काय हित होईल त्याच्या आड येणें त्यांना शक्य नसतें. स्वदेशी राजे लोक चाली-रीतींचीं, सर्व राज्यकारभाराचीं बाह्य स्वरूपें तेवढीं सार्वभौम सरकाराची नक्कल करून दाखवितात, परंतु आंतला प्राण दोहोंकडेहि नाहीं. कारण त्याला लोकांच्या इच्छा व अपेक्षा यांकडे लक्ष पुरविणारे राज्यचालक लागतात.

सार्वभौम सरकारची अरेरावी व पंक्तिप्रपंच नुसता सामान्य लोकांसच लागू आहे असें नाहीं. संस्थानिक व राजेरजवाडे यांजवर आलेल्या अनेक प्रसंगांवरून त्यांची बाधा सर्वांसच होते याविषयीं कांहीं शंका उरली नाहीं. त्यांची आपल्या प्रजेशीं वागणूक उत्तम असली व त्यांचें शीलहि एकंदरीनें सर्वांनीं अभिमान बाळगण्याजोगें असलें म्हणजे संस्थानी प्रजेंतच काय तमाम भारतवर्षीयांत त्यांच्या-संबंधीं प्रेम व सहानुभूति असणें साहजिक आहे. एखाद्या संस्थानिकासंबंधानें कमिशन बसलें किंवा त्याचे अधिकार कमी केले किंवा त्यास राजीनामा घेऊन

किंवा तसेंच पदच्युत केलें तर जिकडे तिकडे हळहळीचे उद्गार बाहेर पडतात, तसे उद्गार निघण्याचें कारण प्रस्तुत दुःख भोगणाऱ्या व्यक्तींचे गुण नव्हेत तर त्याच्या वडिलांची योग्यता व गादीबद्दल असणारा पूज्यभाव. बडोदें, काश्मीर, झालवाड, इंदूर इत्यादि संस्थानांच्या हकीगती लोकांच्या स्मरणांतून गेलेल्या नाहींत. आमच्या संस्थानांतील विषप्रकरण मानानें चहाच्या पेल्यांतील वादळाप्रमाणेंच समजावयाचें व परमेश्वरकृपेनें त्याचा परिणाम व्हावयास पाहिजे होता तसाच झाला. आपल्या हक्कांची जपणूक हे संस्थानिक व राजेरजवाडे बिलकुल करूं शकत नाहींत याचें कारणहि हेंच. आपल्या दूधभातापलीकडे किंवा व्यसना-पलीकडे यांना फारच थोड्या गोष्टी दिसतात. एखाद्या माणसास संतति होणें न होणें हें अनियत कारणाचें कार्य आहे याबद्दल विचारपूस न करतां दुसऱ्याच राज्यपद्धतींत ढकलणें ही सामान्य गोष्ट नाहीं, पण डलहौसीनें हा धुमाकूळ घातला. हल्लीं हिंदु कुळाचारास धाब्यावर बसवून दत्तक घेतलेल्या मुलास गादीवर बसविण्याचें सोडून देऊन अगोदर गादीवर बसवून मग दत्तकविधान करण्याचें विलक्षण व निष्कारण कृत्य केवळ साम्राज्यसत्तेचें कर्तुमकर्तुं सामर्थ्य प्रकट करण्यासाठींच कीं काय हें इंग्रज राज्य करीत असतें. वाटेल त्या क्षुल्लक किंवा महत्त्वाच्या प्रसंगीं पाहिजे त्याचा पाणउतारा करणें हें तर नित्य कृत्यांपैकीं होऊन बसलें आहे. यामुळें राजे लोकांसहि आपण कोणाच्या घरीं जावें, कोणाचीं आर्जवें करावीं याचा विधिनिषेध राहिला नाहीं. आपला दर्जा आपण राखला पाहिजे ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनींहि नाहीं.

अशा दुःस्थितीचें परिमार्जन करण्यासाठीं सर्व राजे लोकांनीं, संस्था-निकांनीं आपण होऊन एक कायमची परिषद् स्थापन केली असती तर किती बहार झाली असती ! त्यांना सर्व प्रकारें मदत करण्यांत सामान्य जनांपैकीं विद्वन्मान्य व कार्यक्षम स्त्रीपुरुषांस अभिमान वाटला असता. अनायासें सार्वभौम सरकार असे प्रसंग आणून देतें. दरसाल एक सरदारसभा करून त्यांचा एजंट एक व्याख्यान झोडतो हें महाराष्ट्रीयांस माहीत आहेच, परंतु आमची मंडळी जागी होतील असें आज तरी वाटत नाहीं. राजे लोकांची अशी परिषद् असली म्हणजे त्यांतूनच एखादी समिति ( कमिशन ) बसवून वेदोक्तासारख्या प्रकरणांचा निकाल करतां आला असता; राष्ट्राचा औद्योगिक व व्यापारीय उत्कर्ष साधण्यास एकजुटीनें निधि उभारण्यास किंवा देशाच्या निरनिराळ्या भागांत कलाभवनें स्थापण्यास मोठी मदत होईल. या गोष्टीचा श्री. सयाजीराव महाराजांसारख्यांनीं विचार करावा. सर्व धोरण बदलावयाचें आहे. बालपणापासून राजपुत्र-शिक्षणाचें

धोरण निराळें झालें पाहिजे. सर्व राजे एकत्र होतील तर बुद्धिशिक्षण व शारीर शिक्षण उत्तम तऱ्हेनें देतां येईल, पण हें काम सार्वभौम सरकारच्या ताटाखालचीं मांजरें होण्याची हांव सोडल्याशिवाय शक्य नाहीं.

आपली प्रजा राजी ठेवून, तिची सहानुभूति व प्रेम पूर्णपणें साधून त्यायोगें मिळणारें सामर्थ्य साहेबलोकांच्या मायावी मर्जीपासून कधींहि प्राप्त व्हावयाचें नाहीं, हें अगोदर आमच्या सर्व संस्थानिक व राजेरजवाड्यांनीं ओळखलें पाहिजे. खरोखर यांत कठीण कांहीं नाहीं. निम्मी तयारी आयतीच आहे. हिंदु लोकांचा स्वभाव सिंहासनास पूज्य मानण्याचाच आहे. त्यांना पार्लमेंट नको व त्यांना प्रतिनिधि सभा नको. सुखाचें समाधान मिळालें म्हणजे दुवा देण्याचेंच काम आवडतें. आमची राष्ट्रीय राज्यपद्धति म्हणजे अष्टप्रधान पद्धति होय. जबाबदार माणसांनीं आपआपल्या विषयांचें अर्थात् खात्याचें पूर्ण आलोचन व अध्ययन केलेलें असलें म्हणजे त्यांचा सल्ला मान्य करणें एवढें राजाचें काम. सचिवांचा उपदेश हेंच राजाचें ज्ञान, यांतच प्रजेचा मान आहे, तेवढा केला म्हणजे प्रजा राजासाठीं जीव देण्यास तयार असते; परंतु या लेखाच्या प्रारंभीं लिहिलेल्या राष्ट्रीय विचाराचा हा काल नाहीं. इंग्रजी राज्याच्या संपर्कानें प्रत्येकानें राजकीय गोष्टींचा थोडाबहुत विचार केला पाहिजेच असा प्रसंग येऊन ठेपला आहे. साधारण शहरसफाईचें काम करण्यास निवडक मंडळी लोकांनीं निवडून दिली पाहिजेत, म्हणजे ज्या कामासाठीं त्यांची नेमणूक व्हावयाची त्या कामांची प्रत्येकानें माहिती करून घेतली पाहिजे. तूर्त हें शक्य नाहीं म्हणून निवडणुकीचें कार्य कसें होतें, वैमनस्यें कशीं माजतात, गाड्यांची धांवाधांव कशी होते हें सर्वांना माहीत आहे. खुद्द इंग्लंडांत इतक्या दिवसांच्या सरावानें जी गोष्ट शक्य झाली नाहीं ती येथें झाली पाहिजे! पण येथें सार्वत्रिक मोफत सक्तीचें शिक्षण देण्याचें नांव नाहीं. पुढारी लोक म्हणजे अर्थात् आजवरचे सुशिक्षित लोकच नव्हेत काय? त्यांच्यावर तर सार्वभौम सरकारचे राजकार्यधुरंधर मोर्लेसाहेब शत्रुत्वाचा आरोप करतात. त्यांचीच झील ओढून आमच्या राजे लोकांनीं आपल्या राज्यांतील शिक्षित लोकांस चळवळे म्हणावें, त्यांच्या आशीर्वादास शिव्याशाप गणावें, त्यांच्या प्रार्थनांस भलतीं भलतीं नांवें द्यावीं आणि 'अशक्य' जाहीरनामे प्रसिद्ध करावेत काय? यासारखें दुर्दैव व अवनतीचेंच नव्हे तर विनाशाचेंच चिन्ह दुसरें कोणतें असावें. अशा राजे लोकांस उपदेश केला तर तेथें पन्नगपयोन्यायाचाच दाखला येणार किंवा कालिदास म्हणतो त्याप्रमाणें

**स्रजमपि शिरस्यन्धः क्षिप्तां धुनोत्यहिशंकया।**

याच गोष्टीचा अनुभव यावयाचा, पण लोकांनीं सुशिक्षितांच्या साहाय्यानें आपलें कर्तव्य करण्यांत कसूर करूं नये. हरिद्वारपासून रामेश्वरपर्यंत व द्वारके-पासून पुरीपर्यंत हजारों संस्थानें आहेत, त्यांच्या हिताहिताच्या प्रश्नांचा विचार झाला पाहिजे. राष्ट्रीय सभा यास फेटाळून देते, आणि संस्थानिक खुद्द दाद घेत नाहींत, ते स्वत: आपल्या हक्काची पायमल्ली करून घेत आहेत किंवा आपले हक्क दळून त्याची गोड पोळी करून परकीयांस चारीत आहेत. अशा वेळीं सर्व संस्थानी प्रजांनीं नेटानें एखादी संस्थानी परिषद् भरवावी असेंच आम्हांस वाटतें. कार्यास लहानसा प्रारंभ दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानच्या लोकांनीं येत्या गुरु-द्वादशीच्या मुहूर्तावर कां करूं नये हें आम्हांस समजत नाहीं. कांहीं सुशिक्षितांनीं या कार्यास आपल्यास वाहून घेतलें पाहिजे.

केवळ इंग्रज सरकारचा आश्रय व पाठिंबा आहे एवढ्यावरच संस्थानी राजांनीं आपल्या प्रजेचे गळे कापावे असा खुद्द इंग्रजांचाहि मानस असेल असें वाटत नाहीं, पण असेल नाहीं तर नसेल; त्याचा विचार करण्याचा हल्लीं काळ नाहीं. सर्व हिंदुस्थानच मूर्ख व दुर्विचारी संस्थानिकांच्याच ताब्यांत असता तर मात्र त्यांची मस्ती त्यांच्या प्रजेनें जुलूम असह्य झाल्यास जिरविली असती, पण आज हल्लीं इंग्रज सरकारचें आवरण व संरक्षण यांना आहे. त्याचा उपयोग हल्लीं चालला आहे असा न व्हावा असा लंडन टाइम्सच्या १८५३ मधील एका दुष्ट हेतूंनेच लिहिलेल्या महत्त्वाच्या लेखांत स्पष्ट आहे. तो लेख टीपेंत मुद्दाम देत आहों.* संस्थानी प्रजा खरोखर आपलीच प्रजा आहे असें त्यांत म्हटलें आहे. आपली आपण राज्यक्रांतिद्वारां दाद लावून घेण्याची त्यांची मोकळीक हिरावून घेतल्यामुळें संस्थानी प्रजेचें संरक्षण करण्याचा बोजा आपणांवर आहे असें त्यांत म्हटलें आहे. ही जबाबदारी आज इंग्रज ओळखीत नाहींत. आत्मैव ह्यात्मनो बंधु: ।

• • •

---

येथें लेखकानें लंडन टाइम्स दि. ९–२–१८५३ च्या अंकांतील एका महत्त्वाच्या लेखांतील उतारा उद्धृत करून त्यावर थोडक्यांत समीक्षणात्मक टीप लिहिली आहे. आतां तो उतारा तसाच उद्धृत करण्यांत स्वारस्य न वाटल्यामुळें गाळण्यांत आला आहे.

# ७. मोर्ले साहेबांचें भाषण आणि त्यांच्या राजवटीबद्दल तीव्र संताप

[ 'विश्ववृत्त ' जुलई १९०७ ]

**" आर्यमाते, आम्ही तुझे मुलगे शोभतों काय ? "**

मोर्लेसाहेबांचें भाषण होऊन आज बरेच दिवस झाले आहेत. तेव्हां त्यांतील एकदोन गोष्टींसंबंधानें शांतपणें विचार करण्यास आतां हरकत नाहीं. त्यांच्या भाषणानें कांहीं चातकांची निराशा झाली आहे व कांहीं थोड्यांमध्यें आशेचा थोडासा अंकुर उत्पन्न झाला आहे. मोर्लेसाहेबांनीं मोठ्या उदार ( ? ) अंतःकरणानें राज्यांत तीन सुधारणा करण्याचें योजिलें आहे. बड्याबड्या लोकांचें एक मंडळ ( Council of notables, not-ables ? ) नेमलें आहे. ह्या मंडळानें सरकारच्या कृत्याविषयीं लोकमत कळवावयाचें व सरकारच्या हेतूंविषयीं लोकांमध्यें माहिती द्यावयाची. परंतु ( अ ) ह्या सरकारनें निवडलेल्या लोकांस लोकांचे प्रतिनिधि कसें म्हणतां येईल व त्यांनीं कळविलेलें मत हें लोकमत कसें होईल हें आम्हांस समजत नाहीं. हे 'बडे' लोक म्हणजे सरकारच्या मर्जीवर ज्यांचें जीवित अवलंबून आहे असे राजेरजवाडे किंवा अन्य तऱ्हेनें जे सरकारचे मिंधे असतात, हेच लोक होत अशी अटकळ करण्यास आम्हांस दिक्कत वाटत नाहीं. अशा लोकांचें मंडळ असलें काय व नसलें काय, लोकांना सारखेंच. शिवाय ( ब ) ह्या मंडळाला जर अधिकार कोणताच नसेल, तर ह्यांच्या उपदेशाला भीक कोण घालणार ? पण नव्हे, त्यांना अधिकार नाहीं हें म्हणणें चुकीचें होईल. त्यांना नुसता उपदेश करण्याचा अधिकार नाहीं काय ? मोर्लेसाहेबांनीं उदार अंतःकरणानें हा अधिकार आम्हांस दिला याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच ! ( क ) आतां ह्या मंडळानें सरकारच्या हेतूसंबंधानें लोकांच्या मनांतील गैरसमज दूर करणें हें या मंडळाचें दुसरें एक कर्तव्य आहे. परंतु ह्या मंडळाला तरी सरकारचे खरे खरे हेतू कळतील असें आम्हांस वाटत नाहीं. सरकारचे अंतस्थ हेतू हे मुख्य मुख्य अंमलदारांखेरीज इतर लोकांना सांगण्याइतकें सरकार वेडें नाहीं. व्हाइसरॉयच्या कौन्सिलमधीलहि हिंदी प्रतिनिधींना अंतस्थ हेतु कळत नाहींत. फार काय, कित्येक वेळां विलायतेंतील इंडिया कौन्सिलच्या युरोपियन अधिकाऱ्यांनाहि

सरकारचे अंतस्थ हेतू कळत नाहींत. अशी जर वस्तुस्थिति आहे, ह्या कौन्सिल-मधील लोकांनाच जर सरकारचे हेतू कळत नाहींत, तर हे लोक इतर लोकांचे गैरसमज दूर कसे करणार ? हा सर्व प्रकार म्हणजे आंधळ्यानें आंधळ्यास वाट दाखविण्यासारखें आहे. असल्या या फार्सापासून जनसमूहाला फायदा कांहीं नाहींच, पण कदाचित् मानासाठीं हपापलेल्या कांहीं लोकांना ह्या फार्सांत काम करण्यास संधि सांपडेल एवढी मात्र एका अर्थी समाधानाची गोष्ट आहे.

मोर्लेसाहेबांनीं सुचविलेली दुसरी सुधारणाहि असल्याच प्रकारची आहे. गव्हर्नरच्या किंवा व्हाइसरॉयच्या कौन्सिमध्यें एक दोन जागा जास्त मिळण्याचा लवकरच संभव आहे, असें त्यांच्या वचनावरून दिसतें. परंतु जोंपर्यंत हिंदी मेंबरांचें कौन्सिलमधील भाषण अरण्यरुदिताप्रमाणेंच होतें, तोंपर्यंत अरण्यरुदन करणारे चार असले काय किंवा पांच असले काय, विशेष फरक कांहींच नाहीं. हिंदी लोकांचें ज्या वेळेस बहुमत होईल त्या वेळेसच कौन्सिलमध्यें कांहींतरी सुधा-रणा झाली असें म्हणतां येईल. तोंपर्यंत आमचे हिंदी मेंबर म्हणजे एका सुभा-षितांत म्हटल्याप्रमाणें 'फाल्गुने बालका इव' आहेत असें आम्हांस वाटतें. आमच्या हिंदी गृहस्थांना ज्या वेळेस अंमलबजावणी खात्यांतील मुख्य मुख्य जागा मिळतील व ज्या वेळेस आमच्या हिंदी मेंबरांचें बहुमत होईल त्या वेळेसच आमचें समाधान होईल. असल्या लहानसहान भूल पाडणाऱ्या भाकरीच्या तुकड्यानें आमचें समाधान कधींहि व्हावयाचें नाहीं.

मोर्लेसाहेबांची तिसरी सुधारणाहि ह्याच तऱ्हेची आहे. लंडनमधील 'इंडिआ कौन्सिल' मध्यें एखादद्दुसरा हिंदी मेंबर पुढेंमागें होईल अशी आशा मोर्लेसाहेबांनीं लावली आहे. ही आशा सफल होईल तेव्हां होवो. परंतु सध्यां आम्हांला एवढें म्हणून ठेवलें पाहिजे कीं, इंडिया कौन्सिलमधील हिंदी मनुष्यावर हिंदुस्थान सरकार किती विश्वास ठेवील, त्याला सरकारी धोरणाविषयीं कितपत माहिती देईल, गुप्त गुप्त बातम्या त्याला सरकारकडून कितपत कळतील, ह्या गोष्टींबद्दल आमचें मत फार साशंक आहे. बाकी इंडिया कौन्सिलमध्यें हिंदी मनुष्य एखाद-दुसरा गेल्यास 'अकरणान्मंदकरणं श्रेयः' या न्यायानें आम्हांला इष्टच आहे. परंतु या योगानें म्हणजे आमचें कांहीं समाधान होईल असें मात्र कदापि शक्य नाहीं.

आमचें समाधान अशा भाकरीच्या तुकड्यांनीं होणार नाहीं हें सांगितलें. मग आम्हांस हवें काय ? व मोर्लेसाहेबांनीं त्या अंतिमसाध्य वस्तूंसंबंधानें काय म्हटलें आहे ? आम्हांला आमचा राज्यकारभार आमच्या हातीं हवा, आमच्यावर

आमच्या हिंदी लोकांच्या बहुमतानें कर बसले जावेत, आमचें सैन्य आमच्या ताब्यांत पाहिजे इ. इ. गोष्टी आम्ही मागत आहों. त्या आजच द्या असें आम्ही म्हणत नाहीं व आजच हे हक्क आम्हांस मिळतील असें आम्हांस वाटत नाहीं; परंतु आज त्या दिशेनें मोर्लेसाहेबांस पुष्कळ सुधारणा करतां आल्या असत्या, पण त्यांनीं तसें न करतां उलट 'तुमचें साध्य असाध्य आहे' व तुमच्याच हिताकरितां इंग्लिश अधिकाऱ्याच्या हातांत पूर्ण व अप्रतिबन्ध सत्ता असली पाहिजे असें ते म्हणतात. फार काय, पण हिंदुस्थानांतील लोकांना कधीं प्रजा-सत्ताक राज्य मिळेल अशी त्यांना कल्पनासुद्धां होत नाहीं. हिंदुस्थाननें नेहमीं अशृंखल अशा इंग्लिश अधिकाऱ्याच्या पूर्ण सत्तेखालीं राहिलें पाहिजे असें ते म्हणतात, व त्यांना भाषणस्वातंत्र्य किंवा लेखनस्वातंत्र्य देणें श्रेयस्कर आहे किंवा कसें याविषयीं ते साशंक आहेत. वाहवा मोर्लेसाहेब! आपल्यासारख्या 'लिबरल' माणसाच्या तोंडांतून असले शब्द यावेत ना! पूर्वी प्लेटोला वाटलें होतें कीं 'Philosopher-King' म्हणजे 'राजर्षि' ह्याला मुख्य सत्ता मिळाल्याशिवाय कोणत्याहि देशाची सुधारणा व्हावयाची नाहीं. मोर्लेसाहेब प्रसिद्ध तत्त्ववेत्ते आहेत व ते आजकाल हिंदुस्थानचे राजे आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण प्लेटोला बिचाऱ्याला काय कल्पना कीं मोर्लेसाहेबांसारख्या लिबरल तत्त्ववेत्त्याच्या हातांत राजसत्ता असतां सुधारणा न होतां हिंदुस्थानची पीछेहाटच होणार आहे! खरोखर, मोर्लेसाहेबांच्या भाषणानें त्यांच्या इतक्या दिवसांच्या कीर्तीला काळिमा आणला आहे. मोर्लेसाहेबांसारख्या सुंदर व कल्पक लेखकाला व वक्त्याला हिंदुस्थानला कधीं काळीं स्वतःचें राज्य चालवितां येईल अशी कल्पनासुद्धां करतां येत नाहीं ना? मोर्लेसाहेबांनीं अधिकाऱ्यांच्या सांगणी-वरून व अनुभवामुळें जरी कांहीं कृत्यें केलीं असतीं तर आम्हीं त्यांना फार दोष दिला नसता, परंतु ह्या कृत्याचें समर्थन करतांना आपल्या लौकिकास, आपल्या तत्त्वज्ञानास न साजणारीं विधानें त्यांनीं केलेलीं पाहून त्यांच्याविषयीं आम्हांस कींव येते. हिंदुस्थानविषयीं त्यांना पूर्ण माहिती नसल्यामुळें इंग्लिश वरिष्ठ अधिकाऱ्यांवर त्यांनीं विश्वास ठेवून त्यांच्या सांगण्याप्रमाणें करावें यांत त्यांचा फारसा दोष नाहीं. उघडच आहे कीं, राज्यकारभारामध्यें प्रत्यक्ष पूर्ण ज्ञानाच्या अभावीं मुख्य मुख्य अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवल्याशिवाय गत्यंतर नसतें. मोर्ले-साहेबांनींच एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, राजकारणांत पुष्कळ वेळां 'एकीकडे आड व एकीकडे विहीर' अशी स्थिति येऊन एक कांहींतरी पत्करणें भाग पडतें. (In politics, we have often to choose between two blunders.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम ८५५.८५ वि: निबंध
... २०२२ ... २०13/०7


तशीच स्थिति मोर्लेसाहेबांची झाली. एकीकडे अँग्लोइंडियन लोकांची 'काव काव' ओरड व एकीकडे आपल्या मनाची उदार प्रवृत्ति, पण अँग्लो इंडियन लोकांना हिंदुस्थानचा अनुभव व स्वतःला तर कांहींच अनुभव नाहीं. तेव्हां स्वतःच्या उदारप्रवृत्तीस स्वैर आचरण करून द्यावें किंवा अँग्लोईंडियन लोकांच्या कावकावीकडे लक्ष द्यावें या दोहोंपैकीं त्यांनीं दुसरें पत्करलें ह्याबद्दल त्यांना फार दोष देतां येणार नाहीं. परंतु कारण नसतांना भलभलतीं विधानें करून हिंदी लोकांचा अपमान करणें, त्यांना चीड आणणें हें मात्र अगदीं गैर झालें असें आम्हांस म्हणावें लागतें. यामुळें त्यांच्या मुत्सद्दीपणाची तर किंमत झालीच व शिवाय इतक्या दिवसांच्या त्यांच्या लौकिकालासुद्धां हिंदुस्थानांत हरताळ लागला आहे.

पण मोर्लेसाहेबांच्या कीर्तीबद्दल किंवा त्यांच्या मुत्सद्दीपणाबद्दल आपणांस विशेषसें कर्तव्य नाहीं. त्यांनीं इंग्लिश अधिकाऱ्यांचें म्हणणें खरें मानून त्याप्रमाणें वागावें हें मानवी स्वभावास अनुसरूनच आहे हें म्हटलें पाहिजे. परंतु आपण मात्र मानवी स्वभावाच्या विरुद्ध आचरण करीत आहों. आपल्या लाला लजपतरायसारख्या उदार व स्वाभिमानी देशभक्ताला सरकारनें हद्दपार करावें, आपल्याला दुःख प्रदर्शित करण्याससुद्धां सरकारनें सभासुद्धां भरवूं देऊं नये, ही गोष्ट डोळ्यांदेखत आपण पाहत असूनसुद्धां आपण कांहीं करीत नाहीं, नुसते आकाशाकडे बोट दाखवून 'दैव दैव' म्हणत बसतों, यापरतें दुःखास्पद काय आहे ? क्षणोक्षणीं अपमान होत असतांनासुद्धां पावलोपावलीं लाथा बसत असतांनासुद्धां आपण जिवंत राहावें तेव्हां आपल्या शक्तीची तारीफ करावी तेवढी थोडीच ! दारिद्र्याच्या दुःखाला दुष्काळांतील हाल, मानखंडनेच्या वेदना, ह्यांनींसुद्धां आमचें हृदय फुटत नाहीं. तेव्हां आमचें हृदय दगडापेक्षांहि कठीण व जोरदार आहे यांत शंका नाहीं ? असल्या डोंगराखालीं इतर देशांतील लोकांनीं जिवापाड धडपड करून डोंगर तरी पालथा पाडला असता किंवा ते मेले तरी असते. पण आम्ही हिंदु लोक फार खंबीर. आर्यभूमाते, आम्हीं तुझे मुलगे शोभतों काय ? तुझे हाल, तुझी मानहानि डोळ्यांदेखत पाहत असून षंढासारखे नुसते मोर्लेला नाहीं तर कर्झनला शिव्या देतों हें पाहून आपले पूर्वज आर्य लोक आम्हांला काय म्हणत असतील ! दुःख भोगण्याचा प्रसंग येणें किंवा अपमान होणें हें दैवाच्या हातीं आहे. पण दुःख व अपमान होत असतांनासुद्धां जगणें हें फक्त आम्हां हिंदूंच्याच हातीं आहे ! खरोखर, आमच्या मतें मानखंडना होण्यानें दुःख होत नाहीं, पण तिचा प्रतिकार करण्याची शक्ति नसणें किंवा शक्ति असून त्या रीतीनें आचरण करण्याचें निश्चयाचें बल नसणें हें मात्र दुःखास्पद खरें; आणि या दुःखापेक्षां अधिक दुःख कशापासून आहे ?

• • •

# ८. हें धर्मयुद्ध नव्हे !

[ ' विश्ववृत्त ', सप्टेंबर १९०७ ]

ऑगस्ट महिन्याची ३१ तारीख आली व गेली, तरी येत्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानीं कोणाचीच योजना झाली नाहीं. रा. टिळक यांचीच सालमजकुरीं निवडणूक व्हावी अशी आमची इच्छा आहे. आमचें मत असें कां झालें आहे याचीं कारणें सविस्तरपणें आम्हीं दोन लेखांत दिलीं आहेत. नेमस्त म्हणून म्हणतात त्या पक्षास रा. टिळकांच्या अध्यक्षतेखालीं काम करणें नको. त्यांचीं दुसरीं कितीजरी कारणें असलीं आणि व्यक्तिव्यक्तीसंबंधाचा विचार केला म्हणजे तीं कितीहि खरीं किंवा योग्यहि असलीं, तरी सर्वांत मुख्य कारण आहे तें हें कीं, सरकारास जर एक माणूस अगदीं नको असेल तर तो हा केसरीकार टिळक. सरकारच्या विरुद्ध आम्ही किती जरी बोललों आणि स्वराज्याशिवाय आमचें समाधान होणार नाहीं, सरकारनें किती चांगलें राज्य केलें तरी तें आम्हांला नको, आम्हांस आमचें राज्य पाहिजे असें प्रतिपादीत असलों तरी सरकारला आम्ही चिडविणें बरोबर नाहीं. आम्ही जें म्हणतों तेंच म्हणणें जरी रा. टिळकांचें आहे तरी त्यांचें नांव सरकारला नको तर आमच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाच्या खुर्चीला तरी कशाला ? लाल, पाल, बाल यांची लोकहि सांगड घालतात मग त्या तिघांत कांहीं फरक असला आणि रा. टिळक आमच्याप्रमाणें साम्राज्यांतर्गत स्वराजपक्षीय असेल, ( खरोखर पाहतां लाल काय किंवा पाल काय याच मताचे आहेत; फक्त प्रयत्नाच्या दिशेंत व भाषणाच्या रोखांत थोडेंबहुत अंतर आहे. ) तरी सरकारच्या व आमच्यापैकीं बऱ्याच लोकांच्या पोटांतील मळमळ जात नाहीं. यासाठीं असल्या प्रकरणाची अध्यक्षस्थानास शिवाशिव कशाला असावी ? रा. टिळकांना अध्यक्षस्थानीं बसविण्यापूर्वी प्रायश्चित्तहोम होऊन सर्व संसर्गदोष नाहींसा झाला पाहिजे, अशा प्रकारचे विचार नेमस्त मंडळाच्या डोक्यांत घोळत आहेत व त्यामुळें रा. टिळक नको, मग दुसरा कोणी का अध्यक्ष होईना त्यांची हरकत नाहीं. जुन्या पक्षाच्या मनाची स्थिति अशी कीं नवा जहाल पक्ष राजकीय चळवळीचें तारूं खडकावर आपटील आणि नव्या पक्षाच्या मनाची स्थिति अशी कीं, जुन्या पक्षाच्या रीतीनें काम करण्याचे दिवस गेले, आतां

अधिक जोम पाहिजे. दोघांच्याहि मनांत राष्ट्रहित व्हावें अशी खरी इच्छा आहे आणि म्हणूनच दोघांनीं मिळून राष्ट्रीय सभेच्या कामास सारखेंच झटलें पाहिजे. अध्यक्ष म्हणजे राष्ट्रीय सभा असा कांहीं भाग नव्हे. नागपुरास सभा बोलाविली कोणीं हा प्रश्न गौण आहे. जुन्या पक्षास ती पाहिजे आहे व नव्या पक्षास आपल्या गांवांत तिची बैठक होऊं नये असा भाग थोडाच आहे? चालू सालीं काम आणीबाणीवर येऊन बेतलें आहे. अत्यंत मवाळांचाहि मवाळपणा मावळला आहे. रा. गोखले काय व रा. टिळक काय सगळे एका माळेचे मणी आहेत असें सर्व इंग्रज ओळखूं लागले आहेत. फर्ग्यूसन कॉलेजसारख्या संस्था सरकारांनीं दिलेले अवमानकारक व जुलमी हुकूम मान्य करण्यास तयार नाहींत. त्यांत गुरुवर्य डॉ. भांडारकरांसारखे जुन्या पक्षाचे कट्टे अभिमानी आहेत, त्यांनासुद्धां सरकारशीं मऊपणानें वागून उपयोगी नाहीं, घासून घ्यावें पण हसून घेऊं नये किंवा मोडलें तरी बेहेत्तर पण वांकणें चांगलें नाहीं, अशी आपण आतां प्रवृत्ति ठेवावी जसें वाटूं लागलें असलें तर प्रजापक्षानें बराच पल्ला जिंकला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या सर्व मंडळींचें ( आणि गुरुवर्यांची आम्हांस विशेष माहिती असल्यामुळें आम्ही त्यांच्याविषयीं अधिकारानें आजवर लिहीत आलों आहों ) अंतःकरण इतर कोणत्याहि देशभक्ताइतकेंच स्वदेशाभिमानपरिपूर्ण आहे, परंतु आपल्या लोकांत खरी कळकळ व खरी स्वार्थत्यागबुद्धि आल्याशिवाय कांहीं होणें शक्य नाहीं असें वाटून आपली तयारी अगोदर करा आणि मग कोणतेंहि राजकारण करण्यास कंबरा बांधा असें ते सांगत आले आहेत; नुसती तोंडाची वाफ दवडूं नका. हल्लींची चळवळ पाहून त्यांनादेखील कांहीं आशांकुर दिसत असला पाहिजे. संथपणानें काम केल्यास देवदयेनें बरे दिवस येतील असा दृढविश्वास नेमस्तांच्या मनांतहि उत्पन्न झाला आहे. मि. मोर्लेपासून तों तहत क्षुल्लक इंग्रज अंमलदार आपल्या वाणीनें व कृतीनें सर्व नेमस्तांना जहालांच्या कंपूंत ढकलीत आहेत, हा रोख ओळखून नागपूर येथील नव्या पक्षाच्या मंडळींनीं आपला एक हेतु सिद्धीस गेला नाहीं म्हणून राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या कामास तनमनधन अर्पण करण्यापासून परावृत्त होणें हें अगदीं कोत्या दृष्टीचें आहे. आपला पक्ष संख्येनें अधिक आहे हें सिद्ध करणें सोपें आहे व द्रव्यसामर्थ्याच्या कसानें पाहतां तीनचतुर्थांश मतें मिळवून मताधिक्य करणें शक्य नसलें, तरी राष्ट्रांतील खऱ्या जोमाचा व पुढें कार्य करून दाखविणारा भाग आपल्या पक्षाला आहे हें त्यांनीं स्पष्ट दाखविणें जरूर आहे. अध्यक्षाच्या निवडणुकींत जरी मताधिक्याचें प्रमाण तीनचतुर्थांशाचें आहे तरी

इतर हरएक गोष्टी त्यांच्या इच्छेप्रमाणें होण्यास कोणाचीच हरकत नाहीं हें नव्या पक्षास कळलें पाहिजे. या वर्षीं पुढें पडलेलें पाऊल पुढच्या वर्षांच्या प्रगतीस उपयोगी पडेल. अध्यक्षाच्या निवडणुकीच्या कामीं होणाऱ्या झटापटींत नेमस्तांचें काम सोपें होतें. त्यांत त्यांच्याकडे फक्त बचावाचें काम होतें. हल्ल्याचें काम नव्या पक्षाचें असल्यानें त्यास अधिक बळ व दळ दाखविण्याची जरूरी होती. या कामीं वर दर्शविल्याप्रमाणें द्रव्यदृष्ट्या जरी त्यांचा पराजय झाला, तरी 'मारतां मारतां मरावें' हें ब्रीद सोडणें त्यांना शोभत नाहीं. नुसतें एखाद्यानें एखाद्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केल्यानें सर्व देशास त्यांच्या दळभाराची कल्पना होणें शक्य नाहीं. समरांगणीं अवघे २६ वीर आले इतकेंच लोकांना दिसलें. त्यांच्या मागें १,८०० आहेत एवढें बोलण्यानें कार्य होत नसतें. १,८०० मतें मिळविण्यास कांहीं कमी खटपट पडली नसेल. कांहीं एक विशिष्ट हेतु पुढें ठेवून इतका पैसा गोळा करण्याइतकी तयारी नव्या पक्षाची झाली आहे हें पुढें येणें जरूर होतें. जुन्या पक्षाचें काम सोपें असलें तरी तें तसें आहे हें उघड उघड दिसत असल्यामुळें निव्वळ कायदेशीर जय त्यांचा झाला तरी नैतिक जय नव्या पक्षाचाच झाला असें सर्व देशास वाटलें असतें, या दृष्टीनें पाहतां आपलें सर्व मतदारांचें सैन्य समरांगणीं न आणण्यांत नव्या पक्षानें चूक केली असें म्हणणें भाग आहे. 'युद्धे चाप्यपलायनम्' हें ब्रीद सोडणें नीट नाहीं. पराजय निश्चित असल्यावर उगीच प्राणहानि कां करून घ्यावी हें म्हणणें वीरांचें नव्हे. प्रस्तुत प्रसंगीं मतवाल्यांचीच सभा झाली असती तर नव्या पक्षाचा विजयध्वजच फडकला असता असें आम्हांस वाटतें. सभास्थानीं १,८०० समंजस नव्या पक्षाची मंडळी पाहून जुन्या पक्षांतील वृद्ध, अनुभविक व विवेकशील अशा लोकांचे डोळे अश्रुपूर्ण होऊन आपण या सर्व लोकांवर केवळ सरकारच्या कृपेनें मिळविलेल्या पैशाच्या जोरावर जय मिळवून त्यांचा मनोभंग करीत आहों, याबद्दल उपरती झाल्याशिवाय राहिली नसती. असला जय मिळविण्यांत त्यांना पुरुषार्थ वाटला नसता अशी आमची मनोदेवता आम्हांस सांगते. जुन्या पक्षांतील लोक, आपण पिकलेलीं पानें आहोंत, खरी कर्तबगारी दाखविणारी मंडळी निराळी व ती आपल्यापुढें कर्तबगारी दाखवून उभी आहेत, असें पाहून त्यांच्या मनाची प्रवृत्ति कांहीं निराळीच झाली असती. स्वार्थसाधु राज्यकर्त्यांसारखीं या वृद्धमंडळींचीं अंतःकरणें नव्हत. तरुण हिंदुस्थान आपआपल्या मोठ्या कष्टानें मिळविलेल्या व प्रेमानें अर्पिलेल्या २५ रुपयांच्या तिकिटासह समोर उभें असतां केवळ आपला हेका चालवावा असें त्यांना वाटलें

नसतें. राष्ट्रीय सभेचा खर्च चालविण्याचा एवढा बोजा उचलण्याच्या कामीं पुढील तीन महिन्यांत ज्यांची मदत दरघडीस आपणांस लागेल त्या तरुणांस आपण आतां दुखवूं नये, असें त्यांस वाटलें असतें. इतक्यांतूनहि कायदेशीर जय त्यांनीं मिळविला असता तरी सर्व राष्ट्रांनीं नागपूरकर नव्या पक्षाची तारीफच केली असती आणि असला द्रव्यजय मिळविल्याबद्दल जुन्या पक्षाबद्दल आदरबुद्धि वाटली नसती. हल्लीं मात्र त्या पक्षास आपलें औदार्य प्रकट करण्याची एक संधि नव्या पक्षानें दिली. कायदेशीर रीत्या आपणांस वाटेल तो अध्यक्ष नेमण्याची संधि आली असतां आपण केवळ मताधिक्याच्या जोरावर हें काम निकालांत आणूं इच्छीत नाहीं, असें जाहीर करण्यानें त्यांनीं आपल्याविषयीं लोकांत पूज्यभाव उत्पन्न करून घेतला आहे. पुण्यास १८९५ सालीं कै. नाम. न्यायमूर्तींनीं बहुमत आपल्या बाजूनें असतां सामाजिक परिषद् निराळ्या मंडपांत भरवून मनाचा दिलदारपणा दाखविला तसा आज नागपूरकर जुन्या पक्षानें दाखविला आहे. हाच दिलदारपणा आपल्या विरुद्ध मतसंख्या पाहून दाखविला असता असें आम्हांस वाटतें आणि बाहेरच्या सर्व लोकांसहि केवळ कायदेशीर जय मिळावा म्हणून बहुमताविरुद्ध अभिप्राय देणें जड गेलें असतें. जुन्या पक्षाच्या मंडळीची यादी वाचून पाहतां त्यांत स्वतः विचार करण्यास समर्थ किती आहेत व नव्या पक्षाच्या यादींत स्वतंत्र मत बनवितां येण्याइतके लोक किती आहेत ह्या गोष्टीचा त्यांनीं विचार केला असतां, २०० रुपये देणाऱ्या एकट्या माणसानें ८ मतें मिळविलीं म्हणजे २५ रुपये देणाऱ्या स्वतंत्र ८ मतांइतकीच त्यांची योग्यता नाहीं हें तत्त्व कोणासहि कळण्याजोगें आहे. परंतु बाहेरच्या लोकांस आज तसें कांहीं मत देतां येत नाहीं. नव्या पक्षानें खरोखर मतें व द्रव्य यांचें बल मिळविलें आहे कीं नाहीं व किती मिळविलें आहे हें कळण्याचा सीधा मार्ग उरला नाहीं. आतां जुन्या पक्षाचें म्हणणें इतर ठिकाणच्या मंडळीस निव्वळ सभ्याचारास अनुसरून मान्य करणें भाग पडेल. राष्ट्रीय सभा मुख्य कीं अध्यक्षांची निवडणूक मुख्य हा प्रश्न एखादें मूल सोडवील. आतां तर नागपूरच्या नव्या पक्षानें जमविलेले पैसे मागें ठेवले असले तर राष्ट्रीय सभेच्या कार्यापेक्षां अध्यक्षाच्या निवडणुकीचा प्रश्न त्यांस अधिक महत्त्वाचा वाटतो, किंबहुना त्यापुढें राष्ट्रीय सभेचें काम कांहीं नाहीं असेंच वाटतें असें होणार आहे. अशी बुद्धि चांगली नाहीं. दुसरी गोष्टहि लक्षांत घेण्याजोगी आहे. अशा जाहीर रीतीनें आपण पैसे मागें ठेवल्यावर या लोकांस राष्ट्रीय सभेंत येण्यास तोंड राहात नाहीं. कायदेशीर अटकाव बिलकुल नाहीं, परंतु येथें येऊन

आपल्या मताचा विजय व्हावा अशाबद्दल खटपट करण्याचा उजू मार्ग राहात नाहीं. नागपुरांत भरलेल्या सभेच्या खर्चासाठीं पैशाची मदत न करतां त्यांनीं आयत्या वेळीं बाहेरच्या लोकांप्रमाणें उपभोगास यावें यांत शोभा कोणाची ? असे अनेक प्रश्न या नव्या पक्षाच्या वर्तनानें उद्भवले आहेत. ज्या संस्थेची सुधारणा व्हावी असें आपणांस वाटतें त्या संस्थेच्या अस्तित्वासाठीं, इभ्रतीसाठीं झटणें व त्यांत मिळूनमिसळून नेकीनें नियमानुसार काम चालविणें हाच खरा हिताचा मार्ग आहे. ही विचारसरणी ज्यांस मान्य असेल त्यांस नागपूरच्या नव्या पक्षानें पुढें न येण्यांत एक प्रकारें दौर्बल्य दाखविलें असेंच वाटेल. या पापाची निष्कृति जमविलेला पैसा दुसऱ्या कोणत्याहि चांगल्या कार्यास अर्पिल्यानें होईल असें आम्हांस वाटत नाहीं. विरुद्ध पक्षानें मिळविलेला जय द्रव्यजय आहे, मतजय नव्हे असें दाखविण्याची सोन्यासारखी संधि गमाविली असेंच आम्ही मोठ्या खेदानें म्हणतों, व आम्हांला ते पुनः लाभले आहेत ह्याबद्दल ईश्वराचें आभारपूर्वक स्मरण करणें व त्याच्यावरच भाव ठेवून अंगीकृत कार्य करीत राहणें हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे, हें सांगून हा लेख पुरा करतों.

• • •

# ९. राष्ट्रीय सभेचें स्थलान्तर

[ 'विश्ववृत्त', नोव्हेंबर १९०७ ]

आजकाल आपल्या राष्ट्रास जर एका गोष्टीची अत्यंत जरूर असेल तर ती गोष्ट जूट ही होय. मतमतांतरांची व पक्ष-भेदाची आवश्यकता आहे, त्यायोगें सर्व बाजूंनीं एखाद्या विषयाची चर्चा होते, सर्व लोकांच्या हिताहिताचा विचार होतो, असें आपण ग्रंथांतरीं वाचतों, परंतु प्रत्येक बाबींत व प्रत्येक प्रसंगीं असा मतभेद आवश्यक आहे असें प्रतिपादन करणें वेडेंपणाचें आहे. हिंदुस्थान देशास प्राप्त झालेल्या सर्वतोपरी दैन्यावस्थेनें त्यांच्यामध्यें ऐक्य झालें नाहीं व होण्याचीं चिन्हें अद्यापि स्पष्ट दिसत नाहींत हें पाहून आमच्या वैऱ्यांस आनंद व्हावा यांत नवल नाहीं. सुशिक्षित लोकांस जे शत्रु समजतात त्या राज्यकर्त्यांस तर आनंदाची उकळी फुटावी अशा प्रकारचें वर्तन आम्हांकडून चालू महिन्यांत झालें आहे, असें मोठ्या शरमेनें कबूल करण्याचें आमच्या नशीबीं आलें आहे. २३ वर्षांत जी गोष्ट घडली नाहीं ती आमच्या राजकीय चळवळीसंबंधानें झालेली पाहून आमच्या अनिष्ट चिंतकांस जयजयकार कां वाटणार नाहीं ? स्वराज्य हेंच आमचें साध्य, स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणें शक्य नाहीं, स्वावलंबनाशिवाय आम्हांस दुसरा उपाय नाहीं. जपाननें जशी आपली उन्नति करून घेतली तशी आपण आपली उन्नति करून घेतली पाहिजे. जर्मनी, अमेरिका वगैरे राष्ट्रांनीं आमच्याशीं सहानुभूतीनें वागलें पाहिजे, अशा लांब लांब बाता मारणाऱ्या लोकांस अमक्या एका शहरीं राष्ट्रीय सभेची बैठक भरवूं म्हणून एकमतानें पूर्वींच्या बैठकीच्या वेळीं जाहीर केलें असतां तसें करतां येऊं नये याहून कमीपणा आणणारी गोष्ट कोणती ? पोरें बिघडलीं किंवा अधिक सभ्यपणानें बोलावयाचें म्हणजे विद्यार्थी उच्छृंखल झाले एवढ्याच सबबीवर राष्ट्रीय सभेस स्थानान्तर करावें लागलें असाच या सर्व गोंधळाचा आम्ही अर्थ करतों. जहाल, नेमस्त किंवा टवाळ मवाळ किंवा नवा जुना या पक्षोपक्षांनीं एकमेकांस दिलेल्या बऱ्यावाईट नांवांमुळें किंवा त्यामुळें उत्पन्न झालेल्या उदार-अनुदार लेखीतोंडी चर्चेमुळें आजवर हा अनिष्ट प्रसंग राष्ट्रीय सभेवर गुदरला नव्हता. आपल्याच राष्ट्रांतील मुलें आपणांस कह्यांत ठेवतां येत नाहींत, एखाद्या शहरांत विद्यार्थ्यांना ताब्यांत ठेवतां येत

नाहीं असें सर्व राष्ट्रानें व सर्व राष्ट्रीय राष्ट्रसभा मंडळानें पर्यायानें कबूल करावें हें समाधानकारक आहे असें कोणास वाटत असेल तर वाटो, आम्हांस तर तें अत्यंत उद्वेगजनक वाटतें. नागपुरांतील दोहों पक्षांपैकीं एकासहि झालेली गोष्ट अभिमानाची नाहीं. एका हातानें टाळी वाजत नाहीं. कोणत्याहि कलहांत सर्वच सत्य किंवा सर्वच असत्य एका बाजूस असणें शक्य नाहीं. एकाच पक्षांतील सन्मान्य वृद्धजनांचा अमर्याद उपमर्द झाला व त्यांच्या पाठींत काठ्या मारल्या व डोळ्याडोक्यांत धूळ टाकली इतका प्रकार करणाऱ्या पोरांच्या तोंडांत देणारें कोणी तेथल्या तेथें भेटलें नाहीं याबद्दल नागपूर शहराची कींव आल्याशिवाय राहणें अशक्य आहे. या गोष्टींविषयीं लिहितांना कोणी थट्टेवारी टीका केली तर त्यांच्या लोकोत्तर लोकमान्यतेकडे पाहून किंवा अलौकिक गुणश्रेणी ध्यानांत घेऊनहि आम्हांस त्या लेखाबद्दल अभिमान वाटणें शक्य नाहीं. या सर्व अपमानाबद्दल नागपुरांतील जुन्या पक्षाच्या मंडळींशीं आमची पूर्ण सहानुभूति आहे; इतकेंच नाहीं तर एके वेळीं इतकें वाईट वाटलें कीं, अशा शहराच्या वाऱ्यास पांच वर्षें उभें राहूं नये असे देखील उद्गार तोंडावाटें निघाले, परंतु या गोष्टी क्षणिक आहेत. राष्ट्रीय मानापमानाच्या बाबींत खोल व दूरवर विचार करणें जरूर आहे. मनोविकाराचे झटके येथील व बाहेरील दोन्ही पक्षांच्या मंडळीस येणें साहजिक आहे, परंतु तो वेग दीर्घकालपर्यंत टिकूं देणें योग्य नाहीं. नव्या पक्षांतील मंडळींचें पारिपत्य करण्याचे मार्ग मोकळे आहेत. नवा पक्ष तरुण मंडळीस प्रिय झाला पाहिजेच. त्यांच्याच उल्हासानें, उद्योगानें व साहसानें तो यशस्वी व्हावयाचा आहे. सर्व राष्ट्रीय सभा त्या पक्षाचीच व्हावयाची आहे, तोंपर्यंत आजचा नवा पक्ष जुना होऊन दुसराच पक्ष नवा होईल. नवा व जुना हे कांहीं व्यक्तींच्या कलाचे किंवा मर्जीचे खेळ नाहींत. स्वावलंबी किंवा परावलंबी असे हे तत्त्वाचे प्रश्न आहेत. यांत दुटप्पीपणाला जागा नाहीं. स्वपरावलंबी असा एक नामदार गोखले व रा. रा. टिळक यांचा पक्ष आहे. त्या पक्षास मिळेल तेवढें विलायतेस व येथें गोरे लोकांचें साहाय्य पाहिजे. पार्लमेंटांत प्रश्नाचा मारा करणारे कॉटनप्रभृति लोक व इकडे येणारे केरहार्डी, नेविसन या मंडळींचें कौतुक करण्यास हा पक्ष तयार आहे. उच्छृंखल अधिकारीसत्ताक पद्धतीवर व विशिष्ट उद्दाम अंमलदारांवर प्रखर टीकास्त्र सोडण्यांत हा पक्ष तरबेज आहे. या पक्षाइतकेंसुद्धां परकीयांचें साहाय्य आमच्या राजकीय चळवळीस किंवा औद्योगिक उन्नतीच्या उद्योगास नको असें मानणारा व प्रतिपादणारा केवळ स्वावलंबी पक्ष आहे. यास सर्व कांहीं आपल्या लोकांनीं शक्य तेवढें करावें,

आपल्याच लोकांत जागृति करावी या सर्व बाबींत पूर्ण स्वावलंबी व्हाव असें वाटतें. या पक्षाचा परकीयांवरचा व परकीय मालावरचा बहिष्कार जाज्वल्य असावयाचा यांत सवाल नाहीं. स्वपरावलंबी मंडळींपैकीं कांहींनीं बहिष्कार बहिष्कार म्हणून किती जरी ओरड केली तरी कृति अर्धवटच राहाणार. तरी पण या सर्व पक्षांस इंग्रजी राज्यास धोका पोंचविण्याच्या खटपटीपासून दूर राहावयाचें आहे. सर्वांस राष्ट्रीय सभा पाहिजे आहे. राष्ट्रीय सभेचें धोरण मात्र एकाच तऱ्हेचें सदासर्वदा कसें राहील? राष्ट्रांतील बहुमताचें प्रतिबिंब तिच्या कार्यक्रमांत पडल्याशिवाय राहील काय? तात्पर्य, नागपुरांतील तंटा कोणीं तरी उगाचच्या उगाच एखाद्या व्यक्तीचें स्तोम माजविण्यासाठीं उपस्थित केला असें म्हणणारांस कालवर्तमानाचें बिलकुल ज्ञान नाहीं असें म्हणणें भाग आहे. रा. रा. टिळकच अध्यक्ष असावेत असें आम्ही प्रतिपादन करीत आलों आहोंच म्हणून त्या बाबतींत आतां जास्ती लिहिण्याचें कारण नाहीं. त्या संबंधांत रीतसर प्रयत्न होऊन नवा पक्ष हरला. पुढें दोघांनीं म्हणजे नव्या-जुन्यांनीं प्रेमानें वागणें जरूर होतें. अध्यक्षाची नेमणूक म्हणजेच कॉंग्रेस असें नसल्यानें नव्या पक्षानें सर्व पैसे कार्यकारी मंडळास देणें योग्य होतें व ते स्वागतमंडळांत नांवें नमूद करून देऊन मग देणें प्राप्त होतें असेंहि आमचें स्पष्ट मत आम्हीं दिलें आहे. यापुढें सर्व प्रकरण फाजील विकोपास गेलें. यांत केसरीकारांनीं वेळीं ' हात आटोपा हात आटोपा ' म्हटलें असतें तर गोष्ट या थरावर आली नसती असें कित्येकांचें म्हणणें आहे. या तर्कवादांत पडण्याची आमची इच्छा नाहीं, तसें लिहिलें असतें तर वरकरणीं लिहिलें, आंतील पेंच वेगळा आहे असेंहि म्हणण्यास कांहींनीं कमी केलें नसतें. याच वितंडवादापायीं आमचें आजवर वाटोळें झालें आहे. आतां तरी शुद्धीवर या म्हणून अष्ट दिक्पाल आक्रोश करीत आहेत. यक्षरक्षोगंधर्व व साक्षात् देवाधिदेव हेंच उपदेशीत आहेत. परंतु दुर्दैव आमचें कीं यादवी आम्हांस सोडीत नाहीं. या प्रसंगीं वर्ड्स्वर्थ कवीनें मिल्टनविषयीं जो उद्गार काढला त्याची आम्हांस आठवण होते.

Milton thou shouldst be living at this
Hour! England hath need of thee!

आमचे कीर्तिपथाप्रत गेलेले महर्षि न्या. महादेव गोविंद रानडे आज हयात असते तर नागपूरहून राष्ट्रीय सभा तापीच्या स्नानाला कधींच गेली नसती. त्याचें नामस्मरण करून जुन्या पक्षाच्या मंडळींनीं ' नपुनि तेथें त्वां

शांति आदरावी ' हा उपदेश हृदयास घट्ट धरून क्षमा केली असती तर केवढी बहार झाली असती ! सर्व हिंदुस्थानची निर्णायक सभा सर पिरोजशा मेथा यांच्या घरीं भरली नसती व उभय पक्षांच्या मंडळीस हजर ठेवून सर्व गोष्टी सलोख्यानें मिटल्या असत्या. न्यायमूर्तींची जागा कोणीं भरून काढली नाहीं यापेक्षां दुसरें दुर्दैव नाहीं असें आज आमच्या प्रत्ययास मोठ्या जोरानें आलें आहे. वृद्धत्वास व अनुभवास साजणारी क्षमा नागपूरच्या वृद्धांनीं दाखविली नाहीं हें फार गैर केलें. अजूनहि काय काय सोहाळे व्हावयाचे आहेत ते एका परमेश्वरासच माहीत. सर पिरोजशा यांचें साम्राज्य आतां टिकावयाचें नाहीं, इतकें मात्र खास.

●●●

# १०. सुरत येथील असमाधानकारक प्रसंग

[ ' विश्ववृत्त ', डिसेंबर, १९०८

अन्तः प्रतप्तमरुसैकतदह्यमान-
मूलस्य चम्पकतरोः क्व विकासचिन्ता ।
प्रायो भवत्यनुचितस्थितिदेशभाजां
श्रेयः स्वजीवपरिपालनमात्रमेव ॥

सर्व देशभर ज्या गोष्टीकडे लोकांचे डोळे लागून राहिले होते, अशी सुरत येथील २३ वी राष्ट्रीय सभा भरून तिचा इतिहास लिहिण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे. सालाबादप्रमाणेंच सर्व हकीगत देतां येईल असें आम्हांस वाटलें होतें. एकजुटीनें सर्व काम अखेरीस उरकेल, पण ही एकजूट करण्यापूर्वीं दोन्ही बाजू पुष्कळ ओढून धरतील आणि मग लोकपक्षाच्या दृष्टीनें या संस्थेचें पाऊल पुढें पडेल अशी आमची अटकळ होती. १९०७ सालाइतकें वाईट साल आमच्या देशास गेलेलें आम्हांस बिलकुल स्मरत नाहीं. प्रजापक्षाचें प्रधानमंडळ विलायतेस अधिकारारूढ असल्यानें १९०५ सालीं नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं काशीक्षेत्रीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं उद्भवलेल्या आशांकुरापासून मधुर फळांची प्राप्ति आमच्या राष्ट्रास होईल असें कित्येकांस वाटत होतें. परंतु १९०६ च्या प्रारंभींच अभावाचा भोपळा फुटला, आणि तेव्हांपासून बुडत्याचा पाय खोलांत या न्यायानें मोर्लेसाहेब अधिकाधिक अप्रिय किंबहुना तिरस्कार विषय होत आहेत. मोर्लेसाहेबांसारख्या लिबरल शिरोमणीपासून इतकी निराशा झाली तरीसुद्धां सरकार आमचें चिरंतन राजकीय हित करील असा भरंवसा बाळगण्याइतका दुधखुळेपणा आमच्यांत नसावा, अशी बऱ्याच समंजस लोकांची खात्री होत चालली आहे. बंगाल्यांत विद्यार्थ्यांवर खटले केले, हिंदु-मुसलमानांच्या तंट्यांत पक्षपात दाखविला तरी लोक इतके चिडले नाहींत; परंतु लाला लजपतराय व अजितसिंग या उभयतांस चौकशी न करतां हद्दपारीची शिक्षा केली व पुढें सभाप्रतिबंदीचा कायदा पसार केला यावरून आतां धडगत दिसत नाहीं, असा दृढ लोकमनोग्रह होऊन गेला. अजूनहि सरकारच्या नादीं लागणारे लोक आहेत, त्यांस सरकारच्याच साहाय्यानें व सहानुभूतीनें राजकीय स्वातंत्र्य पायरीपायरीनें प्राप्त होईल असें वाटतें. अशा बुद्धीनें प्रेरित होऊन ते सरकारच्याच कानींकपाळीं ओरडण्याचा

किंवा विलायतेंतील लोकमत जागृत करून पार्लमेंट सभेच्या वजनानें आपले राजकीय हेतू सिद्धीस नेण्याचा जुना राजकीय चळवळीचा मार्ग सोडण्यास ते तयार नाहींत. लोकशिक्षण व लोकजागृति या गोष्टी त्यांना नको आहेत असें नाहीं, परंतु लोकांच्या मनांत सरकाराविषयीं आशा उत्पन्न करून, सरकारावर पूर्ण श्रद्धा ठेवण्यास त्यांचें मन वळवून, कोणत्याहि प्रकारें सरकारास न दुखवितां किंवा न चिडवितां आपलें कार्य साधावयाचें असा या नेमस्त मंडळीचा बेत आहे. या मार्गाचा अवलंब राष्ट्रीय सभेनें वीस अधिक वर्षे घेतल्यावर लोकांना त्याची निरर्थकता भासली आहे. लोकमतास सरकार मुळींच जुमानीत नाहीं ही गोष्ट बंगालच्या विभागणीनें पूर्ण सिद्ध करून दाखविली आहे. त्यापूर्वी लोकमत स्पष्टपणें कळविल्यावरहि विभागणी रद्द झाली नाहीं म्हणून अडवणुकीचा व बहिष्काराचा मार्ग अवलंबिण्याचा निश्चय बंगालकर देशबांधवांनीं केला व त्यास सर्व हिंदुस्थान देशानें संमति दिली. बहिष्कार ही राजकीय चळवळ चालविली. विशेषतः ब्रिटिश मालावर बहिष्कार घातला म्हणजे इंग्रज सरकारची धुंदी उतरेल असा लोकांचा ग्रह झाला आहे. मद्रास, महाराष्ट्र, वऱ्हाड, नागपूर वगैरे प्रांतांत या मताचा फैलाव होत आहे व सरकारशीं शांत कायदेशीर उपायांनीं युद्ध मांडल्याखेरीज आपला तरणोपाय नाहीं असें मत जोरानें पसरत आहे. मताप्रमाणें वर्तणूक होत नाहीं किंवा सरकारच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडावें इतक्या जोरानें आचरण होत नाहीं ही गोष्ट कबूल आहे. तसेंच, सरकार परकें असल्यानें त्याच्या हातून लोकशिक्षणाचें काम काढून घेतल्याशिवाय स्वावलंबनाचा खरा मार्ग व स्वतःची खरी योग्यता लोकांच्या ध्यानांत बाणणें अशक्य आहे हेंहि कबूल आहे; परंतु या गोष्टी साध्य करण्यास अधिकाधिकच सरकारची कांस धरून चालणें हा उपाय नाहीं. सरकारास आवडो वा न आवडो, सरकार चिडो वा सुप्रसन्न राहो, राष्ट्रांतील लोकांनीं अर्थात् सुजाण पुढाऱ्यांनींच आपण होऊन राष्ट्रोत्कर्षाचा मार्ग धरला पाहिजे. आपले आपणच सर्व धंदे आटोपले पाहिजेत, मुख्यत्वेंकरून सर्व प्रकारचें शिक्षण आपल्याच हातांत घेतलें पाहिजे. प्रत्येक बाबतींत मनूच्या शासनाप्रमाणें

> यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् ।
> यद्यदात्मवशं तु स्यात् तत्तत्सेवेत यत्नतः ॥
> सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।
> एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥

सर्व गोष्टी आपल्या हातीं घेतल्या पाहिजेत. त्यांत राष्ट्रांतील लोकांचें अर्थात् लहानथोरांचें शिक्षण म्हणजे मनें बनविण्याचें कार्य परकीयांच्या हातीं देऊन स्वतंत्र राष्ट्राची उभारणी करणें म्हणजे लिंबाच्या झाडास आंबे लागावेत अशी इच्छा करण्याप्रमाणें आहे. औद्योगिक व व्यापारीय चळवळीस राजकयि स्वरूप देऊन त्य चळवळीचा पहिला परिणाम ब्रिटिश राज्यांतील व्यापारावर घडवून आणणें, राज्य-सत्तेच्या वर्मीं घाव घालणें हें सामान्य कार्य नाहीं. दृढनिश्चय व स्वार्थत्याग या दोन गोष्टींचें पूर्ण पाठबळ असल्याशिवाय असल्या प्रचंड उद्देशाचा मुखावाटे परिस्फोटदेखील करूं नये असें कित्येक नेमस्तांचें म्हणणें पडतें, परंतु लोकमत जागृत करण्यास गुपचुप प्रयत्न करण्याचीं साधनें जोंपर्यंत लाभत नाहींत, तोंपर्यंत उघड उघड खटपट करणें व त्या कामीं येतील तीं संकटें सोसण्याची तयारी वाढविणें हाच एक उपाय आहे. यास सर्व सुबुद्ध व कर्तृत्वशाली पुरुष मिळतील तर यशसिद्धि लवकरच होईल; परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, सुबुद्ध व कर्तृत्ववान् असे पुष्कळ लोक सरकाराचे अंकित झाले आहेत किंवा सरकारच्या मोहिनीनें पछाडले आहेत. परंतु लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दींतील अरेरावीमुळें लोकांचे डोळे उघडल्यानें राष्ट्रीय पक्ष म्हणून स्वतंत्र विचाराचा पक्ष जोरांत आला. २१ व्या राष्ट्रीय सभेपासून लोकांत अशी दृढ समजूत वाढूं लागली कीं, सरकारकडे अर्ज करून किंवा प्रार्थना करून किंवा त्यांच्या कृत्याचा साधा किंवा जोरदार निषेध करून राष्ट्रास बरे दिवस येण्याची आतां आशा नाहीं. स्वतः कंबर बांधल्याशिवाय कांहीं होणार नाहीं. २२ व्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं परमेश्वरकृपेनें अगदीं नेमस्त मंडळीचे कान टोंचणारा सोनारच अध्यक्षस्थानीं आल्यानें स्वराज्याची कल्पना स्पष्टपणें राष्ट्रापुढें मांडण्यांत आली. त्या योगानें नवा पक्ष जोरांत आला. कलकत्ता राष्ट्रीयसभेंत स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण हे विषय लोकांच्या पुढें येऊन त्यांवर लोकपक्षास मान्य असे ठराव पसार झाले. या निरनिराळ्या विषयांवर सर्व वर्षभर वर्तमानपत्रांतून व वक्तृत्वपीठावरून चर्चा सुरू असल्यानें लोकांच्या मनास एक प्रकारें वळण लागत चाललें. प्रांतिक सभा, जिल्हा सभा, तालुका-सभा स्थापन होऊन, यासंबंधानें यत्न व्हावा अशी राष्ट्रीय सभेची आज्ञा लोकांस झाली होती, त्याअन्वयें थोडें थोडें कार्यहि सुरू झालें. कित्येक सभांतून तर (कुलाबा जिल्हा रिपोर्ट पाहा.) सरकारकडे अर्ज पाठविण्यापासून कांहीं उपयोग नाहीं असें सर्वानुमतें पसार झालें आहे. लोकजागृति झाल्यामुळें कित्येक खेड्यापाड्यां-तून अशिक्षित लोकसुद्धां पैसापट्टी आनंदानें महिनेमाल गोळा करीत आहेत. स्वदेशी हा शब्द सर्व बायकापोरांसदेखील कळून गेला आहे, असें असून शिष्ट

नेमस्त लोकांनीं या जनमनास्थितीकडे दुर्लक्ष न करतां तिचा फायदा घेऊन तिला योग्य वळण व प्रोत्साहन द्यावें तें सोडून, पूर्वीच्या अंधपरंपरेला चिकटून राहावें यासारखें दुर्दैव कोणचेंच नाहीं. सुरत मुक्कामीं प्रांतिक सभेच्या वेळचें सर पिरोजशाचें वर्तन हें या प्रवृत्तीचें ढळढळीत उदाहरण आहे. तीच अरेरावी पुढें राष्ट्रीय सभेच्या कामांत दिसून येणार अशीं स्पष्ट चिन्हें नागपूर येथील नेमस्त मंडळीच्या वर्तनावरून दिसत होती. नागपूरच्या नेमस्त मंडळीस तेथील जहाल अथवा नव्या पक्षानें त्राहि त्राहि करून सोडलें. त्यांत कित्येक अत्याचारहि झाले, त्यांचा निषेध आम्हीं पूर्वीच केला आहे, परंतु या सर्व चळवळींच्या मुळाशीं तत्त्वाचा प्रश्न आहे. हा केवळ व्यक्तीचा प्रश्न नव्हे असेंहि त्याच वेळीं आम्हीं लिहिलें आहे. नागपूरच्या पराभूत नेमस्त मंडळीनें राष्ट्रीय सभेचें कार्य आपल्या हातून नीटपणें पार पडणार नाहीं असें ‘ ऑल-इंडिया कमिटी ’स कळविलें. त्याचा परिणाम काय झाला हें येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. नव्या पक्षानें आपणांस राष्ट्रीय पक्ष म्हणून नांव घेतलें त्यावरच कित्येक नेमस्त लोकांच्या तळपायाची आग मस्तकास गेली. नांवाबद्दलच जर भांडावयाचें तर आपण त्या नव्या पक्षास तोतया राष्ट्रीय व आपणांस सत्य राष्ट्रीय पक्ष म्हणावयाचें होतें, परंतु या राष्ट्रीय पक्षांत जोर किती आहे, त्यांच्यांत कशा प्रकारचे उद्योग चालले आहेत, त्यांत ताजें रक्त खेळत असल्यानें त्याचा उत्साह व कर्तव्य मर्यादा केवढी आहे, या सर्व गोष्टींचा विचार न करतां सरकारी अंमलदारी थाटाचें वर्तन करणें विचारी व दूरदर्शी माणसास शोभत नाहीं. केवळ ‘ हार खाली ’ किंवा ‘ कशी वंगली ’ असें म्हणून पोरेंबाळें उपहास करतील या भीतीनें राष्ट्रांतील तरुण वर्गाशीं वृद्ध व अनुभविक लोकांनीं स्वेच्छाचारीपणाचें वर्तन ठेवावें हें पुढारीपणास साजत नाहीं. ‘ तुमचें म्हणणें काय आहे ? या, बसा, बोला ’ अशा प्रकारें आदरानें त्यांस बोलाविण्यांत कोणाहि वृद्धांचा अपमान नाहीं अशी आमची पक्की समजूत आहे. त्यांच्याकडून कांहीं गोष्टी चुकल्या असतील तर त्यांची समजूत घालणें व त्यांस ताळ्यावर आणणें हें त्यांचें कर्तव्य आहे, परंतु त्यांच्या उत्साहाची दिशा बरोबर असतांना केवळ त्या उत्साहाचा अतिरेक पाहून गांगरून जाणें अगदीं बरोबर नाहीं. सरकार व त्यांत परकी सरकार आज शें दीडशें वर्षें आपल्याशीं कसें वागलें आहे व त्याचे डोळे उघडण्याचा प्रयत्न करतां करतां निराश झालेल्या पितामहानें दाखविलेला मार्ग कसा आहे या गोष्टीचा विचार करून तरुण पिढीच्या प्रयत्नाचें अभिनन्दन करण्याचें सोडून त्यांस नांवें ठेवणारांच्या पदरीं राष्ट्रहितविघाताचें पातक येतें असा

आमचा पूर्ण ग्रह आहे. डावपेंच करून किंवा पारिभाषिक शब्दांचा उपयोग करून त्यांची समजूत घालण्याची खटपट यशस्वी किंवा श्रेयस्कर होईल असें मानणें वेडेपणाचें आहे. त्यांत परकीय सरकारचे अंमलदार जसा कायदेशीर-पणाचा अर्थात् शाब्दिक कायदेशीरपणाचा डौल आणतात, त्याप्रमाणें लोकाग्रणी म्हणविणारांनीं वागणें हें तर लांछनास्पद आहे. याहून विशेष शरमेची गोष्ट म्हणावयाची ती ही कीं, लोकांची म्हणजे बहुजनसमाजाची बाजू दडपून टाकून वस्तुस्थितीचा विपर्यास करून दाखवावयाचा प्रयत्न हुबेहूब सरकारी अंमलदारा-प्रमाणें करण्यांत येतो. भाषणामध्यें औपचारिक प्रकार असतो; लेखांत दिसण्यांत शब्द एक असावेत पण कृति त्याहून निराळी असावी असे प्रकार सरकारी ठरावांतून व जाहीरनाम्यांतून अनेक असतात. असेच लपंडाव परस्परांत देश-बांधवांनीं करावेत हें चांगलें नाहीं. राष्ट्रीय सभेच्या अधिकारी मंडळाकडून प्रसिद्ध झालेल्या कांहीं पत्रकांवरून आमच्या म्हणण्याची साक्ष पटण्याजोगी आहे. कॉंग्रेसच्या स्थानिक चिटणिसांपैकीं एकाच्या सहीनें, अमक्या अमक्या विषयावरील ठराव गाळले आहेत असें विधान करण्यांत आलें आहे तें निराधार आहे व तें तसें करावयास नको होतें, इतक्याच आशयाचें एक हस्तपत्रक प्रसिद्ध झालें होतें. राष्ट्रीय पक्षाची उत्कंठा कोणाच्या संबंधांत होती हें माहीत असतां असा मुग्ध लेख प्रसिद्ध करणें सरकारी तोऱ्यासच साजतें. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या विषयांचा राष्ट्रीय सभेंतील कार्यक्रमांत प्रवेश केला जाणार आहे म्हणून ते विषय गाळले आहेत असा कोणीं गैरसमज करून घेऊं नये असें स्वच्छ कळविण्यास कांहीं प्रत्यवाय होता असें आम्हांस वाटत नाहीं. हें हस्तपत्रक तरी काढण्याची कांहीं जरूरी नव्हती. राष्ट्रीय मंडळीच्या वतीनें चिटणिसांनीं लिहिलेल्या पत्रास उत्तर पाठविलें असतें तर तें सभ्याचारास अधिक जुळून झालें असतें. राष्ट्रीय पक्ष किंवा '**नॅशनॅलिस्ट्स**' हें नांव आवडलें नाहीं तरी त्या पक्षांत असलेले लोक नामांकित व सद्बुद्धिप्रेरित असे आहेत असें मानून त्यांच्याकडून होणाऱ्या व्यवस्थितपणें केलेल्या प्रयत्नाचा धिक्कार करणें योग्य नाहीं. सरकारास चीड येऊं नये, त्याचा उपमर्द होऊं नये अशी मुरवतीची वर्तणूक ठेवणारांनीं आपल्या देशबांधवांस धुडकावून लावावें हें सामान्य जनास त्वेष आणण्यास पुरें आहे. ५००।६०० मंडळी संथपणानें एखाद्या गोष्टीचा विचार करतात, त्यांचा कांहींच परामर्श घेणें जरूर वाटत नाहीं, असें कॉंग्रेसच्या अधिकारी मंडळास कां वाटावें हें आम्हांस कळत नाहीं. निव्वळ बखेडा मांडावा अशा बुद्धीनें हे लोक एकत्र झाले नव्हते. एखाद्यानें हूं

म्हटलें कीं हूं असें श्ववृत्ति लोकच सर्व त्यांत गोळा झाले होते अशी का या नेमस्त म्हणविणारांची समजूत झाली होती ? या नेमस्त मंडळींत जशा प्रकारचे कोणत्याहि विषयावर सांगोपांग विचार करून अभिप्राय देण्यास समर्थ लोक होते, तसेंच राष्ट्रीय पक्षांतहि होते. सर पिरोजशा किंवा नामदार गोखले किंवा मि. वॉचा यांच्यासंबंधानें केसरींत कांहीं उपमर्दाचे किंबहुना उपहासाचे लेख आले म्हणून तें मनांत ठेवून सुरतेस त्यांनीं असें वर्तन करण्यास प्रवृत्त व्हावें हें एकपक्षीं अप्रयोजक व दुसरेपक्षीं एकावरचा राग दुसऱ्यावर काढण्याप्रमाणें आहे. एका प्रसिद्धिपत्रकाची ही जशी गोष्ट, तीच राष्ट्रीय पक्षानें नेमलेले रा. टिळक वगैरे पुढारी लोकांबरोबर वागण्यांत तीन चार दिवसांत दिसून येत होती. जहाल नेमस्तांचें आतां एका ठिकाणीं जमावयाचें नाहीं, असें कित्येक लोक म्हणत आहेत तें मात्र आम्हांस खरें वाटत नाहीं, नेमस्त मंडळीचा संग्रह करून हिंदुस्थानचा राज्यशकट हांकावा असा आपला बेत आहे म्हणून कितीदां तरी मि. मोर्ले यांनीं जाहीर केलें, तरी हिंदुस्थानवासीयांच्या अंतःकरणांत एकच राजकीय कल्पना खिळून गेल्या* आहेत. शक्तीशिवाय मस्ती करून उपयोगी नाहीं असा त्यांचा तरुण जहालांना उपदेश असावयाचाच. तरुणांस तो मानावयाचा नाहीं. त्यांची हांव कायदेशीर चळवळीबाहेर न जातां सरकारास झिडकारून टाकण्यापर्यंत येणारच, या **नॅशनॅलिस्ट** पक्षाचें वर्णन डॉ. राजबिहारी घोष यांनीं आपल्या अध्यक्ष या नात्यानें करूं इच्छिलेल्या भाषणांत केलें आहे. त्यांत ही मंडळी बेबंदशाहीपैकीं नाहींत असें स्पष्ट म्हटलें आहे. नव्या पक्षाचें वर्णन डॉ. राजबिहारी घोष यांनीं जसें केलें आहे, त्याहून एखाद्या खुद्द नव्या पक्षवाल्यांच्यानेंहि सरस वठेल कीं नाहीं याची आम्हांस शंका आहे. अर्थात् तें वर्णन पूर्वपक्ष-प्रमाणें आहे. त्या पक्षाचें खंडन तितकें समर्पक झालें नाहीं. कारण नव्या पक्षानें केलेलीं विधानें असत्य किंवा अनुभवास सुटून आहेत असें दाखविणें शक्य नाहीं. नुसत्या सरकारावर किंवा विलायतेंतील लोकांच्या अज्ञानतिमिर-मग्नन्याय दृष्टीवर अवलंबून राहावें असें सांगण्याचा काय उपयोग ? हें तिकडील लोकांचें अज्ञान घालविण्याच्या प्रयत्नापेक्षां आपल्याच लोकांचीं मनें तयार करावीं व ह्या कामींच आपलें बुद्धिसर्वस्व व द्रव्यसर्वस्व खर्चीं घालावें हें नव्या पक्षाचें म्हणणें सयुक्तिक आहे असें कोणीहि कबूल करील. गेल्या दीडशें वर्षांच्या

* येथें डॉ. घोष यांच्या न झालेल्या भाषणांतून एक उतारा उद्धृत करण्यांत आला आहे तो दैनिक ‘ इंदुप्रकाशां ’त प्रसिद्ध झाला होता.

इतिहासानें व गेल्या सालच्याच धांगडधिंग्याच्या प्रत्यक्ष अनुभवानें ज्याचा सरकारवर विश्वास उडाला नसेल, असा कोणीहि डॉ. राजबिहारी घोष यांच्या पुढील उद्गारास औपचारिक, औपरोधिक किंवा औपहासिक झटल्याशिवाय राहाणार नाहीं. "हल्लींच्या परिस्थितींत आपला हेतु साध्य होण्याला सरकारची मदत आपणांस अवश्य घेतलीच पाहिजे. कारण हें ध्यानांत ठेवा कीं, स्वराज्याला आपण योग्य आहों असें आपण आपल्या राज्यकर्त्यांना दाखविल्याखेरीज इंग्लिश लोकांचें येथील राज्य पूर्वीप्रमाणें अबाधित राहणारच. आपली पात्रता त्यांच्या निदर्शनास आल्याबरोबर कृतकृत्य होत्साते ते परत आपल्या देशीं मोठ्या आनंदानें जातील." नव्या पक्षाचें वर्णन डॉ. घोष यांनीं केलेलें पाहा. नव्या पक्षानें आपली अशी समजूत करून घेतलेली दिसते कीं, आमच्या राज्यकर्त्यांकडून आम्हांला कांहीं हक्क मिळतील अशी आशा करणें वेडेपणाचें आहे व राष्ट्रीय सभेच्या धोरणावर राजकीय चळवळ करणें म्हणजे निव्वळ भ्रम आहे. ह्या पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, खऱ्या अधिकारीवर्गाला नेमस्तपणाची किंमत कळत नाहीं व कायदेशीर चळवळ करणाऱ्यांचा ते गुप्तपणानें तिरस्कार करतात. आयर्लंडांतील सिनफेन पक्षाप्रमाणें नव्या पक्षाचा कायदेशीर चळवळीवरचा विश्वास पार नाहींसा झाला आहे, तरी पण त्याच्यातर्फेनें हेंहि पण सांगितलें पाहिजे कीं, बेकायदेशीर दंडेलीवरहि त्यांचा विश्वास नाहीं. तसेंच त्यांच्यांतील पुढील राज्यव्यवस्थेच्या कामांत अडचण उत्पन्न व्हावी ह्याकरितां लोकांनीं कर देऊं नये असाहि त्यांस उपदेश करीत नाहींत. ह्या पक्षाची सर्व मदार सर्वव्यापी अशा अशस्त्र प्रतिकारावर आहे. मला वाटतें कीं हा मार्ग म्हणजे इंग्रजी म्हणून जेवढी गोष्ट तेवढ्यावर गुपचुप बहिष्कार घालणें त्यांना हंगेरीच्या हल्लींच्या इतिहासावरून सुचला असावा. माझ्या समजुतीप्रमाणें ह्या पक्षाच्या कार्यक्रमांत खालील गोष्टी येतात. सरकारची कोणत्याहि प्रकारें नोकरी म्हणून करावयाची नाहीं. मग ती पगार घेऊन असो किंवा म्युनिसिपालिट्या, लोकल बोर्डें किंवा कायदे कौन्सिलें यांचे सभासद ह्या रूपानें असो. ब्रिटिश न्यायकचेऱ्यांवर बहिष्कार घालावयाचा व त्यांच्या जागीं लवाद कोर्टांची स्थापना करावयाची. [ येथें जातां जातां हें सांगितलें पाहिजे कीं ह्यावरून हें काम बुभुक्षित वकिलांचें खास नाहीं एवढें सिद्ध होत आहे. ] सरकारी शाळा व कॉलेजें ह्यांच्यावर बहिष्कार घालावयाचा. सारांश ज्या ज्या गोष्टींत सरकारवर अवलंबून राहण्याची आपल्याला जी संवय लागली आहे, ती टाकून द्यावयाची व जणू काय सरकार नाहींच अशा समजुतीनें आपण आपलीं कामें करावयाचीं. हें सर्व दांडगाईनें न करतां सामाजिक दाबानें घडवून आणावयाचें

कारण दंडेली करावी किंवा बेकायदेशीरपणा करावा असें म्हणणारा पक्ष आमच्यांत अजून उत्पन्न झालेला नाहीं.

जहाल व नेमस्त यांच्या अंतिम साध्याविषयीं कल्पना निराळ्या आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. बोलून दाखविण्याचे मार्ग निराळे आहेत. राष्ट्रीय सभेंतच राहून आपल्या कल्पनांचा जोर बाहेर वाढवून खुद्द राष्ट्रीय सभेवर त्यांचा परिणाम होईपर्यंत वाट पाहणें राष्ट्रीय पक्षास शक्य आहे व तसाच आपला हेतु आहे हें रा. टिळक यांनीं आपल्या अत्यंत मुद्देसूद भाषणांत सांगून ठेवलें आहे. तारीख २४ रोजीं नॅशनल कॉन्फरन्समध्यें व तारीख २८ रोजीं नॅशनल कॉंग्रेसच्या पुढील व्यवस्थेबद्दल भरलेल्या मुख्त्यार मंडळीपुढें झालेलीं दोन भाषणें कोणत्याहि देशांतील दूरदर्शी मुत्सद्द्यास शोभणारीं होतीं. त्यांची खबर सर फिरोजशा ना. गोखले वगैरे मंडळीस पोहोंचल्याशिवाय राहणें अशक्य आहे, परंतु सालमजकुरीं रा. टिळक वगैरे मंडळीच्या म्हणण्याचा सामोपचारानें विचार करावयाचा नाहीं असा कृतसंकल्प दिसत होता. यंदा कॉंग्रेसची बैठक सुरतेस आहे, त्या ठिकाणीं कलकत्त्यास खुद्द मि. दादाभाईसारख्या अनुभविक राजनीति-कोविदाच्या अध्यक्षत्वाखालीं पुढें पडलेलें पाऊल मागें सारण्याचा बेत उघड उघड दिसल्यानें हा भयंकर प्रसंग टाळावा इतकेंच साध्य पुढें ठेवून कार्य करण्याचा राष्ट्रीय पक्षाचा बेत ठरला होता. स्वदेशी चळवळ अधिक यशस्वी करण्याकरितां व राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याकरितां स्वतंत्र व्यवस्था व संस्था कराव्यात म्हणजे खऱ्या कार्यास प्रारंभ केल्याप्रमाणें होईल अशी त्याची इच्छा होती. नागपुरास राष्ट्रीय सभा भरली असती तर राष्ट्रीय पक्षाचें पाऊल या दृष्टीनें पुढें सरसावलें असतें. तेथें सुपीक जमिनीवर पेरलेलें बीं जोरानें उगवलें असतें. परंतु तेथून राष्ट्रीय सभेचें स्थानांतर झाल्यानें वृद्ध दादांनीं लावलेलें झाड करपून जाण्याचीच भीति वाटत होती. त्याचा विकास होण्याचा गोष्ट दूरच, परंतु जीव धरून तेंच झाड कसें वाढतें हीच काळजी होती. तेवढेंच साधण्यासाठीं द्रव्यबलाची वाण असलेल्या राष्ट्रीय पक्षास अनेक हालअपेष्टा सोसून सुरत मुक्कामीं जुटीनें जमणें आवश्यक झालें. बहुमत करणें अशक्य, पण आपल वजन पाडतां येईल एवढी तरी संख्या असावी अशा हेतूनें निराळा कंपू करून तेथें आपल्या मंडळीनें एक-विचारानें वागतां येईल अशी योजना केली. नेमस्त पक्षाचा पहिला बेत राष्ट्रीय पक्षास अनुकूल असे २२ व्या राष्ट्रीय सभेंत प्रसार झालेले ठराव मुळींच दाबून टाकावे असा होता, परंतु तें साधलें नाहीं, तरी शाब्दिक फेरफारानें त्यांची तीव्रता कमी करावी इतकें तरी साधावयाचें होतें. आहेत तसें पूर्वीचे ठराव कायम

करण्याची कबुली असेल तर डॉ. राजबिहारी घोष यांचें अध्यक्षत्व एकमतानें कबूल करावें, नाहींतर पहिल्यापासून आज २२ वर्षें राष्ट्रीय सभेच्या सर्व कारभारास ऐकमत्याचा जोर होता तो नाहींसा करून टाकावयाचा असें नव्या पक्षानें ठरविलें होतें. प्रत्येक ठराव बहुमतानें पसार व्हावयाचा असेल तर होईना; पण आपण म्हणून आपलें विरुद्ध मत एकजुटीनें द्यावें असें नव्या पक्षानें ठरविलें होतें. वस्तुतः पाहतां एवढें मागणें कांहीं फार नव्हतें. एकदां अध्यक्षाची निवडणूक सर्वानुमतें झाली म्हणजे त्या जोरावर वाटेल त्यास बोलून द्यावें, वाटेल त्यास न द्यावें, विषयचर्चेच्या पोटसभेंत जहालास दडपून टाकावें असें कांहीं झालें असतें, यासाठीं अगदीं प्रारंभापासूनच ओढून धरून गोष्ट तडजोडीवर आणावी असा संकल्प होता. या कामीं पुष्कळ थोर थोर लोक मध्यस्तीस धांवले होते परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. या सर्व प्रयत्नांची किंवा पुढील गडबडीची वेळोवेळीं घडलेली सर्व हकीगत येथें देण्याचें कारण नाहीं. इतकेंच म्हणावें लागतें कीं, कॉंग्रेसच्या अधिकारी मंडळीनें व्यवस्थित प्रयत्न करणाऱ्या आपल्या देशबांधवांस किंबहुना प्रतिनिधी बंधूंस, अरेरावी सरकार प्रजाजनास वागवितें, तशा प्रकारानें वागविलें. यामुळें त्यांच्या मनास त्वेष आला असल्यास नवल नाहीं. राष्ट्रीय पक्षाकडील प्रतिनिधींस, व्यवस्थापक मंडळी, किंवा कॉंग्रेसच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे स्वागत मंडळी, अगदीं असभ्यपणानें वागवीत होती. त्यांचा व स्वयंसेवकांचा काय तो मंडपापुरता संबंध येत असे; पण तेवढ्यांत हे बालवीर अनेक प्रकारें अरेरावीनें वागत. मुलांना काय, श्रेष्ठांनीं वळण लावावें तसें लागतें. दक्षिणी प्रेक्षक व प्रतिनिधी यांच्याशीं कसें वागावें याबद्दल त्यांना कांहींतरी विशेष धडे शिकविले असतील असें वाटत होतें. अशा वर्तनानें कित्येक प्रतिनिधी व प्रेक्षक चिडून जात. प्रस्तुत लेखकास असे प्रसंग आले, परंतु मुलांशीं काय किंवा थोरांशीं काय कसें वागावें याचा अनुभव असल्यानें गोष्ट विकोपास गेली नाहीं, परंतु इतक्या शांतपणानें सर्व लोक वागत नाहींत म्हणून तंटे होतात हें उघड आहे. स्वतःची शेखी मिरविण्यासाठीं नव्हे, तर या मुद्द्याचें समर्थन करण्यासाठीं ह्यांपैकीं एकदोन प्रसंगांचें कथन करतों. अगदीं पहिल्या दिवशीं बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या भाषणास प्रतिबंध झाल्यावर सभेचें काम तहकूब झाल्यानंतर स्वयंसेवक मंडळी सर्व लोकांस 'मंडप सोडून चालते व्हा' म्हणून सांगूं लागली. लोक घोळके करून निरानिराळ्या ठिकाणीं बोलत उभे राहिले होते, कित्येक लोक उगीच बसले होते. जागोजाग स्वयंसेवक व इतर अधिकारी 'चला, चला, बाहेर व्हा' म्हणत होते. साध्या बोलण्यावरून

बोलाचाली सुरू होई. प्रेक्षकांनीं म्हणावें आम्हीं पैसे भरले आहेत, प्रतिनिधींनीं म्हणावें मंडप आमचा आहे, स्वयंसेवकांनीं म्हणावें हुकूम तोडला तर तुम्हांस हांकून लावूं, असा प्रकार चाले. व्यवस्था करण्याच्या प्रयत्नानें तुम्ही लोक अव्यवस्था मांडीत आहां असें एका पंजाबी प्रतिनिधीनें शांतपणें सविस्तर समजून सांगितल्यावर अधिकारी गुपचूप बसले, प्रस्तुत लेखकाकडे एकामागून एक स्वयंसेवक आले, त्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें त्यांची समजूत घालून त्यास परत लावलें. नंतर शिष्टाचाराच्या गोष्टी सांगण्यास एक मोठे गृहस्थ आले, त्यांनाहि शांतपणानें खुर्चीवर बसण्यास सांगितलें, आणि म्हटलें, "काहो, सभेचा असा आकस्मिक परिणाम होईल अशी तुम्हीं अटकळ केली होती काय ? संध्याकाळ-पर्यंत सभेचें काम चालेल, मग सावकाश गार हवा पडली म्हणजे पायीं आपल्या शिबिरीं जाऊं अशा बेतानें आम्ही आलों, आतां उन्हांत बाहेर कोठें जावें बरें ? ऊन सरेपर्यंत तास दोन तासपर्यंत स्वस्थ येथें बसण्याचा विचार केला आहे. सभा केव्हांहि संपो, घोडा-गाडी बाहेर तयार आहे, अशा माणसाची गोष्ट वेगळी, मंडपांत सावलींत बसल्यानें कांहीं मंडप झिजत नाहीं ना ? एका खुर्चीवर बसून दुसरीकडे पाय ठेवले आहेत. तिसरीवर रुमाल आहे. या तीन खुर्च्यांपैकीं तक तरी आम्हांला मिळाली तरी पुरे आहे. बाकीच्या पुष्कळ जवळजवळ रिकाम्या आहेतच. एवढ्या आरामाच्या जागेंत बसूं देण्यास तुमची हरकत नसावी." यानें त्या गृहस्थाची समजूत पडली व त्यांनीं स्वयंसेवकांस मागें घेतलें असें वाटतें. दुसऱ्या दिवशीं सभेचें काम सुरू होण्यापूर्वीं नागपूरी, वऱ्हाडी व दक्षिणी मंडळींपैकीं मध्यपीठा-समोर व आसपास कोणीं नसावें असें ठरल्यासारखें दिसत होतें. दूरचें दिसत नाहीं व भाषणें ऐकूं येणार नाहींत म्हणून पंजाबी मंडळी मध्यें पुष्कळ खुर्च्या रिकाम्या होत्या, त्यांपैकीं एकावर बसल्याबरोबर एक, दोन, तीन स्वयंसेवक आले. त्यांना कोणा मुख्यास बोलाविण्यास सांगितल्यावर ते आले व म्हणाले 'बॉंबे, डेक्कन, ती जागा' त्यांस सांगितलें 'सरकारी नमुनेवाईक हुकूमबंदीच्या अक्षरशः पुनरावृत्तीचें येथें आपल्या राज्यांत काम नसावें. कांहीं सारासार विचारास थारा असावा. विशिष्ट व्यक्तीस विशेष कारणामुळें कांहीं निराळ्या पद्धतीप्रमाणें वागण्याची चाल ठेवावी. एखाद्यास दूरचें दिसत नाहीं किंवा जरा कमी ऐकूं येतें तर त्यास जरा जवळ जागा द्यावी. अशानें काटेकोर लष्करी व्यवस्था राहिली नाहीं असें होईल. पण कामाचें धोरण बरें राहील' याहि भाषणाचा परिणाम ठीक होऊन वर्तमानपत्रांच्या मुखत्यारांत जागा मिळाली. वस्तुतः गेल्या पांच वर्षांत इतक्या वाईट रीतीनें कोणीं वागविलें नाहीं अशी कांहीं दक्षिणी प्रतिनिधींची वागणूक सुरतेस झाली.

दक्षिणी वर्तमानपत्रांना मुखत्याराचीं टिकिटें फारशीं देऊं नयेत असाहि बेत होता कीं काय नकळे. मागणी करण्यासाठीं चिठ्ठी लिहिली. स्मरणपत्रिका लिहिली तरी जबाब नाहीं. **नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सला** जाणाऱ्या माणसास काँग्रेस कँपमध्यें उतरावयाची सवड न मिळावी म्हणून कीं काय कोण जाणें, तेथील व्यवस्था २५ तारखेस सुरू होईल असें ठरवून तशीं उत्तरें गेलीं असावींत असें दिसतें. कसें झालें तरी मुखत्यार म्हणजे सुरतेचे पाहुणे मग ते कोठेंहि उतरोत, त्यांच्याशीं सर्व स्वयंसेवकांनीं सभ्यपणें वागण्यास हरकत नव्हती. प्रतिनिधींप्रमाणें इतर लोकांसहि त्रास व दगदग सोसावी लागली.

बंगाल, पंजाब, मद्रास येथून कांहीं तरी चांगल्या तऱ्हेनें निकाल लागावा म्हणून लोक आले असतील. कित्येक मुखत्यार भरतीसाठीं दोन्ही पक्षांनीं आणले असतील, नाहीं असें नाहीं; पण दोन्ही पक्षांच्या मनांत आपापल्या मताप्रमाणें राष्ट्रीय सभा यशस्वी व्हावी असें असलें पाहिजे असा आमचा तर्क आहे. झाला हा परिणाम करावा असा स्पष्ट हेतु पुढें ठेवून कोणी तेथें गेले होते असें आम्हांस वाटत नाहीं. असल्या परिणामावर गोष्ट जाईल अशी भीति पुष्कळांच्या पोटांत होती. सर फिरोजशा यांस जहालांची व नेमस्तांची फारकत व्हावी अशी इच्छा होती असें स्पष्ट दिसतें व सुरतेस आपलें एकछत्री राज्य चालेल, आपण देऊं तो निकाल घेऊन दुसऱ्या पक्षास स्तब्ध राहावें लागेल अशी त्यांची अटकळहि असेल, परंतु गोष्ट भलत्याच थरावर जाऊन संन्यास घेण्याच्या विचारांत शिरण्याचा प्रसंग येतेल असें त्यांच्या स्वप्नीं, मनीं ध्यानींहि नसेल. १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या मागें राष्ट्रकार्य ढकलून त्याची पीछेहाट करावी हा दूषित संकल्प त्यांनीं योजला नसता तर त्यांना गुरुदंड झाला नसता; परंतु ४० वर्षांच्या कामगिरीबद्दल व अलौकिक सार्वजनिक सद्गुणांबद्दल लोकांच्या मनांत असलेल्या आदरावर वाजवीपेक्षां ताण पडला, त्यामुळें तो आदर पार नाहींसा झाला. याचें खापर त्यांनीं दुसऱ्या कोणाच्याहि डोक्यावर फोडण्याचें मनांतहि आणूं नये. नामदार गोखले यांनीं नेमस्तांत एक उपपक्ष किंवा पोटफळी उत्पन्न केली असती, तर चाललें असतें; परंतु आपले सद्धेतु ओळखण्याइतका उदारपणा नॅशनॅलिस्ट मंडळींत नाहीं व इंग्रजी व मराठी पत्रांतून आपली वेळीं अवेळीं केलेली नालस्ती पाहून अकालिक तहाचें बोलणें लावण्याचें ओझें माथीं घेण्यांत अर्थ नाहीं, उगीच काय होतें तें पाहावें असाच त्यांनीं बेत केलेला दिसला. राजकीय राष्ट्रकार्यास आपलें तनमनधन आपण वाहिलें आहे, इतर धंदे सांभाळून सुखासमाधानानें शिळोप्याच्या वेळीं देशकार्याच्या गोष्टी

बोलणारे आपण नाहीं आहों, सरकारच्या गुरकावणीला आपण भीक घातली नाहीं, सरकारच्या मनधरणीनें आपलें टीकास्त्र बोथट केलें नाहीं, लोकांच्या किंवा सरकारच्या मर्जीखातर आपल्या मनोदेवतेच्या सदुपदेशाचा अनादर केला नाहीं, तेव्हां गैरसमजरूपी ढग वितळून जाऊन आपल्या खऱ्या कामगिरीची वाहवा झाल्याशिवाय राहणें अशक्य आहे, म्हणून या वेळीं त्यांनीं प्रायः मूकभाव धारण केला होता असा आमचा समज आहे. राजकीय मताचें मान पाहतां रा. टिळकांच्या व त्यांच्या विचारांत फार म्हणजे फारच थोडें अंतर आहे. पारशी लोक केव्हां झाले तरी थोडे असणार, संख्येच्या मानानें त्यांना सुराज्यावर तृप्त असण्याचीच पाळी येणार. स्वराज्य जें पाहिजे तें हिंदु लोकांना व मिळून वागलें तर मुसलमानांना, पण मुसलमान सरकारची कांस धरूं लागले तर त्यांना देखील, तें नको असेंच समजलें पाहिजे. तेव्हां नुसत्या सुराज्यतुष्ट असणाऱ्या सर मेथांपेक्षां आपसांत कितीहि भांडले तरी टिळक गोखल्यांचेंच जुळलें पाहिजे. वैयक्तिक गैरसमजुतीनें सद्विचार बुद्धीस अंधत्व आलें, तर सुखाचा काळ तितका दूर जाईल इतकेंच.

गेल्या काँग्रेसच्या बखेड्याची जबाबदारी आणखी कोणावर असली तर ती अर्थात् डॉ. राशबिहारी घोष यांजवर आहे. त्यांच्या अध्यक्ष या नात्यानें होऊं घातलेल्या भाषणाविषयीं पूर्वींच लिहिलें आहे. काँग्रेसमध्यें झालेली फूट पाहून मला बरें वाटलें, केव्हां तरी ही फूट व्हावयाचीच असें त्यांनीं टाइम्सच्या बातमी-दारास सांगितलें, हें त्यांचें म्हणणें खरें कीं, आपल्या भाषणांत सर्वत्र ऐक्या-स्तव केले आहे तें खरें ? ज्याला वर्षभर कांहीं तरी देशकार्य करावयाचें असतें त्याला राष्ट्रीय सभेसारख्या एखाद्या संस्थेचीच मोठी जरूर आहे असा भाग नाहीं. सर्व हिंदुस्थानांत एकजुटीनें, कांहीं सरकारच्या अनेक खात्यांप्रमाणें प्रचंड कार्यें उरकावयाचीं असतील तर काँग्रेसच्या पोटसभा नेमण्याची जरूर आहे. राष्ट्रीय करपद्धतीचा उपक्रम करावयाचा व राष्ट्रीय शिक्षणांत एकरूपता ठेवावयाची असें ठरविण्यास राष्ट्रीय सभेपासून पोटसंस्था व सर्व सालभर त्यांच्या कार्यावर देखरेख करणारी अधिकारी संस्था करण्याकडे राष्ट्रीय सभेचा रोख असावा असा राष्ट्रीय पक्षाचा मनोरथ तरी आहे. प्रयत्न करणें जुटीचें काम आहे. जूट व्हावी अशी खरी इच्छा असेल तर त्याप्रमाणें देवाणघेवाण पाहिजे. ‘ हम करें सो कायदा ’ असें कोणींच करून चालावयाचें नाहीं. सालोसाल राष्ट्रीय सभेच्या कार्यांत ऐकमत्य राखण्यासाठीं ‘ त्वयार्धं मयार्धं ’ करून तडजोड घडवून आणण्याचें काम त्या त्या वर्षाच्या अध्यक्षाचें आहे. आपल्या अध्यक्षतेखालीं भरणारी

राष्ट्रीय सभा कांहीं बखेडा न माजतां पार पडेल अशीहि चिंता अध्यक्षास नसावी काय ? १९०५ सालापासून बखेड्याचीं प्रकरणें उपस्थित झालीं. १९०५ सालीं अध्यक्षाच्या गादीचा मान नामदार गोखले यांस मिळाला, त्या वेळीं बखेड्याचीं मुळें खुडून टाकण्यास जें थोडेबहुत परिश्रम पडले त्या वेळीं मुंबईचे सर फिरोजशा मेथा अनुकूलच होते असें प्रसिद्ध झालेलें नाहीं. त्या सालीं श्रीकाशीक्षेत्रास सर फिरोजशा यांचें आगमन झालें नाहीं, यावरून पट्टशिष्य किंवा प्रत्येक म्हणण्यास निर्विवेक अनुमोदन देणारे असे अध्यक्ष त्या कॉंग्रेसला लाभले नाहींत असें वाटून कांहींतरी निमित्तानें तें बडें प्रकरण हजर झालें नाहीं असा सर्वांचा तर्क झाला. त्यांच्या सान्निध्यापेक्षां इतर गोष्टी महत्त्वाच्या व शांततेस साहाय्यकारी वाटल्यावरून नामदार गोखल्यांनीं त्या भव्य पुरुषाच्या सान्निध्याची परवा केली नसावी. तात्पर्य १९०५ सालच्या राष्ट्रीय सभेंत अध्यक्षांनीं योग्य काळजी घेतल्यानें बखेडा माजला नाहीं. पुढें १९०६ सालीं वृद्ध पितामहापुढें सर फिरोजशाचें तेज पडलें नाहीं. त्या वेळच्या तडजोडींत आपला जोराचा हेका न चालल्यामुळें सर्व ठरावांच्या गोळ्या गटागट गिळाव्या लागल्या, परंतु त्यायोगें पोटांत दुखूं लागलें, त्यामुळें साऱ्या सालभर चैन पडेनासें झालें. त्या गोळयांवर पुढील राष्ट्रीय सेंभत उतारा घ्यावा असा निश्चय झाल्याचें बाहेर आलें होतें. १९०६ सालीं राष्ट्रीय सभेंत पसार झालेले ठराव व सर्व सभेंत दिसून येणारें ऐक्यमत्य यांचें श्रेय केवळ दादाभाईंच्या चातुर्य व दूरदर्शित्वाकडेच होतें. राष्ट्रांतील निरनिराळ्या भागांतील प्रमुख मंडळींत मतभेद असल्याचें कळल्यामुळें त्यांनीं सभेच्या अगोदर एक दोन दिवस आपल्या बंगल्यावर सर्वांस बोलावून आणून त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें. तसा कांहीं प्रकार डॉ. घोष यांनीं करावयास पाहिजे होता. वाटेल त्या वेळेस रात बेरात त्यांच्या बोलावण्यास मान देऊन लोक गेले असते. निदान राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षत्वाचा मान सर्वांनुमतें दिला तरच मी घेईन नाहीं तर घेणार नाहीं असें म्हणणें त्यांस योग्य होतें व तसें ठरल्याशिवाय सभाकार्यास प्रारंभ करूं न देणें हें त्यांचे आधीन होतें. हें धोरण डॉ. घोष यांचें चुकलें.

जहाल पक्षाचीं मतें कोणास मान्य असोत वा नसोत, त्यांचें या वेळचें मागणें अगदीं साधें होतें. स्वदेशाचें संरक्षण करणारांचा पक्ष जसा न्याय्य असतो व परकीय स्वारी करणाऱ्या लोकांच्या पक्षाकडे जसें आततायीपणाचें पातक येतें, तसा जहाल नेमस्तांचा प्रकार होता. जहाल हे घर धरून बसलेले व त्यांचें मालकीचें ठरलेलें धन बुचाडण्यास नेमस्त आले होते. आकस्मिक बहु-

मताच्या जोरावर हें कार्य करूं देणें म्हणजे राष्ट्राच्या हितास आपण जागलों नाहीं असें होणार. ही पवित्र संरक्षणाची जबाबदारी राष्ट्रीय पक्षांतील मंडळींच्या पुढें आपल्या कार्याची पवित्रता व न्याय्यता उज्वलत्वानें ठेवीत होती. नेमस्त पक्षाकडील लोकांची श्रीमंती, सरकारांतील वजन, समाजांतील मान्यता यामुळें कांहीं कालपर्यंत जहालांविषयीं गैरसमज होईल, पण राष्ट्राच्या हिताच्या उत्कर्षाचा ध्वज त्याच्यांच हातांत आहे व त्यांच्या छायेखालीं लवकर किंवा उशिरां सर्व समंजस लोक येणार ही त्यांच्या मनाची खात्री आहे. आपसांत खाजगीपणानें भांडून झगडून शेवटीं सार्वजनिकदृष्ट्या ऐक्य प्रकट करण्याचा शुद्ध, सरळ व मामूल मार्ग सुटल्यानें, २३ व्या काँग्रेसचा भंडवडा झाला याबद्दल कोणच्या खऱ्या देशभक्तास वाईट वाटणार नाहीं ? राष्ट्रांतील कांहीं शिष्ट शिष्ट नेमस्तांचा संग्रह सरकारनें करावा व त्यांच्याकडून आपल्या देशभक्तांचा गळा कापविण्यास मदत करावी हें कोणा राष्ट्रहितचिंतकास मानवेल ? फूट पाडून राज्य करणें हें तत्त्व उराशीं बांधणें परकीय राज्यकर्त्यांना साजतें व त्यांत यश मिळाल्यास त्यांचा फायदा होतो, परंतु ज्या राष्ट्रांतील लोकांवर ह्या डावाचा प्रयोग होतो त्याला कोणत्याहि प्रकारें तें सन्मानावह किंवा हितावहहि होत नाहीं. बुडावें तर सर्वांनीं बुडावें, तरावें तर सर्वांनीं तरावें यांतच खरें हित व खरा मान आहे.

# ११. पुढें काय ? स्वराज्य कीं साम्राज्य ?

[ ' विश्ववृत्त ', फेब्रुवारी १९०८ ]

गेल्या दोन अंकांत सुरत येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेसंबंधानें आम्हांस जें काय वाटलें तें लिहिलें. झाला प्रकार अत्यंत अनिष्ट झाला यांत शंका नाहीं. संघशक्तीनें काम करण्यास हिंदुस्थानांतील पुढारी लोक शिकले नाहींत हें सिद्ध करण्यास सुरतेस झालेली धामधूम बस्स आहे. दोहों पक्षांकडे दोष आहे, त्यांत व्यक्तीच्यासंबंधानें गैरसमज माजून राहावा हें दुर्दैवाचें काम आहे. ज्या वेळीं सुरतेस सर्व मंडळी हजर होती त्याच वेळीं मिलाफ होणें शक्य नव्हतें असें क्षणभर कबूल केलें तरी जुन्या पक्षानें भरविलेल्या ' कन्व्हेन्शन ' नामक सभेस सुरतेस जें एकतर्फी वळण आलें होतें तें मनोविकार शांत झाल्यावरहि बदलण्यांत न यावें याबद्दल आश्चर्य वाटतें व खेद होतो. राष्ट्रीय सभेचे नियम व कार्याचें धोरण राष्ट्रीय सभेंतच ठरलें पाहिजे. तेविसावी राष्ट्रीय सभा तहकूब राहिली आहे तेव्हां चोविसावी भरवितां येत नाहीं यांत शंका नाहीं. डॉ. राजबिहारी घोष यांची नेमणूक झाली असें म्हणणारांसहि हें कबूल करणें भाग आहे कीं, ती मोठ्या जलदीनें करून टाकण्यांत आली. उच्चपीठावर घातलेल्या आसनांपैकीं पुढच्या कांहींवर बसलेल्या प्रतिष्ठित मंडळी-शिवाय ठरीव शिष्टाचार किंवा ठरीव मंत्रोच्चार कोणाच्या नजरेस किंवा कानांवर आला नाहीं. तेव्हां ही अध्यक्षाची निवडणूक सर्व प्रतिनिधींनीं कबूल करावयाची म्हणजे जुन्या पक्षांतील पुढाऱ्यांच्या मुरवतीखातरच कबूल करावयाची आहे. नव्या पक्षाच्या मुरवतीखातर कलकत्त्यास पसार झालेले ठराव आहेत तसे विषयविवेचक सभे-पुढें मांडावेत. विषयविवेचक सभेमध्यें असणाऱ्या लोकांनीं कोणत्याहि गोष्टीचा विचार करावयाचा तो आपल्या स्वतःच्या अभिप्रायावर नजर देऊन करूं नये, तर राष्ट्रांत कोणाच्या मतांचा कशा रीतीनें प्रसार होत आहे इकडे लक्ष पुरवून करावा. बहुजनमतास वळण लावणें हें त्यांचें काम आहे व तें बजावून मग आपल्या मताप्रमाणें राष्ट्रीय सभेंत सर्व कामगिरी करावी. नवीन पक्षानेंहि विषयविवेचक मंडळींत आपलें बहुमत होईपर्यंत राष्ट्रीय सभेंत एखादा विषय मांडण्याची घाई करूं नये. विषयविवेचक सभेमध्यें असणारे लोक अनुभविक व देशहितेच्छुच असतात. त्यांना आपल्या मार्गांत अडचणी कोणत्या आहेत हें माहीत असतें. नवीन

पक्षाच्या पुढाऱ्यांस त्यांची समजूत घालतां आली नाहीं, तर सर्व राष्ट्रानें मिळून एखादें कार्य करावयाचें, त्यांत अनुभव व दूरदर्शित्व यांची उणीव आहे असें समजण्यास हरकत नाहीं. नियामक सत्तेचे नियम व कार्यपद्धति राष्ट्रीय सभेस लागू करूं पाहणारांनीं कोणताहि ठराव पसार होण्यास, इंग्लंडांत वड्या लोकांच्या सभेंत व लोकप्रतिनिधींच्या सभेंत असा दोहों ठिकाणीं तो प्रसार व्हावा लागतो हें विसरतां कामा नये. आमच्या राष्ट्रीय सभेंत जर हा वृद्ध-तरुणांच्या दोन सभांचा प्रकार असता, तर हल्लींचा तरुण पिढीचा जोर राष्ट्रीय पक्षद्वारां दृष्टीस पडत आहे त्यास स्पष्ट स्वरूप आलें असतें. केव्हांना केव्हांतरी राष्ट्रीय पक्षाच्या मतांची सरशी झाल्याशिवाय राहणार नाहीं. यासाठीं राष्ट्रीय सभेंतील प्रतिनिधींच्या बहुमतानें प्रांतवारी निवडणूक होऊन विषयविवेचक सभेंत व्यवस्थितपणें काम चालून बहुमतानें जें ठरेल तेंच भर राष्ट्रीय सभेंत सर्वानुमतें पसार करावयाचें अशी जी मामूल वहिवाट आहे ती कायम ठेवावी असें आमचें मत आहे. विषयविवेचक सभेंत कोणीं हजर असावें यासंबंधानें नेहमीं वाद उपस्थित होतो; सभेंत जाऊन चर्चेमध्यें आपण कांहीं भाग घ्यावा अशी इच्छा थोड्यांचीच असते, परंतु तेथें चालणारा वाद मनोरंजक व शिक्षणावह असतो म्हणून पुष्कळांची तो ऐकण्याची इच्छा असते. सर्व प्रतिनिधींस जाहीर मोकळीक ठेवली तर कांहीं हरकत नाहीं. त्यांनीं प्रेक्षकवृत्तीचा अंगीकार केला व स्वतःच्या मनोविकारांचें कोणत्याहि प्रकारें प्रदर्शन करावयाचें नाहीं असा निग्रह केला तर एकंदरीनें फायदाच होईल असा आमचा अनुभवावरून बनलेला अभिप्राय आहे. विषयविवेचक सभेचे सभासद निवडण्यांत आजवर होतो तसा सावळागोंधळ नसावा. आजवरच्या प्रकारास सावळागोंधळ असें नांव देणेंहि कदाचित् बरें होणार नाहीं. कारण कोणतीहि गोष्ट असह्य होईपर्यंत टिकते हा नियम लक्षांत घेतल्यास आजवरची विषयविवेचक सभेची निवडणूक सर्व लोक एकमेकांच्या मुरवतीखातर कबूल करीत होते. त्या सभेंत ऊहापोह झाल्यावर मतें मोजण्याचेहि प्रसंग क्वचितच येत होते. त्या सभेंत निवडून जाणें हें आपआपल्या प्रांतांत प्रमुख असल्याचें चिन्ह असे. राजकीय शिक्षण पद्धतशीर मिळालें नसल्यामुळें किंवा निरनिराळ्या प्रचलित विषयांचें सांगोपांग अध्ययन करणारे लोक फारच थोडे असल्यामुळें सभेंत निवडून गेल्यावरहि पुष्कळ लोक श्रोते व प्रेक्षकस्थ बनून राहत असत. श्रीक्षेत्र काशी येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या पूर्वी दहा बारा वर्षे सर्व राजकीय चळवळीस एक ठरीव संस्काराप्रमाणें घडणाऱ्या शिष्टाचाराचें स्वरूप आलें होतें. लॉर्ड कर्झनची अरेरावी कारकीर्द व त्याचें

अत्यंत निंद्य व दुष्ट कृत्य बंगालची विभागणी यायोगें सर्व राष्ट्रांत एक नवीन चैतन्य उद्भूत झालें. तेव्हांपासून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ह्या चतुर्विध शस्त्रांचा उपयोग सुरू झाला. कमीअधिक मानानें ह्या गोष्टी सर्वांस मान्य झाल्या. . कित्येक पुढारी लोक उघडपणें याचें मंडन करूं लागले तर कित्येकांस सावधगिरीचें धोरण राखणें बरें वाटलें. राष्ट्रीय पक्ष अस्तित्वांत आला आणि बंगालच्या अनुभवावरून आजवरच्या शेंदीडशें वर्षांतील सरकारच्या वागणुकीचें सूक्ष्म निरीक्षण सुरू झालें. जपानच्या भाग्यरवीचा चाळीस वर्षांचा उदय पाहून हिंदुस्थानांतील उत्साहशाली व देशाभिमानी लोकांस आपल्या सर्वांगी अपकर्षाची ओळख पटली. '**राजा कालस्य कारणम्**' हें राष्ट्रीय राजनीतीचें तत्त्व स्पष्ट डोळयांपुढें उभें राहून इंग्रजी राज्यापासून सर्वस्वीं झालेलें आपलें नुकसान भरून निघावयाचें असल्यास आपणच राजपद घेतलें पाहिजे असें प्रतिपादन करणारा पक्ष आपल्या देशांत उत्पन्न झाला. राष्ट्रीय सभेंत सर्व लोकाग्रणी जमत असतात व त्यांच्याहून दुसरे निःसीम देशभक्त असणें शक्य नाहीं. खरें लोकमत त्या सभेच्या द्वारेंच प्रकट व्हावयाचें व तिनेंच स्वराज्याचा पाया घालावा असें नवीन उद्भवलेल्या राष्ट्रीय पक्षास वाटणें सहज आहे. राष्ट्रीय सभेच्या जुन्या अमदनींत वाढलेल्या व इंग्रज सरकारानें वेळोवेळीं दिलेल्या वचनांवर पूर्ण अविश्वास न झालेल्या लोकांस हें नवीन धोरण अत्यंत उतावीळ-पणाचें वाटूं लागलें. लोकमत व वृद्धमत असें द्विविध झाल्यानें राष्ट्रीय सभेचे मामूल संप्रदाय टिकणें अशक्य झालें. विषयविवेचक सभेंत नव्या विचाराचे लोक यावेत व तिच्या सभासदांच्या निवडणुकीस कांहीं व्यवस्थित स्वरूप असावें असें वाटतां वाटतां १९०७ सालीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत त्या सभासदांची संख्या प्रांतवारी नियमित करण्यांत आली. प्रांताप्रांताच्या मुख्त्यारांनीं एकत्र जमून आपली संख्या भरून यावी या कामीं बहुमतानेंच निर्णय व्हावा असें ठरल्यासारखें होतें; परंतु सुरतेस येथपर्यंत मजल आलीच नाहीं. पुढें जेव्हां राष्ट्रीय सभा भरेल त्या वेळीं विषयविवेचक सभेंत बहुमतानें जें ठरेल तेंच एकमतानें राष्ट्रीय सभेंत पसार व्हावें असें जुन्या व नव्या पक्षांस मान्य होईल तर सर्व काम सुरळीत चालेल.

ही सर्व विचारसरणी मान्य करून काम पूर्ववत् चालावें असें जुन्या पक्षाच्या मंडळीस वाटत नाहीं असें त्यांनीं अस्तित्वांत आणलेल्या कन्व्हेंशनवरून दिसून येत आहे. राष्ट्रीय सभेचें काम अपरिछिन्न कालपर्यंत लांबणीवर टाकलें आहे तें अध्यक्ष या नात्यानें डॉ. राजबिहारी घोष यांनीं टाकलें आहे.

डॉ. राजविहारी घोष यांची अध्यक्षस्थानीं नेमणूक पूर्ण झाली नाहीं असें राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें आहे. स्वागत सभेचे अध्यक्ष मि. मालवी यांचा कांहींच संबंध राहत नाहीं. त्यांनीं सभेचें काम तहकूब केलें नाहीं. डॉ. राजविहारी घोष यांस, ते अध्यक्ष झाले नसल्यानें, तो अधिकार नाहीं. सभा तर बंद पडली; तेव्हां पुढील सभा भरेल तर व भरेल तेव्हां चोविसावी म्हणावी कीं तेविसावी म्हणावी हा एक प्रश्न आहे. विलायतेंतील ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी ही अशीच त्रिशंकूप्रमाणें मध्येंच लोंबकळत पडली आहे. राष्ट्रीय सभेचे 'जनरल सेक्रेटरी' हि वर्षभरच नेमलेले असल्यानें त्यांची वाट काय? असा सर्वच गोंधळ उडून गेला आहे. कोणी म्हणतात कीं 'ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटी' आहे तिनें पुढचें काम करावें, परंतु तिच्याहि कार्याची मर्यादा १९०७ च्या राष्ट्रीय सभेंत एक वर्ष-पर्यंतच ठरलेली आहे. परंतु जुळवावयाचें असल्यास या तात्त्विक प्रश्नामुळें कांहीं विघ्न येईल असा भाग नाहीं. शब्दापेक्षां अर्थावर नजर देऊन वागण्याचें शहाणपण आमच्या लोकांत नाहीं असें आमच्यानें म्हणवत नाहीं, पण हा शहाणपणाचा प्रश्न नसून यांत हेकेखोरपणाचा भाग अधिक दिसत आहे. कन्व्हेन्शनचें मुंबईस झालेलें काम अगदीं गुप्तपणें उरकण्यांत आलें; परंतु (फुटलेल्या गुप्त गोष्टींचा या ठिकाणीं उल्लेख करण्यास हरकत नाहीं.) त्यांत अमक्या शर्तीवर सही करून खुषी असेल तेवढ्यांसच राष्ट्रीय सभेस येतां येईल असें कलम घातलें आहे. अशी अट ठरविणें म्हणजे राष्ट्रांतील कांहीं लोकांस त्यांच्या राजकीय मतां-बद्दल राष्ट्रबाह्य करणें आहे. परदेशी मालावर व परदेशी सरकारच्या देणग्यांवर बहिष्कार घालावा असें मत प्रतिपादण्यास भिणाऱ्या लोकांना आपल्या देशबांधवांवर बहिष्कार घालण्यास दिक्कत वाटत नाहीं असें जगजाहीर करण्यासारखें नाहीं काय? राष्ट्रीय सभा म्हणजे राष्ट्रांतील सर्व लोकांची असा अर्थ नव्हे काय? हल्लीं अस्तित्त्वांत असलेल्या सरकारशीं, तें कांहींहि करो, आम्ही एकनिष्ठेनें वागूं असें प्रसंगीं अप्रसंगीं म्हणणार तेवढाच राजनिष्ठ अशी जोंपर्यंत राजनिष्ठेची व्याख्या नाहीं तोंपर्यंत प्रत्येक कार्याच्या आरंभीं राजनिष्ठेची शपथ घेण्याची जरूरी नाहीं असें आम्हांस वाटतें. त्याचप्रमाणें आमची राजकीय उत्कर्षाची हांव अमक्या मर्यादे-पर्यंतच आहे असें नमूद करणें वेडेपणाचें आहे. राजकीय प्रगतीसंबंधानें सर्व व्यक्तींच्या आकांक्षा एकच असाव्यात असा हट्ट जुन्या पक्षाच्या मंडळीस कां असावा हें ताडणें फार कठीण नाहीं. परकी सरकारच्या जुलमी अमलानें हे लोक भेदरून गेले आहेत. पृथ्वींतील सर्व माणसें परमेश्वरानें सारखीं निर्माण केलीं आहेत हें सामान्य तत्त्व त्यांच्या बुद्धींतून गेलें आहे असें विधान आमच्या हातून

करवत नाहीं. परंतु आपल्या देशांतील लोकांपेक्षां त्यांचा संबंध सरकाराशीं अधिक असल्यानें लोकांच्या प्रस्तुत सामर्थ्याविषयीं किंवा यत्न करून त्यांच्यांत येणें शक्य आहे त्या सामर्थ्याविषयीं जितके विचार त्यांच्या मनांत घोळावेत तितके घोळत नाहींत. प्राय: त्यांच्या मनांतील सर्व जागा सरकाच्या अपरंपार सामर्थ्याच्या व वैभवाच्या गोष्टीनें व्यापून गेली आहे. १२० कोटि द्रव्य सरकारच्या गांठीं दरसाल पडतें एवढें त्यांना दिसतें. काळें गोरें मिळून दोन लाख सैन्य सरकारच्या पदरीं आहे एवढें त्यांच्या मनोनेत्रांपुढें उभें राहतें. पोलिसपाटलापासून गव्हर्नर जनरल किंबहुना स्टेट सेक्रेटरीपर्यंत बिनबोभाट चाललेल्या राज्यकारभाराची शिस्त त्यांची छाती दडपून टाकते. इंग्रजांचें आरमार, इंग्रजांचा व्यापार व तारायंत्र, टपाल व आगगाड्या हीं नोकरखातीं व एकंदर इंग्रजांचा दिमाख हीं पाहून त्यांच्या पोटांत स्वावमानता उत्पन्न होऊन त्यांना भावी कालाविषयीं पूर्ण निराश करून टाकते. यामुळें सरकारच्या छळणुकीचें स्वरूप जरा उग्र झालें कीं त्यांचें धाबें दणाणून जातें.

१२० कोटि वसूल देणारीं माणसें आपल्या देशांत आहेत व तीं **माणसें** आहेत व तीं एकजुटीनें करतील तर काय न करतील हें समजण्याइतकी बुद्धिमत्ता जुन्या पक्षांतील लोकांत आहे, परंतु या दिशेनें तीव्र विचार करण्यास कोणांस फावलें आहे असें दिसत नाहीं. त्यांतील बहुतेक मंडळी आजपर्यंतच्या सुखासमाधानाच्या राजकीय चळवळींत वाढलेली असल्यानें अलीकडील जपानी मर्दानीचे विचार त्यांच्या डोक्यांत शिरण्यास राजकीय चळवळ किंवा स्वदेशहितचिंता हाच ज्यांचा अष्टौप्रहर व्यवसाय आहे अशा कार्यकर्त्या पुरुषांचीच आज जरूर आहे. वर्षानुवर्षें वकील, वैद्यकी किंवा खाजगी शाळांतील शिक्षकी करून सालाच्या अखेर चार-दोन दिवस, वर्षभर फुरसतीच्या वेळांत मिळविलेल्या ज्ञानाच्या पुंजीवर, राष्ट्रीय सभेच्या कामगिरीस हजर होणाऱ्या माणसांनीं यापुढें राष्ट्रीय प्रगतीचा गाडा ओढला जाणें शक्य नाहीं. प्रचंड कार्यास प्रचंड स्वार्थत्याग लागतो. गोडगोड गोष्टी बोलून राजकर्त्यांनीं आजवर दिवस काढले, त्या वेळीं तसल्याच राजकीय चळवळयांचें काम होतें, परंतु आतां लोकांचे डोळे उघडले आहेत. आतां त्यांना अधिक जोमाचे व अधिक स्वार्थत्यागाचे पुढारी हवे आहेत. लोकांना योग्य वळण लावावयाचें म्हणजे त्यांची चांगली समजूत पटेल अशा रीतीनें त्यांच्यांत जाऊन बोललें पाहिजे. त्यांचे गैरसमज असतील तर ते दूर केले पाहिजेत. त्यांच्यांत स्वत:च्या कर्तबगारीविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली पाहिजे म्हणून व्यवस्थित प्रयत्न केले पाहिजेत. अशा प्रकारचे प्रयत्न जुन्या पक्षांतील लोकांकडून

होऊं लागले म्हणजे त्यांच्यांतील जुनेपणा नाहींसा झाला. ना. गोखले यांच्यामध्यें जुन्या पक्षाचा भेकडपणा नसल्यामुळें त्यांचे उद्गार जहाल म्हणून नांवाजलेल्या राष्ट्रीय पक्षासच अधिक मिळते असतात. जुन्या पक्षांतील मंडळी नव्या पक्षांत किंवा त्यांच्या विचारांत येऊन पडण्यास नामदार गोखले व त्यांचा भारतसेवक-समाज हा एक सोनेरी पूलच आहे असें आमच्या मनानें घेतलें आहे. मि. मोर्ले किंवा मिंटो किंवा कोणीहि बारीक मोठा इंग्रज अंमलदार आमच्या देशाचें कायम कल्याण करूं शकणार नाहीं. तें आपल्या लोकांकडूनच घडून यावयाचें आहे असें प्रकारांतरानें जाहीर केलें आहे. स्वराज्य हेंच आपलें अंतिम साध्य आहे असेंहि प्रकारांतरानें जाहीर केलें आहे. इतर कोणत्याहि देशांत ज्याप्रमाणें लोक आहेत त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्या देशांत असलें पाहिजे. आपल्या देशबांधवांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांस कोणतीच इयत्ता मी घालूं इच्छीत नाहीं; असें अनेक वेळां म्हणणारानें ‘ वसाहतीचें स्वराज्य ’ हें राष्ट्रीय सभेचें साध्य म्हणणारांच्या नादीं लागावें व तसा लेख सहीनिशीं देण्याचें कबूल करील त्यासच राष्ट्रीय सभेंत घ्यावें असें प्रतिपादन करावें, हें अशक्य आहे व तसें जर तें करीत असतील तर त्यांत कांहींतरी राष्ट्रहिताचा मतलब असावा असें समजून श्रद्धापूर्ण अंतःकरणानें त्यांच्या करण्या-बोलण्यांत छिद्रें काढून गैरसमज वाढवूं नये. त्यांच्यासारखेच लोक कार्यासाठीं अविश्रांत परिश्रम करणारे असतील त्यांचे अंतस्थ हेतु शुद्ध आहेत असें गृहीत धरून जर लोक वागतील व वर्तमानपत्रेंहि हेंच धोरण राखून ज्याचा त्यास देशहित साधनाचा मार्ग अवलंबविण्यास पूर्ण मुभा ठेवतील तर हल्लींपेक्षां आमची प्रगति लवकर होईल असें आम्हांस वाटतें. सर्व पुढाऱ्यांनीं एकत्र जुळून जें काम करावयाचें तें फार थोडें होईल, पण तेवढ्या निमित्तानें एकत्र जुळून प्रेमानें व मोकळेपणानें बोलण्यास तरी संधि मिळेल. अशा ठिकाणीं जे ठराव होतील ते सर्वांचें एकमत ज्यावर होणें शक्य आहे अशाच विषयावर केलेले असावेत. त्या सभेंत निघण्याच्या विषयासंबंधानें अगोदर विषयविवेचक सभा भरून पूर्वीं लिहिल्या-प्रमाणें बहुमतानें ठराव करून ते सर्वमान्य रीतीनें राष्ट्रीय सभेंत पसार करावे, हा मार्ग सोडून जुन्या पक्षानें राष्ट्रीय सभेस येण्यास अटी घालण्याचें काम चालू केलें आहे; तें मात्र लॉर्ड कर्झननें बंगालची विभागणी करून आमचें नुकसान केलें नाहीं इतकें नुकसान करण्यास कारण होत आहे. बाह्यशत्रूंपेक्षां अन्तःशत्रूंच्या हातून आमची हानि फार होण्याचा संभव आहे. यासाठीं नेमस्त पक्षानें जहाल पक्षास सोडून द्यावें असें जें कित्येक इंग्रजांचें व इंग्रजी वर्तमान-

पत्रांचें म्हणणें आहे त्यास यश येऊं नये अशी आमची इच्छा आहे. राष्ट्रीय पक्ष प्रतिपादीत आहे तीं राजकीय तत्त्वें कोणाहि विचारी माणसास सहज नाहीं तरी विचाराअंतीं पटणारीं आहेत. जुन्या पक्षास वेगळें करून सरकार आपला मतलब साधील, पण जुन्या पक्षाचें कार्य काय साधेल हें आम्हांस बिलकुल कळत नाहीं. जुन्या पक्षाचें राजकीय साध्य काय आहे व नवीन पक्षाचें साध्य कोणतें व त्यांत फरक आहे कीं काय ह्या गोष्टीचा थोडासा विचार केला तर वाचकांच्या ध्यानीं हल्लींच्या प्रसंगाचें महत्त्व चांगलें येईल असें आम्हांस वाटतें.

हल्लीं जे लोक आपणांस नेमस्त म्हणवितात त्यांच्या मनांत आपल्या राष्ट्रास सर्व प्रकारें स्वातंत्र्य मिळावें असें वाटत नाहीं असें म्हणण्यास कांहीं प्रमाण नाहीं. प्रत्यक्ष आणि अनुमान अशीं दोन प्रमाणें या ठिकाणीं शक्य आहेत. आपल्या मनांत काय आहे हें स्पष्ट बोलून दाखविणें हें परतंत्र राष्ट्रांतच नव्हे तर स्वतंत्र म्हणून गणलेल्या राष्ट्रांतहि शक्य नाहीं. त्यांत कमीअधिक मानानें स्पष्ट बोलणारे लोक असतात. सामान्य व्यवहारांतसुद्धां, यजमानापुढें नोकर खरें पण अप्रिय बोलूं शकत नाहीं, नेहमींच्या गिऱ्हाइकाच्या मुरवतीसाठीं व्यापारीसुद्धां जपूनच बोलतो, शिक्षकास आपल्या बोलण्यानें दुखविण्याची गोष्ट शिष्याच्या जिवावर येते, सारांश; या सर्व ठिकाणीं आपला मतलब सोडून न देतां दुसऱ्याचें मन दुखविण्याचें टाळणें फार कठीण आहे. तें साधल्यास आपण त्यास व्यवहार-चतुर हें पद मोठ्या सन्मानानें लावतों. हा प्रकार साधारण व्यवहार व सामान्य मुरवतीपुरता आहे; परंतु यजमान, गिऱ्हाईक किंवा शिक्षक सह्य मर्यादेबाहेर जाईल तेव्हां मग तद्विशीं संबंध तोडणें हेंच शक्य असतें. हाच न्याय स्वतःच्या किंवा परक्या सरकारसंबंधानें आहे. हिंदुस्थान देशांत काय किंवा पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याहि देशांत असे कित्येक लोक असावयाचेच कीं त्यांना राज्य कोणाचें व कशा प्रकारचें आहे याची दादसुद्धां नसते. सुरक्षित व सुखावह राज्य असलें म्हणजे त्यांचा संतोष असतो. कदाचित् तसें नसलें तर तें दुःख व त्रास सोसून आपल्या दैवावर सर्व भार घालून गप्प बसतात, परंतु अशा बेफिकीर लोकांच्या बुद्धीवर किंवा प्रयत्नांवर राज्याच्या घडामोडी किंवा व्यवस्था गैरव्यवस्था अवलंबून असत नाहीं. कांहीं थोडेच लोक या कामांत लक्ष घालणारे असतात; पुढारी व अनुयायी यांच्यावर सर्व राज्यभार असतो. ते लावतील तें वळण राज्यकारभारास लागत असतें, परंतु स्वतंत्र राष्ट्रांतील लोक व राज्यसत्ता यांच्या-मध्यें कलह झाला व यादवी युद्ध झालें तरी एकंदरींत राष्ट्राचें कायमचें नुकसान फारसें होत नाहीं व कलहाचा निकालहि एकदोन पिढ्यांच्या आंत लागतोच

लागतो. परंतु दुर्दैवानें एक राष्ट्र दुसऱ्याच्या पारतंत्र्यांत सांपडलें असलें व जिंकणाऱ्या राष्ट्रास आपल्या अंकिताचें पूर्ण चंदन करून टाकण्यास सवड देण्याइतकी गाढ निद्रा जित राष्ट्रास दीर्घकालपर्यंत आली असली म्हणजे सर्वच आटोपलें. अशा गाढ निद्रेंतून आपलें राष्ट्र ज्यांस जागें करावयाचें असेल त्यांच्यापुढें फार नाजूक व कठीण कामगिरी असते. पिढ्यान्‌पिढ्या दास्यांत ज्यांचा काल गेलेला असतो अशा लोकांस आपण दास्याहून श्रेष्ठ अशा स्थितीस पात्र आहों अशी कल्पनाच येत नाहीं. चौदा वर्षें तुरुंगांत असलेल्या एका कैद्यास सुटका झाल्यावर कसेंसेंच होऊं लागलें अशी गोष्ट सांगतात, तींत पुष्कळ तथ्य आहे. ‘आंधळा मुलगा’ म्हणून एक सुंदर कवन आहे त्यांत लोक आपली कींव कां करतात, ‘अरेरे, बापडा’ असें कां म्हणतात हें त्यांस कळत नव्हतें व आपण निजतों ती रात्र व जागे असतों तो दिवस असें आपलें स्वातंत्र्य असल्यानें तो सदैव आनंदानें गात असे आणि स्वतःस राजाप्रमाणें सुखी मानीत असे. अशाप्रमाणेंच राष्ट्रबुद्धिच्युत जनसमूहांत राष्ट्रत्वाची जागृति उत्पन्न करण्यास मोठे कष्ट होतात व ते कष्ट फलद्रूप होण्यापूर्वींच जिंकणाऱ्या लोकांच्या मायावी वर्तनाचा त्याच्यावर पगडा बसतो कीं काय अशी भीति पडते. एकीकडे प्रेमळ वर्तनाच्या मोहिनीनें जनसमूहास झडपून टाकणें आणि दुसरीकडे लोकजागृतीसाठीं झटणाऱ्या लोकांचा नाना प्रकारें नाहक छळ करणें या जोडगोळीच्या माऱ्याखालीं जित लोकांचें डोकें वर कसें निघावें ही मोठी पंचाईत पडते. यास उपाय एकच. लोकांचे प्रयत्न सरकारच्या प्रयत्नापेक्षां बलवत्तर झाले पाहिजेत. सरकारचा अधिकार, त्याची व्यवस्थितपणें चाललेली अंमलबजावणी व सर्वांत महत्त्वाची गोष्ट त्याचें लोकांवरील प्रभुत्व या साधनांनीं त्याच्यापुढें लोकांचें काय चालणार या विचारानें ते सर्व गांगरून जातात. यासाठीं ही सरकारची सर्व सत्ता लोकांच्या अज्ञानावर व भ्याडपणावर अवलंबून आहे. खरी सत्ता लोकांचीच आहे अशी समजूत पडली म्हणजे जुलमी राज्याधिकाराचा अंतकाल समीप आलाच म्हणावयाचें. या सर्व गोष्टी आमच्यांतील नेमस्त व जहाल किंवा जुना व नवा पक्ष या उभयतांस सारख्याच समजतात व त्या समजून जें कार्य व्हावयाचें तें उभयतांसहि सारखेंच पाहिजे आहे. परकीय राज्य जित लोकांस सुखावह होणें अशक्य आहे, परकी लोक नेहमीं आपमतलबी असणार व जित लोकांस अज्ञानी, आळशी व दुर्बळ ठेवून त्यांची श्री, धी व कीर्ति नष्ट करणार हें ठरल्यासारखेंच तत्त्व आहे, हें न समजण्याइतका मंदबुद्धि कोणीं असूं शकत नाहीं. व्यापाराच्या रूपानें, हर एक उत्पादक हुन्नराच्या रूपानें, सर्व देश धुऊन चालला आहे हें न

दिसण्याइतका अंध कोण आहे? पण हें जाणणारे सर्व शिक्षित लोक निरनिराळ्या मार्गानें देशहित साधूं पाहतात; त्यांनीं एकोप्यानें एकत्र काम केलें नाहीं तरी परस्परांविषयीं दुर्बुद्धिमूलक वाटेल असा चकार शब्द काढूं नये यांतच खरें राष्ट्रहिताचें चिन्ह आहे. आमच्या या देशांत जितका परस्परप्रेमभाव वसेल तितका पाहिजे आहे. कांहीं महत्त्वाच्या गोष्टींत पूर्ण एकमत असलेले खरे देशभक्त, वैरी आहेत असें भासावें ह्याहून राष्ट्रहितविघाताची दुसरी गोष्ट क्वचितच असेल. सर्व देशभक्तांनीं आपण ज्या गोष्टींत एकमताचे आहों तेवढ्यापुरतें एकत्र काम करावें अशाबद्दल परिश्रम करून तेवढ्या गोष्टींत तरी राज्यकर्त्यांनीं हार खाल्ली पाहिजे, अशी परिस्थिति राष्ट्रांत जुळवून आणण्यास हरकत नाहीं. सर्व लोकांनीं एक-दिलानें एवढीशी गोष्ट मागितली तर ती साध्य होते असें ऐक्याचें तत्त्व देशांतील लोकांच्या मनावर बिंबलें तर लहानसहान काम होईल असें नाहीं. एक एक हक्क अभेद्य लोकमताच्या जोरावर मिळण्याचा संभव आहे म्हणून विद्यमान राज्यपद्धतीचा अंत किंवा विनाश हें आपलें साध्य न कल्पितां तिच्या साहाय्यानेंच आपल्या उत्क्रान्तीचा गाडा पुढें पुढें ढकलीत नेणें शक्य आहे व तो तसा नेण्यांतच आमचें कल्याण आहे, असा संथ क्रम चालू ठेवण्याचें सोडून केवळ तात्त्विक विचाराचें उद्‌घाटन करून असाध्य साधनाचा निंद्य नसला तरी मूढ क्रम अवलंबिण्याचें धाडस करणें सर्वस्वीं विघातक आहे. यानें हित तर कांहीं नाहींच पण आपल्या प्रचंड सत्तेनें सरकार निमिषार्धांत सर्व राजकीय चळवळींचा चुराडा उडवील. या जगन्नाथ-पुरीच्या रथाखालीं चूर होण्यापेक्षां जीव राखून आस्ते आस्ते आपलें पाऊल पुढें पडेल असा पोक्त विचार करणें हेंच सर्व समंजस देशभक्तांस प्रशस्त वाटतें. सरकार सर्व शक्तिमान् आहे, आणि तें आपल्यास वाटेल तेव्हां न्यायाचा अन्याय व अन्यायाचा न्याय करून चकित व हताश करतें म्हणून घाबरून जाण्याचें कारण नाहीं. आपली शक्ति सावधपणानें वाढवावी, आपल्या सामाजिक रीतीभाती सुधाराव्या, जातिभेदासारख्या अंतर्भेद उत्पन्न करणाऱ्या संस्था मोडाव्या, लोकांत गाढ अज्ञानांधकार पसरला आहे तो ज्ञानाची मशाल कोन्याकोपऱ्यांत नेऊन दूर पळवावा, हिंदु, मुसलमान, पारशी ख्रिस्ती या धर्मभेदांच्या योगानें उत्पन्न होणारें वैमनस्य नष्ट होऊन विस्तृत देशाभिमानाचा पगडा राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या मनावर बसवावा. हीं कामें शांतपणानें करावीं म्हणजे परराज्य पूर्णपणें नाहींसें झालें नाहीं तरी त्याचें वर्चस्व केवळ नांवापुरतें राहील व खरोखर आपलें स्वराज्य चोहोंकडे नांदूं लागेल.

येथवर नेमस्त पक्षाचें किंवा आम्ही ज्याला जुना पक्ष म्हणतों त्याचें म्हणणें आम्हांस शक्य तितक्या सरळपणानें मांडलें आहे. वसाहतींतील स्वराज्य हिंदुस्थानचें साध्य आहे किंवा साम्राज्यांतर्गत स्वराज्य हेंच आपणांस हवें आहे असें म्हणणारा पक्ष तो आज जुना पक्ष आहे. लॉर्ड मिंटो, मि. मोर्ले किंवा इंग्रज पत्रकार व बहुतेक गोरे लोक या जुन्या पक्षासहि चांदोबा मागणारे म्हणजे केवळ तत्त्वचिंतक किंवा असाध्यसाधनेच्छु म्हणत आहेत. तरी पण अशांचा पाठिंबा आपणांस असावा अशी परमेश्वराजवळ प्रार्थना मि. मोर्लेसाहेब करीत आहेत. या पक्षास अंजारून गोंजारून घ्यावें अशी त्यांनीं क्लृप्ति काढली आहे. त्यांच्या जाळ्यांत सांपडून आपल्या देशबंधूंचा धिक्कारपूर्वक परित्याग करण्याचा जुन्या पक्षाचा बेत दिसून येत आहे. किंबहुना असंभिन्न स्वराज्यवादी किंवा ब्रिटिश सत्तेपासून अलिप्त नसलें तरी पूर्ण स्वतंत्र असें स्वराज्य हेंच हिंदुस्थानवासी लोकांचें साध्य आहे असें प्रतिपादन करणारे लोक आमच्या राजकीय चळवळींत नसावेत, त्यांचा आपला योग नसावा असें म्हणणारा पक्ष तोच जुना पक्ष अशी या जुन्या पक्षाची व्याख्या करण्याची वेळ आली आहे. कारण दोघांचें अंतिम साध्य एक आहे, पण आज कॉंग्रेससारख्या सभांमध्यें त्या अंतिम साध्याचें नांव निघूं नये किंवा तसले विचार आमच्या मनांत नाहींत असें स्पष्ट नमूद करून ठेवावें आणि तसें नमूद केलेला करार हेंच राष्ट्रीय सभेंत बसणाऱ्या लोकांचें राजधर्ममत, याहून इतरांवर त्यांची श्रद्धा नाहीं अशी बालंबाल खात्री राज्यकर्त्यांची झाली पाहिजे असा कन्व्हेन्शनरूपी पुराणपक्षवादी संघाचा आग्रह आहे. नव्या पक्षाच्या न नव्या पक्षाइतकी राजकीय चळवळींत मजल पोहोंचली नाहीं तरी नव्या पक्षांत गणण्यास हरकत नाहीं अशांच्या मतें हा श्रद्धालेख अनावश्यक, अप्रासंगिक, अन्याय्य व अविचारदर्शक आहे. नवीन तऱ्हेची म्हणजे पाश्चात्त्य देशांतील इतिहास वाचून सुरू असलेली, अर्ज, प्रार्थना व निषेध या त्रयींच्या रूपानें व्यक्त होणारी, युक्तिवादानें राज्यकर्ते वळतात या दृढ श्रद्धेनें प्रेरिलेली चळवळ आपल्या देशांत पन्नास वर्षांवर चालू आहे. राष्ट्रीय सभा तर आज तेवीस वर्षें भरत आहे. परंतु इतक्या वर्षांत आज सुचविलेल्या प्रतिज्ञालेखाची जरूर भासली नाहीं. तशा प्रकारचा लेख प्रत्येक सभासदानें दिला तर अमक्या अमक्या मागण्या कबूल करूं असें सरकारनें म्हटलें नाहीं. कित्येक लोकांचीं बहुत विचाराअंतीं कांहीं राजकीय मतें ठाम ठरलीं आहेत व त्यांच्या प्रचारासाठीं ते प्रामाणिकपणें यत्न करीत आहेत, तथापि ते सर्व लोकांबरोबर राष्ट्रीय सभेंत काम करण्यास सिद्ध आहेत. ज्यावर सर्वांचें एकमत आहे असेच

ठराव पुढें आले तर त्यांस आपल्या मताची पुष्टि देण्यास तयार आहेत अशा आपल्या राष्ट्रबंधूंस त्यांच्या मताविरुद्ध एखादा लेख पुढें करून त्यावर सही करा, तरच आंत या, असें म्हणणें अन्यायाचें आहे. राष्ट्रीय सभा राष्ट्रांतील सर्व लोकांची आहे, अमक्याच मताच्या लोकांची आहे असें नाहीं तर मग तींतून कांहीं लोकांस म्हणजे राष्ट्राच्या एका भागास बाहेर ठेवणें हें अन्याय्य आहे. प्रस्तुत सरकारचे कायदे कोणी मोडीत नाहीं त्याअर्थीं ते सर्व प्रजाजनापैकीं आहेत व सरकारांनीं त्यांना जोंपर्यंत बहिष्कृत केलें नाहीं तोंपर्यंत त्यांचा तेथें येण्याचा हक्क आहे. अपवादप्रसंगीं सरकारचे जुलमी किंवा अन्यायाचे कायदे मोडून ते लोकमताच्या बलानें जरूर दुरुस्त करण्याचा यत्न करणें न करणें हा निराळा प्रश्न आहे. प्रस्तुत प्रसंगीं राष्ट्रीय सभेपुरता विचार आहे. त्या वेळीं प्रत्येक राजनिष्ठ प्रजाजनाचा त्या सभेंत बसण्याचा हक्क आहे व तो काढून घेणें अन्यायाचें आहे.

साम्राज्यांतर्गत स्वराज्य किंवा वसाहतीचें स्वराज्य हें आमचें राजकीय साध्य आहे असा प्रतिज्ञालेख लिहून घेऊन मग राष्ट्रीय सभेंत प्रवेश व्हावयाचा हें अनावश्यक, अप्रासंगिक व अन्याय्य कसें आहे हें वाचकांच्या लक्षांत आलें तरी त्यांची विचाराच्या कसोटीस उतरण्याइतकी योग्यता नाहीं. हा भाग ध्यानीं आणला म्हणजे या मागण्याचा वेडसरपणा पूर्ण लक्षांत येण्याजोगा आहे. ज्यांना खूष करावें म्हणून हा यत्न आहे ( असें कित्येक आक्षेपक म्हणतात ) त्यांना तर यापासून संतोष आहे; हें मत प्रतिपादन करणारांच्या मतासाठीं इंग्रज लोक किंवा अधिकारी त्यांना जवळ करतात असें बिलकुल नाहीं. त्याचें कारण निराळेंच आहे. प्रजाजनांपैकीं कोणीच आपल्यास अनुकूल नाहीं असें असणें घातक आहे किंवा दिसण्यांतहि ठीक नाहीं, किंवा इंग्लंडांतल्या बहुजनसमाजास पसंत पडण्याजोगें नाहीं. यासाठीं त्यांतल्यात्यांत दगडापेक्षां वीट मऊ म्हणून नेमस्त मंडळीचें कवच आपल्या अंगावर मि. मोर्लेप्रभृति मंडळी चढवीत आहे. देण्याचा विचार निघाला म्हणजे बहुतेक पूज्यच. बोलाची कढी बोलाचा भात. तुम्ही बरे, आम्ही बरे. या शुष्काशुष्की मान बहुमानासाठीं आपल्या आवेशयुक्त देशबांधवांचा असंतोष करून त्यांना पार झुगारून द्यावयाचें हें अगदीं अप्रशस्त आहे. आज पन्नास वर्षांत न्यायान्याय विचार काय झाला आहे, नामदार न्यायमूर्ति रानडे, तेलंग, दादाभाई, सर फिरोजशा मेथा असली आमच्या इलाख्यांतील मंडळी व इतर प्रांतांतील असलींच धेंडें सारी बुद्धि खर्चून जेथें रितें माप पदरीं घेऊन बसलीं, मग आतांच्या मंडळीस यश येणार आहे तें तितकेंच.

येथवर नेमस्त पक्षाचें किंवा आम्ही ज्याला जुना पक्ष म्हणतों त्याचें म्हणणें आम्हांस शक्य तितक्या सरळपणानें मांडलें आहे. वसाहतींतील स्वराज्य हिंदुस्थानचें साध्य आहे किंवा साम्राज्यांतर्गत स्वराज्य हेंच आपणांस हवें आहे असें म्हणणारा पक्ष तो आज जुना पक्ष आहे. लॉर्ड मिंटो, मि. मोर्ले किंवा इंग्रज पत्रकार व बहुतेक गोरे लोक या जुन्या पक्षासहि चांदोबा मागणारे म्हणजे केवळ तत्त्वचिंतक किंवा असाध्यसाधनेच्छु म्हणत आहेत. तरी पण अशांचा पाठिंबा आपणांस असावा अशी परमेश्वराजवळ प्रार्थना मि. मोर्लेसाहेब करीत आहेत. या पक्षास अंजारून गोंजारून घ्यावें अशी त्यांनीं क्लृप्ति काढली आहे. त्यांच्या जाळ्यांत सांपडून आपल्या देशबंधूंचा धिक्कारपूर्वक परित्याग करण्याचा जुन्या पक्षाचा बेत दिसून येत आहे. किंबहुना असंभिन्न स्वराज्यवादी किंवा ब्रिटिश सत्तेपासून अलिप्त नसलें तरी पूर्ण स्वतंत्र असें स्वराज्य हेंच हिंदुस्थानवासी लोकांचें साध्य आहे असें प्रतिपादन करणारे लोक आमच्या राजकीय चळवळींत नसावेत, त्यांचा आपला योग नसावा असें म्हणणारा पक्ष तोच जुना पक्ष अशी या जुन्या पक्षाची व्याख्या करण्याची वेळ आली आहे. कारण दोघांचें अंतिम साध्य एक आहे, पण आज कॉंग्रेससारख्या सभांमध्यें त्या अंतिम साध्याचें नांव निघूं नये किंवा तसले विचार आमच्या मनांत नाहींत असें स्पष्ट नमूद करून ठेवावें आणि तसें नमूद केलेला करार हेंच राष्ट्रीय सभेंत बसणाऱ्या लोकांचें राजधर्ममत, याहून इतरांवर त्यांची श्रद्धा नाहीं अशी बालंबाल खात्री राज्य-कर्त्यांची झाली पाहिजे असा कन्व्हेन्शनरूपी पुराणपक्षवादी संघाचा आग्रह आहे. नव्या पक्षाच्या न नव्या पक्षाइतकी राजकीय चळवळींत मजल पोहोंचली नाहीं तरी नव्या पक्षांत गणण्यास हरकत नाहीं अशांच्या मतें हा श्रद्धालेख अनावश्यक, अप्रासंगिक, अन्याय्य व अविचारदर्शक आहे. नवीन तऱ्हेची म्हणजे पाश्चात्त्य देशांतील इतिहास वाचून सुरू असलेली, अर्ज, प्रार्थना व निषेध या त्रयींच्या रूपानें व्यक्त होणारी, युक्तिवादानें राज्यकर्ते वळतात या दृढ श्रद्धेनें प्रेरिलेली चळवळ आपल्या देशांत पन्नास वर्षांवर चालू आहे. राष्ट्रीय सभा तर आज तेवीस वर्षें भरत आहे. परंतु इतक्या वर्षांत आज सुचविलेल्या प्रतिज्ञालेखाची जरूर भासली नाहीं. तशा प्रकारचा लेख प्रत्येक सभासदानें दिला तर अमक्या अमक्या मागण्या कबूल करूं असें सरकारनें म्हटलें नाहीं. कित्येक लोकांचीं बहुत विचाराअंतीं कांहीं राजकीय मतें ठाम ठरलीं आहेत व त्यांच्या प्रचारासाठीं ते प्रामाणिकपणें यत्न करीत आहेत, तथापि ते सर्व लोकांबरोबर राष्ट्रीय सभेंत काम करण्यास सिद्ध आहेत. ज्यावर सर्वांचें एकमत आहे असेच

ठराव पुढें आले तर त्यांस आपल्या मताची पुष्टि देण्यास तयार आहेत अशा आपल्या राष्ट्रबंधूंस त्यांच्या मताविरुद्ध एखादा लेख पुढें करून त्यावर सही करा, तरच आंत या, असें म्हणणें अन्यायाचें आहे. राष्ट्रीय सभा राष्ट्रांतील सर्व लोकांची आहे, अमक्याच मताच्या लोकांची आहे असें नाहीं तर मग तींतून कांहीं लोकांस म्हणजे राष्ट्राच्या एका भागास बाहेर ठेवणें हें अन्याय्य आहे. प्रस्तुत सरकारचे कायदे कोणी मोडीत नाहीं त्याअर्थीं ते सर्व प्रजाजनापैकीं आहेत व सरकारांनीं त्यांना जोंपर्यंत बहिष्कृत केलें नाहीं तोंपर्यंत त्यांचा तेथें येण्याचा हक्क आहे. अपवादप्रसंगीं सरकारचे जुलमी किंवा अन्यायाचे कायदे मोडून ते लोकमताच्या बलानें जरूर दुरुस्त करण्याचा यत्न करणें न करणें हा निराळा प्रश्न आहे. प्रस्तुत प्रसंगीं राष्ट्रीय सभेपुरता विचार आहे. त्या वेळीं प्रत्येक राजनिष्ठ प्रजाजनाचा त्या सभेंत बसण्याचा हक्क आहे व तो काढून घेणें अन्यायाचें आहे.

साम्राज्यांतर्गत स्वराज्य किंवा वसाहतीचें स्वराज्य हें आमचें राजकीय साध्य आहे असा प्रतिज्ञालेख लिहून घेऊन मग राष्ट्रीय सभेंत प्रवेश व्हावयाचा हें अनावश्यक, अप्रासंगिक व अन्याय्य कसें आहे हें वाचकांच्या लक्षांत आलें तरी त्यांची विचाराच्या कसोटीस उतरण्याइतकी योग्यता नाहीं. हा भाग ध्यानीं आणला म्हणजे या मागण्याचा वेडसरपणा पूर्ण लक्षांत येण्याजोगा आहे. ज्यांना खूष करावें म्हणून हा यत्न आहे ( असें कित्येक आक्षेपक म्हणतात ) त्यांना तर यापासून संतोष आहे; हें मत प्रतिपादन करणारांच्या मतासाठीं इंग्रज लोक किंवा अधिकारी त्यांना जवळ करतात असें बिलकुल नाहीं. त्याचें कारण निराळेंच आहे. प्रजाजनांपैकीं कोणीच आपल्यास अनुकूल नाहीं असें असणें घातक आहे किंवा दिसण्यांतहि ठीक नाहीं, किंवा इंग्लंडांतल्या बहुजनसमाजास पसंत पडण्याजोगें नाहीं. यासाठीं त्यांतल्यात्यांत दगडापेक्षां वीट मऊ म्हणून नेमस्त मंडळीचें कवच आपल्या अंगावर मि. मोर्लेप्रभृति मंडळी चढवीत आहे. देण्याचा विचार निघाला म्हणजे बहुतेक पूज्यच. बोलाची कढी बोलाचा भात. तुम्ही बरे, आम्ही बरे. या शुष्काशुष्की मान बहुमानासाठीं आपल्या आवेशयुक्त देशबांधवांचा असंतोष करून त्यांना पार झुगारून द्यावयाचें हें अगदीं अप्रशस्त आहे. आज पन्नास वर्षांत न्यायान्याय विचार काय झाला आहे, नामदार न्यायमूर्ति रानडे, तेलंग, दादाभाई, सर फिरोजशा मेथा असली आमच्या इलाख्यांतील मंडळी व इतर प्रांतांतील असलींच धेंडें सारी बुद्धि खर्चून जेथें रितें माप पदरीं घेऊन बसलीं, मग आतांच्या मंडळीस यश येणार आहे तें तितकेंच.

उगीच आशेला गुंतून फसण्यांत अर्थ नाहीं. स्वच्छ आपल्या लोकांसमोर निराशेचा नगारा वाजवावा व आपलें काम आपण करण्यास आव्हान करावें हें चांगलें. दोन भिन्न राष्ट्रांच्या हिताहिताचे संबंध जेथें येतात तेथें दुर्बळ जितानें किती बुद्धिवाद केला व किती दांतांच्या कण्या केल्या तरी लभ्यांश कांहीं नाहीं. जपाननें सर्व कारभार आपल्या हातांत असल्यानें कशी कमाई केली ! त्यातलें इंगित स्वातंत्र्य हेंच आहे. असें बोलणाऱ्या पक्षास आपला म्हणण्याशिवाय गत्यंतर नाहीं. जितका विलंब तितका घात. जितका मोह तितका नाश. शीघ्र जागृति व दीर्घ उद्योग यांतच तरणोपाय आहे. प्रत्येक गोष्टींत दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी प्याल्यानें तहान भागावयाची नाहीं. ठसका मात्र लागावयाचा. प्राण राहिला तर आश्चर्य. वित्त व जीविताचें रक्षण, शिक्षण, आरोग्यरक्षण, दळणवळण, परस्पर-वादनिर्णय, व्यवस्थित कारभार या सहा गोष्टी परकी सरकार करतें त्या आपल्या लोकांस योग्य रीतीनें करतां येणें अशक्य नाहीं. पूर्वीं चालल्या त्याच; असें उघड उघड म्हणणारा पक्ष तोच राष्ट्रीय पक्ष. सरकारच्या प्रमुख कामगिऱ्यांपैकीं शक्य तेवढ्या स्वतः कराव्या हेंच त्या पक्षाचें सांगणें. ज्या त्या स्वतंत्र राष्ट्रांत आपल्या उत्कर्षाच्या हरएक बाबी पाहणें हें सरकारचें काम आहे आणि आपलें राष्ट्र स्वतंत्र असतें तर येथील सरकारनें या गोष्टीकडे पूर्ण लक्ष पोहोंचविलें असतें. परतंत्र लोकांसहि कामें स्वतः करून आपला उत्कर्ष साधणें जरूर आहे.

दीर्घकाल पारतंत्र्यांत गेला असल्यानें, लोकांतील अक्कलहुशारी व कर्तृत्वशक्ति तसेंच पराक्रम व शरीरसामर्थ्य या सर्व गोष्टी नष्ट किंवा नष्टप्राय झालेल्या असतात. परंतु एकदा कां राष्ट्रत्व जागृति झाली आणि या गोष्टींची कमतरता ओळखून त्यांच्या प्राप्तीची इच्छा उत्पन्न झाली म्हणजे उदयकाल समीप आला म्हणून समजावें. जिगीषा म्हणजे विजयेच्छा तीव्र झाली म्हणजे सर्व कांहीं होत असतें. परंतु संसारांत लंपट झालेल्या माणसास कधींकाळीं वैराग्याची आठवण होऊन मुमुक्षा म्हणजे 'नको हा संसार यांतून मुक्त व्हावें' अशी इच्छा एखादे वेळीं उदय पावते आणि लवकरच ती अस्तास जाते. तसें न होतां वैराग्य व ज्ञान यांची जोडी प्राप्त होऊन खरी मुमुक्षा असली म्हणजे मग सर्वसिद्धि होते, तशीच राष्ट्राची गोष्ट आहे. जिगीषेच्या मागोमाग स्वार्थत्याग व दृढनिश्चय उत्पन्न होतात. अशी सिद्धता आपल्या लोकांत हरएक मार्गानें व्हावी म्हणून अहर्निश झटण्याची जबाबदारी राष्ट्रीय पक्षावर आहे. या पक्षास असें खात्रीनें वाटत आहे कीं, परकी सरकारपासून आपलें कांहीं कल्याण होणार नाहीं व जें कांहीं कल्याण होतें असें दिसेल तें परकी लोकांच्या शतपट कल्याणास साधनीभूत असेंच असेल. आमच्या

दुर्दैवानें, आमच्या पूर्वजांच्या हयगयीनें व नामर्दपणानें आपणांस ही दुःस्थिति प्राप्त झाली आहे. तिचा प्रतिकार करण्यास आपण त्यांच्या विपरीत गुणांच्या योगानेंच प्रयत्न केला पाहिजे. युक्तिवादानें किंवा आर्जवानें हें काम साधणें शक्य नाहीं. या संबंधांत मि. मोर्ले यांचें स्वच्छ म्हणणें असें आहे कीं, आपली कल्पनाशक्ति चालते तितक्यावरून पाहतां हिंदुस्थानचा अंमल व्यक्तीच्या हातांतच पाहिजे व तो स्वैरच पाहिजे. या सरकारच्या बाजूच्या प्रमुखाच्या उक्तीशीं नेमस्ताग्रणी नामदार गोखले यांचें स्वराज्य कसें मिळतें राहील याचा विचार कोणासहि होईल. नामदार गोखले यांसहि झालाच असला पाहिजे, पण त्यांची मेहनत महाभारतांतील सावित्री आख्यानावरून मिळविलेल्या शहाणपणानें प्रेरित असेल असेंहि वाटतें; परंतु यम झाला तरी आपल्या वचनास जागणारा होता. त्याला फसवून सावित्रीनें वचन घेतलें तसें स्वराज्यरूपी चंद्र हस्तगत करून घेण्याची हांव तेवढी धरूं नका बाकी पाहिजे तें मागा असें म्हटल्यावरून इतर गोष्टी ना. गोखले यांनीं मागितल्या पण त्यांचें मि. मोर्ले यांच्या भाषणांत नांव सुद्धां नाहीं. सावित्रीस यमधर्म वरचेवर म्हणतो तें पहिल्या* श्लोकांत दर्शविलें आहे. तो घोळून घोळून तेंच तें पुनः पुनः म्हणत आहे व सावित्रीहि आपली चिकाटी सोडीत नाहीं; पण सावित्रीसारख्या पुण्यास यमधर्मासारखा शुद्धधी व न्यायी उत्तर देणारा लागतो. एरवीं त्या पुण्याचा क्षय व्यर्थ करणें ठीक नाहीं. सावित्रीनें केलेल्या बारीक सारीक मागण्या देऊन अखेर सौभाग्य दिलें. परंतु मोफत शिक्षणाची देणगीहि मि. मोर्लेंच्या मुठींतून निसटत नाहीं. दमवून दमवून क्षुल्लक देणग्या तोंडावर टाकाव्या व इतकें देतों तरी संतोष नाहीं म्हणून रागानें बोलावें, कृतघ्नपणाचा आरोप करावा हेंच परकीयांचें ठरीव धोरण असतें. तेव्हां अशा नादाला कधीं लागूं नका असा प्रसिद्ध जार्ज वॉशिंगटन याचा आपल्या देशबांधवांस निक्षून उपदेश आहे.†

---

* निवर्त तुष्टोऽस्मि तवानया गिरा स्वराक्षरव्यंजनहेतुयुक्तया ।
वरं वृणीष्वेह विनास्य जीवितं ददामि ते सर्वमनिन्दिते वरम् ॥

† Constantly keep in view that it is folly in one nation to look for disinterested favours from another, that it must pay with a portion of its independence for whatever it may accept under that character, that by such acceptance it may place itself in the condition of having given equivalents for nominal favours, and yet of being reproached with ingratitude for not

[ पुढील पानावर पाहा ]

या उपदेशांतील तत्त्व आज आम्ही आपल्या हृत्पटलावर उत्तम प्रकारें कोरून ठेवलें पाहिजे. हें तत्त्व नामदार न्यायमूर्ति रानडे पूर्णपणें ओळखत असत; म्हणून ते अर्जरूपी लेखास स्वजनास उद्देशून लिहिलेले म्हणत असत. सरकारकडे नांवाला धाडावयाचे, परंतु खरोखर त्यांत नमूद केलेल्या गोष्टी लोकांत प्रसिद्ध होऊन त्यांना शिक्षण मिळावें हाच हेतु. परके राजे विद्वान् स्वदेशाभिमानी लोकांचा सामान्य जनाशीं संबंध होऊं देत नाहींत तशा वक्त्यांवर व लेखकांवर राजद्रोहाचे आरोप लादूं शकतें तेव्हां काय लिहावयाचें व बोलावयाचें तें जोरानें सरकारपुढें मांडावें. ते लेख किंवा तीं भाषणें कांहीं गुप्त नसतात. लोकांत त्यांचा प्रसार होतोच. हा क्रम ना० गोखले यांनीं अबाधित चालविला आहे. ज्वलत्तम जहालांनीं मोठमोठ्या सभांमध्यें किंवा लेखांत उपयोजिलेल्या भाषेइतकी कडक भाषा आज कोणीं सरकारी अधिकाऱ्यांच्या तोंडावर ठोकून दिली असेल तर ती ना० गोखल्यांनींच. परंतु साक्षात् लोकांचा व त्यांचा संबंध येत नाहीं यामुळें लोकांत त्याच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या मंडळीशीं संबंध ठेवणें त्यांना योग्य वाटत नाहीं यामुळें, त्यांच्याविषयीं इतका गैरसमज झाला आहे. इतका कीं एखादे वेळीं कर्झन किंवा हॅरिस यांनाहि कित्येक लोक तांब्याभर पाणी देऊन प्रेमानें बोलावतील, पण गोखल्यांचें नांव काढलें कीं त्यांच्या पायाची आग मस्तकास जाते. या मनोविकारांतसुद्धां एक प्रकारची सुसंगता आहे असें अलीकडील राष्ट्रीय पक्षाच्या मतांचा पूर्ण विचार करणारांच्या ध्यानीं येईल. हा तीव्र मनोविकार केवळ व्यक्तिद्वेषमूलक आहे असें मानण्याचें बिलकुल कारण नाहीं. राष्ट्रीय पक्षांतील कित्येक विचारवंत स्वार्थत्यागी, निर्मलान्तःकरणाचे व उदारधी असे पुरुष आहेत कीं त्यांस सरकारचें साहाय्य मुळीं नको; या परकीय सरकारच्या वंचक वचनापासून जितकें दूर राहवेल तितकें बरें; त्याच्याकडून होणाऱ्या लहानसहान उपकृतींवरून त्याच्याविषयीं एवढेंसुद्धां प्रेम व आदर उत्पन्न होईल असें करूं नये. जेणेंकरून आपल्या हाडवैऱ्याविषयीं आपल्या देशबांधवांच्या अंतःकरणांत सद्भाव निपजेल अशा

---

[ मागील पानावरून चालू ]

giving more. There can be no greater error than to expect or calculate upon real favours from nation to nation. It is an illusion, which experience must cure, which a just pride ought to discard.

Farewell Address

कृत्याकडे वा उक्तीकडे आपली व आपल्यापैकीं कोणाचीहि प्रवृत्ति होऊं नये असें मानतात. अशीं मनोघटना बनून गेलेले राष्ट्रीय पक्षवादी लोक ना० गोखले यांच्यासारख्यांचीं बुद्धिमत्ता व परिश्रम विपरीत मार्गास लागले आहेत असेंच प्रतिपादितात. स्वावलंबनानें व स्वकष्टानें जें मिळवावें तेंच खरें. मागून घेतलेलें किंवा देऊन कृपेनें दिलेलें कांहींहि असलें तरी तें आपल्या स्वाभिमानास बट्टा आणणारेंच होईल म्हणून कोणीहि मानी पुरुष असल्या भिक्षान्नाचा स्वीकार करून देश व प्राण यांची सांगड कायम राखूं इच्छिणार नाहीं.. म्हणून अशा बुद्धिमत्तेचा व दीर्घोद्योगाचा उपयोग केवळ लोकजागृतीकडेच व्हावा, सरकारवर पूर्ण बहिष्कार घालावा अशा मताचा एक राष्ट्रीय पक्ष उत्पन्न झाला आहे. त्यानें परकी राज्यकर्त्यांचा कावा पुरा ओळखला आहे. म्हणून साम्राज्यांतर्गत स्वराज्याच्या किंवा वसाहतींतील स्वराज्याचा मागणीचा शुष्कपणा किंवा अशक्यत्व सिद्ध करण्यास तो पक्ष कचरत नाहीं. वर्णभेदाचा पगडा इंग्रजी साम्राज्यांतच नव्हे तर सर्व गोऱ्या सृष्टींत केवढा बसला आहे हें ज्यांना माहीत आहे ते हिंदुस्थानला गोऱ्या वसाहतीप्रमाणें ब्रिटिश सरकार स्वराज्य देईल असें म्हणूं शकणार नाहींत. बाभळ गुलाब होईल, लिंबुण्यांना द्राक्षाची गोडी येईल, कोळशाचा हिरा होईल, पण गोरे लोक काळया लोकांस बरोबरीनें कधीं वागविणार नाहींत. दुसरी गोष्ट हिंदुस्थानाएवढ्या म्हणजे तीस लोकांच्या राष्ट्रास साम्राज्यांतील इतर सर्व अवयवांप्रमाणें म्हणजे सर्वांस समसमान हक्क द्यावयाचे याचा अर्थ हिंदुस्थानच्याच लोकांचें सर्व साम्राज्य व्हावयाचें असाच होईल. इतर लोक हिंदी लोकांत कोठेंच गडप होतील. ही गोष्ट गोरे लोकांस मान्य व्हावयाची नाहीं. ब्रिटिश लोकांचें साम्राज्य असें राहणार नाहीं. असो; हा सर्व तात्त्विक वाद तूर्त निष्फळ आहे. मुख्य मुद्द्याची गोष्ट इतकी कीं जरी कांहीं लोक आज निव्वळ स्वराज्याशिवाय आपणांस कांहीं दुसरें साध्य नाहीं असें तात्त्विक दृष्ट्या प्रतिपादन करतात, तरी त्यांच्यापैकीं पुष्कळांना इतका समंजसपणा आहे कीं आजच या मतास व्यावहारिक स्वरूप येणें शक्य नाहीं. त्यांच्यामतें राष्ट्रांतील उत्कर्षेच्छु लोकांनीं साध्य तेवढें काम एकच करावें असें आहे; परंतु ज्या ठिकाणीं हें करावयाचें त्या ठिकाणीं आपल्या मनांत जे विचार घोळत आहेत त्याच्या विरुद्ध लेख लिहून द्या असें मात्र मान्य करणार नाहीं आज कृतीनें प्रस्तुत आस्तित्वांत असलेली राज्यव्यवस्था उलथून पाडण्याचा उपक्रम करीत नाहींत एवढें कबूल घेणें अशक्य नाहीं. अशक्य व अप्राप्य अशी गोष्ट म्हणून आपण जिला समजतों ती आपणांस साध्य आहे कसें म्हणावें ? स्वराज्य म्हणजे प्रत्येक बाबतींत आपली हुकमत झाल्यास

देशांतील सर्व तिजोरी आमच्या ताब्यांत येईल. मग लष्करी खर्च आवाढव्य आ तो कमी होईल, सरकारी मोठमोठ्या नोकरींवरून गोरे लोक दूर होतील, परदेश मालावर कर वाढेल, मँचेस्टरवाले हताश होतील, परक्या लोकांस आमच्या देशांत थारा मिळणार नाहीं या सर्व गोष्टी मि. मोर्ले यांस मान्य होत नाहींत; तर इतर त्याच्याहून संकुचित बुद्धीच्या माणसास कशा होतील? हिंदुस्थानचीं लहान-मोठीं गाऱ्हाणीं आपल्या राजकीय पक्षोत्कर्षासाठीं डावांत पुढें मागें सरकविलीं जाणारीं मोहरीं व प्यादीं होत अशीं ज्या राज्यांत स्थिति आहे, तेथें तोंड वेंगाडून दाद काय मागावी? आम्हांस निःशस्त्र करून स्त्रीत्वाप्रत आणून सोडणारांच्या राज्यांत स्वसंरक्षणसुद्धां आम्हांस अशक्य झालें आहे अशा प्रसंगीं वरचेवर आगबोटींत बसून आसुरी भूमीचें दर्शन करण्यांत हंशील काय असे प्रश्न जहाल लोकांनीं विचारूं नयेत तर करावें काय? जमिनीची मालकी लोकांची होती ती सुवर्णसंपत्ति चालली, समुद्रकिनारा एवढा मोठा असून व जहाजास जरूर अशी काष्ठसंपत्ति विपुल असून दर्यावर्दीपणा विलयास गेला, जबाबदारी व प्रसंग या दोन्ही गोष्टी नसल्यामुळें बुद्धिमत्ता व शरीरसामर्थ्य हीं लोपून गेलीं. अशा स्थितींत आंकडेशास्त्राचें गौडबंगाल घेऊन इंग्रज लोक व इंग्रज अधिकारी यांच्यापुढें कपाळमोक्ष करून घेतला तरी काय होणार आहे? आपल्या लोकांत ऐक्य होईना अशा वेळीं दुसऱ्याचीं दारें पुजण्यांत अर्थ नाहीं. पूर्ण विचार करून सर्व कार्यकर्त्यांनीं मोर्ले-मिंटो कंपनीच्या पुढें डेप्युटेशनें नेऊन हात जोडण्यापेक्षां परवांच्या कॉन्फरन्सचें तत्त्व कायम ठेवून किंवा त्याहून जास्ती एकोप्याचा मार्ग शोधून प्रथम राष्ट्रांतल्या राष्ट्रांत ऐक्य करावें. भलतेच प्रतिज्ञालेख मागून आपली जूट कमी करून शत्रूंकडून आपलें हंसें करून घेऊं नये. कशांतून झालें तरी उपयुक्त असें कांहीं तरी निष्पन्न होतेंच, त्याप्रमाणें या अत्यंत परावलंबनापासून देखील इंग्रजी राज्यकर्त्यांची स्वार्थाविषयींची चिकाटी व सत्य, न्याय व यथार्थ युक्तिवाद यांपासून पराङ्मुखता अधिक स्पष्ट होऊन लोकांतील स्वावलंबन पक्ष जोरावत जाईल. एवढाच जर उपयोग व्हावा असा ना. गोखले यांच्यासारख्यांचा हेतु असेल तर त्यांच्या आचरणास कविकुलगुरु कालिदासोक्तीचा आश्रय करून,

अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन्
विचारमूढः प्रतिभासि मे त्वम्।

असें म्हणावें लागेल अथवा भर्तृहरीच्या पुढील श्लोकाचें स्मरण करावें लागेल.

स्थाल्यां वैडूर्यमय्यां पचति तिलकणानिन्धनैश्चन्दनाद्यैः
सौवर्णैर्लाङ्गलाग्रैर्विलिखति वसुधामर्कमूलस्य हेतोः ।
छित्वा कर्पूरखण्डान्वृतिमिह कुरुते कोद्रवाणां समन्तात्
प्राप्येमां कर्मभूमिं न चरति मनुजो यस्तपोमन्दभाग्यः ।।

—नीतिशतक

परंतु नव्हे, हें कार्य कांहीं अल्प नव्हे. सकृद्दर्शनीं अल्प वाटतें खरें, पण पुढें याचा उपयोग मोठा आहे. आतांच कित्येक लोक नामदार गोखले यांना अर्धे राष्ट्रीयपक्षवादी म्हणतच आहेत. सर्व प्रयत्न विफल होऊन ते पूर्ण राष्ट्रीय-पक्षवादी किंवा ज्वलत्तम जहाल बनतील, त्यांना सरकारच्या तोंडापुरतें बोलून कांहीं स्वार्थ साधावयाचा नाहीं. हताश झालेल्या सरकारावलंबी महापुरुषास निराशेचें बळ चढल्यावर त्याच्या हातून मोठें कार्य होईल.

सारांश, श्रीमद्भगवद्गीतेंतील उपदेशरहस्य —

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैवरिपुरात्मनः ।

हें ध्यानांत धरून चालावें यांतच आपलें हित आहे. गीतावाक्य सर्वांस माहीत आहे, परंतु आचरणांत तें दिसून येत नाहीं यामुळें वारंवार त्याची आठवण करून द्यावी लागते. स्वावलंबन हें राष्ट्रीय पक्षाचें आदितत्त्व, परंतु राष्ट्रीय पक्षांतील लोकहि शत्रु कोण व मित्र कोण हें ओळखीत नाहींत. कांहीं झालें तरी प्रथम राष्ट्रांतील कार्यकर्त्या लोकांत एकी पाहिजे. सर्वांनीं मिळून नेहमीं एखादें कितीका कमी महत्त्वाचें काम करण्यासाठीं एकत्र जुळलें पाहिजे. खाजगी वैमनस्यास किंवा दुसऱ्या कांहीं मनोविकारांस थारा नसला पाहिजे. लोकाग्रणी म्हणवितात किंवा लोकांच्या वर्तनास वळण लावण्याचें काम ज्यांनीं हातीं घेतलें आहे त्यांच्या मनांत राष्ट्रहिताशिवाय दुसऱ्या कोणत्याहि ऐहिक विषयानें प्रवेश करूं नये. लोकांनींहि आपआपल्या मगदुराप्रमाणें विचार करून आपल्या संशयाची निवृत्ति व्हावी म्हणून लोकनायकापाशीं शरणंगतीनें ज्ञान-भिक्षा मागावी, परंतु त्यांच्यावर अचल श्रद्धा ठेवावी. स्वार्थत्यागी राष्ट्रभक्त पाहिले कीं, त्यांच्या चरणीं माथा ठेवावा व त्यांच्या आचरणांत कांहींहि आपणांस अगम्य असा सद्धेतु असावा अशी श्रद्धा बाळगावी, म्हणजे सर्व गोष्टींची सिद्धता झाल्याशिवाय राहणार नाहीं.

• • •

# १२. बाँबगोळे प्रकरण

[ ' विश्ववृत्त ', मार्च १९०८ ]

या महिन्यांत जिकडे तिकडे सर्वतोमुखीं बंगालमधील बाँबगोळे प्रकरणासंबंधानें बोलणें चाललेलें असतें. कोणी पकडलेल्या लोकांना मूर्ख ठरवितात, कोणी सरकारला दूषण लावतात, तर कोणी जहाल पक्षावर तुटून पडतात. सध्यां हा विषय कोर्टांत असून कोर्टाचा निकाल पूर्णपणें बाहेर पडल्याशिवाय आम्ही या संबंधानें फार लिहूं इच्छीत नाहीं. बाबू अरविंद घोष यांजवर अजून नक्की कोणताहि आरोप ठेवण्यांत आला नसूनहि त्यांच्यासारख्या अब्रदार मनुष्यालाहि जामिनावर सोडण्यांत आलें नाहीं. पोलिसांनीं माणिकतोळाजवळील तलाव वगैरे सर्व खोदून तपासून पाहिलें, परंतु अद्यापि बाबू अरविंद घोष यांचा या प्रकरणाशीं कोणताहि संबंध जोडतां आलेला दिसत नाहीं. फक्त ते दारूगोळा सांपडलेल्या घराचे अंशतः मालक आहेत एवढ्यावरूनच त्यांना कैदेंत ठेवण्यांत आलें आहे. हें कसेंहि असो. प्रश्न एवढाच आहे कीं, असले प्रकार जे होऊं लागले आहेत त्याची जबाबदारी कोणावर आहे व असले प्रकार बंद होणें शक्य आहे किंवा नाहीं व असल्यास कोणत्या उपायांनीं ? आमच्या मतें ह्या भयंकर प्रवृत्तीच्या मुळास इंग्लिश राज्यपद्धतीच आहे.

वीस पंचवीस वर्षें सनदशीर चळवळ करूनहि विशेष फलप्राप्ति होत नाहीं, किंबहुना जास्त जास्तच जुलूम होत आहे. बंगालची फाळणी, युनिव्हर्सिटी ॲक्ट, लाला लजपतरायांसारख्यांना उगीच हद्दपार करणें इत्यादि गोष्टींचें मनन उद्वेगजनक आहे हें कोणीहि कबूल करील. मग कांहीं तारुण्याच्या भरांत असलेल्या, राष्ट्रमातेच्या उज्ज्वल व पवित्र प्रेमानें उत्साह पावलेल्या कांहीं धाडशी देशभक्तांच्या हातून असलीं अचाट व भयंकर कृत्यें घडून आल्यास नवल काय ? जुलमी राज्यपद्धतींचे, कर्झनशाहीचे, अपराधाशिवाय हद्दपार करण्याचे परिणाम अशा प्रकारचे असणें हें सृष्टिनियमास एका अर्थी अनुसरूनच आहे. त्यांत कांहीं नवीन किंवा नवल नाहीं. अथवा नवल हें कीं सरकार इतकें शहाणें व धूर्त असूनहि त्यांना एवढी सरळ गोष्ट कळत नाहीं ? का कळत असून डोळेझांक होत आहे ? केव्हांहि काय, परकीय सरकारला आपली चूक कबूल करणें लज्जास्पद व इभ्रतीला हानि करणारें वाटतें. तेव्हां चूक कळूनहि

सरकार लोकांवर चूक लादणार व दोषारोपहि कदाचित् करील, पण आमच्या-पैकींच कांहीं मंडळी जेव्हां हा दोष जहाल पक्षावर लादूं पाहतात, तेव्हां त्यांच्याविषयीं काय म्हणावें हें समजत नाहीं. जहाल पक्ष म्हणजे विध्वंसक पक्ष नव्हे. जहाल पक्ष विध्वंस करण्याकरितां नाहीं. तर स्वावलंबनानें आपल्या राष्ट्राची संघटना करण्याची या पक्षाची इच्छा व महत्त्वाकांक्षा आहे. या पक्षाला, लोक ठार मारले गेले म्हणजे आनंद होतो असें नाहीं. हिंदु लोक उपाशी मरत आहेत म्हणून ज्यांचा जीव तिळतिळ तुटतो, ते लोकांचा जीव उगाच घेण्यामध्यें आनंद मानतील हें म्हणणें विपरीत होय. जहाल पक्षाला साहेबांचे जीव घ्यावयाचे नसून हिंदी लोकांचे जीव वांचवावयाचे आहेत. ते क्रूर, खुनशी नसून, फारच दयार्द्र अंतःकरणाचे आहेत, म्हणूनच त्यांची भाषा इतकी कळकळीची येते. कळकळीची, जोराची भाषा म्हणजे खुनशी भाषा नव्हे. जहाल पक्षा-वर अंशतः तरी ती जबाबदारी आमच्याच कांहीं लोकांकडून लादण्यांत येत आहे. ती भ्रममूलक आहे. तसेंच, असल्या भयंकर कृत्यांना आळा घालण्याच्या कामीं जहाल पक्षाला जो उपदेश करण्यांत येत आहे तो अस्थानींच होय. कारण मागें म्हटल्या-प्रमाणें हे भयंकर प्रकार जहाल पक्षाच्या चिथावणीनें किंवा उत्तेजनामुळें होत नसून लॉर्ड कर्झनसारख्या व्हाइसरॉयच्या जुलमी कारकीर्दीमुळें किंवा लालाजपत-राय यांच्या अन्यायी हद्दपारीमुळें होत असतात. कार्य बंद करणें असल्यास कारणें बंद केलीं पाहिजेत. सरकारला हे अनिष्ट प्रकार नको असल्यास जुलमी राज्य-पद्धति सोडली पाहिजे. त्याला दुसरा उपाय नाहीं. सरकार जर जास्तच दडप-शाही करूं लागेल तर जास्त भयंकर प्रकार घडून येतील अशी भीति आहे. विध्वंस व खून जसे सरकारला नकोत तसे लोकांनाहि नकोत. म्हणून लोकांतर्फे आम्ही सरकारास नम्रपणें सुचवितों कीं, प्रजेचें कल्याण करण्याची जर खरी इच्छा असली तर लोकांना जास्त हक्क देऊन, त्यांच्याशीं सलोख्यानें वागावें म्हणजे लोक संतुष्ट राहून, आपोआपच असले प्रकार बंद होतील.

सरकारनें आपलें डोकें फार शांत ठेवलें पाहिजे. घाबरून जाऊन दडप-शाहीचा आरंभ झाल्यास, सृष्टिनियमानुसार दुसरीकडे स्फोट झाल्यास त्याची सर्व जबाबदारी सरकारकडेच येणार आहे, हें सरकारनें ध्यानांत ठेवावें.

• • •

# सामाजिक व धार्मिक लेख

१ वसन्तोत्सव व्याख्यानमाला

२ मांसभक्षण

३ सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा

४ पुरोगति आणि परागति

५ हिंदुधर्म - सनातनधर्म

# १. वसंतोत्सव व्याख्यानमाला

[ ‘ग्रंथमाला’, जुलई १९०० ]

पुण्यास दोन जबर फळ्या आहेत, या दुःखद स्थितीचा अपलाप करणें शक्य नाहीं. त्यांच्यांतील दिसून येणाऱ्या स्पर्धेचें रूप कित्येक वेळां अत्यंत खेदकारक असतें. परंतु आज ज्या गोष्टीसंबंधानें आम्ही दोन शब्द लिहिणार आहों ती या स्पर्धेचें मनोहर स्वरूप व्यक्त करणारी आहे. ‘फ्रेंड्स लिबरल असोसिएशन’ नामक मंडळीनें करविलेल्या व्याख्यानमालिकेचा वृत्तान्त पूर्वीं आम्हीं दिला आहेच. तीं सर्व व्याख्यानें इंग्रजी भाषेंत झालीं. सर्व चांगलींच होतीं. जून २४ रोजीं संपलेली वसंतोत्सव व्याख्यानमालाहि तशीच चांगली होती. हीं व्याख्यानें बहुतेक मराठींत झालीं. त्यांचीहि योग्यता पूर्वींच्या मालेहून कमी नाहीं, हें पुढें दिलेल्या यादी-वरून कळून येणार आहे. या व्याख्यानमालेस प्रायः आश्रय पुण्यांतील दुसऱ्या म्हणजे सुधारकेतर पक्षाचा होता असें दिसतें. परंतु बाहेरच्या लोकांस हा विचार करण्याचें कारण नाहीं. ज्यांनीं व्याख्यानें दिलीं, त्यांपैकीं कित्येक लोकांचे दोहों पक्षांत चांगले स्नेही आहेत. तेव्हां त्यांना सत्कृत्यें करण्यांतच पुण्याचे दोन पक्ष स्पर्धा दाखवितील तर फार चांगलें असें वाटत आहे. मेहरबान डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन जाईल्स साहेब बहादुर यांचा या मालिकेवर जरा रोष आहे, पण हा वितळून जाणारा ढग आहे. व्याख्यानमालेंतील व्याख्यानें अक्षरशः प्रसिद्ध होऊन तेथें लोक काय बोलले, कोणत्या विषयाची कशा प्रकारें चर्चा झाली, ज्या मंडळीविषयीं कोणत्याहि कारणानें आपले दुग्रह झाले आहेत ती खरोखर कशी आहे, हें सर्व कळलें म्हणजे मि. जाईल्ससारख्या विद्यासंपन्न व विशुद्धान्तःकरण अधिकाऱ्याच्या मनावरील पटल दूर झाल्याशिवाय राहणार नाहीं. तूर्त श्रीरामदासस्वामी समर्थ म्हणतात त्यापैकीं कांहीं प्रकार आहे.

**आत्मज्ञानी आहे भला । आणि संशय उठला ।**

हल्लीं एखाद्या दुसऱ्या शिक्षकास ‘ नको देऊं व्याख्यान या वसंतमालिकें ’त म्हणून त्यांनीं म्हटलें असेल. त्या एकदोन व्याख्यानांच्या अभावानें मालिकेस कांहीं गौणत्व आलें नाहीं. ह्या गोष्टीची चर्चा पुणेकर मंडळींनीं अधिक करूं नये.

पुढें सर्व ठीक होईल. व्याख्यानें झालीं त्यांची यादी तारीख १ जुलईच्या 'मराठा' पत्रावरून घेतली आहे. ती अशी :—*

| | | |
|---|---|---|
| १. | रा. सा. ना. भ. पावगी. | आमची हल्लींची स्थिति व ती सुधारण्यास उपाय. |
| २. | रा. रा. वा. खानापूरकरशास्त्री. | हिंदु पंचांग. |
| ३. | ,, रा. मो. साने. | दिवाणी कायदा. |
| ४. | ,, गो. का. टिळक. | मिसेस ॲनीबीझंटचीं मतें. |
| ५. | ,, के. वा. पेठे. | हिंदुधर्म व आरोग्यशास्त्र. |
| ६. | ,, गो. का. नातू. | फौजदारी कायदा. |
| ७. | ,, वा. मो. पोतदार. | सुशिक्षितांचीं कर्तव्यें. |
| ८. | ,, कृष्णशास्त्री दामले. | ब्रह्मज्ञान हाच पुरुषार्थ आहे. |
| ९. | ,, ल. रा. पांगारकर. | कवि मोरोपंत. |
| १०. | ,, पी. आर. अवास्ति. | आमचा धर्म. |
| ११. | ,, न. चिं. केळकर. | The News-Paper-Press as a power. |
| १२. | ,, शि. म. परांजपे. | समाजरचना. |
| १३. | ,, नी. पा. पाटणकर. | राष्ट्रीयोन्नति. |
| १४. | मि. के. सुब्रह्मण्य अय्यर. | Commercial Education. |
| १५. | रा. रा. वा. रा. जोशी. | राष्ट्राचें जन्ममरण. |
| १६. | डॉ. ग. कृ. गर्दे. | ईश्वराचे अवतार. |
| १७. | रा. रा. स. वा. भाटे. | 'सिटिझन ऑफ इंडिआ' या पुस्तकावर चार विचार. |
| १८. | ,, त्र्यं. गं. काळे. | कालिदास – चित्रकार. |
| १९. | मि. एन्. करकरे. | भक्तीचें माहात्म्य |
| २०. | रा. रा. वा. गं. टिळक. | दक्षिण हिंदुस्थान, सिलोन व ब्रह्मदेश इकडील प्रवास. |

• • •

---

* विषयांचीं मराठी नांवें एका ठिकाणीं मिळालीं नाहींत, म्हणून आम्हीं इंग्रजीवरून मराठींत भाषांतर केलें आहे.

# २. मांसभक्षण

[ ‘ ग्रंथमाला ’, ऑगस्ट १९०१ ]

कांहीं महत्त्वाचें कार्य नसलें म्हणजे कांहींतरी शुष्क उद्योगांत किंवा दुष्ट व्यसनांत मनुष्य पडतो, तद्वत् सांप्रतकालीं आमच्या समाजाची स्थिति झाली आहे. तसेंच अंगचें शौर्य दाखविण्यास रणांगणीं जाऊन धारातीर्थीं देहमोचन करण्याची संधि नसली म्हणजे घरच्या घरीं कलह करून एकमेकांचे चावे घेत बसण्याचा क्रम सुरू होतो, त्याची प्रतीति आमच्या समाजांत येत आहे. मोठमोठ्या सभांमध्यें वाक्पांडित्य करून आपली नैसर्गिक बुद्धि व यत्नप्राप्त विद्वत्ता यांचा प्रकाश पाडण्यास जागा नसली म्हणजे, नसते वाद उपस्थित करून आपल्याच लोकांशीं वितंडवाद करीत बसण्यांत सर्व बुद्धिसामर्थ्य खर्च होतें. तसाच कांहीं प्रकार हल्लीं आमच्या समाजांत चालला आहे. वास्तविक पाहतां सुधारक व असुधारक हे सर्व देशहितासाठींच झटत आहेत. मात्र परस्परांच्या देशहिताच्या कल्पना जुळत नाहींत म्हणून एकमेकांवर कटुशब्दप्रहार करून समाजांत यादवी माजत आहे. त्याचा फायदा तिसऱ्यांस होत आहे. राजकीय बाबतींत, व्यापारीय उत्कर्षाच्या गोष्टींत किंवा शास्त्रीय ज्ञानप्रसारांत आम्हीं होऊन नवीन प्रदेश काबीज करण्याचें राहिलेंच. असलेलें राखणें म्हणजे नवीन काबीज करणें हें जर खरें तर गमावलेलें मिळविणें म्हणजे नवीन काबीज करणें होय, याविषयीं शंकाच नको. सर्व बाबतींत जें थोडें आमच्याजवळ आहे, तें राखण्याचा यत्न करण्यांतच आमचा उत्साह व सामर्थ्य खर्च होत आहे. गमावलेलें मिळविण्याच्या खटपटींत उत्साह व सामर्थ्य शिल्लक नाहीं. येईल कोठून ? आमच्यांतील उत्साह व सामर्थ्याचा बराच भाग शुष्कवाद व परस्पर-द्वेषमूलक लेख यांतच खर्ची पडत आहे.

मागें ७७ व्या अंकांत ‘ जातिभेद व मराठ्यांचें नष्टवैभव ’ या शिरो-लेखाखालीं, आमच्या सांप्रतच्या दीन स्थितीचें खापर जातिभेदाच्या डोक्यावर फोडण्याचा प्रयत्न करणें म्हणजे वड्याचें वेल वांग्यावर काढण्याप्रमाणें आहे, असें दाखविलें आहे. जातिभेदापासून कांहीं अनर्थ ओढवत असतील तर कांहीं हितहि झाल्यावांचून राहत नाहीं; तेव्हां उगीच एखादी गोष्ट घेऊन, तिजवर

लिहीत सुटणें चांगलें नाहीं व विशेषत: विचारप्राबल्यापेक्षां विकारप्राबल्य अधिक प्रकट करणें नीट नाहीं असें रा. रा. राजारामशास्त्री भागवत यांस आम्हीं कळविलें आहे. पूर्वीं जातिभेदावर चालविलेली बुद्धि त्यांनीं हल्लीं **मांसभक्षण** या विषयावर चालविली आहे असें दिसतें. मांसभक्षण हा विषय पुनर्विवाहाप्रमाणें आहे. कोणत्याहि एका धर्माच्या सर्व लोकांस विचार करण्याचा हा विषय नाहीं. कारण त्याचा प्रतिबंध काय तो ब्राह्मणवर्गास आहे. तोदेखील दक्षिणी ब्राह्मणांपुरता. देशकालवर्तमान पाहून आपद्धर्माचीं तत्त्वें लक्षांत घेऊन पूर्वींप्रमाणें आहारविहारांत फेरफार करण्यास आर्यधर्माची सवड आहेच. हल्लीं वादविवाद करून सर्रास पुणें, मुंबई वगैरे ठिकाणच्या ब्राह्मणांस मांस खाऊं घालण्याची खटपट कशास हवी आहे, हें आम्हांस कळत नाहीं. आपल्या जिवाची पर्वा करणारा माणूस मोठेंसें देशकार्य करूं शकत नाहीं. एवढा बोध लक्षांत घेऊन कड्यावरून उडी टाकून प्राण देणाऱ्या माणसास कोणी विचारी म्हणेल काय ? प्रसंगीं अप्रसंगीं बेपर्वाई असणें हा शूरपणा नव्हे. तूर्तच्या काळीं इकडे रेव्हेन्यू बिलानें रयतेच्या जमिनीवरील हक्काचें चंदन होण्याची पाळी आली आहे, बोअर लढाईच्या झळा आमच्या देशासहि लागत आहेत, प्लेगचा प्रसार झपाट्यानें होत आहे, दुष्काळानें देशांतून पाय काढला नाहीं. अशा वेळीं मांसभक्षण हा वादग्रस्त विषय आहे, यावर वाद झाला पाहिजे असें कोणीं म्हटलें, तेवढेंच घेऊन बसून ब्राह्मणांनीं मांस खाण्यास कां प्रारंभ करूं नये यावर चर्चा करण्यास याला बोलाव त्याला बोलाव असें करण्यांत काय पुरुषार्थ आहे, आम्हांस कळत नाहीं. आठ दिवसांत उत्तर आलें नाहीं तर मांसभक्षण पक्ष सिद्ध झाला असें ठरवूं म्हणून धमकी देण्यांत काय तात्पर्य आहे ? एक लहानशी जात मांस खात नाहीं, म्हणून आतां कोणतें देशकार्य अडलें आहे ? मांस न खाल्ल्यानें आजवरची बौद्धिक उन्नति झाली, सात्त्विक वृत्तीस निवृत्तमांस असणें चांगलें, मांसांत असणारे गुण उडदासारख्या धान्यांत आहेत, वगैरे गोष्टींचा मननपूर्वक विचार होईल तर एकट्या राहिलेल्या जातीनें मांसभक्षक बनावें या पक्षास दुजोरा येईलसें वाटत नाहीं, पण वादास यावें असें आव्हान करण्यानें 'विद्या विवादाय धनं मदाय' ह्या भर्तृहरिवचनाची सत्यता स्थापित करणें होईल. समाजसुधारकांनीं लोकांच्या मनांत या प्रश्नासंबंधानें विचार उत्पन्न केले आहेत. प्रसंगानुसार आचरण झाल्यास समाज डोळेझांक करीत आहे. अशा वेळीं खऱ्या उपयुक्त सुधारणांचा खल सोडून देऊन 'अभक्ष्यभक्षण', 'अपेयपान', 'स्पृश्यास्पर्श' ह्यांसारख्या

प्रश्नांचा विचार करीत बसणें योग्य नाहीं. वाद्च सुरू झाला, तर 'मांसभक्षण पक्ष' विजयी होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. जोंपर्यंत शरीरबलच एक साध्य वस्तु जगांत मानली जात नाहीं, तोंवर ह्या वादास फार फांटे फुटतील व निकाल लागणारच नाहीं. तेव्हां 'गोंधळा यावं' 'गोंधळा यावं' असें करून शास्त्रीबोवांनीं आपलें हसें करून घेऊं नये, असें आमचें त्यांस सप्रेम व सविनय सांगणें आहे.

# ३. सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा

[ ‘ ग्रंथमाला ’, ऑगस्ट १९०३ ]

राजकीयदृष्ट्या आमचें राष्ट्र पारतंत्र्य स्थितींत आहे, यामुळें जितक्या झपाट्यानें राजकीय हक्क मिळावेत असें वाटतें, तितक्या लवकर ते मिळत नाहींत. परंतु सामाजिक सुधारणेच्या कामीं आम्हीं चांगली मेहनत केली तर लवकर यश येईल असा पुष्कळांचा समज आहे. सामाजिक, राष्ट्रीय व प्रांतिक सभा भरतात. त्यांत जों-पर्यंत धर्माच्या व जातींच्या गोष्टी सोडून, म्हणजे प्रचलित धर्मकल्पना व जातिव्यवस्था यांस बाध न आणतां, विषय चर्चेंत येतात, तोंपर्यंत सर्व लोकांचें ऐकमत्य होतें. उदाहरणार्थ, मद्यपाननिषेध, स्त्रीशिक्षण, हीन मानलेल्या जातींचें शिक्षण व त्यांच्याशीं प्रेमाचें व सहानुभूतीचें वर्तन, या विषयासंबंधानें लोकमत जागृत करून बहुजनसमूहांत प्रचार पाडणें कठीण असलें, तरी तें सामाजिक परिषदेस शक्य आहे. इतर कांहीं गोष्टींत यश मिळविणें तिच्या हातीं नाहीं. कारण, केवळ सामाजिक विषयचर्चेपलीकडे त्यांची मर्यादा जाते. म्हणजे आमच्या-मध्यें व्यवस्थित रीतीनें अस्तित्वांत असलेल्या 'धर्मसंस्थेच्या अधिकारांतील गोष्टींचा निकाल, तिची अनुमति बाजूलाच राहिली, पण सल्ला घेतल्याशिवाय करण्यांत येतो, तेवढ्यानें कार्य होत नाहीं. धर्म मोडावा व जातिबंधनें तोडून टाकावींत असें सामाजिक परिषदेनें कधींहि म्हटलें नाहीं, हें वारंवार आम्ही प्रतिपादन करीत आलों आहों. पुनर्विवाहाच्या प्रश्नाखेरीज सामाजिक सुधारकांनीं कोणत्याहि धर्म-कल्पना व प्रचलित धर्म्य आचार यांत फेरफार जोरानें सुचविले नाहींत. त्याविषयीं-सुद्धां त्यांचे विचार नेमस्त आहेत, परंतु या व इतर बाबतींतसुद्धां आजवर त्यांची दिशा चुकली आहे असें आम्हांस वाटतें. राजकीय सुधारणा अमलांत आणणें जसें आपल्या हातीं नाहीं, त्यांतील कामीं आपल्यावर एक सरकार आहे व आपण केवळ अर्जदार आहों असें आपण जाणतों, पण ही भावना सामाजिक सुधारणेच्या प्रांतांत आल्याबरोबर आपणांतून अगदीं मावळल्यासारखी झाली आहे. राष्ट्रीय सभेच्या सर्वानुमतें किंवा बहुमतें झालेल्या ठरावाच्या जोरावर राजकीय सुधारणा अमलांत आणतां येत नाहीं, पण सामाजिक सुधारणा मात्र सभेंतील ठरावाप्रमाणें अमलांत आणण्यास हरकत नाहीं असें वाटतें. राष्ट्रीय सभेचे ठराव

अर्जरूप आहेत, पण सामाजिक सभेचे ठराव तसे नाहींत, तर आपल्या स्वतःसाठीं वर्तनाचीं तत्त्वें म्हणून ते पुढें आलेले असतात, सुधारणेच्छूंच्या म्हणण्यास योग्य वाटलें तर संमति देऊन, त्यांची अंमलबजावणी करणारे दुसरे कोणी वरिष्ठ नाहींत व ते पसंत पडल्याबरोबर सर्वांनीं पाळावयाचे आहेत, अशी समजूत झालेली आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, या मंडळीस ( आम्हीहि त्यांतीलच आहों याचा अपलाप करण्याची आमची इच्छा नाहीं ) ठराव करण्यापलीकडे कांहीं करतां येत नाहीं.

बहुजनसमाजापैकीं बऱ्याच सरळ मनाच्या लोकांस सामाजिक परिषदेचीं मतें आवडलीं, तरी त्याप्रमाणें समाजांत आचार रूढ होत नाहींत यांतील बीज काय ? हा विचार करतां आजवर चाललेल्या प्रयत्नांत एक व्यंग आहे तें काढून टाकलें पाहिजे असें सामाजिक परिषदेच्या सभासदांस वाटूं लागलें आहे. तें हें कीं, आपली राजकीय सुधारणेंत जी पद्धति आहे तीच पद्धति सामाजिक सुधारणेंतहि ठेवावी. हें तत्त्व सामाजिक परिषदेंत अद्यापि जोरानें पुढें आलें नाहीं, परंतु हल्लीं जी सुशिक्षित लोकांच्या मनाची प्रवृत्ति होत चालली आहे तिजमुळें लवकरच तसें होईल असा आम्हांस रंग दिसत आहे. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत मेहनत करणारे कांहीं लोक, जातीजातींचे मुख्य व धर्मगुरु यांच्या साहाय्यानें, अनुमतानें व मार्गदर्शनानें हें कार्य सुलभ होईल असें मानूं लागले आहेत. परिषदेच्या पीठावरून तसे स्पष्ट व निःसंशय ठराव होण्यास थोडा अवधि लागेल तरी पण तें तत्त्व तिच्या कार्यक्रमांत शिरलें आहे यांत शंका नाहीं. सोलापूर येथील प्रांतिक, सामाजिक सभेंतील एका ठरावांत जातीचे मुख्य व गुरु यांचें साहाय्य घ्यावें व त्यांस विनंती करावी असें नमूद केलें आहे. कोंकणस्थ, कऱ्हाडे व देशस्थ यांच्यामध्यें विवाह सुरू व्हावेत अशा सूचनेवर श्रीजगद्गुरु शंकराचार्यांकडे साताऱ्च्या लोकांनीं अर्ज केला, त्यावर सामाजिक परिषदेच्या कित्येक अभिमान्यांच्या सह्या आहेत. याचा अर्थ इतकाच कीं, आपण या देशांत नवीन चालीरीती प्रचारांत आणण्यास आजच उत्पन्न झालों आहों असें नाहीं तर आपणांस कांहीं पूर्वपीठिका आहे व जुन्यापुराण्या धर्मसंस्थांवर बहुजनसमाजाची श्रद्धा आहे तिचा फायदा घेऊन, त्या संस्था व त्यांचे पिढीजादे चालक यांच्या सामर्थ्यावर अवलंबून राहण्याची आपलीहि प्रवृत्ति झाली तर इष्ट सुधारणा अमलांत येणें अशक्य नाहीं असा सुशिक्षित लोकांचा ग्रह होत आहे.

या मताविरुद्ध आजवर आचरण झाल्यानें, कांहीं इष्ट सुधारणा, व्हाव्या तितक्या जोरानें झाल्या नाहींत, असा आक्षेप आणणारांस उत्तर म्हणून देण्यांत

येतें कीं, "श्रीजगद्गुरु स्वामी किंवा ठिकठिकाणचे व विशेषतः क्षेत्रांतील ब्रह्मवृन्द यांचें आनुकूल्य मिळाल्यानंतरच एखादें पाऊल पुढें टाकावयाचें म्हटलें तर आपल्या समाजाचें पाऊल पुढें पडावयाचें नाहीं, त्यांच्या कल्पना किती जुन्या, त्यांचे विचार किती कोते, हजारों वर्षांपूर्वीं ज्या चालीरीती सुरू होत्या त्या हल्लींच्या मनूंत काय उपयोगी आहेत, त्यांस चालना दिली पाहिजे, हें सुविचाराचें तत्त्व त्यांच्या मठ्ठ डोक्यांत शिरतें कोठें ! त्यांना पाश्चात्त्य शिक्षणाचा फायदा नसल्या-कारणानें धर्म व आचार या बाबतींत हे जुने धर्माधिकारी व निरनिराळ्या मठांचे शंकराचार्य किंवा माध्वाचार्य आमचे पुढारी होण्यास लायक नाहींत. म्हणे हे कबूल करतील तेवढ्याच सुधारणा करा आणि बाकीच्या आज नाहीं कबूल झाल्या तर कालांतरानें त्यांस मान्यता मिळेल म्हणून आजच आपल्या स्वतःच्या निश्चयाच्या बळावर काय करतां येईल तें देखील सोडा, छे ! हल्लींचा काळ अशा लोकांस जुमानण्याचा नाहीं. आमचे मानलेले धर्मगुरु तितक्या पुरतेच. "

हा युक्तिवाद सकृद्दर्शनीं बरा दिसतो, परंतु कसेंहि झालें तरी रूढीचा जोर ज्यांच्या बाजूला आहे असे आचार्य व भिक्षुक लोक व त्यांचे अनुयायी यांची संख्या समाजांत अतिशय आहेना ? तसेंच कोणतेंहि वर्तन किंवा आचार यास कांहीं व्यवस्थित स्वरूप देणारी एखादी संस्था पाहिजेना ? वाटेल त्यानें वाटेल तें करावें असें राजकीय बाबतींत चालत नाहीं व चालेल तर अव्यवस्था माजूं लागेल, हें तत्त्व दोन आणि दोन चार इतकें स्पष्ट दिसतें; पण धार्मिक, सामाजिक व नैतिक बाबतींत कोणी व्यवस्थित सरकार असावें ही कल्पना नसल्यानें त्यासंबंधानें विचार करण्याचें सोडून देऊन किंवा होती ती बुजाल्यानें काम चाललें आहे. तसें चालणें अशक्य आहे, यासाठींच नवे नवे समाज व मंडळ्या अस्तित्वांत येत आहेत. सामाजिक सुधारणेसाठीं आपण परिषद् भरवितों त्यांत तरी हेतु काय ? 'सेंट्रल रिफॉर्म ॲसोसिएशन' व तिच्या शाखा केल्या पाहिजेत अशी आपली खटपट आहे याचा अर्थ काय ? तर कांहीं तरी व्यवस्थित रूप दिलें पाहिजे हाच. म्हणजे आजवरचें असलेलें धर्माच्या बाबतींतलें सरकार आम्हांस नको व आपलें नवीनच सरकार स्थापन करूं इतकेंच. हा नवीन प्रयत्न सिद्धीस जाणें आम्हांस शक्य वाटत नाहीं, हेंच कार्य जुन्यास धरून व इंग्रजी नांवें सोडून देऊन केलें तर अधिक फलद्रूप होईल.

परकीय राज्य असल्यानें धर्मसंस्थेस जितका राजाश्रय असावा तितका नाहीं हें उघड आहे. पण धर्म व राष्ट्र यांचा संबंध किती निकट आहे व धर्मप्रीती-

शिवाय राष्ट्रप्रीति किंवा ज्यास देशभक्ति म्हणतात ती भावना लोकांच्या मनांत उत्पन्न होणार नाहीं, असें ज्यास वाटत असेल तो नवीन संघशक्ति उत्पन्न करण्याच्या अवजड कामास हात न घालतां, असलेल्या संघशक्तीचा उपयोग करून घेणें शक्य असेल तर घेतल्याशिवाय राहणार नाहीं. राजसत्तेच्या अभावानें, निस्तेज नाहीं, तरी न्यूनतेस झालेल्या धर्मगुरूंची योग्यता वाढविणें व त्यांच्याद्वारां राष्ट्रांतील जोम वाढविणें हेंच अधिक श्रेयस्कर व स्वदेशाभिमानास शोभणारें आहे. याचा अर्थ सुशिक्षित लोकांनीं कर्मठ होऊन त्यांतच वेळ घालवावा व देवभोळे-पणाच्या बेड्या पायांत वागवाव्या असा नाहीं. आपले नवे विचार व नवा युक्तिवाद, आपलीं धर्मपीठें असतील त्यांच्या पुढें योग्य नम्रतेनें मांडावा व त्यांज-कडून कोणत्याहि गोष्टीस आज्ञापत्रें मिळवावीं, म्हणजे सुधारणेच्या चळवळीस जोर येईल. मूठभर लोकांनीं सर्व समाजाच्या फार पुढें धाव मारून राष्ट्रांत दुही माजते व अगोदरच खालावलेल्या राष्ट्राचा पाय अधिक खोलांत जात आहे हें पाहून कोणा राष्ट्रभक्ताचें चित्त कळवळत नसेल ? आपण पुराणप्रिय आहों यांतच आपल्या स्थैर्याचें बीज आहे. तेरड्याच्या रंगासारखे तीन दिवसांत आमचे आचार-विचार पालटले नाहींत, म्हणून आज आपण हयात राहिलों आहों. अलीकडे १५० वर्षांत या महाराष्ट्रास ऱ्हासकाल आला, त्यामुळें त्याचें सर्वच त्याज्य असें निराशेनें वाटूं लागलें आहे. खरोखर त्याज्य किंवा संशोध्य असा भाग नाहींच असें प्रति-पादन करणारा कोणीहि अंध उरला नाहीं. यासाठीं निरनिराळ्या ठिकाणीं विचार करून एकत्रपणें सामाजिक विषयांची चर्चा होणें जरूर आहे. यासाठीं सामाजिक परिषद् हवी आहे. पण राजकीय गोष्टींत ज्याप्रमाणें आपले ठराव सरकारपुढें आपण ठेवतों, आपला सर्व युक्तिवाद ऐकून पूर्णपणें नाहीं तरी कांहीं अंशांनीं सरकार आपलें म्हणणें कबूल करतें व त्यांतील कांहींतरी सरकारास मान्य झालें तर त्याबद्दल आपण कृतज्ञता प्रदर्शित करतों, त्याप्रमाणेंच धार्मिक व सामाजिक बाबतींत कां होऊं नये ? याचा विचार करून पाहतां हल्लींची आमची पद्धति चुकीची आहे, असें वाटतें. या पद्धतीस आम्ही बंडपद्धति म्हणतों. मिठावरचा कर आम्हांस अन्यायाचा वाटतो म्हणून आम्ही तो देत नाहीं म्हणून बसलों तर शासन होतें, तसा प्रकार सामाजिक किंवा धार्मिक विषयांत होत नाहीं. एवढ्याच जोरावर आम्हांपैकीं कित्येकांचें स्वैर आचरण चाललें असतें. क्षुल्लक बाबींतसुद्धां सरकारचे आचार ठरलेले असतात, ते मोडले कीं शिक्षा होते. अमक्या प्रसंगीं अमकाच पोषाख असावा असें ठरलें कीं त्यांत अणुमात्र अंतर पडतां कामा नये. परंतु आमच्या हिंदुत्वाचा 'युनिफार्म'

म्हणजे विशिष्ट (एकरूप) पेहराव मात्र सोडला तरी आतां चालतें. कां? तर शास्ता नाहीं. वाटेल त्यानें बूटपाटलोन घालून किंवा साहेबी टोपी घालून भर अंबाबाईच्या देवालयाच्या आवारांतून जावें व मर्जी वाटल्यास आंतहि जावें (आंत जाण्याची इच्छा होत नाहीं), पण असें करणाराच्या कृतीबद्दल प्रायश्चित्त देऊन त्यास ताळ्यावर आणणारी सत्ता राहिलेली नाहीं म्हणून, या सर्व गमजा चालतात. हल्लींच्या स्थितींत वाटेल ते रिवाज पडत चालले आहेत. हळूहळू सार्वत्रिक होईपर्यंत त्यांचा उपहास होतो. पुढें सर्रहा पडूं लागले म्हणजे कोणी विचारीत नाहीं. रस्त्यांतून चिरूट किंवा विडी पीत धूर सोडीत जाण्यांत कांहीं कमीपणा वाटत नाहीं. तोंडानें तंबाकू चघळीत बोलण्यांत कांहीं वाटत नसतें, तसेंच हें धूम्रपान प्रकरण झालें आहे. या वाईट गोष्टी जशा बिनबोभाट समाजांत शिरतात तशा कांहीं चांगल्याहि शिरतात. परदेश प्रवासाबद्दल असलेल्या प्रातिकूल्यास बरेंच शैथिल्य आलें आहे. जसे हे बारीकसारीक प्रकार तद्वतच पुनर्विवाहाच्या चालीचे होण्यास हरकत नाहीं.

खऱ्या चांगल्या गोष्टीस झटकन वळण देऊन पुष्कळ अनिष्ट होण्यापूर्वी त्यास व्यवस्थित रूप थावें व नुसत्या छिचोरपणास आळा घालावा असें ज्यास वाटत असेल त्यानें आम्ही म्हणतों त्याप्रमाणें शांतपणानें व नम्रपणानें धर्मगुरु व दीर्घकालपर्यंत कबूल झालेले समाजाचे इतर नायक यांचें साहाय्य घ्यावें. संन्यासी, गोसावी, बैरागी, पुजारी, गुरव या सर्व जातींतील आपआपल्या परीनें उपयुक्त अशा संस्थांपासून जसा उपयोग होईल, तसा वर्षांतून किंवा महिन्यांतून फावेल त्याप्रमाणें धर्माचा व आचाराचा विचार व खल करण्यासाठीं भरणाऱ्या सभांनीं होणार नाहीं. केवळ धर्म, नीति व सदाचार यांचा प्रसार करण्यासाठीं झटणाऱ्या व निरपेक्षबुद्धीनें व स्वेच्छेनें पत्करलेल्या दारिद्र्यांत राहून श्रम करणाऱ्या लोकांचे वर्ग लुप्त होत चालले आहेत. अशा प्रकारच्या सर्व संस्थांचा बोज राखणें हें सुशिक्षितांचें आद्य कर्तव्य आहे असें आम्हांस वाटतें. सरकारच्या कानांवर आम्ही आपलीं गाऱ्हाणीं घालण्यास जितके परिश्रम व अर्ज करतों, तितकी आराधना व तितक्या विज्ञापना श्रीसंकेश्वरमठाधिपति किंवा क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदांच्या चरणीं केल्या, तर आपली कार्यसिद्धि शीघ्र होईल असा आम्हांस भरंवसा आहे. सरकारनें निराश केलें तर आम्ही स्वराज्यनिष्ठ लोक पुनः यत्न करतों, पण श्रींनीं एकदा पुनर्विवाहाच्या वादांत निराश केल्याबरोबर तो रस्ताच सोडावयाचा हें स्वधर्मनिष्ठ प्रजेस शोभतें काय? जीं प्रमाणें व परिस्थिति १८७० सालीं होतीं, तींच १८८० किंवा १८९० त नसतात. १९०३ त पुनर्विवाहाचा प्रश्न

अत्यंत हृदयद्रावक पद्धतीनें पुढें मांडतां घेण्याजोगा आहे. परंतु बंड केलें तर सरकार शासन करतें आणि त्याच कृत्यास धर्माच्या हल्लींच्या राज्यांत शासन नाहीं. धर्माचा पाय लंगडा पडला आहे एवढ्यावरच खऱ्या राष्ट्रहितावर लक्ष ठेवणाऱ्या व दूरदृष्टीच्या सुशिक्षित लोकांनीं धर्मसंस्थांची अवहेलना किंवा उपमर्द करणें सर्वथा अनुचित आहे. नवीन नवीन कल्पनांचा त्या संस्थांत प्रवेश करून, त्यांची योग्यता वाढविणें हें त्यांचें काम आहे. शिष्याच्या बुद्धीवर व परिश्रमावर गुरूची योग्यता अवलंबून असते हें सामान्य तत्त्व प्रत्येक सुशिक्षितास ( मग तो कोणत्याहि पद्धतीनें शिकलेला असो ) कळलें पाहिजे. अशा बिकट शंका शिष्य विचारूं लागतात, तशी गुरूची अधिक तयारी होते. त्याचप्रमाणें समाजशास्त्राचें, राजनीतितत्वाचें, अर्थशास्त्राचें व सृष्टिशास्त्राचें परिशीलन करून आपला शिष्यवर्ग सुप्रबुद्ध झाला आहे व त्याच्या-पुढें राष्ट्रीय उत्कर्षाचे प्रश्न आहेत त्यांचा निर्णय करण्यास आपल्या जवळची सामग्री पुरत नाहीं, असें दृष्टोत्पत्तीस आल्यास धर्मगुरु तदनुरूप आपली तयारी ठेवतीलच ठेवतील अशी आमची खात्री आहे व तशी ठेवीपर्यंत आपण त्यांच्या-जवळ झटून विज्ञापना केली पाहिजे. बंड उपयोगी नाहीं.

• • •

# ४. पुरोगति आणि परागति

[ ' विश्ववृत्त ', मे आणि जून १९०६ ]

## ( १ ) राष्ट्रध्यान :

आपला देश, आपला धर्म, आपली भाषा, या सर्वांचा उदय व्हावा, तो देश अपकृष्टदशेंत असला तर त्याची ती दशा नाहींशी व्हावी, पारतंत्र्यांत असल्यास त्यास स्वातंत्र्य मिळावें, अशी इच्छा ज्याच्या मनांत नाहीं असा मनुष्य पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि सांपडणार नाहीं. सर वॉल्टर स्कॉट म्हणून एक प्रसिद्ध कवि व कादंबरीकार होता, त्याचें एक कवन आहे. त्याच्या प्रारंभीं, ही माझी स्वभूमि, स्वजन्मभूमि आहे असें स्वत:ला जो कधीं म्हणाला नाहीं, 'अशा मेलेल्या आत्म्याचा माणूस जिवंत आहे काय ?' असें वाक्य आहे. केव्हांना केव्हां तरी स्वभूमि, स्वजन्मभूमि हे विचार मनांत आलेच पाहिजेत असें स्कॉटचें म्हणणें आहे व असे विचार न येणें अशक्य आहे असा त्याचा भाव आहे; पण जर कदाचित् असा माणूस असेल तर त्याच्याबद्दल विचार काय करावा तें कवीनें दर्शविलें आहे. अशा प्रकारचा कधीं तरी स्वभूमीचा विचार आला तर स्कॉट कवीच्या वेळेस स्कॉटलंडचें चालण्याजोगें होतें, पण आमच्या देशांत हल्लीं एवढ्यानें भागणार नाहीं. जर आमचा उदय व्हावयाचा असेल तर कांहीं वर्षें तरी सर्व जातींच्या, धर्मांच्या व स्थितीच्या लोकांनीं देशाचें एकसारखें ध्यान केलें पाहिजे. सामान्य व्यवहार जगण्यासाठीं घडले पाहिजेत, ते कांहीं राहत नाहींत, ते बुद्धिपुरस्सर करावयाचे असें सुद्धां मनांत वागवावयास नको. राष्ट्र मात्र दृष्टीआड होतां कामा नये. त्यापासून आपली दृष्टि दुसरीकडे चालविणारा तो आपला दुष्मन असें वाटलें पाहिजे. उपनिषदांत सांगितलें आहे कीं, 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव', 'आचार्यदेवो भव' त्याचप्रमाणें याउपर '**राष्ट्रदेवो भव**' असा उपदेश प्रत्येकास केला पाहिजे. पितृभक्ति, गुरुभक्ति, तशी राष्ट्रभक्ति मानली पाहिजे. त्यांत राष्ट्रास सर्वथा जेणेंकरून मोठेपणा येईल. त्या गोष्टी करण्यास झटणें हें राष्ट्रासंबंधीं प्रत्येकाचें कर्तव्य होय. भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें सत्पुत्राचें लक्षण असें आहे कीं जो वडिलांस आपल्या चांगल्या आचरणानें सुख देतो तो सत्पुत्र. आपली जन्मभूमि किंवा मातृभूमि ही सुद्धां वडिलांप्रमाणेंच आपला पुत्र चांगल्या आचरणानें आपणांस सुख देईल अशीच आशा करून राहते हें प्रत्येक माणसानें

लक्षांत वागविलें तरच त्याच्या हातून सत्कृत्यें होत राहतील. सर्व गोष्टी यथास्थित चालल्या असल्या म्हणजे मनुष्यास आपल्या स्वतःच्या सुखा-समाधानाकडे लक्ष पुरवितां येतें. आई, बाप, भाऊ व इतर आप्तइष्ट या सर्वांच्या प्रकृति ठीक असून धनधान्यसमृद्धीहि झाली आहे, राजभय, चोरभय किंवा परचक्रभय नाहीं अशा स्थितींत राष्ट्र असलें म्हणजे कोणत्याहि गोष्टीची फिकीर राहत नाहीं, परंतु यांपैकीं कोणास कांहीं दुखणेंबाणें झालें म्हणजे त्या माणसाकडे लक्ष द्यावें लागतें, कर्त्या पुरुषास, म्हणजे अर्थात् इतर माणसें ज्याच्यावर अवलंबून राहतात त्यास कांहीं मोठा आजार झाला तर सर्व माणसांचें लक्ष तिकडे लागतें व असतील नसतील तितके प्रयत्न त्याच्या आरोग्यासाठीं केले जातात व परमेश्वरकृपेनें आराम पडला म्हणजे सर्वांस आनंदी आनंद होतो. याच दृष्टान्ताचा आश्रय करून आम्ही असें म्हणतों कीं भारत-राष्ट्रपुरुष आज आजारी आहे. अनेक दिवसांच्या आजारानें त्याची सर्व शक्ति नष्ट होत चालली आहे, पण अजून आशा आहे तोंपर्यंत यत्न करणें योग्य आहे. परंतु एकादोघांनीं किंवा एकदोन हजारांनींच याबद्दल तळमळ करून पुरें होणार नाहीं. राष्ट्रांतील प्रत्येक माणसास यासंबंधीं निदिध्यास लागला पाहिजे. कोणता उपाय करावा, कशानें सुस्थिति प्राप्त होईल इकडे सर्वांचें लक्ष लागलें पाहिजे. परंतु प्रत्येकानें निरनिराळे उपाय करून सर्व बावचा करावयाचा नाहीं. राष्ट्रांत एक सार्वनियामक संस्था असून तिनें दर्शविलेल्या मार्गानें कार्य चाललें पाहिजे. राष्ट्रपुरोगतीचें धोरण ठरविणारे पुढारी सर्वांस काम नेमून देतील तें आपआपलें काम सुयंत्रित रीतीनें पार कसें पडेल याचें रात्रंदिवस प्रत्येक व्यक्तीस ध्यान लागलें म्हणजे झालें. आज सरकारप्रमाणें या राष्ट्राची संस्था नाहीं असें लोकांस वाटत आहे, परंतु खरी गोष्ट तशी नाहीं. संस्था स्थापन झाली आहे, पण पुढारी लोकांनीं राष्ट्रांतील लोकांस मार्ग दाखवून दिला नाहीं. मार्ग ठरवून तो उत्तम रीतीनें लोकांच्या मनांत ठसविण्यास जे उपाय योजिले पाहिजेत ते उपयोजिले जात नाहींत, यामुळें राष्ट्रीय सभेसारख्या उत्तम व इतर राष्ट्रांत अत्यंत फलप्रद ठरलेल्या संस्थेचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. आतां निजण्याची वेळ नाहीं. प्रत्येक शहराच्या पुढारी लोकांनीं आपआपल्यापुरती संस्था करून तिच्या द्वारां आपल्या प्रांताच्या चळवळीचें धोरण ठरवावें. मोठ्या राजकीय धोरणाचा विचार बाजूस ठेवला तरी लोकशिक्षणाचा मोठा प्रश्न ठिकठिकाणच्या लोकांनीं उलगडण्यास हरकत नाहीं. 'स्थानिक प्रश्नांचा विचार जेथल्या तेथेंच झाला पाहिजे. परंतु राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांमध्यें जसा उदासीनपणा आहे तसाच

ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांत आहे, हा सर्व प्रकार शोचनीय आहे, निंदनीय आहे असें कोणीं कोणास म्हणावें? आपण सर्व एकाच संकटांत आहों व एकाच दोषानें ग्रासलेलों आहों. तेव्हां इतकेंच म्हणावें कीं, सर्व पुढारी लोकांनीं राष्ट्रदेव बनून राष्ट्रध्यानपरायण झालें पाहिजे व सर्वांनीं आपआपलें लहानमोठें कर्तव्य बजाविण्यास जपलें पाहिजे.

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।**

**इंग्रजांनीं चालविलेलीं वर्तमानपत्रें :**

इंग्रजी राज्याची इकडे स्थापना झाल्यापासून वर्तमानपत्रें निघूं लागलीं. प्रथम राज्यकर्त्यांच्या जातभाईंचीं वर्तमानपत्रेंच प्रसिद्धीस आलीं. इतर बाबतींत ज्याप्रमाणें कांहीं कालपर्यंत आपण परकीयांचें अनुकरण करीत आलों, त्याप्रमाणें याहि बाबतींत अस्सलबरहुकूम नक्कल वठविण्याचें काम चाललें. अलीकडे स्वतंत्र विचारांचा थोडाबहुत फैलावा झाल्यामुळें इंग्रजांच्या दृष्टीनें एखाद्या गोष्टीचें स्वरूप पुढें आलें तर एतद्देशीयांच्या दृष्टीनें त्याच गोष्टीचें निराळें स्वरूप पुढें येतें. कित्येक दिवसपर्यंत परकीय राज्यकर्ते व आपण जिंकलेली प्रजा यांचे हितसंबंध भिन्न आहेत ही गोष्ट वर्तमानपत्रकर्त्यांच्या स्वप्नींहि नव्हती. हिंदुस्थानच्याच कल्याणाकरितां ब्रिटिश राज्याची स्थापना हिन्दुस्थानांत झाली आहे अशी सर्वत्र भावना होती. पुढें पुढें हा ग्रह पालटला. आतां तर हिंदुस्थानच्या खऱ्या हिताची कोणतीहि गोष्ट प्रायः इंग्रज वर्तमानपत्रकर्ते हातीं घेत नाहींत अशी समजूत होत चालली आहे. राजद्रोहांच्या खटल्यांची उभारणी करण्यास सरकारला जर कोणाची मदत विशेष होत असेल तर ती मुख्यत्वेंकरून आमच्या इंग्रज नामधारी बंधूंकडून व्हावयाचीच असें ठरल्यासारखें आहे. कांहीं इंग्रज वर्तमानपत्रकर्ते या विधानास अपवादभूत असले तर ते अपवाद नियमाची विशेष जोरानें सिद्धि करतात इतकेंच होईल. शिवाय त्या वर्तमानपत्रांत ज्या विषयांची चर्चा असते त्यांचा हिंदुस्थानशीं प्रायः कोणत्याहि प्रकारचा संबंध नसतो. जेव्हां संबंध येतो तेव्हां कांहींतरी हितशत्रुत्वाचा येतो. आतां या तऱ्हेनें कां होईना, ते काय म्हणतात हें कळणें जरूरीचें आहे. परंतु यासाठीं आपल्या पदरचे पैसे खर्चून त्यांचीं पत्रें घेण्याचें कारण नाहीं. असा हल्लीं सर्व देशांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत अभिप्राय होत चालला आहे. त्याअन्वयें कित्येक ठिकाणीं इंग्लिशमन्, मद्रास मेल, टाइम्स ऑफ इंडिया यांजवर बहिष्कार घालण्यांत आला आहे. आमच्या मुंबई इलाख्यांतच काय तीं आमचीं निवळ इंग्रजी दैनिक पत्रें

नाहींत, इतरत्र आहेत. आमच्या इलाख्यांतहि 'ज्ञानप्रकाश' व 'इन्दुप्रकाश' हीं दोन दैनिक पत्रें इंग्रजांच्या पत्रांतील उतारे घेऊन लोकांची तेवढी भूक भागवूं शकतील. शिवाय मोठमोठ्या शहरांतील लोकांस इंग्रजी समाजाच्या व युरोपांतील विविध गोष्टी कळवून घेण्याचा छंद लागला आहे, तो पुरविण्यासाठीं फार तर इंग्रजी दैनिकांच्या आठवड्याच्या आवृत्ति घेण्याचें करावें. कोणतेंहि व्यसन सुटतां सुटतां सुटेल. एवढ्या विचारानें ही युक्ति सुचविली आहे. जगांत राहाणारे आम्ही अलग राहूं शकत नाहीं. बाहेरच्या व्यवहारांचा परिणाम सर्वांवर होतो. परंतु त्या व्यवहारांचें परीक्षण ज्याचें त्यानेंच केलें पाहिजे. आमचे स्वतःचे बातमीदार सर्व जगांतील प्रमुख ठिकाणीं असले तर, हें काम आमच्या देशाच्या संबंधाच्या गोष्टीसंबंधानें उत्तम तऱ्हेनें पार पडेल. हल्लींची रूटरसारखी आपमतलबी मंडळी सर्वस्वीं त्याज्य आहे. तिचें दुष्ट व निंद्य वर्तन अनेक वेळां दिसून येतें. परवांच्या बॅरिसाल प्रकरणीं तिनें अगदीं मूकभाव धारण केला असल्यानें, विलायतेस त्या प्रकरणाची फारच थोडी माहिती झाली होती. मेच्या चौथ्या तारखेच्या सुमारास इकडून जेव्हां आमच्या लोकांचीं वर्तमानपत्रें गेलीं, तेव्हां सर्व गोष्टी कळल्या. शेंकडा पांच रकानेसुद्धां ज्या वर्तमानपत्रांत लोक-हिताच्या गोष्टीकडे दिलेले असतात नसतात, बहुतेक भाग सिमला, महाबळेश्वर, उटकमंड, खंडाळा वगैरे हवेच्या ठाण्यांतील मेजवान्या व खेळ, गव्हर्नर व गव्हर्नर जनरलांचे दौरे, तसेंच विलायतेकडील गप्पासप्पा, बातम्या, खेळांचे वृत्तान्त व व्यापारवृद्धीची माहिती या गोष्टींनीं व्यापले असतात, अशा पत्रासाठीं सालीना मोठमोठ्या रकमा खर्च करणें हें स्वदेशी चळवळीच्या अगदीं विरुद्ध वर्तन होत आहे या गोष्टीचा सर्व लोकांनीं शांतपणें विचार केला पाहिजे. बहु-मतानें जेथें कार्यें चालतात अशा पुस्तकालयांतून तर या इंग्रजी वर्तमानपत्रांस अगोदर अर्धचंद्र मिळाला पाहिजे. बऱ्याच ठिकाणीं हे विचार सुरू आहेत ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

**आमचे वर्तमानपत्रकर्ते, वक्ते व लेखक :**

राष्ट्रास हल्लीं खऱ्या महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या आहेत याचा विचार करून नेहमीं ते विषय सदासर्वदा लोकांच्या पुढें आणले पाहिजेत, ही गोष्ट आमचे पुढारी म्हणजे राष्ट्रीय विचारास वळण लावणारे अगदीं विसरतात. एक वेळ किंवा दोन वेळ भाषणें करून किंवा लेख लिहून कार्य आटोपतें, असा त्यांचा समज आहे कीं काय कोण जाणें ? पाश्चात्त्य

राष्ट्रांत एका एका कार्यास वाहिलेलीं पत्रें व मासिक पुस्तकें असतात तशीं इकडे नाहींत तोंपर्यंत इंग्रज वर्तमानपत्रकर्ते तारेंतून आणून ज्या बातम्या आपल्या पत्रांत छापतात किंवा तिकडील वर्तमानपत्रांतून उतरून घेतात, त्यावर कांहीं लिहीत सुटणें हें पुरें नाहीं. आमच्या खऱ्या कल्याणाच्या गोष्टीपासून आमचीं मनें पराङ्मुख व्हावीं असा कोणा हितशत्रूचा मानस असला तर त्यानें याहून दुसरी युक्ति योजली नसती. नवीनपणांत काय विशेष आहे? आपणांस काळाप्रमाणें एकसारख्या ग्रासून टाकणाऱ्या गोष्टींत आमची पुरोगति किंवा परागति किती झाली याचा सदैव पुनः पुनः आढावा घेतला पाहिजे. आपले स्वतःचे विश्वसनीय बातमीदार जागोजाग ठेवले पाहिजेत. सार्वजनिक महत्त्वाचे प्रश्न प्रसिद्ध करून सर्वांस उत्तरें देण्यास विनंती केली पाहिजे. आपल्यांतील विचारी माणसांचे अभिप्राय प्रकट केले पाहिजेत. स्पेनच्या राणीच्या किंवा राजाच्या खुनावीण आमचें काय अडलें आहे ? इंग्रजी वर्तमानपत्रें नसतीं तर त्यांस महत्त्व आलें नसतें. बादरायणसंबंध लावतां येणार नाहीं अशी कोणती गोष्ट आहे ?

आजकाल प्रत्येक आठवड्याच्या पत्रांत निदान महिन्यांतून कांहीं एकदां व कांहीं दोनदां तरी लोकजागृतीचे प्रयत्न झाले पाहिजेत असे कांहीं विषय पुढें देतों:— स्वदेशी चळवळ, राष्ट्रनिधि, राष्ट्रीय शिक्षण, नैतिक उन्नति, शारीरिक ऱ्हास, स्वत्वसंरक्षण, शास्त्रीय ज्ञान, यांत्रिक शिक्षण, स्त्रीशिक्षण, राष्ट्रीय सभा, तिच्या हेतूंचा विचार, स्थानिक चळवळी, लोकमत, प्रबुद्धलोक-शिक्षण, आध्यात्म्यविद्या, प्रपंच व परामर्थ, औद्योगिक विद्या विषय ( व्यापार, शेतकी वगैरे ), धार्मिक शिक्षण, ऐतिहासिक शोध, वाङ्मयीन ऊहापोह वगैरे.

ही यादी परिपूर्ण आहे असें नाहीं; परंतु आमच्या म्हणण्याचा रोख कळावा म्हणून दिली आहे. लिहिण्याचा हेतु इतकाच कीं, एखाद्या विषयास सरकारनें किंवा एखाद्या अंमलदारानें महत्त्व दिलें म्हणजे त्या त्या तुरळक बाबीचा विचार होतो. त्या वेळचे विचार चित्तक्षोभाच्या तडाक्यासरशीं बाहेर पडतात तसें पडणें जरूर आहेच. रोग उत्पन्न झाला म्हणजे तेथें मात्रा किंवा औषध पोंचलें पाहिजे. कायम महत्त्वाच्या विषयावरून आमचें चित्त उडावें व क्षणिक महत्त्वाच्या विचारांत गुंग होऊन राहावें असे प्रकार धूर्त परकीय राज्यकर्ते करीत असतात. उगीच क्षोभ उत्पन्न करून तो कालेंकरून निवतो न निवतो तों तसलीच दुसरी बाब उपस्थित करावयाची. ब्रिटिश राज्याचें असें

धोरण चाणाक्ष पर्यालोचकाच्या लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. गौप्य-गोपनाचा कायदा व विलायतेस नेलेल्या राजे व सरदार अतिथिमंडळाकडून खर्च घेण्याची क्लृप्ति, हिंदुस्थानचें कांहीं सैन्य आफ्रिकेंत ठेवण्याची योजना, हीं अशा प्रकारचीं उदाहरणें होत. कायम महत्त्वाच्या विषयावर लोकमत जागृत करून राष्ट्रीय उत्कर्षाच्या कामास त्यांना तयार करण्याकडे जें लेखनसामर्थ्य व वक्तृत्व खर्च व्हावयास पाहिजे होतें तें असले क्षुद्र व अल्पकालिक महत्त्वाचे विषय घेऊन गेले. त्यांतलाच प्रकार हा वंगभंगाचा होईल अशी कर्झन साहेबांची अपेक्षा असावी, पण यांतून कायम महत्त्वाच्या एका चळवळीकडे लोकांचें लक्ष गेलें व आतां वंगभंग रद्द झाला तरी ती चळवळ थांबावयाची नाहीं हें लॉटसाहेबांचें दुर्दैव. हिंदुस्थानास पुरोगतीचा मार्ग दाखवून द्यावा हा कांहीं त्यांचा हेतु नव्हता. असो, तात्पर्य इतकेंच कीं कायम महत्त्वाच्या विषयाकडे आपण दुर्लक्ष करूं नये. हे विषय व त्यांच्या शाखा आपल्याश‍ा करून त्यांचा फुरसतीप्रमाणें तरुण विद्वानांनीं परिचय करून घ्यावा व राष्ट्रबांधवांस त्याचा फायदा द्यावा ह्या कायम महत्त्वाच्या विषयांच्या तात्पुरत्या अंगास क्षणिक महत्त्व येतें त्या वेळीं कांहींतरी लिहावें-बोलावें लागतेंच, पण तेवढ्यावर समाधान मानून राहूं नये. असे विषय कोणते हें सांगण्याचें कारण नाहींच, तरी दिग्दर्शन करतों. बॅरिसाल, राजाशाही, मायमनसिंग इत्यादि ठिकाणांतील धामधुमी, आमचें वेदोक्त, हिंदु युनिव्हर्सिटी, बंगाल नॅशनल एज्युकेशन स्कीम, पैसाफंड, अलीगढ कॉलेज, इंग्रजी वर्तमान-पत्रांचा खोडसाळपणा, ठिकठिकाणीं भरणाऱ्या स्वदेशी चळवळीच्या सभा, ग्रंथकारांचें संमेलन, रायगड महोत्सव, मिसेस् ॲनी बीझँट व पंडिता रमाबाई, यांच्यांतील साम्यवैषम्य विचार, वगैरे. असे विचार वर्तमानपत्रांत येतात. त्यांनीं केव्हां केव्हां वरील कायम महत्त्वाच्या विषयांकडे वळावें व आपण होऊन ते विषय पुढें आणावे. मासिक पुस्तककारांनीं तर त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरवावें. लिहिणारास व विचार करणारांस विषय पुष्कळ आहेत.

## ( २ ) " पुरोहितवर्गावरचा राग धर्मावर काढणें अविचारीपणाचें आहे. "

हिंदुस्थानांत काय व इतर देशांत काय केवळ नीतीचा आश्रय करून सर्व व्यवहार चालवूं पाहणारे लोक आपल्या बुद्धीस अगम्य असें कांहीं आहे हें विसरतात. आपल्याहून कोणी श्रेष्ठ असून त्याचे आपण भक्त आहोंत असें मानून शरण असलों म्हणजे तो शुभ बुद्धि देतो. भक्तिपुरःसर 'स नो बुद्ध्या शुभया

संयुनक्तु ' अशी प्रार्थना केली म्हणजे बुद्धि शुभ होते. मनांत तेंच तें पुनः पुनः आणलें म्हणजे त्याकडे मानासिक प्रवृत्ति होते. यासाठीं सद्धेतु व सद्वासना यांचें फार नाहीं तर नित्य अर्धी पाव घटिका तरी चिंतन करावें, असा अभियुक्तांचा उपदेश आहे. इतर भाषांतील ग्रंथांप्रमाणेंच आपल्या साधुसंतांचे ग्रंथ फार नाहीं तर नित्य घटिका दोन घटिका वाचावे अशी आमची सर्व तरुणांस सूचना आहे. हल्लीं धर्माविरुद्ध त्यांचा झालेला निकाल आरोपींचें म्हणणें मुळींच किंवा पुरें न ऐकतां दिलेला आहे. रामदास, तुकाराम आदिकरून मंडळीचा हक्क महाराष्ट्रीयांच्या मनांवर नाहीं असें नाहीं. स्पेन्सर व हक्सले यांहून कांहीं जास्ती आहे. नीति म्हणजे इहलोकीं वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय किंवा वैश्विक कल्याणप्राप्तीसाठीं राखावयाचें वर्तनांतील धोरण; परंतु धर्म म्हणजे या धोरणास बल देणारें व प्राणिमात्रांतील अमर अंशाचें आत्यंतिक श्रेय साधण्यासाठीं राखावयाचें वर्तनांतील धोरण होय. या दोहोंमधील विवेक समजण्यास विशिष्ट बुद्धियोग लागत असतो. तो भगवच्छरणंगतीनें प्राप्त होतो. तसा बुद्धियोग देईन म्हणून श्रद्धायुक्तांस भगवंताचें वचन आहे.

धर्म व नीति यांचा परस्परविरोध आहे असा भ्रमात्मक व भ्रामक समज करून घेऊन; कांहीं लोक आपल्या तर्काग्नीनें धर्माचें भस्म करूं पाहतात ही त्यांच्या सारासार विवेकशून्यतेची साक्ष आहे. अधिकमासांत अनारशाचें वायन घेऊन तें वायन हीन जातींतील आपल्या अंगवस्त्रास अर्पण करणारे भटजीबोवा समाजांत असले म्हणजे धर्माची योग्यता कमी मानणारे लोक, सुधारणावाद्यांच्या समाजांत दारू पिणारीं माणसें पाहून सर्व सुधारकवर्गावर तुटून पडणाऱ्या लोकांहून श्रेष्ठ बुद्धीचे मानतां येणार नाहींत. दुराग्रही व जुलमी अंमलदार असले म्हणून विशिष्ट सरकाराविरुद्ध किंवा सामान्यतः राज्यव्यवस्थेविरुद्ध बंड करणें जितकें समंजसपणाचें होईल तितकेंच पुरोहितवर्गावरचा राग धर्मावर काढणें हें सुविचाराचें होईल. व्यक्तींच्या वर्तनावरून समाजाविषयीं सामान्यजनाचा ग्रह वाईट होतो म्हणून प्रत्येक व्यक्तीनें आपल्या समाजाच्या अब्रूसाठीं जपलें पाहिजे. एवढ्या अंशानें पुरोहितवर्गाचें वर्तन निंद्य आहे हें आम्ही प्रांजलपणें कबूल करतों. परंतु अनेक परीक्षा उतरून सुशिक्षित म्हणून गाजणाऱ्या लोकांमधील, मद्यपी, उत्कोचग्राही (लांच घेणारे), परांगनासेवी, वारांगनागृहवासी, विद्याविभूषितांपेक्षां पुरोहितांस दोष अधिक देतां येईल काय? एकाच्या वर्तनानें विद्या त्याज्य होत नाहीं तर, दुसऱ्याच्या वर्तनानें धर्म आदरणीय कां व्हावा हें कोणी सांगूं शकेल काय? धर्माच्या साहाय्यानें दुसरें मोठें कार्य करावयाचें आहे तिकडे सर्व बुद्धि,

उत्साह, साहस, स्वार्थत्याग, मनोनिग्रह व उद्योग या षाड्गुण्याची जरूर आहे. हल्लींचा उपाध्याय, पुरोहित, जोशी वगैरे पिढीजात व लोकांत वजनदार असलेला भिक्षुकवर्ग स्थित्यंतराच्या फेऱ्यामुळें क्षीणबल झाला आहे असें वाटल्यास त्याला हातीं धरा किंवा त्या वर्गांत तुम्ही स्वतः शिरा. वर्णधर्म बुडवून आपण व राष्ट्र सर्वच बुडूं नका. धर्म, नीति व राष्ट्रोत्कर्ष या गोष्टी एकजीव आहेत. त्या तशा आमच्या वाडवडिलांनीं मोठ्या शहाणपणानें ठेवल्या आहेत. त्यांनीं आमच्या समाजव्यवस्थेस पुष्कळ स्थितिस्थापकता ठेवली आहे, यायोगें ही समाजव्यवस्था त्रिकालाबाधित आहे. त्रिकालज्ञ परमेश्वराच्या अंशांनीं निर्माण केलेली गोष्ट अशीच असावयाची.

• • •

# ५. हिंदुधर्म – सनातनधर्म

[ 'ग्रंथमाला', ऑक्टोबर १९०० ]

**आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम्‌ ।**
**सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥**

पाश्चात्य विद्येचा परिचय विशेष झाल्यानें व परकीय राजांचें धर्मशिक्षणाकडे अलक्ष्य असल्यानें आम्हांतील कित्येक लोक नित्यनैमित्तिक कर्माविषयीं आदरहीन झाले आहेत. प्रायः कर्मलोप झाला आहे. त्यायोगानें ज्यांच्या मनांत ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं बिलकुल संशय नाहीं असें लोकसुद्धां त्याच्या संबंधानें आपणांवर कांहीं कर्तव्यभार आहे असें मानीत नाहींतसे दिसतात. तर्कशास्त्राच्या कसोटीस कोणतेंच धर्मशास्त्र टिकत नाहीं म्हणून परधर्म स्वीकारण्यास ते तयार होणार नाहींत. आचाराविषयीं मनन करण्याची त्यांस जरूरी भासत नाहीं. परंपरागत चालू असलेले आचार व संप्रदाय तात्पुरते पाळले तरी, त्यांत आपली जोंपर्यंत स्पष्ट हानि दिसत नाहीं तोंपर्यंत ते तसे पाळण्याकडे त्यांची प्रवृत्ति आहे. बाकी त्यांतील सहेतुकता स्पष्ट नसल्यामुळें त्यांच्याविषयीं आदरबुद्धि नाहीं. कांहीं जनलज्जा, कांहीं मनलज्जा आणि कांहीं स्वकुटुंबांतील वृद्धजनलज्जा या ठिसूळ पायावर आज शिक्षित म्हणविणाऱ्या लोकांच्या धर्मविचारांची व आचारांची इमारत उभी आहे. आपलें तर्कशास्त्र या विषयास ते लावीत नाहींत. श्रद्धेचा भाग फार कमी आहे. इंग्रजी राज्यानें व शिक्षणानें नवीन विचाराचा प्रसार केला. त्या विचाराचा गंधहि पुराणधर्म संस्थांस लागला नाहीं त्यामुळें त्या जागच्याजागीं थंड राहिल्या. त्यांच्या हातून शिक्षित जनांचें प्रेम व आदर आपल्या ठिकाणीं जखडून ठेवणें झालें नाहीं. दीर्घकालपर्यंत अशिक्षित व स्वार्थपरायण लोकांच्या ताब्यांत या संस्था असल्यानें कालक्रमागत पूज्यत्व नवीन पिढीच्या मनांत बिंबण्यास मार्ग राहिला नाहीं. पुराणधर्मसंस्था व नवीन पिढी यांत बंध नाहींसा झाला.

राष्ट्रास धर्म नाहीं असें राहणें शक्य नाहीं. "आपण कोण? आलों कोठून? जावयाचें कोठें? आपल्या शुभाशुभावर स्वामित्व कोणाचें आहे? आपण तर सर्वस्वीं पराधीन आहों! काल आनंदी सागरांत तर आज दुःखपंकांत

अशी आपली स्थिति ! विश्वांतील सर्व चमत्कारांपुढें आपण दीन, पंगु व अज्ञान आहों" हे विचार केव्हांहि आल्याशिवाय राहणार नाहींत. या विचारांनीं उत्पन्न होणाऱ्या चित्तस्वाथ्याची शांति, ईश्वराचे ठायीं सदा लीन व श्रद्धायुक्त व भक्तिपूर्ण झाल्याशिवाय शक्य नाहीं. शुद्ध विचार व शुद्ध भक्ति यांचा आपल्या वैदिक धर्माच्या वर्तमान स्वरूपांत लोप दिसून आल्यानें व समाजांत पाहावें तिकडे भ्रष्टाकार दृष्टीस पडल्यानें चढत्या व विजयी राष्ट्रांच्या धर्माचारांचें अनुकरण भासणारा, पण प्राचीन हिंदुधर्माच्या तात्त्विक स्वरूपास बिलकुल सुटून नसणारा पंथ शिक्षित मंडळानें काढला. इंग्रजी शिकणाऱ्या लोकांच्या पहिल्या पिढीनें चुका केल्या असतील, आम्ही नाहीं म्हणत नाहीं, पण त्यांच्या पूर्वीच्या पिढींतील लोकांच्या मानानें पाहतां ही अधिक विचारी व उद्योगशील झाली यांत संशय नाहीं. अशा स्थितींत प्रार्थनासमाजादि धर्मसंस्था उत्पन्न झाल्या. परंतु त्यामध्यें धर्मसंस्थापक निवृत्तिपर आचार्य नसल्याकारणानें व इतर लोकसंग्राहक तत्त्वांचा त्यांत अभाव असल्यानें त्यांचा प्रसार झाला नाहीं. आमच्या लोकांत युगाचीं युगें दृढ झालेल्या अंतर्बाह्य शुचित्वाचीं लक्षणें यांतील प्रमुख प्रवर्तक मंडळींत नसल्यानें त्यांचा भक्तपरिवार वाढला नाहीं. शुद्धशील व विद्याविनयसंपन्न सांसारिक सद्गृहस्थ ह्या दृष्टीनें ज्यांची योग्यता पहिल्या प्रतीची ठरेल, त्यांस धर्माचार्यांचा मान देण्यास बहुजनसमाज तयार झाला नाहीं. राजा राममोहन रॉय व बाबू केशव चंद्रसेन किंवा दयानंदसरस्वती यांची गोष्ट वेगळी. अशी मंडळी इकडे प्रस्थापक असती तर कदाचित् इकडच्या समाजांचींहि पाळेंमुळें अधिक खोल गेलीं असतीं. इकडच्या प्रस्थापकांनीं बजावलेल्या देशकार्याची बेरीज केली तर ती फार मोठी व पूज्यभाव उत्पन्न करणारी अशीच आहे. परंतु इतर कार्याबरोबर धर्मसंशोधनाचें कार्य त्यांनीं हातीं घेतलें तें सिद्धीस गेलें नाहीं. त्यांच्याविरुद्ध लोकांस धरून धर्मसंशोधन करूं असें म्हणणाऱ्यांसहि यशसिद्धि प्राप्त झाली नाहीं. आजकाल ज्या मठाधीश, पुरोहित, उपाध्याय, पुराणिक, हरिदास, गुरव, पुजारी, सेवेकरी, भगत, भजनी इत्यादि मंडळीच्या हातीं लोकांतील पुराणधर्मसंस्था आहेत, त्यांच्यांत शुद्ध आचार व विचार यांचें बीं पेरण्याचा व रुजविण्याचा उपाय सुरू आहे असें दिसत नाहीं. विरुद्ध पक्ष नसते दोष समाजाच्या माथीं मारतो याचा सूड उगविण्यासाठींच कीं काय न कळे, आपल्या समाजांतील व्यंगांवर पांघरूण घालण्याचा व दुसऱ्याचे दोष बाहेर काढण्याचा क्रम सुरू आहे. वेदाचा अर्थ बिलकुल न समजतां वैदिक म्हणविणें हें गौण आहे. वेदपठणाबरोबर वेदार्थज्ञान

करून देणें हें आपलें कर्तव्य आहे. भलता दुराग्रह व मिथ्या अभिमान सोडून सत्यपक्षाचा सभ्य रीतीनें पाठराखीपणा करणारा सुधारक आचार्य अद्यापि निपजावयाचा आहे. तोंपर्यंत वाग्युद्ध चालेल.

त्यांतल्या त्यांत आनंद मानावयाची गोष्ट इतकी कीं, या दृष्टीनें अनेक लोक विचार करूं लागले आहेत. आत्म्याचें अमरत्व, पुनर्जन्म, ईश्वरोपासनेचे फलदायकत्व, कर्मानुरूप फलभोक्तृत्व इत्यादि विषयांकडे लोकांचें मन लागावें व सांप्रत जी धर्मपराङ्मुखता आपल्या समाजांत झाली आहे तिला प्रतिरोध व्हावा म्हणून आम्हांमध्यें अनेक प्रकारचे प्रयत्न सुरू आहेत. हिंदुधर्माची थोरवी जगास कळविण्यासाठीं येथून स्वामी विवेकानंद व अवधूत अगम्य योगीन्द्र यांसारखे धर्मशूर लोक परखंडी आर्यधर्माची विजयपताका घेऊन जात आहेत. इकडे हिंदुस्थानांतहि या विषयाची जारी चर्चा सुरू आहे. परवां पुण्यामध्यें एका व्याख्यानांत रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं हिंदुधर्माचें एक लक्षण केलें आहे तें असें —

प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानाय नियम एतद्धर्मस्य लक्षणम् ।।

त्यांचा हेतु मुसलमान, ख्रिस्ती वगैरे धर्म त्या लक्षणाखालीं येऊं नयेत. त्यांच्या मतें आर्यसमाज मात्र या लक्षणांत येतो, पण प्रार्थनासमाज येत नाहीं. त्यांनीं केलेल्या विवरणाप्रमाणें या लक्षणश्लोकाचा अर्थ केला तर त्या धर्मास सनातन धर्म या थोर पदावर बसवितां येणार नाहीं. तेंच वेद याचा अर्थ ईश्वरप्रणीत ग्रंथ असा सामान्य घेतला म्हणजे कुराण व बायबल ह्याहि ग्रंथांचा समावेश होईल. ख्रिस्त व महंमद आदिकरून साधूंचा योग्य आदर केलासें होऊन त्यांच्या ठायीं ईश्वरांशत्व कबूल करण्यास प्रत्यवाय राहणार नाहीं. खरें पाहतां आमच्या येथील नेटिव्ह जनरल लायब्ररींत रा. रा. वामन रामचन्द्र जोशी, बी. ए., संपादक समर्थ व आर्यन एज्युकेशन सोसायटीचे लाइफ मेंबर यांच्या 'मानवी सुख वाढविण्याचीं साधनें' या विषयावर झालेल्या व्याख्यानांत त्यांनीं दर्शविलेली आर्यधर्माची कल्पना याच व्यापक तत्त्वास अनुसरून होती. त्यांच्या मतें व्यक्तीचें नांव धर्मास देणें हें सर्वथा अनुचित. ख्रिस्ती धर्म, महंमद धर्म हें म्हणणें गैरवाजवी आहे. जितके धर्म म्हणून म्हणतात ते खरोखर पंथ होत. ते एका धर्माच्या शाखा होत. खरा धर्म एक आहे. तेथें अनेक उपास्य देवतांचे उपासक एकत्र प्रेमानें वागण्यास हरकत नाहीं. याच तत्त्वाचा अंगीकार

करून सर्व जग सनातनधर्माचें होईल अशी आशा आहे. या दृष्टीनें पाहतां पुढच्या श्लोकांत सनातनधर्माची कल्पना येण्याजोगें लक्षण सांपडेल.

भूतेषु समदृष्टित्वमीश्वरे शरणंगतिः ।
तद्विभूतिषु पूज्यत्वमेव धर्मः सनातनः ॥

भिन्न आचारांनीं भिन्न उपासनामार्गांनीं, भिन्न समाजव्यवस्थांनीं धर्मभिन्नता होण्याचें कारण नाहीं. द्वेषभाव वाढण्याचें किंवा अमकाच मुक्ति मिळविणार व दुसरा अधोगतीप्रत जाणार अशा उच्चनीच भावास थारा मिळणार नाहीं.

• • •

# वाङ्मयीन लेख

१ ग्रंथमालेचा उपोद्‌घात
२ मराठी भाषेची लेखनपद्धति
३ प्रो. मॅक्समुल्लर
४ केकावली
५ काळाची वक्रदृष्टि
६ ब्रह्मीभूत विवेकानंद
७ स्वामी विवेकानंद व ॲडव्होकेट सेटलूर
८ काव्यसंग्रह
९ नामदार प्रो० गोपाळ कृष्ण गोखले
१० श्रीधर गणेश जिनसीवाले
११ हर्बर्ट स्पेन्सर
१२ सारसंग्रह : विष्णु कृष्ण चिपळूणकर
१३ प्रास्ताविक
१४ मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा

# १. ग्रंथमालेचा उपोद्घात

[ 'ग्रंथमाला', वर्ष १ लें, अंक १ ला ]

प्रस्तुत मासिक पुस्तक सुरू करण्यांत, केवळ मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांस उपयुक्त असा ग्रंथसंग्रह निर्माण करावा, याशिवाय दुसरा प्रधान हेतु नाहीं. कोणतेंहि काम हातीं घेण्यांत अनेक उद्देश असतात. त्यांत कांहीं गौण असे असतात. प्रत्येक कृत्यापासून कांहींतरी परिणाम घडतात. वाईट कृत्यापासून वाईट, चांगल्यापासून चांगले. कित्येक वेळां वाइटापासून चांगले व चांगल्यापासून वाईट असेहि परिणाम होतात; परंतु या दुसऱ्याविषयीं आम्हांस तूर्त बोलावयाचें नाहीं. कारण, आम्हीं जें कृत्य हातीं घेतलें आहे, तें चांगलें म्हणूनच घेतलें आहे. आमच्या सकल देशबांधवांस जीं ज्ञानसाधनें प्राप्त नाहींत, तीं जगदीशकृपेनें आम्हांस प्राप्त झालीं आहेत. त्या साधनांच्या प्राप्तीसाठीं आम्हांस द्रव्य खर्चावें लागलें व थोडेबहुत कष्टहि सोसावे लागले. त्या सर्वांचा स्वतः आम्हांस तर थोडाबहुत फायदा झालाच आहे, परंतु त्याचा कांहीं थोडा अंश तरी देऊन, आपल्या देशबांधवांस ह्या सुखाचे व आनंदाचे वाटेगार करावें, अशा हेतूनें इंग्लिश व संस्कृत या भाषांतील ग्रंथसागरांत लाधलेल्या रत्नमौक्तिकांपैकीं कांहींची माला करून, आमच्या प्रिय वाचकांचे कंठीं अर्पण करण्यास आम्ही उद्युक्त झालों आहों.

हा उद्योग करणें म्हणजे आम्ही देशावर उपकार करतों, असें आमचें बिलकुल म्हणणें नाहीं. तसा न केला तर आम्ही आपल्या कर्तव्यास जागलों नाहीं असें होईल. दुसऱ्या एका दृष्टीनें पाहिलें असतां, आम्ही आमच्या अशिक्षित व सुशिक्षित अशा सर्व देशबांधवांचे ऋणी आहोंत. कारण, आम्हीं खर्चिलेल्या द्रव्यापेक्षां आम्हांस मिळालेला मोबदला फारच मोठा आहे. आम्ही ज्या विद्यालयांत चार अक्षरें शिकलों, तीं सर्व आमच्या देशबांधवांच्या एकवटलेल्या द्रव्यसंचयाचीं फलें होत. विद्यालयेंच काय, पण चोहोंकडे असलेली शांततादेखील आमच्या निर्विघ्न अध्ययनास आवश्यक होती; अशा एक का दोन म्हणून गोष्टी सांगाव्या. आम्ही ज्या समाजाचे अवयव आहों, त्या सर्व समाजाचे आम्हांवर अनंत उपकार आहेत, म्हणूनच प्राचीन तत्त्ववेत्ता प्लेटो म्हणतो कीं, लोकांत जेवढें बुद्धिवैभव व विद्वत्त्व असेल, त्या सर्वांवर समाजाचा हक्क आहे.

असा योग्य विचार केला असतां, आपल्या बुद्धिमत्तेचा व विद्येचा विनियोग, सर्वस्वीं समाजाचें कल्याण साधण्यांतच करण्याची सुशिक्षित लोकांवर केवढी जबाबदारी आहे हें पुसावयास नको. या गोष्टीची आठवण बहुधा दरवर्षी पदवीदानसमारंभाच्या वेळीं विश्वविद्यापीठाचे अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष करून देत असतात, परंतु याविषयीं आपण अत्यंत मंदकर्ण झालों आहों आणि विवाहकालीं 'सुमुहूर्त सावधान' असें वाक्य ऐकूनहि निरवधान असतोंच आणि पुढें संसार-लंपट होतोंच. तद्वतच आमच्या उपदेष्ट्यांचे उपदेश वायां जातात, असा आक्षेप येत असतो, त्यास वैयर्थ्य येण्याचा काल समीप आहे, हें पाहून कोणत्या देशहितचिंतकास आनंद होणार नाहीं ?

अशा प्रकारच्या प्रयत्नाची जरूरी आणि तसे करण्याची तयारी, याशिवाय आणखी एक गोष्ट आवश्यक आहे, ती नसेल तर असे प्रयत्न सफल होणें अशक्य. ती कोणती म्हणाल तर, साधनांचें आनुकूल्य. हें तिसरें तत्त्व नसल्यामुळें आजवर झालेले बहुतेक प्रयत्न फुकट गेले. त्या प्रयत्नाचें बीं या आर्यभूमींत रुजलें नाहीं. एका ठिकाणाहून उपटून दुसरीकडे लावलेल्या रोपा प्रमाणें दोन दिवस हिरवा रंग दाखविल्यावर, पुढें त्या सर्व प्रयत्नांस म्लानि आली. ज्या समाजाची सेवा करावयाची, त्या समाजांत सर्वत्र ह्या प्रयत्नांविषयीं अनास्था असल्यामुळें ते प्रयत्न व्यर्थ झाले. यांत समाजाचा दोष म्हणावा तर फारच थोडा आहे. ज्या गोष्टीची आपणांस आवश्यकता वाटत नाहीं, तिजविषयीं आपण आस्थापर असत नाहीं. म्हणून प्रथमतः लोकांस अशा प्रकारची आवश्यकता भासून दिली पाहिजे. समाजांतील अल्प अशा वर्गासच ती भासून उपयोगी नाहीं. प्रस्तुत विषयासंबंधानें म्हटलें तर मराठी ग्रंथ लोकांस समजले तर ते वाचतील, पण सामान्य लोकांस जितकें शिक्षण मिळालेलें असतें, तेवढें उच्चप्रतीचे ग्रंथ समजण्यास पुरेसें नाहीं. शिक्षणक्रमांत असलेल्या लोकांस ते ग्रंथ परभाषेंतच शिकले पाहिजेत. मिळून देशभाषेंत ग्रंथ होण्याची आवश्यकताच राहिली नाहीं, मराठींत जेवढें शिक्षण देण्यांत येतें, तेवढें सर्व अगदीं सुलभ विषयावर असतें, त्यांत कांहीं थोडेसे शिक्षकशाळेंत वगैरे उच्च विषय असतात, त्यांजकडे पुरावें तितकें लक्ष पुरत नाहीं. सारांश, मराठींतून झपाट्यानें सर्व प्रकारचें शिक्षण सुरू झाल्याविना या विषयासंबंधानें लोकांत आस्था व उत्साह उत्पन्न होण्याचा रंग दिसत नाहीं. हें काम लहानसान नाहीं. देशाचा त्वरित उद्धार व्हावा असा हेतु असेल, तर या बाबतींत आपल्याच लोकांस प्रचंड परिश्रम करणें जरूर आहे. एक दोन ठिकाणीं व्याख्यानें किंवा एक दोन वर्तमानपत्रांत लेख आल्यानें हें काम

उठणारें नव्हे. यास इकडचा पर्वत तिकडे केला पाहिजे. इंग्लिश लोकांनीं धान्याच्या कायद्याविरुद्ध जसा अँटिकॉर्न लॉ लॉग म्हणून विश्वव्यापी कट केला, व आयरिश लोकांनीं धर्मस्वातंत्र्य मिळविण्यासाठीं कॅथॉलिक असोसिएशन म्हणजे कॅथालिक मंडळ स्थापिलें, अशा महा प्रमाणावर जेव्हां चळवळ होईल, तेव्हांच हें कार्य पूर्णपणें फत्ते होईल. खेडोखेडीं, गांवोगांवीं, शहरोशहरीं सभा व पोटसभा स्थापून जेव्हां विश्वविद्यापीठावर अर्जांचे गोळे पडतील, तेव्हां हा गड हातीं लागणार. तोंपर्यंत आम्हीं हातीं घेतलेल्या कार्यास मोठेंसें यश प्राप्त होणें. कठीण.

आमच्या या म्हणण्याची सत्यता पाहणें झाल्यास, महाराष्ट्र ग्रंथसंग्रहाचा आजवरचा इतिहास पाहिला म्हणजे पुरे. इ० स० १८१७ त मुंबई इलाख्यांत पहिला छापखाना सुरू झाला. तेव्हांपासून १८६४ पर्यंत १०८ छापखाने झाले. त्यांपैकीं ४६ छापखान्यांत मिळून ६६१ मराठी पुस्तकें छापून निघालीं. त्या पुस्तकांत कांहीं फार चांगलीं होतीं असें म्हणतात; परंतु त्यांपैकीं बहुतेकांचें आज दर्शन होणें अशक्यप्रायच म्हटलें पाहिजे. पुढें झालें तरी आमच्या ग्रंथसंग्रहांत कादंबऱ्यांची भरती फार. अलीकडे थोडी जागृति झाली आहे व बडोदेकरांनीं या कामीं बराच आश्रय दिला आहे, म्हणून कांहीं चांगलीं पुस्तकें बाहेर पडलीं आहेत; परंतु एकंदरीनें पाहतां, या कामीं झालेले परिश्रम व त्यांचें अत्यल्प फल याचा विचार करतां छाती दडपून जाते, आणि इतक्या प्रयत्नांनींसुद्धां आमच्यांत सद्ग्रंथसंग्रह झाला नाहीं, तेव्हां आपलें दुर्दैव मोठें असें वाटल्याविना राहवत नाहीं. या कामीं ज्यांनीं खटपट केली त्या मंडळ्या कोणत्या, त्यांनीं केलें काय वगैरे माहिती देतां एक लांब निबंध होईल. येथें फक्त नांवें देतों.

| नांव | स्थापिली तें वर्ष |
|---|---|
| १. विद्योत्तेजक सभा | १८१५ |
| २. ( नांव माहीत नाहीं ) | १८२० |
| ३. नेटिव्ह स्कूल बुक आणि स्कूल सोसायटी | १८२२ |
| ४. हईदशाळा, शाळापुस्तकमंडळी ऊर्फ मुंबईची शिक्षामंडळी | १८२३ |
| ५. बोर्ड ऑफ एज्युकेशन | १८४० |

१ यासंबंधाची माहिती १८६७ सालीं, सर. ए. ग्रँट साहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या १८६४ पर्यंत छापलेल्या पुस्तकांच्या यादीच्या बुकावरून व विविधज्ञानविस्तार पुस्तक १० अंक ३ वरून मिळाली आहे, हें प्रसिद्ध करण्यास आम्हांस मोठा आनंद वाटतो.

| नांव | स्थापिलीं तें वर्ष |
|---|---|
| ६. स्टूडंट्स लिटररी ॲंड सायन्टिफीकिक ॲसोसिएशन – शाखा मराठी ज्ञानप्रसारक सभा | १८४८ |
| ७. दक्षिणभाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी | १८४९ |
| ८. दक्षिणाप्राइज कमिटी | १८५१ |
| ९. महाराष्ट्रजनप्रबोध कविताप्रसारक मंडळी | १८६२ |
| १०. मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी | १८७८ |
| ११. महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळी. | १८८९ |

या सर्व मंडळयांत मोठ्या आस्थेनें काम करणारे, विद्वान् व वजनदार असे लोक होते. नंबर ७ च्या मंडळीचा पुढाकार हार्ट म्हणून एक साहेब होते त्यांजकडे होता व यांनीं मोठ्या मेहनतीनें २५,००० रु. फंड जमविला होता. नंबर १० चे मंडळीचें प्रस्थापकत्व न्यायमूर्ति रा. ब. रानडे व कै. रा. ब. गोपाळराव हरी यांजकडे होतें. यांनीं कांहींच केलें नाहीं असें म्हणणें कृतघ्न-पणाचें होईल, पण श्रमाच्या व द्रव्यसाधनाच्या मानानें फल अत्यल्प आलें. हा ह्या वड्यावड्या मंडळयांचा इतिहास. हा सर्व सरकारच्या शिक्षणक्रमाच्या बाबतींत मराठीस उत्तेजन नसल्याचा परिणाम झाला; पण ह्याउलट एक वेळ चुकून सरकारचें वर्तन झालें आहे. मुंबईस एक वैद्यकवर्ग मराठींत काढला होता. तेवढ्याच उत्तेजनानें वैद्यकावर कांहीं चांगले ग्रंथ झाले. ते तेथील वैद्यकपदवीधर डा. सखाराम अर्जुन व डा. गोपाळ शिवराम यांनीं रचिले. हाच क्रम सरकारनें इतर विद्यास्थानांत अवलंबिला असता तरी बराच फायदा झाला असता. बरें, मासिक पुस्तकें आजवर निघालीं किती व बुडालीं किती, तें पाहिलें म्हणजे-दखील उत्साह येत नाहीं. नाहीं म्हणायला एक ‘विविधज्ञानविस्तार’ मात्र सन्मान्य अपवाद आहे, आणि त्यांतील लेखहि चांगले, योग्य व मार्मिक असतात.

अशा प्रतिकूल परिस्थितीस न जुमानतां, आम्हीं जगापुढें येण्याचें साहस केलें आहे, तें सामर्थ्यविशेषाच्या घमेंडीचें लक्षण नव्हे. ‘कर्तव्यमिति कर्तव्यम्’ याशिवाय दुसरा कोणताहि हेतु नाहीं. त्यांच्या अपयशाचीं कारणें अद्यापि जागरूक आहेतच, तथापि त्यांची दिशा बरोबर आहे आणि त्यांच्या योगानें मार्ग मळलेला आहे, म्हणून कांहीं संकटें कमी येतील असा सुमार दिसत आहे. कधींकाळीं (लवकर होईल अशी आशा आहे) वरिष्ठ शिक्षणांत मराठी भाषेचा प्रवेश झाला तर, अगर श्रीमंत गायकवाड सरकारांसारखा देशी भाषांचा वाली भेटून

संस्थानांत मराठी पाठशाळा व विद्यापीठाची स्थापना झाल्यास, ग्रंथसंग्रहाच्या बाजूनें अडचण राहूं नये हा उद्देश मनांत धरून, आमच्या पुणेकर मित्रमंडळीप्रमाणेंच आम्हीं हें काम हातीं धरलें आहे.

हल्लीं उच्च विषयावर मराठींत ग्रंथ लिहिणें फार कठीण आहे. अजून कित्येक पारिभाषिक शब्दसुद्धां ठरावयाचे आहेत. शिवाय साधारण इंग्लिश शब्द व कल्पनांसदेखील मराठी पेहराव चढविणें सुलभ नाहीं. मराठी भाषेचा हा क्रांतिकाल आहे. या वेळीं ग्रंथकारांच्या टांकसाळींतून कितीएक नवीन शब्द बाहेर पडतील. कित्येक स्वरूपतःच स्वार्थव्यंजक होतील, त्यास टीपेची अपेक्षा राहणार नाहीं. कित्येक दुर्बोध व अत्यंत अपरिचित असल्यास टीपा देण्यांत येतील. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत व सतराव्याच्या प्रथमार्धांत इंग्लिश भाषेची जी स्थिति झाली, तशीच आज आमच्या भाषेची होईल. फरक इतकाच कीं, आमच्या भाषेंत संस्कृत शब्दांचा प्रवेश बराच अगोदर झाला आहे. त्या वेळीं जसें वाटेल तसे शब्द भाषेंत आणले, कांहींस थारा मिळाला व बाकीचे लुप्त झाले. लोकांस रुचले तेच राहिले. खुद्द महाकवि शेक्सपीअरच्या प्रतिभेचा शिक्कामोर्तब झालेल्या शब्दांससुद्धां चिरंतन स्थळ मिळालें नाहीं, तेव्हां नवीन केलेले शब्द अशा प्रबल लोकमतावर अवलंबून राहतील. या संबंधांत जास्त लिहिण्याचें कारण दिसत नाहीं.

अगदीं साध्या कामांतसुद्धां आपण वारंवार इंग्लिश शब्दाचा उपयोग करतों, तें सोडून दिलें तर, मराठी भाषेंत सहज बरीच सुधारणा होईल व हल्लीं आम्हांस इंग्लिश शब्दांत जी खुबी वाटते, ती तितकी वाटणार नाहीं. नेहमीं इंग्लिश शब्दच वापरला म्हणजे तोच बरा वाटतो. कारणावांचून इंग्लिश शब्द वापरण्यानें आमची भाषा बाटकी झाली आहे. ही संवय मोडून आम्ही एकभाषी झालों, तर मराठीवर आमचे मोठे उपकार होतील.

आतां ह्या अडचणी पुढें ठेवल्या म्हणून, मराठी भाषेच्या योग्यतेंत कांहीं कमीपणा येत नाहीं. 'ही भाषा प्रगल्भ दशेस पोहोंचली नाहीं. हिचा शब्दसंचय दरिद्री आहे, म्हणून हिच्यांत चांगली ग्रंथरचना अशक्य' असेहि उद्गार आमच्या कानीं आले आहेत, पण हें म्हणणें अगदीं गैरवाजवी आहे. ज्या भाषेंत मुकुंदराज, ज्ञानदेव, मुक्तेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, मोरोपंत, रामजोशी, वामनपंडित इत्यादि कविवरांनीं आपले प्रासादिक ग्रंथ निर्माण केले, त्या भाषेस ग्रंथसंग्रहास नालायक म्हणणाऱ्यांचीच परीक्षा होते. परवांच

नामदार रानडे यांनीं हिंद यूनिअनच्या क्लबाच्या शेवटच्या व्याख्यानाच्या दिवशीं सांगितल्याप्रमाणें, संस्कृतचें पाठबळ असल्यास मराठींत पाहिजे त्या गहन विषयावर ग्रंथरचना करतां येणार आहे. संस्कृत शब्द मराठींत फार सुलभ रीतीनें सामील होतात, यामुळें संस्कृत भाषेच्या ठायीं असलेल्या माधुर्य, औदार्य, कांति इत्यादि गुणांचें चतुर लेखकास मराठींत प्रतिबिंब पाडतां येणार आहे. संस्कृतच्या आश्रयानें मराठींतहि आटोपशीर समासरचना करण्यास अवघड जात नाहीं. ही समासशक्ति इंग्लिश भाषेंतदेखील विशेष नाहीं. असो, या दृष्टीनें पाहतां प्रथमारंभीं थोडी बिकट वाट असली तरी कालेंकरून हा मार्ग फार सुगम होणार आहे.

आतां आमच्या मासिक पुस्तकांत येणारे विषय प्रसिद्धिपत्रकांत नमूद केले आहेतच. सर्व महाराष्ट्रग्रंथ आमच्या अवलोकनांत असणें शक्य नसल्याकारणानें, पूर्वीं कधीं झालेल्या निबंधाचें अथवा ग्रंथाचें भाषांतर करण्याचें हातीं घेतलें जाईल, असें न होण्याविषयीं खबरदारी घेऊं, पण कित्येक वेळां कृतकरणाचा दोष येईल, त्यास उपाय नाहीं. आमचे तर स्वतंत्र यत्न होतील, पण विविध-ज्ञानविस्तारांत असें झालें आहे कीं, पांचव्या व सहाव्या पुस्तकांत एक नऊ-प्रकरणीं आज्ञापत्र प्रसिद्ध झालें आहे, तेंच पुनः २० वर्षें गेल्यावर २२ व २३ व्या पुस्तकांत बहुतेक शब्दशः छापून निघालें आहे. आतां हें बुद्धिपुरःसर केलें असा अनुदार आक्षेप आणणारे आणोत. आम्हांस तर ही नजरचूक वाटते. असे प्रमाद ल्हानसहान विनोदपर चुटके व गोष्टी यासंबंधानें होण्याचा संभव फार आहे.

हिंदुस्थान देशास कधींतरी चांगले दिवस दिसणार असतील, तर ते येथील लोक अज्ञानांत राहून खचित दिसणार नाहींत. त्यांच्यांत सत्यज्ञानाचा प्रसार होऊन त्यांची वेडगळ समजुतींपासून मुक्तता झाली पाहिजे. आज त्यांच्यांत जे गुण दिसत नाहींत ते गुण आले पाहिजेत. दृढ इच्छा, अचल निश्चय, व्यावहारिक कार्यक्षमता, चिरस्थायी क्लेशसहत्व, अव्याहत उद्योग, विचारपूर्वक साहस, न भंगे प्रसंगीं असें धैर्यबळ, कर्तव्यपरायणता, स्वावलंबन, स्वहितत्याग, स्वत्वविस्मृति, परस्परविश्वास, इत्यादि गुणांचा जिकडे तिकडे प्रादुर्भाव झाल्याशिवाय आमचें नष्टचर्य टळणार नाहीं, आणि हे गुण उत्पन्न होण्यास ज्ञानप्रसाराशिवाय दुसरा उपाय नाहीं; आणि तो करण्याचे कामीं प्रस्तुत कालीं बहुत दिशांनीं यत्न सुरू आहेत, त्याच प्रयत्नसागरास आमचा हा

अल्पप्रमाण प्रवाह मिळून, आमच्या देशबांधवांच्या अज्ञानाचें क्षालन होण्यास त्याचें थोडेंबहुत साहाय्य झालें तर आम्ही मोठें समाधान मानूं.

असो; येथवर आमचे हेतु, आमची उमेद व आमचें मनोगत यांचें दिग्दर्शन केलें. आमच्या हातून ही सेवा निरंतर व नियमितपणें घडो, एवढीच जगन्नियंत्या परमेश्वराजवळ प्रार्थना करून हा बराच लांबलेला उपोद्घात संपवितों.

स्वधर्मस्वदेशस्वभाषादिकांचा ।
जगीं मान व्हावा असा हेतु साचा ॥
मनीं योजिला, अल्प हा यत्न केला ।
जनाला सदा तोषवो ग्रंथमाला ॥

• • •

# २. मराठी भाषेची लेखनपद्धति

[ ' ग्रंथमाला ', सारसंग्रह सप्टेंबर १९०० ]

एखादी गोष्ट आपणांस साधावयाची असली म्हणजे तिच्या सिद्धीसाठीं लागणारीं सर्व साधनें उत्तम स्थितींत राखणें हें कार्यसाधकांचें पहिलें कर्तव्य आहे. लढाई करणाऱ्या सरकारास आपलीं हत्यारें व दारूगोळा आणि आपलें सैन्य व आरमार ह्या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. एवढी मोठी गोष्ट कशाला, आमच्या नित्य व्यवसायांतीलच उदाहरण घेऊं. मासिकपुस्तकासाठीं लेख लिहावयाचा म्हणजे प्रथमतः आपलें डोकें साफ राखलें पाहिजे. नंतर कागद, लेखन व शाई हीं मुख्य लेखनसाधनें ठीक जमलीं आहेत कीं नाहीं हें पाहणें जरूर आहे. यानंतर कांहीं उपसाधनें म्हणतां येतील अशा गोष्टींविषयीं हयगय केल्यास लेखास बरीच गौणता येते. टीपकागद चांगला नसणें, पुष्टिपत्र वाईट असणें, बसण्याची जागा वाईट असणें, मेज व खुर्ची हीं लेखकाच्या बेताचीं नसणें वगैरे गोष्टी अशा उपसाधनांत येतात. लिहितां लिहितां एखादा ग्रंथ पाहावासारखा वाटावा व तो दूर असावा, म्हणजे एक प्रकारचा हिरमोड होतो, त्याचा अनुभव लेखकांसच माहीत. असो. सारांश इतकाच कीं, साधन-उपसाधनांची जुळणी झाल्याशिवाय साध्य वस्तूची प्राप्ति होत नाहीं. जावत्कालपर्यंत मनुष्य समाज करून राहिले आहेत, व परस्परांच्या हिताहिताचा विचार करून आपली उन्नति करूं इच्छितात, तावत्कालपर्यंत त्यांच्यांतील दळणवळण कमी होणार नाहीं. तें दळणवळण व्यवस्थित रीतीनें चालण्यास सर्व जगांत एक भाषा असती तर किती बहार झाली असती, परंतु अनेक कारणांमुळें तें शक्य नाहीं. देशादेशांत तरी एक एक भाषा असतेच असा नियम नाहीं. जेथें एक भाषा असते, तेथेंदेखील त्या भाषेंत अनेक प्रकार असतात. ते इतके कीं, एक भाषा बोलणाऱ्या लोकांस दुसऱ्यांचें म्हणणें कळत नाहीं. यासाठीं निदान एका भाषेचें तरी स्वरूप एकच असावें अशी ती भाषा बोलणारांची इच्छा होते. या हेतूस लेखी ग्रंथसंग्रहाची मोठी मदत होते. एखादी भाषा जेथें जेथें बोलली जाते, तेथें तेथें त्या भाषेंतील ग्रंथ वाचले जाऊन सर्व तद्भाषीयांच्या लिहिण्याबोलण्यास एकच वळण लागतें. वाङ्मयवृद्धीनें येणाऱ्या एकरूपतेस व्याकरणाचें साहाय्य मोठें होतें. हें व्याकरण

खरोखर वाङ्मयावरून व शिष्टजनसंप्रदायावरून ठरविलें असल्यानें त्याचा अधिकार दुय्यम प्रतीचा असतो, परंतु एकवार त्यास मान्यता आली, म्हणजे त्यांतील नियम पाळले जातात व मग विशेष नवीन रूढीशिवाय त्यांस बाध येत नाहीं. अशा प्रकारचे शुद्धाशुद्धनिर्णयाचे नियम बांधण्याचे परिश्रम देशांतील विद्वान् शोधकांनींच करावयाचे असतात. भाषेंत नवीन नवीन शब्द व पदसमुदाय अनेक कारणांनीं शिरतात, परंतु एकदां ठरलेला व्याकरणनियम सहसा बदलत नाहीं. तथापि कोणत्याहि शास्त्रास चालना नसल्यानें त्याची गति कालाबरोबर राहूं शकत नाहीं. या कारणामुळें आमचें पुणेकर विद्वन्मंडळ झटत आहे याबद्दल त्यांचे जितके उपकार मानावेत तितके थोडे. रा० सा० साने, गोडबोले व हातवळणे यांस कोणीहि नांवें ठेवोत. ते मराठी भाषेच्या प्रगतीविषयीं अश्रान्त परिश्रम करीत आहेत, त्याअर्थीं ती भाषा बोलणाऱ्या लोकांवर त्यांचे अनंत उपकार आहेत. त्यांच्या व अशाच प्रकारें श्रम करतील त्यांच्या म्हणण्याचा आदरानें व प्रेमानें विचार केलाच पाहिजे, असें आमचें साग्रह म्हणणें आहे. ठिकठिकाणीं **महाराष्ट्रभाषाभिवर्धक** सभा असाव्यात व त्यांनीं नाना प्रकारें भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ परिश्रम करावेत असें आम्हीं अनेक वेळां सुचविलें आहे. तशा प्रकारच्या सभांनीं आपले अभिप्राय मशारनिल्हे विद्वत्त्रयांस कळविणें हें त्यांचें कर्तव्य आहे.

सदरहू पंडितत्रयानें आजवर शालापत्रकांतून व पृथग्रूपानें अनेक लेख प्रसिद्ध केले. कृपा करून ते सर्व वेळोवेळीं आम्हांकडे त्यांनीं पाठविले त्याबद्दल आम्हीं त्यांचे ऋणी आहों. परवां एक महिन्याखालीं हे सर्व लेख ज्यांत समाविष्ट केले आहेत व आणखी कांहीं नवीं प्रकरणें ज्यांत घातलीं आहेत असें एक मनोहर पुस्तक त्यांनीं पाठविलें आहे. त्या सर्व प्रकरणांवर एकदम अभिप्राय देण्याचें धाडस आज करीत नाहीं. या विषयाचें विवेचन घाईघाईनें होणार नाहीं व असें करण्याचेंहि तादृश कारण नाहीं. म्हणून जें काम जसजसें येथील **महाराष्ट्रभाषाभिवर्धक** सभेमध्यें होईल त्याप्रमाणें प्रसिद्ध करण्याचा विचार केला आहे.

येथील **महाराष्ट्रभाषाभिवर्धक** सभेची स्थापना तारीख ११ माहे एप्रिल सन १८९९ रोजीं शके १८२१ च्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर झाली. हिचे सभासद शहरांतील मराठी शाळांचे मास्तर व ट्रेनिंग स्कूलचे विद्यार्थी आहेत. ही मंडळी या कामीं मनापासून झटते. तिच्या वेळोवेळीं सभा

भरतात. त्यांमध्यें भाषाशुद्धीसंबंधानें झालेले ठराव जसेच्या तसेच तिच्या वृत्तपुस्तकांतून ( प्रोसीडिंग बुकांतून ) उतरून घेतलेले आमच्या प्रिय वाचकांस सादर करतों.

ता० २२।४।९९. रा. सा. साने, गोडबोले व हतवळणे यांच्या ५ नंबरच्या टिपणांतील सामान्य तत्त्वांपैकीं पहिलें 'तोंड, जीभ वगैरे शतशः साधे व गोड शब्द मराठी भाषेंत रूढ होऊन तिच्या हाडीं खिळले आहेत व प्रिय झाले आहेत ते जशाचे तसे ठेवावे' हें सभेंत ठरलेल्या सर्व मंडळीस ग्राह्य ठरलें.

सदरील ५ नंबरच्या टिपणापैकीं तत्त्व दुसरें—'ज्या म्हणी, थोर पुरुषांचीं वचनें, पारिभाषिक शब्द वगैरे मराठींत येऊन रूढ झालेले आहेत त्यांमध्यें ढवळा-ढवळ करूं नये' वगैरेबद्दल पुढील सभेंत विचार व्हावा, अशी सूचना रा. रा. काशीकर मास्तर यांनीं आणून त्यांस रा. रा. जोगळेकर यांजकडून अनुमोदन मिळाल्यानंतर, त्याबद्दल वादविवाद होऊन अधिक मतांनीं ती पसंत झाली. तसेंच त्यापुढील सामान्य तत्त्व तीन हेंहि पुढील सभेकरितां आणावें. कारण, सभेचें काम लवकर संपणार नाहीं अशी सूचना रा. रा. बळवंतराव वैद्य व रा. रा. राम-भाऊ आळतेकर यांनीं आणल्यानंतर ती सर्वानुमतें पसंत ठरली.

ता० २४।६।९९. लेखनपद्धति सामान्य तत्त्वें नंबर ५ यांतील तिसऱ्या तत्त्वासंबंधानें विचार होऊन कांहीं भाग मंजूर झाला व सार्थ शब्दासंबंधाच्या व्याख्येबद्दल पुण्यास लेखी खुलासा विचारण्यांत आला होता. तें पत्र रा. हतवळणे, यांजकडून आलेलें वाचून दाखविलें, व ऱ्हस्व दीर्घ वगैरे शब्दाबद्दल छापील प्रति आल्या आहेत त्यांतील वाचन झालें.

ता० १।७।९९. नंबर ५ च्या कागदाचें सर्व वाचन होऊन सयाजीविजय पत्रांतील भाषासुंदरी या लेखाखालीं आलेल्या लेखासंबंधानें वाचन होऊन विचार झाला.

ता० ८।७।९९. सार्थ अनुस्वार कायम असावेत व ज्या शब्दांवरील अनुस्वार काढले असतांहि अर्थ समजण्यास अडचण पडत नाहीं व व्युत्पत्ति-संबंधानें हरकत येत नाहीं, ते त्याज्य मानावे असें ठरलें. नंतर अनुस्वारपत्रिका वाचण्यांत आली. व त्यासंबंधानें चर्चा करण्याकरितां हल्लीं उपलब्ध असलेलीं व्याकरणें [ मराठी भाषेचीं ] ट्रेनिंग विद्यार्थ्यांनीं नेमून घेऊन वाचावीं व त्यांतील शब्दासंबंधानें काय काय म्हणणें आहे त्याजबद्दल तयारी ठेवावी.

ता० १५।७।९९. आज रोजीं सभा भरली त्या वेळीं ठरलेले नियम खालीं लिहिल्याप्रमाणें.

समाहारद्वंद्वाच्या अनेकवचनी प्रत्ययांच्या अव्यवहित पूर्वीच्या सामान्यरूपाच्या अंत्यावर अनुस्वार असावा. उदाहरणार्थ – झाडामाडांस–मुलाबाळांस; कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं ' हातांपायांस ' असें लिहिलें आहे.

२ सविकरण सामान्यरूपासंबंधानें अनुस्वारानें अर्थभेद उत्पन्न होतो, त्याबद्दल उदाहरणें :—

( अ ) माझ्यांहून [ = माझ्या मुलांहून ] त्याचीं मुलें चांगलीं.

( ब ) माझ्याहून [ मजपेक्षां ] त्याचीं मुलें चांगलीं.

सदरील ( अ ) उदाहरणांतील अनुस्वाराबद्दल प्रघात कसा आहे तें पुढील सभेस पाहून येणेचें ठरलें.

ता० २२।७।९९. आज रोजीं सभेंत ठरलेला नियम :—

विभक्तिप्रत्ययासंबंधानें एकवचनी प्रत्ययावरचे पूर्वी सामान्यरूपावर अनुस्वार देऊं नये; अनेकवचनी मात्र द्यावा. दोन्ही वचनी प्रत्ययांवरील अनुस्वारांचा उपयोग नसल्यानें ते मुळींच नसावेत. अशानें एकवचनाचा भेद तेवढा दर्शविला जाऊन बराच घोंटाळा मोडेल. हल्लींच ही व्यवस्था द्वितीयेच्यासंबंधानें प्रचारांत आहे. जसें—वाघास, वाघांस. सप्तमीच्या दोन्ही वचनी सामान्यरूपावर अनुस्वार असतो. तो फक्त अनेकवचनींच देणेचा आहे. तसेंच ' घरांतून ' ह्या पंचमीच्या रूपाविषयीं आहे. यांत ' अंत अथवा आंत, आंतून व आंतील ' या शब्दांवर अनुस्वार पूर्वापार चालत आलेला आहे. तो अंतर शब्दांतील नकाराचा दर्शक आहे. तो फक्त अनेकवचनी राहील.

ता० १२।८।९९. आज रोजीं सभा भरल्यावेळीं पास झालेला ठराव येणेप्रमाणें — ' एकाच शब्दाचे अनेक अर्थ दाखविण्यासाठीं अनुस्वार देण्याचा प्रघात नाहीं. व्युत्पत्ति दाखविण्यासाठीं अनुस्वार असतो, जसें पांच पाच. याजवरून आजपर्यंतचा व्युत्पत्तिदर्शनाच्या उपयोगी असलेला अनुस्वार कायम ठेवावा. जेथें तसा नसेल तेथें नवीन देणेचें कारण नाहीं. कारण भाषेंत कायम झालेल्या शब्दांत बदल करावयाचा नाहीं असें ठरविलें आहे. जसें — ( मंचक ) माचा, खोडणें, शिंशपा, मास इ०.

ता० २६।८।९९. जेथें अनुस्वार प्रचारांत असून व्युत्पत्तिसिद्ध नसेल तेथें तो देऊं नये. जसें — धांवणें, फांस, कांच, लांकूड.

अनुस्वारपत्रक

अ [ पृष्ठ ४ ]— कायम.

करणम्, भक्षणम् यांतील अखेरच्या नपुंसकलिंगी प्रत्ययाचे दर्शक मराठींतील करणें, भक्षणें ह्या शब्दांतील अंत्यावरचे अनुस्वार आहेत. ते शब्द 'ए' कारांती नपुंसक शब्दांप्रमाणें धरून त्यासारखीच अनुस्वारपद्धति ठेवावी. 'अन' व 'म' असे दोन्ही मराठींत आले आहेत. 'म' बद्दल अनुस्वार आहे. सबब तो व्युत्पत्तिसिद्ध असल्यानें कायम ठेवला पाहिजे. धावनम्— धावणें हा शब्द केळें यासारखाच चालेल म्हणून — या [ क्रियावाचक ] धातुसाधितांचा अपवाद करण्याचें कारण नाहीं. दहीं, बीं, मोतीं यांवरील अनुस्वार काढण्याबद्दलचा नियम पसंत आहे. बी, बीं, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग असे दोन प्रकार आहेत. त्यामध्यें अनुस्वारच लिंगभेददर्शक आहे. यासाठीं कित्येकांच्या मतें नपुंसकलिंगापुरता अनुस्वार कायम ठेवावा असें आहे. परंतु एकाच शब्दासाठीं व्युत्पत्तिसिद्ध नसलेला अनुस्वार ठेवणें ठीक नाहीं.

सदरील ठराव या सभेंत पसार झाले. पुढें प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यानें हें काम बंद पडलें तें पुनः लवकरच सुरू होईल अशी आशा आहे.

• • •

# ३. प्रो. मॅक्समुल्लर

[ ‘ ग्रंथमाला ’, जुलै १९०० ]

सामान्यतः पुस्तकें वाचण्याइतकें जगांतील कोणत्याहि भाषेचें ज्ञान ज्या स्त्रीस किंवा पुरुषास झालें असेल, तिला किंवा त्याला या वृद्ध अनेकभाषाकोविदाचें नांव माहीत नाहीं, असें असणें आम्हांस तरी अशक्य वाटतें. दुसऱ्या कोणत्या कारणानें नाहीं तरी अगदीं अलीकडे ऋग्वेदाची नवीन आवृत्ति काढल्यावर ती रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांस तुरुंगांत नजर पाठविली व त्यांच्यावर मेहेरनजर करून सरकारनें त्यांस कारागृहांतून मुक्त करावें अशा प्रकारचा अर्ज विलायतेस ज्या प्रमुख मंडळींनीं केला, त्यांत या भीष्माचार्याचें नांव होतें, हें तरी सर्वांस माहीत झालें आहे. त्यांना भट्ट मोक्षमुल्लर या संस्कृत नांवाचा जास्त अभिमान वाटतो. त्या निखिल जगतीतलास भूषणभूत अशा महा विद्यावीराची या अत्यंत वृद्धावस्थेंत त्याच्या घरीं गांठ घेऊन त्या प्रसंगाचें वर्णन मि. ह्यू. स्ट्रॅांग या सद्गृहस्थांनीं **टेंपल मॅगझीनच्या** जूनच्या अंकांत केलें आहे. त्यांतील कांहीं भाग मि. स्टेडनीं आपल्या पुस्तकांत दिला आहे. त्याची मराठी प्रतिकृति आमच्या जिज्ञासु वाचकांस देण्याचें योजिलें आहे.

जिकडे तिकडे पुस्तकेंच पुस्तकें ! प्रो. मॅक्समुल्लर आपल्या घरास ‘ जर्मन वर्कशॉप ’ म्हणतात व या कारखान्यांतून अनेक कुसरीचीं कामें बाहेर पडतात. भिंतीला कपाटें लावून त्यांत पृथ्वीवरील राष्ट्रांच्या भाषेचे नाना प्रकार नमूद केलेलीं पुस्तकें आहेत. या सर्वांचा उपयोग प्रोफेसरास अगदीं मनापासून आवडणारा विषय ‘ जगांतील धर्म ’ यासंबंधानें शक्य तितकें सर्व ज्ञान मिळविण्याच्या कामीं झाला व होत आहे.

मि. स्ट्रॅांगनीं अनेक प्रकारें विचारपूस केली त्यास उत्तरादाखल मॅक्समुल्लर साहेबांनीं सांगितलें,

“ आतां माझा कार्यभाग आटपला. ऋग्वेदाचे ६ भाग आणि ‘सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट ’ ( पूर्वदेशीय धार्मिक पुस्तकें ) हीं ५० पुस्तकें. इतकें काम मला ऑक्सफर्ड विद्यापीठाचें करावयाचें होतें तें झालें. ही माझी आयुष्याची

कामगिरी. याशिवाय अनंत लहानमोठीं पुस्तकें व निबंध आहेत. ‘भाषांचें शास्त्र’, ‘धर्मांचें शास्त्र’, ‘पुराणांचें शास्त्र’, ‘हिंदी तत्त्वशास्त्राचा इतिहास’ वगैरे. बाकी लहानसान कामें मीं केलीं तीं सर्व ‘चिप्स फ्रॉम अ जर्मन वर्कशाप’ मध्यें गणितों. आतां सर्व शिडें व अवजारें गुंडाळावींत असा काल आला आहे. माझी काम करण्याची रीति साधी आहे. दुसरें कांहीं करावयाचें नसलें म्हणजे मी कामास लागतों. गोष्टबीष्ट मला कांहीं सांगतां येत नाहीं. लेखणी, कागद व पुस्तकें हीं माझी वाट पाहत असतात. खेळाची किंवा करमणुकीची मला जरूर पडली नाहीं. मीं काम करून थकलों कीं विश्रांति घेतों.”

थोड्या दिवसांखालीं प्रो. मॅक्समुल्लर अति आजारी होते. तेव्हां मद्रासच्या एका ब्राह्मण मित्राचें पत्र आलें, त्याची हकीगत त्यांनीं सांगितली. त्यावरून मद्रासेंत देवापुढें प्रार्थना करविल्यामुळें आपणांस आराम पडला असा आपला भरंवसा आहे असें कळविलें. पुजारी प्रथम अहिंदु माणसाबद्दल प्रार्थना करीना; पण हे युरोपियन जातीनें, पण मतानें हिंदु आहेत असें सांगून व कांहीं अधिक दक्षिणा देऊन त्यांच्या आरोग्याबद्दल प्रार्थना करविली. तिकडे प्रार्थना जेव्हां झाली त्यापासून २४ तासांत हलकें पडलें; इतकेंच नव्हे, तर प्रकृति पूर्ण बरी झाली. जर्मन वैद्यांनीं मुळीं आशाच सोडली होती.

असे सत्पुरुष पृथ्वीवर किती आहेत?

• • •

# ४. केकावली

[ 'ग्रंथमाला', जुलै १९०८ ]

आपण यथेष्ट जेवणें । उरलें अन्न तें वांटणें ।
परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसे ज्ञानीं तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जगास सांगावें ।
तरतें बुडों न द्यावें । बुडतयासी ॥ २ ॥
उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
वर्तल्याविण बोलावें । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥

हें लघुकाव्य ज्यास माहीत नाहीं असा मराठी वाचक कोणी असेल असें आम्हांस वाटत नाहीं. कालिदासाचें जसें 'मेघदूत', जगन्नाथ पंडिताचें जसें 'गंगालहरी' तसेंच मोरोपंताचें 'केकावली' काव्य अत्युत्तम कवित्वशक्तीची साक्ष पटविणारें आहे. ह्या कवींचीं एवढींच काव्यें अवशिष्ट राहून त्यांचा बाकीचा ग्रंथविस्तार नाहींसा झाला असता तरी त्यांचें यशस्वी नांव अजरामर झालें असतें; आणि यांचीं अधिक काव्यें सांपडत नाहींत म्हणून रसिकांच्या मनास चुटपुट लागून राहिली असती. मंदाक्रान्ता, शिखरिणी व पृथ्वी या तीन वृत्तांस एक प्रकारची विशेष योग्यता या विशिष्ट काव्यरचनेमुळें आली आहे.

संस्कृतज्ञ मराठी वाचकांस केकावली हें काव्य कठीण वाटणार नाहीं असें आम्हांस वाटतें. क्वचित् स्थळीं थोडेंसें साहाय्य लागेल किंवा अंमळ विचार करून अर्थ लावावा लागेल; पण ज्यास संस्कृत येत नसेल, त्यास हें काव्य शुद्ध दगडाचें पेंव वाटल्यावांचून राहणार नाहीं. अशासाठीं ह्या काव्यावर भरपूर टीका असणें जरूर आहे. तशा प्रकारची एक टीका आज दोनतीन महिने आमच्या मेजावर आहे व तिचें विस्तीर्ण स्वरूप पाहूनच आम्हांस शेक्सपीअरच्या 'व्हेरीओरम एडिशन'ची आठवण झाली. एकेक नाटक घेऊन त्यावर हरएक दिशांनीं पूर्ण चर्चा ज्यांत आहे, असा एक एक पांचपांचशें पानांचा ग्रंथ लिहिला आहे. असा प्रकार इंग्रजी वाङ्मयांत आमच्या पाहण्यांत आला आहे. अशा तऱ्हेचे लहानमोठे अनेक ग्रंथ अनेक कवींच्या काव्यासंबंधानें इंग्रजींत आहेत. तसे टीकापर ग्रंथ लिहिण्यास लागणारी सामग्री तिकडे एकट्यासच जमवावी लागत नाहीं. प्रसिद्ध कवींच्या काव्यांचें अध्ययन करून त्यावर सांगोपांग चर्चा

करण्यासाठीं व निरनिराळ्या स्वरूपांत ऊहापोह करून लिहिलेले निबंध वाचण्यासाठीं कविमंडळें स्थापन झालीं आहेत. ‘ शेक्सपीअर सोसायटी ’, ‘ मिल्टन सोसायटी ’, ‘ वर्डस्वर्थ सोसायटी ’ अशा मंडळयांच्या कामकाजाचे वार्षिक ग्रंथ पाहिले म्हणजे इंग्रजी राष्ट्राचें वैभव केवळ सांपत्तिकच आहे व आम्ही तेवढ्याच दृष्टीनें त्यांच्या मागें आहों असें नाहीं अशी बालंबाल खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशा तऱ्हेच्या मंडळ्या इकडे नसतांना प्रस्तुत लेखविषयक ग्रंथ प्रो. श्रीधर विष्णु परांजपे, बी. ए., यांनीं तयार केला हें पाहून आम्हांस कौतुक वाटतें. त्यांना या विषयाची खरी आवड नसती तर त्यांनीं इंग्रजी काव्यें शिकतांना काव्याभ्यासाचीं जीं तत्त्वें चांगल्या विद्यार्थ्यांसच अधिगत होतात त्यांची मराठी कवितेच्या अध्ययनास लापनिका करून दाखविण्याचें मोठ्या कष्टाचें काम केलें नसतें. मराठी भाषेविषयीं किंबहुना देशी भाषांविषयीं साभिमान लेख व भाषणें होऊं लागलीं आहेत, त्यांचा विश्वविद्यापीठांत प्रवेश व्हावा म्हणून अल्पस्वल्प प्रयत्नहि होत आहेत, परंतु त्या भाषांतील ग्रंथभांडारांतील रत्नांची व्हावी तशी पारख अजून व्हावयाचीच आहे. प्रो. परांजपे यांच्याप्रमाणें इतर पदवीधरांनीं इंग्रजी शिकतांना लाभलेलीं अध्ययनतत्त्वें मराठीस लागू करून तिचें गौरव केल्याशिवाय आमची तिच्या ठायीं खरी निष्ठा आहे असें सिद्ध होणार नाहीं.

‘ केकावली ’ हें प्रस्तुत ग्रंथास नांव दिलें आहे खरें, पण केकावली व तिजवरील टीका यांशिवाय या ग्रंथांत जो भाग आहे तो फार महत्त्वाचा आहे, व तो पाहिला म्हणजे आम्ही लिहीत आहों त्याची सत्यता व्यक्त होणार आहे. प्रथमत: मोरोपंतांचें चरित्र दिलें आहे, त्यांत आज उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे. मोरोपंतांवर कै० विष्णुशास्त्री यांनीं निबंधावली लिहिल्यानें त्यांच्याविषयीं बरीच चर्चा झाली व निरनिराळीं मतें त्यांच्या गुणदोषांसंबंधानें पुढें आलीं, त्या सर्वांचा संग्रह व विचार प्रस्तुत चरित्रांत प्रो० परांजपे यांनीं केला आहे. या चरित्रास फार महत्त्वाचीं अनेक परिशिष्टें जोडलीं आहेत. त्यांवरून मोरोपंतांच्या सर्व कृतींचें मार्मिक अध्ययन करून सर्वांगांनीं मोरोपंतांच्या कवितेचा विचार करणारास मोठें साहाय्य होणार आहे. परिशिष्टें, कोणत्या दिशेनें उद्योग करावा इतकेंच दाखविण्याच्या हेतूनें तयार केलीं नाहींत, तर त्यांत नवीन भर घालणें कठीण पडेल असें वाटतें. शेवटच्या परिशिष्टांत म्हणजे उपमासंग्रहांत बरींच उदाहरणें सामील करतां येतील. नुसतीं परिशिष्टेंच लक्षपूर्वक वाचल्यानें थोडाथोडका बहुश्रुतपणा येईल असें वाटत नाहीं. किती तरी प्रकारांनीं काव्याचें अवलोकन करतां येईल, हें मराठी वाचकांस चांगलें समजून येईल अशी आमची

खात्री आहे. इंग्रजी वाङ्मयाचा मार्मिक अभ्यास करणाऱ्या लोकांनीं परीक्षेचीं कांहीं पुस्तकें इतकीं किसून वाचलीं असतील, पण मराठी कवीच्या कृतीवर इतके परिश्रम कोणीं पदवीधरानें केलेले आमच्या पाहण्यांत नाहींत, म्हणून प्रो. परांजपे यांस मार्गदर्शक या नात्यानें जेवढें गौरवावें तेवढें थोडें असा आमचा समज झाला आहे.

चरित्राच्या अखेरीस मोरोपंतांची इतर कवींशीं तुलना केली आहे, त्यांत जोड्या ठरविलेल्या आहेत, त्यांमध्यें आपाततः सादृश्य असणें जरूर आहे. कालिदास व मोरोपंत ही जोडी बरोबर नाहीं. संस्कृतांतील कवि मोरोपंताच्या तोडीला आणावयाचाच तर क्षेमेन्द्र आणावा. कालिदासानें काव्यांत कथाभाग अगदींच थोडा आणला आहे; प्रसंगविशेषांचें, कालविशेषांचें व स्थलविशेषांचें वर्णनच फार. शृंगाररसपरिपाकांत तर दोघांची तुलनाच होणें नाहीं. बाकीच्या चारी जोड्या सुरेख आहेत व विवेचनहि ठीक आहे.

खुद्द केकावलीच्या टीकेविषयींहि आमचा असाच अनुकूल ग्रह झाला आहे. अशा पूर्णतेनें एक दोन ग्रंथ जरी वाचले तरी सर्व वाङ्मय वाचल्याचें श्रेय येतें. पौराणिककथानुसंधान, शब्दसिद्धिकथन, अलंकारचर्चा, व्याकरण-विशेषप्रकटन, रसपरिपाकविचार, समासविवरण, काव्यमर्मप्रकाशन, अर्थसादृश्य-प्रदर्शन, रचनाकौशलाविष्करण, नीतिव्यवहारोपदेश, गुणदोषविवेचन इत्यादि गोष्टींकडे पूर्ण लक्ष पुरविल्यानें ग्रंथविस्तार फार झाला आहे. परंतु आपापल्या अधिकाराप्रमाणें व जरूरीप्रमाणें त्यांतला भाग वाचावा अशी बारीक मोठे ठसे वापरून सोय केली आहे. त्याच दिशेनें सुधारणा करण्यास थोडी जागा आहे. ती इतकीच कीं, मध्यम प्रकारच्या लोकांस लागणारा मजकूर निराळा जरा मोठ्या ठशांनीं छापून त्याच्या खालीं सलग बारीक ठशांनीं अधिक जिज्ञासूंकरितां देण्याचा भाग यावा. निव्वळ संस्कृत किंवा इंग्रजी उतारे टीपांत यावेत. म्हणजे त्या भाषा न येणाऱ्या लोकांची गैरसोय होत नाहीं.

टीका विस्तृत व भरपूर असल्यापासून एक मोठें नुकसान होतें, तें हें कीं वाचकगण आयदी होतो. स्वतः मेंदूस कांहीं श्रम करावे लागले नाहींत म्हणजे श्रम करण्याची मेंदूची ताकद व संवय नाहींशी होते. सर्व गोष्टी आयत्या तयार मिळाल्यामुळें तात्पुरतें काम भागतें खरें, परंतु जेथें साहाय्य नाहीं तेथें मति कुंठित होते. स्वतः डोकें घालून एखाद्या पद्याचा अर्थ लावून मर्म ध्यानांत आलें असतां जो आल्हाद मनास होतो, त्याची बरोबरी, पन्नास सुरस सुभाषितें हरि-

करण्यासाठीं व निरनिराळया स्वरूपांत ऊहापोह करून लिहिलेले निबंध वाचण्यासाठीं कविमंडळें स्थापन झालीं आहेत. ‘ शेक्सपीअर सोसायटी ’, ‘ मिल्टन सोसायटी ’, ‘ वर्डस्वर्थ सोसायटी ’ अशा मंडळयांच्या कामकाजाचे वार्षिक ग्रंथ पाहिले म्हणजे इंग्रजी राष्ट्राचें वैभव केवळ सांपत्तिकच आहे व आम्ही तेवढ्याच दृष्टीनें त्यांच्या मागें आहों असें नाहीं अशी बालंबाल खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशा तऱ्हेच्या मंडळया इकडे नसतांना प्रस्तुत लेखविषयक ग्रंथ प्रो. श्रीधर विष्णु परांजपे, बी. ए., यांनीं तयार केला हें पाहून आम्हांस कौतुक वाटतें. त्यांना या विषयाची खरी आवड नसती तर त्यांनीं इंग्रजी काव्यें शिकतांना काव्याभ्यासाचीं जीं तत्त्वें चांगल्या विद्यार्थ्यांसच अधिगत होतात त्यांची मराठी कवितेच्या अध्ययनास लापनिका करून दाखविण्याचें मोठ्या कष्टाचें काम केलें नसतें. मराठी भाषेविषयीं किंवहुना देशी भाषांविषयीं साभिमान लेख व भाषणें होऊं लागलीं आहेत, त्यांचा विश्वविद्यापीठांत प्रवेश व्हावा म्हणून अलपस्वल्प प्रयत्नहि होत आहेत, परंतु त्या भाषांतील ग्रंथभांडारांतील रत्नांची व्हावी तशी पारख अजून व्हावयाचीच आहे. प्रो. परांजपे यांच्याप्रमाणें इतर पदवीधरांनीं इंग्रजी शिकतांना लाभलेलीं अध्ययनतत्त्वें मराठीस लागू करून तिचें गौरव केल्याशिवाय आमची तिच्या ठायीं खरी निष्ठा आहे असें सिद्ध होणार नाहीं.

‘ केकावली ’ हें प्रस्तुत ग्रंथास नांव दिलें आहे खरें, पण केकावली व तिजवरील टीका यांशिवाय या ग्रंथांत जो भाग आहे तो फार महत्त्वाचा आहे, व तो पाहिला म्हणजे आम्ही लिहीत आहों त्याची सत्यता व्यक्त होणार आहे. प्रथमतः मोरोपंतांचें चरित्र दिलें आहे, त्यांत आज उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे. मोरोपंतांवर कै० विष्णुशास्त्री यांनीं निबंधावली लिहिल्यानें त्यांच्याविषयीं बरीच चर्चा झाली व निरनिराळीं मतें त्यांच्या गुणदोषांसंबंधानें पुढें आलीं, त्या सर्वांचा संग्रह व विचार प्रस्तुत चरित्रांत प्रो० परांजपे यांनीं केला आहे. या चरित्रास फार महत्त्वाचीं अनेक परिशिष्टें जोडलीं आहेत. त्यांवरून मोरोपंतांच्या सर्व कृतींचें मार्मिक अध्ययन करून सर्वांगांनीं मोरोपंतांच्या कवितेचा विचार करणारास मोठें साहाय्य होणार आहे. परिशिष्टें, कोणत्या दिशेनें उद्योग करावा इतकेंच दाखविण्याच्या हेतूनें तयार केलीं नाहींत, तर त्यांत नवीन भर घालणें कठीण पडेल असें वाटतें. शेवटच्या परिशिष्टांत म्हणजे उपमासंग्रहांत बरींच उदाहरणें सामील करतां येतील. नुसतीं परिशिष्टेंच लक्षपूर्वक वाचल्यानें थोडाथोडका बहुश्रुतपणा येईल असें वाटत नाहीं. किती तरी प्रकारांनीं काव्याचें अवलोकन करतां येईल, हें मराठी वाचकांस चांगलें समजून येईल अशी आमची

इतकेंच. अशा रीतीनें टीपा लिहिण्याची ज्यास सवड नसते, त्यांस विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा व आकलनशक्तीचा अदमास नसल्यानें टीपा वाजवीपेक्षां कमी किंवा अधिक होतात. प्रस्तुत पुस्तकांत त्या कमी आहेत असा आरोप येऊं शकणार नाहीं. किंवा प्रथम फार, पुढें कमी असा दिवसाच्या पूर्वभागांतील सावलीप्रमाणें प्रकार नाहीं, अगर प्रथम थोडच्या, पुढें पुष्कळ असाहि दोनप्रहरानंतरच्या सावलीप्रमाणें प्रकार नाहीं. कोणत्याहि भागापासून पुस्तक वाचण्यास सुरुवात केली तरी त्या भागापुरतें विवरण सांगोपांग केलेलें आढळतें, यायोगें ग्रंथ जरा वाढला आहे. अगदीं साध्या गोष्टीबद्दल टीपा आहेत, अगदीं सुलभ प्रचारांतील शब्दांचे अर्थ दिले आहेत व विशेष फोड न करतां सामान्य विद्यार्थ्यांस समजण्याजोग्या गोष्टींबद्दल पाल्हाळ झाला आहे. अशामुळें ज्या गोष्टी व्यंग राहणें चांगलें त्या वाच्य व अगदीं उघड करून टाकल्या आहेत. सारांश, एखाद्या हरिदासाच कीर्तन चाललें असतां तें निरूपण लघुलेखकाकरवीं उतरून छापलें आहे कीं काय असा कित्येक ठिकाणीं भास होतो. कित्येक अलंकाराच्या टीपांवर हाच आक्षेप येऊं शकतो. पण हा दोष ग्रंथास विशेष कमीपणा आणीत नाहीं व वर दर्शविलेल्या दिशेनें टीकाग्रंथाचा उपयोग करणारास त्यापासून बऱ्याच गोष्टी नवीन कळतात, यामुळें त्याचा ज्ञानसंचय तितका वाढणार आहे.

प्रस्तुत पुस्तक उत्तम वठलें आहे व वाचकांस अधिक विचार करावयास लावण्याजोग्या टीपा आहेत. कित्येक पौराणिक आख्यानांचें गूढार्थप्रकटन करण्याचा प्रयत्न फार मार्मिक आहे. बेकनकृत 'एन्शंट वुइस्डम्' म्हणून पुस्तकांत जुन्या पौराणिक कथांत रूपकद्वारां नैतिक व व्यावहारिक शिक्षण कसें संचित करून ठेवलें आहे, हें दाखविलें आहे. तसाच प्रयत्न पूर्वीं इतरांनीं काढलेल्या कल्पनांवरून व स्वतः कल्पना बसवून प्रो. परांजपे यांजकडून करण्यांत आला आहे. मूळ अर्थ लाक्षणिक असल्यानें तो लुप्त झाला. पुढें तो समजण्यास अवश्य अशी गुरुपरंपरा नष्ट झाली म्हणजे लोक शब्दशः अर्थ करून भलभलते समज करून घेऊन नाहीं नाहीं ते आचार सुरू करतात, अशी शोचनीय स्थिति आमच्या समाजाची कित्येक बाबतींत आहे. ती दूर करण्यास प्रो. परांजपे यांच्या हातून झालेले प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहेत. कृष्णचरित्रानें पाद्री लोकांस केवढें जबरदस्त शस्त्र मिळाल्यासारखें झालें आहे. खुद्द आमच्या लोकांस अलंकारिक भाषा न समजल्यामुळें तें चरित्र शब्दशः यथार्थ वाटून लोकांच्या नीतिकल्पनांवर व आचारावर किती दुष्परिणाम होत आहेत याची कल्पना करवत नाहीं. हा विचार

केला म्हणजे भारतीय कृष्ण व भागवतीय कृष्ण यांतील अंतर लक्षांत घेऊन लोक विचार कां करीत नाहींत याचें आश्चर्य वाटतें. पूर्वींच्या कृष्णांत व ह्यांत इतकें अंतर नैतिक दृष्ट्या पडले कसें? ही लोकांस कल्पना न व्हावी इतका परिणाम भक्तिमार्गोपदेशाच्या हेतूनें केलेल्या भागवतादि पुराणग्रंथांचा आपल्या समाजावर झाला आहे. " त्यांत देवभक्तांचें अलौकिक प्रेमच भरलें असून वैषयिक प्रकाराचा गंधहि नाहीं." ही गोष्ट ज्यायोगें लोकांत प्रकट होईल तें आम्हांस पाहिजे आहे. यांत आमची धर्मोन्नति आहे. अशाच अध्यात्मपर लावण्याच्या कथा असून त्यांचा अल्प समजुतीनें चुथडा झाला आहे. ह्यास उदाहरणें अहल्या-प्रकरण, भगवंताचें मोहनी स्वरूपधारण इत्यादि आहेत. या सर्वांचें यथासांग उद्घाटन प्रो. परांजपे यांनीं केलें आहे. एवढ्याच भागाचें लहानसें चोपडें करून पाद्री लोक धर्मग्रंथ फुकट वाटतात त्याप्रमाणें किंवा अल्पस्वल्प किंमत ठेवून, तें विकलें तरी समाजास फार उपयुक्त होईल असा आमचा दृढ समज आहे. निर्णयसागरसारख्या छापखान्यास हें सहज होऊं शकेल. केकावलींतच अशीं पंधरा-वीस प्रकरणें येऊन गेलीं आहेत. आणखी कांहींचा त्यांत समावेश करतां येणार आहे. पुराणरूपकांचा हा घोंटाळा अवश्य मोडला पाहिजे, तरच सुंदर वाङ्मय व खरे धर्मग्रंथ या नात्यानें पुराणग्रंथांची योग्यता वाढणार आहे व त्यांच्या ठिकाणीं सर्व पृथ्वीवर आदर उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. हें काम आजवर कोणीं केलें नाहीं व आमच्या समाजांतील पुराणग्रंथपाठक सर्व मूढ होते असें मात्र म्हणण्याचा आमचा आशय नाहीं. ठायीं ठायीं ह्या रूपकांचीं मर्में ग्रंथकार व कवि दाखवीत आले आहेत; परंतु शृंगारकथा सर्वांस प्रिय होतात व त्यावरच लोकांचा बहर असल्यानें तीं यथार्थ विवरणें जागच्या जागीं राहून रासक्रीडादि प्रकारांत विचकटपणा माजून राहिला आहे. आमच्या समाजांत चतुर व विवेकी साधूंनीं ही ज्योत ग्रंथांतरीं कायम ठेवली आहेच. तिचा प्रकाश चोहोंकडे झाला पाहिजे इतकेंच. अशा कामीं केलेल्या साहाय्याबद्दल प्रो. परांजपे यांचें आम्ही आनंदानें अभिनंदन करतों. " भगवान् श्रीकृष्ण पूर्ण निर्विषयी असून त्यांनीं सकाम गोपिकांसदेखील निष्काम केलें. राधाकृष्णाचें प्रेम म्हणजे भजकभज्याचें, आत्मपरमात्म्याचें अथवा जीवशिवाचें प्रेम. भक्ताच्या अंत:करणांत राधेच्या प्रेमाची ज्योत प्रकाशते तेव्हां चित्प्रकाश व भगवत्साक्षात्कार तेथें सहज होतो. या परम मंगल प्रेमास वैषयिक मानणारे लोक अत्यंत हतभागी समजले पाहिजेत." हा ज्ञानदुंदुभिनाद सर्व पृथ्वीवर पसरून आर्यधर्माची महती सर्व मानवजातीच्या प्रत्ययास येवो व एकनाथांनीं भगवद्वचनानें जाहीर केल्याप्रमाणें

मिशनऱ्यांची व पुराणास शिमगा म्हणणाऱ्या मूर्खशिरोमणींची सर्व जग पूजा बांधो.

म्यां गोपिकांसी काम केला । कीं निःशेष काम त्यांचा हरिला ।
न विचारतां या बोला । कृष्ण व्यभिचरला मूर्ख म्हणती ॥

एकंदरीनें प्रस्तुत पुस्तकांतील बराच भाग वाचून आमच्या मनास फार संतोष वाटला. पदवीधरांनींच हीं कामें हल्लीं केलीं पाहिजेत. पूर्वसंस्कारानें व सुधारलेल्या जगाच्या कल्पनांच्या सहवासानें ज्यांची मति संस्कृत झाली आहे, त्यांनीं स्वतःच्या भाषेचा अभ्यास करणें जरूर आहे. त्यांचें उदाहरण पाहून पुढें इतर म्हणजे अर्वाचीन विद्यासंस्काररहित अशांसदेखील हा उद्योग साध्य होईल. आपल्या विद्याव्यासंगापासून उत्पन्न होणारा संस्कार दुसऱ्यांच्या मनावर उठविणें ह आजकाल पदवीधरांचें काम आहे व तें करून सर्व देशबांधवांस अर्वाचीन-विद्यासंस्कृत बनविण्याचें त्यांच्या हातून वठलें तरच त्यांच्या शिक्षणाचें साफल्य आहे. इतकें लिहून प्रो. परांजपे यांच्या कृतीचें गौरव कितीहि केलें तरी पुरें व्हावयाचें नाहीं, तेव्हां तो मोह आवरून हें गुणग्रहण येथेंच पुरें करतों.

रसिक कवि परमसज्जन भगवद्भक्त प्रसन्न होतील ।
न गमेल यापरिस हित तो, जो वदनांत अमृत ओतील ॥

— मोरोपंत

• • •

## ५. काळाची वक्र दृष्टि

[ 'ग्रंथमाला', जुलै १९०२ ]

सर्वं जिह्मं मृत्युपदमार्जवं ब्रह्मणः पदम् ।
एतावान् ज्ञानविषयः किं प्रलापः करिष्यति ॥
— महाभारत, शांतिपर्व

अर्थ — वांकडेपणा तितका अधःपाताचें लक्षण व सरळपणा तितका उत्कर्षाचें लक्षण. जाणावयाची गोष्ट मिळून इतकीच; उगीच वायफळ पुष्कळ बोलून काय करावयाचें ?

गेल्या अंकांत केंब्रिज विश्वविद्यापीठाकडून आमच्या महाराज सरकारांस व शिंदे सरकारांस एलूएल्. डी. पदवी मिळून जो त्यांचा बहुमान झाला, त्याविषयीं बराच विचार करून दोन शब्द लिहिले, त्यांत

१. संपत्तीचें महत्त्व किती आहे ?

२. संपत्तीचा व संपत्तिमानांचा विद्वानांनीं बहुमान कां करावा ?

३. तसा मान करण्याचे प्रकार कोणत्या विश्वविद्यापीठांत कसे किती दिवस चालले आहेत ?

४. आमच्या महाराजांस व शिंदे सरकारांसच हा मान देण्याची केंब्रिज विश्वविद्यापीठास कां प्रवृत्ति झाली असावी ?

५. ही पदवी मिळाल्यानें ती धारण करणारावर कोणती जबाबदारी पडते ?

६. ती जबाबदारी न ओळखतां वागणाऱ्या लोकांशीं विद्वान् लोकांचें वर्तन कसें असावें ?

अशा सहा मुद्द्यांवर सामान्यरीत्या विवेचन केलें असतां तें शिरोलेखांत नमूद केलेल्या वर्तमानपत्राच्या कर्त्यांस आवडलें नाहीं व त्याविषयीं गैरसमज उत्पन्न होण्याजोगें एक लांबच लांब 'आर्टिकल' त्यांनीं आपल्या २५ माहे जुलईच्या अंकांत लिहून टाकलें आहे. 'वाहवा, शाबास, खाशी' असें म्हणून डुलणारा वाचकवर्ग सांप्रत कालीं उत्पन्न झाला आहे. यासाठीं त्यांच्या लिहिण्यांतील ग्राह्याग्राह्यांशाचा विचार करण्याचें आज आम्हीं योजिलें आहे.

आमची नेहमींची पद्धति अशी आहे कीं, असला वाद ग्रंथमालेंत माजवावयाचा नाहीं. ज्या पत्रांत आमच्याविषयीं कांहीं गैरसमज उत्पन्न करण्याजोगा

मजकूर लिहिला असतो, त्याच पत्रांत उत्तर सही घालून पाठवावयाचें. असें करण्याचें कारण गेल्या ८।९ वर्षांत एकदोनदां आलें. इतःपर तसें करण्याचें कारण पडणार नाहीं. जी गोष्ट ग्रंथमाला निघून चारदोन वर्षेंदेखील झालीं नाहींत अशा वेळीं स्वसंरक्षणार्थ स्वतः करावी लागत होती, ती आतां करण्याचें तितकें कारण राहिलें नाहीं. मत्सरमूलक लेखांनीं आतां ग्रंथमालेस धक्का लागण्याची काडीइतकी भीति नाहीं. साधारण सारासार विचार करण्याची ज्याला शक्ति आहे, त्याला आतां कळून येणार आहे कीं, १०,००० वर पृष्ठें ज्या मासिक-पुस्तकांत प्रसिद्ध होऊन गेलीं व ज्यांत आजपर्यंत सुमारें १०० लेखकांनीं तरी लेख लिहिले आहेत, त्या मासिकपुस्तकाच्या भाषेविषयीं अगर विषयविवेचना-विषयीं सर्वंकष म्हणजे व्यापक शेरा मारणें शक्य नाहीं. कोणतेंहि विधान केलें तर तें खरें असलें तर तें सर्व मासिकपुस्तकास लागू होणार नाहीं. एका लहान किंवा मोठ्या भागासच लागू पडेल. यासाठीं सामान्य व जबाबदारी अंगावर घेऊन अमका अमका लेख अमक्या कारणामुळें आक्षेपणीय आहे असें सभ्य रीतीनें विचारपूर्वक कोणीं दाखविल्याशिवाय तिकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. आतां सामान्यजनांत इतका शांत विचार नसल्यानें, किंवा जात्या तितका असला तरी आक्षेपकाचा विपर्यास करून दाखविण्यास समर्थ अशा लेखन-कौशलाच्या जोराखालीं तो शांत विचार नष्टप्राय झाल्यानें, कित्येक वेळां गैरसमज होईल, परंतु अखेर सत्याचा पगडा बसल्याशिवाय राहणार नाहीं. यासाठीं कोणी कांहीं मत्सरबुद्धीनें अगर कोणाचा कैवार घेऊन किंवा केवळ अज्ञानानें कांहीं अपशब्द योजिले तरी त्यास उत्तर देऊं नये इतका धिमेपणा आमच्यामध्यें आला आहे. त्या गालिप्रदानांतहि कांहीं खरा उपदेश असेल तर तेवढा घेण्यासहि आम्हीं तयार आहों. गालिप्रदानास प्रतिगालिप्रदान, हें आमचें शील नव्हे. उलट उपकाराबद्दल आभार मानूं.

आज ९९ महिने आमचें व आमच्या टीकाकारांचें (ज्या आश्रयाची त्यांनीं टवाळी केली आहे, तो बंद होईपर्यंत म्हणजे १९०१ जूनपर्यंत ग्रंथमाला त्यांचेकडे जात होतीच.) लक्ष ज्या गोष्टीकडे गेलें नाहीं, तिकडे तें आज त्यांनींच वळविल्याबद्दल अकृत्रिम भावानें आम्हीं त्यांचे उपकार शिरीं धारण करतों. त्याची प्रतीति आजच्या मुखपृष्ठावरील 'आश्रयच्छत्र' पाहून होईल. येथें मोरोपंतांचें वचन देऊन त्याप्रमाणें वागण्याची सर्वांस प्रेरणा होवो अशी आशाहि प्रकट करतों.

**चुकल्या जनासि कोणी सांगुनि निजहितपथासि जो लावी।**
**धनदेंहि उपकृतीशीं त्याच्या निजसंपदा न तोलावी ।।**

यापुढील आमच्या टीकाकारांनीं लिहिलेला सगळा लेख असंबद्ध व निरर्गल प्रलापानें भरला आहे. तो कसा हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

१. आमच्या आक्षेपकांचें पहिलें तत्त्व. इंग्रज सरकारनें इकडून राजे-रजवाडे व इतर लोक यांना तिकडे बोलावून * नेलें, तें त्यांचा मान करण्या-साठीं नव्हे. "अपमान हा नेटिव्ह राजांना तिकडे नेण्यामध्यें मुख्य उद्देश होय."

२. त्यांचें दुसरें तत्त्व. एकदां शत्रू जिंकला व त्याचा प्रांत व त्याचें राज्य हस्तगत केलें, म्हणजे त्याच्याबद्दल आदर किंवा त्याच्या पराक्रमाबद्दल गौरव हा जिंकणाऱ्या लोकांमध्यें असणें शक्य नाहीं.

३. त्यांचें तिसरें तत्त्व. एका परिस्थितींतील इंग्रजांचीं जीं मतें व तीं प्रदर्शित करण्याच्या ज्या पद्धती, त्याच सर्व इंग्रजांच्या असतात. कांहीं इंग्रजांचे लेख व बोल पाहून, काय वाटेल तें इंग्लिश राष्ट्रास सरसकट लागू करावयाचें.

ह्या तीन तत्त्वांची सत्यासत्यता पाहून मग आमच्या खुद्द लेखांतील एक उतारा घेऊन, त्यावर रचलेल्या खोडसाळ पुराणाचा विचार करूं. त्यांतील कार्यकारणभावांचा विपर्यास करून वाचकांस हसविण्याचा प्रयत्न कसा केला आहे हें दाखवून देऊं.

आपल्या देशास प्राप्त झालेली शोचनीय पारतंत्र्यस्थिति सदासर्वदा आपणांस जाच करो. तिच्यायोगानें आपणांस कदाचित् अन्नहि गोड न लागो, परंतु ती स्थिति ज्यांच्या जयामुळें व उत्कर्षामुळें आम्हांस प्राप्त झाली आहे, त्यांच्या-मध्यें सामान्यरीत्या मानवजातींत सांपडणारे चांगले गुणहि नाहींत, अशी कल्पना करण्याइतकी आपल्या बुद्धीची समता राखतां येऊं नये हें मोठें व्यंग आहे. आमच्या आक्षेपकांच्या मनांत इंग्रजांच्या कांहीं चांगल्या गुणां-विषयीं आदर असेल, परंतु त्यांच्या लेखांवरून निदान प्रस्तुत लेखावरून तरी वाचकांच्या मनांवर

**न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ।**

---

* हा शब्द आमचा आहे. आमच्या आक्षेपकांच्या म्हणण्याप्रमाणें 'आगबोटींत घालून' असें आहे.

त्यांच्या ठायीं शुद्धभाव, शुद्धाचार व खरेपणा या गोष्टींचा पूर्ण अभाव आहे असा ग्रह झाल्याशिवाय राहणार नाहीं.

आम्हांस त्यांनीं जिंकिलें आहे, परंतु तेवढ्यानें आमचा कोणताहि मान करण्याचें त्यांच्या मनांत नाहीं, आमचा अपमान करावा हा त्यांचा मुख्य हेतु आहे हें विधान कसें संभवतें? प्रथमतः आमचें स्वातंत्र्य पूर्ण किंवा अंशतः (खालसा प्रजेचें पूर्ण व संस्थानिक प्रजेचें अंशतः) नाहींसें झालें एवढ्यानें आमचा अपमान झाला आहे पण ती स्थिति पत्करल्यावर आज राज्याभिषेक-समयास हजर राहणाऱ्या राजांचा अपमान कोणता झाला आहे हेंच आम्हांस कळत नाहीं. इंग्रजी साम्राज्य विस्तीर्ण आहे व संपन्न आहे. त्याचा विस्तार व संपत्ति यांचें ज्या रीतीनें प्रदर्शन होईल व ज्या रीतीनें पृथ्वींतील लोकांच्या तें मनांत भरेल, अशा सामान्य संसारी पद्धतीस अनुसरून थाटानें राज्याभिषेक समारंभ व्हावा हें प्रत्येक ब्रिटनास व ग्रेट ब्रिटनचें प्रजात्व सुखानें वा दुःखानें ज्यांनीं पत्करिलें आहे त्यांस वाटणें साहजिक आहे. मूळ ब्रिटन प्रजेस हौस अधिक व दुःखानें झालेल्या प्रजेस हौस कमी, त्यांत पुनः जिंकल्यानंतर ज्यांना जसें वागविलें असेल त्याप्रमाणें पायऱ्या लागतील, परंतु ह्या मनःस्थितीचा इंग्रज लोकांच्या आजच्या राज्याभिषेकाच्या वेळच्या वर्तनाशीं संबंध पोहोंचवून कांहीं तरी लिहीत सुटणें हें नीट नव्हे. इंग्रज लोकांनीं चमत्कारिक देखावा म्हणून आमच्या राजेरजवाड्यांचे पोषाख व जवाहीर यांचें वर्णन केलें. लहान मोठे राजे अशा अर्थीं कांहीं वर्तमानपत्रांनीं निरनिराळ्या प्रकारांनीं आपले विचार प्रकट करण्यांत कोणीं पोरकटपणासुद्धां केला; असेंहि क्षणभर कबूल केलें तरी इंग्रज सरकारांचा हेतु आपलें वैभव जगजाहीर व्हावें व आपल्या राष्ट्राच्या पराक्रमाचें दृश्य स्वरूप जगापुढें व ब्रिटनच्या प्रजेपुढें मांडावें याहून दुसरा कांहीं हेतु आम्हांस दिसत नाहीं. आम्हीं मिरवणुकीच्या वेळेस आपलें वैभव दाखवितों. घरचे नसले तरी सरकारांतून शृंगारलेले घोडे आणवितों, भालेवाले व बंदुकबारदार आणून समारंभ साजरा करतों. ह्यांत आपलें गौरव करण्यापलीकडे कांहीं हेतु नसतो. आतां मिरवणुकींत आणलेल्या शिपायांत कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें कष्टदशा प्राप्त झालेला एखादा पिढीजाद मराठा किंवा मुसलमान असला तर त्यानें आपल्या दुःस्थितीबद्दल मनांत वाटेल तितकें झुरावें, ती दुःस्थिति येण्यास आपलेच कांहीं दोष कारणीभूत झाले असतील तर स्वतःचा धिक्कार करावा, पण ज्या यजमानाच्या मिरवणुकींत आपणांस यावें लागलें, त्या यजमानानें आपला अपमान करण्याच्या हेतूनें

आपणांस गळ्यांत पट्टा अडकवून पट्टेवाला बनविलें आहे असें म्हणून त्याच्या नांवानें बोटें मोडावीं काय ? भाऊबंदी खटल्यांत आपलें घरदार व जमीनजुमला विकून टाकून आलेला पैसा वकिलाची भर करण्यांत व सरकार देणें देण्यांत ज्यानें खर्चिला अशा श्रीमंत मनुष्याच्या नातवापणतवांवर तोच जमीनजुमला ज्याच्या ताब्यांत गेला त्याच्या घरीं गुमास्त्याचें किंवा कारकुनीचें काम करण्याचा प्रसंग आला, तर या निकृष्टदशापन्न गृहस्थानें आपल्या यजमानास शापशिव्या द्याव्यात काय ? व त्या यजमानाच्या घरीं लग्नकार्य उभें राहिलें असतां त्याला भोजनास बोलाविलें, तर त्यांत यजमानानें अवमान केला असें त्यानें किंवा इतरांनीं मानावें काय ? त्याच वेळीं या गृहस्थाच्या आज्यापणज्याची माहिती असलेले कोणी याच्याजवळ येऊन जुन्या गोष्टींच्या आठवणीनें त्यास जरा सन्मानानें वागविलें, तर यांत कोणीं कोणाचा बुद्धिपुरःसर अपमान केला असें म्हणतां येईल काय ? आमचे आक्षेपक म्हणतात त्याप्रमाणें आपली कुलपरंपरा लपविणें हेंच अशा वेळीं उचित, परंतु आपण लपवून ती लपली नाहीं तर, आणि ती स्मरून दुसऱ्यांनीं आपणांस गौरवानें वागविलें तर ते आमचा पाणउतारा करतात असें म्हणावें काय ? कांहीं लोक अशा विपन्नकालीं नाक खाजवून कुरापत काढणारे असे असतात व हीनबलाच्या नाकांत काड्या घालण्यास कमी करीत नाहींत. परंतु अशीं माणसें कोणतीं याचा विचार न करतां आपण जर सरसकट दोष लावूं लागलों, तर त्यांत शहाणपणा दिसेल काय ? इंग्रजांपैकीं कांहीं जणांनीं शिवाजी लुटारू होता, बंडखोर होता असें म्हटलें कीं यावत् सर्व इंग्रज लोक शिवाजीविषयीं तीच बुद्धि बाळगतात असें मानणें आपल्या अनुदार बुद्धीचें व्यंजक आहे. इंग्लंडमधील चांगल्या माणसांचीं चरित्रें ज्यांनीं वाचलीं नाहींत, इंग्रजी वाङ्मयांतील उदार विचार ज्यांच्या स्वप्नांतहि आले नाहींत, अशा एखाद्या माथेफिरूनें असलीं तर्कशास्त्रबाह्य विधानें ठोकून दिलीं तर शोभेल, पण आमच्या आक्षेपकांच्या विद्वत्तेच्या माणसांनीं असें लिहिणें किंवा बोलणें म्हणजे लोकमनोरंजनाच्या इच्छेनें एका मोठ्या राष्ट्राची अब्रूनुकसानी करणें आहे. राष्ट्रांत याहूनहि अधमपणानें आमच्या राष्ट्राची अब्रूनुकसानी ज्यांनीं केली आहे, असे लेखक व वक्ते आम्हांस माहीत नाहींत असें नाहीं. त्यांच्याविषयीं लिहितांना किंवा बोलतांना योग्य ती भाषा आमच्या सामर्थ्याप्रमाणें योजण्यास कमी करूं किंवा करतों असेंहि नाहीं, परंतु टका शेर भाजा आणि टका शेर खाजा या तत्त्वावर सर्व इंग्रज राष्ट्राची निंदा किंवा विटंबना करणारा कोणी भेटला तर आम्ही क्षमा करणार नाहीं. बर्क, ब्राइट, फॉसेट, ब्रॅडला, ह्यूम, डिग्बी,

वेडर्बर्न, रिपन, रे, यांचें कर्ज आम्ही कसें फेडणार? आम्हांपासून कोणत्याहि प्रकारची किफायत नसतां व उलट स्वजातीयांचा द्वेष संपादन करण्याची खात्री असतां ज्या लोकांनीं केवळ सत्य स्मरून आमची कड घेतली, त्या राष्ट्राची सरसकट निंदा केलेली ऐकून किंवा वाचून आम्ही स्वस्थ बसलों तर आम्हांस परमेश्वराच्या घरीं कोणी विचारील काय? यांची स्तुति करून किंवा यांच्या-सारख्या लोकांचें गौरव करून आम्हांस राजकीय हक्क मिळतात ही गोष्ट थोडीच आहे; हें आम्ही जाणून आहों. त्यासंबंधानें सर्व आमचें आमच्यावरच अवलंबून आहे. गेल्या १०० वर्षांपूर्वींच्या शतकांत आम्हीं जे दिवे लावले त्यांचीं पन्नें आम्ही आज भोगीत आहों. आज दुसरे लोक किती वाईट आहेत याचा विचार सोडून देऊन आपण किती वाईट आहों व आपल्यांतला किती चांगुलपणा लोकांनीं नेला याचा विचार लोकांनीं केला पाहिजे हें आम्हीं जाणून आहों व आपलपोटेपणाचा त्याग करून सडकून उद्योग केला पाहिजे हें त्याहिपेक्षां अधिक पूर्णपणें जाणून आहों. परंतु तें सर्व सोडून देऊन आमच्यांतील जाणतीं जाणतीं माणसें भलभलतें बोलूं व लिहूं लागलीं तर परिणाम कसा लागेल याची मोठी जबर काळजी वाटते.

आपण जित आहों हें खरें, म्हणून दुसऱ्याच्या दारीं आम्हांस जावें लागतें हेंहि खरें पण तेवढ्यामुळें आमच्याकरितां कांहीं मानसन्मानाच्या गोष्टी केल्या तर त्याबद्दल आपल्या पोटांतील रंजीसपणा क्षणभर बाजूस ठेवून या वेळेस कांहीं विशेष दुःखीकष्टीपणा न दाखविणें, तिरसटपणा तर मुळींच न प्रकट करणें हें थोरपणाचें लक्षण आहे. आयरिश लोकांप्रमाणें अंधारांत रात्र काढणें किंवा अद्वातद्वा अभद्र बोलत सुटणें, यांस श्वानाचें लक्षण म्हणतात. सिंहाची वृत्ति यांत बिलकुल नाहीं. खरें कार्यबल आयर्लंडांत आयरिश लोकांस दाखवितां येत नाहींच. अशी स्थिति आमची न व्हावी. १८३७ मध्यें असलेल्या लोकसंख्येचा निम्मा भाग १८९७ त राहिला व हल्लीं आयर्लंडमध्यें १५ वर्षांच्या खालील मुलें व ७५ वर्षांच्या वरील वृद्ध पुरुष यांचाच भरणा राहिला आहे. यांतलें इंगित इतकेंच कीं, ज्याला खरा पराक्रम करावयाचा व कर्तबगारी दाखवावयाची त्यानें बाहेर जावें असा प्रकार झाला आहे. म्हणजे आयरिश लोकांच्या राजकीय चळवळीची दिशा चुकली आहे असें सिद्ध होतें. तिचा अवलंब करून आम्हांस कोणतीहि फलप्राप्ति व्हावयाची नाहीं. राज्यकर्त्यांस शिव्या देऊन वागण्यानें स्कॉटलंडला हल्लींचें महत्त्व आलें नाहीं. प्रसंगीं पराक्रम, इतर वेळेस धिमेपण व खऱ्या स्वहिताचे व्यवसाय यांमुळें स्कॉटलंडची स्थिति आयर्लंडहून निराळी आहे.

सारांश, आपले जेते झाले म्हणून काय झालें? त्यांच्यांत असलेले गुण घेतले पाहिजेत व त्यांनींहि आमचे घेतले पाहिजेत. १०० वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत ज्यांनीं चक्रवर्ती सत्ता उपभोगली, त्या मराठ्यांस शूर व पाणीदार हीं विशेषणें व त्यांच्या राज्याच्या संस्थापकाविषयीं आदर, या गोष्टी सरळ मनाच्या इंग्रजांत सांपडणें आमच्या आक्षेपकांस अशक्य वाटलें ना? मुसलमानी इतिहासावरून ज्यांनीं आपली माहिती मिळविली त्यांनीं शिवाजीस चोर, लुटारू म्हटलें, परंतु हल्लीं कै. न्या. रानडे यांचा इतिहास वाचून* आपल्या मतांत अणुरेणु अंतर पडूं देणार नाहींत, इतके इंग्रजी विश्वविद्यापीठांतील लोक मठ्ठ किंवा क्षुद्रबुद्धी खचित नाहींत. अशा लोकांच्या मनांत शिवाजीविषयीं आदर व त्याच्या वंशजाचा बहुमान करण्याची इच्छा उत्पन्न न व्हावी हें आमच्या कल्पनेच्या बाहेर आहे. विद्याव्यासंगी व विद्योत्कर्षेच्छु विश्वविद्यापीठीय लोक संपत्तिमानांचा बहुमान कसा करतात व कां करतात, याविषयीं आम्हांस जें काय लिहावयाचें होतें तें गेल्या अंकींच आम्ही लिहून चुकलों आहों. हिंदुस्थानांतील राज्याधिकारलोलुप इंग्रज अधिकारी वेगळे व केंब्रिज व ऑक्सफर्ड वगैरे विश्वविद्यापीठांतील लोक वेगळे. आमच्या महाराजांचा त्यांनीं जसा मान केला तसाच वसाहतींच्या बारा अध्यक्षांपैकीं पांचांचा केला. पण आमच्यापैकीं कांहींच्या डोळ्याला कावीळ झाली आहे व त्यांच्या लेखणींत प्रक्षोभक लेख लिहिण्याचें सामर्थ्य आहे, तेव्हां त्यांना जें रूप दिसलें तेंच हुबेहूब रेखाटतां आलें, किंबहुना लिहिण्याच्या आवेशांत मनांत आहे त्यापेक्षां अधिकपट वठलें म्हणून बिचारा समाज अहो ही माळ नव्हे, हा आमच्या गळ्यांत साप अडकविला आहे म्हणून झिंझाडून टाकूं लागला अशी आमची स्थिति होते.

---

* My aim is rather to present a clear view of the history from the Indian stand-point, to remove many apprehensions which detract much from the moral interest and the political lessons from the story, and, above all, to enlist the sympathy of the representatives of the conquering British power in the fortunes of its worsted rival. Now that all jealousies are laid at rest, the tribute of justice may well be paid to the departed great whose names are cherished by millions in India as the sweet memories of an irrevocable past.

— Ranade

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ०५५८५ वि: विविध
क्रमांक २०२२ ता. २०१३।०९



स्रजमपि शिरस्यन्धः क्षिप्तां धुनोत्यहिशंकया।

या महाकवि कालिदासोक्तीस अनुसरून आमचे आक्षेपक म्हणतात, तुमच्या अंगावर शिंप टाकली आहे तीं रुपें म्हणून कां उचलता? असा आमच्या त्यांच्यांत तफावतीचा प्रकार आहे.

आक्षेपकांच्या संकुचित विचारांचा आणखी एक मासला अवश्य पाहण्याजोगा आहे. ते मोठ्या दिमाखानें उपदेश करतात कीं, कृत्य मोठें, वंश मोठा नव्हे. आपला मोठेपणा हा आपल्या प्रस्तुतच्या महत्कृत्यांवर आहे, हें हल्लींच्या राजांस व त्यांच्या कागदी आश्रयाखालीं असणारांस कळलें पाहिजे. इतिहासाचा व्यापकदृष्ट्या विचार करणारांनीं एका घराण्यावर असें घसरण्यापेक्षां सर्व राष्ट्रांवर घसरावें हें चांगलें. युरोपांतील तक्ताधिपति जितक्या बौद्धिक व नैतिक योग्यतेचे असतात, त्यापेक्षां आमच्यां इकडचे राजेरजवाडे फार कमी नाहींत, असें बारकाईनें पाहणारास कळून येईल. त्यांची योग्यता त्यांच्या प्रस्तुतच्या महत्कृत्यांवर नाहीं, तर त्यांच्या हाताखालील राष्ट्रांच्या महत्कृत्यांवर आहे. आमच्या राजे लोकांस आम्ही सद्गुणांचे पुतळे समजतों, असें मानण्याचें कारण नाहीं. त्यांच्या सर्व कृत्यांची आम्ही तारीफ करीत नाहीं, किंबहुना युरोपांतील राजांप्रमाणेंच त्यांनाहि नियंत्रितसत्ताकच करून ठेवणें हें चांगलें. त्यांच्या हातांत स्वैर सत्ता असूं देण्यापासून प्रजेचें अकल्याण आहे, हें कोण नाकबूल करील? पण तें झालें नाहीं म्हणून आणि परकीय साम्राज्यामुळें व आपल्या लोकांनीं त्यांच्याच तेवढ्या गुणावगुणांची परीक्षा करण्यासाठीं लावलेल्या कसामुळें, त्यांचें तेज पडत नाहीं, म्हणून शिवाजीच्या वंशजास 'शिळे छत्रपति' म्हणण्यास शरम वाटूं नये काय? आग लागो त्या स्वदेशभक्तीला, जळो तुमचें विद्वत्त्व व चातुर्य. असला देशाभिमान कोणाच्या डोक्यांत असला, तर तो काढून टाकण्यास प्रत्येकानें झटलें पाहिजे. मि. दादाभाईस परक्यानें 'काळा' माणूस म्हटल्याबद्दल आमची तळपायाची आग मस्तकास पोहोंचते, आणि आमच्याच माणसानें शिवाजीच्या गादीचा असा उपमर्द केलेला आम्हांस खपतोना! आम्ही आमच्या प्रस्तुतच्या महाराजांच्या गुणाविषयीं लिहीत नाहीं. त्यांनीं आमचा आश्रय काढून घेतला, आमच्या सर्व जातीविषयीं त्यांचा आदर दृष्टीस पडला नाहीं, तर त्या अंत:कलहाच्या गोष्टी आहेत. त्या आहेत म्हणून संस्थानिकांविषयीं व राजेरजवाड्यांविषयीं उद्गार काढलेले आम्हां संस्थानीयांस खपणार नाहींत. आमच्या राजांचीं महत्कृत्यें नसतील, पण आम्हांस राजे तरी आहेत. आमच्या संस्थानांत

उत्पन्न होणारा पैसा साता समुद्रांपलीकडे जात नाहीं, त्याचा दुरुपयोग झाला तरीं फिरून प्राय: तो परत प्रजेंतच पसरतो. एकावर कृपा दुसऱ्यावर अवकृपा झाली तरी एकंदरीनें हिंदुप्रजाच पुढें येते. अशामुळें मुळींच सर्व नकाशा तांबडा लाल झाल्यापेक्षां छत्रपती असतील तितके पाहिजे आहेत. आमचेच लोक संस्थानाविषयीं अनादर प्रकट करूं लागले व महत्कृत्यें दाखवा नाहींतर आपली कुळी लपवा, असें म्हणूं लागले म्हणजे इंग्रजादि परकीयांस फावलेंच म्हणून समजा.

असो; कोळसा उगाळावा तितका काळाच. किती लिहिलें तरी तेंच. इंग्रज राष्ट्रानें पाहुणे म्हणून हिंदुस्थानांतून बोलावून नेलेल्या लोकांचा सत्कार हिंदुस्थानच्या पैशानें केला असल्यास प्रखर टीका करा. वसाहतींच्या अध्यक्षांची सभा केली व त्यांचे मूळदेशाशीं संबंध ठरविण्यासाठीं व राज्याच्या एकंदर धोरणाचा विचार करण्यासाठीं सभा भरविली, तशी आमच्या राजेलोकांची भरविली नाहीं याबद्दल काय लिहावयाचें तें लिहा. आणखी कांहीं आपली परिस्थिति पाहून तिला उचित असे विषय हातीं घ्या. बाकी खरी सुधारणा म्हणाल तर आपले आपण शहाणे व्हा व लोकांस तसें करा. आपणच आपले शत्रु व आपणच आपले मित्र हेंच खरें.

आपला अपमान आपण करून घेतों, दुसरा कोणी करीत नाहीं. मानापमानाच्या कल्पना स्थित्यनुरूप असतात. काळावर नजर देऊन हें ओळखावें. आपण कित्येकांस भेटावयास जातों, तेव्हां एक यजमान आपण आल्याचें ऐकून लगबगीनें दारापर्यंत येऊन आपणांस आंत नेतो. दुसरा घरीं खुर्चीवर किंवा तक्क्याला टेकून बसलेला असतो, तेथें आम्ही गेल्यावर उत्थापन देतो व 'असे इकडे या' म्हणून खुर्ची देतो किंवा गादीवर बसवून घेतो. तिसरा आपण जागेवरून न उठतां 'बसा' इतकेंच म्हणतो. चौथा तेवढेंहि म्हणत नाहीं. याहून आणखी पुढचे प्रकार पुष्कळ आहेत. या सर्व ठिकाणीं आपआपल्या योग्यतेप्रमाणें आपला मान होतो हेंच खरें. आमच्या मतें मानापमानाच्या गोष्टी आपल्या योग्यतेवर आहेत. अपमान पत्करून आपल्या कार्यावर नजर देऊन वागणारानें तो विचार मनांत आणूं नये. अपमान होईल असें ठाऊक असून, आपण होऊन निरर्थक कोण कोठें जाईल ? यासाठीं दुसऱ्यास दोष देण्याचा आपणांस अधिकार नाहीं; आणि परक्यास दोष देण्याचा तर सुतराम् नाहीं.

शिवाजीला लुटारू म्हटलें, दरवडेखोर लोकांचा पुढारी म्हटलें याबद्दल आम्हांला वाईट वाटतें व रागहि येतो, पण त्याला परिमिति आहे. आम्ही जित

म्हणूनच इंग्रज इतिहासकारांची ही पुष्पवृष्टि आम्हांवर झाली आहे असें कोणी समजत असेल तर ती मोठी चूक आहे. शिवाजीच्या तोडीचा फ्रेंच वीर ज्यानें सर्व सुधारलेल्या जगाला थरथरा कांपायाला लावलें, त्या नेपोलियनाविषयीं इंग्रज इतिहासकारांचे उद्गार पाहिले म्हणजे भरपूर माहिती (कागदोपत्राची, नुसती ऐकीवाची किंवा बखरीची नव्हे) असतांना विपरीत किंवा एककल्ली ग्रह कसे होतात हें लक्षांत येईल. इतिहासरचनेंत मुख्य एक देशाभिमानाचें तत्त्व (पॅट्रिऑटिक एलेमेंट) म्हणतात तेवढें नसलें म्हणजे मोठा कमीपणा येतो. न्यायमूर्ति रानड्यांच्या पुस्तकांत ही जी ज्योति लखाखत आहे ती ग्रँट डफ-सारख्या त्यांतल्या त्यांत चांगल्या इतिहासांत कशी दिसेल ? तेव्हां नेपोलियनास सार्वजनिक स्वातंत्र्याच्या दुष्मन, धर्माध्यक्षाचा छळवादी, स्वैरवृत्त, रक्तपाताचा भुकेला राक्षस, सहस्रावधि मानव बळी घेणारी काळभैरवाची मूर्ति, हीं विशेषणें इंग्रजांनीं लावलेलीं पाहावींत आणि मग शिवाजीस लावलेलीं विशेषणें तुच्छ बुद्धीनें किंवा मराठ्यांचा अपमान करावा ह्या हेतूनें उपयोजिलीं आहेत कीं काय याचा सुज्ञांनीं विचार करावा. परक्याचा इतिहास सरळ मनानें लिहिणें फार कठीण काम आहे, आणि आमच्या आक्षेपकांच्या हातून तर तें होण्याची आशाच नको.

आपआपल्या देशांतील थोर महापुरुषांच्या संबंधाचें गुणग्रहण करण्या इतकें सौजन्य जेथें नाहीं, आणि हें केव्हां तर ते महापुरुष द्वेषप्रीतिपथातीत झाल्यावरसुद्धां, मग आमच्यासारख्या पामर व्यक्तींची कथा काय ? आक्षेपकांच्या विरुद्ध मत प्रकाशित करण्याचें घोर महापातक आचरण्याचें साहस केल्यावर मग आम्हांला क्षमा कोठून होणार ? क्षमा राहिली, सरळ व समर्पक टीका तरी कोठून मिळणार ? आपल्या सर्व वक्रोक्तिरूप पाशुपत अस्त्रांचा वर्षाव करून आम्हांस जमीनदोस्त केलेंच पाहिजे. आमच्या लेखांतला एखादा उतारा घेऊन तो नवीन विरामचिन्हें देऊन व त्यांतील सरळ कार्यकारणभावांचा विपर्यास करण्यासाठीं त्याचें डोकें पायाखालीं, हात पाठीमागें, पोट कंबरेखालीं अशी भिन्नक्रम रचना दाखवून आपलें विध्वंसकौशल व्यक्त केलें पाहिजे. आणखी वर सत्याचा, प्रामाणिकपणाचा, निस्पृहपणाचा, राज्यकर्तृदर्पदलनाचा आणि सगळ्यावर कळस म्हणून स्वदेशाभिमानाचा मक्ता आपणांकडे आला आहे असें जगास ध्वनितच करून दाखविलें तर तितकी समजूत वाचकांच्या सामान्य डोक्यांत असेल नसेल म्हणून स्पष्ट वाच्य करून दाखविलें पाहिजे. असा कृतनिश्चय झाल्याशिवाय कालतूणीरांतून बिचाऱ्या निराश्रित ग्रंथमालेवर व

ग्रंथमालाकारावर असला (असमंजस उत्प्रेक्षेकरितां अर्थान्तरन्यास) लेखसायक सणसणून सुटला नसता.

हें विवेचन करण्याचें कारण, आमच्या आक्षेपकांच्या प्रलापामुळें आम्हांस कांहीं कमीपणा आला आहे, तो दूर करून आमची बाजू साफ करून घेण्याची जरूरी आहे असें आम्हांस वाटलें असें बिलकुल नाहीं. आमच्या लिहिण्यांतील कांहीं वाक्यें घेऊन त्यांच्या अर्थाची ओढाताण करून, नुसती आपल्या गिऱ्हाइकांची करमणूक करून देण्यांत, ती करमणूक करणारांस व करून घेणारांस आनंद व समाधान वाटेल इतक्याच पल्ल्यावरची ही गोष्ट असती तर या प्रकरणीं आम्हीं एक टांकहि ओढला नसता. परंतु प्रतिष्ठित गृहस्थांनीं चालविलेलें वर्तमानपत्र म्हणजे तमाशांतील नाच्या पोर किंवा नकल्या हरिदास नव्हे. त्याच्यावर सत्यमतप्रसाराची कांहीं जबाबदारी आहे. चांगल्या प्रकारचें शिक्षण देणें हें त्याचें कर्तव्य आहे. भलतेच विचार गुलजार भाषेच्या जोरावर व अप्रयुक्त नाहीं तरी अप्रयोजक शब्दांनीं व कल्पनातरंगांनीं सामान्यजनांच्या डोक्यांत घालणें हें निंद्य व विघातक आहे व राष्ट्रास झपाट्यानें अवनतीप्रत नेणारें आहे; असा आमचा मनापासून ग्रह असल्याकारणानें हें विवेचन करण्यास आम्ही प्रवृत्त झालों. कोटीवर कोटी लढवून वादाच्या भोंवऱ्यांत सांपडणें ठीक नाहीं हें आम्ही जाणून आहों. म्हणून या बाबतींत हाच शेवटचा शब्द लिहून आमच्या आक्षेपकांस नमस्कार करतों.

• • •

# ६. ब्रह्मीभूत विवेकानंद

[ ‘ग्रंथमाला’, जुलै १९०२ ]

साधुपुरुषांचें पृथ्वीवरील कार्य झालें कीं ते क्षणभर येथें राहत नाहींत. त्यांचें कार्य झालें न झालें हें मात्र कळण्याची योग्यता ज्याची त्यास असते. आम्हांस वाटतें शिवाजी ५३ वर्षेंच जगला. रामदास स्वामी त्याच्यानंतर फार दिवस राहिले नाहींत. न्यायमूर्ति रानडे व्हाइस चॅन्सेलर होण्याच्या किंवा पेन्शन घेऊन राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष-स्थानाचा स्वीकार करण्याच्या पूर्वींच परलोकास गेले; परंतु या गोष्टी आम्हां सामान्य माणसांच्या कल्पनेच्या बाहेर आहेत. अगदीं ज्या वेळेस ज्या माणसांची आम्हांस अत्यंत जरूर आहे असें वाटतें, त्याच वेळेस अचुक त्यांस मृत्यु हिरावून नेतो. असे हजारों अनुभव आले असतां, आपण शोकाकुल होऊन आपल्यास मृत किंवा गत मनुष्यापासून फायदा किती झाला, ह्याचा विचार करण्याचें सोडून देऊन आणखी किती झाला असता, याविषयींच आम्ही विचार करूं लागतों. एक धनाढ्य पुरुष आहे व आपण सर्व भिकारी लोक त्याच्याकडे आपली उपासमार चालली आहे तिजबद्दल कांहीं मदत म्हणून मागण्यास गेलों आणि त्यानें कोणास १००, कोणास २००, कोणास ३०० असे रुपये दिले; तर पुढें पडलेला रुपयांचा ढीग पाहून आणखी दिले नाहीं म्हणून रडावें, कीं दिलेल्याचा उपयोग कसा करावा या विचारांत समाधानानें परत यावें? असा प्रश्न विचारला असतां, कोणी पोरदेखील बरोबर उत्तर देण्यास चुकणार नाहीं. हीच गोष्ट साधु पुरुषांच्या आयुर्मर्यादेस लागू आहे.

श्रीविवेकानंद स्वामींनीं ४० वर्षांच्या आंत आपला सर्व इहलोकींचा बाजार आटपला. आपल्या जवळ होती नव्हती ती सर्व चीजवस्त आम्हांस देऊन टाकली आहे. **शांकरदिग्जया**प्रमाणेंच **विवेकदिग्जय** कोणी महा-कवि रचील तर तोहि तसाच मनोहर व बोधप्रद झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांचें संक्षिप्त चरित्र देणें फार कठीण नाहीं. यांचा जन्म १८६३ सालीं झाला. ह्यांचे वडील वकील होते. आपल्या वयाच्या २०।२१ वर्षांच्या वेळेस हे बी. ए. झाले. त्या वेळीं तर्कशास्त्र व तत्त्वशास्त्र शिकल्यानें यांचें मन अनेक तत्त्व-वेत्त्यांच्या विचारांनीं भरून गेलेलें होतें. बुद्धि तीव्र व विशाल असून कोणत्याच

गोष्टींचा निर्णय झाला नाहीं अशा स्थितींत परमहंस रामकृष्ण हे त्यांस गुरु लाभल्यानें त्यांच्या चरित्रास निराळें वळण लागलें व गृहस्थाश्रमांत न शिरतां एकदम त्यांनीं संन्यास घेतला व आमरणान्त तत्त्वोपदेश करण्यांत त्यांनीं आपला सर्व काळ घालविला. त्यांची शिकागो प्रदर्शनापासून विशेष प्रसिद्धि झाली.

शिकागोस जाण्यापूर्वी त्यांनीं हिंदुस्थानचा प्रवास केला. त्यांत आमच्या या क्षेत्रास त्यांचे चरणरज १८९२ सालीं लागले होते. त्या वेळीं हे मोठे नामांकित वक्ते होतील असें आम्हांपैकीं प्रत्येकास वाटलें होतें. त्यांना विषय-परिज्ञान चांगलें असून, ते लोकांच्या मनांत भरेल अशा आवेशानें आपलीं मतें प्रतिपादीत. आमच्या राजारामीय परिषदेंत त्यांना बोलाविलें होतें, त्या वेळेस त्यांच्याशीं संभाषणांत घालविलेला तास दीडतास आम्ही आजन्म विसरणार नाहीं. तो तास दीडतासाचा अनुभव आम्हांस नसता तर त्यांच्या भाषणानें हजारों श्रोते ' बभूवुरालेख्यसमर्पिता इव ' म्हणजे चित्रांत रेखाटून ठेवले आहेत कीं काय असे दिसले म्हणून आम्हीं ऐकलें व वाचलें; त्याची कल्पनाच आम्हांस झाली नसती. समक्ष संभाषणाच्या वेळीं आम्हीं काय पाहिजे तें त्यांना विचारून घेतलें; पण त्याचें कांहीं टांचण केलें नाहीं. साध्याच सर्वांस माहीत असलेल्या गोष्टी, पण त्यांच्या मुखांतून बाहेर आल्या म्हणजे त्यांस कांहीं विलक्षण मोहकपणा येई. आमच्या येथें त्या वेळीं रा. सा. लक्ष्मणराव गोळवलकर खाजगी कारभारी होते. त्यांजकडे कोणी इंग्रजी बोलणारा भव्य संन्याशी आला आहे आणि महादेव गोविंदांचें पत्र घेऊन आला आहे असें कळतांच, आम्ही फिरून परत येतां येतां संध्याकाळच्या भोजनाच्या अगोदरच, त्यांच्या बिऱ्हाडाची जागा खासबागेंत केली होती, तिकडे तडक गेलों. तों दुरून स्वामी महाराजांचा आवाज कानीं आला. बाकीचे सर्व आवाज ओळखींचे व नवीन व खणखणीत आवाज दुरूनच ऐकूं आला, तोच अर्थात् स्वामींचा असें मनांत येऊन प्रकरण जाडें आहे असा एकदम ग्रह झाला. जवळ जाऊन संप्रदायाप्रमाणें आम्हीं वांकून जमिनीवर हात जोडून नमस्कार केला, तों ' नारायण ' नाहीं, आशीर्वादहि नाहीं, बोलण्याचा तडाका चालू आहे. मध्येंच त्यांस मंडळींनीं प्रश्न विचारावे, विचारण्याची फुरसत; फुटाण्यासारखे शब्द उडत होते. पटापट उत्तरें. झालें ! दुसऱ्या दिवशीं राजारामीयन क्लबांत बोलाविलें, तेथेंहि हाच प्रकार. सगळ्या २५ पंचवीस मंडळींचें मिळून भाषण १० मिनिटें, बाकीचा सर्व वेळ स्वामींच्या भाषणाचा प्रवाह चालला होता; त्यांच्या वाक्यांपैकीं एक वाक्य आमच्या कानांत त्या आवाजासह अजून दुमदुमत आहे. My religion is such that Buddhism is its rebel child and

Christianity but a farfetched imitation. युरोपांत म्हणजे संपत्तिसुखांत लोळणाऱ्या लोकांस धर्माची आठवण कशानें होणार? असा कांहीं बोलण्यांत भाग निघाला त्या वेळीं कोणीं कल्पना काढली कीं, मांसाहारी लोकांत थोर धर्मकल्पना कोठून येतील? लगेच स्वामी उसळले No! No! Your ancient Sages were flesheaters. Don't you read in your Uttara Rama 'समांसो मधुपर्क इत्याम्नायं बहु मन्यमानाः श्रोत्रियायाभ्यागताय वत्सतरीं महोक्षं वा महाजं वा निर्वपन्ति गृहमेधिनस्तं हि धर्मसूत्रकाराः समामनन्ति।' स्तब्ध सगळी मंडळी जिकडे तिकडे! यावरून त्यांच्या जातीविषयीं जरा शंका आली, पण विचारायची छाती कोण करतो? शिवाय असला अवघड आणि अशुद्ध प्रश्न करून पाहुण्यास दुखवावें कशास? बाकी उत्तर हिंदुस्थानांत हा निर्बंध फार नाहींच हें ठाऊक होते. तथापि जातीनें कायस्थ असून, मांसाशन हें पाप आहे असें तें मानीत असत याविषयीं संशय नको. आपला स्वतःचा आचार तोच वंद्य असें म्हणणारांपैकीं ते नव्हते.

श्रीविवेकानंदांच्या चळवळीपासून हिंदुस्थानास विशेषतः काय: फायदा झाला ह्याचा विचार करतां आमचें आम्हांस चांगलें उमजत नाहीं. राष्ट्रीय कल्याणाच्या दृष्टीनें सर्व मानव जातीच्या एकीकरणार्थ प्रवृत्त झालेल्या तत्त्वशास्त्राचा प्रसार झाल्यामुळें हिंदुस्थानचें कल्याण कांहीं झालें आहे काय, हा विचार पुढें राहतो, त्या वेळीं विवेकानंद ही एक शक्ति परमेश्वरानें उत्पन्न केली आणि पाश्चात्त्य राष्ट्राची जागृति करण्याकडे हिचा उपयोग झाला असें वाटतें. तुच्छ मानलेल्या हिंदुस्थानाकडून मोठें जगत्कार्य होणें शक्य आहे हें स्थापित झालें. इतर देशांप्रमाणें नारायणाची कृपा ह्या देशावर अद्यापि आहे. येथेंहि आपले अंश अद्यापि प्रकट करण्याचा त्यास कंटाळा आला नाहीं. न्या. रानडे यांची दिशा एक नव्हती. त्यांचें वजन व त्यांची उपयुक्तता विस्तृत प्रदेशावर नव्हती. परंतु हिंदुस्थानास त्यांच्यापासून अधिक फायदा झाला. आमच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच कीं, विवेकानंदांसारख्या प्रचंड शक्तीचा उपयोग आमचा आम्हांस झाला पाहिजे होता व पुढें झालें तरी आधीं घर आणि मग जग, अशी कल्याणाची हांव असली म्हणजे राष्ट्राची उन्नति होते, पण प्रथमच म्हटल्याप्रमाणें साधुपुरुषांच्या कामगिऱ्या ठरविणें व त्यांची कालमर्यादा निश्चित करणें हें आम्हां पामरांचें काम नाहीं. तें नियमन निराळ्याच व आमचें कल्याण आमच्या अनंत पटीनें ज्यास कळतें अशा नियंत्याच्या हातीं आहे.

अशा तऱ्हेचे संन्यासी केवळ धर्माच्या चळवळीसच पाहिजे आहेत असें नाहीं. राजकीय, औद्योगिक वगैरे कामास अशींच माणसें आज हिंदुस्थानास पाहिजे आहेत.

• • •

## ७. स्वामी विवेकानंद व ॲड्व्होकेट रा. रा. सेटलूर

[ 'ग्रंथमाला', ऑगस्ट १९०२ ]

रा. रा. श्रीनिवास आयंगार सेटलूर बी. ए., एलूएल्. बी., ॲड्व्होकेट, हायकोर्ट मुंबई, हे आपल्या धंद्याच्या कामानिमित्त येथें आले असतां त्यांनीं तारीख २४ ऑगस्ट रोजीं येथील नेटिव्ह जनरल लायब्ररींत Readings From Vivekananda असा विषय घेऊन व्याख्यान दिलें. स्वामीच्या व्याख्यानांतील व लेखांतील अनेक सुरस, चटकदार व अत्यंत बोधप्रद वेंचे वाचून दाखविले. प्रथम स्वामींचें चरित्र थोडक्यांत सांगितलें. त्यापैकीं ठळक गोष्टी आम्हीं गेल्या अंकीं दिल्या आहेतच; पण कांहीं नवीन माहिती रा. सेटलूर यांनीं सांगितली, ती आमच्या प्रिय वाचकांसाठीं येथें नमूद करून ठेवतों.

१. बी. ए. झाल्यावर नरेन्द्रनाथ ( स्वामींचें प्रथमाश्रमींचें नांव ) परमहंस रामकृष्ण यांच्या छात्रवर्गांपैकीं एक झाल्यावर त्यास संसारोन्मुख करण्यास अनेक प्रयत्न झाले. त्यांची मातुश्री खुद्द परमहंस रामकृष्णाकडे जाऊन त्यास आपण घरीं पाठवा व विवाह करून घेण्याविषयीं त्यास बोध करा म्हणून प्रार्थना करिती झाली. त्या वेळीं आपल्या शिष्यास परमहंसांनीं सांगितलें कीं आईच्या इच्छेप्रमाणें वागण्यास कांहीं हरकत नाहीं. तूं देवाची परवानगी घे आणि घरीं जा. नरेन्द्र देवापुढें प्रार्थनेस बसला, तो तेथेंच देवाकडे नजर लावून समाधींत बसला. आईनें तासभर वाट पाहिली, दोन तास पाहिली, तरी तो कांहीं उठेना. परमहंस स्वामी म्हणाले, "घरीं तरी नेऊन याला काय करणार ? हा असाच बसेल." असें पाहून आई निराशेनें परत गेली.

२. स्वामी विवेकानंदांनीं सर्व हिंदुस्थानांत प्रवास केला. सर्व क्षेत्रें पाहिलीं. अनेक प्रकारच्या लोकांशीं संवाद करून सर्व धर्ममतांच्या लोकांचा परिचय केला. परंतु मद्रासेंत त्यांचा आदर झाला तसा कोठें झाला नाहीं. शिकागो प्रदर्शनाच्या वेळीं 'पार्लमेंट ऑफ रिलिजन्स' भरली होती त्यांत हिंदुधर्माच्या वतीनें आपण जावें असें स्वामीस रामनदच्या महाराजांनीं सुचविलें. पैशाची मदत त्यांनीं बरीच केली. स्वामीस त्या वेळीं मद्रासमध्यें असलेल्या कांहीं महिसुरी तरुण विद्यार्थ्यांनीं सांगितलें कीं, आम्हीं वर्गणी गोळा करतों. महिना १० रुपये देणारी अशी ३० मंडळी तयार झाली. अशा तऱ्हेनें स्वामींची मद्रासेहून रवानगी झाली.

३. बोटीवर बसण्याच्या वेळीं स्वामींच्या नवीन शिष्यांपैकीं एकानें विचारलें, "स्वामी महाराज, आपण परक्या ठिकाणीं हिंदुधर्माविषयीं बोलण्यास जात आहां, तर बरोबर कांहीं पुस्तकें नेत नाहीं काय?" "दुसरी कांहीं नेलीं नाहीं तरी एवढें पुस्तक न्या," असें म्हणून त्यानें आपल्या खिशांतून माधवाचार्यांच्या 'सर्व-दर्शनसंग्रहा'ची एक प्रत बाहेर काढली. तेव्हां स्वामींनीं त्या पुस्तकांतील कांहीं भाग तोंडपाठ एकामागून एक म्हणून दाखविले. स्वामींची बुद्धि तीव्र व स्मरणशक्ति फार चांगली. तीन वेळां वाचलें कीं पाठ होत असे. हा जेव्हां सर्वदर्शन संग्रहाविषयीं प्रकार पाहिला, तेव्हां त्या शिष्यानें पुस्तक बरोबर घ्या म्हणण्याचें सोडलें.

४. अमेरिकेंत लोकांस स्वामींची माहिती प्रथम कशी झाली व ते प्रसिद्धीस कसे आले तोहि प्रकार लक्षांत ठेवण्याजोगा आहे. गेल्यानंतर प्रथमच आगगाडींत एक विद्वान् व बहुश्रुत बाई स्वामींच्या डब्यांत बसल्या होत्या. त्यांनीं स्वामींचा चमत्कारिक पोषाक वगैरे पाहून यांना विचारलें, "तुम्ही कोण, कोठील" वगैरे. तों बोलण्याचालण्यावरून त्या बाईच्या मनावर यांच्या अगाध विद्वत्तेची व अधिकाराची छाप बसून, त्यांनीं आमच्याच घरीं चला म्हणून नेलें. आपल्या घरीं स्नेह्यांस बोलावून त्यांचें प्रदर्शनच केलें. त्यांत तत्त्वशास्त्रप्रवीण एक प्रोफेसर होते. त्यांनीं स्वामींशीं अनेक विषयांवर संभाषण केलें. तेव्हां यांच्या अलौकिक बुद्धिसामर्थ्याची व अगाध ज्ञानाची माहिती त्यांनीं आपल्या लोकांस दिली. अशी स्वामींची माहिती झाली. ही हकीगत इकडे कळवून, 'पैसे संपले आहेत ते पाठवा' असें स्वामींनीं पत्र धाडलें. अमेरिकेंत काय, कोठें काय, यात्रा केली कीं माणसाची किंमत राहत नाहीं. तेथें पोषाक, जेवणखाण, राहणी वगैरेंची व्यवस्था सर्वप्रथम ते आपल्या खर्चानें करीत होते. हा बोजा फार दिवस त्यांजवर पडला नाहीं. 'आतां अमेरिका माझी सर्व प्रकारें काळजी घेत आहे' असें लवकरच लिहून आलें.

५. स्वामींनीं हिंदुस्थानांत जाहीर व्याख्यान असें कधीं दिलें नाहींच. तो प्रसंग त्यांस प्रथम शिकागो येथील धर्मपरिषदेपुढें आला. तेथील त्यांच्या पहिल्याच भाषणाची छाप लोकांवर एकदम बसली. प्रथमतः भाषणास सुरुवात करतांना सर्व लोकांप्रमाणें Ladies and Gentlemen असा प्रारंभ न करतां Brothers and sisters of America असा उपक्रम करतांना जी टाळी पडली, ती सारखी मिनिट दोन मिनिटें चालली होती. तें भाषण लहानच पण फारच चटकदार आहे.

६. 'पार्लमेंट ऑफ् रिलिजन्स'मध्यें हिंदुधर्माला एक लहानशी खोली दिली होती. जिकडे वक्तृत्व चांगलें तिकडे श्रोतृवर्गाची गर्दी फार. तेव्हां हळू हळू सर्वांत मोठा दिवाणखाना स्वामीस व हिंदुधर्मास देणें भाग पडलें.

७. स्वामीच्या बुद्धिमत्तेचें एक उदाहरण असें आहे कीं, पॅरिसमध्यें सहा महिने राहून तेवढ्यांत फ्रेंचभाषा शिकून तेथें फ्रेंचभाषेंत त्यांनीं व्याख्यान दिलें.

८. परदेशांतील ठिकठिकाणीं मठ स्थापून स्वामी स्वदेशीं आले. पुढें स्वदेशांत येऊन त्याची सेवा करणार तों सर्व ग्रंथ आटपला. मुंबईस मि. छबीलदास यांनीं आपली कॅनेरी केव्हज ही जागा मठासाठीं स्वामींस देण्याचें कबूल केलें होतें. विवेकानंद प्रथमच आपल्या देशांत काम करण्यास सुरुवात करते तर त्यांस कोणीं जुमानलें नसतें. अशी आमच्या लोकांची प्रवृत्ति आहे. 'जेथें पिकतें तेथें विकत नाहीं' ही गोष्ट आमच्या देशास विशेष लागू आहे.

• • •

## ८. काव्यसंग्रह

[ 'ग्रंथमाला', नोव्हेंबर १९०२ ]

मधुप इव मारुतेऽस्मिन्मा सौरभलोभमम्बुजिनि संस्थाः ।
लोकानामेव मुदे महितोऽप्यात्मामुनार्थितां नीतः ॥

—जगन्नाथ पंडित

निर्णयसागर छापखान्याचे मालक रा. रा. तुकारामशेट यांनीं 'काव्य-संग्रह' या अत्यंत उपयुक्त मासिकपुस्तकाच्या तरणोपायासाठीं सर्व स्वदेश-भक्तांस व विशेषतः महाराष्ट्रभाषाभक्तांस उद्देशून एक फार मार्मिक व कळकळीचें विनंतिपत्र काढलें आहे. निर्णयसागरशीं या मासिकपुस्तकाचा संबंध नसता तर आज दहा वर्षें हें मासिकपुस्तक चाललेंच नसतें, आणि मराठी उत्तमोत्तम काव्यांचीं नऊ दहा हजार पत्रें प्रसिद्ध झालींच नसतीं. ही गोष्ट कै. जावजी दादाजींस व त्यांच्यानंतर त्यांचे योग्य चिरंजीव रा. रा. तुकारामशेटजी यांस जितकी भूषणावह आहे तितकीच ती सर्व महाराष्ट्रास कमीपणा आणणारी आहे.

कोणत्याहि चांगल्या संस्थेची उभारणी राष्ट्रांतील जितक्या अधिक व्यक्तींच्या सहानुभूतीवर व साहाय्यावर होईल तितका तिच्यांत जोम अधिक समजला पाहिजे. अमकी अमकी गोष्ट ही राष्ट्रीय आहे काय, ह्याची अटकळ करणें झाल्यास तिच्यांत किती लोकांनीं मन घातलें आहे, हें पाहण्याची चाल आहे. राजा परका असला तर तो सर्व गोष्टींत हा विचार करतो. लोकांत कांहीं एका गोष्टीसंबंधानें ओरड चालली आहे, तिचा आवाज मोठा आहे एवढ्यावरच तो जात नाहीं. थोडेच लोक हा गलबला करीत आहेत, कीं सर्व लोकांचे या मागणीस पाठबळ आहे, हा विचार करून त्याप्रमाणें तो आपल्या मताची किंवा आचरणाची दिशा फिरवितो. त्याचप्रमाणें वरवर पाहणाऱ्या माणसास काव्य-संग्रह सुंदर ठशांनीं, गुळगुळीत जाड कागदावर, चांगल्या मार्मिक अर्थनिर्णायक टीपांनीं युक्त, असा दहा वर्षें निघत आहे, हें पाहून असें वाटेल कीं, महाराष्ट्रांत काव्यवाचनाची गोडी मोठी आहे. परंतु हा सर्व दिखाऊ डोलारा एका व्यक्तीच्या स्वभाषाप्रेमावर व फारच थोड्या लोकांच्या साहाय्यावर अवलंबून आहे हें कळल्यावर त्याच्या मनाची स्थिति काय होईल व महाराष्ट्रांतील लोकांविषयीं त्याची कल्पना काय होईल बरें ?

चटकदार मनोरंजक गोष्टी किंवा सरकारावर चरचरीत टीका वाचण्याच्या कामीं वर्षाच्या काठीं चारपांच रुपयांचा व्यय करणारीं माणसें देशांत निपजूं लागलीं म्हणजे देशाचा ऊर्जित काळ आला म्हणून समजणें शुद्ध वेडेपणाचें आहे. खरोखर राष्ट्रीय वळण अंगीं बाणून देणारे परिणाम, उसळणाऱ्या पाण्याप्रमाणें मनाची स्थिति करणाऱ्या वाङ्मयानें होत नसतात. तें वाङ्मय वेगळें. अशा प्रकारचें राष्ट्रीय वाङ्मय बहुजनसमाजास प्राप्त होण्यास संथपणाचे उद्योग करावे लागतात. अशा संथपणाचे उद्योग १८८० मध्यें स्वदेशभक्तमुकुटमणि विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं व त्यांच्या समानशील साथीदारांनीं नेटानें हातीं घेतले होते. त्यापूर्वीं या मार्गाची खरी वाट रा. सा. मंडलीक, रानडे वगैरे मंडळींनीं दाखविली होती. सर्व हिंदुस्थानास व हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांस उद्देशून बोलावयाचें व लिहावयाचें म्हणजे इंग्रजी भाषेचा अवलंब करावयाचा व आपल्या महाराष्ट्रीय बांधवांची जागृति करावयाची ती मराठी भाषेच्या द्वारें करावयाची, यासाठीं प्रथमतः वडिलोपार्जित ज्ञानाचा ठेवा आपल्यापाशीं किती व कोणता आहे हें पाहून त्याची प्रसिद्धि करण्याचें काम सुरू झालें. त्या प्रयत्नांत माधवचंद्रोबाचा ‘ सर्वसंग्रह ’ ‘ ज्ञानप्रसारक ’ मंडळीचें मासिकपुस्तक, कै. रा. ब. नीळकंठराव कीर्तने वगैरे मंडळींचे इतिहासविषयक शोध यांचा समावेश होतो, परंतु विश्वविद्यापीठीय शिक्षणाचें पाणी अंगीं मुरलेली डेक्कन कॉलेजांतून बाहेर पडलेली कांहीं मंडळी १८८० सालीं पुढें सरसावली, त्या वेळीं ह्या दमदार राष्ट्रीय कार्यास जोरानें प्रारंभ झाला. त्या उद्योगपरंपरेपैकीं प्रस्तुत लेखाशीं संबंध असलेला प्रयत्न म्हणजे ‘ काव्येतिहाससंग्रह ’ हाच होय.

‘ काव्येतिहाससंग्रह ’ वर्गणीदारांच्या अभावामुळें बंद पडल्यावरून अशा कामीं महाराष्ट्राची अनास्था प्रकट झालीच. परंतु कांहीं दिवस वाट पाहून काव्यप्रकाशनाचें काम निरनिराळ्या लोकांनीं हातीं घेतलें. ‘ मयूरकवि ’ म्हणून एक मासिकपुस्तक निघालें. ‘ वामनीग्रंथ ’ म्हणून दुसरें निघालें. ‘ सन्मणिमाला ’ म्हणून तिसरें निघालें. परंतु निर्णयसागरच्या चालकांची आस्था व त्यांचें सामर्थ्य हें या मंडळींत नसल्यानें हीं सर्व मागें पडलीं व आतां रा. रा. तुकारामशेटसुद्धां टेकीस आल्याप्रमाणें दिसत आहेत. मध्यंतरीं संपादकाच्या अभावामुळें त्यांचा निरुपाय झाला; परंतु पहिल्यापासून त्यांना या कामीं उत्तम साहाय्य मिळत गेलें आहे. कै. जनार्दन बाळाजी मोडक यांनीं काव्यसंग्रहाचें संपादकत्व हातीं घेतल्यानें ‘ काव्येतिहाससंग्रहा ’च्या त्या भागाचें ‘ काव्यसंग्रह ’ हें पुनरुज्जीवनच म्हणावयास हरकत नाहीं. त्यानंतर कै. रा. रा. ओक व कै. रा. रा. गुंजीकर

यांनीं हें काम केलें. हल्लीं रा. रा. नारायण चिंतामण केळकर, बी. ए., यांजकडे संपादकत्व आहे. हे राजारामीय असल्यानें यांची आम्हांस विशेष माहिती आहे. यांचा व्यासंग या विषयावर मोठा आहे. त्यांच्या हातीं हें पुस्तक असतांना त्यांजवर तुकारामशेटजींनीं आपल्या विनंतिपत्राच्या शेवटच्या खंडांत दर्शविलेला प्रसंग येऊं नये असें आम्ही मनापासून इच्छितों. दहा वर्षांत पांच सहा संपादक या पुस्तकास झाले. यावरून आजवरचें याचें आयुष्य ह्या दृष्टीनेंहि संकटमयच झालें आहे असें म्हणावें लागतें.

रा. रा. वामनराव ओकांच्या वेळीं अशाच प्रकारें आश्रयदात्यांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न झाले होते. त्या वेळीं वामनरावजींनीं ठिकठिकाणच्या आपल्या स्नेह्यांस पत्रें पाठवून वर्गणीदार वाढविले होते. आमच्या लोकांस नियमितपणाच्या संवयी अद्यापि लागल्या नाहींत. खर्चाच्या बाबी किती, त्यांपैकीं पुस्तकखरेदीकडे दरसालांत आपल्या उत्पन्नाचा अमका हिस्सा किंवा अमके रुपये द्यावयाचे असा निर्बंध ठरविलेले लोक फार थोडे आहेत. यामुळें वाङ्मयप्रसार व्हावा तसा होत नाहीं.

केवळ देशाच्या भावी हितासाठीं म्हणून ऐतिहासिक लेख छापले जातात. चांगला इतिहासकार निपजेल तेव्हां ते जुने लेख त्याच्या उपयोगी पडतील. मिळतील ते लेख छापले पाहिजेत. कोणता लेख कोणती माहिती देण्यास पुढें मागें उपयोगी पडेल याची आज अटकळ करीत बसण्याची वेळ नाहीं, असें आज आम्ही किती दिवस तरी लिहीत आहों; परंतु ही गोष्ट चांगले चांगले शिकलेले व ऐपतवान लोकदेखील ध्यानीं घेत नाहींत. आज त्या लेखांच्या वाचनापासून आपणांस कांहीं उपयोग नाहीं, सबब आम्हीं त्यांस आश्रय देऊं इच्छीत नाहीं असें म्हणणारे लोक त्यांत आहेत. अशानें ऐतिहासिक लेख प्रसिद्ध व्हावेत कसे ही गोष्ट वेगळी. अशाच मताचा प्रसार झाल्यानें ‘ काव्येतिहाससंग्रह ’ ‘ ऐतिहासिक लेखसंग्रह ’ व ‘ भारतवर्ष ’ हीं मासिकपुस्तकें बंद पडलीं. आम्हीं ग्रंथमालेंत ऐतिहासिक भाग प्रसिद्ध करण्याचें ठरविलें त्या वेळीं आमच्या एका हितचिंतकानें, स्वतः इतिहासाचा व ऐतिहासिक लेखाचा कट्टा भोक्ता असूनहि, असें सुचविलें होतें कीं, महाराष्ट्राच्या इतिहासाच्या साधनांच्या प्रसिद्धीस ग्रह फार प्रतिकूल आहेत, तेव्हां ही सोबत ग्रंथमालेस बाधेल अशी भीति वाटते. त्याबरोबरच त्याच मित्रानें असेंहि लिहिलें होतें कीं, निव्वळ ऐतिहासिक मजकुरा-साठींच ग्रंथमालेस वर्गणीदार होणारेहि कांहीं भेटतील.

सारांश, ऐतिहासिक लेखासंबंधानें सकृद्दर्शनीं घेण्याजोगा जो आक्षेप तोहि काव्यासंबंधानें येत नाहीं. त्यासंबंधानें रा. रा. तुकारामशेटजींच्या म्हणण्याप्रमाणें 'मंजुळवाणीनें बोध करणाऱ्या कविश्रेष्ठांचा' अनादर करणारे लोक स्वतःचें सांप्रतचें हितसुद्धां ओळखीत नाहींत, याशिवाय दुसरें कांहीं म्हणतां येत नाहीं. आपला सर्व खर्चवेंच भागून (पुढच्या तरतुदींचा विचारसुद्धां आम्ही खर्चांतच धरतों), ज्याला ५८४ खर्चण्याची ऐपत नाहीं त्यास आम्ही दोष लावूं इच्छीत नाहीं. प्रत्येक मराठी जाणणारानें काव्यसंग्रहांतील रसाळ कविता फुरसतीप्रमाणें वाचल्याशिवाय राहूं नये अशी मात्र आमची शिफारस आहे. राष्ट्रीयत्वाचें बीज आपल्या हृद्यांत कायम ठेवावयाचें असल्यास मराठी व शक्य तर संस्कृत वाचल्याशिवाय राहणाऱ्या माणसास स्वदेशद्रोही असें विशेषण लावण्यास आम्हीं किमपि अनुमान करणार नाहीं. नवीन नवीन कल्पनेचे इतिहास व निबंध वाचणें व सांप्रतकालींन विचारांचा परिचय करून घेणें हें इहलोकींच्या जीवनार्थकलहास अवश्य आहे. या शर्यतींत ज्यास, मग ती व्यक्ति असो वा राष्ट्र असो, मागें पडावयाचें नसेल त्यास आज तारखेपर्यंतचें ज्ञान पाहिजे आहेच. तें मिळवा म्हणून सांगणें म्हणजे नित्य भोजनपानादि व्यवहार करण्याचा उपदेश करण्यासारखें आहे. परंतु एवढें व्यावहारिकज्ञान झालें म्हणजे जीवितकर्तव्य आटोपलें असा भाग नाहीं. प्रत्येक राष्ट्रांतील लोकांस कांहीं उदात्त कर्तव्यें आहेत, तीं बजावण्यास उदात्त व राष्ट्रीय वाङ्मयाची आवश्यकता आहे. परंपराप्राप्त जो वाङ्मयाचा निधि तोच आमच्या पुढील वैभवास कारण होणार आहे. हें जाणण्याचें साधन उदार शिक्षण मिळालेल्या लोकांजवळ असून ते काव्यसंग्रहावर प्रेम ठेवून त्याची अभिवृद्धि करीत नाहींत, तेव्हां त्यांस वरील कठोर विशेषणें न लावावीं तर करावें काय? सर्व लोक ऐपतवान नसतात म्हणूनच पुस्तकसंग्रहालयासारख्या संस्था अस्तित्वांत आल्या पाहिजेत. प्रत्येक खेड्यांत एक लहानसें पुस्तकालय असलें पाहिजे. त्यामध्यें काव्यसंग्रहांत आजवर प्रसिद्ध झालेले ग्रंथ अवश्य असले पाहिजेत. मोठमोठ्या शहरांत मध्यम स्थितींतल्या लोकांनीं दहा पांच कुटुंबांत समाईक ग्रंथसंग्रह केला तरी अशक्य नाहीं. तीस चाळीस रुपये पगाराच्या लोकांस वर्षांतून १ रु. किंवा ८ आणे देऊन पांच दहा मंडळींत काव्यसंग्रहासारखें अत्यंत उपयुक्त पुस्तक घेणें कठीण नाहीं. या सर्व गोष्टींस खरी आस्था पाहिजे. दुसरें कांहीं नाहीं.

एवढ्या महाराष्ट्रांत काव्यसंग्रहास ३०० पेक्षां जास्ती लोकांचा आश्रय नसावा हें फार आश्चर्यकारक आहे. आमचा अजमास सुमारें ५०० वर्गणीदार या

पुस्तकास असावे व सालीना ५० कमीजास्ती होऊन ती संख्या कायम रहावी असा होता, परंतु खरा प्रकार जितका हृदयद्रावक तितकाच आश्चर्यकारक आहे. अत्यंत शोचनीय व गर्हणीय प्रकार म्हटला म्हणजे रा. रा. तुकारामशेटजींनीं आपल्या विनंतिपत्रांत ‘ तक्रार ’ म्हणून महाराष्ट्रीयांपुढें मांडली आहे. ३०० पैकीं १०० वर्गणीदार बुडवे निघावे हें खरोखर अत्यंत लाजिरवाणें आहे. , कमीअधिक प्रमाणानें हा अनुभव सर्व देशांतील सर्व वर्तमानपत्रकार व मासिकपुस्तककार यांस आहेच. आमच्या लोकांची या कामींच काय परंतु व्यापारी दृष्ट्या सर्व कामांत नीति अत्यंत खालावली आहे असें म्हणणें भाग पडतें. माल घेऊन पैसे बुडविणें याहून मानवी नीचपणा नाहीं असें नाहीं, परंतु मासिकपुस्तकास जेरीस आणण्यास हा पुरे आहे, अगोदरच आमच्या देशांत हा धंदा किफायतकारक किंवा उत्तेजनदायक नाहीं. सालोसाल कॉंग्रेस, क़ॉन्फरन्स व सरकाराकडे अर्जाचीं भेंडोळीं पाठविणें यासारखेंच हें लोकशिक्षणाचें काम आहे. कधीं काळीं एवढासा परिणाम होतो, या आशेवर धैर्य खर्चू न देतां केवळ कर्तव्य म्हणून हीं कामें आपला अमोलिक वेळ खर्चून करावयाचीं. त्याचें चीज देशबांधवांकडून असें व्हावें काय ? वर्तमानपत्रकार अगदीं निर्दोष आहेत असें आम्ही म्हणत नाहीं; परंतु आश्रयदात्यांचें वर्तन सरळपणाचें नसल्यानें त्यांचें नाहक नुकसान कसें होतें तें खुद्द आम्हांस ग्रंथमालेच्या कामीं आलेल्या अनुभवाच्या आधारें दाखविण्याची आमची पूर्ण तयारी आहे. तसा प्रकार न व्हावा व् आपल्या हातून कांहीं प्रतिकार व्हावा असें ज्या सद्गृहस्थांच्या मनांत असेल त्यांस पुढील कांहीं मासलेवाईक वंचनेचे प्रकार सादर करतों.

१. आपण स्वतः पत्र पाठवून किंवा मुखत्याराजवळ वर्गणीदार होण्याचें कबूल करून चार दोन अंक हातीं पडल्यावर बाकी चुकती न करतां किंवा अगाऊ सूचना न पाठवितां मध्येंच एखादा अंक Refused ( नको ) म्हणून परत केला जातो.

२. कित्येक लोक वर्षाचे ११ अंक मुकाट्यानें घेतात. मग बिल पाठवून त्याप्रमाणें व्ही. पी. येईल अशी ८ दिवस अगाऊ सूचना पाठविली तरी उत्तर न पाठवितां स्वस्थ बसतात. पुढें व्ही. पी. गेल्यावर Refused म्हणून लिहितात किंवा ‘ घेत नाहीं ’ म्हणून सांगतात. असें झाल्यावर पोस्टमन् [ टपालचा शिपाई ] ‘ मालक घेत नाहीं ’ असा शेरा मारून परत नेतो. हे लोक स्वतः आपण होऊन वर्गणीदार झालेले असतात किंवा त्यांनीं एजंटाजवळ कबूली दिलेली असते.

३. मुखत्याराजवळ कबूली दिलेल्या लोकांचा आमच्या जवळ कांहीं दाखला असावा म्हणून आम्हीं एक मागणीपत्राचा नमुना करून त्यावर सही घ्यावी अशी मुखत्यारास ताकीद दिली. तशी सही करून दिल्यानंतर त्याजकडे अंक १५ दिवसांत रवाना झालेले Refused म्हणून परत आल्याचीं उदाहरणें एक दोनच, पण आहेत.

४. ग्रंथमालेचा पहिला अंकच काय तो आम्ही ऐपतवान मानलेल्या सद्गृहस्थांची एक यादी करून त्यांजकडे मासल्यास पाठविला होता. पहिला अंक बाहेर पडल्यावर आम्हांस भयंकर ज्वर आल्यानें दुसऱ्या खेपेस अंक पाठवून त्यावर 'वर्गणीदार व्हावयाचें नसल्यास अंक परत करावा' अशी सूचना करण्यास झालें नाहीं. देवदयेनें आजारांतून उठल्यावर तिसऱ्या अंकावर सूचना दिली. तिजकडे लक्ष न देतां एकासारखे अंकावर अंक स्वीकारून पुढें बिल पाठविलें तर मनीआर्डरनें पैसे नाहींत. त्यांस अगाऊ सूचना पाठवून अंक व्ही. पी. केला, परंतु तो नाकारल्यामुळें परत आला. यांपैकीं कित्येक मंडळी प्रसिद्ध व पैसे बुडविणार नाहींत असें वाटल्यावरून पुढें वसूल करूं अशा आशेवर त्यांजकडे अंक दुसऱ्या वर्षीहि सुरू ठेवलें व पुढें ६ महिने गेल्यावर पत्र पाठविलें तर उत्तर नाहीं. जरा स्पष्ट खुलासेवार लिहिलें तरी तेंच. पुढें अखेर चांगलीं बोधपर एक दोन पत्रें पाठविलीं. त्यांत 'आमचे अंक परत पाठवा, आम्हीं खर्च देऊं' असें लिहिलें तरी उत्तर नाहीं. पुढें अगाऊ सूचना पाठवून व्ही. पी. केले ते मात्र परत आले. व्ही. पी. चा कमिशन आकार आमच्यावरच बसला हें उघड आहे.

५. कांहीं गृहस्थ एक वर्षभर वर्गणीदार होऊन त्या वर्षाची वर्गणी देऊन पुढच्या सालचे ११ अंक घेऊन १२ वा अंक व्ही. पी. केला, तेव्हां मुकास्यानें 'पुढें वर्गणीदार होण्याची इच्छा नाहीं, सबब परत' असें लिहून अंक नाकारतात याला काय म्हणावें! पुढें नको खरें, पण मागील बाकीची वाट काय? हा कांहीं विचार नाहीं.

६. एक दोन गृहस्थ चांगले माहितीचे म्हणून सूचना पाठवून त्यांजकडे व्ही. पी. अंक पाठविला, त्यांनीं Refused म्हणून शेरा मारून सही तारीख घातली आहे. पुढें त्यांस 'मागील अंक ठेवून घेऊन वर्गणीकरितां व्ही. पी. आलेला अंक परत कां केला, आमचें नाहक नुकसान आपण कराल असें वाटलें नव्हतें,' अशा मजकुराचें कार्ड लिहिलें. त्याचें उत्तर त्यांनीं लिहिलें आहे. 'तुमचेकडे ××× संबंधांत आमचे पैसे आहेत,

त्यांतून वर्गणी वसूल करून घ्या. आमच्या या गांवांतील लायब्ररींत मला ग्रंथमाला वाचावयास मिळते, सबब मला पुढें अंक पाठवूं नका. व्ही. पी. कशी परत झाली या प्रश्नास उत्तर असें :—' मी त्या वेळीं घरीं नव्हतों, कोणीं नको म्हटलें कोण जाणें; अंक व्ही. पी. होऊन कधीं आला होता तेंहि मला माहीत नाहीं.' हें उत्तर पाहून आम्हांस काय वाटलें असेल बरें ? यांत लक्षांत ठेवण्याजोग्या तीन गोष्टी आहेत :—

( १ ) त्यांचे आमचेकडे दुसऱ्या हिशेबांत पैसे होते ते वर्गणीपुरते नव्हते. कमींतून जास्ती काढून घ्यावे कसे ?

( २ ) ज्या लायब्ररींत ग्रंथमाला वाचावयास मिळते म्हणून लिहिलें ती लायब्ररी त्या वेळीं वर्गणीदार नव्हती.

( ३ ) Refused या शब्दाखालीं त्यांची सही व तारीख असून व्ही. पी. आली तेव्हां ते घरीं नव्हते.

७. कित्येक लोक हिंशेब समजला नाहीं म्हणून व्ही. पी. परत करतात. कोणांस वाटतें नुकतीच वर्गणी दिली, पुनः कसले पैसे द्यायचे ?

अशा या वरील प्रकारच्या लोकांत गोरगरीब व अशिक्षित लोकांचा भरणा असतो व अधिक शिक्षण मिळालें म्हणजे मासिक पुस्तककारांचें नष्टचर्य संपेल अशी कोणास आशा असेल तर ती व्यर्थ आहे. कारण हे लोक प्रायः ऐपतवान व सुशिक्षित असतात. यांत पदवीधर आहेत, वकील आहेत, अंमलदार आहेत, इनामदार आहेत. या सर्वांचा समाजांत मोठा मान होतो, मोठमोठ्या संस्थांस हजार हजार रुपयांच्या देणग्या देणारे; दोनशें, चारशें, हजार, दोन हजार अशी ज्यांची दरमहा प्राप्ति, त्या लोकांचीं नांवें वरच्या मंडळींत आहेत. हा अनुभव पाहून पडद्याच्या आंतला देखावा व रंगभूमीवरचें नाटक यांतील अंतर कोणाचें अंतःकरण खेदानें विव्हल करून टाकणार नाहीं ? अशी नीति ज्या राष्ट्रांतील कांहीं पुढाऱ्यांची, त्या देशांत तुकारामशेटजींनीं वर्णन केल्याप्रमाणें ३०० पैकीं १०० वर्गणीदारांकडचा पैसा वसूल कसा होत नाहीं याचें आश्चर्य वाटण्याजोगें नाहीं

ही स्थिति अत्यंत शोचनीय व निंद्य खरी. हिच्यायोगानें चांगल्या हिंमतवान मासिकपुस्तककारांचेंदेखील धैर्य खचून जाईल, पण देशांतील सर्व लोक वरच्या प्रकारचे नाहींत. मोठमोठ्या विद्वान् व नांवाजलेल्या लोकांत अशीं काळीं मेंढरें सांपडलीं म्हणून सर्व कळप काळ्या मेंढरांचा होत नाहीं. ह्यामुळेंच सर्व जगांतील धंदे चालत आहेत. मासिकपुस्तकें काय, वर्तमानपत्रें काय, चालविणारे

लोकांची मेहनत ओळखणारे व त्यांत निरपेक्षपणानें परिश्रम करणाऱ्यांचें चीज करणारे उदार आत्मे महाराष्ट्रांत शेंकडों आहेत. त्यांची संख्या सुदैवानें वरच्या बुडव्यांपेक्षां किती तरी पटीनें जास्ती आहे, परंतु हे लोक आपण होऊन पुढें येत नाहींत. त्यांच्या दारीं सर्व लाज सांडून आपण गेलें पाहिजे. मुखत्यारांच्या द्वारें किंवा स्वतः खटपट केल्यास तुकारामशेटजीस ५०० वर्गणीदार सहज मिळतील अशी आमची खात्री आहे. महाराष्ट्रांतील औदार्याचा झरा इतका आटला नाहीं. मराठी भाषेच्या नांवावर व तींतील प्रासादिक कवींच्या कृतीच्या जोरावर दहा काव्यसंग्रह चालविण्याइतका पैसा गोळा होईल. पण रा. रा. तुकारामशेटजींनीं, रा. रा. दामोदर सावळाराम किंवा रा. रा. बळवंतराव दाभोळकरांप्रमाणें किंवा केव्हां केव्हां आम्ही स्वतः किंवा मुखत्याराचेद्वारां घेतों त्याप्रमाणें प्रतिष्ठित भिक्षेचें व्रत घेतलें पाहिजे. आमच्याजवळ असलेलें, अमृत लोक मागावयास येईपर्यंत वाट पाहण्याची सोय नाहीं. लोक मरत आहेत तरी अमृताचा शोध करीत नाहींत, तर ज्याच्याजवळ तें असेल त्यानें आपल्या बांधवांस नेऊन पाजलें पाहिजे अशी प्रस्तुतकाळीं आमच्या देशाची स्थिति आहे. सरकाराविरुद्ध चरचरीत लेख, मोठमोठ्या व्यक्तींची खरीखोटी नालस्ती किंवा नाटक, कादंबऱ्या यांचा खप आपोआप होतो, परंतु जॉर्ज वॉशिंग्टनचा पत्रव्यवहार छापण्यास खुद्द अमेरिकेंत आम्हीं म्हणतों अशीच खटपट करावी लागली. वर्गणी-दार मिळवून तेवढ्यापुरत्याच प्रती काढणें भाग पडलें. ही सुधारणेच्या अत्युच्च शिखरावरील देशाची स्थिति. आम्ही तर किती खालील, अगदीं रसातळांतील माणसें! आम्हांस किती मेहनत, किती त्रास व किती अपमान सोसून आपल्या कल्पनेप्रमाणें देशकार्यास झटलें पाहिजे. या कामीं सर्वांनीं गुरु करण्याजोगे सद्गृहस्थ प्रो. कर्वे आहेत. किती विरोध, किती दुराग्रह मोडून त्यांनीं जवळ जवळ २०,००० रुपये फंड उभारला आहे. इतका विरोध, इतका दुराग्रह आमच्या कामांत मुळींच नाहीं. काव्यसंग्रहाच्या कामांत तर खचित नाहीं. असें असतां या कामीं 'निरुपायास्तव आम्हांस विराम पावावें लागेल' हें म्हणणें ठीक नाहीं असें आमचें ठाम मत आहे. खुद्द मुंबई-पुण्यांतच हें काम आम्हीं म्हणतों तसें केलें तर, शेंदीडशें वर्गणीदार जमतील असें म्हणणें साहसाचें नाहीं. मागणारे फार झाले, अमृत म्हणून गढूळ पाणी पाजणारे लोक पुष्कळ झाले, साधूचें सोंग घेऊन भोंदू येऊं लागले आहेत, इत्यादि गोष्टी आम्हांस कबूल आहेत, परंतु कोण कसा हें निवडण्याचें काम वाचकवर्गाचें आहे एखाद्या वेळेस फसवणूकहि होते. मोलाचें रडें खऱ्या शोकाप्रमाणें वठविणारे रॅरिक किंवा

भाऊराव कोल्टकर येऊन पैसे नेतील. म्हणून कोणी मागणाऱ्यानें मुळीं मागूं नये व देणाऱ्यांनीं मुळीं देऊं नये असें होईल कीं काय? जग आहे असेंच घेऊन चाललें पाहिजे. सारांश, हातीं घेतलेलें काम शेटजींनीं सोडूं नये अशी आमची त्यांस मनापासून प्रार्थना आहे.

"४ [ विज्ञप्ति ] सर्व लोकांस हात जोडून अशी विज्ञप्ति आहे कीं त्यांनीं आपल्या कृपेची पाखर **काव्यसंग्रहा**वर घालावी. त्याची उपेक्षा करूं नये. त्यास सर्वसंग्रह व काव्येतिहाससंग्रह यांच्या गतीला जाऊं देऊं नये. मंजुळ वाणीनें बोध करणाऱ्या कविश्रेष्ठांना अप्रसिद्धीच्या अंधारकोठडींत कोंडून ठार मारण्याइतके आपण कृतघ्न बनलों आहोंत असें म्हणवून घेण्याचा प्रसंग न येवो!"

ही व पुढील कलमांतील चौपदरी नव्हे आठपदरी तुकारामशेटजींची विज्ञप्ति, मुखत्यारांच्या मुखांतून महाराष्ट्रांतील श्रीमंतांच्या दारीं वायां जाईल असें आम्हांस वाटत नाहीं. हें गद्य स्वरूप अत्यंत हृदयद्रावक आहेच. परंतु यास रामदासी श्लोकांचें, तुकारामी अभंगांचें, श्रीधरी ओव्यांचें, रामजोशी लावण्यांचें, अमृतरायी कटावांचें रूप देऊन भिक्षा मागावी किंवा मागवावी लागल्यास देखील शेटजींनीं व काव्यसंग्रहाच्या संपादकांनीं मागें सरूं नये. शिरोलेखांतील पंडितरायांच्या आर्येंत वर्णिल्याप्रमाणें ही भोंग्यासारखी आपलपोटी भिक्षा नव्हे तर वायूसारखी परोपकारी भिक्षा आहे. इतका कृतनिश्चय झाल्यास 'निरुपायास्तव विराम पावण्याच्या' ओंगळ शब्दास मुळींच थारा मिळणार नाहीं व विनंतिपत्रांतील तक्रारीस फारशी जागा उरणार नाहीं अशी आशा करून आमचा प्रार्थनालेख संपवितों.

**जे झांकितात संप्रति येतां पाहुनि तुम्हांस दरवाजे ॥**
**कीर्त्यर्थ तेहि तुमच्या भजनीं रततील छत्रधर राजे ॥ १ ॥**

—मोगरे

• • •

## ९. नामदार प्रो. गोपाळ कृष्ण गोखले, बी. ए.

[ 'ग्रंथमाला ', एप्रिल १९०१ व ऑगस्ट १९०२ ]

आम्हां राजारामीय मंडळीस आज मोठ्या अभिमानाचा दिवस आला आहे. नामदार प्रो. गोखले हे मध्यभागातर्फे मुंबई इलाख्यांतील कायदे कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद झाल्यानें आम्हांस मोठा आनंद वाटला होताच. परंतु हल्लीं त्यांची सर्व सभासदांनीं एकमतानें सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांत नेमणूक करून दिली हें विशेष आनंदाचें व अभिमानाचें आहे. प्रथमतः या मानासाठीं दोन प्रतिस्पर्धी पुढें येणार होते. परंतु प्रो. गोखले यांच्या गुणांवर लुब्ध होऊन त्यांनीं लवकरच सुविचारानें व समंजसपणानें तो प्रयत्न सोडला. कोणत्याहि ठिकाणचा मुखत्यार लागतात तेवढीं जेमतेम मतें मिळून जाण्यापेक्षां सर्वानुमतें पुढें जाण्यांत एक प्रकारचें गौरव विशेष आहे व तें नामदार गोखले यांस लाभल्यामुळें त्यांच्या निवडणुकीस मोठें गोड स्वरूप आलें आहे. त्यास अनुसरून चोहोंकडून त्याबद्दल अभिनंदनाचे उद्गार बाहेर पडत आहेत. प्रो. गोखले सर्वगुणपरिपूर्ण आहेत असें आम्ही म्हणत नाहीं, परंतु मुंबई इलाख्यांत चांगलीं माणसें पुष्कळ आहेत, तथापि त्यांत अनेक दृष्टींनीं विचार करतां प्रो. गोखले यांच्यासारखा प्रस्तुत मानास कोणीहि योग्य नाहीं. हल्लीं प्रचलित असलेल्या राजकीय प्रश्नांचें त्यांच्याइतकें अध्ययन केलेलें आहे, असे पुरुष एका हाताच्या बोटांइतकेंहि नाहींत. वक्तृत्व तर अप्रातिम. विनयशीलता अशी दुसरीकडे सांपडणें कठीण. मोहक व सौम्य वृत्तीनें अत्यंत प्रखर विरोधाचेंसुद्धां पाणी करून टाकण्याची नैसर्गिक हातोटी व त्यांत राज्यकर्त्यांच्या जन्मभूमींत संपादन केलेली नागरिक समुदाचारपद्धति ह्या प्रस्तुत कालास अत्यंत उपयुक्त सद्गुणाची भर पडल्यावर, दुधांत साखर आणि त्यांत उत्तम मसाला पडला असें कोण म्हणणार नाहीं ? हल्लींच्या काळीं ज्यांना ज्यांना खरें देशहित करावयाचें असेल त्यांनीं कै. ना. न्या. रानडे यांच्या गुणांचा अंशतः लाभ करून घेतला पाहिजे. तसा अलौकिक लाभ एक तपाहून अधिक कालपर्यंत चरणसेवा करून प्रो. गोखले यांनीं मिळविला आहे. त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष कां न होईल बरें ? खेदाची गोष्ट एवढीच कीं, तो उत्कर्ष पाहण्यास व प्रो. गोखले यांस शाबासकी देण्यास तो महात्मा इहलोकीं जवळ नाहीं, परंतु

आमची खातरी आहे कीं, त्याचें संरक्षक व प्रोत्साहक सांनिध्य प्रो. गोखल्यांस सदैव अनुभवास येईल. त्यांची गुरुभक्ति व गुरुसेवा अशीच आहे, हें प्रो. गोखल्यांच्या अत्यंत निकट स्नेह्यांस माहीत आहे. त्या जोरावर नामदार गोखले हिंदुस्थानांतच काय तर विलायतेस व पृथ्वीवर जेथें जेथें जातील तेथें तेथें ना. रानड्यांचें शिष्यत्व गाजवितील व सर्व समंजस व निर्मळ अंतःकरणाच्या लोकांकडून त्यांचा धन्यवाद होईल.

करवीरस्थांस या गोष्टींचा किती आनंद, किती अभिमान, याचें वर्णन काय करावें? आमच्या मुंबई इलाख्यांत ज्यांनीं नांव गाजविलें असे कांहीं श्रेष्ठ पुरुष आमच्या येथले आहेत, असें स्मरून आम्हांवर परमेश्वराची कृपा आहे असें वाटून त्याच्या चरणीं भक्ति दृढ होते. एरवीं आमच्याच गांवांतून इतकीं नांव काढणारीं माणसें कां बाहेर पडावीं? महादेव गोविंद रानडे, महादेव मोरेश्वर कुंटे, अण्णा मोरेश्वर कुंटे, वामन शिवराम आपटे. एवढीं चारच नांवें घेतलीं म्हणजे बस्स आहे. असे प्रवर ज्यांचे, त्यांस कुलाभिमान कां नसेल? आतां नामदार गोखल्यांचें नांव सामील करून आम्ही पंचप्रवरी झालों आहों. बारीकसारीक नांवें घेण्याचा कालच नव्हे. परमेश्वराजवळ आमच्या गोपाळरावांस उदंड आयुरारोग्य मागून ह्या आनंदोद्गारलेखाची परिसमाप्ति करतों.

· २ ·

## पुणें म्युंनिसिपालिटीचे नवे अध्यक्ष :

नामदार गोखले यांचें नांव आतां हिंदुस्थानांत तर सर्वांस माहीत झालें आहे. प्रसिद्ध जलयुद्धवीर नेल्सन यांस होरेशिओ नेल्सन एवढ्याच पत्त्यावर कोणीं एक पत्र पाठविलें होते, तें हातीं आलें, तेव्हां जवळील एका गृहस्थानें विचारलें, "असला ठावठिकाणा शिवाय पत्ता कसा लिहिला यानें?" त्यावर जरा योग्य अशा स्वाभिमानानें नेल्सन म्हणाला कीं, जगांत होरेशिओ नेल्सन एकच आहे. असो, आज ना. गोखले यांच्याविषयीं लिहिण्याचें कारण असें आहे कीं, सर्व राजारामीयांनीं खरोखर समाधान व अभिमान मानण्याजोगा त्यांचा बहुमान झाला आहे. मरहूम मि. दोराबजी पदमजी हे जवळ जवळ वीस वर्षें पुणें म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते. त्यांच्या शोचनीय मृत्यूनें रिकाम्या पडलेल्या जागेवर, कमिशनर लोकांनीं सर्वानुमतें ना. प्रो. गोपाळराव गोखले यांची नेमणूक केली. त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत आहे, याबद्दल आम्हांस आनंद होत आहे.

त्यांच्या स्वदेशसेवेची हौस पाहून आम्हांस अभिमान वाटतो. आपल्या केवळ अंगच्या गुणांनीं म्हणजे अलौकिक बुद्धिमत्ता, असामान्य उद्योग, सद्गुरुप्राप्त व्यवहारपाटव, प्रसंगीं न भंगणारें धैर्यबळ व श्रोतृजनांस तल्लीन करून सोडणारें वक्तृत्व* एवढ्या जोरावर ते पुढें येत आहेत. पार्लमेंटचे सभासद होण्याची त्यांच्या अंगीं योग्यता आहे व त्यांची तिकडे जाण्याची तयारी आहे, परंतु इंग्लंडांत जाऊन राहणें सोपें नाहीं. तें काम पैशाचें आहे.

---

*या गुणाबद्दल त्यांची प्रथम प्रसिद्धि त्यांनीं १८८६ सालीं पहिलें जाहीर व्याख्यान येथील नेटिव्ह जनरल लायब्ररींत दिलें तेव्हां झाली. त्या वेळीं मि. लीवॉर्नर ( हल्लीं सर वुइल्यम लीवॉर्नर ) येथें पोलिटिकल एजंट होते, ते अध्यक्षस्थानीं होते. या प्रसंगाचा साहेबमजकुरांनीं पुढें दोन तीन ठिकाणीं जाहीर भाषणाच्या वेळीं उल्लेख केला. पुढें १८८९ सालीं लॉर्ड रे यांच्या कारकीर्दीत मामलेदारांच्या कामांत पुण्यांत जंगी जाहीर सभा झाली होती त्या वेळच्या प्रो. गोखल्यांच्या भाषणासंबंधानें टाइम्स ऑफ इंडियाकर्त्यांनीं त्यांची मि. चेंबरलेनशीं तुलना केली होती. " A speech which for trenchancy and vigour would do no discredit to Mr. Chamberlain." पुढें मुंबईस प्राव्हिन्शल कॉन्फरन्सच्या वेळीं एक Home charges (विलायतेंत हिन्दुस्थानचा होणारा खर्च) वर त्यांचें भाषण सुरेख झालें. त्याविषयींहि आमच्या लोकांचे गुण घेण्यास नेहमीं तत्पर नसणाऱ्या टाइम्स ऑफ इंडियानें पुढील उद्गार काढले आहेत.

"Lord Northbrook has indeed done little more than gather together the remonstrances of a long series of Viceroys and Secretaries of State–remonstrances to which up to this time no real answer has been given. What Lord Northbrook's House of Lords' speech, as the reporters have given it to us, lacks in lucidity has been supplied by the able exposition of the case that was given at the Bombay meeting by Mr. Gokhale who has devoted to the subject more study and thought than financial questions usually get at the hands of political speakers in India."

त्यांचीं मोहडा बिल, पब्लिक सर्व्हिस कमिशन, व (ग्रॅज्युएट असोसिएशनपुढील) शिक्षण या विषयावरील भाषणें आहेत व तीं लोकांच्या ध्यानांतहि आहेत. वेल्बी कमिशनपुढील साक्ष, लँड रेव्हिन्यू बिलावरील मुंबई कौन्सिलमधील भाषण व कलकत्ता कौन्सिलपुढचें बजेटवरील भाषण या तीन गोष्टी तर त्यांच्या प्रस्तुत उच्च पदावर आरोहण करण्याच्या तीन पायऱ्याच आहेत.

तूर्त झाल्या त्या गोष्टींत संतोष मानून, आजवर परमेश्वरकृपेनें सर्व गोष्टी व्हाव्या तशा घडून आल्या, तशाच पुढें होतील अशी आशा करून राहावें हेंच बरें दिसतें. त्यांच्यावर नानाप्रकारचीं संकटें आलीं, गैरसमजानें त्यांच्या सार्वजनिक चरित्रावर नाहीं नाहीं ते आक्षेप सरकारनें व लोकांनीं आणले व त्यांचा थोडा-बहुत छळहि झाला, यामुळें कांहीं सुखासमाधानाचे तर कांहीं मानसिक संतापाचे दिवस त्यांना प्राप्त झाले. यामुळें भर्तृहरीच्या 'मनाच्या श्लोकां'पैकीं एक श्लोक त्यांच्या मनावर उत्तम ठसला आहे, आणि तोच ते सर्वकाळ पुढें ठेवून वागत आहेत. यामुळें त्यांच्या मनाचा मूळचा अस्थिरपणा जाऊन, त्यांच्या ठिकाणीं सागरगांभीर्य येत चाललें आहे. तो श्लोक असा आहे :—

**परिभ्रमसि किं वृथा क्वचन चित्त विश्राम्यताम्**
**स्वयं भवति यद्यथा भवति तत्तथा नान्यथा ।**
**अतीतमपि न स्मरन्नपि च भाव्यसंकल्पय-**
**न्नतर्कितगमागमाननुभवस्व भोगानिह ॥** *

• • •

* परिभ्रमिशि कां उगी क्वचन घे विसांवा मना
स्वता घडति जें जसें घडति तें तसें, चूक ना ।
गताहि घडल्या कथा विसर, भावि नाणूं मनीं
अकल्पितचि भोग जे घडति त्या रहा भोगुनी ॥

# १०. श्रीधर गणेश जिनसीवाले

[ ‘ ग्रंथमाला ’, ऑगस्ट १९०२ ]

मंगळवार तारीख १८ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्रास अशा अनर्थाचा उगवेल असें आमच्या ध्यानींमनींस्वप्नींहि नव्हतें. रविवार रात्रीपासून प्रो. जिनसीवाले पक्षघातानं मुंबईस बेशुद्ध झाल्याची खबरहि बाहेर येण्यास फुरसत नव्हती, तो आकस्मिक रीतीनें त्यांचा अकालीं काल झाल्याची तार मंगळवारीं दोनप्रहरानंतर येथें **समर्थ** कचेरींत येऊन थडकली ! त्यानंतर लवकरच ही गोष्ट आम्हांस व ज्या ज्या स्नेह्यांस कळली त्यांस फार दुःख झालें. त्यांचें कुटुंब व एकुलता एक मुलगा वारल्याची माहिती आम्हांस होती व मृत्यूसमयीं त्यांच्याजवळ सगोत्रांपैकीं कोणी नसेल ही कल्पना मनांत आल्याबरोबर प्रसिद्ध अथेनियन मुत्सद्दी पेरिक्लीस याच्या वचनाची आठवण झाली. तो म्हणे, ‘ माझ्यामुळें कोणी सुतक धरावयास नको ’ असा मी सुखी आहें. परंतु अशीं माणसें एका कुटुंबांतील नव्हेत, तर तीं राष्ट्राचीं माणसें आणि त्यांच्याबद्दल राष्ट्र सुतकी होतें. सुतक धरण्यास ज्या ज्ञातिसूत्राची आवश्यकता असते, तें सूत्र या लोकांनीं सर्व वसुधा आपलें कुटुंब मानल्यानें त्या सूत्राची व्यापकता वाढलेली असते. आपल्या देशभूमीच्या ठायीं प्रो. जिनसीवाल्यांचें अपरिमित प्रेम होतें. तिच्याविषयीं बोलतांना त्यांना अत्यंत गहिंवर येई. त्यांच्या सद्गदित कंठांतून निघालेल्या भाषणांनीं ज्याचें अंतःकरण द्रवलें नाहीं व नेत्रांस अश्रू आले नाहींत, असा श्रोताच आम्हीं पाहिला नाहीं. आम्हांस पेरिक्लीसचीच आठवण होण्याचें कारण हेंच कीं, तो असाच अप्रतिम वक्ता होता, त्याच्या जिव्हाग्रावर मोहनी होती असें इतिहासकार लिहितात. तशीच गोष्ट प्रो. जिनसीवाल्यांची असे. प्रो. जिनसीवाल्यांच्या व्याख्यानास गांवांतील सर्व जागा नेहमीं अपुऱ्या पडावयाच्या हा निश्चयच. असा अलौकिक व प्रेमळ उपदेशक पुत्र मृत्युमुखीं पडल्यानें आर्यजननीस दारुण पुत्रशोक व्हावा यांत आश्चर्य नाहीं. प्रो. जिनसीवाल्यांची आठवण आम्हांस आमरण राहील व त्यांचें आवेशाचें, प्रेमाचें व खऱ्या कळकळीचें जाहीर व खासगी भाषण पुनः ऐकावयास सांपडणार नाहीं म्हणून एकसारखा चटका लागून राहिला आहे. इतर व्यवसायांतून मोकळ्या झालेल्या मनास मधूनमधून प्रो. जिनसीवाले यांचें स्मरण झालें कीं, एक शक्ति महाराष्ट्रांतून गेली, तितक्यापुरते आपण दीन झालों, अशीं किती घेण्या-

जोगीं ढळढळीत उदाहरणें डोळ्यांपुढून गेलीं म्हणजे नुसत्या पुस्तकी शिक्षणानें काय होणार, असे अनेक संबद्ध, असंबद्ध विचार मनांत येतात.

प्रो. जिनसीवाल्यांच्यासंबंधानें फार वाईट वाटतें तें हें कीं, देशानें, सरकारनें किंवा ज्या विश्वविद्यापीठाचे ते ललाम होते त्या विश्वविद्यापीठानें त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांचा करावा तसा सत्कार केला नाहीं. त्यांचे विचार, हल्लींच्या सरकारनें त्यांचे गौरव करण्यासारखे नव्हतेच. लोकांनीं त्यांचीं भाषणें मात्र मनमुराद ऐकलीं. पण कधीं त्यांना मानपत्र किंवा एखादें पदक किंवा कांहींतरी प्रेमाचें किंवा गुणग्रहणाचें चिन्ह दिलें काय? त्या महापुरुषास असल्या गोष्टीची जरूरी नव्हती. त्यास आपण चंदनापरी देशासाठीं व सत्यासाठीं व धर्मासाठीं झिजावें एवढें माहीत होतें. यांचा पाद्री लोकांच्या कॉलेजाशीं संबंध सुटल्यापासून पुढें एकदांहि विश्वविद्यापीठानें त्यांना परीक्षक नेमलें नाहीं. पाद्री लोकांची गैरमर्जी झाल्याबरोबर त्यांच्या अलोट विद्वत्तेचा झरा आटला काय? आमच्या देशबांधवांचें जें विश्वविद्यापीठांत वजन होतें त्यायोगानें ही गोष्ट अशक्य किंवा असाध्य नव्हती, पण घर फिरलें म्हणजे घराचे वासेहि फिरतात म्हणतात त्यांतली अवस्था! असो.

या त्रयीकडून त्यांचा आदर झाला नाहीं याबद्दल वाईट वाटतें, पण त्याहूनहि वाईट वाटतें तें अशाबद्दल कीं, त्यांचा या महाराष्ट्रभूमीस कांहीं दिवसांनीं अगदीं विसर पडणार! उत्तम वक्ता व उत्तम लेखक यांत हें अंतर. जेथें जेथें त्यांचीं भाषणें झालीं तीं तीं स्थळें ध्वनिलेखकयंत्रें असतीं, तर पुढील पिढ्यांनीं तीं यात्रेचीं स्थळें मानून आळंदीपंढरीप्रमाणें तिकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी गेल्या असत्या. परंतु हाय! हाय! त्यांचें एकहि भाषण आतां कानीं पडणार नाहीं. मग प्रो. जिनसीवाल्यांची आठवण कशी राहणार! साखरेची गोडी कोठें वर्णनानें कळणार आहे काय? प्रो. जिनसीवाले निःसीम देशभक्त होते. या देशासाठीं त्यांचा जीव तिळतिळ तुटत होता. त्यांची वृत्ति अत्यंत सात्त्विक होती. तेव्हां त्यांचा पुनर्जन्म याच महाराष्ट्र भूमींत होईल आणि असे अनंत जन्म घेत घेत ते पुनः पुन्हा या दीन आर्यमातेच्या सेवेंत तत्पर राहतील, एवढीच आम्हांस आशा आहे.

प्रस्तुत लेखकास प्रो. जिनसीवाल्यांचा दीर्घ सहवास नव्हता. बर्कविषयीं जॉन्सननें म्हटलें आहे, तें प्रोफेसरसाहेबांस लागू पडतें. वाटेनें जातां जातां गुरांची गर्दी झाली म्हणजे रस्त्याच्या कडेवर मिनिट दोन मिनिटें संभाषण होण्या-पुरता योग जरी आला, तरी बर्कच्या ठायीं लोकांचें प्रेम जडे व त्याच्याठायीं

आदर उत्पन्न होई. प्रस्तुत लेखकाचा या थोर पुरुषाशीं प्रथम संबंध परीक्ष्य-परीक्षकाचा आला. त्या वेळीं खाजगी भाषणाचें अर्थात् प्रयोजन नव्हतेंच, पण पुढें तो बी. ए. झाल्यावर सुमारें चार महिन्यांनीं ते करवीरास आपल्या एका स्नेह्याकडे आले असतांना त्यांस मुद्दाम भेटावयास गेला. त्या पहिल्या भेटींत तीन वर्षांपूर्वींची आठवण काढून मोठ्या प्रेमानें त्यांनीं जें भाषण केलें, त्याचें विस्मरण अशक्य आहे; परंतु त्यांतला सार्वजनिक उपयोगाचा एकच चुटका येथें देतों. त्यांनीं असा प्रश्न विचारला कीं, 'तुम्हीं रामायण-महाभारत कांहीं वाचलें आहे कीं नाहीं?' त्यावर उत्तर केलें कीं, 'नुकताच या परीक्षांतून सुटलों आहे. हे ग्रंथ साग्र वाचण्याचा मीं संकल्प केला आहे. होईल तेव्हां खरें.' पुढें विचारलें, 'मनु तरी वाचला आहे काय?' त्यावर तो म्हणाला कीं, 'धर्मशास्त्र कांहीं मीं घेतलें नाहीं'. 'तें खरें हो पण तुम्ही हिंदु तरी आहांना? प्रत्येक संस्कृत जाणणारानें तो ग्रंथ एकवार तरी अवश्य वाचावा व आपल्या लोकांनीं तर वाचावाच.' या बोलण्याचा परिणाम इतका झाला कीं, मानवधर्मशास्त्र पैदा करून तें पुस्तक संपवीपर्यंत दुसरें कांहीं संस्कृत अक्षर प्रस्तुत लेखकानें वाचलें नाहीं. एकंदरींत धर्मावर त्यांची श्रद्धा फार व तोच आपल्या देशास सुदिन दाखवील असा त्यांचा दृढ विश्वास असे. राजकीय शिक्षणासाठीं धर्माचें थोतांड माजविणें त्यांस आवडत नसे. 'धर्मासाठीं राज्य, राज्यासाठीं धर्म नाहीं' अशा पूर्ण मताचे ते असत. त्यांना लिहिण्याचा कंटाळा असे. बेकननें* म्हटल्याप्रमाणें 'वाचनानें मनुष्य पूर्ण होतो, लिहिण्यानें कांटेकोर होतो व बोलण्यानें तयार होतो.' आम्ही ग्रंथमाला काढल्यावर त्यांस फुरसत होतीच व त्यांस आम्हीं अनेक वार तसदी दिली, पण ग्रंथ लिहिण्याचें त्यांनीं कधीं कबूल केलें नाहीं. त्याचा परिणाम इतकाच कीं, हें सर्व ज्ञान आपलें आपण बरोबर घेऊन जाणार असें आम्हीं म्हटलें तेव्हां, ते म्हणाले, 'मीं कोठून आणलें आहे? काय असेल तें पुस्तकांतूनच गोळा केलें आहे, तें सर्व येथेंच राहणार, आहेत तीं पुस्तकें लोक वाचीनात!' अशामुळें पुढील पिढीस प्रो. जिनसीवाल्यांची कल्पना येण्यास कांहीं राहिलें नाहीं याबद्दल वाईट वाटतें. परंतु गेल्या पन्नास वर्षांचा महाराष्ट्राचा किंवा मराठी भाषेचा इतिहास जर लिहिण्यांत येईल, तर त्यांत अप्रतिम लेखक कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या बरोबरीनें अप्रतिम वक्ता प्रो. श्रीधरपंत जिनसीवाले यांचें नांव अजरामर झाल्याशिवाय राहणें अशक्य आहे.

• • •

* Reading makes a man full, writing makes him exact and speaking makes him ready.

# ११. मरहूम हर्बर्ट स्पेन्सर

[ 'ग्रंथमाला', डिसेंबर, १९०३ ]

एका प्रसिद्ध व प्रचंड लेखकाच्या यथाकालीं झालेल्या निधनाबद्दल खेद प्रदर्शित करण्यापेक्षां परमेश्वराचे अनन्य भावानें आभार मानणें योग्य आहे. ज्यास आपलें योजिलेलें कार्य तडीस नेण्याइतकें आयुरारोग्य परमेश्वरानें दिलें त्यास मरण मोठ्या आनंदानें आलें असेल यांत आम्हांला बिलकुल शंका वाटत नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांना स्पेन्सरच्या मरणाबद्दल इतकी हळहळ कां वाटते ह्याचें कारण आम्हांस इतकेंच दिसतें कीं, त्याचे थोडेबहुत ग्रंथ वाचणारे अलीकडे आपणांत बरेच लोक आहेत. त्याचे ग्रंथ मननपूर्वक वाचण्यापेक्षां त्याच्याविषयीं किंवा त्याच्या मताविषयीं चारदोन गोष्टी ऐकून गतानुगतिकत्वानें त्याचें स्तोम माजविणारेच लोक फार आहेत. युरोपीय राष्ट्रांनादेखील स्पेन्सरनें कांहीं नवीन शिकविलें आहे कीं काय याची आम्हांस शंकाच आहे. हिंदुस्थानच्या लोकांस विशेष ग्राह्य असें नवीन कांहीं त्याच्या ग्रंथांत आहे असें आम्हांस वाटत नाहीं. पृथ्वीवरील सर्वसाधारण लोकांस म्हणजे साऱ्या मनुष्यजातीस किंवा सृष्टीस लागू पडतील अशीं सोपपत्तिक विधानें त्यानें केलीं आहेत, इतकेंच. गरीब व अन्नान्नगतिक झालेल्या या देशानें कृतज्ञताबुद्धीनें त्याचें नांव स्मरावें असें स्पेन्सरच्या ग्रंथांत किंवा चरित्रांत आम्हांस कांहीं आढळलें नाहीं किंवा कोणीं दाखविलें नाहीं. बाह्य सृष्टिशास्त्रांत त्याच्यापेक्षां हक्स्ले, टिंडल, फॅरेडे वगैरे नांवें अधिक महत्त्वाचीं वाटतात. स्पेन्सरला तत्त्ववेत्ता असें कित्येक लोक म्हणतात, पण खरा तत्त्ववेत्ता वाटेल तेथें आढळणें शक्य नाहीं. तत्त्व म्हणजे सृष्टीचें रहस्य किंवा अध्यात्मविद्या, कीं जिला सर्व विद्यांतील अग्रगण्य मानलें आहे, तिचा अत्यल्प भागहि स्पेन्सरच्या ग्रंथांत आढळत नाहीं. शारीरिक व मानसिक शास्त्राचा विचार त्यानें केला आहे. मानसिक व नैतिक विचारांत सामाजिक व वैयक्तिक हिताहिताचा ऊहापोह त्यानें केला आहे, परंतु ऐहिक गोष्टीच्या पलीकडे त्याची मजल गेली नाहीं. मूर्तसृष्टिशास्त्रांविषयीं सूक्ष्म विचार इतरांप्रमाणें त्यानें केला आहे व उत्क्रान्तितत्त्वाची सर्वत्र लापनिका करण्याचा यत्न केला आहे. परंतु पारमार्थिक विचाराच्या अवाढव्य प्रदेशाच्या बाहेर

बाहेरच्या टोंकावरूनसुद्धां आंत नजर फेंकण्यास लागणारें दिव्य किंवा लोकोत्तर ज्ञान त्याला नव्हतें, अशी त्याचे लौकिकदृष्ट्या सुंदर ग्रंथ पाहून आमची खात्री झाली आहे. समाजशास्त्रीय प्रश्नावरील त्याचे विचार यदृच्छा किंवा यद्भविष्य-वाद्याप्रमाणें होते असें म्हणतां येणार नाहीं, परंतु साक्षेपी किंवा जोरदार यत्न-वाद्यास प्रोत्साहन देणारे नाहींत. हिंदुस्थानांत तत्त्वशास्त्राची ज्योत कशी पाजळलेली आहे याचें अवलोकन घडलें नाहीं, त्यास स्पेन्सर लिहूं लागण्यापूर्वी सर्व घोटाळा व गोंधळ होता तो मोडून त्यानें व्यवस्था लावली असें वाटणें साहजिक आहे. आपल्या घरीं असलेलीं रत्नें टाकून दुसऱ्याच्या गारगोट्याची चकाकी पाहून भुलण्याइतका हिंदुस्थान देश आजला वेडा झाला आहे. हिंदु-स्थानासाठीं स्पेन्सरनें कांहीं केलें नाहीं. हिंदुस्थानचा इतिहास, राजकीय अवस्था, सांपत्तिक स्थिति यांपैकीं कशाचीदेखील त्यास माहिती नव्हती. सत्य व तत्त्वभूत नीतिमत्तेचें उदाहरण इतर राष्ट्रांस घालून देण्याची परमेश्वरकृपेनें स्पेन्सरच्या देशबांधवांस संधि होती व आहे; पण बर्क ब्रॅडलॉप्रमाणें अप्रिय सत्य आपल्या लोकांपुढें मांडणाऱ्याचें स्मारक स्पेन्सरच्या अगोदर आम्हीं करावें. त्यांचीं मतें हिंदुस्थानांत प्रसृत झालीं पाहिजेत म्हणून बक्षिसें ठेवलीं तर उपयोग आहे. इंग्लंडचे लोक स्पेन्सरविषयीं उदासीन आहेत, पण एका हिंदी माणसानें हजार पौंड का हजार रुपये त्याच्या स्मारकासाठीं इंग्लंडांत दिले याबद्दल आम्हांस अभिमान तर वाटत नाहींच. ज्याच्या पैशाचा तो मालक आहे, पण हाच पैसा येथेंच सत्कारणीं लावतां आला असता इतकें म्हणण्याचा मोह मात्र आम्हांस आवरत नाहीं. मुळीं उत्क्रांतितत्त्वच खोटें किंवा अर्धें खोटें असेंच ठरलें म्हणजे स्पेन्सरच्या ग्रंथाची इमारत ढासळणार. स्पेन्सरला आम्ही कमी समजतों असें कोणीं समजूं नये. एक हेतु पुढें ठेऊन ५० वर्षें सतत त्यावर ग्रंथरचना करीत राहणें हें कांहीं सामान्य नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांविषयीं विशेष गोष्ट सोडली तर एकंदरीनें समदृष्टि व विवेकी पुरुष आजवर होऊन गेले त्यांत त्याचें नांव घेण्याजोगें होईल. इंग्लिश वाङ्मयांत १९ व्या शतकांतील हजारों लेखकां-पैकीं चार दोन नांवें बरेंच दिवस टिकतील त्यांत याचें नांव राहील. पण त्यांत आमचें गौरव कांहीं नाहीं. श्रद्धा व भक्ति या गुणांशिवाय प्रसाद येत नाहीं आणि तो प्रसाद असल्याविना तत्त्ववेत्ता हें उपपद शोभत नाहीं. तर्शीं माणसें तर्ककशरण म्हणजे तर्कानेंच सर्व गोष्टींचा विचार करणाऱ्या युगांत निपजणें

अशक्य. स्पेन्सरसारख्या माणसास विशालधी, दीर्घश्रमी, सत्यान्वेषी, वितृष्ण, उदारबुद्धि अशीं उत्कर्षदर्शक विशेषणें लावतां येतील, पण ज्यांची वाणी ऐकतांच त्यांचे पाय घट्ट धरावे अशी ज्यांच्याविषयीं भावना उत्पन्न व्हावी तशी विभूति प्रस्तुतलेखविषयक व्यक्ति होती असें म्हणतां येत नाहीं. तत्त्ववेत्ते आणि तत्त्वचिंतक असे दोन भेद आम्ही करीत असतों. दुसऱ्या वर्गात स्पेन्सरची प्रत बरीच वर येईल. अशांस तत्त्ववेत्ता हें नांव लावतात पण तें या संकुचित अर्थानेंच लावण्यांत येतें.

• • •

## १२. कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर

[ 'ग्रंथमाला', मार्च १९०१ ]

स्वभाषासेवा करण्याच्या म्हणजे स्वराष्ट्राच्या आयुष्याची वृद्धि करण्याच्या कामगिरीस दृढनिश्चयानें ज्यांनीं आपणांस वाहून घेतलें, अशांचें उदाहरण आपण कधींहि विसरूं नये. शास्त्रीबोवांनीं दुसरें कांहीं केलें नसलें तरी जनमनाचा ओघ आंग्ल भाषेकडून आपल्या भाषेकडे परतविला व त्या भाषेचें सामर्थ्य लोकांच्या मनावर बिंबविलें. त्यांच्या कांहीं लेखांतील कांहींतरी दोष काढून त्यांना व्यापक स्वरूप देऊन चर्चा करीत बसण्याचा क्रम आम्हांस बिलकूल पसंत नाहीं. जगांत निर्दोष असें कांहीं नाहीं. कोणत्याहि गोष्टींतील दोष टाकून गुणग्रहण करण्याकडे प्रवृत्ति असावी. गुणांचा विचार पूर्ण झाला म्हणजे मग दोषांचा विचार करावयाचा. खरोखर म्हटलें तर एखाद्या मनुष्याच्या दोषांचा विचार करणें म्हणजे त्यांचें मोठेंपण कबूल करणें असाच आम्ही म्हणतों. लोकांचें चित्त वेधावें असें कांहींतरी अलौकिक त्याच्यामध्यें असल्याशिवाय त्याचा आम्ही विचार करीत नाहीं. असामान्य दुष्टपणा हाहि वर्णनविषय होतों; परंतु अंगीं या वाईट गुणाबरोबर लोकोत्तर सद्गुण असल्याशिवाय त्यांचें नांव वारंवार निघणें अशक्य. लोकोत्तर गुणवत्ता व साधारण दुर्लक्ष करण्याजोगे दोष असले तरच कोणाहि माणसास त्याच्या मरणोत्तर देवपण येतें. जें जें विभूतिमत् सत्त्व आहे त्यांस त्यांनीं परमेश्वरांश असें ओळखून लोक त्यांचें पूजन करतात. त्यांच्या जन्मातिथि किंवा निधनतिथि पाळतात. त्यांचा मानवांश गुणग्राही समाजांत नष्ट होतो म्हणजे — जातो पण —

**सर्वानंदिन्यङ्गके कामिनीनामीर्मं मार्गत्येष वै वंभरालिः ।**

निखिल जनांस आनंद देणाऱ्या सर्वांगसुंदर स्त्रीच्या शरीरांत व्रण कोठें आहे तेवढेंच माशी पाहते. तद्वत् कांहीं लोक सुवृत्त व 'बहुतकर' लोकांच्या चरित्रांतील व लेखांतील व्यंगें काढण्याकडे प्रवृत्त होतात. शास्त्रीबोवांच्या लेखांतील चांगला भाग तेवढाच सज्जनप्रिय होईल. असा भाग त्यांच्या लेखांत थोडा नाहीं. तीनचतुर्थांश किंवा पांचषष्ठांश भाग असा आहे. तत्कालीन स्थितीस अनुरूप असें त्यांचें लिहिणें होतें हा बचाव ज्या लेखांसंबंधानें पुढें आणावा लागतो असे लेख अगदीं थोडे आहेत. सर्व काळीं सर्वांस मान्यच नव्हे, तर वंद्य होईल

असाच भाग पुष्कळ आहे. शास्त्रीबोवांच्या लेखांपैकीं उत्तम भाग कोणता असें विचारलें तर त्यांच्या भक्तांपैकीं असे किती असामी निघतील कीं तो 'लोकहितवादीवरील निबंध' होय आणि 'जॉनसनचें चरित्र' किंवा 'इतिहासावरील निबंध' नव्हे असें म्हणतील त्यांच्या या किंवा त्या लेखावर खरोखर त्यांची थोरवी नाहीं. ती त्यांच्या सर्व चरित्रावर आहे. तें चरित्र त्यांच्या निबंधमालेंत, न्यू इंग्लिश स्कुलांत, चित्रशाळेंत, किताबखान्यांत व काव्येतिहाससंग्रहांत आहे. तें त्यांच्या विकारवश लेखांत नाहीं. तें पुण्याच्या किंवा कोल्हापूरच्या किंवा साताऱ्याच्या पोरांच्या आचरटपणांत नाहीं.

**रा. रा. टिळकांचा निबंध :**

शास्त्रीबोवांच्या निधनतिथीच्या दिवशीं सद्वर्तन प्रसारक मंडळीपुढें रा. टिळकांचा निबंध वाचला गेला. तो एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील महाराष्ट्राच्या इतिसांतील एक महत्त्वाचा भाग होण्यास लायक आहे. तो आमच्या बहुतेक वाचकांनीं वाचला असेलच; नसल्यास अलबत वाचावा. अर्ध्या मुर्ध्या ज्ञानामुळें अव्वल इंग्रजींत समाजांतील वरच्या वरच्या लोकांचे निर्बंध कसे शिथिल झाले व सरकारनें त्यांना थोर केलें तरी बहुजनसमाजांत त्यांना मान कसा मिळाला नाहीं हें उत्तम दाखविलें आहे. शास्त्रीबोवांचे वेळीं वस्तुस्थिति कशी पालटत होती तेंहि सुरेख दाखविलें आहे. एकंदरींत तो सर्व लेख चांगला आहे.

पुढें शास्त्रीबोवांच्या लेखावर आलेल्या आक्षेपांचें निरसन करतांना मात्र रा. रा. टिळकांच्या लेखांत समतोलपणा राहिला नाहीं. हें निरसन या निबंधास गालबोट आहे असें आम्हांस वाटतें.

शास्त्रीबोवांचे कित्येक लेख मेकॉलेसारखे आहेत हाच आक्षेप आहे. म्हणजे मेकॉलेचे गुण व दोषहि त्यांत आहेत. यांचें निरसन करतांना रा. रा. टिळक म्हणतात, ते तसेच आहेत व असले पाहिजेत. म्हणजे त्यांच्या मतें मेकॉलेचे लेख व लेखनपद्धतीच उत्तम असे होते. हें विधान सर्वांस पसंत पडेल असें नाहीं. आम्हांला तर तें सद्वर्तनाच्या प्रसारास विघातक आहे असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. "कित्येक लोकांची अशी समजूत आहे कीं, चांगला लेख कोणता, तर त्यांत दोहों पक्षांचा समतोलपणा राखून कोणासहि न दुखवितां दरबारी रीतीनें विषयाचें विवेचन केलेलें असतें." चांगल्या लेखाची ही व्याख्या आम्हांस पसंत असल्यानें तिच्याविरुद्ध उपदेश केलेला पाहून त्याचा निषेध

केल्याशिवाय राहणें बरें नव्हे, असें वाटल्यावरून दोन शब्द लिहिण्यास आम्ही प्रवृत्त झालों आहों.

१. वेळेपुरती छाप बसविणें व क्षणिक मनोवृत्ति जागृत करणें हा अगोदर गौणच प्रकार आहे. सत्यास चांगल्या वक्तृत्त्वाची मदत असावी हेंच अभिलषणीय आहे. मनोहर वक्तृत्व लेच्यापेच्या गोष्टीस पुष्टि देण्यास क्षणभर मदत करील, पण विचारी लोकांस तें पसंत पडणार नाहीं. निव्वळ असत्याच्या किंवा अल्पसत्य-विमिश्रित सत्याचा प्रसार करण्यास खर्ची पडणारें बुद्धिसामर्थ्य आणि वाक्पाटव हें समाजाच्या चिरंतन हिताच्या दृष्टीनें पाहतां अगदीं अभिनंदनीय नाहीं सैतानाचा मोहकपणा निसंतानाचा व पूर्ण विध्वंसाचा सरळ व जवळचः मार्ग होय.

२. रा. रा. टिळक पहिल्या प्रतीचे गणिती आहेत. त्यांना दोहों बाजूच्या समतोलपणाचें महत्त्व कळलें पाहिजे. समतोल नाहीं ती वस्तु खालीं पडलीच पाहिजे. पक्षपात म्हणजे तरी एका बाजूस पडणें. हा अलंकार ज्या सृष्टिदर्शना-पासून घेतला आहे त्याचाच विचार करूं पाहतां समतोल लेख चांगला असें ठरत नाहीं काय? खुद्द मेकॉले दोहों पक्षांचा विचार करून समतोलपणानें लिहिणाराचे गोडवेच गाणार यांत शंका नाहीं.

३. दुसऱ्याचें मन न दुखवितां सत्य सांगणें अगदीं अशक्य आहे काय? ज्या भगवद्गीतेचा उपदेश रा. रा. टिळक सद्बुद्धीनें अनेकशः करीत असतात त्या गीतेंतील—

> अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्।
> स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते॥

याचा अर्थ काय? राक्षसी वाणीचा त्याग करून सूनृता वाणीचा उपयोग करण्यास भवभूति सांगतो तें विसरावें काय?

४. दरबारी भाषण म्हणजे नागरिक, सभ्य किंवा अदबीचें असेंच भाषण समजावयाचें कीं नाहीं? कीं दरबारी म्हणजे 'संतांस जो निंदी। अधम लोभा-साठीं वंदी' अशांचें भाषण!

५. किरातार्जुनीयांपैकीं जो श्लोक विद्वान् लेखकांनीं आपल्या म्हणण्या-च्या पुष्ट्यर्थ पुढें आणला आहे, तोहि तसाच आहे. 'अमर्षशून्य' म्हणजे अक्षमाहीन किंवा क्षमाशील असणें हा मोठा गुण आहे; परंतु त्या स्थलीं दुर्गुण म्हणून दाखविला आहे व तें म्हणणें नीट नाहीं असें पुढें धर्मराजाच्या उत्तरा-

वरून सिद्ध होणार. जो लोकांस अपराधाची क्षमा करणार नाहीं, योग्य काल आला आहे किंवा नाहीं हें न पाहतां शत्रूवर तुटून पडेल तो यशःसिद्धि पावणार नाहीं, असें या वाक्याच्या खंडनाचें तात्पर्य आहे. हें वाक्य आधार देणें म्हणजे कायदेबाज वकिलानें पुढें फिरलेला निकाल आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ देण्या-प्रमाणें आहे. न्यायाधीश विचारी व उलट पक्षाचा वकील तरतरीत असला म्हणजे असा कोटिक्रम गळ्यांत येतो हें रा. रा. टिळकांसारख्या कायदे पंडितास समजावून सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

६. प्रस्तुतकालीं आपल्या समाजास समतोलपणाचें, दुसऱ्याचें मन न दुखेल असें व दरबारी पद्धतीचेंच भाषण उपयुक्त आहे. गर्भस्वतंत्र म्हणजे 'फ्रीबॉर्न' लोकांनीं जशी भाषा वापरली तर खपेल, तशी उपयोजिण्याची स्थिति आज आम्हां हिंदु लोकांची नाहीं हें शांत विचारानें कळून येईल. म्हणून अप्रिय सत्य होतां होईल तो गोड करून बोलण्याचा उपदेश सद्वर्तन प्रसारक मंडळीच्या व्यासपीठावरून होत असावा, असें आमच्या अल्पमतीला वाटतें. आवेशानें लिहिण्यास व स्वपक्षसमर्थनार्थ किंवा स्वमतविजयार्थ निव्वळ सत्य प्रसंगोपात्त झुगारून देण्यास उपदेशाची जरूर नाहीं. मनुष्याची सहजप्रवृत्ति तशी असते. तिला थोडा आळाच घातला पाहिजे.

आमच्या मतें शास्त्रीबोवांचे बहुतेक लेख समतोलपणाचे, दुसऱ्याचें मन न दुखेल असेच आहेत. या सामान्य नियमास अपवादभूत असलेल्या लेखाची तरफदारी करण्यांत अर्थ नाहीं. सर्व वंद्य व अनुकरणीय भागांचा गौरव करून, बाकीच्यांविषयीं फारतर मूकभाव धरावा हेंच बरें.

• • •

# १३. प्रास्ताविक

[ 'विश्ववृत्त', एप्रिल १९०६ ]

पूर्वीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें 'विश्ववृत्त' मासिकपुस्तकाचा हा पहिला अंक आहे. हल्लींच्या रोगराईच्या दिवसांत हें काम आम्हीं हातीं घेतलें आहे. तेव्हां नियमितपणानें आमच्या व वाचकांच्या इच्छेनुरूप हें कार्य कसें पार पडतें ही काळजी आहे. प्रस्तुत कार्याचा व्याप आजवर चालविलेल्या कामाहून निराळा आहे. पहिल्या अंकावरूनच सर्व पुढील कार्याची पूर्ण कल्पना येणें शक्य नाहीं, फक्त दिशा समजेल. हें काम एकाचें नाहीं हें उघड आहे. यामुळें अमक्याच प्रकारचे विचार यांत येतील असें सांगणें कठीण आहे. त्याचप्रमाणें निबंधांची संख्या मर्यादित करतां येईल असेंहि वाटत नाहीं. स्थूलमानानें तूर्त १०० पृष्ठांत बसतील तितके स्वतंत्र निबंध येतील. याच पुस्तकांत हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणीं महिन्यांत प्रसिद्ध होणाऱ्या मासिकपुस्तकांतील प्रमुख लेखांचा सारांश द्यावा असें आमच्या मनांत होतें. तशी कित्येक हितचिंतकांची सूचनाहि होती. परंतु याला निरनिराळया भाषा जाणणाऱ्या सद्गृहस्थांचें साहाय्य पाहिजे. तसें मिळविण्याचा यत्न केला, परंतु सफल झाला नाहीं. बाजारभावाप्रमाणें निरख देऊन हें काम करून घेतां येण्यास तूर्त द्रव्यानुकूल्य नाहीं, म्हणून हा विचार सोडून दिला आहे. इंग्रजींत प्रसिद्ध होणाऱ्या मासिकपुस्तकांतील प्रमुख विषय इकडील वर्तमानपत्रांत येऊन जातात. त्यांतून जे विशेष महत्त्वाचे असतील त्यांच्यावर टीकारूप स्वतंत्र निबंध कोणी तरी याच पुस्तकांत लिहिण्याचा संभव आहे. प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य हेतु प्रचलित विषयावर लोकमत तयार करावें हा तर आहेच, शिवाय आपल्या लोकांना ज्या ज्या विषयांच्या चर्चेपासून नैतिक व सांपत्तिक उत्कर्षाचा मार्ग स्पष्ट होण्याजोगा आहे असे कायम महत्त्वाचे विषयहि घेतले जातील. ऐतिहासिक व शास्त्रीय विषयांची माहिती व चर्चा यांचा समावेश केला जाईल. सामाजिक, वाङ्मयिक व शैक्षणिक विषयांवर तात्त्विक निबंध येतील. प्रवासवर्णन व त्यापासून मिळणाऱ्या बोधाच्या गोष्टीस या पुस्तकांत स्थळ दिलें जाईल. व्यापारीय, औद्योगिक व राजकीय या विषयांवर निबंध लिहिणारांनीं मोठ्या काळजीनें व जबाबदारी ओळखून लिहिलेल्या लेखांची आमच्या पुस्तकास विशेष जरूर आहे. आजपर्यंत केलेलीच प्रार्थना

खाजगी पत्रद्वारां तर करीत आहोंच, तिची येथेंहि पुनरुक्ति करतों. पदवीधरांपैकीं ज्यांनीं आपल्या परीक्षाक्रमाचा शेवट लावून व्यवसाय पत्करून आपल्या चरित्रास स्थिरता आणली आहे, अशांनीं आपल्या उद्योगांतून वेळेंत वेळ काढून सालीना सुमारें १६ पृष्ठांचे एक दोन निबंध लिहावे. उभ्या वर्षांत ३०।३२ पृष्ठें लिहिण्यास विनंती केली तरी शेंकडा ५ असामींची होय किंवा नाहीं अशीं उत्तरें येत नाहींत. मुग्धता म्हणजे समंति समजूनच आम्ही चालतों; परंतु अशा स्थितींत हें काम जरूर पडल्यास ठराविक पांचचार असामींत पार पाडण्याचा निश्चय करून या कार्यास हात घातला आहे. एवढ्या प्रमाणावर अशा प्रकारचें कार्य मराठींत पहिलेंच आहे. जितकें विविधत्व येईल तितकें राष्ट्रांतील प्रगमक विचारांचें प्रतिबिंब या पुस्तकांत येईल म्हणून ही प्रार्थना केली आहे. सर्व सुशिक्षित मंडळीचा दास किंवा स्वयंनियुक्त प्रतिनिधि समजून हें जोखमीचें कार्य अंगावर घेतलें आहे.

याचा अभिमान व याची लाज त्यांनाच असली पाहिजे.

**अहो देवराया तुम्ही शक्ति द्यावी**
**निमित्तेंचिमात्रें क्रिया ही घडावी ।**
**अशा भावनेचें असो साधुवृत्त**
**जनांचे कृपापात्र हो ‘ विश्ववृत्त ’॥**

· २ ·

**सालअखेर :**

विश्ववृत्ताचा हा १२ वा अंक वाचकांच्या हातीं पडत आहे. हा मार्च महिन्याचा अंक असून जूनच्या अखेरीस प्रसिद्ध होत आहे; अशाच प्रकारें मागील कांहीं अंकहि उशिरां निघाले, याबद्दल ग्राहकांनीं क्षमा करावी अशी प्रार्थना आहे. वेळच्या वेळीं काम करण्यास जितकी फुरसत पाहिजे होती तितकी मिळाली नाहीं. समर्थविद्यालयांतील शिक्षक रा. रा. वामनराव जोशी यांच्या साहाय्यानें किंबहुना त्यांच्याच देखरेखीखालीं होणाऱ्या व्यवस्थेनें पुढच्या सालचे अंक नियमित वेळीं निघतील अशी उमेद आहे. महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळाच्या कार्याची जुळवाजुळव करण्यांत दुसरीं कामें निभणें कठीण आहे. यासाठीं नवीन उत्साहशाली कार्यकर्त्यांची मदत घेणें अवश्य आहे. मासिकपुस्तकाची पृष्ठसंख्या

तीच म्हणजे १०० ठेवून त्यांतील विषयांची वांटणी कांहीं निराळी करून वाचकांस तें अधिक मोहक व बोधक करण्याचा यत्न होईल. इंग्रजी व दुसऱ्या भाषेंतील कांहीं मासिकपुस्तकें व प्रमुख वर्तमानपत्रें यांचे विचार व धोरण देऊन जरूर तेव्हां त्यांचें पर्यालोचन केलें जाईल. महिन्यांत एकंदरीनें आपल्या राष्ट्राचें पाऊल पुढें किंवा मागें किती पडलें याचा घडलेल्या गोष्टींचा विहंगम-दृष्ट्या विचार करून एक लेख लिहिला जाईल. नवीन प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या परीक्षणाकडे कांहीं भाग दिला जाईल. लहान स्फुट लेखाच्या रूपानें महिन्यांतील खंडशः इतिवृत्त लिहिण्याचा संकल्प केला आहे. लोकांत अत्यंत महत्त्वाचा म्हणून एखाद्या विषयाचा खल चालला असला तर त्यावर अनेक देशभक्तांचे अभिप्राय प्रकट केले जातील. ही सूचना खुद्द श्री. सयाजीराव गायकवाड सरकार यांनीं केली आहे. अशा प्रकारें एकाच विषयावर नव्हे तर एकाच पुस्तकावरसुद्धां अनेक तज्ज्ञांचे अभिप्राय प्रकट करण्याची चाल युरोपियन मासिकपुस्तकांची आहे. 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज'च्या पद्धतीनें 'कॅरेक्टर स्केच' म्हणजे लोकांच्या पुढें असलेल्या एखाद्या प्रमुख स्त्री किंवा पुरुषासंबंधानें 'चरित्र-बोध' म्हणून लेख लिहिण्याचा विचार आहे. हल्लीं येतात त्याप्रमाणें निबंधहि येतीलच. होतां होईलतों एक निबंध फारतर १६ पृष्ठांत आटपावा अशाबद्दल खबरदारी घेऊन लेखांत बराच विविधपणा आणण्याचा यत्न होईल. अशा प्रकारचें निव्वळ निबंधांचें एखादें पुस्तक (मासिक) मराठींत चालेल कीं नाहीं हा अनुभव घेण्याचा विचार आम्ही बहुत दिवस करीत होतों, हें ग्रंथमालेच्या वाचकांस माहीत आहेच. गतवर्षीं या कार्यास हात घातला त्या वेळीं आमचे पदवीधर मित्र एखाद्या विषयाचें अध्ययन करून निबंध लिहून साहाय्य करतील असें वाटलें होतें, परंतु ती आशा विशेष सफल झाली नाहीं. येत्या सालीं ह्या मंडळींचीं मदत अधिक होईल अशी आशा प्रकट करून हा साल-अखेरचा लेख संपवितों.

• • •

# १४. मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा

[ ' विश्ववृत्त ', मे १९०६ ]

चालू महिन्यांत 'मराठी ग्रंथकारांचें संमेलन' व्हावयाचें ठरून त्या महत्त्वाच्या प्रसंगीं ज्या अनेक गोष्टींची चर्चा व्हावयाची आहे, त्यांत 'मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा व ग्रंथकर्तृत्वास येणाऱ्या अडचणी व त्या दूर करण्याचा उपाय' हा विषय ठेवला आहे. या विषयाचे निरनिराळे तीन भाग आहेत, त्यांपैकीं पहिल्याचाच अगोदर विचार होणें रास्त आहे. आपणांस कोणत्या दिशेनें जावयाचें आहे हें प्रथम निश्चित झाल्यावर मग त्या दिशेनें जाण्यास कोणकोणच्या सवलती व सवडी आहेत व नवीन मिळण्याजोग्या आहेत किंवा कोणत्या अडचणी उत्पन्न होण्याचा संभव आहे अथवा अगोदरच येऊन त्या पडल्या आहेत त्याचा विचार करणें ठीक पडेल.

'मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा' हा विषय एका अर्थीं म्हटला तर वाङ्मयात्मक आहे म्हटला तर सामाजिक व राजकीय आहे. राष्ट्रोत्कर्ष व राष्ट्रापकर्ष या गोष्टी ज्यांच्या मनांत रात्रंदिवस घोळत असतील त्यांना कांहीं ठराविक अपेक्षा व आकांक्षा असतात. सामान्यतः खिलाडू मुलास तुला अमक्या अमक्या ठिकाणीं मौज पाहावयास न्यावयाचें आहे म्हणून सांगितलें तर तें देखील आपल्यापरीं मोठा विचार करून कोणच्या जिनसा बरोबर घ्यावयाच्या व त्यांपैकीं कोणच्या आपल्याजवळ पूर्वींच आहेत व कोणच्या नवीन संपादन केल्या पाहिजेत याचा विचार करींत असते. वडील माणसें त्यास उपदेशहि करून ठेवतात, तोहि लक्षांत घेण्याजोगा आहे. 'मुला, आपल्या बरोबर अमके जण येणार आहेत त्यांच्याशीं किंवा त्यांच्या देखत जसें वागशील, त्याप्रमाणें तुला व आम्हांला बरें-वाईट म्हणतील'. राष्ट्र हें एका दृष्टीनें पाहिलें असतां पुढारी लोकांना मूलच आहे म्हटलें तरी चालेल. प्रत्येक राष्ट्रांत विचार करणारा वर्ग लहान असतो. मोठा जनसमूह म्हणजे लोकांचें पाहून किंवा वाडवडील वागत आले तसें करणारा असतो. सर्व मानवप्राण्यास सामान्य बुद्धि परमेश्वरानें दिलेली असते. परंतु तिला संस्कारविशेष झाले नसल्याकारणानें तिची मजल साध्या नित्याच्या साक्षात् व तात्कालिक गोष्टींपलीकडे जात नाहीं. त्या गोष्टींची माहिती करून

तीच म्हणजे १०० ठेवून त्यांतील विषयांची वांटणी कांहीं निराळी करून वाचकांस तें अधिक मोहक व बोधक करण्याचा यत्न होईल. इंग्रजी व दुसऱ्या भाषेंतील कांहीं मासिकपुस्तकें व प्रमुख वर्तमानपत्रें यांचे विचार व धोरण देऊन जरूर तेव्हां त्यांचें पर्यालोचन केलें जाईल. महिन्यांत एकंदरीनें आपल्या राष्ट्राचें पाऊल पुढें किंवा मागें किती पडलें याचा घडलेल्या गोष्टींचा विहंगम-दृष्ट्या विचार करून एक लेख लिहिला जाईल. नवीन प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या परीक्षणाकडे कांहीं भाग दिला जाईल. लहान स्फुट लेखाच्या रूपानें महिन्यांतील खंडशः इतिवृत्त लिहिण्याचा संकल्प केला आहे. लोकांत अत्यंत महत्त्वाचा म्हणून एखाद्या विषयाचा खल चालला असला तर त्यावर अनेक देशभक्तांचे अभिप्राय प्रकट केले जातील. ही सूचना खुद्द श्री. सयाजीराव गायकवाड सरकार यांनीं केली आहे. अशा प्रकारें एकाच विषयावर नव्हे तर एकाच पुस्तकावरसुद्धां अनेक तज्ज्ञांचे अभिप्राय प्रकट करण्याची चाल युरोपियन मासिकपुस्तकांची आहे. 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज'च्या पद्धतीनें 'कॅरेक्टर स्केच' म्हणजे लोकांच्या पुढें असलेल्या एखाद्या प्रमुख स्त्री किंवा पुरुषासंबंधानें 'चरित्र-बोध' म्हणून लेख लिहिण्याचा विचार आहे. हल्लीं येतात त्याप्रमाणें निबंधहि येतीलच. होतां होईलतों एक निबंध फारतर १६ पृष्ठांत आटपावा अशाबद्दल खबरदारी घेऊन लेखांत बराच विविधपणा आणण्याचा यत्न होईल. अशा प्रकारचें निव्वळ निबंधांचें एखादें पुस्तक (मासिक) मराठींत चालेल कीं नाहीं हा अनुभव घेण्याचा विचार आम्ही बहुत दिवस करीत होतों, हें ग्रंथमालेच्या वाचकांस माहीत आहेच. गतवर्षीं या कार्यास हात घातला त्या वेळीं आमचे पदवीधर मित्र एखाद्या विषयाचें अध्ययन करून निबंध लिहून साहाय्य करतील असें वाटलें होतें, परंतु ती आशा विशेष सफल झाली नाहीं. येत्या सालीं ह्या मंडळीची मदत अधिक होईल अशी आशा प्रकट करून हा साल-अखेरचा लेख संपवितों.

• • •

# १४. मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा

[ 'विश्ववृत्त ', मे १९०६ ]

चालू महिन्यांत 'मराठी ग्रंथकारांचें संमेलन' व्हावयाचें ठरून त्या महत्त्वाच्या प्रसंगीं ज्या अनेक गोष्टींची चर्चा व्हावयाची आहे, त्यांत 'मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा व ग्रंथकर्तृत्वास येणाऱ्या अडचणी व त्या दूर करण्याचा उपाय' हा विषय ठेवला आहे. या विषयाचे निरनिराळे तीन भाग आहेत, त्यांपैकीं पहिल्याचाच अगोदर विचार होणें रास्त आहे. आपणांस कोणत्या दिशेनें जावयाचें आहे हें प्रथम निश्चित झाल्यावर मग त्या दिशेनें जाण्यास कोणकोणच्या सवलती व सवडी आहेत व नवीन मिळण्याजोग्या आहेत किंवा कोणत्या अडचणी उत्पन्न होण्याचा संभव आहे अथवा अगोदरच येऊन त्या पडल्या आहेत त्याचा विचार करणें ठीक पडेल.

'मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा' हा विषय एका अर्थीं म्हटला तर वाङ्मयात्मक आहे म्हटला तर सामाजिक व राजकीय आहे. राष्ट्रोत्कर्ष व राष्ट्रापकर्ष या गोष्टी ज्यांच्या मनांत रात्रंदिवस घोळत असतील त्यांना कांहीं ठराविक अपेक्षा व आकांक्षा असतात. सामान्यतः खिलाडू मुलास तुला अमक्या अमक्या ठिकाणीं मौज पाहावयास न्यावयाचें आहे म्हणून सांगितलें तर तें देखील आपल्यापरीं मोठा विचार करून कोणच्या जिनसा बरोबर घ्यावयाच्या व त्यांपैकीं कोणच्या आपल्याजवळ पूर्वींच आहेत व कोणच्या नवीन संपादन केल्या पाहिजेत याचा विचार करीत असते. वडील माणसें त्यास उपदेशहि करून ठेवतात, तोहि लक्षांत घेण्याजोगा आहे. 'मुला, आपल्या बरोबर अमके जण येणार आहेत त्यांच्याशीं किंवा त्यांच्या देखत जसें वागशील, त्याप्रमाणें तुला व आम्हांला बरें-वाईट म्हणतील'. राष्ट्र हें एका दृष्टीनें पाहिलें असतां पुढारी लोकांना मूलच आहे म्हटलें तरी चालेल. प्रत्येक राष्ट्रांत विचार करणारा वर्ग लहान असतो. मोठा जनसमूह म्हणजे लोकांचें पाहून किंवा वाडवडील वागत आले तसें करणारा असतो. सर्व मानवप्राण्यास सामान्य बुद्धि परमेश्वरानें दिलेली असते. परंतु तिला संस्कारविशेष झाले नसल्याकारणानें तिची मजल साध्या नित्याच्या साक्षात् व तात्कालिक गोष्टींपलीकडे जात नाहीं. त्या गोष्टींची माहिती करून

देऊन त्यांच्यापासून लाभ कसा करून घेतला पाहिजे हें समाजास समजावून देण्याचें काम विचारीवर्गाचें आहे. यावरून विचारीवर्गावर केवढी जबावदारी येते याची कल्पना येते.

ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा ठरविणें म्हणजे लॉर्ड बेकननें केलेलें काम करण्याप्रमाणें आहे. आजवर आपल्या भाषेंत कोणकोणच्या विषयांवर किती व कोणच्या योग्यतेचे ग्रंथ झाले आहेत याचें पर्यवेक्षण करून पुढें इतर राष्ट्रांच्या मानानें आपणांस कोणच्या ज्ञानाची कमताई आहे व ती भरून काढण्यासाठीं कोणते उपाय योजिले पाहिजेत हा व्यापक विचार करण्यास जीं साधनें व जो वेळ पाहिजे आहे, तीं साधनें व तो वेळ नसल्यानें विद्याभिवृद्धीच्या योग्यतेचा ग्रंथ आमच्या हातून निर्माण होणें शक्य नाहीं. लॉर्ड बेकनची बुद्धि व व्यासंग हीं तर आमच्यामध्यें नाहींतच, पण नुसता मराठीचा ग्रंथसंग्रह आमच्याजवळ नसल्यानें बहुतेक कामें स्मरणशक्तीवरच भागविणें प्राप्त आहे. बराच ग्रंथसंग्रह पूर्वीं पाहण्यास मिळाला असल्यानें त्यावरून सुचणारीं अनुमानें चुकीचीं होतील असें मात्र वाटत नाहीं.

मराठी भाषेंत ग्रंथ करावयाचे कशासाठीं हा पहिला प्रश्न आहे. ग्रंथ करावयाचे ते लोकांनीं वाचावेत म्हणून, परंतु आमच्या लोकांची स्थिति अशी आहे कीं, ज्यांना वाचनाची निव्वळ निष्काम अभिरुचि आहे असे लोक फार थोडे. पदवीधर लोक खाजगी धंद्यांत किंवा नोकरींत शिरल्यावर सामान्य वाङ्मयाचे ग्रंथ क्वचितच वाचतात. वर्तमानपत्रें म्हणजे बहुशः इंग्रजांनीं चालविलेलीं रोजचीं पत्रें व कांहीं इंग्रजी कादंबऱ्या यांशिवाय त्यांचें फारसें वाचन असतच नाहीं. मराठींत तयार झालेल्या ग्रंथाबद्दल त्यांचा प्रायः तिरस्कार नसला तरी अनादर असतो. इंग्रजी भाषेच्याद्वारां आपण ज्या गोष्टी शिकलों त्या आपल्या देशबांधवांस कळून त्यांतील सुविचारांचा फैलाव समाजांत व्हावा हें तात्त्विकरीत्या ते कबूल करतात; परंतु त्यांच्यापैकीं फारच थोडे लोक या कामास स्वतःला वाहून घेण्यास तयार असतात. तितकें केलें नाहीं तर वर्षांतून पांचपंचवीस पृष्टें आपण लिहून काढावींत या बुद्धीनें कांहीं मननपूर्वक वाचन करावें अशीसुद्धां बुद्धि क्वचितच होते. त्यांतल्यात्यांत जरा समाधानाची गोष्ट ही आहे कीं, अलीकडे कांहीं लोकांचें लक्ष या विषयाकडे थोडें अधिक लागलें आहे. पुढील काळीं हें प्रमाण वाढत जाणार आहे अशीं चिन्हें आहेत व याबद्दल समाधान वाटणें साहजिक आहे. अशी आशा नसती तर आज ज्या विषयावर

प्रस्तुत लेख लिहिण्यास आम्ही प्रवृत्त झालों आहों तो विषय हातीं घेण्यापर्यंत मजल आलीच नसती. पदवीधरांच्या औदासीन्यांत म्हणण्याजोगा फेरफार झाला आहे असें नाहीं. परंतु त्यांच्याजवळ आज ही मराठी वाङ्मयाची गोष्ट काढली तर पूर्वीप्रमाणें नाकें मुरडून पूर्ण धिक्कार प्रकट करीत नाहींत. आम्हां अल्पसंतुष्टांस तेवढें सुद्धां तूर्त पुरें आहे. पुढचा पाय आहे यांत आनंद आहे. लहानपणापासून मराठी भाषेंतील प्रासादिक ग्रंथांकडे आपलें लक्ष वेधणारा कोणी गुरु भेटला नाहीं हें आपलें दुर्दैव आहे असें म्हणणारे मामलेदार, मुनसफ आढळतात. तेव्हां पुढील पिढीला जुन्या पिढीहून कांहीं निराळें वळण खचित लागेल असा भरंवसा वाटत आहे. अशा स्थितींत ग्रंथकारांनीं चांगले गुण प्रकट केले तर त्यांचें चीज होईल. एका प्रसिद्ध व अनुभविक ग्रंथकारानें आमच्याजवळ असे उद्गार काढले कीं 'आतां मराठी वाचकांनीं चारसहा आण्यांपर्यंतच्या किंमतीचीं पुस्तकें विकत घेऊन वाचण्याइतकी भूक वाढली आहे. याहून अधिक पुस्तकें फार खपत नाहींत' असा त्यांचा अभिप्राय आहे.

सामान्य लोकांच्या करमणुकीसाठीं किंवा शिक्षणासाठीं पुस्तकें लिहावयाचीं हा हेतूच काय तो मुख्यत्वेंकरून मराठी ग्रंथकारापुढें आहे. इतर देशभाषांचीहि गोष्ट तीच आहे. शिक्षणासाठीं पुस्तकें लिहिलेलीं असतात, त्यांना उत्तेजन अति थोडें मिळतें, म्हणजे ग्रंथकाराचा पुस्तकछपाईचा खर्च देखील भागत नाहीं. तेव्हां या कामीं ग्रंथकर्तृत्वाची दिशा केवळ निर्लोभतेची नव्हे तर स्वार्थत्यागाचीच पाहिजे. अर्थात् हें म्हणणें द्रव्य दृष्टीनेंच आहे. बाकी ग्रंथ करण्यासाठीं जो बुद्धीचा व श्रमाचा व्यय होतो त्याचा आत्मसुधारणेच्या रूपानें मोबदला मिळतोच. पण लक्ष्मीपूजनाच्या दिवसांत केवळ सरस्वतीचा वरदहस्त आपल्या मस्तकावर असावा एवढी इच्छा बाळगणारे थोडे, म्हणून थोड्यांवरच हें लोकशिक्षणाचें काम पडत आहे. कायम महत्त्वाच्या ग्रंथाची रचना सरकारी नोकरींत असलेल्या लोकांनीं आस्ते आस्ते केली तर बरेंच कार्य होईल. हल्लींच्या दिवसांत सरकारी नोकरांवर हरएक प्रकारें सरकारची करडी नजर असल्यानें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार लोकांत व्हावा या हेतूनें फावल्या वेळीं शास्त्रीय विषयांचें अध्ययन करून लहानमोठीं पुस्तकें लिहिल्यास लोकांना मोठा उपयोग होणार आहे. खेड्यापाड्यांत व्याख्यानें देऊन व शास्त्रीय प्रयोग दाखवून अगदीं सुगम लेख कसा वठतो हें पाहून मग पुस्तकें लिहिण्याच्या कामास हात घातला तर त्या पुस्तकांची योग्यताहि वाढेल. काव्य, नाटक, कादंबरी व कल्पित गोष्टी यांचा राष्ट्रीय शील बनविण्यास फार उपयोग होतो. जो उपदेश, नुसता सांगितला

असता कंटाळवाणा वाटतो तो या रूपामध्यें लोकांपुढें आल्यास नकळत त्यांच्या हृदयांत उतरतो. नीतीचीं निराळीं पुस्तकें शाळांमध्यें लावावींत असा कित्येकांचा आग्रह असतो, परंतु त्या मताविरुद्ध पुष्कळ लोक आपला अभिप्राय देतात, याचें कारण तरी हेंच. रामायण किंवा महाभारत वाचीत असतां आपणांस अत्युतम नीत्युपदेश मिळतो. वर्गांत गुरूनें किंवा घरीं आईबापांनीं अथवा इतर श्रेष्ठांनीं असें वागल्यापासून असें होतें म्हणून धडधडीत शिक्षण दिलें म्हणजे याचा उपयोग होत नाहीं असें कोण म्हणेल? पण त्या सर्व प्रसंगीं आपण कमी आहों, आपल्यास कोणी शिकवीत आहे, आपणांस कमी प्रतीचें, जात्या वाईट चालीचें, निदान शिकविल्याशिवाय कांहीं कळण्याचा संभव नाहीं, असें मानून कोणीतरी बुद्धिपुरःसर पढवीत आहे असा मनावर ग्रह असतो. तसा प्रकार काव्य, कादंबरी आदिकरून वाङ्मयांत बिलकूल असत नाहीं. यामुळें नीतिशिक्षण सहज होऊन लहानास काय व थोरास काय, बहुत फायदा होतो. मारून मुटकून आपणांस अमक्या प्रकारचे बनविण्याचा यत्न चालला आहे, हा ग्रह मनावर अगदीं नसल्यानें आपले आपण शिक्षक बनतों व तेंसुद्धां आपल्यास कळून येत नाहीं. आपण कांहीं नवीन शिकत आहों, आपल्यास कांहीं शिक्षण मिळत आहे असेंसुद्धां न वाटतां नवीन विचार मनांत भरत जातात. ग्रंथकार साध्या गोष्टी लिहून जातो व आपण त्यापासून जो बोध घेतों तो आपणांस त्यानें कांहीं दिला नाहीं तर आपणांस सहज झाला किंवा आपण काढला असें वाटून एक प्रकारें स्वतःच्या बुद्धीची प्रौढी मिरवीत आपण अधिकाधिक शहाणे होतों, हा या तऱ्हेच्या वाङ्मयापासून मोठा फायदा आहे. मनोरंजन होतां होतां सहजासहजीं उपदेश देणें व एखाद्या गोष्टीबद्दल आवेश, आदर, अभिमान, तिरस्कार उत्पन्न करावयाचा असल्यास या प्रकारचें वाङ्मय वृद्धिंगत झालें पाहिजे. आम्हांमध्यें या प्रकारचे प्रयत्न बरे चालले आहेत व ही गोष्ट अभिनंदन करण्याजोगी आहे. प्रचलित राजकीय व सामाजिक व औद्योगिक चळवळींचें मर्म दाखविणारी या शाखांतील पुस्तकें समाजांतील अत्यंत मोठ्या भागावर परिणाम करतील म्हणून परमेश्वरकृपेनें ज्यांना प्रतिभा असेल त्यांनीं या मार्गाचा अवलंब करावा.

या वाचनापासून फायदा होण्याचा संभव असतो, तितकाच हें चांगल्या रीतीनें म्हणजे मननपूर्वक झालें नाहीं तर नुकसान होतें. ओढ्याचें पाणी जसें लवकर येतें तसें लवकरच जातें. त्याप्रमाणें ज्ञानापेक्षां ध्यानाची योग्यता अधिक आहे हें लक्षांत वागवून एकंदरीनें यापासून काय बोध घ्यावा व पुस्तक वाचण्याचे

पूर्वी आपण कसे होतों व आतां आपल्यांत नवीन काय आलें आहे याबद्दल थोडासादेखील विचार न करतां, एक पुस्तक वाचून झाल्यावर दुसरें घ्यावयाचें, असा प्रकार होण्याचा संभव असतो. स्त्रीपुरुषांच्या ठेवणीचें, स्वभावाचें, रीती-भातीचें व मनोरचनेचें वर्णन केलेलें असतें त्याकडे दुर्लक्ष करून कथानकावरच नजर ठेवून अशीं पुस्तकें वाचणारे लोक फार असतात, यामुळें अशा वाचनाचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. गोष्टीच्या मोहकपणामुळें पुढें काय झालें इकडे सर्व लक्ष लागल्यानें लोक पानें भराभर उलटून टाकतात व हीच संवय किंवा खोड लागली म्हणजे शहाणपणा मिळविण्याचें बाजूसच राहतें व गोष्टी वाचाव्या हाच नाद लागतो. त्यासाठीं पुस्तकावर पुस्तकें वाचून सोडण्याचा छंद लागतो, तो इतका कीं जुगारी व व्यभिचारी लोक जागरणें करतात त्याप्रमाणें पापणीला पापणी न लावतां रात्रीच्या रात्री या वाचनव्यसनांत काढण्याची खोड माणसाच्या अंगीं खिळून राहते. करमणुकीचा अतिरेक होऊन बोध बाजूस राहतो. त्यांत चित्तविक्षेप होऊन विषयी व विलासी लोकांस ज्या तऱ्हेचीं वर्णनें स्वाभाविक-रीत्या रुचतात तसलीं प्रकरणें रचण्याकडे वित्तदृष्टि ग्रंथकारांचें लक्ष लागतें. म्हणून राष्ट्राचें हित न होतां तरुण स्त्रीपुरुषांस जातिस्वभावानुरूप विचार सुचून कुनीतिपथाच्या उतरणीवरून घसरत जाण्यास उशीर लागत नाहीं. अशा दुष्परिणामामुळें कित्येक वेळां चांगल्या चांगल्या पुस्तकांपासूनसुद्धां तरुणांस परावृत्त करणें प्राप्त आहे असें पालकांस व शिक्षकांस वाटूं लागतें. याबद्दल खबरदारी घेणें ग्रंथकाराकडे आहे. सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या व संपत्तीच्या महापुरांत यथेष्ट पोहणाऱ्या राष्ट्रास ज्या गोष्टी खपतील त्या आमच्यासारख्या मागासलेल्या व गरीब लोकांस उपयोगी नाहींत. आधीं वेळ थोडा, काळजी फार, पैसे मिळवावयाचे उद्योग राष्ट्रांत कितीतरी काढा-वयाचे, तेव्हां आम्हांस चैनीचे भोक्ते होण्याची सोय नाहीं, हें धोरण लक्षांत वागविणें जरूर आहे. राष्ट्ररचना करण्यास प्रस्तुत सद्‌उद्योगप्रवर्तक अभिमान उत्पन्न करणाऱ्या ग्रंथांची संख्या वाढावी अशी खबरदारी घेतली पाहिजे.

नाटकें व कादंबऱ्या यांजवर येणारा आक्षेप काव्यावर प्रायः येऊं शकत नाहीं. कितीहि झालें तरी काव्य वाचण्यास मनाची स्थिरता अधिक लागते, यामुळें त्यापासून मनाला बोध घेण्यास फुरसत सांपडते. संस्कृतांतील अमूप ग्रंथसंग्रहामुळें, आमच्या भाषेंत अनंत ग्रंथ प्रतिबिंबित झाले आहेत. सर्व प्रकारची काव्यसृष्टि मराठींत आहे. लहान चुटके लिहिण्याचा महाकवींना नाद नसतो. आमचे कवि संसारांतील हजार धंदे सांभाळून कवितादेवीची उपासना करणारे

नव्हते. प्रायः विरक्त असल्याकारणानें उपदेशपर व प्रपंचविमुख करणारे ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. इंग्रज लोक म्हणतात त्या सामान्य ' भाकर आणि लोणी ' बद्दल खटपट करण्याला कोणाला मुद्दाम शिकवावें लागत नाहीं. सर्व उपदेशाच्या गोष्टी पाहिजे आहेत त्या नित्य शत्रु अथवा सदासर्वदा ज्यांचें बिऱ्हाड आपल्या शरीरांत आहे त्यांना व अनित्य शत्रु म्हणजे रोग, परचक्र, दुष्ट लोक इत्यादि यांना जिंकून आपण शुद्ध व अलिप्त आहों तसेंच राहण्यासाठीं झटण्याबद्दलच सांगितल्या पाहिजेत. म्हणून विवेक, भक्ति व वैराग्य या विषयांचा निरनिराळ्या रूपांनीं अनेक ठिकाणीं आमच्यांतील ग्रंथकारांनीं उपदेश केला आहे. मूळ ' न हि सत्यात्परो धर्मः ' या उपदेशाला धरून व्यवहार व परमार्थ यांची साऱ्या पृथ्वीवर सांगड एखाद्या वाङ्मयानें घातली असली तर ती आमच्या संस्कृत भाषेंतील वाङ्मयानें घातली आहे. नीति व व्यवहार या संबंधांत बाहेरच्या जगाकडून आम्हीं कांहीं घेतलें नाहीं तरी आमचें बिलकुल अडणार नाहीं, आणि हल्लीं आम्ही शेंदीडशें वर्षे खालावत चाललों तरी अजूनहि दोन गोष्टी शिकविण्याची योग्यता आम्हांस आहे. असा उत्तम काव्यांचा सांठा आमच्या मराठींत आहे. संस्कृतांत जें आहे तें सर्व घेण्याचा यत्न कवि करीत आले आहेत, परंतु मराठी कवि केवळ निर्विवेक अनुकर्ते नाहींत. उसनें घेण्यांत कांहीं कमीपणा नाहीं, आपण उद्योगी व प्रामाणिक आहों व आपल्याजवळ भांडवलाची उणीव असली तर लोकांकडून कर्ज काढावें व आपला व्यापार थाटावा, पण धनकोच्या द्रव्यांत कांहीं भर घालावी, त्यास व्याज पोंचवून मुद्दलहि परत करावें. अशानें नवीन व्यापाऱ्याचें दुकान थाटांत उभें राहून त्यासहि जगांत मान मिळूं लागतो. अभंग, ओवी, लावणी, पोवाडा इत्यादि जागत्या वृत्तांनीं शृंगारून मराठी भाषेस गौरव आणणाऱ्या कविवर्यांचें कर्ज फेडणें आम्हां परवश पामरांच्या हातून होईल काय? संस्कृत काव्याची कास सोडून पाश्चात्त्य भाषेंतील ' लिरिक्स अँड सॉंग्स 'चीं अनुकरणें करण्यांत कोणताहि कमीपणा नाहीं. त्यायोगेंहि आपल्या कवितासंग्रहांत आधुनिक कवि भर घालीत आहेत ही गोष्ट अभिनंदनीय आहे, पण या कवींनासुद्धां आजकाल राष्ट्रजागृतीस उचित अशीच उमदी काव्यरचना करण्यास काव्यरत्नावलीच्या ताज्या अंकांत एका कवीनें प्रार्थिलें आहे तसेंच प्रार्थितों.

संघशक्तीनें करण्याजोगें एक कार्य आहे, तेंहि येथेंच ओघानें सांगणें योग्य आहे. पूर्वकवींच्या ऋणांतून मुक्त होण्यास त्यांच्या सर्व काव्यांच्या आवृत्ती व त्यांतील सर्व कठीण किंवा प्रचारबाह्य शब्दांचे कोश या दोन गोष्टींकडे काव्यप्रिय माणसांचें लक्ष लागलें पाहिजे. एकदा कार्य करण्याचीं तत्त्वें ठरविलीं

म्हणजे अनेक स्त्री-पुरुषांनीं हें काम वांटून घेतलें पाहिजे. आवृत्ति तयार करणें म्हणजे अनेक पोथ्यांवरून पाठ ठरविणें हें काम चांगल्या विद्वानांनींच हातीं घेतलें पाहिजे, पण शब्द काढण्याचें काम सामान्य व्यक्तींकडूनहि होईल. उदाहरणार्थ मोरोपंतांचीं काव्यें काव्यसंग्रहांतून प्रसिद्ध झालीं आहेत, यांतील शब्द काढून अक्षरविल्हेवारीनें जुळविण्याचें काम चार दोन मार्मिक लोक शेंपन्नास स्वयंसेवकांच्या साहाय्यानें एक वर्षाच्या आंत करूं शकतील. घरीं अभ्यास करणाऱ्या प्रौढ स्त्रिया व अनाथ बालिकाश्रमांतील विद्यार्थिनीहि इतर कॉलेजच्या विद्यार्थ्यांप्रमाणें या कामीं उपयोगी पडतील. एकच भाग दोघा-तिघांनीं घेतला म्हणजे नजरचुकीला फारशी जागा राहात नाहीं. ह्या काव्यांचें जितक्या मार्मिक रीतीनें अध्ययन झालें पाहिजे तितकें अद्यापि झालें नाहीं. त्यासाठीं वाङ्मयिक निबंध लिहून त्यावर चर्चा करण्यासाठीं ठिकठिकाणीं वाङ्मयिक सभा स्थापन झाल्या पाहिजेत. तेच निबंध ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाल्यास चांगला संग्रह होईल.

वर सांगितलेल्या कल्पनासृष्टींतील वाङ्मयप्रकाराच्या पुढें चरित्रांची पायरी आहे. इकडे आपल्या ग्रंथकारांचें अजून ज़ावें तितकें लक्ष गेलें नाहीं. पंधरा वर्षें शिवाजीचा उत्सव चालला असतां अजून त्यास चांगला चरित्रकार मिळाला नाहीं. इंग्रजींत ‘ बारा मुत्सद्दी, जगांतील कार्यकर्ते, तत्त्ववेत्ते, वाङ्मयवर्धक पुरुष, हिंदप्रशासक चरित्रमाला ’ अशा तऱ्हेचे ( आढळतात तसे ) व्यवस्थित प्रयत्न होणें जरूर आहे. कितीहि चांगले व थोर असले तरी नाटक, कादंबरी व काव्य यांतील नायकांविषयीं ते कांहीं खरोखर नव्हते हा ग्रह मावळूं शकत नाहीं. अतिमानुष चरित्रें सामान्य अडचणींत गुरफटून केलेल्या आम्हांस उपयोगी काय? असा प्रश्न साहजिक उद्भवतो, त्यास चरित्रें समर्पक उत्तरें देऊं शकतात. दुसरी गोष्ट इतिहासापासून मिळणाऱ्या शिक्षणाची प्राप्ति चरित्रापासून बरीच होते. कित्ये-कांच्या मतें चरित्रेंच इतिहासाचें ज्ञान अधिक करून देतात व जनांच्या मनावर,

**लोके गुरुत्वं विपरीततां वा**
**स्वचेष्टितान्येव नरं नयन्ति ।**

किंवा ‘ नर करणी करे तो नरका नारायण हो जाय ’ अथवा इंग्रज म्हणतात त्याप्रमाणें ‘ मदायत्तं तु पौरुषम् ’ या धोरणावरचें मनुष्यच आपल्या नशिबाचा कारागीर आहे इत्यादि वचनांची सत्यता बिंबवून सोडतात. यामुळें ज्यांना राष्ट्रांतील पुढील पिढीला वळण द्यावयाचें आहे त्यांनीं फार दीर्घ नाहीं, फार लघु नाहीं, अशा चरित्रांची माला निर्माण केली पाहिजे. विशेष श्रमाशिवाय लोकांस

जगाच्या इतिहासांतील घडामोडींची माहिती मिळवून देऊन त्यांस उत्साहपरिपूर्ण करणारे चरित्राशिवाय दुसरे ग्रंथ असूं शकत नाहींत, या गोष्टीकडे ग्रंथकारांनीं चांगलेंच लक्ष पुरविलें पाहिजे.

सामान्यजनांच्या शिक्षणास येथपर्यंत दर्शविलेले गद्य व पद्य वाङ्मय-प्रकार उपयोगी आहेत. परंतु राष्ट्रांतील उच्च प्रकारचे बुद्धिमान् लोक ज्यांच्याकडे राष्ट्राच्या कल्याणाची कामगिरी मुख्यतः असते म्हणजे जे लोकाग्रणी व्हावयाचे त्यांच्यासाठीं मेंदूला जरा त्रास होऊन तत्त्वचिंतनाची कटकट पडेल असे ग्रंथ उत्पन्न झाले पाहिजेत. त्यास व्यापक दृष्टीनें विचार करणारे विद्वान् लोकच पाहिजे आहेत. ज्यांनीं नानाप्रकारच्या जगाचा अनुभव घेतला आहे, निरनिराळ्या ठिकाणीं समाजरचना कशी आहे, लोकव्यवहाराचें धोरण कोठें कसें आहे, देशी-विदेशी लोकांचे आचार-विचार कोणत्या प्रमाणांत आपल्या लोकांच्या आचाराविचारांशीं मिळतात, त्यांचा त्या त्या समाजावर एकंदर परिणाम कसा झाला आहे हें सर्व ज्ञान मिळविलें आहे अशा प्रकारच्या अभियुक्त लोकांच्या हातून निर्माण होणारे ग्रंथ प्रायः परवश राष्ट्रांत दृष्टीस पडत नाहींत. राज्याधिकार भोगलेले किंवा अगदीं सूक्ष्मरीत्या तशा लोकांवर नजर ठेवून राहिलेले लोकच असे ग्रंथ रचूं शकतात. भीष्माचार्यांनीं व रामदासांनीं राजधर्मानुशासनाचा मक्ता घ्यावा; इतरांचें बोलणें-लिहिणें अंधारांत चांचपडण्याप्रमाणेंच समजलें पाहिजे. हल्लीं पाश्चात्त्य राष्ट्रांत स्वतः मुत्सद्दी नसलेल्या लोकांनीं राजनीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिले आहेत, परंतु तिकडे राज्यकारभाराचा विचार करणारे लोक अनेक असतात व त्यांच्या राज्यसंस्थाच अशा प्रकारच्या आहेत कीं, त्यांपैकीं पुष्कळांना राज्ययंत्रघटनेची व राज्ययंत्र चालनाची माहिती असते. सारांश, राष्ट्राची राजकीय प्रगति होऊन त्यास परावलंबी होण्याचा प्रसंग न यावा हा विचार ज्यांच्या मनांत घोळत असतो तेच लोक ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचे व राजनीतीचे ग्रंथ रचीत असतात. अशा प्रकारची व्यापक व दूरदर्शक नजर आमच्या ग्रंथकारवर्गाची झाली नाहीं. पांच वर्षांपूर्वीं एका कसलेल्या विद्वान् ग्रंथकारानें मला पत्र लिहून कळविलें कीं फ्रीमननें इंग्रजींत जसे ऐतिहासिक निबंध लिहिले आहेत तसे आपण मराठी भाषेंत लिहिणार आहों. परंतु संकल्पा-पलीकडे त्यांची मर्यादा गेली नाहीं. त्यांना अनेक नडी आल्या असतील. कदाचित् मराठी इतिहासावर अद्याप जितका प्रकाश पडावयास पाहिजे तितका पडला नाहीं ही गोष्ट ध्यानांत घेऊन आपला बेत बुद्धिपुरःसर तहकूब केला असेल; परंतु त्या विचाराबद्दल त्यांचें कौतुक करून आभार प्रदर्शित केले.

येथेंच ओघानें ऐतिहासिक कागदपत्रांच्या शोधाविषयींहि दोन शब्द लिहिणें वावगें नाहीं. पाश्चात्त्य राष्ट्रांत जीं कामें स्वतः हौसेनें करून, सरकार तीं करणारांस मदतहि करतें तीं कामें येथें एकस्या दुकस्यावर पडलीं आहेत हा सुद्धां परकीय अमलाचा परिणाम आहे. परंतु ज्या गोष्टी सरकार करणार नाहीं त्या गोष्टी आपण केल्या पाहिजेत अशी आम्हांमध्यें जागृति होत आहे हें स्वदेशी चळवळीवरून व्यक्त होत आहे. आयात मालावर कर बसवून देशाच्या मालाबरोबर त्याची किंमत करून टाकणें हें काम सरकारचें, पण आज इतक्या अट्टाहासानें तें आम्हांस करावें लागत आहे. राष्ट्राच्या इतिहासापासून अर्थात् ज्यांतील लोकांनीं मोठमोठे पराक्रम गाजविले आहेत व मोठ्या चातुर्यानें मुत्सद्दी-पणाचीं कामें केलीं आहेत अशा राष्ट्राच्या इतिहासापासून राजकीय शिक्षण मिळतें तें दुसऱ्या कशापासूनहि प्राप्त होण्याजोगें नाहीं; आणि हें राष्ट्राच्या इतिहासापासून लाभण्याजोगें असून त्याकडे डोळेझांक करून दुसऱ्याच्या इतिहासोदधीच्या आलोडनांत जन्माचे जन्म घालविण्यांत मोठा अविचार होत आहे. इतर देशांचे इतिहास नकोत असें नाहीं, पण आपल्या घरच्या साऱ्यांवर नजर असूं द्या. संस्कृतांत एक सुभाषित आहे, 'सिद्धमन्नं परित्यज्य भिक्षमटति दुर्मतिः ।' त्यांतला प्रकार होत आहे. परदेशीं नेलेलीं दप्तरें इकडे आणलीं पाहिजेत, खेडो-खेडीं असलेले जुने लेख मिळविले पाहिजेत, इतकें सर्व करून पुढें इतिहासरचना होणार, त्या कामास सर्व राष्ट्रांतील लोकांनीं साहाय्य केलें पाहिजे. परंतु ग्रंथ-कारांनीं मधूनमधून लोकांचें लक्ष वेधेल असे लेख इतिहासाच्या साधनांवरून लिहिले पाहिजेत.

राजनीतिशास्त्र व राजनीतिकला यांच्या अध्ययनास आजवर आमच्या राष्ट्रांत जी अलीकडे मदत झाली आहे ती सर्व इंग्रजी भाषेच्या द्वारांच झाली आहे आणि ती सरकारच्या नजरेस आपलीं गाऱ्हाणीं यावीं म्हणून लिहिलेल्या अर्जांच्या रूपानें व कांहीं स्वतंत्र लेखांच्या व भाषणांच्या रूपानें झाली आहे. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिक पुस्तकाचे अंक पाहिले असतां आम्ही म्हणतों त्याची प्रतीति येईल. राजकीय चळवळीबद्दल परिश्रम कसे करावे, माहिती कशी मिळवावी, लोकसंग्रह करून संघटना कशी करावी या गोष्टीस प्रारंभ केल्याचें स्पष्ट दिसत आहे. मराठींतून लोकांस ज्ञान देण्यासाठीं इंग्रजी पुस्तकांचें रूपां-तरहि कांहीं दिवस प्रसिद्ध होत होतें, परंतु त्याचा फैलाव विशेष झाला नाहीं. मराठी ग्रंथकारावर ही जबाबदारी महत्त्वाची आहे. राज्यांतील घटकावयव कोणकोणचे, परस्परांशीं त्यांचा संबंध काय, स्वराज्यांत कायदेकानू कसे करतात

पाळण्यांत येण्यासाठीं काय काय योजना असतात, लोकांतील चालीरीति व अनादि संप्रदायाचें राज्ययंत्रास साहाय्य किंवा विघ्न कितपत होतें, लोकशिक्षण, पोलीस, अबकारी, व्यापार, शेतकी इत्यादि खात्यांची यशस्वी सरकार कशी व्यवस्था लावतें हें शास्त्र व कलेचे उच्च प्रकारच्या शिक्षणाच्या व सरकारी कामाचा अनुभव घेतलेल्या कायदेपंडित ग्रंथकारांनीं करण्याजोगें काम आहे. गुलामगिरींत गुंतवून टाकल्यामुळें अनेक सुबुद्ध पदवीधरांचीं आयुष्यें फुकट गेलीं हें पाहून माझें अंत:करण तिळतिळ तुटतें. तितक्या बुद्धिसंपत्तीवर दरवडा पडला व राष्ट्रांतून ती नाहींशी झालीच असें म्हणावें. कॉलेजांत असतांना ज्याच्या बुद्धीचा प्रभाव पाहून गुरुजन व सहचारिगण थक्क होत असत, त्यांनीं ‘ ऑन् हिज मॅजेस्टीज सर्व्हिस ओन्ली ’ हा पाकिटावरील शेरा आपल्या हृत्पटलावर मारून घ्यावा यासारखें दुर्दैव नाहीं. ज्या विषयाबद्दल कॉलेजांत आपला कीर्ति-दुंदुभि गाजत असे त्याचें अध्ययन करून त्यावर ग्रंथरचना करण्यास सरकारनें कोणांस बंदी केली नाहीं. परंतु थकूनभागून म्हणा, कुटुंबचिंतेमुळें म्हणा, अशा लोकांचा राष्ट्रास उपयोग झाला नाहीं हें खरें. त्याचा परिणाम आज दिसत आहे.

“ आतां तरी पुढें हाचि उपदेश। नका करूं नाश आयुष्याचा। ”

संघशक्तीनें करण्याच्या कामांपैकीं अत्यंत महत्त्वाचें काम म्हटलें म्हणजे ‘ विश्वकोश ’ हें होय. सर्व कामें आजच होतील असा भाग नाहीं. विद्येचा प्रसार जरी बराच झाला आहे तरी मार्मिक रीतीनें व्यावहारिक उपयोग करून घेतां येईल अशा प्रकारचें ज्ञान आजवर आपणांस मिळालें नाहींच. आजपर्यंत ‘ ज्ञानाभासेन तृप्तता ’ ह्याच महादोषानें आपण सर्व विद्यार्थी ग्रस्त झालों आहों, असें म्हटलें तरी चालेल. हें फसवें ज्ञानहि अलीकडे झालें आहे. तेव्हां पक्कें व खरें ज्ञान होण्याचे उपाय आतां योजूं म्हणजे त्यापुढें विश्वकोशासारखीं कामें चांगल्या रीतीनें पार पडतील. परंतु तो हेतु पुढें ठेवून ग्रंथकार मंडळीनें पूर्व-तयारी करण्यास हरकत नाहीं. प्रथमत: निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ करून त्या विषयांत प्रवीण झालेले लोक संक्षिप्त रूपानें विश्वकोशासाठीं लेख लिहिण्यास पात्र होतात. राष्ट्रांत एकाच विषयाचें ज्ञान होऊन चालत नाहीं. एकाच प्रकारचे व एकाच धंद्याचे लोक राष्ट्रांत नाहींत. सर्वांस उपयोगी पडणारें ज्ञान एकत्र होईल असा ग्रंथसमुच्चय किंवा एक संक्षिप्त पुस्तकसंग्रह म्हणजेच विश्वकोश. तो आम्हांत असावा अशी इच्छा होणें साहजिक आहे. या संबंधानें विचार करून कांहीं अंशांनीं तरी त्याचा उपक्रम आज करतां येण्याजोगा आहे. कित्येक

शास्त्रें आम्हांस शिकविलीं नाहींत तीं नवीनच शिकलीं पाहिजेत. परंतु प्रथमतः कांहीं लोकांनीं इंग्रजी एन्सायक्लोपीडिया या पुस्तकाचें पर्यालोचन करून त्यांत पूर्वेकडील गोष्टींची अत्यंत उणीव आहे, ती भरून काढून पाश्चात्त्य गोष्टींचा विशेष पाल्हाळ केला आहे त्यास फांटा देऊन एक लहानसा विश्वकोश पहिल्या आवृत्तीदाखल करतां येणें अशक्य नाहीं. कार्यास प्रारंभ केला पाहिजे, पुढें पुढें त्यांत सुधारणा होईलच.

ग्रंथकर्तृत्वाच्या दिशेचा विचार करतां एक महत्त्वाची व अत्यंत जरूरीची गोष्ट लक्षांत येते, तिचाहि उल्लेख करणें जरूर आहे. आपणांस परमेश्वरकृपेंकरून इंग्रजी भाषा बरीच चांगली येते व त्यामुळें इंग्रजी ग्रंथ व वर्तमानपत्रांतले लेख वाचतां येतात. त्यांच्या वाचनानें माझ्या मनावर एक गोष्ट बिंबली आहे ती हीं कीं, आमच्याविषयीं लिहितांना इंग्रज लेखकांची समबुद्धि कायम राहात नाहीं. कित्येक वेळां निव्वळ अज्ञानामुळें गैरसमज होऊन त्यांच्याकडून भलभलतीं विधानें केलीं जातात ही गोष्ट आमच्यासंबंधानें जशी होते तशीच इतर राष्ट्रांविषयींहि लिहितांना झालीच पाहिजे. स्वतःची माहिती स्वतःस जशी पूर्णपणें असते तशी दुसऱ्याची नसते. आपल्याहून निराळ्या संस्था व संप्रदाय ज्या लोकांत आहेत त्यांच्या स्थितीची व विचारांची तंतोतंत कल्पना करणें म्हणजे सर्वथा आपण तद्राष्ट्रीय बनून लिहिणें किंवा बोलणें शक्य होत नाहीं. यामुळें आपल्या लेखांत व भाषणांत गौणपणा येतो ही गोष्ट कबूल करणेंदेखील कित्येकांस आपल्या अभिमानास कमीपणा आणणारें आहे असें वाटतें. परंतु ज्या आम्हांस या पक्षपाताचा किंवा कल्पनादौर्बल्याचा अनुभव आला आहे, त्यांनीं सर्व जगाविषयीं माहिती मिळवावयाची ती इंग्रजांच्याच द्वारानें सदैव मिळवून संतुष्ट कां राहावें ? फ्रेंचांविषयीं, जर्मनांविषयीं, रशियनांविषयीं माहिती त्यांच्या त्यांच्या देशांत जाऊन जरी झाली नाहीं तरी खुद्द त्यांच्या त्यांच्या भाषा शिकून मिळविली पाहिजे. शिवाय इंग्रज यांच्याविषयीं काय म्हणतात हें कळण्याचें जसें आपणांस साधन आहे, तसें इंग्रजांविषयीं ते काय म्हणतात हेंहि साक्षात् कळून घेण्याचें आपणांस साधन असलें पाहिजे. म्हणून परकी भाषांचें अध्ययन व तद्वारां त्या त्या लोकांच्या माहितीनें आपलें राष्ट्र बहुश्रुत करण्याचें काम ग्रंथकारांचें आहे.

परखंडीय भाषेविषयीं बोलतांना व लिहितांना साक्षात् ज्ञानाची इतकी जरूरी भासते तर स्वखंडीय व स्वदेशीय भिन्न भिन्न भाषांच्या ज्ञानाची आवश्यकता केवढी आहे हें सांगणें नकोच. कांहीं बंगाली कादंबऱ्यांचें

भाषांतर मराठींत जाहलें आहे. परंतु याहून अधिक संमिश्रणाचा काळ आला आहे. हिंदी भाषा आपल्या देशांत मोठ्या भागांत बोलण्यांत येते, यामुळें युरोपांत फ्रेंच आहे त्याप्रमाणें सर्वांच्या व्यवहारास ती उपयोगी पडेल असा सुमार आहे. परंतु हें कामसुद्धां ग्रंथकाराच्या मर्दुमकीवर अवलंबून आहे. हल्लीं हिंदुस्थानचें एकराष्ट्रीभवन जोरानें होण्याचा रंग आहे. प्रत्येक भागांत सर्व प्रमुख देशभाषांचा अभ्यास सुरू होईल. हिंदी व बंगाली भाषांचें अध्ययन आमचेकडे सुरू होईल, त्याप्रमाणें तिकडे मराठी व गुजराथी भाषा अगदीं प्राथमिक शाळांपासून सुरू होतील. अशा स्थितींत इतर भाषांतील ग्रंथकारांपेक्षां मराठी ग्रंथकार अधिक योग्यतेचे ठरले तर मराठी भाषेचाच अभ्यास चोहोंकडे वाढेल. नामांकित ग्रंथ झाला म्हणजे तो वाचण्याची इच्छा सहजच होते. निव्वळ केसरी वाचतां येण्यासाठीं आपण मराठी शिकलों असें आगगाडींत एका दोघा गृहस्थांनीं मला सांगितलें त्या वेळीं मला सानंदाभिमान वाटला. सारांश, दुसऱ्या भागांत आपल्या हिंदु व मुसलमान बंधूंचे विचार काय चालले आहेत हें कळून घेण्यासाठीं व आपल्या ग्रंथांत त्यांचें प्रतिबिंब पाडण्यासाठीं कांहीं ग्रंथकारांनीं आपल्या देशांतील इतर भाषांचें अध्ययन करून तिकडील भांडारांचीं द्वारें महाराष्ट्र वाचकांस खुलीं करून दिलीं पाहिजेत.

अशा अनेक प्रकारांनीं आपलें अवलोकनक्षेत्र वाढवून त्याचा फायदा आपल्या वाचकांस जे ग्रंथकार देतील ते आपल्या राष्ट्राचें उपकर्ते होतील. राष्ट्रांतील सांपत्तिक द्रव्याचा उपयोग आपला आपण करून देश द्रव्यसंपन्न करण्याच्या इच्छेप्रमाणेंच राष्ट्रांतील लोकांच्या मनास योग्य शिक्षण देऊन त्यांना ज्ञानसंपन्न करण्याची इच्छाहि उदात्त आहे. सामान्य धनाची वृद्धि करणारे व्यापारी जसें राष्ट्रास उत्कर्षस्थिति आणून देतील, तसेच ज्ञानधनाची अभिवृद्धि करणारे व्यापारी म्हणजे ग्रंथकार हेहि राष्ट्रोदयास सहायभूत होणार आहेत. आपल्या राष्ट्रास कोणच्या मालाची जरूरी आहे याबद्दल दोघांनींहि सारखेंच जपलें पाहिजे.

• • •

# परिशिष्ट

१. प्रो. विजापूरकर यांच्या हस्ताक्षरांचे नमुने

२. प्रो. विजापूरकर यांनीं
नामदार गोपाळ कृष्ण गोखले
यांना पाठविलेलीं कांहीं पत्रें :
( इंग्रजी, मोडी व मराठी )

## परिशिष्ट १

प्रो. विजापूरकर यांचें मराठी हस्ताक्षर


विरुद्ध मत प्रसिद्ध करीत आहे. उलट पक्षीं
हल्लींच्या अध्यक्षस्थानाच्या वादांत मला
अर्थ बिलकुल दिसत नाहीं. अध्यक्ष म्हणजे
बादशहा नव्हे त्याला सर्वानुमतें वागणें प्रा-
प्त आहे. सर्व राष्ट्रांतील शेलक्या लोकांनीं
जमून तडजोडीनें जें ठरवावयाचें तें च होईल.
मागील दोष काढीत बसलों तर कांहींच
व्हावयाचें नाहीं. आज मना पासून काम
करणारा असें राष्ट्रास वाटून आमच्यास
आपल्या हातीं देतां येण्या जोगा असलेला
उच्चतम मान द्यावयाचा असल्यास अट
काव कां असावा? असे विचार प्रसृत
व्हावेत, भलत्याच कामांत सरकारची
मुरवत धरण्यांत अर्थ नाहीं, इंडियन नेश
न म्हणते त्याप्रमाणें रा. टिळकापेक्षां मि.
दादाभाई अधिक जहाल बोलतील,


विष्णु गोविंद विजापूरकर


विजापूरकर यांचें इंग्रजी हस्ताक्षर


vernaculars. I of course chiefly ~~intend~~ to work for Granthamala. trying to secure promises from competent experienced graduates ~~that~~ they would write one or two articles per year on any subject they like. I intend also to secure subscribers for the journal particularly deposit subscribers. When are you coming here? I hope before September end.

K. B. Vijapurkar









## परिशिष्ट २

13-11-1891

[ 1 ]

My dear Sir,

I have given up writing to you as it is not encouraging to spend unproductive ink, pen and paper and brain in the bargain I am not at all angry with you for anger is not in me and more especially with regard to a man like yourself.

You deserve more pity than sympathy. Glad that you are resolved to do nothing calculated to put a strain on the brain power in the evening. If you carry this resolution into effect I am sure you will falsify our well meant prophesy — that you are to leave us at your fortieth. We are all — one and all — your friends earnestly longing to see you and don't you think you are particularly unkind to me when you have paid no heed to my earnest entreaties that you should spend a week or so in the healthy atmosphere of Kolhapur where you can enjoy the rare advantage of your old familiar friends where you can put away the rigid formality of intercourse ?

Mr. Bajirao comes to you and I may tell you, to wait upon you as a deputation — though monosyllabic — from us to convey our best wishes and give you a formal invitation to Kolhapur. So you must say to him definitely when you will meet us all here. The post I send my letter with this time is *inexorable* and will not part without extracting a reply.

Bajirao has an earnest desire to see all the lions of Poona and if possible to make acquaintance with all or some of the men of light and learning in Poona. At least I expect that you will take him to your colleagues — especially to Mr. Agarkar It is in your power to see that his desire is fulfilled — I am all right and hope you are so too — My B. C. to Prof. Agarkar.

Yours

— Sd. V. G. BIJAPURKAR

Rajaram College
Kolhapur City
7-9-99

[ 2 ]

My dear Gopalrao,

I hope you have duly got my letter. I really do not know when you are to be quite free from plague. It must be some consolation to us all in these days that His Excellency spoke so well of you — he who had spoken so unkindly almost brutally about you. Everyone then blamed you and very few must have changed their mind that your apology was more sweeping* But let bygones be bygones; let us take the sweets of the passing hour. I long to see you a Member of the Legislative Council doing good work. There is no doubt that you will do good work. You will make up for your comparative silence so long. I do not now say after your last letter that you were inactive but I shall say that it was not so demonstrative as all work has to be if you are to lead the people.

I have written to you what I mean to do in regard to Shridharpant Bhandarkar's place. Prof. Kathavate supports my proposal and is ready to do all in his power if I succeed in approaching Mr. Justice Candy and I have told you what I expect from you. Raosaheb Ranade as Prof. Kathavate calls Justice Mr. Ranade in his letter to me will secure the support of Messrs Mehta and Bhatwadekar but you also have to add your own quota* of few* words So many people perhaps Parsis and Gujratis will try. I am afraid Dr. Macdonald will have a man of his selection. I do not know how he can be approached. I think I must leave that line altogether as I don't know him at all nor is there any chance of his having heard me.

I write this letter today particularly to inquire what the advertisement in the Sudharak calling for applications from a B. Sc. and an M. A. in English and Sanskrit means. Do you want these gentlemen for your college? and why do you want them? I don't* say you know something of this matter.

---

* हे शब्द नीट वाचतां आले नाहींत; पण तेच असावेत. ( सं. )

Plague is not yet in the town. Sooner or later it is to be amongst us and we are taking all precautions. But God will have his way. People are afraid of the likely rigour of the plague measures. Hoping this finds you all all right.

V. G. BIJAPURKAR

**P. S.** I got your letter after I had made the above ready for the post. I thank you for the contents. It only deepens in me the regret that we have been so long without seeing each other. It is a pity that you should see lack of a genuine sincerity in my private letters. I have told you all. It is true that authorities do not like me. This is because they do not like anybody who thinks independently. I feel under no immediate danger of expulsion. I have friends in the Darbar as well as men whom I should not call my foes but those that will be glad if I go away. There is a limit to evil doing even in absolute rulers. I like Kolhapur but neither the upper people nor the authorities seem to appreciate any independent work even remotely instilling good ideas in the minds of the general public. There is absolutely no zealous co-operation. On the whole I have begun to feel that I have sacrificed the betterment of my own mind by staying in Kolhapur for a purpose which I looked and still look upon as higher. For scholarly work Kolhapur is a village and I long to be in some *center* of activity in Poona or better still in Bombay. It is not without a pang that I think of getting out of Kolhapur. I am not at all displeased with my Maharaja. I have no right to expect from a lad of 25 comparatively uneducated what I have failed to find in men who have received the best education now available in India. The king is what his ministers and even his people make him. Well they have made him helpless. His natural bent of mind is as it should be. I do not feel my position to be shaky here firstly because there is no great danger and secondly because I care not for my position when my brother takes up the load of the family that I have borne so long.

---

(Centre is written as 'center' in the letter.)

I think I must stop somewhere and I shall do so here today. But do not suppose that I shall ever lack in sincerity or openness to friends whom I have considered tried ones. I have my views and ideas formed possibly in different surroundings from yours. They have not had the shock of discussion with you when I should have modified yours or you mine. I do not know if we do radically differ in any. I suppose not. Well then now I *really* stop.

Yours sincerly,
V. G. BIJAPURKAR

If Dr. Bhalchandra is not Chandavarkar is. I have made his acquaintance when he was here last week. He said you would be soon in Legislative Council. Mr. Shridharpant is trying and will probably succeed.

**Rajaram College**
Kolhapur City
24-9-1902

[ 3 ]

My dear Gopalrao,

First about the station master's guests. What a storm of attack is this ! The gentleman was helpless and expressed to me how unable he was to accommodate his people at Poona for a day or so. I got no more notice than a day's. I could only send you a telegram instead of a card. But I was sure I would not send anything Telegram or letter to anybody else if not to Haribhau Apte of the Anandaśrama. I knew full well that you could not spare rooms in your house without difficulty but burdens *must* be thrown on shoulders in order to try them. I would never have thrown this one if I had not been sure that with your stay in Poona for nearly twenty years you were well able to acquit yourself thoroughly. As to myself well send me a thousand people if you like and I shall show you that I can accommodate them in Kolhapur at only six hour's notice.

I shall let you know definitely when I shall fix the date of leaving this place. I mean to leave as soon after the 30th of the current month. I shall form my plans after seeing you.

I hope you will not be angry with me for having made use of the stanza of Bhartihari in a brief note on you in my latest issue of the Granthmala without previously obtaining your permission. I have not divulged anything that you showed me so kindly from your private diaries.

I am simply laughing as I am'reading over again your slashing paragraph on my demand on your hospitality for strangers. I am put in mind of that Durvasa of Mahabharata who at midnight went to Draupadi with his 60,000 pupils and called for a meal in that forest residence of the Pandavas. With God's grace she satisfied the call and I am sure if you had not Murarji's Dharmshala you would have found someting else. Have more trust in God and everything will be as it should be.. Ramdas asked Shivaji to make a gift of villages not in his possession. That was a stimulus for the disciple to conquer these.

Yours sincerly,
Sd. V. G. BIJAPURKAR

श्री

मोडी पत्र

अजर शरणम्
शाहुपुरी
३।३।१९०६

(१)

कृ. सि. सा. न. वि. वि. आपण पुण्यास आला आहां. चार रोजांनीं परत जाल. त्या अवधींत आपण विलायतेस जाण्याचे पूर्वी एक पत्र पाठविलें होतें, त्यांत लोकजागृतीसाठीं 'राष्ट्रस्थित्यादर्श' अगर 'राष्ट्र स्थिति' अगर 'राष्ट्र प्रबोध' अशा नांवांचें, अशा प्रकारचें एक लहान छोटेसें मासिक पुस्तक देशी भाषांत प्रसिद्ध करावें, मराठीचा तरी उपक्रम करावा. त्यास जरूर ते माहितीचे आंकडे व त्यावरून सुचणारे विचार तसेंच राजकीय कागद उदा० 'राणीचा जाहीरनामा', कांहीं जबान्या, कांहीं गव्हर्नरांचीं भाषणें, कांहीं कायदे व फॅमीन कोड, पोलीस कोड, वगैरे शेतकी, व्यापार, मद्यपान, दुष्काळ, पोस्ट खातें, बँक खातें, लोकसंख्या, वगैरे अनेक राष्ट्रस्थितीचें चित्र उभें राहील अशा प्रकारची माहिती प्रथमतः २४ अगर ३२ पृष्ठांचें मासिक पुस्तक काढून देणेस सुरुवात होईल. यांतच देशांतील निरनिराळ्या ठिकाणची आपल्याच

लोकांनीं मिळविलेली, पत्रव्यवहार करून मागविलेली, स्थलविशेषीं आपले मुक्त्यार पाठवून आणविलेली माहिती प्रसिद्ध करावी. सरकाराचे माहिती गोळा करण्याचे प्रकार आहेतच. ते घेऊन आपणांस वाटेल ती माहिती अधिक मिळवितां आली पाहिजे. आपणच आपली पाहाणी करण्याचा यत्न कां करूं नये ? ती माहिती विश्वसनीय अधिक मानली पाहिजे. ठरलेले प्रश्न सर्व ठिकाणीं पाठवून उत्तरें आणवावीं. प्रश्नाचा मासला सोबत आहे. देशी चळवळींची माहितीहि त्यांत यावी. सारांश—त्याद्वारां लोकस्थितीचें चित्र नेत्रांपुढें उभें राहण्यास मदत होईल. एखाद्या वर्तमानपत्रास, सरकारचे प्रसिद्ध होतात ते कागद आपल्या पत्रास मागवावयाचे असल्यास कोणाकडे मागवावयाचे ? तें लिहाल तर मेहेरबानी होईल. समर्थ पत्रासाठीं मागवूं. हल्लींची ताजी माहिती वेळोवेळीं कोठून व कशी मिळवावी या कामीं आपलें मोठें साहाय्य पाहिजे आहे. तरी ही कल्पना आपणांस मानवते काय ? प्रेसिडेन्सी असोसिएशन असा कांहीं उद्योग करीत असते म्हणून ऐकतों त्यांचें साहाय्य होईलच. तूर्त लोकशिक्षण लिहितां वाचतां येऊन सामाजिक व नैतिक उन्नति करण्याची खटपट फार पाहिजे व त्यासाठीं जागोजाग आपलीं ठाणीं पाहिजेत. कालावधीचा मार्ग असला तरी हरकत नाहीं. पण कालावधीची सबब सांगून लोक दिरंगाई करतात तें पाहावत नाहीं. एंजिनिअरिंग, मेडिकल व लॉ-क्लासेस आमच्या युनिव्हर्सिटीचे कसे चालतात हें पाहून सर्व राष्ट्रांत परक्या म्हणजे जर्मनी, अमेरिका व जपान येथून शिक्षण पाहून ( शब्द नीट लागला नाहीं, पत्राचा तेवढा भाग फाटला आहे—सं ) व आपले तरुण तिकडोन तयार करून आणण्यास पाठवून राष्ट्रीय युनिव्हर्सिटीची उभारणी करणें किती जरूर आहे याचा विचार मनांत येऊन झोंप येईनासें होतें पण उपाय नाहीं. लोकांनीं कल्पना प्रसिद्ध करून चळवळ बंद ठेवल्यासारखें केलें आहे. मी पंडितजीच्या पाठीं पत्रव्यवहारानें आहेच. २०।२५ दिवसांखालीं १५ दिवसांत डेप्युटेशन निघेल असें करतों म्हणून लिहून आलें. परवां १ ल्या तारखेस पुनः विश्वामित्र हरिश्चंद्र न्यायानें पत्र लिहिलें आहे. आपआपल्या मंडळीस कामाची गति कशी झाली हें कळण्यास १५ दिवस किंवा महिन्यास एक खासगी हकीकतीचें पत्रक फिरविण्याची योजना कराल तर बरें होणार नाहीं काय ? म्हणून लिहिलें आहे. राष्ट्राचें मन आतां लोकांचे ताब्यांत देण्याची सोय नाहीं. इंग्रज लोकांच्या न्यायबुद्धीस जागृति होऊन तेथून प्रगतीचे मार्ग खुले होतील ही आशा मृगजळाप्रमाणें वाटत आहे. प्रचंड प्रयत्न पाहिजे. आपण प्रारंभिलेल्या समाजावर सरकाराचा डोळा आहे. त्यांत राजकीय भाग आहे व 'इंडिया' ची

वर्गणी अधिकारी लोक देतात. त्याला उद्देशूनच सर्क्युलर निघालें आहेसें वाटतें. हिंदुस्थानांतील किंवा हिंदुस्थानासंबंधें बाहेर चालू असणाऱ्या राजकीय चळवळींस सरकारी नोकरांनीं मदत करूं नये. अस्सल पाहण्यास मिळालें नाहीं. पत्रोपत्रीचीच खबर आहे. मी प्रारंभिलेल्या उद्योगांचा व्याप बराच असल्यानें कोल्हापूर हें मुख्य राहण्याचें ठिकाण करणें प्राप्त आहे. भेटीचा लाभ झाला म्हणजे अमळ स्पष्ट सर्व गोष्टींचा खुलासा होतो. युनिव्हार्सिटींत लक्ष आहे तोंपर्यंत साक्षात् मेंबर या नात्यानें आपल्यांत मिळतां येत नाहीं व इतर स्वतंत्र उद्योग असणारास एकंदरीनें तें जडच ! पण कार्य एकच आहे. कळावें, लोभ आहेच ही विनंती.

(सही) वि. गो. विजापूरकर

श्री

अजर शरणम्
शाहुपुरी (कोल्हापूर)
११।१०।०६

(२)

कृ. सि. सा. न. वि. वि. आपलें पत्र पावलें. मासिक पुस्तकास आपण कसाहि लेख लिहिला तरी बाधक होणार नाहीं. ज्या वेळीं लोकांस विचार करण्याची अमकी दिशा योग्य आहे असें दाखविणें जरूर आहे. त्या वेळेस मी तरी निदान कोणाची भीड-मुर्वत न धरतां लिहीत असतो. मलाच जेव्हां वाटतें कीं अशा एका प्रकारानें विषयाची मांडणी केली असतां लोकसंग्रह अधिक होईल त्या वेळीं तत्त्वास न सोडतां एकंदरीनें हा लेखक जुन्याचा द्वेष्टा नाहीं उलट अभिमानी आहे असा ग्रह होण्याजोगें लिहितो. नवीन व परदेशी जितकें चांगलें तितकें घ्यावयाचेंच असा मात्र समज केल्याशिवाय राहत नाहीं. विश्ववृत्ताच्या जूनच्या अंकांतील 'समर्थ विद्यालय' हा लेख नजरेखालून गेला असल्यास माझ्या म्हणण्याची सत्यता ध्यानीं असेल. इंग्लंडांतील कामगिरीसंबंधानें मि. मोर्ले व खुद्द आपण या उभयतःविषयीं झालेले 'दोन गैरसमज' दूर करण्याचा यत्न माझ्यापरी म्यां जुलाईच्या (४) अंकांत केला आहे. त्यामुळें ज्या लोकांचें साहाय्य नवीन शिक्षणाच्या बाबतींत मीं घेतलें आहे त्यांपैकीं कांहींस नसलें तरी तशा मताच्या लोकांस माझें लिहिणें halting policy चें वाटत आहे. परंतु

लोकांनीं मिळविलेली, पत्रव्यवहार करून मागविलेली, स्थलविशेषीं आपले मुक्त्यार पाठवून आणविलेली माहिती प्रसिद्ध करावी. सरकाराचे माहिती गोळा करण्याचे प्रकार आहेतच. ते घेऊन आपणांस वाटेल ती माहिती अधिक मिळवितां आली पाहिजे. आपणच आपली पाहाणी करण्याचा यत्न कां करूं नये ? ती माहिती विश्वसनीय अधिक मानली पाहिजे. ठरलेले प्रश्न सर्व ठिकाणीं पाठवून उत्तरें आणवावीं. प्रश्नाचा मासला सोबत आहे. देशी चळवळीची माहितीहि त्यांत यावी. सारांश—त्याद्वारां लोकस्थितीचें चित्र नेत्रांपुढें उभें राहण्यास मदत होईल. एखाद्या वर्तमानपत्रास, सरकारचे प्रसिद्ध होतात ते कागद आपल्या पत्रास मागवावयाचे असल्यास कोणाकडे मागवावयाचे ? तें लिहाल तर मेहेरबानी होईल. समर्थ पत्रासाठीं मागवूं. हल्लींची ताजी माहिती वेळोवेळीं कोठून व कशी मिळवावी या कामीं आपलें मोठें साहाय्य पाहिजे आहे. तरी ही कल्पना आपणांस मानवते काय ? प्रेसिडेन्सी असोसिएशन असा कांहीं उद्योग करीत असते म्हणून ऐकतों त्यांचें साहाय्य होईलच. तूर्त लोकशिक्षण लिहितां वाचतां येऊन सामाजिक व नैतिक उन्नति करण्याची खटपट फार पाहिजे व त्यासाठीं जागोजाग आपलीं ठाणीं पाहिजेत. कालावधीचा मार्ग असला तरी हरकत नाहीं. पण कालावधीची सबब सांगून लोक दिरंगाई करतात तें पाहावत नाहीं. एंजिनिअरिंग, मेडिकल व लॉ-क्लासेस आमच्या युनिव्हर्सिटीचे कसे चालतात हें पाहून सर्व राष्ट्रांत परक्या म्हणजे जर्मनी, अमेरिका व जपान येथून शिक्षण पाहून ( शब्द नीट लागला नाहीं, पत्राचा तेवढा भाग फाटला आहे—सं ) व आपले तरुण तिकडोन तयार करून आणण्यास पाठवून राष्ट्रीय युनिव्हर्सिटीची उभारणी करणें किती जरूर आहे याचा विचार मनांत येऊन झोंप येईनासें होतें पण उपाय नाहीं. लोकांनीं कल्पना प्रसिद्ध करून चळवळ बंद ठेवल्यासारखें केलें आहे. मी पंडितजीच्या पाठीं पत्रव्यवहारानें आहेच. २०।२५ दिवसांखालीं १५ दिवसांत डेप्युटेशन निघेल असें करतों म्हणून लिहून आलें. परवां १ ल्या तारखेस पुन: विश्वामित्र हरिश्चंद्र न्यायानें पत्र लिहिलें आहे. आपआपल्या मंडळीस कामाची गति कशी झाली हें कळण्यास १५ दिवस किंवा महिन्यास एक खासगी हकीकतीचें पत्रक फिरविण्याची योजना कराल तर बरें होणार नाहीं काय ? म्हणून लिहिलें आहे. राष्ट्राचें मन आतां लोकांचे ताब्यांत देण्याची सोय नाहीं. इंग्रज लोकांच्या न्यायबुद्धीस जागृति होऊन तेथून प्रगतीचे मार्ग खुले होतील ही आशा मृगजळाप्रमाणें वाटत आहे. प्रचंड प्रयत्न पाहिजे. आपण प्रारंभिलेल्या समाजावर सरकाराचा डोळा आहे. त्यांत राजकीय भाग आहे व ‘ इंडिया ’ ची

वर्गणी अधिकारी लोक देतात. त्याला उद्देशूनच सर्क्युलर निघालें आहेसें वाटतें. हिंदुस्थानांतील किंवा हिंदुस्थानासंबंधें बाहेर चालू असणाऱ्या राजकीय चळवळींस सरकारी नोकरांनीं मदत करूं नये. अस्सल पाहण्यास मिळालें नाहीं. पत्रोपत्रीचीच खबर आहे. मी प्रारंभिलेल्या उद्योगांचा व्याप बराच असल्यानें कोल्हापूर हे मुख्य राहण्याचें ठिकाण करणें प्राप्त आहे. भेटीचा लाभ झाला म्हणजे अमळ स्पष्ट सर्व गोष्टींचा खुलासा होतो. युनिव्हर्सिटींत लक्ष आहे तोंपर्यंत साक्षात् मेंबर या नात्यानें आपल्यांत मिळतां येत नाहीं व इतर स्वतंत्र उद्योग असणारास एकंदरीनें तें जडच ! पण कार्य एकच आहे. कळावें, लोभ आहेच ही विनंती.

( सही ) वि. गो. विजापूरकर

श्री

अजर शरणम्
शाहुपुरी ( कोल्हापूर )
११।१०।०६

( २ )

कृ. सि. सा. न. वि. वि. आपलें पत्र पावलें. मासिक पुस्तकास आपण कसाहि लेख लिहिला तरी बाधक होणार नाहीं. ज्या वेळीं लोकांस विचार करण्याची अमकी दिशा योग्य आहे असें दाखविणें जरूर आहे. त्या वेळेस मी तरी निदान कोणाची भीड-मुर्वत न धरतां लिहीत असतो. मलाच जेव्हां वाटतें कीं अशा एका प्रकारानें विषयाची मांडणी केली असतां लोकसंग्रह अधिक होईल त्या वेळीं तत्त्वास न सोडतां एकंदरीनें हा लेखक जुन्याचा द्वेष्टा नाहीं उलट अभिमानी आहे असा ग्रह होण्याजोगें लिहितो. नवीन व परदेशी जितकें चांगलें तितकें घ्यावयाचेंच असा मात्र समज केल्याशिवाय राहत नाहीं. विश्ववृत्ताच्या जूनच्या अंकांतील ‘समर्थ विद्यालय’ हा लेख नजरेखालून गेला असल्यास माझ्या म्हणण्याची सत्यता ध्यानीं असेल. इंग्लंडांतील कामगिरीसंबंधानें मि. मोर्ले व खुद्द आपण या उभयतःविषयीं झालेले ‘दोन गैरसमज’ दूर करण्याचा यत्न माझ्यापरी म्यां जुलाईच्या ( ४ ) अंकांत केला आहे. त्यामुळें ज्या लोकांचें साहाय्य नवीन शिक्षणाच्या बाबतींत मीं घेतलें आहे त्यांपैकीं कांहींस नसलें तरी तशा मताच्या लोकांस माझें लिहिणें halting policy चें वाटत आहे. परंतु

I think I must stop somewhere and I shall do so here today. But do not suppose that I shall ever lack in sincerity or openness to friends whom I have considered tried ones. I have my views and ideas formed possibly in different surroundings from yours. They have not had the shock of discussion with you when I should have modified yours or you mine. I do not know if we do radically differ in any. I suppose not. Well then now I *really* stop.

Yours sincerly,
V. G. BIJAPURKAR

If Dr. Bhalchandra is not Chandavarkar is. I have made his acquaintance when he was here last week.. He said you would be soon in Legislative Council. Mr. Shridharpant is trying and will probably succeed.

**Rajaram College**
Kolhapur City
24-9-1902

[ 3 ]

My dear Gopalrao,

First about the station master's guests. What a storm of attack is this ! The gentleman was helpless and expressed to me how unable he was to accommodate.his people at Poona for a day or so. I got no more notice than a day's. I could only send you a telegram instead of a card. But I was sure I would not send anything Telegram or letter to anybody else if not to Haribhau Apte of the Anandaśrama. I knew full well that you could not spare rooms in your house without difficulty but burdens *must* be thrown on shoulders in order to try them. I would never have thrown this one if I had not been sure that with your stay in Poona for nearly twenty years you were well able to acquit yourself thoroughly. As to myself well send me a thousand people if you like and I shall show you that I can accommodate them in Kolhapur at only six hour's notice.

I shall let you know definitely when I shall fix the date of leaving this place. I mean to leave as soon after the 30th of the current month. I shall form my plans after seeing you.

I hope you will not be angry with me for having made use of the stanza of Bhartihari in a brief note on you in my latest issue of the Granthmala without previously obtaining your permission. I have not divulged anything that you showed me so kindly from your private diaries.

I am simply laughing as I am reading over again your slashing paragraph on my demand on your hospitality for strangers. I am put in mind of that Durvasa of Mahabbharata who at midnight went to Draupadi with his 60,000 pupils and called for a meal in that forest residence of the Pandavas. With God's grace she satisfied the call and I am sure if you had not Murarji's Dharmshala you would have found someting else. Have more trust in God and everything will be as it should be. Ramdas asked Shivaji to make a gift of villages not in his possession. That was a stimulus for the disciple to conquer these.

Yours sincerly,
Sd. V. G. BIJAPURKAR

श्री

मोडी पत्र

अजर शरणम्
शाहुपुरी
३।३।१९०६

(१)

कृ. सि. सा. न. वि. वि. आपण पुण्यास आला आहां. चार रोजांनीं परत जाल. त्या अवधींत आपण विलायतेस जाण्याचे पूर्वी एक पत्र पाठविलें होतें, त्यांत लोकजागृतीसाठीं ' राष्ट्रस्थित्यादर्श ' अगर ' राष्ट्र स्थिति ' अगर ' राष्ट्र प्रबोध ' अशा नांवांचें, अशा प्रकारचें एक लहान छोटेंसें मासिक पुस्तक देशी भाषांत प्रसिद्ध करावें, मराठीचा तरी उपक्रम करावा. त्यास जरूर ते माहितीचे आंकडे व त्यावरून सुचणारे विचार तसेंच राजकीय कागद उदा० ' राणीचा जाहीरनामा ', कांहीं जबान्या, कांहीं गव्हर्नरांचीं भाषणें, कांहीं कायदे व फॅमीन कोड, पोलीस कोड, वगैरे शेतकी, व्यापार, मद्यपान, दुष्काळ, पोस्ट खातें, बँक खातें, लोकसंख्या, वगैरे अनेक राष्ट्रस्थितीचें चित्र उभें राहील. अशा प्रकारची माहिती प्रथमत: २४ अगर ३२ पृष्ठांचें मासिक पुस्तक काढून देणेस सुरुवात होईल. यांतच देशांतील निरनिराळ्या ठिकाणची आपल्याच

आपण गेल्या राष्ट्रीयसभेस अध्यक्ष झाला व वयानें लहान असून हा मान पुष्कळ लोकांचे अगोदर आपणांस मिळाला हें भूषणावह आहे. त्याच वेळीं मला एका जुन्या मानाची आठवण झाली. तो मान म्हणजे ग्रॅज्युएट्स ॲसोसिएशनच्या वार्षिक समारंभाचा. त्यापेक्षां राष्ट्रीय सभेचा मान कितीतरी योग्यतेचा. हल्लींच्या प्रसंगीं रा. टिळकांचे अध्यक्षत्वाबद्दल आपण उघडपणें संमति द्यावी असा माझा स्पष्ट अभिप्राय आहे. नापृष्टः कस्यचित्ब्रूयात् हें ब्राह्मणनीतितत्त्व लक्षांत नाहीं असें समजूं नका. परंतु आपल्यास वाटेल तें दुज्यास सांगणें हें वर्तमानपत्रकर्ते व मासिकपुस्तककर्ते यांचें ब्रीद आहे. शिवाय या वेळीं आपलें मन चलबिचल झालें असेल तर निश्चितपणें सांगणारे मित्र कमी असतात. जवळ आहेत तीं म्हणजे भ्याड जुन्या तऱ्हेची अतिनेमस्त मंडळी. अलीकडील अध्ययन व जनस्थित्यवलोकन नाहीं. कै. ना. रानडे यांच्याप्रमाणें कालाबरोबरच नव्हे त्याच्यापुढें ज्याच्या विचारांची धाव अशीं माणसें कमी. यामुळें प्रस्तुत प्रसंगीं आपण टिळकांच्या अध्यक्षतेस पाठिंबा द्याल तर त्याचा नैतिक परिणाम फार मजेचा होईल. महाराष्ट्र व बंगाल एकदिलानें वागल्यासारखें होईल व महाराष्ट्रांत तुमचा थोरपणा होईल. सवंग लोकप्रियतेसाठीं मी हें सांगत नाहीं. मी त्या मालाचा भोक्ता नाहीं. काम करणारीं माणसें सर्व तुम्ही उभारलेलें निशाण पुढें करून जाण्यास तयार आहेत. राष्ट्रांत सर्व ठिकाणीं काम व्हावयाचेंच आहे. टिळक आपल्या व आपण टिळकांच्या मताचे असून लागोपाठ दोन वेळां अध्यक्षाचा मान महाराष्ट्रास दैवदयेनें मिळण्याची संधि आहे. कां गमावावी ? क. लो ही विनंति.

वि. गो. विजापूरकर

( ४ )

श्री

शाहुपुरी
२।४।०६

कृ. सा. न. वि. वि. बजेटच्या वेळचें भाषण पोहोंचलें. टाईम्सकारांनीं 'आम्निवस क्रिटिक' 'सेन्सर जनरल' अशा शेलक्या शिव्या व 'पिलीफिक्स' ( शब्द स्पष्टपणें समजला नाहीं–सं. ) वगैरे कर्झनसाहेबी औपरोधिक शब्दछल केलेले पाहिले असतीलच. "शेषं कोपेन पूरयेत्" म्हणतात त्यांपैकीं प्रकार होऊं लागला म्हणजे टिकणारा युक्तिवाद संपला असें समजावें. युद्धास जाण्यास तयार आहांत काय ? बारा वर्षें नोकरी लष्करी पेशाची करण्यास तयार आहांत काय

म्हणून विचारलें आहे. तीन वर्षांच्या आंत २ कोटी सैन्य तयार करून देऊं. मात्र आमचे आम्हांस सर्व कारभार करण्याची मोकळीक पाहिजे असें स्वच्छ उत्तर दिलें पाहिजे. हत्यारांचा कायदा करून निर्वीर्य करावयाचे व मागून असा प्रश्न विचारावयाचा हा टाईम्सचा प्रश्न व जनरल स्कॉटचे 'कसबी कामकरू मिळत नाहींत, म्हणून सरकारास सैन्यांत लागणारे जिन्नसांसाठीं कारखाने स्थापण्याचें जड जातें हें उत्तर एकाच योग्यतेचें आहे. असो. आपण म्हणजे ( तुम्ही ) कामगिरी उत्तम बजावली हें बस आहे. शेवटीं परकें राज्य असलें तरी राष्ट्रीय धोरणाचें असावें अशी मृगजळी आशा प्रकट केली आहे. गाढव कां असेना त्यानें घोड्यासारखें वागावें. होईल कसें ? येथें जागृति जबर पाहिजे. परवाच्या ईस्ट ॲण्ड वेस्ट मध्यें, 'मि. वॉईल' कोणी आहेत, त्यांनीं होमरूल नामशेष झालें काय म्हणून लेख लिहिला आहे. त्यांत लिहिल्याप्रमाणेंच झाल्याशिवाय यशप्राप्तीची आशा नाहीं. विलायतेस मागणी घातली पाहिजे पण तिला या देशांतील प्रचंड चळवळीनें जोर पोंचला पाहिजे. आपण सर्व बुद्धि, उत्साह व पैसा बराच विलायतेंतील कामांत खर्चं करूं नका. हिंदुस्थानांत प्रवास करून खाजगी लोकांच्या मनांतील विचार कळवून घ्या. आपली वीज त्यांच्यांत घाला. सर्वस्व समर्पण हा योग मोठा आहे. हा साधण्यास लोकमत तयार केले पाहिजे. क्षणिक किंवा अल्पकालिक सुखाच्या मागें लोक आहेत. थोडी बहुत जागृति आहे. पैसाहि देण्यास लोक तयार झाले आहेत. अनेक अंगांची चळवळ करण्यास माणसें व पैसा पाहिजे. त्याला तशाच माणसांनीं जुळवाजुळव केली पाहिजे. आमच्या प्रांतांत रा. टिळक कांहीं मंडळींत काम करूं शकतील व आपण कांहीं मंडळींत काम करूं शकाल. डॉ. नानासाहेब देशमुख तिसरे मध्यस्थ आहेत. तीन असामींच्या नांवानें आजकाल वाटेल तितके लोक मदत करतील. मदतीचें प्रमाण आज सांगवत नाहीं. तुम्ही आणखी एक वेळ जाऊन येत आहां ते या. ज्याला आमच्या महाराष्ट्रांतील भाषा येत नाहीं असे मि. दत्तासारखे लोक विलायतेंत राहून पुष्कळ कार्य करतील. सर्व हिंदुस्थानभर हिंडण्यास, तुमचें येथें पुष्कळ काम आहे.

कलकत्त्याहून आलेलें वायब्याचें पत्र मला पसंत नाहीं. प्रश्न पाठविलें ते चहूंकडे पाठवावयाचे आहेत. मासिक पुस्तकाची जाहिरात दिली आहे. दोन मासिकांपैकीं धाकट्यामध्यें काय येणार याचा खुलासा दोन रोजांत निघणाऱ्या ग्रंथमालेच्या मार्चच्या अंकांत केला आहे. 'आक्रोश' हें नांव कित्तेकांस चांगलें वाटलें नाहीं. नुसतें जहालपणानें मी हें नांव दिलें नाहीं. कंठशोष, आक्रोश करीत आहोच ! तरी काम कांहीं होत नाहीं. तरी करीत राहाणें प्राप्त

आहे. आपली तयारी झाली म्हणजे आक्रोश सोडतां येईल. त्या पुस्तकासाठीं मला माहिती प्रसिद्ध करणें प्राप्त आहे. आपल्या मंडळींचे इंग्रजी बँकांत किती पैसे आहेत ते आमच्या देशास उपयोगी पडत नाहींत. हा आपल्या लोकांविरुद्ध आक्रोश; अशी ओतप्रोत माहिती दरमहा आली पाहिजे. तेव्हां तुमचें मत व तुमचें मार्गदर्शन जरूर पाहिजे. सप्टेंबरपर्यंत वायद्याचें उपयोगी नाहीं. नोकरींत होतों तेव्हांसारखे संथपणानें विचारणें वेगळें व आतां कामास लागलों आहे तेव्हांचें वेगळें ! दिवस व्यर्थ जातात. कार्य कांहीं होत नाहीं म्हणून तळमळ वाटते.

विश्ववृत्तांत लेख केवढा कां होईना पण पहिल्या अंकांत एक तुमच्या नांवाचा पाहिजे. या कामीं क्षमा नाहीं. भलीं भलीं भाषणें करण्यास वेळ सांपडतो व गरीब आपल्या भाषेंत आठ–दहा पृष्ठांचा एक लेख लिहिण्यास फुरसत नाहीं ही सबब मी ऐकणार नाहीं. मला तुमच्या नांवचा लेख पाहिजेच. कार्यास सुरवात करणाऱ्यास सर्व तऱ्हेच्या आग्रणीचे लेख पहिल्या चारदोन अंकांत मी घेणार आहे. डॉ. नानासाहेब देशमुख कधींच कोठें लिहीत नाहींत, पण त्यांनींहि दोन तीन अंकांत केव्हांतरी देईन म्हटलें आहे. तुमचा व रा. टिळकांचा पहिल्या अंकांतच आले पाहिजेत. त्यांच्याशीं अलीकडे बरेंच बोलणें झालें आहे. त्याचा परिणाम उघड सभेंत त्यांनीं 'वंदेमातरम्‌चा रस्त्यांत घोष केला म्हणजे कार्य होतें असें नाहीं' असें भर सभेंत बोलून टाकलें. त्यांना काम पुष्कळ व्हावें अशी हौस आहे यांत शंका नाहीं. जवळ माणसें चांगलीं पाहिजेत. लोकांवर छाप आहे तिचा उपयोग करून घेतला पाहिजे. जागोजाग व्याख्यानें देत मात्र मी हिंडणार नाहीं. त्यांनीं जुन्नरला 'शिवाजी उत्सवास जा' म्हणून सुचविलें होतें. तिकडील मंडळी पुण्यास आली होती. पण रा. वासुदेवराव जोशी यांस मी हारतुरे घेत हिंडण्याच्या कामांत तरबेज नाहीं, आतां व्याख्यानें नकोत असें नाहीं पण उत्सव नकोत. इतकेंच माझें म्हणणें आहे. असो.

'लष्करी खर्च,' 'इंग्लंडांतील व येथील चळवळींचें प्रमाण व संबंध' 'राष्ट्रीय शिक्षण' कोणता पाहिजे तो विषय घेऊन एक लेख तयार करावा, व इंग्रजींत विचार तयार आहेतच. राष्ट्रांचे पुढारी राष्ट्रभाषेंत बोलण्यास तयार आहेत. ॅ सिद्ध करण्यास मी काढीत आहे त्या मासिकाचे पहिल्या अंकापासूनच सुरू करा. या दोन्ही कामास अवधी किंवा वायदा मी ऐकणार नाहीं. पहिल्या कामासाठीं जरूर तर समक्ष भेटेन. विलायतेस जाण्यापूर्वीं इकडे यालच कीं नाहीं ? क. लो. अ.

वि. गो. विजापूरकर

मोडी

तूर्त मुंबई श्री

तळेगांव दाभाडा

आषाढ वद्य १२ शके १८३०

२५।७।१९०८

क्रु. सा. न. वि. वि. येथील स्थिति फार भयंकर झाली आहे. सात युरोपियन व दोन हिंदी लोकांचे ज्युरींत याचप्रमाणें मतभेद होऊन रात्रीं १० वाजेपर्यंत कोर्ट लांबवून लष्करी बंदोबस्ताखालीं न्या. दावर यांनीं कडकडून शिक्षा दिल्यामुळें पांढरपेशे लोक अंतस्त्वेषानें जळत आहेत; व गरीब गिरणीवाले प्राणावर उदार होऊन त्या त्वेषाचें प्रदर्शन (हरताळ पाडून) करीत आहेत. मजूर लोक तेंच करीत आहेत. या सर्व हकिकती वर्तमान-पत्रांतून कळतील. आणि मी लिहूनहि पुरणार नाहींत. आपल्या लोकांचें काय होणार हें कळत नाहीं. संथपणानें काम झटून करावें म्हटलें तर सरकारची दडपशाही आड येते. सरकारचें सामर्थ्य जसें अमर्याद आहे तसें त्यांना अंतर्ज्ञान असतें तर रा. टिळकां-वर ते इतकें तुटून पडते ना. अलीकडे त्यांचा माझा सहवास झाला आहे. त्यावरून माझी वालंबाल खात्री झाली आहे कीं, तरुण मुलांच्या बोलण्या चालण्या-पलीकडे व पद म्हणविण्यापलीकडे व तसेंच तालीम करून सशक्त बनण्यासाठीं उपदेश करण्यापलीकडे त्यांची मजल गेली नाहीं. लोकमत जागृत किंबहुना क्षुब्धहि होईल पण अत्याचारास उत्तेजन मिळेल असे त्यांचे प्रयत्न नाहींत. कोणीं तसले विचार काढले तर त्यांना टिळकांनीं 'मूर्ख आहां. असें करूं नये; बोलूंहि नये' असें सांगितल्याचें मला आठवतें. अशा स्थितींत लष्करी अमलाचें प्रदर्शन करून अधिकारी लोक आपलें हंसें करून घेत आहेत. परिणाम ठीक नाहीं. बारिक तेथें तुटणार या न्यायानें फार वाईट वाटतें. आमच्या राष्ट्राचें विनाकारण नुकसान होत आहे. आपल्या अदृष्टाप्रमाणें फल होणार. आपण कर्म करीत राहिलें पाहिजे. पूर्वींच्या घडलेल्या कर्मांसच अदृष्ट म्हणतात. त्याची आज आपणांस माहिती नसते. 'सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा। अहं करोमीति वृथाभिमानः। स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः॥ आमचें काय होईल तें होवो, तूर्त इतकें खरें कीं, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, हे सर्व उत्तम लेख लिहून

लोकमताची सेवा करीत आहेत. सर्वगुण संपन्न कोण आहे? साध्या लेखावरून अशी शिक्षा होणें म्हणजे कायद्याचें रूप भयंकर होणें हें जाणून सर्वांनीं एक झालें पाहिजे. व्यक्तीव्यक्तीमधील गैरसमज बाजूस ठेवून झटावें. तुम्ही तेथें आहांत. इकडील स्थितीविषयीं व माणसा–माणसांच्या हालचालींविषयीं सर्व प्रकारचे लोक—नाना दर्जाचे लोक—विसरतील. विसरलेहि असेल. त्या सर्वांचा विचार राष्ट्रीय व्यापक दृष्टीनें करण्यास तुम्ही समर्थ आहांच. पण बेसावधपणें पूर्वग्रहग्रस्ततेचा परिणाम होऊन कांहीं परपक्षास मदत व ती निराधार सिद्धान्त फैलावून झाली तर देशाचें दुर्दैव आहे. माझ्या मतें लाला लजपतरायाप्रमाणें या वेळींहि कंबर बांधून तुम्ही काम करावें. हें पत्र मी कोणास विचारून लिहीत नाहीं. कोणा मंडळीस माहीतहि नाहीं. विश्ववृत्तांतील लेख ज्याप्रमाणें कोणाचें मत न घेतां लिहितों त्याप्रमाणेंच मी नेहमीं वागतों. वैमनस्य व गैरसमज यांमुळें आमचें फार नुकसान झालें आहे. हल्लींच्या संकटानें सरकारानें टिळकांचा मोठा उपयोग केला आहे. पुष्कळ लोक मागील अनेक गोष्टी विसरून प्रेमानें व सहानुभूतीनें बोलत व लिहीत आहेत. हा एकोपा वृद्धिंगत होवो! व त्यास तुमचें साहाय्य मिळेल तितकें तुमच्या एका खऱ्या हितचिंतकास व मित्रास समाधान होणार आहे.

विद्यालयाचें काम बरें चालेल. हें एक विघ्न आलें आहे, पण माझा परमेश्वराच्या अतर्क्य महिम्यावर पूर्ण विश्वास आहे. मला हळूंहळूं साहाय्य पुष्कळ मिळेल. माणसें निःसीम भक्तीचीं आहेत. नागपुरास होते ते ओक ज. वि. एम्. ए. येऊन मिळाले. रा. नरहर बाळकृष्ण जोशी यांचे शिस्तीच्या कामांत वर्तन आड येतें म्हणून ते फार दिवस टिकणार नाहींत. तुम्ही माझे हितचिंतक म्हणून लिहीत आहें. मी सर्व वादळ संभाळून सावधगिरीनें चालत आहें. काळजी करूं नये. प्रकृतीहि बरी आहे. तुम्ही कांहीं झालें तरी प्रकृतीची हेळसांड करून घेऊं नका. बिकट प्रसंगीं परक्या देशांत एकटे आहां. इकडची स्थिति खरीखुरी कळण्याची मारामार. या सर्व स्थितींत तुमच्याकडून राष्ट्रास व परमेश्वरास मानवेल अशी सेवा होवो! इतकें चिंतून मी हें पत्र थांबवितों. केवळ प्रेमाची परस्परांस अपेक्षा आहे.' इतर गोष्टी कोणीं कोणास देऊन किती पुरतील? कळावें, लोभ असावा ही विनंती.

वि. गो. विजापूरकर

श्री

गोकुळअष्टमी १८३०
तळेगांव दाभाडे
१८।८।०८

कृ. सा. न. वि. वि. मागें पत्र लिहिलें होतें तें पावलें असेलच. आज पत्र लिहीत आहें तसें मोकळया स्थितींत उद्यां किंवा आज रात्रीं लिहितां यइल कीं काय याची शंका आहे.

ज्ञानप्रकाशांत वाचाल त्याप्रमाणें रा. विनायकराव यांस पकडलेंच आहे. आणखी तीन वॉरंटें सुटलीं आहेत. लेख तिसऱ्याचा मासिक पुस्तकाकडे आल्यास पांच सहा महिने झाले असतील. मीं वाचलाहि नव्हता. काल रात्रीं वाचला. मार्चचा अंक जून ४ ला प्रसिद्ध झाला. मी फिरतीवर असतांना रा. वामनराव जोशी, एम्. ए. काम पाहात होते. जुन्या काळच्या विषयावरील लेख आहे. म्हणून फार काळजीपूर्वक वाचलेला नव्हता. पण साधारण पाहून दिला होता.

विश्ववृत्त किंवा ग्रंथमाला किंवा समर्थपत्र या कामावर आमची विशेष आतां नजर नाहीं; मला तर तिकडे पाहण्यास फावत नाहीं, तेव्हां विश्ववृत्त अजिबात बंद केल्याचें जाहिर केलें आहे. कोल्हापूरचा नवा कायदा व बिन-दिक्कत वाटेल तें संकट आणण्याची प्रवृत्ति यांमुळें समर्थहि बंद करून छापखान्याचें स्थलान्तर करण्याच्या विचारांत आम्हीं होतों. तो विनायकराव जोशी यांस पकडल्याची बातमी आली आहे.

अशा दिवसांत कोल्हापूरची जाधव वगैरे मंडळी स्वस्थ बसणें अशक्यच होतें. परंतु साक्षात् माझा संबंध मी बाहेर असल्यानें येगार नाहीं असें वाटलें होतें. परंतु कल्पक व दीर्घोद्योगी माणसांस वाटेल तें हत्यार होतें. असो. बंद झालेल्या महिनेमाल न निघणाऱ्या तीन तीन महिने मागें पडणाऱ्या ६ रु. किंमतीच्या सुमारें दोन तीनशेंवरती वर्गणीदार नसलेल्या व त्यांत पुष्कळ तो भरणा स्नेह्यास. अर्थात् त्यांतील लेख वर्तमानपत्रापेक्षां भारदस्त व प्रमुख सुशिक्षि-तांस विचारास वळण लागावें म्हणून लिहिले गेलेले असें असावयाचें. चेतनेचा

प्रश्न फार कमी. अशा मासिक पुस्तकांवर (मासिक पुस्तकांवर राज्यद्रोहाचा खटला पहिलाच) खटला करा किंवा आम्हांस परवानगी व साहाय्य द्या. म्हणचे आम्ही करूं. असें सरकारास कोल्हापूर दरबार विचारतें व आम्ही करीत नाहीं, तुम्ही करा. आमचा पाठिंबा आहे असें म्हणावें (सर्व तोंडातोंडीं कारभार) अशी वार्ता कळतें. याहून आतां अधिक लिहितां येत नाहीं. कळावें, लोभ असावा हे विनंती.

वि. गो. विजापूरकर

• • •

# टीपा

**पृष्ठ २८ : प्रस्तावना : विजापूरकरांसंबंधींचें लोकमत**

कोल्हापुराहून जुलै १९०६ मध्यें इंग्लंडांत नामदार गोखल्यांना लिहिलेल्या एका पत्रांत विजापूरकर लिहितात : "तूर्त येथेंच मीं एका विद्यालयास प्रारंभ केला आहे. बालविवाहनिषेध करण्यासाठीं मंडळ्या व व्याख्यानें देण्यापेक्षां, विवाहित मुलें घ्यावयाचीं नाहींत अशी अटच ठेवली म्हणजे झालें. असें म्हणून तसें केलें आहे. कोल्हापुरांत या उद्योगास हा माझा म्हणूनच अटकाव करण्याची इच्छा आहे. परंतु लोकांस तो आवडतो. पण आपल्या लोकांच्या सहानुभूतीचाहि कांहीं उपयोग नाहीं. वेळ पडल्यास पाठिंबा देण्यास कोणी तयार होणार नाहीं हें जाणून आहे...शाळेसंबंधानें चोरून चोरून हा प्रयत्न हाणून कसा पाडावा – या शाळेंत हें काय शिकवितील काय कीं, अशी भीति साहेबासाहि पडली आहे कीं काय कोण जाणें !...मला तर, शाळेंत राष्ट्रप्रीति ज्याच्या मनांत उत्पन्न होऊन विशेष खळखळ न दाखवितां कार्यास तयार असतील अशी तरुणांची मंडळी तयार असावी अशी इच्छा आहे. संथ ( मोडी शब्द 'संथ' असावा असें वाटतें-सं. ) शिकवणीशिवाय असा समाज उभारावयाचा नाहीं. विणकाम, सुतारकाम, पुराण, कीर्तन, याज्ञिक, गायन, वैद्यक, घडकाम वगैरे हरहुन्नर करणारे लोक करून त्यांचा समूह खेड्यांतून व्यापार व शिक्षण या कामांसाठीं आपले लोक स्थापणें हा एक उद्योगच आहे. या सर्वांस, ठायीं ठायीं स्वतंत्र, सरकारी मदतीशिवाय चाललेल्या शाळा पाहिजे आहेत असें वाटत आहे. यास ब्रिटिश राज्याचा व आपला वियोग होण्याचें बिलकुल कारण नाहीं. तसा इलाजहि नाहीं. पण त्या राज्यांत आपण सर्व कामें करण्यास तयार झालें पाहिजे....कोल्हापूरची हवा मला बरेच दिवस येथें असल्यानें मानवते व इतर ठिकाणीं दुफळींत जाऊन पडण्यापेक्षां येथेंच उद्योग करावा असें वाटून छापखाना, मासिकपुस्तक, वर्तमानपत्र व ग्रंथमाला वगैरे कामें करीत आहे. पण येथें राहणें म्हणजे पाण्यांत राहून माशांबरोबर वैर करण्यापैकीं आहे. येथील राहणें तें फार जपून वागण्याचें आहे. ... शाळेसंबंधानें पोलिटिकल एजंटास लिहून कळविलें कीं, कांहीं गैरसमजाची गोष्ट असल्यास मला समक्ष विचारून मग मत बनवावें. तें त्यानें कबूल केलें आहे. दरबारला विकलेला माणूस असल्यानें विश्वसनीय नाहीं. खोट्या-नाट्या गोष्टी मुंबई सरकारास

कळवितो. ... एकंदरींत तूर्त कदाचित् कांहीं विघ्न येणार नाहीं. प्रारंभींचें एक वर्ष गेलें म्हणजे आणखी एक दोन शाळा अशा निघतील.”

पुढें याच पत्रांत फंड किंवा देणग्या मिळविण्याची कल्पना मांडून विजापूरकर गोखल्यांना लिहितात, “सरकारचा ट्रस्ट, रजिस्ट्रेशन वगैरेंत पडावयाचें नाहीं असा माझा मानस आहे. इतर मंडळी काय म्हणतात तें कळेल. तंटे-बखेड्यास जड जाईल, कायदेशीर स्वरूप पाहिजे असें कांहीं चाललें आहे. अमेरिकन स्वातंत्र्याचे वेळेस तीन असामींनीं असा खासगी ट्रस्ट केल्याचें माहीत आहे. लोकांनीं त्यांच्यावर विश्वास ठेवून वाटेल तसे पैसे दिले असें काम आमच्या देशांत झालें पाहिजे. आमच्या इलाख्यांत करावयाचें तर डॉ. देशमुख, रा. टिळक यांच्या साहाय्यानें तुम्ही करूं शकाल. तिघांच्या साह्यानें खाजगी विनंतीपत्र व समक्ष भेटींनें कार्य केलें तर पुष्कळ फंड गोळा होईल.”

**पृष्ठ ५७ :** **युनिव्हर्सिटी कमिशन**

**जिकडे पाहिजे तिकडे कॉलेज ! :**

‘थॉट्स ऑन् इंडियन एज्युकेशन’ या नांवाचा शैक्षणिक लेखांचा एक महत्त्वाचा संग्रह विलसन कॉलेजनें मुंबई विद्यापीठाशीं संलग्न होऊन शंभर वर्षें पूर्ण झाला त्या निमित्तानें अलीकडेच प्रसिद्ध केला आहे. त्यांतील अशोक मेहता यांनीं लिहिलेल्या ‘दि युनिव्हर्सिटी ॲण्ड दि मुव्हमेंट फॉर फ्रीडम्’ या लेखांत असें म्हटलें आहे कीं, कर्झनच्या या विद्यापीठ कायद्याचा परिणाम म्हणून १९०२ मध्यें संलग्न कॉलेजांची संख्या १९२ होती ती १९१२ मध्यें १७० झाली! त्याच लेखांत एक खासगी लॉ कॉलेज काढण्याच्या त्या वेळच्या प्रयत्नाला सरकारकडून विरोध कसा झाला तेंहि दिलें आहे. मात्र त्या लेखांतील एका तळटीपेंत जी. एम्. ट्रेव्हेलियन असें छापलें आहे त्याऐवजीं चार्लस एडवर्ड ट्रेव्हेलियन असें असावयास हवें असें वाटतें.

**पृष्ठ ७७ :** **भारतीय विश्वविद्यालय**

**केरूनाना छत्रे :**

पूर्ण नांव विनायक लक्ष्मण छत्रे (१८२४–१८८४). सृष्टिशास्त्र आणि गणित व विशेषतः वेधशाळेंतील ग्रहगणित या विषयासंबंधीं केरूनाना छत्रे यांची

ख्याति होती. त्यांच्याएवढी मान्यता त्या काळांत इतर कोणीहि विद्वान् मिळवूं शकला नाहीं. १८७७ च्या दिल्ली दरबाराच्या वेळीं त्यांना 'रावबहाद्दूर' हा किताब व सुवर्ण पदक मिळालें.

आगरकर त्यांच्यावरील मृत्युलेखांत लिहितात, "वाचकहो, या महात्म्याचें खरें स्वरूप शब्दांनीं व्यक्त करणें दुरापास्त आहे. नाना पेन्शनें घेऊन कॉलेजांतून बाहेर पडले त्या दिवशीं त्यांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांना कडकडून भेटतांना, गहिंवर न सावरल्यामुळें ज्या आम्हांस विलक्षण रडूं कोसळलें त्या आम्हांस, व त्या दिवशीं कॉलेजांत येण्यास घर सोडल्यापासून रडून रडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते त्या नानांस, गुरुशिष्यांमधील खऱ्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव आला."

गणेश जनार्दन आगाशे यांचे 'निवडक लेख' या पुस्तकांतील 'डेक्कन कॉलेजच्या आठवणी' हा इंग्रजी लेखहि केरूनाना छत्रे यांच्याबद्दल प्रि. वर्डस्वर्थ वगैरेंना किती आदर व अभिमान वाटत असे तें दाखवून देणारा आहे.

पृ. १११ :

'दोन गैरसमज' या लेखाची भूमिका स्पष्ट करणारें, विजापूरकरांचें ना. गोखल्यांना लिहिलेलें पत्र परिशिष्टांत दिलें आहे तें पाहावें. पृ. ३६३.

पृष्ठ १२४ : **दोन गैरसमज**

**कर्झन** (१८५९–१९२५), हिंदुस्थानचे व्हाइसरॉय (१८९९ ते १९०५):

हे कर्तबगार असूनहि हिंदी जनतेला अतिशय अप्रिय झाले याची मीमांसा, लोकमान्य टिळकांच्या केसरींतील २९ ऑगस्ट १९०५ च्या अग्रलेखांत उत्तम रीतीनें करण्यांत आलेली आहे. बंगालची फाळणी करण्याचा त्यांचा निर्धार प्रचंड लोकक्षोभास कारणीभूत झाला. खाडिलकरांचें 'कीचक वध' नाटक कर्झनशाहीच्या जुलमाचें स्वरूप व्यक्त करतें.

कर्झननें केलेल्या कांहीं सुधारणा मात्र न विसरतां येण्यासारख्या आहेत. तिसऱ्या वर्गाच्या रेल्वे प्रवाश्यांना डब्यामध्यें संडासाची सोय करून देण्याची जागरूकता कर्झन यांनींच दाखवलेली आहे. पर्वते यांनी लिहिलेल्या इंग्रजी टिळकचरित्रांत कर्झनच्या 'एनशन्ट मॉन्युमेन्ट्स प्रिझर्व्हेशन ॲक्ट' बद्दल त्याला धन्यवाद दिले आहेत.

फुलर :

पूर्व बंगालमधील बारिसाल प्रकरणामुळें प्रसिद्धीस आलेले गव्हर्नर. 'वंदे मातरम्' हें गीत म्हणणें हा त्या वेळीं अक्षम्य गुन्हा ठरविण्यांत आला होता. हें गीत म्हणणाऱ्यांस फटक्यासारख्या अमानुष शिक्षा व कैद होत असे.

पृष्ठ १२८ : टिळक अध्यक्ष कां नकोत ?

टिळक जन्मशताब्दीनिमित्त कांहीं टिळकचरित्रें लिहिलीं गेलीं आहेत. त्यांपैकीं पर्वते यांनीं लिहिलेल्या टिळकचरित्रांत अध्यक्षपदाचा मान टिळकांच्या गळ्यांत पडावा यासाठीं कॉंग्रेसमधील जहाल गट त्या काळांत खटपट करीत होता, असें निःसंदिग्धपणें म्हटलेलें आहे. कांहींहि करून टिळक आपल्यालाच अध्यक्षपद मिळण्याची खटपट करीत आहेत अशी कुत्सित टीका तेव्हां मवाळ पक्षाकडून केली गेली आहे. हिंदुस्थान रिव्ह्यूच्या फेब्रुवारी, १९०८ च्या अंकांत 'टॉपिक्स ऑफ दि डे' या सदराखालीं एक संपादकीय स्फुट प्रसिद्ध झालें आहे. त्याचें भाषांतर असें :

"१९०५ मध्येंसुद्धां मुंबई इलाख्यांतील रत्नागिरी जिल्ह्यांत एका अज्ञात ठिकाणीं एक लहानशी सभा भरली होती. या सभेला फक्त सात भक्तगण उपस्थित होते असें आम्हांला विश्वसनीयरीत्या समजलें आहे. पण बनारसच्या स्वागत कमिटीला मात्र तांतडीनें कळविण्यांत आलें कीं, ना. गोखले यांची बनारस कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून झालेली निवड रद्द समजण्यांत येऊन टिळकांची अध्यक्ष म्हणून निवड व्हावी अशी जनतेची मागणी आहे. १९०६ सालीं अध्यक्ष होण्याची टिळकांची तहान अधिकच वाढली, आणि बाबू बिपिनचन्द्र पाल यांच्यामुळें एक चमत्कारिक समस्या दूर होऊन दादाभाई नौरोजी यांना इंग्लंडहून बोलावून आणण्याचें ठरलें."

पृष्ठ १३१ : टिळक अध्यक्ष कां नकोत ?

वुइल्कस प्रकरण :

जॉन वुइल्कस (१७२७–१७९७) : इ. स. १७६३ मध्यें तिसऱ्या जॉर्जविरुद्ध 'नॉर्थ ब्रिटन' या नियतकालिकाच्या पंचेचाळिसाव्या अंकांत अप्रीति निर्माण करणारा मजकूर लिहिल्याबद्दल वुइल्कसला तुरुंगवास घडणार

होता, परंतु पार्लमेंटचा सभासद या नात्यानें त्याला जे हक्क प्राप्त झाले होते त्यामुळें त्याची कैद वांचली व उलट बेकायदेशीर अटक करण्यांत आली म्हणून त्याला तेव्हां नुकसानभरपाई मिळाली. पुढेंहि त्याच्यावरील खटला टिकूं शकला नाहीं, परंतु वृत्तपत्रांतून त्यानें जी राळ उडविली तिच्यामुळें पार्लमेंटमध्यें निवडून येऊनहि त्याला सभागृहांत प्रवेश नाकारला गेला, असें तीन वेळां घडलें. १७७४ मध्यें अखेर चौथ्यांदांदेखील तो निवडून आला व त्याच्या प्रवेशाला हरकत घेण्याचें पार्लमेंटनें थांबविलें. १७९० पर्यंत तो पार्लमेंटचा सभासद होता.

पृष्ठ १५६ :

शीर्षकामधील शेवटचा प्रश्नार्थक शब्द 'काय ?' चुकून पडला आहे.

पृष्ठ १९२ : **संस्थानी राज्यकारभार**

कूट :

सर आयर कूट (Sir Eyre Coote) १७२६–१७८३ : हिंदुस्थानांत १७५४ मध्यें येऊन कॅप्टनच्या हुद्यावरून चढतचढत हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेच्या लष्कराचा प्रमुख अधिकारी येथपर्यंत कूटनें अधिकारपदें भूषविलीं. लाली या फ्रेंच जनरलचा त्यानें पराभव केला. हैदरअल्लीशीं त्याच्या सैन्याला सामने द्यावे लागले व शेवटीं हैदरअल्लीच्या सैन्याचा पराभव झाला. दरम्यान १७६८ मध्यें तो इंग्लंडांत असतांना पार्लमेंटमध्यें सभासद म्हणूनहि निवडून आला होता.

लेक :

**व्हायकाउंट लेक (१७४४–१८०८)** : मराठ्यांच्या सत्तेचा पाया उखडून टाकण्याच्या वेलस्लीच्या प्रयत्नांत व्हायकाउंट लेकची मदत मोठी झाली आहे. कमांडर-इन्-चीफ व गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचा लेक दुसरा सदस्य होता.

पृष्ठ १९७ :

तळटीप संपादकीय समजावी.

**पृष्ठ २०८ :** **हें धर्मयुद्ध नव्हे !**

**कॉटन :**

सर हेन्री जॉन स्टेडमन कॉटन (१८४५–१९१७) : १९०४ च्या मुंबई येथें भरलेल्या काँग्रेसचे हे अध्यक्ष होते. वंगभंगाच्या योजनेस यांनीं विरोध केला होता.

**पृष्ठ २०९ :**

इंग्रजी कवितेच्या ओळी खालीलप्रमाणें वाचाव्यात.

Milton ! thou shouldst be living at this hour :
England hath need of thee.

**पृष्ठ २४२ :** **बॉम्ब गोळा प्रकरण**

**माणिकतोळा प्रकरण :**

अरविंद घोष यांचे धाकटे बंधु बारीन्द्रकुमार घोष. 'युगान्तर' या क्रांतिकारक विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या पत्राचे संपादक. यांनीं कलकत्त्याच्या माणिकताला बागेमध्यें एक घर भाड्यानें घेऊन वरून दिसण्यास एक आश्रम परंतु गुप्त रीतीनें मात्र क्रांतिकारक पक्ष स्थापन केला. 'युगान्तर' (स्थापना १२–३–१९०६) या पत्रांत ठोशास ठोसा हें तत्त्वज्ञान प्रचारिलें जात होतें. ऑक्टोबर १९०७ मध्यें बारीन्द्रांच्या संस्थेनें चंन्द्रनगर स्टेशनजवळ गव्हर्नरच्या गाडीवर बाँबचा पहिला प्रयोग केला. ६ डिसेंबर १९०७ रोजीं बाँबचा तिसऱ्यांदा प्रयोग करण्यांत आला. किंग्स्फर्ड हे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट या क्रांतिकारकांचें मुख्य लक्ष्य होतें. त्यांनीं आपली बदली मुझफरपूर येथें करून घेतली. खुदीराम बोस व प्रफुल्लचंद्र चाकी या दोन तरुणांना मुझफरपूरला पाठविण्यांत आलें. किंग्स्फर्डच्या गाडींत त्यांचा बाँब पडण्याऐवजीं केनेडी कुटुंबांतील दोन स्त्रिया दुसऱ्या गाडींत होत्या त्या मात्र ठार झाल्या. बारीन्द्रकुमार घोष वगैरे चाळीस मंडळीवर माणिकताला कट म्हणून खटला भरण्यांत

आला. नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधील बाळकृष्ण हरि काणे हे महाराष्ट्रीय तरुणहि या चाळीसजणांत होते. कटांतील लोकांपैकी नरेन्द्र गोस्वामी पोलिसांना फितूर झाल्यामुळें दोन कडव्या तरुणांनीं अलीपूरच्या तुरुंगांत नरेन्द्र गोस्वामीचा पिस्तुलाच्या गोळ्या झाडून ३१ ऑगस्ट १९०८ रोजीं वध केला. बारीन्द्रकुमार घोष हे अर्थातच फांशीं गेले.

हा खटला २ मे १९०८ पासून १२ फेब्रुवारी १९१० पर्यंत चालला.

पृष्ठ २४३ **लजपतराय**

९ मे १९०७ या दिवशीं लाला लजपतराय व आजितसिंग यांस हद्दपारीची शिक्षा झाली.

पृष्ठ २७३ : **ग्रन्थमालेचा उपोद्घात**

गणेश जनार्दन आगाशे यांच्या निवडक लेखांचा एक संग्रह अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें १८३७ सालीं मराठी भाषेंत पहिलें पुस्तक मुंबईंत छापलें गेलें अशी माहिती दिली आहे. विजापूरकर विविध ज्ञान-विस्ताराच्या पुस्तक १०, अंक ३ वरून आपल्या यादींतील कांहीं माहिती मिळाली आहे असें म्हणतात. ती माहिती आगाशे यांच्या लेखाच्याहि आधींची आहे. आगाशे यांनीं १८९८ मध्यें विविध ज्ञानविस्तारांत लेख लिहिला आहे. दोघांनीं दिलेली पुस्तकांची संख्या मात्र तीच म्हणजे ६६१ आहे १८२६ पासून १९०० अखेर स्वतंत्र व भाषान्तरित अशीं मिळून ४,९१२ पुस्तकें मराठी भाषेंत निर्माण झालीं असें आगाशे यांनीं म्हटलें आहे. (ग. ज. आगाशे यांचे निवडक लेख पृ. १०३)

दाते यांच्या ग्रंथसूचीवरून असें दिसतें कीं, विदुरनीति व सिंहासनबत्तिशी हीं पुस्तकें मुंबईंत १८२३ व १८२४ या वर्षीं छापलीं गेलीं.

पृष्ठ २८० : **मराठी भाषेची लेखनपद्धति**

पुढें ग्रंथमालेंतच साने, हातवळणे आणि गोडबोले यांच्या मतांचें खंडन करणारी टीका मोरो केशव दामले यांनीं 'शुद्धलेखन सुधारणा अथवा सरकारी बंडावा' या निबंधामध्यें केली आहे तीहि पाहावी. सानेप्रभृतींनीं जीं अनेक

कारणें शुद्धलेखन सुधारणा प्रतिपादितांना दिलीं त्यांतील एक मोठें मासलेवाईक होतें, तें असें— " ऱ्हस्वदीर्घाचे बाबतींतील सक्तीचा नियम प्रास वगैरे कारणां-साठीं कवीस पाळतां येत नाहीं, म्हणून त्यांस सवड ठेवावयाची आहे, तर... विद्यार्थ्यांचा व इतर सामान्य लोकांचा घोटाळा होतो, म्हणून त्यांसहि वरील सवड कां ठेवूं नये ? " श्री. दामले यांनीं या कोटिक्रमास 'बालिश' म्हटलें आहे, तेंच आजहि म्हणतां येण्यासारखें नाहीं काय ? हा १०६ पानांचा दामल्यांचा लेख ग्रंथमालेंत १९०५ सालीं प्रसिद्ध झाला आहे.

पृष्ठ २८५ : प्रो. मॅक्समुलर

स्वतः मॅक्समुलर यांनींच मोक्ष मुल्लर हें स्वतःचें नामान्तर संस्कृत भाषेंत शोभून दिसण्यासाठीं केलें होतें. आपल्या ग्रंथाच्या आरंभीं कर्त्याचें नांव 'मोक्ष मुल्लर' असें त्यांनीं छापलें आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरहि मॅक्समुलरला मोक्ष मुल्लर म्हणून संबोधीत असत.

बिपिनचन्द्र पाल यांनीं आपल्या आठवणी लिहिल्या आहेत. त्यांपैकीं 'इन् दि डेज ऑफ माय् यूथ' या विभागांत शिवनाथशास्त्री यांच्याबद्दल कांहीं माहिती देतांना बिपिनचन्द्र पाल लिहितात कीं, ऑक्सफर्डबद्दल ओक्षावतरण असें नामकरण पंडित शिवनाथशास्त्री यांनीं केलें होतें.

पृष्ठ २८७ : केकावली

श्रीधर विष्णु परांजपे, बी. ए., कांहीं वर्षे गणिताचे प्राध्यापक, हिस्लॉप कॉलेज, नागपूर, यांनीं केकावलीची सटीक अशी आवृत्ति पहिल्यानें १ नोव्हेंबर १८९७ या तारखेस प्रसिद्ध केली. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत प्रा. परांजपे यांनीं म्हटलें आहे कीं, कै. वामन दाजी ओक यांनीं काव्यसंग्रहाकरितां केकावलीवर विस्तृत टीका लिहिण्याची त्यांना सूचना केली. त्याप्रमाणें एक वर्षभर अभ्यास करून त्यांनीं ही ग्रंथरचना केली. १८९६ च्या मे पासून डिसेंबर-पर्यंतच्या सर्व अंकांत केकावलीवरील ही टीका क्रमशः प्रसिद्ध झाली.

पुस्तकरूपानें ही टीका प्रसिद्ध व्हावी असें वाटण्याचें प्रमुख कारण म्हणजे त्या वेळीं हें काव्य मुंबई विश्वविद्यालयांतील यू. एस. एफ्.च्या परीक्षेस नेमलें

होतें. ‘मद्रास विश्वविद्यालयांतील मराठी भाषा घेणाऱ्या विद्यार्थ्यांस त्याचा फार उपयोग होईल’ असें दुसरेंहि कारण त्यांनीं प्रस्तावनेंत नमूद केलें आहे.

या ग्रंथाची दुसरी आवृत्ति .१९०२ सालीं मार्च महिन्यांत प्रसिद्ध झाली. विजापूरकरांनीं ज्या आवृत्तीवर टीका लिहिली ती हींच आवृत्ति.

याच ग्रंथाची चौथी आवृत्ति १९२५ ची असून तिच्यावर कर्ता म्हणून श्रीरामदासानुदास (श्रीधर विष्णु परांजपे, बी. ए.) असें नांव आहे. या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत परांजपे यांनीं या ग्रंथाच्या चौथ्या आवृत्तीपूर्वींचीं बारा वर्षें ‘श्रीसद्गुरु समर्थांच्या निकटसान्निध्यांत एकान्तवासांत’ घालविलीं असें म्हटलें आहे. पुढें त्यांनीं रामदासानुदास हेंच नांव धारण केलें.

चौथ्या आवृत्तीचीं पृष्ठें सुमारें ८७६ आहेत.

या पुस्तकांत पुरवणी तिसरी म्हणून निवडक विश्वविद्यालयीन प्रश्न दिले आहेत!

**पृष्ठें ३१५ व ३१८ :** **काव्यसंग्रह**

ग्रंथमालेसंबंधीं खटपट करतांना विजापूरकर कधीं कधीं गोपाळ कृष्ण गोखले यांना इतर मजकुराबरोबर ग्रंथमालेविषयींहि कांहीं मजकूर लिहीत असतांना आढळतात. कोल्हापुराहून ४ मे १९०० सालीं लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात, “आमच्या मार्चच्या अंकांत सुचविल्याप्रमाणें गायकवाड सरकारनीं १० प्रतींचा आश्रय एका १००० रुपयांच्या रकमेच्या रूपानें द्यावा असा गायकवाड सरकारास अर्ज केला आहे. खाजगी कारभारी यांनीं हेंच सोइस्कर आहे म्हणून म्हटलें तर काम होईल.”

त्याच पत्रांत पुढें ते लिहितात, “साताऱ्यास कॉन्फरन्सचे वेळीं बराच जमाव जमेल त्या वेळीं हजर राहण्याचें ठरविलें आहे. जमल्यास आमच्या ग्रंथमालेसारख्या प्रयत्नाची गरज काय आहे? हा विषय गोवतां येईल. असो.”

---

पृष्ठ ३०८ ‘स्वामी विवेकानंद व अॅडव्होकेट सेटलूर’ टिळकांवरील १८९७ च्या खटल्याचें पुस्तक बॅ. केशवराव देशपांडे व अॅडव्होकेट सेटलूर यांनीं प्रसिद्ध केलें होतें.

पृष्ठ ३२४ :

श्रीधर गणेश जिनसीवाले:

यांच्याबद्दल परिचयात्मक चांगली माहिती 'जीवनकथा' या श्री. ना. गो. चापेकर यांच्या आत्मचरित्रांत दिलेली आढळेल. विल्सन कॉलेजांतील जिनसीवाल्यांची नोकरी निव्वळ काटयाचा नायटा करणाऱ्या गहजबी सामाजिक मनोवृत्तीमुळें गेली असें त्यावरून दिसेल. विजापूरकर यांनीं जिनसीवाल्यांवरील मृत्युलेखांत पूर्वीं जें म्हटलें तेंच ना. गो. चापेकर यांनीं १९४३ सालींहि म्हणावें याला विशेष अर्थ आहे. चापेकरांच्या जिनसीवाल्यांवरील लेखनांपैकीं शेवटचीं दोन वाक्यें देतों. "जें कार्य विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या लेखांनीं केलें तेंच कार्य जिनसीवाल्यांनीं आपल्या भाषणांनीं केलें. तें कार्य म्हणजे तरुण पिढींत स्वाभिमानाची ज्योत पेटविणें."

पृष्ठ ३३४ :

विश्ववृत्त-प्रास्ताविक

विश्ववृत्त मासिकाच्या पहिल्या अंकांत लोकमान्य टिळक आणि नामदार गोखले यांचे दोघांचेहि लेख वाटेल तें करून प्रसिद्ध करायचेच अशी विजापूरकरांची प्रबळ इच्छा होती. त्याविषयींचें पत्र परिशिष्टांत पाहावयास मिळेल. परंतु तसें घडून आलें नाहीं, एवढेंच नाहींतर गोखल्यांच्याकडून विश्ववृत्तासाठीं लेख मिळालाच नाहीं. तुमच्या मासिकाचा दृष्टिकोण काय राहील वगैरे पृच्छा अधून-मधून गोखले करीत असावेत असें विजापूरकरांना उत्तरादाखल जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांवरून दिसतें. परंतु विजापूरकरांचा गोखल्यांना लेखनाबद्दलचा आग्रह किती जबर होता तें त्यांच्या आणखी एका पत्रांतील खालील वाक्यावरून दिसून येईल.

१६ मार्च १९०६ च्या पत्रांत ते लिहितात, "कसल्याहि विषयावर आठदहा पृष्ठें लिहून पहिल्या अंकासाठीं पाठवावींतच. राष्ट्रीय सभेसाठीं देशांत काम कसें करावें हा विषय आपणांस उत्तम आहे."

पृष्ठ ३३७ :

मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा

महाराष्ट्र साहित्य संमेलनाला मान्यवर सदस्य म्हणून हजर राहणाऱ्या व्यक्तींपैकीं प्रो. विजापूरकर एक होते. विषयनियामक समितींत ते अंतर्भूत असत.

मुंबईस झालेल्या आठव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाची हकीकत महाराष्ट्र साहित्य पत्रिका वर्ष २, अंक ५ मध्यें (त्या वर्षीच्या वि. ज्ञा. विस्ताराच्या बांधीव पुस्तकांत दिली आहे. त्यावरून 'दुय्यम शिक्षणाच्या सर्व विद्यालयांतून दिलें जाणारें शिक्षण देशी भाषेच्या द्वारें दिलें जावें' असा ठराव हरिभाऊ आपटे यांनीं मांडला होता; त्याला प्रो. महादेव रामचंद्र परांजपे यांनीं अनुमोदन दिलें होतें व समर्थकामध्यें प्रो. वि. गो. विजापूरकर आणि सौ. काशीबाई कानिटकर हीं मंडळी होती असें दिसतें. हें संमेलन १९१५ सालीं मे महिन्यांत १६, १७ व १८ तारखांना भरलें होतें. १९१५ सालीं भरलेल्या सम्मेलनापेक्षां ज्या संमेलनासंबंधीं हा लेख त्यांनीं लिहिला त्या संबंधींची त्यांची आत्मीयता किती तरी जास्त असेल हें उघड आहे.

**पृष्ठ ३३८ :** **विद्याभिवृद्धीच्या योग्यतेचा ग्रंथ**

बेकननें Advancement of Learning या नांवाचा जो ग्रंथ लिहिला त्याचा हा निर्देश आहे. हा ग्रंथ बेकननें दोन विभागांत लिहिला आहे.

# महत्त्वाच्या दुरुस्त्या

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १४ | १४ | फार्जील | फाईल |
| ३३ | २१ | थोरपणाचा | धोरणाचा |
| ४२–४३ | ‘ हिंदी स्त्रिया व एकोणिसाव्या ’ ... ते ‘ वगैरे माहिती दिली आहे ’ हा सर्व लहानसा परिच्छेद पृष्ठ ४२ वरील टीपेचाच भाग आहे असें कृपया समजावें. | | |
| ७० | १७ | देशांतले | दशांतले |
| ७७ | १८ | यावयाची | वयाची |
| १३० | ८ | वगळल्याशिवाय | गवगव्याशिवाय |
| १७६ | १६ | कांहीं महत्त्वाचा | कांहीं कमी महत्त्वाचा |
| २०६ | शेवटच्या तीन ओळींतील “ व आम्हांला ते पुन: ... ” वगैरे मजकूर चुकून छापला गेला आहे. लेख ‘ खेदानें म्हणतो. ’ येथेंच संपला आहे असें समजावें. | | |
| २१४ | १ | मस्त | नेमस्त |
| २१७ | १७ | पुढील | पुढारी |
| २३८ | १३ | त्याच्या | त्याच |
| २३९ | १७ | तीस | तीस कोटी |
| २६४ | ३० | आदरणीय | अनादरणीय |
| २६९ | ४ | पूज्यत्वमेव | पूज्यत्वमेष |
| ३३० | १६ | त्यांस त्यांनीं | त्यांस त्यांस |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ९५४५५ वि: विवेध
१३०६ ५०९२ नों० दि० २०।३।७९

REFBK-0013082

नवें प्रकाशन

अर्वाचीन मराठींतील खंडकाव्यें